UNIVERSAL LIBRARY
OU_192410
UNIVERSAL LIBRARY

श्री

# तुकारामबावांचे

## बंधु कान्होबा, मुलगी भागूबाई आणि शिष्य निळोबा

यांच्या

# अभंगांची गाथा.

मना जो गुरू रंक राजा समान। करी कर्म निष्कामबुद्धी विधान ॥
जयाचे कलीकाल वंदीति पाय। ह्मणे वामना त्या गुरू शरण जाय ॥ १ ॥

## तुकाराम तात्या

यांनीं योग्य रचना करून

तत्वविवेचक ग्रंथप्रसारक मंडळीसाठीं छापून प्रसिद्ध केली.

( या पुस्तकाची मालकी सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें प्रसिद्ध करणारानें आपले स्वाधीन ठेविली आहे. )

सन १८९१.

मुंबई:
"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिली.

# प्रस्तावना.

महाराष्ट्र देशांत मुकुंदराजादि जेवढे साधु होऊन गेले. त्यांच्या चरित्रांवरून ( एक रामदासस्वामी शिवायकरून आपआपले सांप्रदाय चालू राखण्यासाठीं शिष्य-मंडळी वाढविली असें दिसून येत नाहीं. त्यांनीं उत्तम पात्र पाहून त्यास अनुग्रह दिल्याचीं उदाहरणें कोठें कोठें आढळतात. परंतु यावरून आपले सांप्रदायमार्गे चालावे म्हणून त्यांनीं त्यांस उपदेश दिला असें ठरत नाहीं.

तुकाराम बावांनीं कोणांस उपदेश दिल्याचा वृत्तांत त्यांच्या जन्मचरित्रांत किंवा त्यांच्या अभंगांच्या गाथेंत सांपडत नाहीं. हे सत्पुरुष कोणत्याही प्रकारें आपणास अहंकाराची उपाधि होऊं नये म्हणून फार सावध असत, आणि देवाजवळ कोणांसही ही उपाधि जडूं नये म्हणून प्रार्थना करीत.—

**"अहंकाराचा वारा नलागो राजसा । माझ्या विष्णुदासां भाविकांसीं"**

असा त्यांचा निश्चय असतां आपला सांप्रदाय मागें चालावा म्हणून त्यांनीं शिष्य केले किंवा कोणांस अनुग्रह दिला असें म्हणतां येत नाहीं, कारण एके समयीं छत्रपति शिवाजी महाराज यांचे शिष्य होण्याच्या इच्छेनें शरण आले असतां त्यांनीं निस्पृहतेनें त्यांस मी लंगोट्या, मळीन आणि कायाहीन मनुष्य आहें, मला कोणास अनुग्रह देण्याचा अधिकार नाहीं, जर तुम्हास आत्मप्राप्तीस्तव उपदेश घेणें असेल तर रामदासस्वामी अमुक ठिकाणीं आहेत तेथें जावें. आणि त्यांचा अनुग्रह घ्यावा असें त्यांस पत्र लिहून पाठविलें.*

आपल्या कुळांत आपला सांप्रदाय चालू रहावा अशीही तुकारामबावांची इच्छा नव्हती. छत्रपति शिवाजी महाराज स्वतः भेटीस आले तेव्हां त्यांस पुष्कळ जवाहिरानें भरलेलें ताट अर्पण केलें† तें त्यांनीं स्वीकारिलें नाहीं. त्यानंतर गांव जहागीर देऊन त्याचें तांब्रपट तुकारामबावांकडे पाठविलें होतें, तेंही त्यांनीं परत पाठविलें; यावरून आपल्या कुळांत ही आपली शिष्यपरंपरा चालूं नये असा त्यांचा अभिप्राय दिसून येतो.

रामेश्वरभट्ट यानें तुकारामबावांचा फार छल केल्यानंतर त्यास अनघडशा फकीराच्या शापानें प्राप्त झालेल्या व्यथेपासून तुकारामबावांनीं मुक्त केल्यावरून तो त्यांस शरण गेला अशी कथा आहे खरी; परंतु त्यावरून तुकारामबावांनीं त्यास अनुग्रह दिला आणि आपला शिष्य केला असें ठरत नाहीं, यद्यपि रामेश्वरभट्ट

---

* आम्ही छापलेल्या तुकारामबावांच्या गाथेंतील अभंग ६३०२ पासून ६३६३पर्यंत पहावे.

† „ „ „ „ ६३११ पासून ६३१७ पर्यंत. पहावे.

त्यांस केवळ परमेश्वरस्वरूप सद्गुरू मानीत होते असें त्यांच्या अभंगां ( गाथेच्या आरंभी छापले आहेत ) वरून स्पष्ट दिसतें.

तुकारामबावा हे भजन करीत असत यास्तव त्यांच्या मागें टाळकरी वगैरे नेमलेली मंडळी असे, तीही विरक्त, प्रेमळ भाविक आणि देवभक्त अशी होती. या मंडळींतील सर्व लोकांवर तुकारामबावांचें फार प्रेम असे, आणि ते तुकारामबावांवर आपल्या जिवापलीकडे प्रेम करीत असत.

हे तुकारामबावांस जरी आपले गुरुप्रमाणें मानीत होते तरी त्यांस त्यांनीं उपदेश दिला होता असें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. हे टाळकरी त्यांचे नुसते अनुयायी असावे असें वाटतें. तुकारामबावांचे मधले बंधु कान्होबा हे या अनुयायांपैकीं नसावे असें अनुमान होतें; कारण निर्याणकाळीं तुकारामबावांनीं आपल्या टाळकरी अनुयायांस शेवटीं निर्वानिरव केली त्याप्रसंगीं असणाऱ्या मंडळीमध्यें कान्होबाचें नांव नाहीं. याशिवाय कान्होबा हे त्यांचे अनुगृहीत होते असेंही कळत नाहीं, परंतु ते तुकारामबावांवर अत्यंत प्रेम आणि श्रद्धा ठेवीत असत. यांनीं जे अभंग केले होते त्यांतील थोडकेच सांप्रत उपलब्ध आहेत ते या गाथेंत छापले आहेत. या अभंगांच्या शेवटील चरणांत आपणांस "तुकयाबंधु" असें दर्शविलें आहे, त्यावरून त्यांनीं आपणांस तुकारामबावांचा ( आपल्या वडीलपणाची पायरी सोडून ) आश्रित असा भाव दर्शविला आहे.

तुकारामबावा कोणास अनुग्रह देण्याविषयीं जरी फार सावध होते तरी त्यांस सच्छिष्य असावा अशी एके प्रसंगीं इच्छा झाली होती असें त्यांच्या खालील अभंगावरून दिसून येतें:—

देवा ऐसा शिष्य देईं । ब्रम्हज्ञानी निपुण पाहीं ॥ १ ॥
जोकां भावाचा आगळा । भक्ति प्रेमाचा पुतळा ॥ २ ॥
ऐशा युक्ति ज्याला बाणे । तेथें वैराग्याचें ठाणें ॥ ३ ॥
ऐसा झाला हो शरीरी । तुका लिंबलोण करी ॥ ४ ॥

कृपा करावी भगवंतें । ऐसा शिष्य द्यावा मातें ॥ १ ॥
माझें व्रत जो चालवी । त्यासी द्यावें त्वां पालवी ॥ २ ॥
व्हावा ब्रम्हज्ञानीं गुंडा । तिहीं लोकीं ज्याचा झेंडा ॥ ३ ॥
तुका तुका हाक मारी । माझ्या विठोबाच्या द्वारीं ॥ ४ ॥

परंतु त्याला त्याचे इच्छेप्रमाणें शिष्य मिळाला किंवा कोणांस त्यांनीं अनुग्रह दिला असें प्रमाण कोठें मिळत नाहीं.

तुकारामबावांस महादेव, विठोबा आणि नारायण असे तीन पुत्र होते. यांशिवाय त्यांस भागूबाई नांवाची एक मुलगीही होती. याच मुलीनें अनघडशा फकीराचा अभिमान (एक चिमटी भर पीठ त्याच्या कोठंब्यांत टाकून तो पिठानें भरून देऊन) हरण केला अशी कथा आहे. या चाऱ्ही मुलांनीं अभंग केलेले होते. त्यांतील कांहीं अभंगांची, दाभाड्याच्या तळेगांवीं एका गृहस्थापाशीं, वही होती तिजमध्यें आढळले होते, परंतु ती वही पुनः तपास करण्यास गेलों तेव्हां आमचे हातीं आली नाहीं, परंतु दुसऱ्या वहीमध्यें जे कांहीं अभंग आम्हांस सांपडले ते या गाथेंत छापले आहेत.

तुकारामबावांचे टाळकरी होते त्यांपैकीं कित्येकांनीं अभंग केलेले होते परंतु ते सध्या आम्हांस आढळले नाहींत. तळेगांवकर संताजी तेली जगनाडे यांच्या अभंगांपैकीं बाण्याचे अभंग प्रसिद्ध आहेत ते आम्हीं तुकारामबावांच्या अभंगांच्या गाथेंत छापले आहेत.

निळोबा नामें एक पिंपळनेरकर ब्राम्हण कुळकर्णी साधु होऊन गेले; त्यांनीं आपण केलेल्या अभंगांमध्यें तुकारामबावांस आपले गुरु अशा संज्ञेनें स्तविलें आहे. हे सत्पुरुष तुकारामबावांच्या टाळकऱ्यां पैकीं होते असें म्हणतात, निळोबांनीं तुकारामबावांस केवळ परमेश्वरस्वरूप सद्गुरू मानून त्यांचें ३३३ श्लोकानें स्तवन केलें आहे. हे श्लोक आह्मीं छापलेल्या तुकारामबावांच्या गाथेच्या आरंभी छापले आहेत. यांशिवाय यांनीं भक्ति, ज्ञान, वैराग्य इत्यादि विषयांवर अभंग केले आहेत, त्यांतून जे कांहीं आम्हांस सांपडले ते आम्हीं या गाथेंत प्रकरणाप्रमाणें छापले आहेत. या अभंगांची वाणी आणि विचार फार गंभीर आणि प्रासादिक आहे. या साधूचें चरित्र लिहिलेलें कोठें आढळत नाहीं.

**सूचना**—ज्या कोणा गृहस्थांपाशीं तुकारामबावांचे बंधु कान्होबा, त्यांचीं मुलें महादेव, विठोबा, नारायण आणि भागूबाई व टाळकरी मंडळी यांचे अभंग असतील ते त्यांनीं लोकोपकारार्थ आम्हांस दिले असतां आम्हीं छापून प्रसिद्ध करूं.

# अनुक्रमणिका.


## अ

### तुकयाबंधु

अगा ये वैकुंठनायका.... .... ३३
अगोचरीं बोलिलों आज्ञेविण आगळे ५६
अनंतजन्में जरी केल्या तपराशी २१
अवघीं तुज बाळें सारिखीं नाहीं तें ७५
असो आतां कांहीं करोनियां सलगी ६४

### निळोबा

अखंड भूतदया मानसीं .... ७७१
अखंडता ते झाली ऐसी.... .... ८५४
अगा ये षड्गुण भाग्यवंता .... ५१२
अगा ये भूवैकुंठपीठा .... .... ५३७
अगा ये नरकासुरमर्दना .... ५५७
अगाध महिमा तुमचा देवा .... ५६३
अगाध कीर्ति वाढले संत .... ६३८
अगाध महिमा पंढरिचा ....१२९४
अग्निची व्हावया शांती .... २८२
अग्निसंस्कार देउनी त्यासी .... ३३३
अचळ धरा तैसें पीठ.... ....१३००
अढळ वैराग्य प्रगटे अंगीं .... ९४०
अर्थ अवघेचि याचे हातीं .... ९६२
अर्थ जाणती अनुभवी.... ....१०८९
अथवा विनंति परिसा देवा .... ५९३
अनाथाची कोण पाववील हाक. ३८७
अनुसरलों जीवें भावें .... .... ४४५
अनुरागें भजती देवा .... .... ६२८
अपार संत झाले क्षितीं .... ९२९
अभिशापासी कारण .... .... ९८८
अभिमानाच्या भुली .... ....१०१८
अमृत गोडिये नाहीं भिन्नपण.... ६४०
अमृताहुनि गोड हरी.... .... ८०५
अयोध्येसी जन्मले राम .... ११०
अर्चुनियां पुंडलिका .... ....११९२
अरूपी रूपाचा विस्तार .... ९४
अलभ्य लाभ ते सत्संगति .... ९०९
अवघीयांचे मनोरथ .... .... १४५
अवघे करुनि जयजयकार .... २९३
अवलोकुनि माझिया भावा .... ३७९
अवगुणी देखिलें .... .... ४६५
अवध्याचि दुःखाचा परिहार .... ५१६
अवघी कळा याचे हातीं .... ६१२
अवघींच अंगें वेष्टोनि ठेलीं .... ७४६
अवघा काळ हेंचि ध्यान .... ८२३
अवघ्या अंगें अवघे झालों .... ९२७
अवलोकिलें कृपादृष्टि.... .... ९६७
अवघीयांचीं ज्ञानें अवघींचि जाणें १०४३
अवघें देखे ब्रह्मरूप .... ....११०२
अवघे वर्ण बावन्न परी.... ....१२८०
अवघें होउनि कांहींची नव्हे ....१३१२
अवघीयांचे असोनि देहीं ....१३१६
अवघोंचि हें कर्मफळ .... ....१३२६
अवघें टाळूनि निमित्त ....१३४७
अवधाची गुणी आहे.... ....१३९८

अश्वरूपिया केसासुर.... .... २९७
अश्व पहातां तो सोज्वळा ....१०२२
अष्टहि दिग्गज आणि दिक्पाळ ११७६
असतें उत्तम सुकृत जरी गांठीं ४१३
असाधारण माझे बोल .... ९७४
असोनी अलिप्त सर्व संगीं .... ९०
असो चरणावरी तुमच्या .... ३३९
असो त्याची मात .... .... ३६८
असो आतां हें बोलणें .... ८२९
असो तूं ऐसियाच्या गोठी ....११९९
अहो कृपेच्या सागरा.... .... १२४
अहो देवा तिमिरनाशा .... ६९
अहो अज्ञान तिमिरनाशा .... ४३०
अहो निर्विकल्पतरु देवा .... ४९१
अहो देवा कृपामूर्ति .... .... ९२८
अहो देवा कृपावंता .... .... ९६६
अहो तुह्मी कृपावंता .... .... ९६९
अहो ऐका भाविक .... ....११७७

# आ

## तुकयाबंधु

आकारवंत मूर्ति .... .... २८
आतां मागतों तें ऐक नारायणा.... ७
आतां कळों आले गुण .... ७९
आतां नराहे क्षण एक.... .... ८८
आतां हें न सुटे न चुके.... .... ९१
आतां चुकलें देशावर .... .... ९७
आली लळिताची वेळ .... ४८

## निळोबा

आईका हो संत तुह्मी मुनेश्वर.... ७४३
आजिवरी काळ वृथाचि गेला....१०३१
आजि पुरलें हो आर्तिचें आरत ....१९३७
आटीतो आटणी करुनी ... ३६७
आठवितां तुमची लिला .... .... ६८
आठवुनियां श्रीकृष्णचरण .... ३०७
आठवला तो माझिया मनीं .... ९४०
आठवितां याचे पाय.... .... ७३६
आठवितां नामें सुखाचीं .... ७८२
आठवितांचि रूप मनीं ....१२८१
आणिखी उपाय सांडियले .... ३६४
आणिक तो युक्ति नाहीं माझ्या .... ४८८
आणिकांसी सांगे आशेचें .... ७०९
आणिखीही याचीं उदंड .... ७०७
आणिखीही उदंड संतजन .... ८१६
आणिकातेंही विठ्ठल करिती .... ९७७
आणिकाची संपत्ती .... ....११२१
आणिकातें उपदेशी ....११४०
आतां आठवूं पाउलें .... .... १०
आतां पाहेन वाडेंकोडें .... १३८
आतां पुढें बाळचरित्र .... २२०
आतां तरी बाळका आणी .... २०९
आतां याचा घेउनी त्रास .... ३७३
आतां पुरवा मनिंचा हेत .... ४०१
आतां यावरी संदेह पुरीं .... ४३९
आतां पुरवा मनिंचा हेत .... ४४०
आतां येउनी सांभाळीं .... ४९७
आतां माझिया भक्तिभावा .... ९१३
आतां कधीं सांभाळाल .... ९३०
आतां माझा अंगिकार .... ९६२
आतांहि जे गाती नामें .... ७६७
आतां तरी विचार करीं ....१००४
आतां अवघे हरिचे जन ....१०९१

आतां निज प्रेमाची हे जाती ....१०६८
आतां अभक्त कातर .... ....११२६
आतां माझ्या सहवासें रहा ....१४२३
आतां मी पुसेन तें सांगारे उमाणें १४३३
आत्मा सकळांचा श्रीहरी ....११८१
आत्मा नाहींची देखिजे ऐसा ....१३१४
आत्मा करीना करवी.... ....१३३६
आत्मा निघोट निर्मळ.... ....१३६१
आदि मग हे अनादि बोली .... ६९१
आधीं भक्त पाठी देव.... .... ६९०
आधींच अविश्वासी जन .... ७१०
आपपरतें नोळखती .... .... ७००
आपणा सारिखे .... .... ८४३
आपणचि ते येती घरा .... ९६८
आपणासमान केलें त्यांसी ....१०१४
आपणा नोळखे .... ....११४२
आप आपणा नेणता .... ....१३३२
आपणा दाउनी भुरळे केले ....१३९१
आपुलिया मनोगतें .... .... ९६
आपुलें तुह्मीं न संडावें .... ४१०
आपुली धणी पुरे तों घ्यावें ....१११०
आबद्ध वाचा मतिहीन.... .... ४
आमोद न सोडी कर्पूर .... ६२२
आमुचा जिवलग सांगाती .... २६१
आह्मां सांपडलें वर्म। हरिभक्तीचें ७६९
आह्मां ताराल जरी श्रीहरि .... ५२९
आह्मां सुखा नाहिंची उणें ....११९१
आह्मीं लेंकुरें लळेवाडें .... ३१०
आह्मीं नेणों भाव कैसा भक्तिरस ४८२
आह्मी तों आपुलें निवेदिलें पायीं ४८३
आह्मी न मागों ऐसा कधीं .... ४९०
आह्मीं दासीं कीजे दास्य .... ४९६
आह्मीं नेणतीं नेणतीं .... .... ५२६
आह्मी देवा भक्तीहीन.... .... ५५१
आह्मी तों जीवें वेंच केला .... ५६०
आह्मी स्वामीचिया बळें .... ७३५
आरतीचें आरत होतें.... .... १८३
आराधिला पुंडलिकें .... ....१२१८
आर्त माझें पूर्ण झालें .... .... १७२
आर्त जीवींचें जाणती.... ....१०७८
आर्त सर्वदां वाहती .... ....१०८०
आला स्वानुभव .... .... ७६३
आला स्वइच्छा पंढरपुरा ....११८७
आले संन्यासी तापसी .... ३१९
आले शरण त्याचा करी प्रतिपाळ ६६९
आले भेटी संतजन .... ....१२१९
आवघ्याची संपत्ति आलिया घरा ४३
आवडोनि रूप मनीं .... .... ६०१
आवडोनि रूप मनीं .... .... ७२०
आवघा टाकोनियां धंदा ....१४४९
आशाबद्ध देखोनियां विटताती ४२४
आशाबद्धा नाहीं मान ....१०४९
आशाबद्धाचिया मुखें.... ....१११४
आहारे काय जोडी केली .... ९८६
आहाडे पाहाडे गे वावुगेची झगडे १९१८
आहे आरुष बोलणें .... ....११११
आळवीन क्षणक्षणां .... .... ३९९
आळवूं आह्मी विठोबासी ....१२८३
आळी करितां नामदेव .... ६३९
आज्ञापिलें जें श्रीहरी ....१०४०
आंगा आणुनि वारें पोरा घालिसी हूमामा .... ....१४९१

आंतु बाहेरी सर्वांपाशीं ....१००२
आंतुबाहेरी देखणाची दिसे ....१३१७
आंधळिया उगवुनि रवि .... ४०४
आंवरुनियां ज्यांनीं चित्त ....१०१९

**इ**

इतर साधनीं उपाव .... .... ९९३
इंद्र चंद्र महेंद्र सर्व .... .... ७९९
इंद्र ह्मणे गा देवदेवा.... .... ३०१
इंद्रादिकां देवां .... ....१२८६
इंद्रियांची पुरली धांव.... ....१३३९

**ई**

ईटे साजीरीं पाउलें .... .... १९४
ईश्वर नियंता निर्गुण .... .... १९
ईसारें गोविला.... .... .... ७४९

**उ**

[illegible]

[illegible] ागलेति उजगरा .... ५७
उदार कृपाळ सांगसी जना .... १३
उभा देखिला भीमातीरीं .... ३४

**निळोबा**

उगाचि राहेन संतांपासीं .... ९९४
उगाचि वदवितां कां गा ....१११३
उगाचि नसे क्षणही भरी ....१४९९
उगेंचि आतां बैसेन मी ह्मणे ....१३९७
उघडली सतज खाणी .... १९९
उच्चारितां नाम वाचे .... ८३९
उचित अनुचित आह्मीं नेणों.... ३३६
उणें पुरें बोलिलों आधीं .... ९४९
उतरिला माझा भार .... .... ७७
उतरिला धराभार .... ....१२९१
उत्तम संचित होतें गांठी .... ९७८
उत्तम अधम नया जें संगती ....१४७०
उत्तीर्ण नव्हीजेचि वेंचतां जीवें .... ८३
उत्तीर्ण त्याचें नव्हिजे आतां .... ९२०
उत्तीर्ण त्याचें काय व्हावें .... २०
उदंडाचें धांवणें केलें.... .... ९६८
उदार ऐसा न दिसेजी दृष्टी.... २७
उदार संत उदार संत .... ९४७
उपदेशिला एकचि सार ....१०६३
उपनिषदांच्या मती .... ....१२८७
उपरम झाला सर्वकाळ इंद्रियां १९९९
उपायाच्या करितां श्रेणी .... ८६२
उपाधीचा उबग आला ....११०३
उभारुनि बाहो ध्वज.... .... ९९४
उभा ठेला ईटेवरी .... ....११६८
उमटलें वरी । होतें .... .... ४४६
उमटलीं खडकावरी .... ....११८९
उमटलीं विष्णुपदें .... ....१२२९
उष्णें न तपेचि सुधाकर .... ८९६
उंचपदीं ठाव.... .... .... ७०

**ए**

**तुकयाबंधु**

एक मागणें हृषीकेशी.... .... ३९

**निळोबा**

एक भूवैकुंठ एक शिवपीठ .... ३९७
एकचि अक्षर वाचेसि येतां .... ३६९
एकदां तरी देखिल्याविण .... ४०६
एक ना दुसरें हो नव्हे तें
मजपाशीं .... .... ....१९९१
एकदां तरी दाखवा डोळां .... ४०७
एकदेशी आह्मी एकट एकलें.... ४२३

एक बैसे सिंहासनीं .... .... ५९२
एकपणाचा घेऊनी त्रास .... ७१९
एक गाऊं आह्मीं विठोबाचें .... ७६२
एक एकाहुनी आगळे .... ९३१
एकचि आशिर्वाद देती .... ९३४
एकचि वचन मानस पायीं .... ९५६
एकलें न कंठवे याविण मज....११४८
एकलेंचि यावें एकलेंचि जावें....१०१०
एकले एकटचि होत ये सदनीं १५३४
एकलाचि हरी .... ....१०१९
एकचि नाम विठोबाचें ....१०६२
एक एका अवलोकिती ....१२१६
एक जोडी बहुतें खाती ....१२४७
एकनिष्ठ झाला भाव .... ....१४५६
एकाक्षरी विस्तार करा .... ३७१
एकाहुनी आगळे एक .... ७५१
एका हरिच्या नामाचि साठीं.... ८१४
एका हरिच्या नामेंवीण .... ९९५
एका विठ्ठलीं ठेविला .... ....११०७
एकाचिया हुंड्या भरी.... ....१२३७
एका पासुनियां हरि .... ....१३४१
एका पासुनि झालें विश्व ....१३९८
एका नामें बहुत तरले ....१३८२
एकी ह्मणती हा आमुचा सांगाती १४६६
एकी ह्मणती हरी आमुचा सोयरा १४६७
एकी ह्मणे हरी आमुचा शेजारी १४६८
एकीं देव अनेकीं देव.... .... ६९९
एकींच नसतां एक पण ....१३२७
एकीं एकटेचि असोनि एकला....१४७९
एकीं एकपणा ठाव .... ....१३३९
एकोबाची सेवा करी .... .... ६४०
एक्या जीवें एक्या भावें .... ८३८
एकंदर देवें आज्ञा केली ....१२६६
एवढा मनिचा पुरवा हेत .... ९७२
एवढासा माझा भाव तो काई.... ७०८


## ऐ

### तुकयाबंधु


ऐकें वचन कमळापति .... ४७


### निळोबा


ऐकतां श्रवणीं परमानंद .... ९०६
ऐकिला तुमचा अगाध महिमा.... ४१२
ऐकिं ऐकपणाचा घेउनियां त्रास १४८७
ऐकोनि गजबजिली दैत्यसभा २१४
ऐकोनियां संतवाणी .... .... ५८८
ऐकोनि संत हांसतील.... .... ६७५
ऐकोनियां दासवाणी .... .... ७४८
ऐकोनियां हरिनामघोष .... ७७९
ऐकोनियां भक्तवचनें .... ....१०५०
ऐकोनि बोल हांसे त्यांचे ....१४१९
ऐक्या रूपें हरिहर .... .... ८२०
ऐशा सोसुनियां यातना ....१००५
ऐशापरि नमन माझें पंढरीनाथा १३७६
ऐशिया सुखाची मांदूस .... ८८८
ऐशीं अगाध चरित्रें याचीं .... २४४
ऐश्वर्याचीं वचनाक्षरें .... .... ८८३
ऐसा चिंतावोनियां मनीं .... २१६
ऐसा वैरियां मुक्तिदानी .... २२६
ऐसा दोहीं स्थळींचा महिमा .... ३५९
ऐसा जोडलिया दातार .... ७३७
ऐसा संतांचा उपकार.... .... ९४४
ऐसा उदार देवदेवो .... ....१२५९

ऐसा आपीं आपरूप .... . ३४०
ऐसा निळा नित्यानंदीं निमग्न केला १३७७
ऐसा बहुतकाळ क्रमिला क्षणांत १४७४
ऐसी विठाई माउली .... .... ५७
ऐसिया वेगडी नका गोवुं आम्हांसी ३३८
ऐसिये सांपडलों संदी.... .... ४३८
ऐसी जोडालिया सत्संगती ....१०८६
ऐसीया सुखामाजी राहीन सुखरूप १५४७
ऐसीयाचे घरीं ऐशिच मी सदा १३३१
ऐसींच देखिलीं उदंडें.... ....११२९
ऐसे याचे आकळ खेळ .... ४९
ऐसे देव आणि ऋषेश्वर .... २२३
ऐसे बैसले रथावरी .... .... ३१४
ऐसे हरिचे दास हरिनामें .... ७५३
ऐसें सांगतां माभळभटा .... २१५
ऐसें पाहुनी मुख अमूप .... २३०
ऐसें विचारुनियां मनीं.... .... २४६
ऐसें जाणोनियां श्रीहरी .... २५०
ऐसें केशियाचें हनन.... .... २५९
ऐसें ऐकोनियां यशोदा .... २७५
ऐसें बोलोनियां ते उन्मत्त .... ३२९
ऐसें ऐकोनियां उत्तर.... .... ६७६

## ओ

### तुकयाबंधु

ओले मृत्तिकेचें मंदिर.... .... ४६

### निळोबा

ओंवाळिती विठोबासी.... ....१२३०
ओंनमोजी पंढिरीनाथा.... .... १
ओंनमोजी विश्वातीता.... .... १८

## अं

अंगकांति प्रकाशली .... ....१२५८
अंगीं ऐश्वर्य येउनी बाणे .... ८४०
अंतरींचें जाणा वर्म .... .... ४०८
अंतरींचा जाणे भेद .... .... ७२४
अंतरींचें मनोगत .... .... ८५९
अंतरींचा जाणती हेत .... .... ९४९
अंतर कोणा नेदी सहसा ....१०४६
अंतरंग माझे गडी .... ....१४४४
अंधकारीं प्रकाश दावी .... ८९३

## क

### तुकयाबंधु

कई देखता होईन डोळीं .... ३६
करूनि आइती सत्यभामा मंदिरीं रे ३०
करूनी उचित .... .... ५१
कनवाळ कृपाळ .... .... ७८
काम क्रोध अहंकार नको देहीं.... १
काय करूं ये लाजा .... .... २३
काय काय करितों या मना .... ३९
काय सांगो हृषीकेशा ऐशी .... ८०
कांहीं विपत्ति आपत्त्या .... ८५
कृपाळ भक्तांचा .... .... ५४
केला अंगीकार पंढरीच्या देवें.... ५५
केली हार्णाळां अंघोळीं .... १२
कोठें गुंतलासी द्वारकेच्या राया २९
कोण या पुरुषार्थाची गती .... १०
कंसरायें गर्भ वधिले सात .... ५८

## क

### निळोबा

कवण्यायोगें तल्लीनता.... .... ६६

कल्पोकल्पीं युगायुगीं.... .... ७१
कळासलेती युगायुगीं.... .... ७२
करितांची सीमा उल्लंघन .... ३१९
कळासलें मनीं तेंची .... .... ३६६
कळासूत्रीं तुझी नाटका नटक.... ३८६
कराल सांभाळ तरी ते तुमची.... ४२७
करीन कैवाड हाची अनुदिनीं ४७९
कराल तरी कृपा देवा.... .... ५०२
करा माझा अंगीकार.... .... ५३९
करूं येईल अंगीकार.... .... ५७३
कवळुनियां कृपा मोहें.... .... ५७६
कळिच्या काळा नागवती .... ८३३
कल्पनातीत झालें मन.... .... ९१६
कथा श्रवणें विरक्ती जोडे ....१०९९
कथा श्रवणें उपजे विरक्ति ....१०९७
कथा श्रवणें स्वरूपसिद्धि ....१०९६
करुनी चंद्रभागे स्नान ....१२४०
कर्मे वांटिलीं चहूं वर्णा ....१०६७
कणाचि आले हे घनदाट ....१२४६
करितां तयां कामधाम ....१४६४
करितां हुसी आतां नये चेंडू १५०२
कपाळ झेटी मिसें बोट लावि-
तोसी लछाटीं .... ....१५१३
कान्होबाचें चाटुनियां आंग ....१४२१
काम क्रोध पळती दुरी.... .... ८३५
काय वर्णूं याचे गुण.... .... ४६
काय विघरुनि केलें पाणी .... ४८
काय द्याल तुझी देवा.... .... ४४८
काय करूं वो भुलविला भुली....१५४०
काय करूं तैसें ज्ञान.... .... ५३६
काय काज कोणा सवें .... ५८०
काय करावीं तप साधनें .... ७६०
काय सांगों सुखानंद झाला .... ७८८
काय त्यांचा महिमा वानूं .... ८३२
काला करिती संतजन ....१२९३
कालि माजुम घेतला होता .... २७२
कावडी भरुनि आणिलीं क्षीरें....१४२८
कासियाचीं बीजें घडिलीं .... ५०
काळया सर्प गजेंद्रनाग .... ५५०
कां जी कृपावंता झालेति निष्ठुर ५२७
कांहींच जाणीव न करावी .... ७
कांहीं करीना हा करवी .... १२०
कांहीं मानदंभासाठीं.... .... ५२४
कांहींचि सदैव दुबळें.... .... ६१३
कांहीं कार्य मांडेल जेव्हां .... ६३२
कांहीं चमत्कार देखती .... ७०९
कांहींचि नहोनि विस्तारला ....१३४९
कांहींच नहोनियां कांहीं एक होता। १४८४
किती तरी चिंता करूं .... ३९७
किंचित् सुख आगळें दुःख .... ९८४
कीर्तनाची आवडी मोठी .... ७४
कीर्तन केलें ब्रह्मानंदें.... .... ७९६
कीर्तनाचा घोष गजर.... .... ७९७
कीर्तनरंगें रंगले जे जे.... .... ७९९

कीर्ति ऐकोनि आलों द्वारा .... ५४६
क्रीडा करी गोपाळपुरीं ....१२६८
कुळवई मर्दुनियां उन्मत्त .... ३२७
कृपावंता सद्गुरुराया .... .... ३५
कृपाघनें वृष्टि केली .... .... ११८
कृपा दीप प्रकाशिला .... १६७
कृपा तुमची फळा आली .... १८७
कृपावंता दया मोठी .... .... ३७२
कृपा करुनी माझी मती .... ३७८
कृपावंत माये तान्हयाचें .... ४७२
कृपाळू भक्तांचा कैवारी .... ५५९
कृपा केली संतजनीं .... .... ९४२
कृष्ण रूपा वेधल्या नारी ....१५५६
कृष्ण बळिराम उठिले .... २३१
कृष्ण बळियांमाजी बलिष्ठ .... ३०६
कृष्ण परमात्मा श्रीहरी .... ३२०
कृष्ण बळिरामातें ह्मणती .... ३२८
केला प्रतिपक्ष आपुल्या अभिमानें ६४३
केला माझा अंगीकार .... ७८१
केला जिहीं नामपाठ .... .... ७८९
केली पायवाट .... .... ८८७
केली कीर्ति अलोलिक ....१२१३
केले सुखी फार .... .... ७८४
केलें तैसें वदलों देवें .... ....१४०३
केव्हां भेटी देसी जीवाच्याजीवना ३८२
कैवल्याचा गाभा .... ....१२८५
कैसा याचा वेध जाणती .... ६८१
कैसा होतो ब्रह्मानंद .... ....१४४८
कैसी सांपडली वेळ .... .... ६९८
कैसी वानूं त्याची थोरी ....११७३
कैसेनि आकळतें मन .... ६८६
कैंची आतां जिवा उरी .... ९२६
कैंची याला बाईल आई ....१३५३
कोटि दिवाळ्या दसरे सण .... ४२
कोटी मदनाचा हा बाप .... १९९
कोटी जन्म वेईन देवा .... ६७०
कोठें विगुंतली नेणों .... .... ४६४
कोठें फावों येतां मग.... .... ८९२
कोठें वसे झाडाचि वरी ....१३२३
कोठें ग्रामीं कोठें पुरीं ....१३२४
कोठेंचि हा नसे कोठेंही नदिसे....१३३२
कोण भाग्याचे ते लोक .... ४०२
कोण करिते समाधान .... ६८७
कोण तया लेखी। नाहीं विठ्ठलीं....११३०
कोणाचीही न धरुनि आशा .... ८०१
कोलें पिकली परलोक पेंठ ....१२४२
कंसें बैसोनियां सभेसी .... २०३
कंसामनीं भयसंचारू.... .... २२४
कंसराया पूजितें नित्य .... ३२२


## ख

### निळोबा


खग मृग राक्षस वान्नर .... ६७३
खाती आपण नें जेविती .... ९६१

खांबसूत्रीं खेळवी दोरी .... २३
खेळवी चाळवी हातीं .... ४७३
खेळविले अंगावरी .... .... ६६८
खेळ मांडी गडियांसवें ....१४१७
खेळीं खेळतांवो विकळ सुंदरा....१९२८
खेळेइटिमेटि नाचे एकाचिपायावरी १४९८
खेळे खेळे झेंपागे आठवी ....१९१६
खेळो कोलकाटि पुढें धांवसील....१९००
खेळों पंडखडे गे बैसोनि निवाडें १९२०

## ग

### तुकयाबंधु कान्होबा

गाऊं वाहूं टाळी रंगीं नाचों उदास ९२
गातों वासुदेव मी ऐका .... ४४
गेले टळले प्रहर तीन.... .... ४९

### निळोबा

गगनीं वसोनियां रवी.... .... ७६
गजेंद्राच्या संगें नाडिया उद्धार.... ८६६
गडियां ह्मणे पाळतां घारें ....१४१८
गणगोत अवघे धन .... .... ६३१
गरुड हनुमंत पुढें सेवेसी ....१२०६
गर्जत नामाच्या कल्लोळीं .... ३०
गर्जविती भगवद्गुणीं .... .... ८८२
गर्जत जाती ब्रह्मानंदें .... ९००
गर्जतां विठोबाच्या नामें ....११०६
गवळी होते राखणाईत .... २४२
गाइलेचि गातां गीतीं .... ९११
गाईन कीर्तनीं गुणनाम पवाडे.... ४८९
गाउनियां आल्हर मुखें .... ४७६
गाय वत्सा देखतां दृष्टीं .... ६३९
गुण लावण्य संपत्ती .... .... १३४
गुण लावण्याची खाणी .... ६६१
गुण वर्णितां भागला शेष ....११९९
गुंतली ते आशा .... ....१०१७
गेला फिरोनियां दिवस ....१०३८
गेलेति आपुल्या ब्रिदातें विसरोनि ४१४
गेलें वेंचोनिया वय याचिपरी.... ३९०
गोड माझी वाणी तुझी करुनि.... ३३९
गोड नाम तुमचें देवा.... .... ९०३
गोड तुमची ब्रिदावळी.... .... ९०९
गोड लागे जें आपणा.... ....१४४२
गोडा गोड तुमचें नाम .... ९०४
गोधनें घेउनी गोपाळ आले ....१४३१
गोपाळपुर निवासिया.... .... ९३८
गोपाळ ह्मणती कान्हा आमुचीं उमाणीं .... .... ....१४३२
गोपाळ विनोदें बोलती.... ....१४३६
गोपीवल्लभा कमलाकांता .... ३८१

गोमटा ह्मणती मानवदेहो .... ३९४
गोमटे पाय देखिले दिठी .... १७७
गोवळ संगें चोरिया करी .... २६८
गोवळ देती उष्टावळी .... .... २८०
गोविलें इंद्रिया पाय दिठी .... ७१८
गंगा पवित्र सर्वा गुणीं .... ....१३४३

## घ

### निळोबा

घडुं जातां अलंकार ........११६४
घडो त्याचा समागम .... ९०८
घनःशाममूर्ति राजीवलोचन .... १७७
घरीं आपुलिये मातेपाशीं .... २६४
घरोघरीं हेची कथा .... .... २०९
घालितां उमाणी पोरा तुमजतीतुज १४९९
घांट गर्जे महाद्वारीं .... ....११९८
घुमघुमिती मोहऱ्या नादें ....१४२६
घेउनियां कात्रिम सोंगें .... .... ९९६
घोकउनी वेदा .... .... ....१२८८

## च

### तुकयाबंधु

चरफडें चरफड शोकें शोक होय ६५
चवदा भुवनें लोक तिन्ही .... ९
चित्तीं बैसलें चिंतन .... .... २२
चुरा चुराकर माखन खाया .... २७

### निळोबा

चढोनियां झाडा पोरा खेळसी सुरकाडी.... .... ....१४९६
चरणीं भागीरथी गंगा.... .... १५९
चऱ्हाटिया दंतकथा .... ....१०६१
चाडिया मुखें दाणा पडे.... ....१०४३
चातुर्य मिरवी कळाव्युत्पत्ति....११३९
चाल ह्मणसी बाईगे खेळों लपंडाई १५२१
चालिले ब्राह्मण वार्ता सांगावया १४७७
चित्त ठेउनि पायांवरी.... ....१४०८
चित्ताचे चिंतनीं मनाचे मननीं....१४५९
चित्तीं माझे पांडुरंग .... .... १७०
चिमणाचि देखिला परि हा .... १८२
चिमणें ठाण कटीं कर .... ....११६९
चिरें आणुनियां वेष्टले .... .... ३१७
चिंतीतों मी चिंतनीं .... .... ३६२
चुचकारुनि गोधनें बैसविलीं ....१४३४
चुबकळोनि काढिलीं.... .... ५४
चोजवीत घरा येती .... .... ९६९
चौदा भुवनें पोटीं .... ....१२७९
चौऱ्यासीं लक्ष योनिप्रति ..... ६८५

चंद्रभागे करितां स्नान .... ....१२२४

## छ.

### निळोबा.

छाया मंडपींचीं चित्रें दीसती ....१३०९

## ज

### निळोबा.

जडला जींवीं तो नव्हेचि परता १४००
जडित मुद्रिका बाहुभूषणें ....१२९६
जडोनियां ठेली .... .... ८४८
जन्म मरणा निवारिती .... २२
जन्म जरा तुटती रोग .... ८१७
जन्मोजन्मीं तुमचे दास ....१४२२
जयाचेनी कृपामृतें .... .... २४
जया जो वांटा भागा आला.... ४११
जयाची तुह्मासी करणें चिंता.... ६६२
जया नाहीं आपपर .... .... ८७१
जया नावंडे पंढरी । निरय ....११९३
जरी तो येईल येथें हरी .... १०३
जरी अवगुणी अन्यायी .... ४६८
जरी झाला तपस्वी थोर .... ९९०
ज्याचा केला अंगीकार। चालवी २६
ज्याचा केला अंगीकार .... ६३०
ज्याचा आहे त्या अभिमान ....१०९२
ज्याचा विश्वास जडला पायीं....१४९९
ज्याची आस करिती लोक .... ७३१
ज्याचीं वचनें ऐके देव .... ९२१
ज्याचें अंतर तया ठावें ....१०९१
ज्याचें देणें त्याचें नाम ....११००
ज्याचें मोक्षा मोक्षत्व देणें ....११७८
ज्याचें करुनियां चिंतन ....१२१७
ज्याचे जैसे भाव तैशा त्या
दाविती .... .... ....१४६९
ज्या ज्या भक्तीं जेथें जेथें ....१३८१
जाईन ह्मणतांची पंढरपुरा ....११९८
जाईल तेथें तेंची फळ.... ....१०४८
जाईजण्याबळें पोरा घालिसी हुंबरी १९०६
जाउनियां भीमातटीं .... ....११९७
जागे आपुल्या उचितावरी .... ८२
जाणतसां जरि अंतरींचें .... ९७६
जाणिवेचा झाला फुंद ....११३२
जाणिवेचें ज्ञान तर्क वादाचें ....११३८
जाणीवची माझी गिळूनि ठेला....१३९९
जाणे पाळूं ळळा .... .... ४७१
जाणे पाळूं ळळा माता स्नेहातुर
बाळा .... .... .... ९३२
जाणे सकळां अंतरिंचा .... ७२९
जाणों जातां तुह्मां जाणीवचि विरे ९७
जाणोनियां मनोभाव .... .... ११४
जाणोनियां मनिचा हेत .... ११९
जाणोनियां मनोगत .... .... ९७४
जातांचि गोकुळा बाहेरी .... ३०८
जारण मारण स्तंभन मोहन ....१०२७
जिकडे तिकडे चाले रवी ....१३९९
जिवाचाही जीव माझ्या शिवा-
चाही शिव .... ....१०३९
जिवलग माझे गडी .... ....१४३८
जिहीं गाइलें हरिचें नाम .... ३२
जिहीं अवलोकिला डोळां .... १९९
जिहीं जोडिला विश्वासें .... ९८६
जिहीं भाव धरिला ठाईं .... ६७१

जिहीं धरुनी हरी मनीं .... ७२९
जिहीं निमिषमात्रें देह पालटिला ८६८
जिव्हाग्रीं ठेवितांची गोड .... १९७
जिव्हाग्रीं ठेवितांची गोड .... ७८९
जीणें मरणें नाहीं आतां .... ६९६
जीव भाव ठेवूं पायीं .... .... ८९७
जीवाचाही जीव तूंचि प्राणाचाही प्राण .... .... ....१३७४
जीवें भावें जोडिलें होतें .... .... ४९
जुनाट पारखी पारखिले ....११६२
जे जे बोलवितां बोल .... .... ३७०
जे जे तुझ्यां शरण आले .... ९१९
जे जे होवुनियां अनुरक्त .... ७७२
जे जे येती वारकरी .... ....१२३६
जेणें माझी वाचस्पति.... .... २९
जेणें मंथुनि क्षीरार्णव.... .... ४७
जेणें पृथ्वीसी धरिलें .... .... १२७
जेणें कीर्तनीं धरिली निष्ठा .... ७९२
जेणें छत्र सिंहासन .... .... ८९८
जेणें रचियेलें भूगोळा ....१२७८
जेणें आणियेली क्षिति ....१२९७
जेथुनियां येणेंचि नाहीं .... ७६८
जेथें जेणें केला वास .... ....१३२२
जेववाल तेंचि जेविन मुखें .... ९६४
जेविं देखोनि सकळां .... ८९
जें जें करिसी तें तें वृथा ....१००६
जें जें बोले तें विकळ ....११३७
जें जें कांहीं होय जाय ....१३११
जैसिया तैसा मिळोनियां .... १२१
जो जो काळ कीर्तनीं जाय .... ७९०
जो देखे एकदां तरी ....१२९७

## झ

### निळोबा

झगमगी काजीवे .... ....१०९०
झाला विरह हे नये देहावरी ....१५३०
झाला विरह अंतरीं कामिनासी१५३२
झाली कीर्तनाची दाटी ....१२०७
झाली भाग्याची उजरी ....११०८
झाले ते ते चमत्कार .... ८००
झालें डोळियां पारणें .... १९०
झेंटि मेटिबाईगे लवे हरिच्यापायीं१५१४

## ट

### निळोबा

टाळ विणे मृदंगेसी .... ....११७१
टिपरियांचे घाईगे नाच सुखेंबाई १५१५

## ठ

### निळोबा

ठायींचा हा ऋणानुबंध.... .... ६५५
ठायीं मीचि नाहीं ह्मणें.... ....११४३
ठेउनियां भावतुमचिये चरणीं .... ३४५
ठेउनियां चित्त पायांवरी .... ५७१
ठेवा पायां पाशीं .... .... ४४२
ठेवाल तेथें राहेन सुखें.... .... ५७०

## ड

### निळोबा

डोळियाचाही डोळा बुद्धि .... ३६

## त

### तुकयाबंधु

तटाचे जातीला नाहीं भीडभार.... १
तिहीं ताळीं हेचि हाक.... .... ९१

तुज ते सर्वे आहे ठावें.... .... ८९
तुझीं वर्मे आह्मां ठावीं नारायणा ७४
तुह्मां आह्मांसी दरुषण .... .... २०
तूंच मायबाप बंधुसखा आमुचा ५०
तूं बळिया शिरोमणी.... .... ३७
तोचि प्रसंग आला सहज .... ९३
तंव ते ह्मणे ऐका हृषिकेशी वो ३२
तंव तो हरि ह्मणे वो निजांगने वो ३१

**निळोबा**

तत्वता नकळे । आलें मनातें....११३४
तप साधन हेंचि माझें .... .... ८२४
तमाळ शामरूप मंडित .... १४२
तरले तों असंख्यात .... .... ७६६
तरले नामें अनेक तरती .... ७७५
तरीच पिंग्या गोडिगे लावोनी आंग १५१०
तरीच बरवंटागे लईलई लखोटा १५१२
तळींवरी सुदर्शन .... ....१२९५
तारुनियां प्रचंड शीळा .... १०८
तारुण्याच्या बळें घेऊं धांवशील झोंबी .... .... ....१४९३
त्याचिपरी हा मुरारी .... २५५
त्याचि माजी होती जाती ....१३१५
त्याचे पायीं माझी बुद्धि .... ८७०
तापत्रयाचें ही हरण .... ....११८९
त्रास उपजे माझिया मना .... ९९७
तिहीं लोकां जें दुर्लभ.... ....११६५
तिहीं लोकीं फुटली हांक ....१२६२
त्रिभुवनपाति अहो देवा.... .... ४३२
त्रिविधाच्या बुद्धि तिन्ही ....१०९९
त्रिवेणीसंगमीं बुडति बहूत .... ३४९
तुकोबाचे कीर्तनमेळीं .... ६४०
तुझिये संगती .... ....१४४०
तुमच्या कृपामृतजळीं .... ९३
तुमच्याचि चरणाचा महिमा .... १०३
तुमच्या पायीं जडतां मन .... १२६
तुमचियाबळें तुम्हांसवें खेळावें ३३७
तुमच्या पायीं माझें हित .... ४३४
तुमचे पायीं आमुचें निज .... ५८१
तुमचीं नांवें गाऊं मुखें .... ६९०
तुमचे चरणीं राहो मन .... ६९२
तुमच्या कीर्तनें पावलों पार .... ८३०
तुमच्या पायीं ठेविलें मन .... ९७३
तुमच्या पायीं ठेवितां चित्त ....१४१३
तुमच्या बळें निशंक मनीं ....१४१५
तुह्मांविण कोणा सत्ता .... ७३४
तुह्मां आह्मां नित्य भेटी .... ६४९
तुह्मी तों कृपेचे सागर .... ३९६
तुह्मी देवा प्रत्यक्ष असा .... ४०६
तुह्मी जाणा अंतरींचें .... ४९८
तुह्मी संत दयाघन .... .... ५७५
तुह्मी दिधलें वैकुंठभुवन .... ६७९
तुह्मी देवा कृपावंत .... .... ६९१
तूंचि पंढरीनाथा .... .... १३३
तेचि संत तेचि संत .... .... ८६९
तेचि धन्य तेचि धन्य.... .... ८९९
तेचि भक्त भागवत .... .... ९६३
तेचि माझे सर्वसाक्षी .... ....१०८८
तेणें दणाणिलें गोकुळ .... २७६
तेथें माझे कायसे बोल .... ६
तेथेंचि बैसलें.... .... .... ८४९
ते ह्मणतीरे हे सुरपतिची .... २९४
तैसींच वत्सें जिचीं जैसीं .... २४०

तैसे तुमच्या योगें थोर .... ९३
तोचि जाणे अंतरिचें .... .... १९८
तोचि वाणिती आनंद.... .... ८७९
तंव त्या करिती शंखस्फुरण .... २०७
तंव त्या रिठीयासी निघाली .... २१७
तंव पातला माध्यान्हकाळ .... २३४
तंव कृष्णाभोंवते गोवळ .... २४१
तंव ते आणिले मागिले गोपाळ २४३
तंव त्या ह्मणेरे गडिहो ऐका .... २८७
तंव आली वार्षिकयात्रा .... २९२
तंव कृष्ण ह्मणे बळिराम देवा ३२१

# द

## तुकयाबंधु

दुःखें दुभागलें ह्रदय संपुष्ट .... ६२
देखिला माय भीमातीरीं .... २९
देवा तुज पैं माझ्या पूर्वजांचें ऋण ८६
देवा मी चांडाळ चांडाळ .... ३८

# द

## निळोबा

दर्शन याचें आदरें घेतां ....११९६
दर्शना धांवोनियां जे येती ....१२२१
दहीं दूध तूप लोणी .... ....१४२०
दळणीं कांडणीं गाईन मंगळीं.... १३
दळणीं दळितां आठवे मानसीं.... १४
दाटलिया थुई आच्छादी .... ४१९
दिवसरात्रीं हाचि धंदा .... १४९
दिव्य तेज मुसावलें .... .... १९६
दिसे तोचि जनीं वनीं.... .... ८९१
दिसे सगुण हा सुरूप सुंदर ....१४८०
दीनबंधु आत्मयारामा .... ३८०
दीन मी अनाथ तुमचें रंक .... ९४
दुजें नेणोनियां कांहीं.... .... ३४
दुभिन्नलें जया पाय .... .... १०
दुर्जन तोचि पुढिलांचें सुख ....१०२
दुरी ठेली कर्माकर्में .... .... १३
दुरी फांकला हा श्रीहरी .... २३
दृढ विश्वासें हरिसी भजतां .... ९२
दृश्य नेणती आभास.... .... ८३६
दृष्टि देखावासाचि वाटे .... ४९१
दृष्टिविण देखणें रसनेविण चाखणें १३६
देउनी भातुकें पुढें .... .... ४७९
देउनियां आपुलें प्रेम.... ....१२०८
देखती लोचनीं । निजात्मया .... १४३
देखतांचि विठ्ठलमूर्ति .... .... १६१
देखतांचि यातें दिठी .... .... १६९
देखतांचि ठसावलें .... .... १९१
देखतांचि ईटेवरी .... ....१३०७
देखती ते विठ्ठलरूप .... ....१९९७
देखिली ते विटेवरी .... .... १९७
देखोनि ते यशोदा ऐकोनि गोष्टी २७४
देखोनियां संतमेळा .... .... ८८९
देखोनियां त्याचा अंतर्भाव ....१४२०
देतां घेतां येतां जातां.... .... ३४४
देतां कांहींचि न घेती .... ६००
देतां कांहींचि न घेती संत .... ८९९
देतां आलिंगन नंदाच्या कुमरा १९२९
देतां शिव्या हांसो लागे ....१४४६
देवपण तुह्मीं गमाविलें देवा .... ४१९
देव चालिला सांगातें.... .... ६०४
देव घरा आला .... .... ६०७
देव आदरें ह्मणे भक्तां.... .... ६०८

देव तोचि भक्त नाहीं वेगळीक ६४६
देव अंगें निराभास .... .... ६९२
देव ह्मणे भक्तराजा .... .... ६७७
देव नसतां भक्तांचीं विघ्नें .... ६८४
देवचि झाले अंगें .... .... ७५०
देव ह्मणे भक्तहो कांहीं तरी .... ७५७
देव हांसोनि बोलती .... ....१४०५
देव प्रगटचि लपाला .... ....१५२४
देव भक्तांचा सोहळा .... ....१२२३
देवामाजी भक्त असे .... .... ६२१
देवादेव मुकुटमणी .... .... ६३४
देवा भक्तां भिन्नपण .... .... ६५६
देवा भेटि संतपण विरे.... ....१५५८
देवासी दासाचा कळवळा .... ६६६
देवावीण भक्तांचें संकट.... .... ६८३
देवाचें वर्म सांपडला भाव .... ७५९
देवासाठीं घेऊनी जोग.... .... ८९८
देवें भक्तांलागीं उपचार मांडिले१५४५
देशकाळ वर्तमान .... .... ४७७
देशें काळें वर्तमान .... .... २७८
दैव आलें त्यांचिया दैवा ....१०८३
दोरीचाचि सर्प पारि होय .... ४१६
दोहीं डोळां अवलोकितां .... १४४
दोहीं डोळां घालुनी वाती .... ५३३
दोष वसे पात्रांतरीं .... ....१३४४
दंभ मान नका। देऊं .... .... ४४३


## ध

### तुकयाबंधु


धन्य ते पंढरी धन्य भीमातीर ६१
धिंदधिंद तुझ्या करीन धिंदड्या ६९


### निळोबा


धनवित्त दारासुत .... ....१३४२
धन्यरूप झाला काळ.... .... ७३९
धन्य त्याची तया माय प्रसवली ८३१
धन्य त्याचा शुद्ध भावो .... ९१५
धन्य काळ आजिचा दिवस .... ९३७
धन्य धन्य पुंडलिका .... ....१२२०
धन्य झालों कृपा केली.... ....१४१४
धराल जरी चित्तीं नलगेची .... ३८५
धराल तरी धरा चित्तीं.... .... ७४२
धरिती ज्याहातीं संत कृपावंत.... ८६५
धरियेला गिरी। सात .... ....१२९०
धरुनी हातीं हात पोरा धरिसी चिकाटी .... .... ....१४९२
धरूनियां श्वासपोटीं सिवो पाहा १५०७
धर्मतरी आहे ऐसा .... .... ५२२
धाडाल तेथें जाईन देवा .... ५७२
धांवोनियां येतों परि नेणें .... ३८४
धांवोनियां येसी .... .... ४६१
धांवोनियां झोंबे कंठीं.... .... ५९५
धांवोनियां वाडें कोडें .... ....११७९
धिक् त्याचें जन्मांतर .... ....११४९
धीट अधिकार कापिरे.... ....१४४३
ध्यानीं रंगलें मानस .... ....१४११
ध्यानीं चिंतनीं मानसीं.... .... १८५
ध्यान राहीलें मानसीं .... .... १८९


## न

### तुकयाबंधु


नमस्कारी भूतें विसरोनि याती.... ८
न मागे न मागे न मागे हरिवीण २४

नये सोमसरी उपचाराची हरी.... ७२
नलगे चिंता आतां अनुमोदन हातां ६६
नाहीं घटिका ह्मणसी.... .... ७७
निनांव हें तुला नांव साजेरे .... ७६
निसुर संसार करून .... .... ८३
नेणे गाऊं कांहीं धड बोलतां वचन ४९
नेत्राची वासना .... .... १४

## निळोबा

न कळती तुझिया मावा .... ८७
नकळे केव्हां दिवस गेला .... १९२
नकळे चित्रअदृष्टाची गती .... २१०
नकळेचि प्रेम याचि गोडी .... ६६३
नकरितीची कांहीं वाणी .... ९६०
नका होवूं खेदक्षीण .... .... ३११
नका पाहूं माझें क्रिया आचरित ४४६
नको पाहों अंत .... .... ४६३
नको बोलों शब्द वावगे विवाद ९७९
नदेखे जो पंढरीनाथ .... ....११९०
नगरी नेली वैकुंठासी .... .... १०९
नघाली मी सांकडें .... .... ४४१
नधरे धीर धरितां मनीं.... .... ८२९
नधरीं आतां शंका .... ....१४०६
नपडे विसर याचा मना .... १८६
नपडे विसर याचा .... .... ९८७
नपडे आतां दिवसराती ....१४१०
नपुरे धणी गुण गातां.... .... १४७
नमार्गो कांहीं तुह्मां धनवित्त.... ३४०
नमियेलीं घरांत घरें .... .... १७
नमों ज्ञानेश्वरा नमों ज्ञानेश्वरा....१४७२
नयेचि साच हा प्रतीती.... ....१३१९
नरकासुरा वधिलें जेणें.... .... ९९८
नरसिंह मेहता गुजराथी ब्राह्मण ६४४
नराहेचि क्षणभरी .... ....१११८
नलगे जाणें वनाप्रति.... ....१०६४
नवल कृपा हे घनवट.... .... ३७
नवलाव हा प्रकाश प्रकाशा वेगळा१८४
नवतों यावरी आतां कोठें .... ७३८
नवलाचि एक वाटे मज.... ....१३९२
नवाटे हें सांगतां खरें.... ....१०७४
नविसंबेचि माउली बाळा .... ४६९
नविसंबे त्यां घटिकापळ.... .... ६१७
नव्हती माझे फुकट बोल ....१४०२
नव्हते एकना दुसरें कांहीं यासी१४९०
नव्हे हे सांगितली मात.... .... २८
नष्टासज्जना एकचि वाट.... ....१०१३
नसतां गुण स्वाभाविक.... .... ६१
नसंडाल तुह्मी आपल्या .... ४२८
नसांपडे ऐसी कधीं .... ....१०३७
नहों अविश्वासी तैसे.... .... ९१८
नाकीं तोंडीं वाहे रुधिर .... ३३१
नाचती विनोदें .... ....१४४१
नाठवी तो स्वयें द्यावी आठवण १०९३
नाढळे कधींही पंढरी। नका सागों ११२८
नातळोनियां नामरूपा ....१३९०
नाना साधनें मंत्रतंत्र.... .... ३४
नाना मतांतरें शब्दाच्या व्युत्पत्ति १०९९
नानातर्के वीचार केला ....११७४
नानामत मतांतरें .... ....११८३
नाना अवतार धरिले जेणें ....१२०९
नाना लोक धांवोनि येति ....१२४९
नाम सांडुनी मुक्ति घेणें .... ५७७
नाम तारक हें श्रीहरी .... ८०४

नामचि एक विठोबाचें.... .... ८१९
नामचिंतनें जडली प्रीति.... .... ९२४
नामधारक हरिचे दास.... .... ९३६
नामस्मरणेंचि श्रीहरी .... ....११८६
नामरूप नातळे ज्यासी ....१२००
नामाचि एक उच्चारिलें.... ....१२१०
नाम वाचे आठविलें .... ....१३८४
नामासाठीं वोपि शांती .... .... १३५
नामाचेचि घोष .... .... .... ७६५
नामापाशीं भुक्तिमुक्ति .... .... ८०३
नामीं गोंवियली वाचा.... .... ३४३
नामें तुमची गाऊं मुखें.... .... ४४९
नामेंचि तुमचीं आळवितां .... ५८३
नामें आळवितां ओठीं.... .... ६७४
नामें तुमचीं गाउनी छंदें .... ७८०
नामें तारिले पातकी .... .... ८११
नामें दोषी अजामिळ .... .... ८१८
नामेंचि पावन केली क्षिती .... ८२२
नारद वैष्णवांचा शिरोमणि .... ७९३
नारद येउनी पंढरीयेसी.... ....१२६७
नारायणा तुमच्या चरणीं .... १०२
नावडे ते जनादेवा .... .... ९
नावडे आणिक.... .... .... १९३
नावडे पंढरी। कथा करी दारोदारीं ११२७
नाहीं तेंचि आणुनि ठेवी.... .... ७८
नाहींचिया डाळमूळ .... .... ८८
नाहीं ऐसें उणेंचि कोठें.... .... १२९
नाहीं उरविलें दुजें .... .... १५१
नाहीं कोठें गोविला हेत .... १७३
नाहींचि तुह्मां भीडचाड .... २७०
नाहीं माझा उरविला .... .... ३६१
नाहींचि केलें समाधान.... .... ३९१
नाहीं घडली कमाई तैसी .... ३९२
नाहीं भजनपूजन केलें .... .... ३९३
नाहीं तुह्मापाशीं कवणेंविशीं.... ४२५
नाहीं लौकिकासीं काज.... .... ४९४
नाहीं उपेक्षिलें कोणा .... .... ४९५
नाहीं कोणा उपेक्षिलें.... .... ५२९
नाहीं लौकिकासीं काम .... ५७९
नाहीं कोणा उपेक्षिलें.... .... ६७२
नाहीं संदेह करी हा पाठ .... ७७६
नाहीं भिन्नत्व उरलें .... .... ८३७
नाहीं तरी संत झकवित कोणा ९५५
नाहीं वारी पळमात्र घडी ....१०४४
नाहीं शब्दाधीन वर्म आहे दुरी १०९६
नाहीं विठोबाचें प्रेम .... ....११२५
नाहीं विश्वास जया गांठीं ....११४८
नाहींचि उरला रिता .... ....१३३७
नाहीं ह्मणतां अवघें तेंचि ....१३६४
नाहीं त्यां उरलें दुजेंकृष्णेंविण १४६२
निजभक्ताचि आवडी.... .... ५८४
निजध्यास लागला मनीं .... ७२६
निज सायासें जोडुनी.... .... ८६१
निजात्मप्रातीलागीं सार .... ७७८
निजानंद मुसावला .... ....११७०
नित्य नूतन गाऊं गुण.... .... ५६७
नित्य श्रीहरीचे आठवितां गुण १५५४
नित्य नूतन तुह्मी नवे .... .... ७०४
नित्य वदनीं हरिचें नाम.... .... ७५४
नित्य कथाश्रवणीं प्रीति ....१०८५
नित्य निरामय सागरीं.... ....११६६
नित्यानंद घोषें करितां.... .... ७८३

नित्यानंदाचिया घरा .... .... ९१०
नित्यानंदापुढें आनंद तो कोण १४८९
निपुण ह्मणती हा आमुचा गुरु ३२१
निरोप मागावया संत .... .... ६०१
निरंतर नाम वदनीं .... .... ४९२
निरंतर तुमच्या नामाचें स्मरण ४७८
निर्गुण निरामय संचलें.... ....१३०१
निर्भय असा माझ्या बळें .... ५८९
निर्भीड बोलणें ज्याचें आपस्वार्थी ११३१
निर्माणचि नाहीं त्याचें काय वर्णावें १३२८
निर्विकार असोनि आत्मा ....१३१०
निर्वैरता सर्वांभूतीं.... .... ....११०१
निवृत्तिनाथासी ठेविलें उन्मनीं ५०९
निवेदिलें पायांपासीं .... .... ५६१
निंदील कोणी मज तो निंदू .... ३९८
निःसीम भाव देखोनि हरी .... ३९१
निराश्रित वाटे मनीं .... ....१५९९
नीच कामीं न धरी लाज .... ६५९
नीच यातीसी संगती .... ....११२०
नित नवा प्रेमा कृपेचिया बळें ....१३९२
नुठेचि मन वरुनियां .... .... १६०
नुरवुनि आतां ठेलों चरणीं ....१३७८
नेऊनियां बळीजेणें घातलापाताळीं १२८९
नेघों आह्मीं कदाभुक्ति आणि मुक्ति ७६१
नेटकेंचि दैव उघडलें आजी ....१३९६
नेणसी अव्हेरूं तरि .... .... ४६२
नेणती ते आप पर........ .... ८३४
नेणा कांहीं तुह्मीं आपुलिया .... ४२०
नेणे आपुल्या हितावरी.... ....१११९
नेणें मी परिहार.... .... ....१४०४
नेणो काय पूर्वार्जित .... .... १६८
नेणोनि आप पर .... ....१११६
नेणोनियां आत्महित .... ....११४१
नेणोनि पारिखे.... .... ....१३४८
नेत्र झांकविले ते हरि .... .... २८३
नेदी त्या दूसरें लागो .... .... ७२३
नेदी करूं काज काम.... .... ७२७
नेमुनियां ठेविलें जेथें .... ....११७५


## प

### तुकयाबंधु.


पत्र उचटिलें प्रयत्नें .... .... ९५
परमानंदा परम पुरुषोत्तम रामा ५९
पवित्र सुदिन उत्तम दिवस दसरा ४१
पूर्वी पूर्वजांची गती .... .... ८२
पहापहा सांवळा कैसा धीटगे ४२
पहा हो कलीचें महिमान .... ११


### निळोबा.


पडतांची तें वचन कानीं ....१४९२
पतना न्यावे जिहीं दोषी .... ७९१
पदार्थ मात्र पाहों जातां .... १७१
पदार्थ मात्रीं आठवे जरी ....१३१८
परम सुखाचा सुकाळ.... .... ६७
परम कृपेचा सागर .... .... ५८५
परमविश्रांती पावली .... .... ६१४
परम कृपावंत हरी .... .... ७३०
परस्त्रीसंगें घडती दोष .... ९८१
परात्परा सच्चिदानंदा.... .... ९
परि तें कर्मबळोत्तरें .... .... २१२
परि हा लावी वाटे श्रुतिचिये.... ३४८
पशुमुखें वेदाच्या श्रुती.... .... १२३
पशुपक्षी श्वापद याती .... .... ९३०

पशुपक्षी जीव श्वापद वनचरें ....१४११
पशूमुखें ज्ञानेश्वरें .... .... ११६
पहा ज्याचें तयाची परी ....१२६०
पळावया न दिसे मार्ग .... .... २८१
प्रताप तुमचा आहेचि जैसा .... ९४५
प्रत्यक्ष जनीं जनार्दन.... ....१०२०
प्रवृत्ति निवृत्तिचे आटुनियां भाग १५१२
प्रवेश राउळा भीतरी.... .... ९९४
प्रसाद तुमचा लाधला आतां.... ४०
प्राणिमात्र पर्वतातळीं.... .... २९८
प्राणी प्राण अर्पे तेथें अर्पी ....१०९४
प्रेमभातें तुह्मां हातीं .... .... ४५८
प्रेम देऊनी सरतें केलें.... .... ५१०
पाचारितां यावें बोळवितां .... ४२६
पाचारितां धांवोनि यावें .... ५१७
पाचारितां पंढरीनाथा ....१५६०
पाडुनि लगोऱ्या चेंडुवाच्या एका घायें .... .... ....१५०३
पाप तया नांव परदारागमन .... ९८३
पापासवें जिणें ज्याचें .... ९८७
पापी आणि दुराचारी .... ६३६
पापें पूर्वज नरका जाती .... ९८२
पायापाशीं जीव । ठेवियला .... ३६३
पायीं लीन होतां निळा .... १३२
पावले ते झाले सुखी .... ९३५
पावलों प्रसाद इच्छा केली तैसी....१३०६
पावले ब्राह्मण अलकापुरासी ....१४७३
पावो माझी हेचि सेवा .... ३४१
पासुनि तुह्मां नवजें दुरी ....१४४५
पाहावीं पाउलें नयनीं हेंचि आर्त ३८३
पाहा भूवैकुंठ पंढरी ....१२१९
पाहाणें पाहातें ....१३५७
पाहिजे तें समयीं देणें .... ८५
पाहों गेलीये वो नंदाच्या नंदना १५५२
पाहोनियां आले ठाव .... ८७६
पाहोनियां सकळ मतांतरें .... ८९४
पाहोनियां हरिकीर्तन ....१०५२
पाहोनि हरिकीर्तन ....११८२
पाहों जातां देखणें तेंचि ....१३६८
पाहों जातां हा नदिसे ....१५२५
पाळुनियां ळळे .... ४६०
पांडुरंगा दयाघना .... ५६७
पांडुरंगा न पाहाती ....११५२
पांडुरंगा तुमची लीला ....१२६१
पांडुरंगें सत्य केला अनुग्रह ....१५६१
पांवा वाजवी मोहरी ....१२२७
पिसाळलें श्वान डसेल भलत्या....११२४
पिंगा ह्मणिजे पिलंगोनि भिर मिरिभिरिऱ्याचे ....१५०९
पुजूनियां पुंडलिकें .... १००
पुढारले विठ्ठल हरी ....१२६५
पुढें ऋषीश्वरांची मांदी .... २२२
पुढें गाईंचीं खिल्लारें .... २७९
पुढें जाणवेल हें पहातां ....१०७५
पुण्य पावन त्यांची वाणी .... ९०५
पुन्हां पेहरंव्याच्या मुखें गे गाई हरी मुखें ....१५१९
पुरातन मी शरणांगत .... .... ९३२
पुष्पवतीच्या संगमीं ....१२२६
पुसे क्षेम भक्तांलागीं .... ५९६
पुंडलीक पूजा करी .... .... ६२६
पुंडलीक ह्मणे देवा .... .... ६२७

पुंडलीक ह्मणे हरी .... ....१२३३
पुंडलीक पांडुरंग .... ....१२३८
पुंडलीकें शेत केलें .... ....१२४४
पुंडलीकें पिकविलें .... ....१२४८
पुंडलीकें आणिला घरा ....१२७२
पूतना ह्मणे भुकेला कान्हा .... २०६
पूर्ण कृपा झाली तया.... .... ६९७
पूर्ण केला पूर्ण केला .... .... ९४८
पूर्णापासुनि झाले आख ....११४६
पूर्वार्जित होतें पुण्य .... .... ४४
पूर्वील कथा अनुसंधान .... २४९
पेहरंब्याचे सोईगे सारविसी भुई १९१७
पोटीचेंचि परी नेणतें बाळ .... ९४३
पोसणाचि परी आवडला .... ६६९
पंढरपुरीं ज्ञानेश्वरीं .... .... ३९६
पंढरीये अनुष्ठान केलें चंद्रें .... ३९८
पंढरिहुनी गांवा जातां .... ६०३
पंढरिये केला वास .... ....१२३९
पंढरपुरा जाऊं चला .... ....१२९१
पंढरिये पांडुरंग .... ....१२७९


## फ

### निळोबा


फळलें तया जन्मांतर.... ....११०४
फिराविसी मान तरी पिंग्याचें महिमान .... .... ....१९०८
फुटलें धरण आला लोंढा .... ३८
फुंकिसी जगा गडिगे तरी घालीं फुगडी .... .... ....१९११


## ब

### तुकयाबंधु कान्होबा


बरवा बरवा बरवारे देवा तूं.... १८
बरारे निर्गुणा नष्टनारायणा .... ६८
बरा जाणतोसी धर्मनीति .... ८४
बहु बोलणें नये कामा .... ९०


### निळोबा


बरवा ओढवला हा रंग.... ....८२६
बरवी आजि हे जोडी झाली ....१४१२
बरवीं हीं गुंतलीं आपुल्या वचनें १४७९
बरा केला अंगीकार .... ....१४०९
बरें जाणवलें मग। करी .... ४७०
बरें होणार ते झाली माझी .... ७०१
बरें झालें शरण गेलों.... .... ९४३
बहुत अवतार घेतलीं सोंगें .... ९६
बहुतें आळिकरें। इनें.... .... ४७४
बहुतां देऊनी अभयदानें .... ९०८
बहुतां दिवसां भेटी आलों .... ९१८
बहुतां येणें नागविलें .... .... ७१९
बहुत भाग्यें भूमंडळा.... .... ९१२
बहुत याचक सांभाळिले ....११९७
बहुरूपि हा एकला .... ....१३३४
ब्रह्म आणि गोवळपणें .... ९२
ब्रह्मसंपत्ति वरी तया.... .... ९३९
ब्रह्मानंदा भरणी आली .... १३०
ब्रह्मा विचार करी मनीं .... २३७
ब्रह्मादिकां न लभे तुमचें .... ४२९
ब्रह्मानंद मुसावला .... ....१०८४
ब्रह्मानंदें गर्जे वाणी .... ....१४१६
ब्रह्मीभूत होते काया .... .... ७४१

ब्राह्मण सोंवळाचि सर्वकाळ ....१३४५
बाप बंधु वेगळा करूनि .... ९८९
बीजा पोटीं महातरू .... ....११९९
बुद्धि जिहीं अढळ केली .... ७३
बुद्धिसि निश्चय नाहीं साचा ....१३२१
बैसला तोचि माझिये ध्यानीं .... १७५
बैसलें आसनीं.... .... .... १९२
बैसला तो ध्यानीं मनीं .... १९८
बैसला होता पाटावरी.... .... २१३
बैसवुनि आले गोधनें आखरी....१४३५
बोलविला बोलें वेद .... .... १५
बोलणें त्याचें तें निःशब्द .... ८५३
बोलणें परमार्थ .... ....११३९
बोलती बोलणें चालती चालणें १४५८
बोलती चालती देखती ऐकती १४६०
बोलाविल्या वांचुनि आला ....१३०४
बोलिलों तें तुह्मां उणें .... ५२३
बोलिलों तें क्षमा करा.... .... ५९३
बोलिले शब्द निश्चयाचे .... ८७४
बोलों जातां वचनाक्षरें .... १५०


## भ

### तुकयाबंधु—कान्होबा


भुक्तिमुक्ति तुझें जळो ब्रह्मज्ञान ७०


### निळोबा


भक्त भावांच्या संपत्ति .... ७५
भक्तस्तवनें जें जें करिती .... १३६
भक्त प्रिये येवो आई .... ४५५
भक्त सेवेच्या उपकारें .... ५९८
भक्त पहावया तांतडी.... .... ६०९
भक्त देव देवतार्चन.... .... ६१८
भक्त पूजिती भगवंता .... ६१९
भक्त देवालागीं झुरे .... .... ६२२
भक्त द्वेषाचीं उत्तरें .... .... ६३३
भक्त करिती तैसा होय .... ६५३
भक्त ह्मणती अहो देवा .... ६८९
भक्त हाका ऐकावया.... .... ७२८
भक्त उत्तीर्णत्वालागीं ....१२०१
भक्त कृपाळू माउली ....१२०४
भक्त देखोनियां श्रीहरी ....१२३४
भक्त आवडी ऐसें रूप ....१२७६
भक्तांचिया गांवा आला .... ६०५
भक्तांलागीं पुढारला .... .... ६१५
भक्तांचिया घरा आला.... .... ६१६
भक्तांचिये मनीं जैसें .... .... ६५४
भक्तांचिया मनोभावा .... .... ६५७
भक्तांघरींचें करीन काम .... ६८०
भक्तांवीण देवा कोण .... .... ६८१
भक्तांवीण देवालागीं .... .... ६८२
भक्तांचि साठीं रूपें धरी .... ६९५
भक्तांचिये भुके .... .... ७३४
भक्तांचाचि वोरस देवा .... ८९१
भक्तां भाग्य घरा आलें ....१२३२
भक्तिपंथें न चले कोणी .... ७११
भक्तिभाव बळकाविला .... ७५५
भक्तिभावचि बांधिला.... .... ७५८
भक्तीं देवातें पूजिलें .... .... ६२०
भक्तीं आराधितां देव .... .... ६९३
भलतेवेळे भलतोंचि करी ....१११७
भवसिंधु तरावया .... ....१००९
भवरोगें जे पडिले लोक ....१०५९
भवसिंधु त्यां पायवाट .... ९२३

भवाब्धीचें सखोल पाणी .... ४३६
भ्याला देव देखोनि भक्तां .... ७५६
भाग्य माझें उभें ठेलें .... .... ६६६
भाग्यहीन द्वाड तया बुद्धि ....१०१२
भाग्याची उजीरी .... .... ८६०
भाग्याचे ते नारीनर .... ....१२३१
भाग्यें जोडे सत्संगती.... .... ९९९
भावभक्ति विलासिया .... .... ९२१
भाव भक्तिचीया प्रीति जेवविला १९४४
भाव भक्तीचा भूकेला.... .... ६१०
भाव शुद्ध तरी .... .... ७२२
भावभक्ती भाग्यवंत .... .... ९९०
भाविकाचा मनोभाव .... .... ८१
भाविकाचें अवघेंचि गोड .... ३९२
भाविकांची उत्तम जाती ....१०८१
भाविक गोवळ .... ....१४९१
भावें पाचारितां विठ्ठल.... .... ७३३
भावें ओजावली भूमिका .... ९९८
भावें आळवितां देवा .... ....१३७९
भिन्न दावूनियां एक .... .... ६२४
भीड भाड जाय उडोनी लौकिक ९८९
भुक्तिमुक्तीचें माहेर .... ....१२३९
भुंकोनियां उठी । श्वान लागे....१११९
भूतीं भगवंत देखिला .... .... ८४१
भूतीं भूतात्मा देखतां .... .... ८९२
भूतीं उपद्रव दीधला .... ....१०६९
भेटवाल पंढरीनाथ .... .... ९७९
भेटावया भक्तजनां .... .... ६२९
भेटी गेला पुंडलिका .... ....१२६३
भेदचि याचा नये हाता ....१३१३
भोगायतन शरीर माझें .... ४३१
भोळा भाव माझा । भाणा .... ३६९
भोळा माझा पंढरिनाथ .... ७४४
भोळा देव दाखविला.... .... ९१७


## म

### तुकयाबंधु कान्होबा


मत्स्य कूर्म शेषा कोणाचा आधार ४
मन उताविळ.... .... .... १९
मनुराजा एक देह पुरी .... ४३
मरोनि जाईन गुण नामावरुनी.... ६
म्हणसी दावीन अवस्था .... ११
मागें असतासि कळला .... ८७
माझ्या भावें केली जोडी .... ९६
मायझवा खर गाढवाचें बीज.... ३
मायबाप निमाल्यावरी.... .... ८१
मुख्य आहे आह्मां मातेचा पटंगा ७१
मूळस्थान ज्यांचें गोमतीचे तीरीं ६७


### भागुबाई


मीरे अपराधी मोठी .... .... १


### निळोबा


मग बोले मंजुळा उत्तरीं .... १९८
मग चरणीं कवळुनियां करतळें २०१
मग वस्त्रें देउनि गौरविला .... २११
मग म्हणती अवघ्याजणी .... २१८
मग ओंवाळुनियां मृत्तिका .... २२९
मग म्हणे गिळिले गोप .... २३२
मग हांसोनि बोलिजे कृष्णें .... २३३
मग धांवोनियां यशोदा .... २९२
मग त्या मिळोनियां सकळ जनीं २६२
मग बैसवुनियां पाटावरी .... २६९
मग लाउनी शिंकियाचा हरी.... २७१

मग पाय ठेउनि खांद्यिं वरी.... २८९
मग पाचारुनियां प्रांतवासी .... २९१
मग सांगे गडियां सुजाणा .... २९३
मग ह्मणे गडियां आपण .... २९७
मग तो उतरुनियां गिरी .... ३००
मग सांगे गुह्य गोष्टी.... .... ३०९
मग लेइले दिव्य अलंकार .... ३१३
मग हळुचि बोले अमृतवाणी.... ४४७
मच्छ कच्छ वराह झाला .... ६४
मच्छ कूर्म वराह झाला ....१२९३
मज तों माझें न कळेचि हित.... ११७
मज हि भीड नुल्लंघवे.... .... ५९९
मज तों सांभाळिलें संतीं ....१०७६
मध्यें परमात्मा श्रीहरी .... २३५
मन माझें बैसलें ध्यानीं .... ९५
मनिचा माझीये संबंध तुटला ....१५९३
मस्तक माझा पायांवरी .... ९३३
मस्तक माझा पायांवरी .... ९७१
महर्षी देव स्तविती ज्यातें .... ५३१
महर्षि सिद्धसनकादिक ....१२८२
महा सुखा पारणें होय .... १६२
महा वैरी निरदाळिला .... १२८
महिमा अद्भुतची पाहतां .... ९८
महिमा याचा चतुर्मुखा ....१२४९
ह्मणती कृष्ण आवडे कैसा .... २६३
ह्मणती दसवंतीये देख देख .... २७३
ह्मणती आजि वांचलों जीवें .... २८४
ह्मणती पाठवावा अक्रूर .... ३०५
ह्मणती नको नको जाऊं .... ३११
ह्मणउनि तुह्मां नित्य आठविती ६४६
ह्मणवितें शरणागत .... .... ६८८
ह्मणवी कामारी .... .... ७७०
ह्मणती ज्यातें परात्पर ....१२०२
म्हणसी कडव सांगे मायचिया १५२२
म्हणे बा गौळणीचिया रागें .... २७७
म्हणे मी येईन तुम्हांसवें .... ५९७
ह्मणोनियां तेथें उगाचि उभा.... २९८
ह्मणोनि याचिया श्रवणें पाठें.... २९
ह्मणोनियां विटलें मन .... .... ३७६
ह्मणोनियां संतजना .... .... ९४६
ह्मणोनियां शब्द न पवेचि तत्वता १३६९
ह्मैसवेलि देतांसेली होसि कासाविस १४९४
ह्मैसीपुत्रामुखें बोलवणें श्रुति .... ८६७
मागण्याची न करूं गोष्टी .... ४९७
मागें ऐकिले पवाडे याचे .... ८४
मागें पुढें अवघा हरी.... .... ३५०
मागें उदंड साधनें केलीं .... ३७५
मागें उदंड जोडी केली .... ४९८
मागें पाळिलीं पोसिलीं .... ५३४
मागें पुढें उभा राहे .... .... ६९४
मागें तुह्मी वांटिलें लोकां ....१२८१
मागें बहुतांसि वांटिलें.... ....१३८०
माझा विठो नव्हेचि तैसा .... ६३
माझा बोल खरा चाल खरा ....११५३
माझ्या मीपणाचा करोनि फराळ १५४३
माझिये वाचेसि नाहीं धीर .... ३
माझिये मनीं विश्रांती वाटे .... १३९
माझिये मनींचा फिटला वेह्रो .... १६४
माझिये मनीं बैसला हरी .... १७४
माझिया भावाचें खंडण .... ३७७
माझिया मनें धरिला विश्वास.... ५०६
माझिया मनास समाधान .... ५९२

माझि मजचि वो पडियेलि भूलि १५४६
माझी बुद्धी झाली वेडी .... ९००
माझी पूजा हेंचि अर्चन .... ९०७
माझे बोल नव्हती फोल .... ४९३
माझें मजचि वो आतुडलें गुज १५३८
माझें माझे हातीं हित.... .... ८५६
माझेंचि मज नवल वाटे ....१३५६
माते बाळिया शिरोमणी .... २८९
माथां मोरपिसें कुंडलें गोमटीं.... १७९
मानामान संकल्प आशा .... ८४४
मायबापा उत्तीर्ण होणें .... २१
माया ह्मणिजे नसतेंचि दिसे ....१३२०
माया ब्रह्मींचा आभास ....१३६०
मार्ग दाऊनि गेले आधीं .... ८८४
मावळली खंती देहीं देहाची .... ८९०
मिरवी अंगीं अवतारलेणीं ....१२९८
मिळाले गोपाळ बैसले पाळीं ....१०७१
मीचि माझा विस्मय करीं .... ९२५
मी ज्या बोलिलों निगुती ....१०८७
मीतों नेणें याची लीला .... ७९
मीतों नेणें व्यासवाणी.... .... ३३४
मीतों दीन नेणें रंक .... .... ४०९
मीतों संतांचें पोसणें .... .... ९७०
मी मज माझियांचा तुटला ....१५४२
मी मज माझें याची केलीवो निरस१४८९
मी माझें पाहतां न देखेचि ....११४५
मुक्तियेती धांवोनियां.... .... ९०२
मुखीं पडतांचि ते शेष ....१२५४
मुगुट कुंडलें वनमाळा .... १५३
मुसावलें मुसे .... .... ....१२०५
मूढमती परि मी बाचे ....१५१८
मूळ डाळ बीजीं अवघे शाखा १३२९
मृतप्राणि ते जीवविले .... १२४
मृत्यूची अवस्था नेणेचि अमृत ४२१
मृदु मधुर वाजवित वेणु ....१४६३
मेळवितांचि हातीं हात .... ३३०
मोकलितां धाय नाईकसी .... ४५६
मोडियेला धनुर्याग .... .... ३१८
मोलें विके स्वभाव गुणी .... ६२
मोहऱ्या पांवे तळालोरी ....१४२९

## य

### निळोबा

यमधर्मही इच्छि भेटी.... .... ७९४
यमुनेचा जो विहारी .... ....१२२८
यशोदा म्हणे वो राजभगिनी.... २०४
यज्ञोपवित सांडिलें दुरी .... २३६
याच पायीं मनोरथ .... ....१०४१
याच्या संगसुखें गर्भवास घेतां १४८८
याचा आश्रय झाला आम्हां .... ८६
याचिया ध्यानें हें चराचर .... १७६
याचिया रूपाचें चिंतन .... ३४७
याचिलागीं हो त्यजियले भोग १५४९
याचिलागीं तुमचा करीतसें धांवा ४८४
याचि अनुष्ठानें ध्रुव .... .... ७३२
याचि लागीं परांगना.... .... ९९१
याची लागीं हरी .... .... ७२१
याचे पायीं धरिला भाव ....११०९
यात्रा फिरोनियां माघारी .... २९९
यात्रे अलकापुरा येती .... ३९४
यात्रेहुनी आले गांवा.... .... ६०६
यापरी करुनियां त्याची गती.... २९६

यारे गडीहो घेऊं धणी ....१४२७
यावरी कंस म्हणे दैत्यादिकां.... २१९
यावरी कोणे एके दिवशीं .... २२७
यावरी म्हणे संवगडीयासी .... २३८
यावरी बगासुराची कथा .... २९४
यावरी गौळणी सुंदरी .... २६०
यावरी गडियांसी खेळत .... २६७
यावरी आपण वृक्षातळीं .... २८८
यावरी कंस भयाभीत .... .... ३०२
यावरी पुढील कार्यार्थू .... ३२९
यावरी बोलती गोवळ.... ....१४३९
यासि पाहतां वो हृदयस्थ पाहिला१४८६
याज्ञीक मंत्रें अवदान देती .... ७०६
येईल चित्तासी तें करा .... ७१२
येईल चित्तासी तुम्हां उचित .... ७१४
येउनि जाऊनी करी गौळणीचें १५३२
येउनियां केव्हां भेटी द्याल .... ४९२
येऊनियां कृपावंतें .... .... ३६०
येउनियां गडी वंदिति कान्हया १४२९
येकलें न कंठेचि म्हणोनिया येणें १४८३
येका येकपण .... ....१५२७
येणें आपुलिया कृपेच्या गुणें ....१५५०
येणें एकलें हो जाणें हि शेवटीं १५३९
येणेंचि साधनें.... .... .... ९९९
येतां देखोनियां भार .... ....१४६५
येतां देखोनियां बळिरामें .... ३१६
येती जाती वर्षती मेघ ....१०३४
येतो जातो न दिसे परी .... ७१६
येती जाती होती मरती ....१३३८
येथील लाभ घडे ज्यासी ....१२७१
येथें येउनि केलें कांहीं ....१००३
येरीकडे गोकुळाभीतरी .... २०२
येरीकडे आनंद गोकुळीं .... २२९
येरे दिवशीं घेऊनी सवें .... २८६
येरें शब्द ते ऐकोन.... .... २६७
योगाभ्यास साधतांचि सांग .... ८१३
योगी चिंतिती चिंतनीं ....११५९


## र

### तुकयाबंधु


राम ह्मणतां काम क्रोधाचें दहन ५


### निळोबा


रत्नखचित पालख .... .... २२१
रसना एकी रस तो नाना .... ९१
राग आला तरी .... .... ४६७
राजा ह्मणे रजकहि गांठी .... ३०४
राजा जाय तिकडे ऐश्वर्य संपत्ति ३५८
रात्रि पळे येतांचि सविता .... ७८७
रानीं वनीं घरीं दारीं.... ....१०००
राया जाणविती सेवक .... ३२४
राहिला उभा इटेवरी.... ....१२१२
राही रुक्मिणी सत्यभामा ....१२७४
राहेन आतां तुमच्या संगें .... ६७८
राहो ध्यानीं मनीं हेंचि नित्य ३४६
राहोनियां सत्संगती .... .... ५७८
रूप देखतांचि लोचनीं .... १५४
रूप राहिलें चिंतनीं .... .... १९६
रूप विक्राळ भयानक .... २९१
रूपीं गुंतलीं मानसें.... ....१३०२
रेखिले निढळीं केशरी टिळक ३२३
रंगले ते संतसंगें .... .... ९५३

# ल

## तुकयाबंधु.


लखलखिलें सुतेज माझिया .... १८०


## निळोबा


लगोरिया मांडुनि पोरा वांटिसील१९०४
लटिक्या भूताची लटिकी .... ४१७
लवेमाजी उत्पन्न एक .... ....१३२९
लाज वाटे जीव करी तळमळ.... ३८९
लाजविली सेवा लाज.... .... ७०३
लाजोनियां समाधीसुख .... ७७३
लाभ अथवा हानी .... .... ७०२
लालुचाई साठीं बाळकाविसी भावा ७३
लुगड्या नांव चंद्रकळा.... ....१०२१
लेवविलें अलंकार .... .... ६६७
लोक सकळही बाहेरी येती .... २९९
लोंढा आला सात्त्विकाचा .... ८०९
लोभियानें धन केलें भूमी .... ४१८
लोहा लागतां सुवर्ण .... .... ६०


# व

## तुकयाबंधु


व्यापिलें सर्वत्र.... .... .... १९
विठलारे तुझे वर्णितां गुणवाद.... १७


## निळोबा


वजनींही नव्हे उणें .... ....११६३
वत्सें वत्स पवनांतरीं .... .... २४९
वदन निमासुरें कडावरीकढ ....१९४१
वदविली अरुष वाणी .... ११२
वदवी असत्याची वाणी ....११२२
वरी तुकीयांचें धूसर .... ....१२२९
वर्णितां चरित्रें न पुरे धणी .... ९९७
वर्णितां महिमा तो अगाध .... ३९९
वर्माचाचि स्पर्श करी.... ....११२३
वसवुनियां चराचर .... ....११८४
वसती पायांपाशीं .... ....१२८४
वस्तुचा जो स्वभाव गुण .... ९९
वळत्या आह्मासी पाठवी ....१४३७
वसुदेव देवकीचिये उदरीं .... १९७
वाउग्या खटपटा नावडती तैशा ९९४
वाचा गुणीं लाचावली ....१९६३
वाचा नामसंकीर्तनीं .... .... ९२०
वाचा वेधली हरिकीर्तनीं .... ७४९
वाचे उच्चारिलें नाम .... .... १४८
वाचे शब्द असत्याचे .... ....१०२९
वाचे बोलविलें देवें .... ....१११२
वाचेतें वदवी रसनेतें चाखवी १३६६
वांटी कवळ श्रीहरि हातें ....१२७०
वांटुनियां गडी चेंडु मांडियली १९०६
वामचरणीं वाहे नीर .... १९८
वायां संतांचीही बोली .... ७१३
वारकरी संत पंढरीस जाती ....१३०९
वाळिलें जें पंढरीनाथें.... ....११९१
विजयध्वज उभारला .... .... ४३९
विटिया दांडु मांडिती खेळा ....१४२४
विटीदांडू भलारे तरीचमारी टोला१९०९
विटेवरी कैवल्यगाभा ....११४७
विठल नामाचा प्रताप.... .... ८०८
विठल नामें वाहे टाळी .... ८४६
विठल विठल वदतां वाणी .... ९९८
विठल नाहीं ज्या ठाउका ....११९४
विठल मूर्ती पाहतां दिठी ....११७२

विठ्ठल विठ्ठल ह्मणोनि छंदें ....११८०
विठ्ठल केणें मागें पुढें.... ....१२४३
विठ्ठल विठ्ठल ह्मणतां वाचे ....१२७३
विठ्ठल नामें विठ्ठल झाले ....१३८३
विठो लावण्याची राशी .... १४१
विठोबा विठोबा नामोच्चार गोड ७८६
विठोजी कृपेचा सागर ....११९०
विद्यामानें गर्वताठा.... ....१०२६
विनवूनियां विठ्ठल देवा .... ९४२
विनंति माझी एकी ऐका ....१२५०
वियोगाच्या दुःखें .... .... ४५९
विश्व अवघें मायाभास ....१३५९
विश्वास माझा जतन करा .... ९१४
विश्वास अंतरींचा जाणोनी .... ९९६
विश्वास याचा न वाटे जया ....१०४७
विश्वासी ते ऐकतां कानीं ....१४९०
विंचु नागी विष धरी.... ....१०३०
वीज पडे गगन गडाडी .... ९२
वेडा नव्हे मुका चतुर शहाणा १३९३
वेडें वांकुडें बोलिलें .... .... ६२९
वेणुनादीं लाभे काला ....१२९६
वेणु वाजवित यमुनेच्या तटीं ....१४८१
वेद वक्ता नारायण .... .... ८
वेद शोधितां शिणले .... ....११६७
वैराग्याचा मेरू तो गोराकुंभार ६४२
वैष्णव वसती जये स्थळीं .... ८७८
वोनमो सिद्धासी नमस्कार ....१४७३
वोरसोनियां भक्तांसाठीं .... ६११
वोवाळुनियां सांडीन काया .... ४१
वंदुनि तुकया सद्गुरूचे चरण....१०६०
व्यापूनियां ठायां ठावो ....१४०१
व्युत्पत्तीचें ज्ञान .... ....११३१

## श

### निळोबा

शकटासुर काळयासी .... ९९
शहाणे तेचि परस्त्री पाशीं .... ९९२
शिंगें काहाळा मोहरी पांवे ....१४४७
शिंपी सोनार चांभार.... .... ८१२
शुक प्रल्हाद हरिच्या नामें .... ८१९
शुकादिकांचिये हृदयींचें ध्यान १४८२
शुद्ध सत्व कैंचा गांठी .... ४३७
शुद्ध सात्वीकी ब्राह्मण ....१३४६
शृंगें पसरिलें जसें शूळ .... २४७
शेते लागीं शेवक झालों .... १६
शोकार्णवीं पाडिलें मन .... ३९५
शोधुनियां आले संत .... ९१९
शोधुनि अन्वय वंशवंशावळी....१५६७
शोषिली पूतना .... .... ....१२९२
श्रवण कथेचें सादर .... .... ८१०
श्रवणीं कुंडलें ढाळ देती ....१२९५
श्रीकृष्ण विचरे कुंजवनीं .... १११
श्रीकृष्ण सांडुनि जातांचि दुरी २००
श्रीकृष्ण स्वरूपा वेधल्या नारी १४५७
श्रीहरीच्या संकीर्तनें .... .... ८४७
श्रुति देवाच्या कणिया खाणें.... ६५८
श्रोते वक्ते होती सुखी .... ११२

## स

### तुकयाबंधु

सकुमार मुखकमळ निज सार ६०
सख्यत्वासि गेलों करीत सलगी ६३

सांडुनि वैकुंठ.... .... .... १३
सुंदर मुख साजिरें .... .... ४०

## भागुबाई

साधूचा संग धरीरे .... .... २

## निळोबा

सकळही संत आराधिती .... १०१
सकळ मंत्रावरिष्ठ सार .... ८०६
सकळ मंत्रामाजी मंत्र उत्तम.... ८२८
सकळसाधना वरिष्ठ सार ....१०६६
सकळा मंगलाचें धाम ....११७७
सकळांचिया नेत्रें तुह्मां सर्वही देखणें .... .... ....१३७९
सकुमार साजिरें ठाण .... १६९
सकुमार सुंदर .... ....११८८
सगुण स्वरूप तुमचें हरी ....१३०८
सगुण निर्गुण कल्पनेचा भास १३७३
सत्य आणि मिथ्या जाणा .... ४८०
सत्यभोळा देवकृपेचा सागर .... ६६४
सत्यासाठीं माझी चाली ....१२२८
सत्याक्षरें माझी वाणी ....१३९४
सद्गदित झाले कंठ .... .... ६०२
सद्गुरु कृपा वोळली तया .... ९४१
सदा सेवकाचा सुकाळ .... ६९
सदा सेवकाचा लाड .... ....१९६४
सदाचा हा धाला सदाचा भुकेला१३३०
सनकादिक ह्मणती देवा ....१२६४
सप्त अहोरात्र होता .... .... २९०
सभे कंस सिंहासनीं .... .... ३३२
समर्था घरीं काम करितां हातीं १०११
समाव नीट दोनी अंगें पोरा लेळें १४९७
समोर सदा सर्वांकडे .... ....१३७१
सये आनंदाचा अवचित आला १९३३
सरलिया खेळा गे ह्मणती १९२३
सर्पें मुखींच धरिलें विष ....१०२८
सर्व काळ तुमच्या पदीं .... १०९
सर्वस्वें उदार.... .... .... १३७
सर्व काळ तेंचि वाटे .... .... १८८
सर्व काळ चित्त ठाईं .... .... ४४४
सर्व गुणीं गुणमंडितां .... .... ४९३
सर्व काळ खती वाटे .... .... ४९४
सर्वज्ञ सर्वदां तुह्मी सर्व साक्षी ४८१
सर्वकाळ जागवीन .... .... ९४७
सर्वकाळीं एकात्मता .... .... ८४२
सर्वतीर्थें चहूं भागें .... ....१२१४
सर्वांतरीं वास याचा .... .... ११९
सर्वांमाजी गगन आहे.... ....१३६३
सर्वीं असतां सर्वपणें.... ....११४४
सहजचि तुमचीं वंदिलीं पाउलें १९६६
सहजची नाम आलें वाच .... ७७४
सहजची होतों उभा.... .... ८८६
सहजची घरींहुनियां यावें ....११९४
सहज गेलों पंढरपुरा .... ....१२४१
स्फूर्ती माझी चेतविली.... .... २
स्नेह सरतां जैसा दीप.... .... २०८
स्वप्नि देखिलें तें जाग्रीतये नाहीं १०३२
स्वामी एक ह्मणवी दास .... ९९१
सारुनि अवघींच मतांतरें .... ९१४
सार्थकाचा ऐसा काळ.... ....१०४९
सांगतां महिमा पंढरिचा .... ६६०
सांगतां आतां न वाटे खरें ....१००८
सांगती एक करिती एक ....१०२४

सांगतों हें मनीं धरा .... ....:७१३०
सांगावें उगऊनी नकळे तयासी ४८९
सांगितलें वर्म एवढाच करीं ....१०६९
सांगितलें संतजनीं .... ....१०७२
सांगीतलो धरिती गोठी ....१४९४
सांगेन तहि धरा अवघे मनीं .... ९८०
सांगेन खूण परि हें नकळे ....१०३२
सांगों जातां शब्दचिविरें .... १६३
सांगों जातां नकळे वाचा .... ७९८
सांगों नवरस लक्षण .... ....१४७१
सांडीयलें बाळा .... .... ४६६
सांडुनि गुणदोषाची मात .... ८९७
सांपडली वाट आम्हां वैकुंठाची ८८९
सांपडली हे सुगमवाट .... ९०४
सांपडला ठेवा आतां पात्र ....११६०
सांभाळिलें बहुतां ऐकिली .... ३८८
सिंधुतनया सवितां पाय .... १०६
सीतबुंद प्राप्त ज्यासी.... ....१२६९
सुकाळ झाला नारीनरां ....११९३
सुकृताचा होतां सांठा .... १४६
सुखवाटे परि हें दुःख भोगवी १००७
स्थिरावल्या वृत्ति पांगुळला प्राण १९६९
सुखानंदाची राणीव .... ....१०३६
सुखाचींच ओतली .... .... ८४९
सुखी केलें सुखी केलें.... .... ८६३
सुखीं सांठविलें सुख .... .... ३९
सुखें जन्मांतरें घेऊं .... .... ९८२
सुखें भिक्षा मागोन खावें .... ८००
सुखें करावें भोजन .... ....११०९
सुदर्शन धरिलें शिरीं .... ....१२९९
सुदिन होय साधकांसी .... ८७२
सुना कमरी आमुचे घरीं .... २१९
सुफळ जिणें हरिच्या भजनें .... ४७७
सुहास्य वदन तुटती तारे .... १४०
सुरवर इच्छा करिती त्यांची .... ९४९
सुरदास आंधळा पंजाबी ब्राम्हण ६४९
सुरकाडी बैसोनि खोडी चढसी १४९९
सुंदर उटी मलयागरें.... ....१२९७
सूर्य बिटला प्रकाशासी .... ९८
सूर्य प्रकाशाचा नेणेचि महिमा ४२२
सूर्य न देखे अंधःकारा .... ८९९
सेल दिलीमागा ऐसी .... .... ४९०
सवकाच परि स्थापिला पदीं.... ९४४
स्नेह सरतां जैसा दिप .... २०८
सैंध दाटलीं अक्षरें .... .... १२८
सोडविलीं ऐसीं बहुतें आयकें.... ४८७
सोडुनि तया न वचे दुरी .... ५९०
सोडोनियां चाती पोतीं .... ९९९
सोनें अस सोनेपणें .... ....१०३३
सोयरा श्रीहरि .... .... ९१
सोरत आलों तुमच्या नामें .... ४००
सोंवळ्या नांव क्षीरसागर ....१०२३
सोहळा तो देखोनियां ....१०९३
संचित प्रारब्ध क्रियमाण ....१०७०
संत कृपा वरदबळें .... .... १२
संत गाती सनकादिक .... १०७
संत वचनें खरीं होतीं.... .... ९३९
संत रूपें तुम्हीचि धरा .... ६३७
संत एकांतीं बैसले.... .... ८०७
संत ऐकती निवाडे.... .... ८२७
संत संगें हरे पाप .... .... ९३८
संत कृपा त्यांसीचि फळे ०६१

संत वोरे आले घरी .... .... ९९२
संत आज्ञा सादवित .... ....१०३९
संत कैसेनि भेटती .... ....१०७९
संत प्रसाद लाधले .... ....१०८२
संत भेटीचें आरत .... ....१२०३
संत सनकादिक देव .... ....१२२२
संत येताति सनकादिक ....१२९२
संतांपासी अपार सुख.... .... ८७९
संतांचा वास जये स्थळीं .... ८८१
संतांपासीं आर्त याचें.... .... ८९०
संतां ऐसा उदार एक .... ९११
संतांचिया समागमें .... .... ९२८
संतीं सांगितलें मज .... .... ११
संतीं जया हातीं धरिलें .... ९६४
संतीं केला अंगी कार .... ९६५
संती ठेविलें निश्चळ ठाईं .... ९६६
संतोष तरूचें हें फळ.... ....१०५८
संवर्तक वर्षेल जळ धारिं .... २९६


## ह

### तुकयाबंधु कान्होबा


हम उदास तिन्हके सुना हो .... २६
हळु हळू जाड होत चालिलें ९४


### निळोबा


हरावया कलिचे दोष .... .... ८७३
हरिरूप ध्यानी हरि नाम .... ७५२
हरिचें नामचि एक पुरे .... ७६४
हरिचें मनोहर कीर्तन.... .... ३१
हरिच्या पढोनियां नामावळी .... ८०२
हरिची कथा अमृत रस .... ८२१
हरिभक्त माझे जिवलग सांगाती ८६४
हरिकीर्तनाच्या योगें .... .... ८८०
हरिच्या नामें हरिचे दास .... ९०१
हरिच्या पढोनि नामावळी .... ८०२
हरिच्या भजनें हरिचे भक्त .... ९०३
हरिचिया भजनें हरिचे जन .... ९०८
हरि भक्तीच्या जाणोनि नीति.... ९१३
हरिच्या पायीं विश्वासले ....१४९३
हरिवीण आहे कोण .... ....१३०१
हरुनियां ध्यावें चित्त .... ७१८
हागे पहा इटे उभा .... ....१३०३
हाचि उपाव सुगम सार ....१०१६
हात पाय इंद्रियें मिळोनि मेळा १३६५
हातीं चक्र सुदर्शन .... .... ९५
हातीं घेतला चिताक .... ....१५२६
हा तों तुमचा सहज गुण .... ५४८
हिंडवितां देश .... ....११६१
हेचि चिंता दिवस रातीं .... ४३३
हेंचि परमार्थाचें सार .... .... ७७७
हेंचि त्यांचें नित्य काम .... ८७७
हेंचि आम्हांसी गुरुगम्य .... ३३
हें देखोनियां गोवळ .... .... २४८
होईल अंगीं बळ तरी .... ....११३२
होऊनियां निश्चळ .... ....१४०७
होऊनियां तेचि राहिले निवांत १३७०
होतां कृपा तुझी पशु बोले वेद १४७८
होतें तेसें पायीं केलें निवेदन ....१५६८
होतें पूर्वार्जित उत्तम संग्रहीं .... ७४०
होत लेउनियां आर्तिचें अंजन १५३५
होते बहुत दिवस आर्त वागवित १५३६
होय अंतरीं पालट .... ....१००१
होवोनियां निश्चळ .... ....१४०७

# तुकारामबावांच्या शिष्यांच्या
# अभंगांची गाथा.

## तुकयाबंधु कान्होबा यांचे अभंग.

### स्फुट अभंग.

॥ १ ॥ काम क्रोध अहंकार नको देहीं । आशा तृष्णा माया लज्जा चिंता कांहीं ॥ वास पंढरीचा सदा देईं । आणीक दुजें मागणें तुज नाहीं ॥ १ ॥ देईं दान हरि मज कृपा देईं दान । नासीं तिमिर दाखवीं चरण ॥ आर्त पुरवावें भेटी देऊन । नको उपेक्षुं आलिया शरण ॥ २ ॥ नाम अखंड हृदयीं राहो वाणी । न पडो विसर क्षण जागृति स्वप्नीं ॥ संतसमागम ऐसा दे लावुनि । आणीक दुजें कांहीं नेणें तुजवांचूनि ॥ ३ ॥ पंथपुरिंचा रविसुत पुरे आतां । आड करावा भवसिंधु ऐसा नव्हता । नाहीं आडताळा त्रैलोक्यामाजी सरता । विनवी तुकयाबंधु चरणीं ठेवूनि माथा ॥ ४ ॥

॥ २ ॥ तटाचे जातीला नाहीं भीड भार । लाता मारी थोर लाहान नेणे ॥ १ ॥ परी त्या विशेष मनुष्य होऊनि । करी खंड मान वडिलांचा ॥ २ ॥ बेरसा गाढव माय ना बहीण । भुंके चवीविण भलतेंचि ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे बोकड मातले । विचारी आपुले तोंडीं मुते ॥ ४ ॥

॥ ३ ॥ मायझवा खर गाढवाचें बीज । तें ऐसें सहज कळों येतें ॥ १ ॥ अपमानिलें जेणें श्रेष्ठाचें वचन । तेचि त्याची खुण ओळखावी ॥ २ ॥ मद्यपी तो पुरा अधम यातीचा । तया उपदेशाचा राग वांया ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे पिसाळलें सुनें । आप पर तेणें न विचारावें ॥ ४ ॥

॥ ४ ॥ मत्स्यकूर्मशेषा कोणाचा आधार । पृथिवीचा भार वाहावया ॥ १ ॥ काय धाक आह्मां कासयाची चिंता । ऐसा तो असतां साहाकारी ॥ २ ॥ शंख चक्र गदा आयुधें अपार । वागवितो भार भक्तांसाठीं ॥ ३ ॥ पांडवां जोहरी राखिलें कुसरी । तो हा बंधुचा कैवारी तुकयाच्या ॥ ४ ॥

॥ ५ ॥ राम ह्मणतां कामक्रोधांचें दहन । होय अभिमान देशधडी ॥ १ ॥ राम ह्मणतां कर्म तुटेल भवबंधन । नये श्रम शीण स्वप्नास ही ॥ २ ॥ राम ह्मणतां जन्म नाहीं गर्भवास । नव्हे दारिद्रास पात्र कधीं ॥ ३ ॥ राम ह्मणतां यम शरणागत बापुडें । आढळपद पुढें काय तेथें ॥ ४ ॥ राम ह्मणतां धर्म घडती सकल । तिमिरपडळ नासे हेळा ॥ ५ ॥ राम ह्मणतां ह्मणे तुकयाचा बंधु । तरिजेल भवसिंधु संदेह नाहीं ॥ ६ ॥

॥ ६ ॥ मरोनि जाईन गुणनामावरूनि । तुझ्या चक्रपाणी मायबापा ॥ १ ॥ चुकविलीं दुःखें मायेला वोळसा । तोडोनियां आशापाश तेणें ॥ २ ॥ केली काया तनु हिंवसी शीतळ । चिंता तळमळ नाहीं ऐसी ॥ ३ ॥ काळें तोंड काळ करूनि राहिले । भूतमात्र झाले सज्जनसखे ॥ ४ ॥ तुकयाबंधु ह्मणे अवघ्या दश दिशा । मुक्त रे परेशा तुझ्या पुण्यें ॥ ५ ॥

॥ ७ ॥ आतां मागतों तें ऐक नारायणा । भावपूर्वक मनापासूनियां ॥ १ ॥ असों दे मोकळी जिव्हा जरि गाइल गुण । नाहीं तरी खिळुन टाकीं परती ॥ २ ॥ मातेचिया परी देखती परनारी । ठेवीं नेत्र तरी नाहीं तरि नको ॥ ३ ॥ तरी बरें कांटाळा करिती निंदास्तुतीचा । नाहीं तरि कानांचा ही देख प्रेत्न ॥ ४ ॥ सकळ इंद्रियांचा निग्रह करूनि एक । राखावीं पृथक तोडोनि भ्रम ॥ ५ ॥ तुकयाबंधु ह्मणे तेचि वाट प्राणां । पडतां नारायणा विसर तुझा ॥ ६ ॥

॥ ८ ॥ नमस्कारी भूतें विसरोनि याती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ १ ॥ परउपकारीं वेचियेल्या शक्ती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ २ ॥ द्वैताद्वैतभाव नाहीं जया चित्तीं । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ ३ ॥ जयाचिये वाचे नये निंदास्तुती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ ४ ॥ उचित अनुचित जाणे धर्मनीती । दृढ भाव भक्ति मानव तो ॥ ५ ॥ तुकयाबंधु ह्मणे वरकड ते येर । संसाराचे खर भारवाही ॥ ६ ॥

॥ ९ ॥ चवदा भुवनें लोक तिन्हीं दाढे जो कवळी । संपुष्ट तो संबळीमध्यें देखा ॥ १ ॥ उत्पत्ति संहार करिता जो पाळण । तो नंदा नंदन ह्मण-

वीतसे ॥ २ ॥ असुर तोडरी दैत्यांचा काळ । झाला द्वारपाळ बळीचा तो
॥ ३ ॥ लक्षुमीचा स्वामी क्षीराच्या सागरा । उच्छिष्टकवळा पसरी मुख
॥ ४ ॥ तुकयाबंधु ह्मणे चतुरांचा रावो । भावें तो पाहा हो केला वेडा
॥ ५ ॥

॥ १० ॥ कोण या पुरुषार्थाची गति । आणियेला हातोंहातीं ॥ जाहाज
पृथ्वीपति । केली ख्याती अद्भुत ॥ १ ॥ भला रे पुंडलिका भला । महिमा
नव जाये वर्णिला ॥ दगा देउनि अवघियांला । सांठविलें अविनाश
॥ २ ॥ केलें एके घरीं केणें । भरलीं सदोदित दुकानें ॥ दुमदुमिलीं
सुखानें । हे भाग्याची पंढरी ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे किल्या । संतांचे हातीं
दिल्या ॥ आंगावेगळें आपुल्या । टाकुनि झाला महिमान ॥ ४ ॥

॥ ११ ॥ पाहा हो कलिचें महिमान । असत्यासी रिझलें जन ॥ पापा
देती अनुमोदन । करिती हेळण संतांचें ॥ १ ॥ ऐसें अधर्माचें बळ । लोक
झकविले सकळ ॥ केलें धर्माचें निर्मूळ । प्रळयकाळ आरंभला ॥ २ ॥
थोर या युगाचें आश्चर्य । ब्रह्मकर्म उत्तम सार ॥ सांडूनियां द्विजवर ।
दावलपीर स्मरताती ॥ ३ ॥ ऐसे यथार्थाचे अनर्थ । झाला बुडाला पर-
मार्थ ॥ नाहीं झाली ऐसी नीत । हा हा भूत पातलें ॥ ४ ॥ शांति क्षमा
दया । भाव भक्ति सत्क्रिया ॥ ठाव नाहीं सांगावया । सत्वधैर्य भंगिलें
॥ ५ ॥ राहिले वर्णाश्रमधर्म । अन्योन्य विचरती कर्म ॥ ह्मणवितां
रामराम । श्रम महा मानिती ॥ ६ ॥ थेर भोरपाचे विशीं । धांवती भूतें
आमिषां तैसीं ॥ कथा पुराण ह्मणतां सिसी । तिडीक उठी नकऱ्याचे
॥ ७ ॥ विषयलोभासाठीं । सवार्थेसीं प्राण साटी ॥ परमार्थी पीठ
मुठी । मागतां उठती सुनींसीं ॥ ८ ॥ धनाढ्य देखोनि अनामिक ।
तयातें मानिती आवश्यक ॥ अपमानिले वेदपाठक । सात्विक शास्त्र
संपन्न ॥ ९ ॥ पुत्र ते पितियापाशीं । सेवा घेती सेवका ऐसी ॥ सुनांचिया
दासी । सासा झाल्या आंदण्या ॥ १० ॥ खोटें झालें आली विवसी ।
केली मर्यादा नाहींसी ॥ भार्या भ्रतारेंसी । रंक तैसीं मानिती ॥ ११ ॥
नमस्कारावया हरिदासां । लाजती धरिती कांहीं गर्वसा ॥ पोटासाठीं खौसा ।
वंदिती मलिंछाच्या ॥ १२ ॥ बहुत पाप झालें उचंबळ । उत्तम न ह्मणती
चांडाळ ॥ अभक्ष भक्षिती विटाळ । कोणी न धरी कोणाचा ॥ १३ ॥
कैसें झालें नष्ट वर्तमान । एकादशीस खाती अन्न ॥ दिडे घेऊनी ब्राह्मण ।

अविद्वाणी वदताती.॥ १४ ॥ कामिनी विटंबिल्या कुळवंती । वदनें दासींचीं चुंबिती ॥ सोवळ्याच्या स्फीती । जगीं मिरविती पवित्रता ॥ १५ ॥ मद्यपानाची सुराणी । नवनीता न पुसे कोणी ॥ केळवती व्यभिचारिणी । दैन्यवाणी पतिव्रता ॥ १६ ॥ केवढी दोषाची सबळता । झाली पाहा हो भगवंता ॥ पुण्य धुडावोनी संता । तीर्थां हरी आणिली ॥ १७ ॥ भेणें मंद झाल्या मेघवृष्टि । आक्रांतली कांपे सृष्टि ॥ देव रिगाले कपाटीं । आटाआटी प्रवर्तली ॥ १८ ॥ अपीक धान्यें दिवसें दिवसें । गाई म्हैसी चेवल्या गोरसें ॥ नगरें दिसतीं उध्वंसें । पिकलीं बहुवसें पाखांडें ॥ १९ ॥ होम हरपलीं हवनें । यज्ञयाग अनुष्ठानें ॥ जपतपादि साधनें । आचरणें भ्रष्टलीं ॥ २० ॥ अठरा यातींचे व्यापार । करिती तस्कराई विप्र ॥ सांडोनियां शुद्ध शुभ्र । वस्त्रें निळीं पांघरती ॥ २१ ॥ गीता लोपली गायत्री । भरले चमत्कार मंत्रीं ॥ अश्वाचियापरी । कुमारी विकिती वेदवक्ते ॥ २२ ॥ वेदाध्ययन संहितारुचि । भकाद्या करिती तयांची ॥ आवडी पंडितांची । मुसाफावरी बैसली ॥ २३ ॥ मुख्य सर्वोत्तम साधनें । तीं उच्छेदुनि केलीं दीनें ॥ कुडीं कापट्यें महा मोहनें । मिरविताती दुर्जन ॥ २४ ॥ कळाकुशळता चतुराई । तर्कवादी भेद निंदेठायीं ॥ विधी निषेधाचा वाही । एकही ऐसीं नाडलीं ॥ २५ ॥ जे संन्यासी तापसी ब्रह्मचारी । होतां वैरागी दिगांबर निस्पृही वैराग्यकारी ॥ कामक्रोधें व्यापिले भारी । इच्छाकरीं न सुटती ॥ २६ ॥ कैसें विनाशकाळाचें कौतुक । राजे झाले प्रजांचे अंतक ॥ पिते पुत्र सहोदर एकाएक । शत्रुघातें वर्तती ॥ २७ ॥ केवढी ये रांडेची अंगवण । भ्रमविलें अवघें जन ॥ याती अठरा चारही वर्ण । कर्दम करूनि विटाळले ॥ २८ ॥ पूर्वी होतें भविष्य केलें । संतीं तें यथार्थ झालें ॥ ऐकत होतों तें देखिलें । प्रत्यक्ष लोचनीं ॥२९॥ आतां असो हें आघवें । गति न व्हे कळीमध्यें वागवरावें ॥ देवासी भाकोनी करुणावें । वेगें स्मरावें अंतरीं ॥ ३० ॥ अगा ये वैकुंठनायका । काय पाहातोसि या कौतुका ॥ धांव कलीनें गांजिलें लोकां । देतो हाका सेवक तुकयाचा ॥ ३१ ॥

॥ १२ ॥ केली हार्णाळां अंघोळी । येऊनि बैसलों राउळीं ॥ १ ॥ अजिचें झालें भोजन । राम कृष्ण नारायण ॥ २ ॥ तुकयाबंधु म्हणे नास । आर्मी कर्पांमी लगाप ॥ ३ ॥

॥ १३ ॥ उदार कृपाळ सांगसी जना । तरी कां त्या रावणा मारियेलें ॥ नित्य नित्य पूजा करी श्रीकमळीं । तेणें तुझें काय केलें ॥ १ ॥ काय वडिवार सांगसी वायां । ठावा पंढरिराया आहेसि आह्मां ॥ एकलाचि जरि देऊं परिहार । आहे दुरिवरी सीमा ॥ २ ॥ कर्णाऐसा वीर उदार जुंझार । तो तुवां जर्जर केला बाणीं ॥ पडिला भुमी परी नयेची करुणा । दांत पाडियेले दोन्ही ॥ ३ ॥ श्रियाळ बापुडें सात्विकवाणी । खादलें कापूनि त्याचें पोर ॥ ऐसा कठिण कोण होईल दुसरा । उखळीं कांडविलें शिर ॥ ४ ॥ शिबी चक्रवती करितां यज्ञयाग । त्याचें चिरिलें अंग ठायीं ठायीं ॥ जाचउनि प्राण घेतला मागें । पुढें न पाहतां कांहीं ॥ ५ ॥ बळीचा अन्याय सांग होता काय । बुडविला तो पाय देऊनि माथां ॥ कोंडिलें दार हा काय कहार । सांगतोसी चित्र कथा ॥ ६ ॥ हरिश्चंद्राचें राज्य घेऊनियां सर्व । विकविला जीव डोंबाघरीं ॥ पाडिला विघड नळा दमयंतीमधीं । ऐसी तुझी बुद्धि हरी ॥ ७ ॥ आणिकही गुण सांगावे किती । केलिया विपत्ति माउसीच्या ॥ वधियेला मामा सखा पुरुषोत्तमा । ह्मणे बंधु तुकयाचा ॥ ८ ॥

॥ १४ ॥ नेत्राची वासना । तुज पाहावें नारायणा ॥ १ ॥ करीं याचें समाधान । काय पहातोसी अनुमान ॥ २ ॥ भेटावें पंढरिराया । हेंचि इच्छिताती बाह्या ॥ ३ ॥ ह्मणतों जावें पंढरीसी । हेंचि ध्यान चरणासी ॥ ४ ॥ चित्त ह्मणे पायीं । तुझे राहीन निश्चयीं ॥ ५ ॥ ह्मणे बंधु तुकयाचा । देवा भाव पुरवीं साचा ॥ ६ ॥

॥ १५ ॥ मन उतावीळ । झालें न राहे निश्चळ ॥ १ ॥ दे रे भेटी पंढरिराया । उभारोनि चारी बाह्या ॥ २ ॥ सर्वांग तळमळी । हात पाय रोमावळी ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे कान्हा । भूक लागली नयना ॥ ४ ॥

॥ १६ ॥ ह्मणसी दावीन अवस्था । तैसें नको रे अनंता ॥ १ ॥ होऊनियां साहाकार । रूप दाखवीं सुंदर ॥ २ ॥ मृगजळाचियापरी । तैसें न करावें हरी ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे हरी । कामा नये बाह्यात्कारीं ॥ ४ ॥

॥ १७ ॥ विठ्ठला रे तुझे वर्णितां गुणवाद । विठ्ठला रे दग्ध झालीं पापें ॥ १ ॥ विठ्ठला रे तुझें पाहतां श्रीमुख । विठ्ठला रे सुख झालें नयना ॥ २ ॥ विठ्ठला रे तुज देतां आलिंगन । विठ्ठला तनमन निवाल्या बाह्या

॥ ३ ॥ विठ्ठला रे तुझी ऐकतां कीर्ति । विठ्ठल हे विश्रांति पावले स्मरणें ॥ ४ ॥ विठ्ठला रे तुकयाबंधु ह्मणे देहभाव । विठ्ठला जीवीं पाव धरितां गेला ॥ ५ ॥

॥ १८ ॥ बरवा बरवा बरवा रे देवा तूं । जीवाहूनि आवडसी जीवा रे देवा तूं ॥ १ ॥ पाहतां वदन संतुष्ट लोचन । झाले आइकतां गुण श्रवण रे देवा ॥ २ ॥ अष्ट अंगें तनु त्रिविध ताप गेला सीण । वर्णितां लक्षण रे देवा ॥ ३ ॥ मन झालें उन्मन अनुपम ग्रहण । तुकयाबंधु ह्मणे महिमा नेणें रे ॥ ४ ॥

॥ १९ ॥ व्यापिलें सर्वत्र । बाहेरी भीतरी अंतर ॥ १ ॥ ऐसें गोविंदें गोविलें । बोलें नवजाये बोलिलें ॥ २ ॥ संचिताची होळी । करूनि जीव घेतला बळी ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे नाहीं । आतां संसार उरी कांहीं ॥ ४ ॥

॥ २० ॥ तुह्मां आह्मांसी दुरुपण । झालें दुर्लभ भाषण ॥ १ ॥ ह्मण-ऊनि करितों आतां । दंडवत घ्या समस्तां ॥ २ ॥ भविष्याचें माथां देह । कोण जाणें होइल काय ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाचा बांधव । आमचा तो झाला भाव ॥ ४ ॥

॥ २१ ॥ अनंतजन्में जरी केल्या तपरासी । तरी हा न पवसी ह्मणे देह ॥ १ ॥ ऐसें जें निधान लागलेंसे हातीं । त्याची केली माती भाग्य-हीना ॥ २ ॥ उत्तमाचें सार वेदाचें भांडार । ज्याच्यानें पवित्र तीर्थें होती ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु आणीक उपमा । नाहीं या तों जन्मा द्याव-यासी ॥ ४ ॥

॥ २२ ॥ चित्तीं बैसलें चिंतन । नारायण नारायण ॥ १ ॥ नलगे गोड कांहीं आतां । आणीक दुसरें सर्वथा ॥ २ ॥ हरपला द्वैतभाव । तेणें देह झाला वाव ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे आह्मी । झालों निष्काम ये कामीं ॥ ४ ॥

॥ २३ ॥ काय करूं ये लाजा । दुमा पुरविला माझा ॥ १ ॥ नेदी आठवूं तुजला । आड येते बोला बोला ॥ २ ॥ शब्द काढी काढी । तो हे उभीच धगडी ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे देवा । इचा पार न देखावा ॥ ४ ॥

॥२४॥ न मागे न मागे न मागे हरीविण । न मागे न मागे शाम कोण्ही गे ॥ १ ॥ तळमळ करि तैसा जीव जळावीण मासा । दिसते हे तैसा दिशा वोसा वो । २ ॥ नाठवे भूक ताहान विकळ झालें मन । घडि जाये प्राण युगा एकी वो ॥ ३ ॥ जरी तुझी नोळखा सांगतों आयिका । तुकयाबंधुचा सखा जगजीवन ॥ ४ ॥

॥ २५ ॥ देखिला माय भीमातिरीं । कर मिरविले कटावरी ॥ पाउलें समचरण साजिरीं । नाम अनंत अति गोड ॥ १ ॥ शंख चक्रांकित भूषणें । जडित मेखळा चिद्रत्नें ॥ पीतांबर उटी शोभे सांवळेपणें । लोपली तेणें रवितेजें ॥ २ ॥ श्रवणीं कुंडलें देतीं टाळ । दशांगुळीं मुद्रिकामाळ ॥ दंतपंक्ति हिरे झळाळ । मुख निर्मळ सुखराशी ॥ ३ ॥ कटीं कर दोन्ही वांकी वेळा । बाहि बाहेवटी पदक गळां ॥ मृगनाभीचा रेखी टिळा । लवती डोळां विद्युलता ॥ ४ ॥ ऐशी सुंदरपणाची साम्यता । काय वर्णू ते मी आतां ॥ तुकयाबंधु ह्मणे अच्युता । प्रसविली माता पिता ते धन्य ॥ ५ ॥

॥ २६ ॥ हम उदास तीन्हके सुनाहो लोकां । रावन मार बिभीषण दिई लंका ॥ १ ॥ गोवरधन नखपर गोकुल राखा । बर्सन लागा जब मेंहु फत्तरका ॥ २ ॥ बैकुंठनायक काल कौंसासुरका । दैत्य डुबाय सब मंगाय गोपिका ॥ ३ ॥ स्तंभ फोड पेट चिरीया कश्यपका । प्रल्हादके लियें कहे भाई तुकयाका ॥ ४ ॥

॥ २७ ॥ चुराचुराकर माखन खाया । गौलनीका नंद कुमर कन्हया ॥ १ ॥ काहे बराई दिखावत मोहि । जानतहुं प्रभुपना तेरा सबहि ॥ २ ॥ और बात सुन उखलसुं गला । बांध लिया आपना तूं गोपाला ॥३॥ फेरत बनबन गाऊ धरावत । कहे तुकयाबंधु लकरी लेले हात ॥ ४ ॥

॥ २८ ॥ आकारवंत मूर्ती । जेव्हां देखेन मी दृष्टी ॥ १ ॥ मग मी राहेन निवांत । ठेवूनियां तेथें चित्त ॥ २ ॥ श्रुति वाखाणिती । तैसा येसील प्रचिती ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाचा सेवक । उभा देखेन सन्मुख ॥ ४ ॥

॥ २९ ॥ कोठें गुंतलासी द्वारकेच्याराया । वेळ कां सखया लावियेला ॥ १ ॥ दिनानाथ ब्रीद सांभाळी आपुलें । नको पाहों केलें पापपुण्य ॥ २ ॥ पतितपावन ब्रीदें चराचर । पातकी अपार उद्धरिले ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे द्रौपदीचा धांवा । केला तैसा मला पावे आतां ॥ ४ ॥

# सत्यभामा देवास लावून बोलली ते अभंग.

॥ ३० ॥ करूनी आइत सत्यभामा मंदिरीं रे । वाट पाहे टळोनी गेली रात्री रे ॥ न येचि देव येती कामलहरी रे । पडिली दुश्चिती तंव तो कवाड टिमकारी रे ॥ १ ॥ सर गा परता कळला तुझा भाव रे । कार्या पुरतें हें दाविसी लाघव रे ॥ बोलतोसी तें अवघी तुझी माव रे । जाणोनी आलासी उजडता समयो रे ॥ २ ॥ मीच वेडी तुजला बोल नाहीं रे । दाना-वेळे विटंबना झाली काय रे ॥ मागुती रुद्रासी भेटीं दिली तई रे । विश्वा-सातें तुझ्या बोला अझुनी तरी रे ॥ ३ ॥ भ्रम होता तो अवघा कळों आला रे । मानवत होतें मी भला भला रे । नष्टा क्रिया नाहीं मी तुझ्या बोला रे । तुकयाबंधु स्वामी कानड्या कौसाल्या रे ॥ ४ ॥

॥ ३१ ॥ तंव तो हरि ह्मणे वो निजांगने वो । लाइ नीच कां देसी डोहणे वो ॥ मजपें दुजें आलें तें देव जाणे वो । शब्द काय बोलसी ते उणे वो ॥ १ ॥ पाहा मनीं विचारूनी आधीं वो । सांडुनि देई भ्रांति करीं स्थिर बुद्धि वो ॥ तंट केलें हें माझें तुझें उपाधीं वो । उघडीं डोळे अझुनी तरी धरी शुद्धि वो ॥ २ ॥ कोठें तरी दुनियांत वर्तलें वो । स्त्रियांनीं भ्रतारा दाना दिलें वो ॥ कैसा भला मी नव्हे तें सोसिलें वो । रुसतेसी तुं उफराटें नवल जालें वो ॥ ३ ॥ काय सांग म्यां दैन्य केली कैसी वो । तुझ्या गर्वें आणविलें हनुमंतासी वो ॥ कष्टी केलें मज गरुडा भीमकीसी वो । तुकयाबंधु ह्मणे खरें खोटें नव्हे यासी वो ॥ ४ ॥

॥ ३२ ॥ तंव ते ह्मणे ऐका हृषीकेशी वो । नावाजिलें तुह्मी ह्मणा आपणांसी वो ॥ तरी कां वंचनुक सुमनासी वो । नट नाट्य बरें संपादूं जाणतोसी वो ॥ १ ॥ सर हो परता परता हों आतां हरी । ह्मणे सत्राजि-ताची कुमरी ॥ जाणतें मी या शब्दाच्या कुसरी । ऐसेंच करून ठकविलें आजीवरी ॥ २ ॥ भावें गेलें म्हणून व्हावा वियोग । मनींची आर्त जन्मां-तरीं व्हावा संग ॥ तों तों केलें हें पाठमोरें जग । ऐसें काय जाणें हे तुझे रंग ॥ ३ ॥ काय करूं गा नागविलें कामें । लागलें तयास्तव इतुकें सोसावें ॥ नाहीं तरी कां नव्हतीं ठावीं वर्में । परद्वारीं ऐसा हाकलिती प्रसिद्ध नांवें ॥ ४ ॥ काय किती सांगावें तुझे गुण । न फुटे वाणी निष्ठुर

ऐसा निर्गुण ॥ आप पर न ह्मणसी माय बहीण । सासूसुनास लावूनी पाहासी भांडण ॥ ५ ॥ इतुकियावरी ह्मणे वैकुंठींचा राणा । होऊन गेलें तें नये आणूं मना ॥ आतां न करीं तैसें करीं क्रिया आणा । भक्तवत्सल ह्मणे तुकयाबंधु कान्हा ॥ ६ ॥

## नाटाचे अभंग.

॥ ३३ ॥ अगा ये वैकुंठनायका । अगा ये त्रैलोक्यतारका ॥ अगा जनार्दना जगव्यापका । अगा पाळका भक्तांचिया ॥ १ ॥ अगा ये वसुदेवदेवकीनंदना । अगा ये गोपिकारमणा ॥ अगा बळिबंध वामना । अगा निधाना गुणनिधी ॥ २ ॥ अगा ये द्रौपदीबांधवा । अगा ये सखया पांडवा ॥ अगा जीवाचिये जीवा । अगा माधवा मधुसूदना ॥ ३ ॥ अगा महेश्वरा महाराजा । अगा श्रीहरी गरुडध्वजा ॥ अगा सुंदरा सहस्रभुजा । पार मी तुझा काय वर्णूं ॥ ४ ॥ अगा अंबऋषिपरंपरा । निरालंबा निर्विकारा । अगा गोवर्धन धरणीधरा । अगा माहेरा दीनांचिया ॥ ५ ॥ अगा धर्मराया धर्मशीळा । कृपासिंधु कृपाळा ॥ अगा प्रेमाचिया कल्लोळा । सकळकळाप्रवीणा ॥ ६ ॥ अगा चतुरा सुजाणा । मधुरागिरा सुलक्षणा ॥ अगा उदारा असुरमर्दना । राखें शरणा तुकयाबंधु ॥ ७ ॥

॥ ३४ ॥ उभा देखिला भीमातीरीं । कर मिरवले कटावरी ॥ पाउलें तरी समचि साजिरीं । नाम तरी अनंत अतिगोड ॥ १ ॥ शंखचक्रांकित भूषणें । जडितमेखळा चिद्रत्नें ॥ पीतांबर उटी शोभे गोरेपणें । लोपलीं तेणें रवितेजें ॥ २ ॥ श्रवणीं कुंडलें देती ढाळ । दशांगुळीं मुद्रिका माळ ॥ दंतओळी हिरे झळाळ । मुख निर्मळ सुखरासी ॥ ३ ॥ कडीं कडदोरा वांकी वेळा । बाहीं बाहुवटे पदक गळां ॥ मृगनाभी रेखिला टिळा । लवती डोळां विद्युल्लता ॥ ४ ॥ सुंदरपणाची साम्यता । काय वर्णूं ते पावे आतां ॥ तुकयाबंधु ह्मणे रे अच्युता । धन्य ते मातापिता प्रसवली ॥ ५ ॥

॥ ३५ ॥ एक मागणें हृषीकेशी । चित्त द्यावें सांगतों वचनासी ॥ मज

आणीक । रिद्धिसिद्धी परलोक ॥ तूं स्वामी मी सेवक । खंडणा नको करूं ऐसी ॥ २ ॥ मना येईल तो जन्म देईं । भलते कुळीं भलते ठायीं ॥ तें मी सांकडें घालीत नाहीं । हृदयींहुनी तूं न वाजें ॥ ३ ॥ इतुकें करीं भलत्या परी । भलत्या भावें तुझे द्वारीं ॥ राहेन दास होऊनि कामारी । वदो वैखरी नित्य नाम ॥ ४ ॥ नको विचारूं दुसरें आतां । शरण आलों जी पंढरीनाथा ॥ तुकयाबंधु ह्मणे रे अच्युता । आहेसि तूं दाता दानशूर ॥ ५ ॥

॥ ३६ ॥ कईं देखता होईन डोळीं । सकळां भूतीं मूर्ति सांवळी ॥ जीवा

नांव भूमंडळीं । जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं ॥ १ ॥ ऐसा कृपा करील नारायण । जीव जगाचा होईन ॥ प्रेमसागरीं बुडईन । होईल स्नान अनुतापीं ॥ २ ॥ ऐसा कईं येईन दैवास । दृश्य नासोनि जाईल आस ॥ सदा संतचरणीं देहाचा वास । सेवीन शेष धणीवरी ॥ ३ ॥ कईं नवसा येतील अंकुर । सुखा नाहींसा होईल पार ॥ अमृत तें पृथ्वीजळ सागर । वाहाती पूर आनंदाचे ॥ ४ ॥ प्रसन्न दया क्षमा शांति । कईं नवविधा होईल भक्ति ॥ भोगुनि वैराग्य संपत्ति । मनोरथ कळती तईं पुरले ॥ ५ ॥ तुकयाबंधु ह्मणे सांग । नव्हे तुजविण निरसेना पांग ॥ ह्मणोनि घातलें साष्टांग । पांडुरंगा वरी चरणा ॥ ६ ॥

॥ ३७ ॥ तूं बळिया शिरोमणी । आहेसि माजीये त्रिभुवनीं ॥ रिघालों पाठीं तुझी ह्मणउनी । आतां करीन मी असेल तें ॥ १ ॥ तूं देवा प्रतापदिनकर । सुरा असुरांचा सुर ॥ महावीर धनुर्धर । मी तो पामर काय तेथें ॥ २ ॥ कृपासिंधु दीनवत्सल । फोडिली देवाची बंदशाळ ॥ संहारूनि राक्षसदळ । शरणागत राजीं स्थापिला ॥ ३ ॥ उपक्रम करावा बहुत । तरी तूं जाणसी धर्मनीत ॥ उचित काय तें अनुचित । राखें शरणागत आलों आतां ॥ ४ ॥ किती म्यां काय विनवावें । शरण आलों जीवें भावें ॥ तुकयाबंधु ह्मणे करावें । क्षेम अवघें येणें काळें ॥ ५ ॥

॥ ३८ ॥ देवा मी चांडाळ चांडाळ । ह्मणतां लागताहे वेळ ॥ नसे पाहातां भूमंडळ । ऐसा अमंगळ खळ दुसरा ॥ १ ॥ जन्मा उपजलियापासूनी । असत्य कर्म तें अझूनी ॥ सत्य आचरण नेणें स्वप्नीं । निखळ खाणी अवगुणांची ॥ २ ॥ भक्ति दया अथवा कथा । कानीं न सहवे वार्ता ॥ अखंड विषयांची वेथा । अधम पुरता अधमाहुनी ॥ ३ ॥ काम

क्रोध दंभ अहंकार । गर्व ताठा मद मत्सर ॥ यांचें तरी माहेरघर । परउपकार वैरी जैसा ॥ ४ ॥ निंदा द्वेष घात विश्वास । करितां नाहीं केला आळस ॥ करूं नये ते केले संतउपहास । अभक्ष तेंही भक्षिलें ॥ ५ ॥ पाळिलें नाहीं पितृवचन । सदा परद्वारीं परधनीं ध्यान ॥ बोलों नये घडलें ऐसें अन्योन्यविण । दासीगमन आदिकरूनी ॥ ६ ॥ कायामनें वाचाइंद्रियांशीं । सकळ पापांचीच राशी ॥ तुकयाबंधु ह्मणे ऐसियासी । आलों हृषीकेशी तुज शरण ॥ ७ ॥

॥ ३९ ॥ काय काय करितों या मना । परि नाइके नारायणा ॥ करूं नये त्याची करी विवंचना । पतना नेऊं आदरिलें ॥ १ ॥ भलतिया सर्वे धांवे सैराट । वाट आडवाट दरे दरकुट ॥ न विचारि कुडें कांहीं कपट । घात बळकट मांडियेला ॥ २ ॥ न पुरती भ्रमणा दाही दिशा । सप्त ही पाताळें आकाशा ॥ घाली उडी बळेंचि देखोनी फांसा । केलों या देशा पाहुणा ॥ ३ ॥ चेतवूनी इंद्रियें सकळ । आशा तृष्णा कल्पना काम क्रोध काळ ॥ दुराविली शुद्ध बुद्धि केली राळ । ऐसें चांडाळ अनिवार हें ॥ ४ ॥ आतां काय ऐसें करावें यासी । बहु जाचिलों केलों कासाविसी ॥ तुकयाबंधु ह्मणे हृषीकेशी । धांव मज ऐसी परी झाली ॥ ५ ॥

---

## दसरा.

—o—

॥ ४० ॥ सुंदर मुख साजिरें । कुंडलें मनोहर गोमटीं वो ॥ नागर नागखोपा । केशर कस्तुरीं मळवटीं वो ॥ विशाळ व्यंकट नेत्र । वैजयंती तळपे कंठीं वो ॥ कास पीतांबराची । चंदन सुगंध साजे उटी वो ॥ १ ॥ अतिबरवंठा बाळा । आली सुलक्षण गोंधळा वो ॥ राजस तेजोराशी । मिरवी शिरोमणीं वेल्हाळा वो ॥ कोटि रविशशिप्रभा । लोपल्या सकळा वो ॥ न कळे ब्रह्मादिकां । अनुपम्य इची लीळा वो ॥ २ ॥ सावळी सकुमार । गोरी भुजा शोभती चारी वो ॥ सखोल वक्षस्थळ । सुढाळ पदक झळके वरी वो ॥ कटीं क्षुद्र घंटिका । शब्द करिताती माधुरी वो ॥ गर्जत चरणीं वांकी । अभिनव संगीत नृत्य करी वो ॥३॥ अष्टांगीं मंडित काय । वर्णावी रूपठेवणी

पक्ष । मंजुळ बोले हास्यवदना वो ॥ बहु रूपें नटली । आदिशक्ति नारायणी वो ॥४॥ घटस्थापना केली । पंढरपूर महानगरीं वो ॥ अस्मानी मंडप दिला । तिन्ही ताळांवरी वो ॥ आरंभिला गोंधळ इनें । चंद्रभागेतिरीं वो ॥ आली भक्तिकाजा । कृष्णाबाई योगेश्वरी वो ॥ ५ ॥ तेहतीस कोटि देव । चामुंडा अष्ट कोटी भैरव वो ॥ आरत्या कुरवंड्या । करिती पुष्पांचा वरुषाव वो ॥ नारद तुंबर गायन । ब्रह्मानंद करिती गंधर्व वो ॥ वंदी चरणरज तेथें । तुकयाचा बांधव वो ॥ ६ ॥

॥ ४१ ॥ पवित्र सुदिन उत्तम दिवस दसरा । सांपडला तो साधा आजि मुहूर्त बरा ॥ गर्जा जयजयकार हरि हृदयीं धरा । आळस नका करूं लाहानां सांगतों थोरां ॥१॥ या हो या हो बाइयानो निघाले हरी । सिलंघणा घेऊनी वेगीं आरत्या करीं ॥ ओवाळूं श्रीमुख वंदूं पाउलें शिरीं । आम्हां दैव आलें येथें घरिंच्या घरीं ॥ २ ॥ अक्षय मुहूर्त औटामध्यें साधे तें । मग येरीं गर्जे जैसें तैसें होत जातें ॥ ह्मणोनि मागें पुढें कोणी न पाहावें येथें । सांडा परतें काम जाऊं हरी सांगातें ॥ ३ ॥ बहुतां बहुतां रीतीं चित्तीं धरा हें मनीं । नका गई करूं आइकाल ज्या कानीं ॥ मग हें सुख कधीं न देखाल स्वप्नीं । उरेल हायहाय मागें होईल काहाणी ॥ ४ ॥ ऐसियास वंचती त्यांच्या अभाग्या पार । नाहीं नाहीं नाहीं सत्य जाण निर्धार ॥ मग हे वेळ घटिका न ये अजरामर । कळलें असों द्या मग पडतील विचार ॥ ५ ॥ जयासाठीं ब्रह्मादिक झालेती पिसे । उच्छिष्टा कारणें देव जळीं झाले मासे ॥ अर्द्धांगीं विश्वमाता लक्षुमी वसे । तो हा तुकयाबंधु ह्मणे आलें अनायासें ॥ ६ ॥

---

## गवळण.

---

॥ ४२ ॥ पहा पहा सांवळा कैसा धीट गे ॥ याच्या बोलण्याचा नये कवणा वीट ॥ ध्रु० ॥ ह्मणतो माझी लपविली पिवळी गोटी ॥ उलट्या भवऱ्याची चोरी लावी पाठी ॥ कंचोळी पहातो सोडुनियां गांठीं ॥ हृदयीं एकांतीं घालोनिया मिठी ॥ १ ॥ अवचित माझ्या डोळ्यांत गेलें कण ॥ फुंकुनी काढितां वाटलें समाधान ॥ शहाणा कानडा तुझा हा नारायण ॥ २ ॥

नवनीत देखोनियां लावितो लाडी गोडी ॥ खुण एक पालवीं राजस डोळे मोडी ॥ अगमा निगमा नकळे याची खोडी ॥ बंधु तुकयाचा दास हात जोडी ॥ ३ ॥

## वासुदेव.

॥ ४३ ॥ मनु राजा एक देहपुरी । असे नांदतु सासी दोघी नारी ॥ पुत्र पौत्र संपन्न भारी । तेणें कृपा केली आह्मांवरी गा ॥ १ ॥ ह्मणउनी आलों या देशा । होतों नाहीं तरी भुललों दिशा ॥ दाता तो मज भेटला इच्छा । देउनि मारग दाविला सरिसा गा ॥ २ ॥ सवें घेउनि चौघे जण । आला कुमर सुलक्षण ॥ कडे चुकवूनी कांठवण । ऐका आणिलीं तीं कोण कोण गा ॥ ३ ॥ पुढें भक्तीनें धरिलें हातीं । मागें ज्ञान वैराग्य येती ॥ स्थिर केलीं जीं आचपळें होतीं । सिद्ध आणुनि लाविलीं पंथीं गा ॥ ४ ॥ केले उपकार सांगों काय । बाप न करी ऐसी माय ॥ धर्में त्याच्या देखियेले पाय । दिलें अखय भय वारुनि दान गा ॥ ५ ॥ होतों पीडत हिंडतां गांव । पोट भरेना राहावया ठाव ॥ तो येणें अवघा संदेह । ह्मणे फेडियेला तुकयाचा बांधव गा ॥ ६ ॥

॥ ४४ ॥ गातों वासुदेव मी ऐका । चित्त ठेवुनि ठायीं भावें एका ॥ डोळे झांकुनि रात्र नका । काळ करीत बैसला लेखा गा ॥ १ ॥ राम राम स्मरा आधीं । लाहो करा गांठ घाला मूळबंदीं ॥ सांडाव्या उगिया उपाधी । लक्ष लावुनि राहा गोविंदीं गा ॥ २ ॥ ऐसा अल्प मानवी देह । शत गणिलें अर्ध रात्र खाय ॥ पुढें बालत्व पीडा रोग क्षय । काय भजनासी उरलें तें पाहें गा ॥ ३ ॥ क्षणभंगुर नाहीं भरंवसा । व्हा रे सावध सोडा माया आशा ॥ न चले बळ पडेल मग फांसा । पुढें हुशार थोर आहे वोळसा गा ॥ ४ ॥ कांहीं थोडें बहुत लागपाठ । करा भक्ति भाव धरा बळकट ॥ तन मन ध्यान लावुनियां नीट । जर असेल करणें गोड शेवट गा ॥ ५ ॥ विनवितों सकळां जनां । कर जोडुनि थोरां लाहनां ॥ दान इतुकें द्या मज दीना । ह्मणे तुकयाबंधु राम ह्मणा गा ॥ ६ ॥

॥ ४५ ॥ गेले टळले पाहार तीन । काय निदसुरा अझून ॥ जागे होउनि

करा कांहीं दान । नका ऐकोनि झाकों लोचन गा ॥ १ ॥ हरी राम कृष्ण वासुदेव । जाणवितसें जना ॥ चिपळ्या टाळ हातीं मुखीं घोष । नारायणा गा ॥ २ ॥ जें टाकेल कोणा कांहीं । फळ पुष्प अथवा तोय ॥ द्या परी मीस घेऊं नका भाई । पुढें विन्मुख होतां बरें नाहीं गा ॥ ३ ॥ देवाकारणें भाव तस्मात । द्यावें न लगे फारसें वित्त ॥ झालें एक चित्त तरी बहुत । तेवढ्यासाठीं नका करूं वाताहात गा ॥ ४ ॥ आलों येथवरी बहु सायासें । करितां दान हेंचि मागावयास ॥ नका भार घेऊं करूं निरास । धर्म सारफळ संसारास गा ॥ ५ ॥ आतां मागुता येईल फेरा । हें तो न घडे या नगरा ॥ ह्मणे तुकयाबंधु धरा । ओळखी नाहीं तरी जाल अघोरा गा ॥ ६ ॥

॥ ४६ ॥ ओलें मृत्तिकेचें मंदिर । आंत सहाजण उंदीर ॥ गुंफा करिती साकार । त्यांचा कोणी न करा अंगिकार गा ॥ १ ॥ वासुदेव करितो फेरा । तूं अद्यापी कां निजसुरा ॥ सावध होईरे गव्हारा । भजभज सारंगधरा गा ॥ २ ॥ बा तुझेनी आधारें । तूं वडील पैं आधारें ॥ तुझा तूंचि पैं बाधारे । वरकड मिळले अवघे चोर गा ॥ ३ ॥ घडोघडी अयुष्य जातें । जों हालवितां पातया पातें ॥ गेलें दिनमान नये मागुतें । सेखीं नुरेची काय पुरतें गा ॥ ४ ॥ वासुदेव करितो टाहो । हा दुर्लभ मानव देहो ॥ उठी उठी जागा हो हो । तुकयाबंधुसहीत लवलाहो गा ॥ ५ ॥

---

## आशिर्वाद.

॥ ४७ ॥ ऐकें वचन कमळापति । मज रंकाची विनंती ॥ १ ॥ करजोडितों कथाकाळीं । आपण असावें जवळी ॥ २ ॥ घेईं ऐसी भाक । मागेन जरि कांहीं आणीक ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे देवा । शब्द इतुका राखावा ॥ ४ ॥

॥ ४८ ॥ आली ललिताची वेळ । असा सावध सकळ ॥ १ ॥ लाहो करा वेगीं स्मरा । टाळि वाहोनि विश्वंभरा ॥ २ ॥ झालिया अवसान । न संपडती चरण ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे थोडे । अवधि उरली आहे पुढें ॥ ४ ॥

॥ ४९ ॥ नेणें गाऊं कांहीं धड बोलतां वचन । कायावाचामनेंसहित आलों शरण ॥ १ ॥ करीं अंगीकार नको मोकलूं हरी । पतितपावन ब्रीदें करावीं खरीं ॥ २ ॥ नेणें भक्तिभाव तुझा ह्मणवितों दास । जरी देसी अंतर तरी लज्जा कोणास ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु तुझे धरियेले पाये । आतां कोण दुजा ऐसा आह्मांसी आहे ॥ ४ ॥

॥ ५० ॥ तूंच मायबाप बंधु सखा आमचा । वित्त गोत जीवलगें जीवाचा ॥ १ ॥ आणीक प्रमाण नाहीं दुसरें आतां । योगक्षेमभार तुझे घातला माथां ॥ २ ॥ तूं च क्रियाकर्म धर्म देव तूं कुळ । तूंच तप तीर्थ व्रत गुरु सकळ ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु करिता कार्यता देवा । तूंच भाव भक्ति पूजा पुनस्कार आघवा ॥ ४ ॥

॥ ५१ ॥ करूनी उचित । प्रेम घालीं हृदयांत ॥ १ ॥ आलों दान मागायास । थोरी करूनियां आस ॥ २ ॥ चिंतनसमयीं । सेवा आपुलीच देईं ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे भावा । मज निरवावें देवा ॥ ४ ॥

॥ ५२ ॥ गाऊं वाहूं टाळी रंगीं नाचों उदास । सांडोनी भय लज्जा शंका आस निरास ॥ १ ॥ बळियाचा बळी तो कैवारी आमुचा । भक्तिमुक्तिदाता सकळां ही सिद्धींचा ॥ २ ॥ मारूं शब्दशस्त्रबाण निःशंक अनिवार । कंटकांचा चुर शिर फोडूं काळाचें ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु नाहीं जीवाची चाड ॥ आपुलिया तेथें काय आणिकांची भीड ॥ ४ ॥

॥ ५३ ॥ सांडूनी वैकुंठ । उभा विटेवरी नीट ॥ १ ॥ आला आला रे जगजेठी । भक्ता पुंडलीकाचे भेटी ॥ २ ॥ पैल चंद्रभागे तिरीं । कट धरूनियां करीं ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे अंबर । गजर होतो जयजयकार ॥ ४ ॥

॥ ५४ ॥ कृपाळू भक्तांचा । ऐसा पति गोपिकांचा ॥ १ ॥ उभा न पाचारितां दारीं । न सांगतां काम करी ॥ २ ॥ भाव देखोनी निर्मळ । रजां वोडवी कपाळ ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे न भजा । कां रे ऐसा भोळा राजा ॥ ४ ॥

॥ ५५ ॥ केला अंगीकार पंढरीच्या देवें । आतां काय करितील काळ मशक मानवें ॥ १ ॥ घातलीं बाहेर तीं भय होतें ज्यानें । बैसला आपण तेथें घालुनियां ठाणें ॥ २ ॥ लागों नेदी वारा दुजियाचा अंगासी । हा पुरता

निर्धार कळों आला आह्मांसी ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु न लगे करावी चिंता । कोणेविशीं आतां बैसलों हस्तीवरी माथां ॥ ४ ॥

॥ ५६ ॥ अगोचरीं बोलिलों आज्ञेविण आगळें । परी तें आतां न संडावें राउळें ॥ १ ॥ जाईल रोकडा बोल न पुसती आह्मां । तुझा तुझें ह्मणविलें पाहा पुरुषोत्तमा ॥ २ ॥ न व्हावा न वजावा न कळतां अन्याय । न धरावें तें मनीं भलता करा उपाय ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु हीन मी ह्मणोनि लाजसी । वारा लागों पाहातोहे उंच्या झाडासी ॥ ४ ॥

॥ ५७ ॥ उठा भागलेती उजगरा । झाला स्वामी निद्रा करा ॥ १ ॥ वाट पाहाते रुक्मिणी । उभी मंचक संवारूनी ॥ २ ॥ केली करा क्षमा । बडबड पुरुषोत्तमा ॥ ३ ॥ लागतो चरणा । तुकयाबंधु नारायणा ॥ ४ ॥

---

## आरत्या.

॥ ५८ ॥ कंसरायें गर्भ वधिले सात । ह्मणोनि गोकुळासी आले अनंत । घ्यावया अवतार झालें हेंचि निमित्त । असुर संहारूनि तारावे भक्त ॥ १ ॥ जय देव जय देव जय विश्वरूपा । श्रीविश्वरूपा । ओवाळीन तुज देहदीपें बापा ॥ ध्रु० ॥ स्थूळरूप होऊनि धरितसे सानें । जैसा भाव तैसा तयांकारणें ॥ दैत्यांसी भासला सिंह गजाने । काळासी महाकाळ यशोदेसी तान्हें ॥ २ ॥ अनंत वर्णी कोणा न कळेचि पार । सगुण कीं निर्गुण हा ही निर्धार ॥ पांगलीं साही अठरा करितां वेव्हार । तो वळितसे गौळियांचें खिल्लार ॥ ३ ॥ तेहतिस कोटि तिहीं देवांसी श्रेष्ठ । पाउलें पाताळीं नेणती स्वर्ग मुगुट ॥ गिळिलीं चौदा भुवनें तरि न भरे चि पोट । तो खाउन धाला गोपाळाचें उच्छिष्ट ॥ ४ ॥ महिमा वर्णूं तरि पांगलिया श्रुति । सिणला शेष चिरल्या जिव्हा करितां स्तुती ॥ भावेंविण कांहीं न चले चि युक्ति । राखें शरण तुकयाबंधु करी विनंती ॥ ५ ॥

॥ ५९ ॥ परमानंदा परमपुरुषोत्तमरामा । अच्युता अनंत हरि मेघश्यामा ॥ अविनाशा अलक्षा परता परब्रह्मा । अकळकळा कमळापती न कळे महिमा ॥ १ ॥ जय देव जय देव जय जी श्रीपती । मंगळशुभदायका करीन

आरती ॥ ध्रु० ॥ गोविंदा गोपाळा गोकुळरक्षणा । गिरिधरकर भवसागरतारक दधिमथना ॥ मधुसूदन मुनिजीवन धरणीश्रमहरणा । दीनवत्सल सकळां मूळ जय जय निधना ॥ २ ॥ विश्वंभरा सर्वेश्वर जगदाधारा । चक्रधर करुणाकर पावन गजेंद्रा ॥ सुखसागर गुणआगर मुगुटमणी शूरा । कल्याणकैवल्यामूर्ति मनोहरा ॥ ३ ॥ गरुडासना शेषशयना नरहरी । नारायणा ध्याना सुरवरहरगौरी ॥ नंदा नंदनवंदन त्रिभुवनांभीतरी । अनंतनामीं ठसा अवतारांवरी ॥ ४ ॥ सगुणनिर्गुणसाक्ष श्रीमंत संतां । भगवाना भगवंता कालकृतांता ॥ उत्पत्तिपाळणपासुन संहारणसत्ता । शरण तुकयाबंधु तारीं रिति बहुतां ॥ ५ ॥

॥ ६० ॥ सकुमार मुखकमळ निजसार निर्मळ । सावळी सुनीळ तनु भ्रमरांग कुरळ ॥ झळकति दिव्य तेजें दंत माज पातळ । मिरवलि मयूरपत्रें मुगुट कुंडलें माळ ॥ १ ॥ जय देवा जगदीश्वरा । धन्य रखुमाईवरा ॥ आरती करीन काया । ओंवाळिन सुंदरा । जय० ॥ ध्रु० ॥ गोजिरें ठाणमान भुजा मंडित चारी । शोभति शंखचक्रगदापद्म मोहरी ॥ त्द्दर्यी ब्रह्मपद बाणलें शृंगारीं । गर्जति चरणीं वांकी कंठ कोकिळास्वरीं ॥ २ ॥ घवघवित उटी अंगीं बावन चंदनांची । ललाटीं कस्तुरिचा कास पितांबराची ॥ कटिसूत्र वरि साजिरें प्रभा वर मोतियांची । संगीत सकळ मुद्रा पाऊलें कुंकुमार्चीं ॥ ३ ॥ सौभाग्यसुख सागर गुणलावण्यखाणी । लाघवी दीनवत्सल विश्व लाविलें ध्यानीं ॥ आश्चर्य देव करिती ऋषि राहिले मुनि । धन्य ते प्रसवली ऐसिया नंदपत्नी ॥ ४ ॥ वर्णितां ध्यान महिमा श्रुति राहिल्या नेति । रविकोटि चंद्र तारा प्रकाश न तुळती ॥ उदार सुर गंभीर पूर्ण आनंदमूर्ति । तुकयाबंधु ह्मणे स्तवूं मी काय किती ॥ ५ ॥

॥ ६१ ॥ धन्य ते पंढरी धन्य भीमा तीर । धन्य सनकादिक ओंवाळिती सुरवर ॥ १ ॥ धन्य धन्य वो तूं विटे उभा श्रीहरी । गोपाळ सांवळा ओंवाळिती नरनारी ॥ ध्रु० ॥ धन्य पीतांबर धन्य कौस्तुभ गळां । श्रीवत्सलांछन पदक शोभे गोपाळा ॥ २ ॥ धन्य तीं कुंडलें माथां मोरपिसा वेंटी । हरिदास कान्हया बरवा जगजेठी ॥ ३ ॥

# कान्होबा देवाशीं भांडले ते अभंग.

॥ ६२ ॥ दुःखें दुभागलें हृदयसंपुष्ट । गहिंवरें कंठ दाटताहे ॥ १ ॥ ऐसें काय केलें सुमित्रा सखया । दिलें टाकोनियां वनामाजीं ॥ २ ॥ आक्रंदती बाळें करुणावचनीं । त्या शोकें मेदिनी फुटों पाहे ॥ ३ ॥ काय हें सामर्थ्य नव्हतें तुजपाशीं । संगें न्यावयासी अंगभूतां ॥ ४ ॥ तुज ठावें आह्मां कोणी नाहीं सखा । उभयलोकीं तुका तुजविण ॥ ५ ॥ कान्हा ह्मणे तुझ्या वियोगें पोरटीं । जालों दे रे भेटी बंधुराया ॥ ६ ॥

॥ ६३ ॥ सख्यत्वासी गेलों करीत सलगी । नेणेंचि अभागी महिमा तुझा ॥ १ ॥ पावलों आपुलें केलें लाहें रस । निर्दैवां परिस काय होय॥२॥ कष्टविलासी म्यां चांडाळें संसारीं । अद्यापिवरी तरी उपदेशीं ॥ ३ ॥ उचित अनुचित सांभाळिलें नाहीं । कान्हा ह्मणे कांहीं बोलों आतां ॥ ४ ॥

॥ ६४ ॥ असो आतां कांहीं करोनियां ग्लांती । कोणा काकुलती येइल येथें ॥ १ ॥ करूं कांहीं दिस राहे तों सायास । झोंबों त्या लागास भावाचिये ॥ २ ॥ करितां रोदना बापुडें ह्मणती । परि नये अंतीं कामा कोणी ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे पडलिया वनीं । विचार तो मनीं बोलिला हे ॥ ४ ॥

॥ ६५ ॥ चरफडें चरफड शोकें शोक होये । कार्यमूळ आहे धीरापाशीं ॥ १ ॥ कल्पतसे मज ऐसें हें पाहातां । करावी ते चिंता मिथ्या खोटी ॥ २ ॥ न चुके होणार सांडिल्या शूरत्वा । फुकटचि सत्त्वा होईल हानि ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे दिल्या बंद मना । वांचूनी निधाना न पवीजे ॥ ४ ॥

॥ ६६ ॥ नलगे चिंता आतां अनुमोदन हाता । आलें मूळ भ्राता गेला साचें ॥ १ ॥ घरभेद्या येथें आहे तें सुकानु । धरितों कवळून पाय दोन्ही ॥ २ ॥ साचें साचिया मुखें पडियेलें ठावें । नलगे सारावें मागें पुढें ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे करील भेटी भावा । सोडीन तेधवां या विठ्ठला ॥ ४ ॥

॥ ६७ ॥ मूळस्थळ ज्याचें गोमतीचे तीरीं । तो हा सारी दोरी खेळ-

वितो ॥ १ ॥ ऐसें हें कळलें असावें सकळां । चोर सा वेगळा नाहीं दुजा ॥ २ ॥ वैष्णव हे हेर तयाचे पाळती । खूण हे निरुती सांगितली ॥ ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे आलें अनुभवास । तेणेंच आह्मांस नागविलें॥ ४॥

॥ ६८ ॥ बरा रे निर्गुणा नष्ट नारायणा। घरबुडवणा भेटलासी ॥ १ ॥ एके घरीं कोणी कोणासी न धरी । ऐसी अपरांपरी केली आह्मां ॥ २ ॥ कान्हा ह्मणे कां रे निष्काम देखिलें। ह्मणोनी मना आलें करितोसी ॥३॥

॥ ६९ ॥ धींदधींद तुझ्या करीन धींदड्या । ऐसें काय वेड्या जाणितलें ॥ १ ॥ केली तरी बरें मज भेटी भावास । नाहींतरी नास आरंभिला ॥ २ ॥ मरावें मारावें या आलें प्रसंगा । बरें पांडुरंगा कळलें सावें ॥ तुकयाबंधु ह्मणे तुझी माझी उरी । उडाली न धरीं भीड कांहीं ॥ ४ ॥

॥ ७० ॥ भुक्ति मुक्ति तुझें जळो ब्रह्मज्ञान । दे माझ्या आणोन भावा वेगीं ॥ १ ॥ रिद्धि सिद्धि मोक्ष ठेवीं गुंडाळून । दे माझ्या आणून भावा वेगीं ॥ २ ॥ नको आपुलिया नेऊं वैकुंठासी । दे माझ्या भावासी आणुन वेगीं ॥ ३ ॥ नको होऊं कांहीं होसील प्रसन्न । दे माझ्या आणून भावा वेगीं ॥ ४ ॥ तुकयाबंधु ह्मणे पाहाहो नाहीं तरी । हत्या होइल शिरीं पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ७१ ॥ मुख्य आहे आह्मां मातेचा पटंगा । तुज पांडुरंगा कोण लेखी ॥ १ ॥ नको लावूं आह्मां सवें तूं तोंवरी । पाहा दूरवरी विचारूनी ॥ २ ॥ साहे संतजन केले महाराज । न घडे आतां तुज भेईन मी ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे अइक्यें ऐक्यता। वाढतें अनंता दुःखें दुःख ॥४॥

॥ ७२ ॥ नये सोमसरी उपचाराची हरी । करकरेचें करीं काळें तोंड ॥ १ ॥ मागतों इतुकें जोडूनियां कर । ठेऊनियां शिर पायांवरी ॥ २ ॥ तुह्मां आह्मां एके ठायीं सहवास । येथें द्वैत द्वेष काय बरा ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे बहुतां बहुतां रीती । अनंता विनंती परीसावी हे ॥ ४ ॥

॥ ७३ ॥ लालुचाईसाठीं बळकाविसी भावा । परी मी जाण देवा जिरों नेदीं ॥ १ ॥ असोंद्या निश्चय हा मनीं मानसीं । घातली येविशीं दृढ कास ॥ २ ॥ मज आहे बळ आळीचें सबळ । फोडीन अंत्राळ हृदय तुझें ॥ ३ ॥ करुणारसें तुकयाबंधु ह्मणे भुलवीन । काढूनी घेईन निज वस्तु ॥ ४ ॥

॥ ७४ ॥ तुझीं वर्में आह्मां ठायीं नारायणा । परि तूं शाहणा होत नाहीं ॥ १ ॥ मग कालावुली हाका देते वेळे । होतोसी परी डोळे नुघडिसी ॥ २ ॥ जाणोनी अज्ञान करावें मोहरें । खोटी खोडी हे रे तुझी देवा ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे कारण प्रचीति । पाहतों वेळ किती तेच गुण ॥ ४ ॥

॥ ७५ ॥ अवघीं तुज बाळें सारिखीं नाहीं तें । नवल वाटतें पांडुरंगा ॥ १ ॥ ह्मणतां लाज नाहीं सकळांची माउली । जवळी धरिलीं एकें दूरी ॥ २ ॥ एका सुख द्यावें घेऊनी वोसंगा । एकें दारीं गळा श्रमविती ॥ ३ ॥ एका नवनीत पाजावें दाटून । एकें अन्न अन्न करितील ॥ ४ ॥ एकें वाटतील न वजावीं दूर । एकाचा मत्सर जवळी येतां ॥ ५ ॥ तुकयाबंधु ह्मणे नावडती त्यांस । कासया व्यालास नरायणा ॥ ६ ॥

॥ ७६ ॥ निनांव हें तुला । नांव साजे रे विठ्ठला ॥ बरा शिरविला । फाटक्यामध्यें पाव ॥ १ ॥ काहीं तरी विचारिलें । पाप पुण्य ऐसें केलें ॥ भुरळें घातलें । एकाएकीं भावासी ॥ २ ॥ मुद्राधारण माळा टिळे । बोल रसाळ कोंवळे ॥ हातीं फांशांचें गुंडाळें । कोण चाळे गृहस्था हे ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे मिस्कीन । करितोसी देखोन ॥ पाहा दुरीवरी विच्छिन्न । केला परी संसार ॥ ४ ॥

॥ ७७ ॥ नाहीं घटिका ह्मणसी । लाग लागला तुजपाशीं ॥ पडिला हृषीकेशी । जाब सकल करणें ॥ १ ॥ माझें नेलें पांघरुण । ठावें असोन दुर्बळ दीन ॥ माणसांमधून । उठविलें खाणोऱ्या ॥ २ ॥ आह्मी हें जगवूनि होतों पाणी । संदी देवदेव करूनी ॥ जालासी कोठोनी । पैदा चोरा देहाच्या ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे केलें । उघडें मजचि उमगिलें ॥ ऐसें काय गेलें । होतें तुज न पुरतें ॥ ४ ॥

॥ ७८ ॥ कनवाळ कृपाळ । उदार दयाळ मायाळ ॥ ह्मणवितोसी परि केवळ । गळेकाटू दिसतोसी ॥ १ ॥ काय केलें होतें आह्मीं । सांग तुझें एक ये जन्मीं ॥ झालासी जो स्वामी । एवढी सत्ता करावया ॥ २ ॥ भलेपणाचा पवाडा । बरा दाविला रोकडा ॥ करूनी बंधु वेडा । जोडा माझा विखंडिला ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे भला । कैसें ह्मणताती तुजला ॥ जीव आमुचा नेला । अंत पाहिला कांहींतरी ॥ ४ ॥

॥ ७९ ॥ आतां कळों आले गुण । अवघेचि यावरून ॥ चोखट लक्षण ।

धरिलें हें घरघेणें ॥ १ ॥ या नांवें कृपासिंधु । ह्मणवितोसी दीनबंधु ॥ मज तरी मैंदु । दिसतोसी पाहातां ॥ २ ॥ अमळ दया नाहीं पोटीं । कठीण तैसाचि कपटी ॥ आंधळ्याची काठी । माझी गुदरसीच ना ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे पुरता । नाहीं ह्मण बरें अनंता ॥ एरवीं असतां । तुझा घोंट भरिला ॥ ४ ॥

॥ ८० ॥ काय सांगों हृषीकेशा । आहे अनुताप आला ऐसा ॥ गिळायासी निमिषा । लागों नेदावें ॥ १ ॥ माझें बुडविलें घर । लेंकरें बाळें दारोदार ॥ लाविलीं काहार । तारातीर करोनी ॥ २ ॥ जीव घ्यावा किंवा द्यावा । तुझा आपुला केशवा ॥ इतुकें उरलें आहे । भावाचिया निमिसें ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे जग । बरें वाईट ह्मणों मग ॥ या कारणें परि लाग । न सांडावा सर्वथा ॥ ४ ॥

॥ ८१ ॥ मायबाप निमाल्यावरी । घातलें भावाचे आभारीं ॥ तोही परि हरी । तुज जाला असमाई ॥ १ ॥ हे कां भक्तीचे उपकार । नांदतें विध्वंसिलें घर ॥ प्रसन्नता व्यवहार । शेवटीं हे झालासी ॥ २ ॥ एका जीवावरी । होतों दोनी कुटुंबारी ॥ चाळवूं तो तरी । तुज येतो निर्लज्जा ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे भला । आणीक काय ह्मणावें तुला । वेडा त्यानें केला ॥ तुजसवें संबंधु ॥ ४ ॥

॥ ८२ ॥ पुर्वीं पूर्वजांची गति । हेचि आइकिली होती ॥ सेवे लावूनी श्रीपती । निश्चिंती केली तयांची ॥ १ ॥ कां रे पाठी लागलासी । ऐसा सांग हृषीकेशी ॥ अद्यापवरी न राहासी । अंत पाहासी किती म्हणूं ॥ २ ॥ जन्मजन्मांतरीं दावा । आह्मां आपणां केशवा ॥ निमित्य चालवा । काईसयास्तव हें ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे अदेखणा । किती होसी नारायणा ॥ देखों शकवेना । खातयासी न खात्या ॥ ४ ॥

॥ ८३ ॥ निसुर संसार करून । होतों पोट भरून ॥ केली विवसी निर्माण । देवपण दाखविलें ॥ १ ॥ ऐसा काढियेला नीस । काय म्हणूं सहित वंश ॥ आणिलें शेवटास । हाउस तरी न पुरे ॥ २ ॥ उरलों पाळव्या शेवटीं । तेंही न देखवे दृष्टी ॥ दोघांमध्यें तुटी । रोकडीचि पाडिली ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे गोड । बहु झालें अति वाड ॥ ह्मणोनी कां बुड । मुळ्यांसहित खारें ॥ ४ ॥

॥ ८४ ॥ बरा जाणतोसी धर्मनीति । उचित अनुचित श्रीपति ॥ करूं येते राती । ऐसी डोळे झांकूनी ॥ १ ॥ आतां जाब काय कैसा । देसी तो दे जगदीशा ॥ आणिला बोळसा । आपणां भोंवता ॥ २ ॥ सेवेचिया सुखास्तव । बळें धरिलें अज्ञानत्व ॥ येईल परि हा भाव । ज्याचा त्यासी कारणा ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे नाहीं । आतां आह्मां बोल कांहीं ॥ जडोनियां पायीं । तुझें त्यांचि घेतलें ॥ ४ ॥

॥ ८५ ॥ कांहीं विपत्ति अपत्यां । आतां आमुचिया होतां ॥ काय होईल अनंता । पाहा बोलों कासया ॥ १ ॥ बरें अनायासें झालें । सायासेंविण बोले चाले ॥ काबाड चुकलें । केलें कष्टावेगळें ॥ २ ॥ बरा सांपडलासी वोजा । वर्मावरी केशीराजा ॥ बोलायासी तुझा । उजुरचि नाहींसा ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे दगा । बरा दिला होता बगा ॥ झडकरी चलागा । चांग दैवें पावलों ॥ ४ ॥

॥ ८६ ॥ देवा तुजपें माझ्या पूर्वजांचें ऋण । आहे तें कां नेदिसी अझून ॥ अवगलासी झोंडपणें । परि मी जाण जीवें जिरों नेदीं ॥ १ ॥ कळों येईल रोकडें । उभा करीन संतांपुढें ॥ तुझें काय एवढें । भय आपुलें मागतां ॥ २ ॥ आजीवरी होतों नेणता । तों तुज फावलें रे अनंता ॥ कवडीचा तो आतां । पडों नेदीन फेर ॥ ३ ॥ ठेविला ये जीवनीं जीव । ह्मणे तुकयाचा बांधव ॥ माझा गळा तुझा पाव । एके ठायीं बांधेना ॥ ४ ॥

॥ ८७ ॥ मागें असताशी कळला । उमस घेउं नसता दिला ॥ तेणेंचि काळें केला । असता अवघा निवाडा ॥ १ ॥ इतका न लागता उशीर । न धरितों भीडभार ॥ सिद्धासी व्यवहार । कासयासी लागला ॥ २ ॥ असोनियां माल खरा । किती केल्या येरझारा ॥ धरणेंही दिवस तेरा । माझ्या भावें घेतलें ॥ ३ ॥ अझून तरी इतक्यावरी । चुकवीं जनाचार हरी ॥ तुकयाबंधु ह्मणे उरी । नाहीं तरी नुरे कांहीं ॥ ४ ॥

॥ ८८ ॥ आतां न राहें क्षण एक । तुझा कळला रे लौकिक ॥ नेदीं हालों एक । कांहीं केल्यावांचूनी ॥ १ ॥ संबंध पडिला कोणाशीं । काय डोळे झांकितोसी ॥ नेईन पांचांपाशीं । दे नाहीं तरी वोढूनी ॥ २ ॥ सुखें नेदीस जाणवलें । नास केल्याविण उगलें ॥ तरि तेंही विचारिलें । आह्मी

आहे तुज आधीं ॥ ३ ॥ असेंच करूनी किती । नागविली नाहीं नीति ॥ तुकयाबंधु ह्मणे अंतीं । न सोडिसी ते खोडी ॥ ४ ॥

॥ ८९ ॥ तुज ते सवे आहे ठावें । घ्यावें त्याचें बुडवावें ॥ परि तें आह्मांसवें । आतां न फावे कांहीं ॥ १ ॥ नव्हों सोडायाचे धणी । कष्टें मेळविलें करोनी ॥ पाहा विचारोनी । आधी धरोनी काम नाहीं ॥ २ ॥ अवघे राहिले प्रकार । झालों जीवासी उदार ॥ असा हा निर्धार । कळला असावा असेल ॥ ३ ॥ आतां निदसुर नसावें । गांठ पडली कुणब्यासवें ॥ तुकयाबंधु ह्मणे राखावें । देवा महत्व आपुलें ॥ ४ ॥

॥ ९० ॥ बहु बोलणें नये कामा । वाउगें तें पुरुषोत्तमा ॥ एकाचि वचनें आह्मां । काय सांगणें तें सांग ॥ १ ॥ देणें आहे कीं भंडाई । करणें आहे सांग भाई ॥ आतां भीड कांहीं । कोणी न धरी सर्वथा ॥ २ ॥ मागें गेलें जें होऊनी । असो तें धरित नाहीं मनीं ॥ आतां पुढें येथूनी । कैसा काय विचार ॥ ३ ॥ सारखी नाहीं अवघी वेळ । हें तों कळतें सकळ ॥ तुकयाबंधु ह्मणे खळखळ । करावी ते उरेल ॥ ४ ॥

॥ ९१ ॥ आतां हें न सुटे न चुके । बोल कां दवडिसी फिके ॥ जन लोक पारिखें । अवघें केलें म्यां यासाठीं ॥ १ ॥ नये सरतां नव्हे भलें । तुझें लक्षण कळलें ॥ बैसलासी काढिलें । देहाचें मुळीं दिवाळें ॥ २ ॥ दिसतोसी बरा बोल कोंवळे । गुण मैंदाचे चाळे ॥ दिसताती ये वेळे । काय करूं विसंबोनी ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे देखतां । अंध बाहिर ऐकतां ॥ कैसें व्हावें आतां । इतुकियाउपरी ॥ ४ ॥

॥ ९२ ॥ तिहीं ताळीं हेचि हाक । ह्मणती पांढरा स्फटिक ॥ अवघा बुडविला लौकिक । सुखेंचि भीके लाविलीं ॥ १ ॥ थोंटा नांव शिरोमणी । नाहीं जोडा त्रिभुवनीं ॥ ह्मणोनी शाहाणे ते कोणी । तुझे दारीं बैसतीना ॥ २ ॥ निर्गुण निलाजिरा निनांवा । लंड झोंड कुडा देवा ॥ नागवणा या नांवा । वांचुनि दुजा नाइकों ॥ ३ ॥ सर्वगुणें संपन्न । कळों आलासी संपूर्ण ॥ तुकयाबंधु ह्मणे चरण । आतां जीवें न सोडीं ॥ ४ ॥

॥ ९३ ॥ तोचि प्रसंग आला सहज । गुज धरितां नव्हे काज ॥ न सांडितां लाज । पुढें वोज न दिसे ॥ १ ॥ तूं तर न होसी शाहाणा । नये

सांगतों तेंही मना ॥ आपण आपणा । आतां प्रयत्न देखावा ॥ २ ॥ न पुरवी पाहातां वाट । द्यावें प्रमाण चोखट ॥ कास घालूनियां नीट । चौघाचार करावा ॥ ३ ॥ आतां श्रमाचें कारण । नव्हे व्हावें उदासीन ॥ न पडे तयाविण । गांठी तुकयाबंधु ह्मणे ॥ ४ ॥

॥ ९४ ॥ हळूहळू जाड । होत चालिलें लिगाड ॥ जाणवेल निवाड । न करिसी परि पुढें ॥ १ ॥ मी तो सांगून उतराई । झालों आतां तुज काई ॥ कळों येईल भाई । तैसा करीं विचार ॥ २ ॥ मागें युगें अट्ठाविस । झालीं दिवसाचा दिवस ॥ मुद्दल व्याज कासावीस । होसी देवा ये कामें ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे राखें । आतां टाकीं तुझीं तीं सुखें ॥ जगजाहिर ठाउकें । झालें नाहीं खंडलेंसें ॥ ४ ॥

॥ ९५ ॥ पत्र उचटिलें प्रयत्नें । ग्वाही कराया कारणें ॥ नाहीं तरी पुण्यें । तुझ्या काय उणें आह्मां ॥ १ ॥ नांव तुझेंचि करोनी । आह्मीं सुखें पोट भरोनी ॥ केली जाणवणी । ह्मणउनि नाहीं ह्मणसील ॥ २ ॥ आतां इतुकिया-उपरी । दे नको भलतें करीं ॥ ह्मणती ऋणकरी । आमुचा इतकें उदंड ॥ ३ ॥ तुकयाबंधु जागा । आळवावया पांडुरंगा ॥ केला कांहीं मागायाची । नव्हती गरज ॥ ४ ॥

॥ ९६ ॥ माझ्या भावें केली जोडी । न सरेसी कल्पकोडी ॥ आणियेलें धाडी । घालूनी अवघें वैकुंठ ॥ १ ॥ आतां नलगे यावें जावें । कोठें कांहींच करावें ॥ जन्मोजन्मीं सुखें खावें । बैसोनसें झालें ॥ २ ॥ असंख्य संख्या नाहीं पार । आनंदें दाटलें अंबर ॥ न माये अपार । त्रिभुवनीं सांठवितां ॥ ३ ॥ अवघें भरलें सदोदित । झाले सुखाचे पर्वत ॥ तुकयाबंधु ह्मणे परमार्थ । धन अद्भुत सांपडलें ॥ ४ ॥

॥ ९७ ॥ आतां चुकलें देशावर । करणें अकरणें सर्वत्र ॥ घरासी आगर । आला सकळ सिद्धींचा ॥ १ ॥ झालों निधानें निधान । लागलें अनंतगुणरत्न ॥ जन्माचें विच्छिन्न । दुःख झालें दरिद्र ॥ २ ॥ तारूं सागरिंचें अवचितें । हेंदोवलें आलें येथें ॥ ओढिलें संचितें । पूर्वदत्तें लाधलें ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे सीमा । नाहीं आमुचिया दैवा ॥ आतां पुरुषोत्तमा । ऐसा सौदागर सांपडला ॥ ४ ॥

# ;कारामबावांची मुलगी भागूबाई इचे अभंग.

॥ १ ॥ मी रे अपराधी मोठी । मज घालावें बा पोटीं ॥ १ ॥ मी तान्हूलें अज्ञान । म्हूण कां देऊं नये स्तन ॥ २ ॥ अवघ्या संतां तूं भेटसी । मी रे एकली परदेशी ॥ ३ ॥ भागु ह्मणे विठोबासी । मज धरावें पोटासी ॥ ४ ॥

॥ २ ॥ साधूचा संग धरींरे ॥ श्रीहरी स्मरणीं रंगली वाणी । भक्ती धरीं दृढ काम तजींरे । साधूचा संग धरीं रे ॥ १ ॥ माया जाळें हें मृग-जळ पाहें । गुंतसी परी गती नाहीं बरीरे ॥ साधूचा० ॥ २ ॥ दुस्तर डोहीं बुडसी पाहीं । तारु हें विठ्ठल नाम धरीरे ॥ साधूचा० ॥ ३ ॥ कीर्तनरंगीं होसी अभंगी । भागु बघ तुज नमन करीरे ॥ साधूचा संग० ॥ ४ ॥

# तुकारामबावांचे शिष्य निळोबा यांचे अभंग.

## मंगलाचरण.

॥ १ ॥ ॐनमोजी पंढरिराया । हृत्कमलवासीया गुरुनाथा ॥१॥ तुमचा अनुग्रह लाधलों । पात्र झालों महा सुखा ॥ २ ॥ सकळ संत करिती कृपा । दाविला सोपा निज मार्ग ॥ ३ ॥ निळा ह्मणे दिवस रात्रीं । गातों वक्त्रीं गुण नाम ॥ ४ ॥

॥ २ ॥ स्फूर्ति माझी चेतविली । गुणीं लाविली आपुलिये ॥ १ ॥ आणखी दुजें नावडे कांहीं । येचि प्रवाहीं सुखावली ॥ २ ॥ नानापरीचे अर्थ भेद । वाचे विद्गद उमटती ॥ ३ ॥ निळा ह्मणे मांडितों बोली । बदवा मुखकमळीं तुम्ही ते ॥ ४ ॥

॥ ३ ॥ माझिये वाचेसी नाहीं धीर । प्रसवते भार अक्षरांचे ॥ १ ॥ तुमचे कृपेचा हा महिमा । पुरुषोत्तमा अगाध ॥ २ ॥ काय नेणों वदवा

वाणी । वळुनियां गुणी आपुला ॥ ३ ॥ निळा म्हणे त्यालीं लेणें । प्रसाद भुषणें तुमचीं ॥ ४ ॥

॥ ४ ॥ आबद्ध वाचा मतिहीन । बुद्धी मळीण विषयलोभें ॥ १ ॥ परि तुह्मी कृपावंत । कां हें वदवितां मी नेणें ॥ २ ॥ न कळे अर्थप्रमेय तंतु । हेतु मातु दृष्टांतही ॥ ३ ॥ निळा ह्मणे पुरुषोत्तमा । जाणा महिमा तुमचा तुह्मी ॥ ४ ॥

॥ ५ ॥ नावडे तें जना देवा । कांहो वदवा मज हातीं ॥ १ ॥ आईते प्रसाद संतवाणी । अमृत झरवणी सुस्वाद ॥ २ ॥ सत्यस्वानुभव बोलिले जें जें । प्रगटुनी सहजे सिद्धांत ॥ ३ ॥ मिळा ह्मणे तुमच्या वरदें । यथानुवादें वचनें तिये ॥ ४ ॥

॥ ६ ॥ तेथें माझे कायसे बोल । संत सखोल संवाद ॥ १ ॥ आइकतांचि समाधान । होतसे उन्मन मनाचें ॥ २ ॥ सिद्ध प्रसादाची वाणी । जे तुमच्या गुणीं मिरवली ॥ ३ ॥ निळा ह्मणे मी तो रंक । जाणती लोक सकळही ॥ ४ ॥

॥ ७ ॥ कांहींच जाणीव न करावी । आहे जिवीं हें ठावें ॥ १ ॥ परि मज बोलवी देवो । तेथें उपावो कोणाचा ॥ २ ॥ नव्हें कांहीं बहुश्रुत । वक्ता पंडित वाचाळ ॥ ३ ॥ निळा म्हणे श्रीविठ्ठल । बोलवी बोल ते बोलें ॥ ४ ॥

॥ ८ ॥ वेदवक्ता नारायण । तोचि तो आपण सर्व दृष्टा ॥ १ ॥ वदवी सेवकाची वाणी । आपुल्या गुणीं प्रवर्तउनी ॥ २ ॥ परम गुह्यार्थ तोचि प्रगटी । आपण पोटीं संचरोनी ॥ ३ ॥ निळा ह्मणे विठ्ठल हरी । वक्ता वैखरी तो वाचा ॥ ४ ॥

॥ ९ ॥ परात्परा सच्चिदानंदा । परिपूर्णाजी आनंदकंदा ॥ जगदधीशा विश्ववंद्या । विश्वव्यापका अनंता ॥ १ ॥ भक्तवत्सला कृपासिंधु । तापत्रयहरणा दीनबंधु ॥ तुझ्या नामीं अगाध बोधु । भक्त पावती भाविक ॥ २ ॥ परमपुरुषा गुणातीता । अव्यया अक्षरा जी अव्यक्ता ॥ विश्वमंगळा रुक्मिणीकांता । पुंडलिकवरदा पंढरीशा ॥ ३ ॥ निरंजना निर्विकारा । निर्विकल्पा जगदोद्धारा ॥ वेदवेदांतसागरा । विश्वंभरा कल्पा-

दी ॥ ४ ॥ भावाभाव विवर्जिता । सगुण निर्गुणा गुणातीता ॥ निळयास्वामी कृपावंता । चरणीं माथा तुमचिये ॥ ५ ॥

॥ १० ॥ आतां आठवूं पाउलें । सकुमार चांगले ईटे ते ॥ १ ॥ तेणें प्रसन्न होती गुरु । संत मुनिश्वरु करुणाब्धी ॥ २ ॥ आदर साचा ईटेवरी । तो मज निर्धारी जाणवला ॥ ३ ॥ निळा ह्मणे जिवीते ध्यातां । कृतकृत्यता करितील ॥ ४ ॥

॥ ११ ॥ संतीं सांगितलें मज । आपुलिये गुज आंतरींचें ॥ २ ॥ ह्मणती आठवीं पंढरिनाथा । सांडी वार्त्ता ईतरांचि ॥ २ ॥ नको विसंबों तूं यासीं । आगाध सुखासि पावसील ॥ ३ ॥ निळा ह्मणे सेवा आतां । हेचि प्रसन्नता आमुची ॥ ४ ॥

॥ १२ ॥ संत कृपा वरद बळें । माझीं वचनामृत फळें ॥ १ ॥ स्वीकारिजे पंढरिनाथें । बैसोनियां सादर चित्तें ॥ २ ॥ ह्मणति गोड हे तुझी वाणी । सद्गुरुकृपेचीं बोलणीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे श्रोते संत । प्रसन्नपणें दत्त चित्त ॥ ४ ॥

## गुरूची स्तुति.

॥ १३ ॥ दळणीं कांडणीं गाईन मंगळीं । कान्हो वनमाळी प्राणसखा ॥ १ ॥ हरिचिया नामें हरती महादोष । तुटती कर्मपाश निमिषमात्रें ॥ २ ॥ सद्गुरुरायाचे पाउले गोमटे । वंदितांचि भेटे ह्रदयस्थ ॥ ३ ॥ माझ्या सद्‌गुरुचें अवलोकितां मुख । समाधीचें सुख तुच्छ वाटे ॥ ४ ॥ सद्‌गुरुरायाचें स्वरूप पाहातां । विश्वीं एकात्मता भासों लागे ॥ ५ ॥ नित्य सद्‌गुरुचीं आळवितां नामें । येती निज धामें भेटों सये ॥ ६ ॥ सद्‌गुरुस्वामीचा महिमा अगाध । वचनेंची बोध करी शिष्या ॥ ७ ॥ सद्‌गुरु सद्‌गुरु करितां उच्चार । येती हरिहर भेटों सये ॥ ८ ॥ सद्‌गुरुच्या नामें पोट माझें धाय । आनंदाचा होय पाहुणेरु ॥ ९ ॥ निळा ह्मणे माझ्या सद्‌गुरुची मूर्ती । सकळाहि विश्रांति विश्रांतीसी ॥ १० ॥

॥ १४ ॥ दळणीं दळीतां आठवे मानसीं । अलकापुरवासी ज्ञानराज ॥ १ ॥ ओविया मंगळीं गाईन तयासि । स्वामी तुकयासी निजानंदें ॥ २ ॥ एकजनार्दन आणि नामदेव । देती स्वानुभव आठवितां ॥ ३ ॥ परलोक सोईरे जिवलग हे माझे । जे का पंढरिराजें अनुग्रहिले ॥ ४ ॥ निळा म्हणे संत जे जे भूमंडळीं । त्यांची पायधुळी वंदीन मी ॥ ५ ॥

॥ १५ ॥ बोलविला बोलें वेद । म्हैसा सुबुद्ध स्वरान्वयें ॥ १ ॥ काय एक न करा देवा । भिंती चालवा निचेष्टिता ॥ २ ॥ शिष्यालागीं देतां बोध । नलगे पलार्ध निमिष्य हि ॥ ३ ॥ निळा म्हणे ज्ञानेश्वरा । मजहि आंगिकारा रंका दीना ॥ ४ ॥

॥ १६ ॥ शेवेलागिं शेवक झालों । तुमच्या लागलों निज चरणां ॥ १ ॥ अहो स्वामी तुकयादेवा । यावरि न करावा अव्हेर ॥ २ ॥ सहज लिळे उदकीं वह्या । तुम्ही रक्षिलीया निजसत्ते ॥ ३ ॥ निळा म्हणे धराल हातीं । तरि द्याल मति निरुपम ॥ ४ ॥

॥ १७ ॥ नमियेलीं घरांत घरें । शिवशक्ती वधूवरें ॥ १ ॥ आदि गुरु चराचरा । पासुनी ज्या परंपरा ॥ २ ॥ प्रसवोनियां दृश्य जातां । सुरासुरा माता पिता ॥ ३ ॥ निळा ह्मणे वरद हस्तें । पावविती जे परमार्थातें ॥ ४ ॥

॥ १८ ॥ ॐनमोजि विश्वातीता । विश्वव्यापका श्री अनंता ॥ परात्परा सद्गुरुनाथा । ईश्वर नियंता सकळादी ॥ १ ॥ तुमचा अनुग्रहो झालिया । निरसे मोह ममता माया ॥ करुनी उपदेश ब्रह्मया । निजात्म पदीं स्थापिसी ॥ २ ॥ सनकादिकांचें चिंतन । नाम तुमचें अनुसंधान ॥ त्यातें स्वरूप स्थिति पावउन । ठेविसी निमग्न निजानंदीं ॥ ३ ॥ शुक प्रऱ्हाद नारद । पावोनियां तुमचा बोध ॥ करिती सदा ब्रह्मानंद । तारिती कीर्तनें आणिकां ॥ ४ ॥ निळा ह्मणे परमानंदा । परात्परा सच्चिदानंदा ॥ सद्गुरुराया निजात्मबोधा । कृपेस्तव लाहीजे तुमचिये ॥ ५ ॥

॥ १९ ॥ ईश्वर नियंता निर्गुण । नाम रूप जया नाहीं वर्ण ॥ विद्याअविद्यातीत चिद्घन । आपणा जो आपण गुरुशिष्य ॥ १ ॥ नातळोनी महदहंकार मायेसी । सहजचि गुणातीत तो अनायासीं ॥ होणें

निमणें नाहीं ज्यासी । आपण आपणासी कदा न देखे ॥ २ ॥ नुरउनी एकाएकपण । दुजेपणा घालीत शून्य ॥ पूर्णपणें नुरवीच पूर्ण । तत्साक्षी आपण सर्वद्रष्टा ॥ ३ ॥ ऐसिया आदि गुरुमूर्ती । आपणचि पुरुष आपण शक्ति ॥ उमामहेश ऐशिया ख्याति । वाढउनी त्रिजगतीं विस्तारिली ॥ ४ ॥ मग आपण गुरु आपण शिष्य । आपण दीक्षा आपण उपदेश ॥ दाउनी परंपरेचा मोस । अभेदज्ञानास प्रगटितु ॥ ५ ॥ ह्मणोनियां जि आदिनाथा । प्रकृति पुरुष तूंचि तूं आतां ॥ सकळ विश्वीं विश्वजनिता । करिसी तत्वता निजबोध ॥ ६ ॥ शिव शक्ति निमिस दाऊन । उपदेशिलें निज गुह्यज्ञान ॥ तेणें देवोदेवि सुखसंपन्न । पावला मीन तो लाभ ॥ ७ ॥ तेणें गोरक्ष उपदेशीला । निजात्मज्ञानीं प्रबोधिला ॥ त्रैलोक्यामाजि गौरविला । योग दाविला विशदार्थ ॥ ८ ॥ गुह्यागुह्य ज्ञान कथन । तेणें गहिनीतें उपदेशून ॥ उद्धरावया दीन जन । तेणें निवृत्ति सिक्षापिला ॥ ९ ॥ तेचि हातवटि ज्ञानेश्वरा । दिधली आदि परंपरा ॥ सोपान मुक्ताई वटेश्वरा । चांगया प्रसाद दीधला ॥ १० ॥ निळा ह्मणे ऐसियापरी । नाथ सांप्रदायाची थोरी ॥ प्रगट केली ज्ञानेश्वरी । भगवद्गीता उकलूनी ॥ ११ ॥

॥ २० ॥ उत्तीर्ण त्याचें काय व्हावें । न कळे भावें वंदितों ॥ १ ॥ जीव पायीं ठेवूं ह्मणे । लटिकेपणें तो मिथ्या ॥ २ ॥ देह मांस चर्म हाडें । अर्पितां आपाडें नैश्वर तीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे चरणीं माथा । ठेवूं आतां संतांचिये ॥ ४ ॥

॥ २१ ॥ मायबाप उत्तीर्ण होणें । न घडे देणें अपत्या ॥ १ ॥ जरी लक्ष जोडी दिली । तरी ते झाली उपाधी ॥ २ ॥ जैसा आत्मा विश्व प्रसवे । तेणें त्या व्हावें उत्तीर्ण कैं ॥ ३ ॥ निळा ह्मणे शुद्ध भावें । चरणा जावें लिगटोनी ॥ ४ ॥

॥ २२ ॥ जन्ममरणा निवारिती । जे दाविति सुपंथ ॥ १ ॥ बैसविती अक्षय पदीं । ब्रह्मानंदीं कृपाळू ॥ २ ॥ एकाचि वचनें सिद्धासनीं । करिती बैसउनी अगाध ॥ ४ ॥ निळा ह्मणे उत्तीर्णत्वासी । दुर्लभ पाशीं कवण वस्तु ॥ ४ ॥

॥ २३ ॥ खांबसूत्रीं खेळवी दोरी । नाचती पुतळ्या दिसती वरी ॥ १ ॥ तैसा बोलवी बोलता । न दिसे परि तो मज आतौता ॥ २ ॥ किन्नरी वाजे नानापरि । वाजवित्याची ते कूसरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे तैसा माझा । वाच्यवाचकु सद्गुरुराजा ॥ ४ ॥

॥२४॥ जयाचेनि कृपामृतें । पोखे माझें जीवन भातें॥१॥ कैसा विसरों मी यासी । एकानेक नाहीं ज्यासी ॥ २ ॥ नेणोनियां आपपर । केला माझा अंगिकार ॥ ३ ॥ निळा ह्मणे शिकवा बोल। बोली बोलणें सूढाळ ॥ ४ ॥

॥ २५ ॥ जेणें माझी वाचस्पती । आपुल्या कृपें केली सरती ॥ १ ॥ त्याचें उत्तीर्ण होऊं ह्मणतां । जीवा जीवपण नुमसे आतां ॥ २ ॥ अवघेंची त्याचें घेणें देणें । मी हें माझें कांहींचि नेणें ॥ २ ॥ निळा ह्मणे ठेविलों ऐसा । जळिंचा बुदबुद जळींचि जैसा ॥ ४ ॥

॥ २६ ॥ ज्याचा केला अंगिकार । चालवी भार त्याचा हा ॥ १ ॥ ऐसा आहे कृपावंत । सद्गुरुनाथ दीनांचा ॥ २ ॥ देउनियां बोध बुद्धी । निरसी उपाधी ममतेच्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे मेळवी सुखा । न ह्मणे पारिखा जीवजंतु ॥ ४ ॥

॥ २७ ॥ उदार ऐसा न दिसेचि दृष्टी । पहातां ही सृष्टी मज आतां ॥ १ ॥ जयाचीया वचनें जीवा जीवपण । नुमसेचि शीवपण शीवा अंगीं ॥ २ ॥ अविद्येनासीं अहंता मावळे । बोध भानु उजळे प्रकाशीतु ॥ ३ ॥ निळा ह्मणे दावी आनंदाआनंदु । भोगवी निजानंदु निजानंदा ॥ ४ ॥

॥ २८ ॥ नव्हे हे सांगितली मात । महीमाची अद्भुत सद्गुरुचा ॥ १ ॥ जीवाजीवपणाचा वंगु । तोडूनि अभंगु ब्रह्म करी ॥ २ ॥ आपुलीये मूळ मिरासी । नांदवी ज्यासी हातीं धरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे करितां सेवा । ऐसिया दैवा पात्र करी ॥ ४ ॥

॥ २९ ॥ ह्मणोनि यांचिया श्रवणें पाठें । वचनें पालटे देहबुद्धी ॥ १ ॥ वैराग्याची राणीव जोडे । ज्ञानाचें उघडे निज मंदीर ॥ २ ॥ नवविधाचे नाना भोग । वसविती अंग येऊनियां ॥ ३ ॥ निळा ह्मणे भुक्ति मुक्ति । शांति विरक्ति वरती त्या ॥ ४ ॥

॥ ३० ॥ गर्जत नामाच्या कल्लोळीं । आले महीतळीं उद्धरीत ॥ १ ॥ ते हे वीर वैष्णव गाढे । कळीकाळ सांपुढें तृणप्राय ॥ २ ॥ वचनमात्रेंचि देती बोध । करिती अगाध सच्छिष्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे त्याचिये वाणी । अमृत बोलुनी वृष्टि करी ॥ ४ ॥

॥ ३१ ॥ हरीचें मनोहर कीर्तन । हेंचि साधन कलियुगीं ॥ १ ॥ नको आणिकां मतांतरीं । पडों भवसागरीं वाहावसी ॥ २ ॥ निश्चयाचें उत्तर हेंचि । करावी हरीची हरिभक्ती ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसे कानीं । सांगितलें येउनी गुरुदेवें ॥ ४ ॥

॥ ३२ ॥ जिहीं गाइलें हरिचें नाम । आतळों कर्म नेदी त्यां ॥ १ ॥ जन्म जरा हरुनी व्याधी । बैसवी पदीं आपुलीये ॥ २ ॥ ऐसा अगाध महिमा याचा । वर्णितां वाचा न पुरती ॥ ३ ॥ निळा ह्मणे स्तवितां संतीं । अपार मती वेदांचिये ॥ ४ ॥

॥ ३३ ॥ हेंचि आह्मासी गुरुगम्य । हरिचें नाम उपदेशिलें ॥ १ ॥ आणिका साधनीं चाडची नाहीं । घालिती अपायीं ह्मणोनियां ॥ २ ॥ योगाभ्यास मंत्रजप । पुरश्चरण तप हरिनाम ॥ ३ ॥ निळा ह्मणे दाविला मार्ग । हाचि हा चांग गुरुनाथें ॥ ४ ॥

॥ ३४ ॥ नाना साधनें मंत्र तंत्र । उपासना यंत्र अवघड तें ॥ १ ॥ ह्मणोनियां हरिचें नाम । भाविका सुगम हरिभक्ता ॥ २ ॥ नाहीं आघात प्रायश्चित्त । वाचा शुचिर्भुत सर्वदा ॥ ३ ॥ निळा ह्मणे ज्ञान व्युत्पत्ति । न कळति निगुती योगाचिया ॥ ४ ॥

॥ ३५ ॥ कृपावंता सद्गुरुराया । केला जो माझीया मना बोध ॥ १ ॥ तो काय बोलोनि दाखऊं आतां । बोलणें बोलतां आरौतें पडे ॥ २ ॥ शब्दातीत परात्पर । ध्वनि ॐकार न पवेचि ॥ ३ ॥ निळा ह्मणे आनंद कोटी । उथळोनी सृष्टी गगनीं भरे ॥ ४ ॥

॥ ३६ ॥ डोळीयाचाही डोळा बुद्धी । माझी उघडुनियां कृपानिधि ॥ देखणी करुनियां त्रिबुद्धी । निजात्मपदीं स्थापिली ॥ १ ॥ तेणें दिसती ठाया वावो । हृदय सकळाचेही भाव ॥ संत दावी जं अनुभव । आणिखिही सर्व मायाकृत ॥ २ ॥ नवल कृपेची हे जाती । फिटली मोह ममता भ्रांती ॥

उत्पत्ति स्थिति प्रळय होती । ते ते निगुती आटले ॥ ३ ॥ देखणें झालें नयनानयन । देखती आपुलें ही वर्तन ॥ राहिले ठायींच ते जडोन । अभेद होऊन देखती ॥ ४ ॥ निळयास्वामीसद्गुरुनाथा । देखणा तूंचि मी नाहीं आतां ॥ तोडुनी मी हे माझी ममता । आपणा आतौता मेळविलों ॥ ५ ॥

॥ ३७ ॥ नवल कृपा हे घनवट । उडउनी मायेचें फलकट ॥ आप आपणां केलें प्रगट । मोडिली वाट दुसऱ्याची ॥ १ ॥ आपणासवें आपण खेळे । आप आपणासी चावळे ॥ शेखी आपण आपणा मिळे । खेळतां वेगळें दाऊनि ॥ २ ॥ ऐसा आपुलिया संतोषा । एकी भिन्नत्वाची आशा ॥ अनेकत्वाचा मिरउनी ठसा । एकीएकला सेवटीं ॥ ३ ॥ दाऊ-नियां नानाकार । नाना कृति नारी नर ॥ तेचि करुनियां निराकार । आपणा अंगीं आपण ॥ ४ ॥ निळा ह्मणे कृपा तरणी । प्रगटोनियां माझिये वाणी ॥ प्रकाशी आपुल्या किरणीं । लाविली गुणीं वर्णावया ॥ ५॥

॥ ३८ ॥ फुटलें धरण आला लोंढा । नावरे तोंडा माझीया तो ॥ १ ॥ कृपाघनें वृष्टी केली । वाचा गर्जिन्नली बोधवरें ॥ २ ॥ प्रतीत विद्यु-ल्लता झळकती । थेंबुटे पडती ब्रह्मरसें ॥ ३ ॥ निळा ह्मणे पिकलें पीक । आलें सकळीक भागासी तें ॥ ४ ॥

॥ ३९ ॥ सुखीं साठविलें सुख । हरिखा हरिख भेटवीला ॥ १ ॥ आनं-दासीही आनंद झाला । सद्गुरु भेटला तेचि क्षणीं ॥ २ ॥ प्रतितिसही प्रतीत झाली । शांती मेळविली निजशांती ॥ ३ ॥ निळा ह्मणे सुकाळ ऐसा । केला दशदिशा कोंदलिया ॥ ४ ॥

॥ ४० ॥ प्रसाद तुमचा लाधला आतां । झालों कृतकृत्य सनाथ ॥ १ ॥ पुरविला जिवींचा हेत । होतों चिंतीत मानसीं तो ॥ २ ॥ कृपा करुनियां दाविला देवा । आपुला ठेवा उघडुनी ॥ ३ ॥ निळा ह्मणे सद्गुरुनाथा । गाऊं आतां ओंविया गीतीं ॥ ४ ॥

॥ ४१ ॥ वोवाळुनियां सांडीन काया । वरुनी पायां तुमचीया ॥ १ ॥ जीवभाव ठेउनी वरी । राहेन द्वारीं तिष्ठत ॥ २ ॥ जोडूनियां कृतांजुळी । नामावळी आठवीन ॥ ३ ॥ निळा ह्मणे करीन सेवा । अहोरात्री देवा चरणाची ॥ ४ ॥

॥ ४२ ॥ कोटी दिवाळ्या दसरे सण । घडले श्रीचरण देखिले ॥ १ ॥ सकळही पर्वे व्रतें जोडलीं । तुमचीं वंदिलीं पदांबुजें ॥ २ ॥ आलिंगनें सीतळ काया । निवाल्या बाह्या जीवप्राण ॥ ३ ॥ निळा ह्मणे अवघींच अंगें ॥ तुमच्या संगें सुस्नात ॥ ४ ॥

॥ ४३ ॥ आवघ्याचि संपत्ती आलीया घरा । तुमचिया दातारा आगमनें ॥ १ ॥ सीतळ झालों पावन झालों । तुमचिया लागलों चरणासी ॥ २ ॥ धरिलीया जन्माचें सार्थक झालें । तुह्मीं अवलोकिलें ह्मणोनियां ॥ ३ ॥ निळा म्हणे धरिलें हातीं । जेव्हांची संतीं तुम्ही मज ॥ ४ ॥

॥ ४४ ॥ पूर्वार्चित होतें पुण्य । तेणें हे चरण आतुडलों ॥ १ ॥ आतां सुखा नाहीं उणें । इहलोकीं भोगणें परत्रीचें ॥ २ ॥ ऐसिया सुखा पात्र केलें । तुह्मीं अवलोकिलें कृपादृष्टी ॥ ३ ॥ निळा म्हणे पूर्ण काम । पावलों संभ्रम सुखाचा ॥ ४ ॥

॥ ४५ ॥ जीवें भावें जोडिलें होतें । पूर्व फळातें आजी आलें ॥ १ ॥ अंगिकार तुम्हीं केला । मुखींचा दिधला प्रसाद ॥ २ ॥ अभयदानें सुखी केलें । दाविलीं पाउलें सतेज ॥ ३ ॥ निळा म्हणे चरणीं थारा । दिधला किंकरा अनाथा ॥ ४ ॥

---

## देवाचें स्तवन.

॥ ४६ ॥ काय वर्णूं याचे गुण । ज्याचें त्रिभुवन रुपस ॥ १ ॥ चंद्र सूर्य तारांगणा । दीप्ती हुताशना ज्यांचेनी ॥ २ ॥ जेणें वाड केलें गगन । दिधलें आसन वसुंधरे ॥ ३ ॥ निळा ह्मणे धरिला मेरु । भरिला सागरु दिव्य क्षीरें ॥ ४ ॥

॥ ४७ ॥ जेणें मंथुनि क्षीरार्णव । काढिलीं अपूर्व दिव्य रत्नें ॥ १ ॥ साचा महिमा वर्णू कैसा । भरोनी आकाशा कोंदला तो ॥ २ ॥ जेणें धरुनियां दांतीं । आणिली वसुमती थावरिली ॥ ३ ॥ निळा ह्मणे जेणें भानु । ठेविला उदनु न मैळेसा ॥ ४ ॥

॥ ४८ ॥ काय विघरुनी केलें पाणी । घडिली अवनी कास्याची ॥ १ ॥ महिमा जाणे त्याचा तोचि । नेणे विरंची जरी ज्ञाता ॥ २ ॥ काय पिंजुनी केलें गगन । निर्मिला हुताशन कासयाचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे भरोनी अंवरा । निर्मिला वारा कासीयाचा ॥ ४ ॥

॥ ४९ ॥ ऐसे याचे आकळ खेळ । जाणतां पांगुळ वेदश्रुती ॥ १ ॥ काय फोडुनी चांदिण्या केल्या । गगनीं बांधल्या कीं मुक्त ॥ २ ॥ कासयाचे पर्वत धोंडे । घडिले अपाडे अमर्याद ॥ ३ ॥ निळा ह्मणे पर्जन्य धारा । केल्या अपारा त्या कैशा ॥ ४ ॥

॥ ५० ॥ कासियाचीं बीजें घडलीं । लावणी केली वृक्ष तृणा ॥ १ ॥ नेणवे महिमा तुमचा देवा । देवा मानवा दानवासी ॥ २ ॥ काय मर्दुनी घातले बहळ । नाना परिमळ पुष्पयाती ॥ ३ ॥ निळा ह्मणे नानापरिचे । घोष तरुचे फळें पर्णें ॥ ४ ॥

॥ ५१ ॥ रसना एकी रस तो नाना । कैसी विवंचना रचिली हे ॥ १ ॥ नकळे लाघव तुमचें हरी । करितां भरोवरी जाणिवेच्या ॥ २ ॥ काय पिंजुनी मेघ पडळ । घडिलें ज्वाळ विजुवाचें ॥ ३ ॥ निळा ह्मणे तडक भारी । फुटे अंबरीं कासीयाचा ॥ ४ ॥

॥ ५२ ॥ वीज पडे गगन गडाडी । रचिली परवडी काशाची ॥ १ ॥ अद्भुत प्रकाशाचा लोळ । पडतां अंतराळ दणाणीत ॥ २ ॥ काय हे तुमची कैसी लीळा । नेणवे सकळां चोजवितां ॥ ३ ॥ निळा ह्मणे गर्भी बाळा । वाढवा गोपाळा कैशा परी ॥ ४ ॥

॥ ५३ ॥ तैसे तुमच्या योगें थोर । आह्मी पामर जीवजंतु ॥ १ ॥ गाऊं वानूं तुमच्या गुणा । तेणें भुषणा वाढलों ॥ २ ॥ कस्तुरीसंगें मृत्तिका जैसी । विके कनकेसी समान ॥ ३ ॥ निळा ह्मणे पुरुषोत्तमा । अपार महिमा हा तुमचा ॥ ४ ॥

॥ ५४ ॥ चुबकळूनि काढिलीं । अक्षरें घोळिलीं ब्रह्मरसें ॥ १ ॥ ऐसे तुष्टलेती देवा । माझिया भावासारिखे ॥ २ ॥ अर्थ चातुर्य तें मी नेणें । तुमचें करणें तुह्मी जाणा ॥ ३ ॥ निळा ह्मणे सर्वत्र साक्षी । यालागीं कैं पक्षी दीनाचे ॥ ४ ॥

*

॥ ५५ ॥ मन माझें बैसलें ध्यानीं । तुमचे चिंतनीं नामाचिये ॥ १ ॥ एकासनीं स्थिरावलें । आठवीं पाउलें निरंतर ॥ २ ॥ तैशीच नामीं रंगली वाणी । करीत घोकणी सर्वदां ॥ ३ ॥ निळा ह्मणे नेणती करणें । तुह्माविण भुषणें दुजीं लेऊं ॥ ४ ॥

॥ ५६ ॥ आपुलिया मनोगतें । गाईन तुमचे गुण वाणी ॥ १ ॥ अहो देवा कृपानिधि । माझिये बुद्धी साह्य व्हावें ॥ २ ॥ नका येऊं देऊं आड । मतिवाद नाड बुडवणा ॥ ३ ॥ निळा ह्मणे नावडो मात । आणखी हा हेत वाड करा ॥ ४ ॥

॥ ५७ ॥ ऐशी विठाई माउली । अनाथां कृपेची साउली ॥ १ ॥ उभी असे निरंतर । ठेउनीयां कटीं कर ॥ २ ॥ देउनी प्रेमाचें भातुकें । दासा अवलोकी कौतुकें ॥ ३ ॥ निळा ह्मणे महिमा इचा । वर्णितां कुंठित वेदवाचा ॥ ४ ॥

॥ ५८ ॥ सूर्य विटला प्रकाशासी । परि तो सांडितां नयेचि त्यासी ॥ १ ॥ तेंवि हो पंढरीश परमात्मा । सांडूं नेणें आपला महिमा ॥ २ ॥ अग्नि दीपना विटला । परि तो न सुटेचि कीं त्याला ॥ ३ ॥ निळा ह्मणे साखरे गोडी । उदका आर्द्रता न सोडी ॥ ४ ॥

॥ ५९ ॥ वस्तुचा जो स्वभाव गुण । वोसंडूं नेणें तो आपण ॥ १ ॥ तेंवि हा परमात्मा श्रीहरी । सांडूं नेणे आपुली थोरी ॥ २ ॥ जेंवि कस्तुरीपरिमळ । शितळपणा मलयानिळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे परिसपणा । नेणें सांडूं आपुल्या गुणा ॥ ४ ॥

॥ ६० ॥ लोहा लागतां सुवर्ण । करावें हा स्वभाव गुण ॥ १ ॥ केंवि सांडवेल परिसा । जगद्गुरु हा विठ्ठल तैसा ॥ २ ॥ रत्ना अंगीं रत्नकीळ नव्हती भिन्न आग्निज्वाळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे सांडुनी जळा । सागर न निवडे वेगळा ॥ ४ ॥

॥ ६१ ॥ नसता गुण स्वाभाविक । वस्तुचि तरी निरर्थक ॥ १ ॥ तेंवि देवा देवपण । नसतां अंगीं तो पाषाण ॥ २ ॥ विना परिमळें कस्तुरी । मृत्तिकाचि ते निजनिर्धारी ॥ ३ ॥ निळा ह्मणे न मारी जिवा । तरी तें विषचि नव्हे तेव्हां ॥ ४ ॥

॥ ६२ ॥ मोलें विके स्वभाव गुणीं । येऱ्हवि तितें न पुसे कोणी ॥ १ ॥ हिंगा दुर्गंधीच मोल । तेणेंविण तो अवघा फोल ॥ २ ॥ भांगि न भुलवी भक्षिल्या । येरचि तरि तो व्यर्थची पाला ॥ ३ ॥ निळा ह्मणे तैशिया परि । देवपणेंचि देवा थोरी ॥ ४ ॥

॥ ६३ ॥ माझा विठो नव्हेचि तैसा । उदारपणें ज्याचा ठसा ॥ १ ॥ नामचि एक स्मरल्या साठीं । गणिका बैसविली वैकुंठीं ॥ २ ॥ भ्रष्ट अजामेळ दोषी । स्मरतां नेला निज धामासीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे सुदाम देवा । देउनी स्थापिलें निज वैभवा ॥ ४ ॥

॥ ६४ ॥ मच्छ कच्छ वराह झाला । खुजाहि शोभला त्रिकाळ ॥ १ ॥ भक्तप्रिय प्रियोत्तम ॥ सदा अविश्राम दासाविशीं ॥ २ ॥ फरशधारी धनुर्धर । स्वरूप सुंदर गोपवेशी ॥ ३ ॥ निळा ह्मणे बौध्य कलंकी । धरी नेटकीं रूपें ऐशीं ॥ ४ ॥

॥ ६५ ॥ अहो देवा तिमिर नाशा । बुद्धी प्रकाशा विठ्ठला ॥ १ ॥ अनुग्रह तुमचा झाला जया । निरसला माया तम त्याचा ॥ २ ॥ असोनियां ते घरींदारीं । मुक्तचि संसारीं संगातीत ॥ ३ ॥ निळा ह्मणे नित्यानंदें । भोगिती ते पदें वैकुंठिचीं ॥ ४ ॥

॥ ६६ ॥ कवण्या योगें तल्लिनता । ऐशी जडोनी ठेली चित्ता ॥ १ ॥ हें मी नेणें गा श्रीपती । तुमची करणी तुह्मा हातीं ॥ २ ॥ बुद्धि इंद्रि-याचें कोड । पुरउनी वाचा केली वाड ॥ ३ ॥ निळा ह्मणे दिवसराती । न कळे केव्हां जाती येती ॥ ४ ॥

॥ ६७ ॥ परम सुखाचा सुकाळ । चित्तीं वसे सर्वहि काळ ॥ १ ॥ ऐसें केलें कृपादान । तुह्मी मनातें मोहून ॥ २ ॥ जिवा पैलाडीये खुणे । पावविलें सामर्थ्यें गुणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसे किती । उपकार वानूं पुढतो पुढती ॥ ४ ॥

॥ ६८ ॥ आठवितां तुमची लिळा । करितां दासाचा सोहळा ॥ १ ॥ ऐसा स्वाभाविक गुण । वसे तुह्मां अंगीं पूर्ण ॥ २ ॥ शरणांगताचिया नांवें । तुह्मां उत्साह दुणावे ॥ ३ ॥ निळा ह्मणे वत्सा धेनु । जेंवि पान्हावे देखोनु ॥ ४ ॥

॥ ६९ ॥ सदा सेवकाचा लाड । पुरवा करूनियां कोड ॥ १ ॥ जेंवि कृपावंत माय । तान्हयाच्या धणि धाय ॥ २ ॥ खाववा जेववा । लेणीं लुगडींही त्या पुरवा ॥ ३ ॥ निळा ह्मणे दिवानिशी । नेणा विसंबों तयाशी ॥ ४ ॥

॥ ७० ॥ उंच पदीं ठाव । करा स्वीकारूनी भाव ॥ १ ॥ अवघी कृपा तयावरी । दासांविशीं उदार हरी ॥ २ नमूनियां याती कुळ । करूं धांवतां सांभाळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे हाचि धंदा । तुह्मां सर्वदां गोविंदा ॥ ४ ॥

॥ ७१ ॥ कल्पोकल्पीं युगायुगीं । व्यवसाय हाचि तुह्मांलागीं ॥ १ ॥ करावें दासाचें पाळण । निवारूनि साचा शिण ॥ २ ॥ निद्रा आळस कांहीं नेणा । हेंचि वाहीं नारायणा ॥ ३ ॥ निळा ह्मणे करुणा पोटीं धरिली नित्य याची साठीं ॥ ४ ॥

॥ ७२ ॥ कळासलेती युगायुगीं । नेणा शीणभाग अंगीं ॥ १ ॥ भक्ताचिये हाक सवे । क्षणें तेथेंचि प्रगट व्हावें ॥ २ ॥ निरसूनियां मोह मळ । पदीं रक्षावे निश्चळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे यश कीर्ति । देउनि सुखाची संपत्ती ॥ ४ ॥

॥ ७३ ॥ बुद्धि जिहीं अढळ केली । चरणीं तुमचे निक्षेपिली ॥ १ ॥ तया विसंबाल कैसे । कवळीलेति निज मानसें ॥ २ ॥ प्राणापानाची ही गती । कुंठित केल्या इंद्रियवृत्ती ॥ ३ ॥ निळा ह्मणे काया वाचा । नेमुनि निर्धारी तुमचा ॥ ४ ॥

॥ ७४ ॥ कीर्तनाची आवडी मोठी । धांवे पाठी वैष्णवा ॥ १ ॥ जेथें होती नामघोष । नाचे उदास ते ठायां ॥ २ ॥ ऐकोनियां आपुली कीर्ति । सुखें जगपती सुखावे ॥ ३ ॥ निळा ह्मणे टाळिया छंदें । डुले आनंदें सप्रेमें ॥ ४ ॥

॥ ७५ ॥ भक्त भावांच्या संपत्ती । भोगा ऐश्वर्यें श्रीपती ॥ १ ॥ करा साचें समाधान । न सांडितां सिंहासन ॥ २ ॥ केली नामाची घोकणी । जिहीं तुमच्या चक्रपाणी ॥ ३ ॥ निळा ह्मणे ठेविली जिहीं । निष्ठा अखंड तमचे पायीं ॥ ४ ॥

॥ ७६ ॥ गगनीं वसोनियां रवी । प्रकाश भूमंडळा पूरवी ॥ १ ॥ तैसे तुह्मी जेथिल तेथें । असोनियां चाळा भुतें ॥ २ ॥ नभ न सांडुनी आपुला ठावो । पुरवी वावो जगातें ॥ ३ ॥ निळा ह्मणे सन्निधानें चुंबक चालवी अचेतनें ॥ ४ ॥

॥ ७७ ॥ उतरिला माझा भार । येणें कैवार करुनियां ॥ १ ॥ आपुला आपण सोहळा करी । पाहिजे संसारीं पुरवी तें ॥ २ ॥ नेंदि पडो उणें कोठें । आलीं संकटें निवारीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे झाला ऋणी । चक्रपाणी आह्मां घरीं ॥ ४ ॥

॥ ७८ ॥ नाहीं तेंचि आणुनि ठेवी । चाड जिवीं जे वाटे ॥ १ ॥ समयाचे समया वरी । निर्माण करी आणि पूरवी ॥ २ ॥ नेदि दिसों केविलवाणें । मिरवी भूषणें निजांगींचीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे गुंतला भाके । धांवे हाके पाचारितां ॥ ४ ॥

॥ ७९ ॥ मी तो नेणें याची लिळा । आकळ कळा खेळ खेळे ॥ १ ॥ पुढील सुचना जाणोनियां । आधींच उपाया करुनी ठेवी ॥ २ ॥ निमित्य दाउनियां आणिकाचें । आपणचि त्याचें रूप धरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे नवल पोटीं । वाटे शेवटीं मग कळे ॥ ४ ॥

॥ ८० ॥ झाले ते ते चमत्कार । निरंतर आठवती ॥ १ ॥ काय सांगों कोणापाशीं । अभाविकासी सत्य न वाटे ॥ २ ॥ ज्या ज्या काळें जें जे झालें । तुह्मीं जें केलें कौतुक तें ॥ ३ ॥ निळा ह्मणे धरुनी ध्यानीं राहिलों तें मनीं आठवित ॥ ४ ॥

॥ ८१ ॥ भाविकाचा मनोभाव । पाववी देव सिद्धी हा ॥ १ ॥ तेंचि सत्य बोलिलों बोले । माझिया आलें स्वानुभवा ॥ २ ॥ जाणे अंतरींचें आर्त । साक्षभूत सकळांचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे संदेह नाहीं । अनुमान कांहीं इदर्थीं ॥ ४ ॥

॥ ८२ ॥ जागे आपुल्या उचितावरी । सावधान हरि सर्वदा ॥ १ ॥ परि हा कळों नेदी भेद । वाटे प्रालब्ध फळ देतें ॥ २ ॥ आसुमाई चिन्ह पडे दृष्टी । वाटे पोटीं नवल तेव्हां ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐशिया परी ।

॥ ८३ ॥ उत्तीर्ण नव्हीजे चि वेचतां जीवें । ऐसे वरवे उपकार याचे ॥ १ ॥ सांगावे ते कोठवरी । जे जे अवसरीं जे केले ॥ २ ॥ वाटे तिटे घरीं दारीं । आपुल्यापरी सांभाळी ॥ ३ ॥ निळा ह्मणे आपुल्या नेमा । न टळे महिमा हाचि याचा ॥ ४ ॥

॥ ८४ ॥ मागें ऐकिले पवाडे याचे । आजि ते साचे कळों आले ॥ १ ॥ आपुलियाचि स्वानुभवा । आलें तेव्हां साच कळलें ॥ २ ॥ आणुनी मोहरा संकट टाळी । गोणी दुष्काळीं दाणियाची ॥ ३ ॥ निळा ह्मणे प्रयोजनीं । साहित्य येउनी संपादिलें ॥ ४ ॥

॥ ८५ ॥ पाहिजे तें समयीं देणें । नेदिता उणें पडों कोठें ॥ १ ॥ ऐसा कृपेचा सागर । रमावर श्रीविठ्ठल ॥ २ ॥ उपकार याचे आठवितां । न संडे चित्ता आनंद तो ॥ ३ ॥ निळा ह्मणे भरोंसा झाला । संदेह फिटला मानसींचा ॥ ४ ॥

॥ ८६ ॥ याचा आश्रय झाला आह्मां । या पुरुषोत्तमा विठ्ठलाचा ॥ १ ॥ गातां वाचितां चरित्रें याचीं । न करी दासाची उपेक्षा हा ॥ २ ॥ आपुला संकेत सिद्धी न्यावा । करणें देवा हेंचि सत्य ॥ ३ ॥ निळा ह्मणे निष्ठा जाणें । तैसाचि करणें आदर त्या ॥ ४ ॥

॥ ८७ ॥ न कळती तुझिया मावा । दैसा देवा आणि मानवा ॥ १ ॥ कैसें तुझें रूप नाम । कोण कूळ याति धर्म ॥ २ ॥ जागृत आहेसी कीं निजेला । उपवासीची कीं धाला ॥ ३ ॥ निळा ह्मणे जित कीं मेला । न वजसी कोणीही देखिला ॥ ४ ॥

॥ ८८ ॥ नाहींचि माडाळ मूळ । पाहतां यासी जाती कूळ ॥ १ ॥ रूप नाम न दिसे वर्ण । पाय डोळे हात कान ॥ २ ॥ बाळ तरुणा वयसा वृद्ध । जिण्यामरणापरता शुद्ध ॥ ३ ॥ निळा ह्मणे धरिला चित्तीं । कैसा नेणों पूर्वी संतीं ॥ ४ ॥

॥ ८९ ॥ जेंवि देखोनि सकळां । आपणा न देखे हा डोळा ॥ १ ॥ परि तो न ह्मणावा कीं अंध । देखणाचि तो शुद्ध बुद्ध ॥ २ ॥ अवधि-यातें जाणे । जाणिव जेंवि आपणा नेणे ॥ ३ ॥ निळा ह्मणे आहे तैसा । आत्मा आपआपणा ऐसा ॥ ४ ॥

॥ ९० ॥ असोनी अलिप्त सर्व संगीं । आत्मा भोगीना विरागी ॥ १ ॥ ऐसें जाणती ते ज्ञानी । नित्य मुक्त त्रिभुवनीं ॥ २ ॥ मी हें स्फुरे जेथूनियां । आत्मा परचि साहूनियां ॥ ३ ॥ निळा ह्मणे मी हें वदती । मूर्ख देहातेंचि कल्पिती ॥ ४ ॥

॥ ९१ ॥ सोयरा श्रीहरी । आत्मा एक चराचरीं ॥ १ ॥ नाहीं तया आपपर । वसवी सकळांचें अंतर ॥ २ ॥ देवां दानवां मानवां । स्थूळ सुक्ष्मादि सरवां ॥ ३ ॥ निळा ह्मणे जीवमात्रीं । व्यापकपणें तोचि धात्री ॥ ४ ॥

॥ ९२ ॥ ब्रह्म आणि गोवळपणें । यज्ञ भोक्ता आणि उच्छिष्ट खाणें ॥ महर्षि स्तव आणि हुंबरी घेणें । नाटकी विंदानें अघटित ॥ १ ॥ नित्य मुक्त आणि बांधला गळा । परात्पर आणि कोंडिती बाळा ॥ ब्रह्मचर्य आणि सहस्र सोळा । भोगिल्या अबळा आणिखींही ॥ २ ॥ असुरमर्दन आणि मारिती गौळणी । लक्ष्मिकांत आणि चोरितो लोणी ॥ ईशाचा ईश आणि फोडी दुधाणी । गुणातीत अगुणीं भरलासे ॥ ३ ॥ विश्वव्यापक आणि यशोदे कडिये । शुकाचें ध्यान आणि दासी पदिये ॥ कृपावंत आणि मारिली माये । रडे येमाये येमाये लटिकाची ॥ ४ ॥ रोमीं ब्रह्मांडें आणि बाळक झाला । आतुर्बळी आणि उखळीं बांधिला ॥ बळीचा द्वारपाळ आणि पंढरिये आला । पुसताचि याला नाहीं कोणी ॥ ५ ॥ सखा भावाचा आणि मामासिचि मारी । धर्मस्थापक आणि अकर्मे करी ॥ देहातीत आणि आयुधें धरी । अकर्ता करी मना आलें ॥ ६ ॥ सर्वज्ञचि आणि नेणता झाला । काळाचाहि काळ आणि बाऊसि भ्याला ॥ माउशीचे स्तनीं विषचि प्याला । उत्तीर्ण तिये झाला जीवघातें ॥ ७ ॥ अरूप आणि घेतलीं सोंगें । निष्काम आणि गौळणी मागें ॥ नित्य तृप्त आणि गोवळ संगें । नित्य उच्छिष्टें खाय त्यांचीं ॥ ८ ॥ भूपति आणि मंत्री माकडें । अर्धांगीं नोवरी आणि नेली ह्मणुन रडे ॥ नावा सांडुनी तारितो दगडे । वनवासी उघडे फळें भक्षी ॥ ९ ॥ अमरा पूज्य आणि राखितो गाई । क्षिराब्धीचा जामात आणि घोंगडें डोई ॥ ईशाचा ईश आणि लोळतो भुई । नंदाचे गोठणीं गाईवाडा ॥ १० ॥ सनकादिक देव स्तविती भावें । तोहा लंपट गौळणीसवें ॥ न मगती त्यासी देउंचि धांवे । आणि मागत्यासी व्हावें अति कृपण ॥ ११ ॥ जगदानी आणि भिकारी झाला । विराटरूपी आणि खुजट ठेला ॥ त्रिपाद देतां त्रैलोक्या नेला ।

शेखीं बळिनें बांधला द्वारदेशीं ॥ १२ ॥ नित्य पूर्ण आणि भोजन मागे । बाळकचि दासाचें कापवी अंगें ॥ न जेवितां सवें पळोंचि लागे । मग धांवे त्यामागें विमानीं घाली ॥ १३ ॥ दयावंत आणि अंगचि चिरिलें । मयोरध्वजाचीं केलीं शकलें ॥ उदार कर्णाचे दांतचि पाडिले । शिबीतें सोलिलें कपोतासाठीं ॥ १४ ॥ ब्राह्मण भक्त आपणा ह्मणवी भला । आणि नारदाचि नारदी करुनी ठेला ॥ सख्खे बहिणीची भीड नाहीं याला । जांबळाच्या निमिसें केला उपहास ॥ १५ ॥ वेदासी स्तवितां उगाचि बैसे । आणि गौळणीच्या शिव्या ऐकोनि हांसे ॥ नित्यानंद आणि रडतचि बैसे । आळी घेउनी मिसें जेवणाच्या ॥ १६ ॥ निळा ह्मणे हा लाघवी हरी । कांहींही न करुनी अवघेंचि करी ॥ भक्ता द्वेषियां एकेचि परी । निंदा स्तुतीवरी सम देणें ॥ १७ ॥

॥ ९३ ॥ तुमच्या कृपामृतजळीं । माझी वचनवल्ली अंकुरली ॥ मती विस्तारें फांकली । फळ संभारी हरिनामें ॥ १ ॥ नवल कृपामृत घन । वरुषला तुमचें हें वरदान ॥ माझी वाचा आणि मन । केलीं पावन कीर्तनें ॥ २ ॥ एकट एकलेचि श्रीपती । पुरोनी उरलेति त्रिजगतीं ॥ अपूर्व चरित्रें अपूर्व ख्याती । संत गर्जती स्वानंदें ॥ ३ ॥ शुक सनकादिक नारद । व्यास वाल्मीक आणि प्ऱ्हाद ॥ साहि शास्त्रें च्याऱ्ही वेद । पुराणें पवाडे वर्णिती ॥ ४ ॥ परि तुह्मी नाकळा साचिये मती । अपार ह्मणोनियां गुण संपत्ती ॥ जेथिचें तेथेंचि भक्त स्तविती । अपार ह्मणती विस्तारला ॥ ५ ॥ सगुण गोकुळीं गौळियां घरीं । निर्गुण योगियां हृदयमंदिरीं ॥ ढिसाळ ब्रह्मांडा बाहेरी । महर्षी देव स्तविताती ॥ ६ ॥ शिव आपुलीये हृदयभुवनीं । नित्य निमग्न तुमचे ध्यानीं ॥ भोळ्या भाविकां लागुनी । आवडी ऐसें रूप धरी ॥ ७ ॥ कामिनी भावें कांतातुर । मदन मूर्ति मनोहर ॥ वैर संबंधी कंसचाणूर । तया तैसाचि ते ठायीं ॥ ८ ॥ गोवळामाजी गाई पाठीं । वानरामाजी मेळउनी थाटी ॥ रावण निःपातनीं परम हटी । आतुर्बळी कळिकाळा ॥ ९ ॥ नित्य नूतन तुमचे गुण । चरित्रें गाती वैष्णव जन ॥ निळा झाला सुखसंपन्न । चरणीं मन ठेवितां ॥ १० ॥

॥ ९४ ॥ अरुपी रूपाचा विस्तार । अगुणीं गुणांचा शृंगार ॥ अनामीं नामाचा बडिवार । सहस्रावरी विराजला ॥ १ ॥ नाहीं अवतारा मर्यादा । अपार गुणांची संपदा ॥ केलीं चरित्रें सच्चिदानंदा । कोण

ार्णिता पुरेल ॥ २ ॥ वृद्ध तरुण नव्हसी मुग्ध । सूक्ष्म स्थूळ ना अगाध ॥ ारंग सागरिंचे बुद्बुद । नाहिं गणना त्यां जैसी ॥ ३ ॥ अनंतरूपा मधुसू-ःना । जगत्रयव्यापका जनार्दना ॥ योगिमानसमनोरंजना । अहो नेधाना सुखमूर्ती ॥ ४ ॥ मुख मंडित सुंदर कर । कटीं विराजले सकु-ार ॥ चरणीं ब्रिदाचा तोडर । रुळती असुर तया तळीं ॥ ५ ॥ संत ार्जती स्वानंदें । कीर्तन करिती ब्रह्मानंदें ॥ नृत्य करिती नाना छंदें । ाढती ब्रिदें सुस्वरें ॥ ६ ॥ निळा ह्मणे तया सुखा । नाहीं पार नव्हे ेखा ॥ समाधि लागे सनकादिकां । तो सोहळा देखोनी ॥ ७ ॥

॥ ९५ ॥ हातीं चक्र सुदर्शन । वागविता न मनी त्याचा सिण ॥ ापुल्या भक्ताचें रक्षण । आणि निर्दाळण अरिवर्गा ॥ १ ॥ भक्तस्तवनीं ाविले कान । भक्तापासी जीव प्राण ॥ भक्ताकडे लाविलें मन । कोणीं ांजिल यासाठीं ॥ २ ॥ नेणे भक्ताविण आणिक । करी दास्य होउनी ेवक ॥ त्याचे वचनाचें कौतुक । श्रवणीं मिरवी भुषणें ॥ ३ ॥ भक्त ाहती वाडे कोडें । होउनी ठाके तेचि पुढें ॥ भक्त वाणिती जे पवाडे । ्कों निवाडे बैसोनी ॥ ४ ॥ त्याचीं वचनें स्तवन माळा । आवडी मिरवी ापुल्या गळा ॥ त्यासी आवलोकितां डोळां । झाला देखणा सर्वांगें । ५ ॥ भक्ताच्या नामें नामांकित । त्याचिया क्रिया कर्मे करित ॥ त्याचि-ा रूपें रूपमंडित । झाला भगवंत भक्तसुखें ॥ ६ ॥ निळा ह्मणे भक्ताची ाठीं । नाना स्वरूपें नटला नटी ॥ नाना अवतार त्याचिये संकटीं । नाना ामें धरियेलीं ॥ ७ ॥

॥ ९६ ॥ बहुत अवतार घेतलीं सोंगें । बहुतां भक्तांसी तारिलें मार्गे ॥ बहुतचि ोभला बहुतां अंगें । बहुतां संगें क्रिडा केली ॥ १ ॥ मासा कासव डुकर झाला । ्सिंह वामन होउनी ठेला ॥ भक्ताचे काजीं संकटें यालां । बहुत आव-ला आवगणिया ॥ २ ॥ एके दिवशीं गोधनामागें । अवघाचि गिळि-ला होता नागें ॥ त्यातें चिरुनियां निघाला वेगें । वाचला भाग्यें ोळियांच्या ॥ ३ ॥ एकदा वोणवा गिळितुचि आला । गोवळें देखोनी ाकिती त्याला ॥ पसरुनी मुख तो अवघाचि प्याला । विराट झाला वरुपी हा ॥ ४ ॥ वनामाजी ब्रह्मा चोरुनी आला । वत्सें गोवळें घेउनी ला ॥ अंगें आपण तैसाची झाला । मिरवत आला गोकुळांत ॥ ५ ॥ द्राची पांजी आपणचि खाय । त्याचिया क्रोधें पाउसाचें भय ॥ मग

उचलुनी डोंगर तळीं त्या राहे । गोकुळासगट नाहीं भ्याला ॥ ६ ॥ चेंडु-वाच्या मिसें बुडाला डोहीं । काळयाचि नाथुनी आणिला पाही ॥ नाचती गोवळे वोरसल्या गाई । आनंदासी काई उणें तेथें ॥ ७ ॥ द्वेषिया ह्मणोनी मामातेंचि मारी । विश्वासी ह्मणोनी पांडवांघरीं ॥ आवडत्या ह्मणोनी भोगिल्या नारी । लाघवी मुरारी खेळ खेळे ॥ ८ ॥ निळा ह्मणे हा भक्ताची साटीं । नाना कचाटें सोसितो आटी ॥ धरूनियां भावें बैसतां पोटीं । सोडवी संकटीं स्वामी माझा ॥ ९ ॥

॥ ९७ ॥ जाणों जातां तुह्मां जाणीवचि विरे । तुमच्या निजध्यासें मनचि मुरे ॥ तुमचिये भेटी अंगचि नुरे । वाचाहि वोसरे स्तवितां तुह्मा ॥ १ ॥ ध्यानें तुमच्या जिउचि हारपे । तुह्मासी जाणता बुद्धीचि करपे ॥ तुमच्या चिंतनें चित्तहि विसर्पे । मिसळे चिद्रुपें चैतन्येसी ॥ २ ॥ तुमच्या आठवें निळाची नाहीं । तुह्मिचि अवघे अंतर्बाही ॥ तुह्माविण दुसरें नुरेचि कांहीं । नाम रूप तेंहि अवघे तुह्मी ॥ ३ ॥

॥ ९८ ॥ महिमा अद्भुतचि पाहतां । चरणीं उद्धार झाला पतिता ॥१॥ अहिल्या सिळा झाली शापें । चरणस्पर्शें ते निष्पाप ॥ २ ॥ उद्धरिलें विमळार्जुन । अगाध चरणाचें महिमान ॥ ३ ॥ निळा ह्मणे तारिल्या सिळा । हाही प्रताप आगळा ॥ ४ ॥

॥ ९९ ॥ शकटासुर काळ यासी । प्रताप ठाउका हा तयासी ॥ १ ॥ बळिसी झाला विद्यमान । देतां तीन पांड दान ॥ २ ॥ लवणासुरा अनु-भव । कुशा गोमताचळा सर्व ॥ ३ ॥ निळा ह्मणे चतुरानना । नित्य करितां पूजा ध्याना ॥ ४ ॥

॥ १०० ॥ पुजूनियां पुंडलिकें । चरण अवलोकीले निके ॥ १ ॥ तोहि जाणतो महिमान । हृदयीं कवळिले ह्मणऊन ॥ २ ॥ शेष जाणे शयन झाला । पद्में उमटलीं तो शोभला ॥ ३ ॥ निळा ह्मणे कुरवाळितां । कमळा पावली अर्धांगता ॥ ४ ॥

॥ १०१ ॥ सकळहि संत आराधिती । हृदयकमळीं ते पूजिती ॥ १ ॥ चरण गोमटे ह्मणउनि । पापा तापा करित धुनी ॥ २ ॥ नित्यानित्यें आठविती । जीवें भावें वोवाळिती ॥ ३ ॥ निळा ह्मणे तृप्त झाले । चर-णामृतेंचि ते धाले ॥ ४ ॥

॥ १०२ ॥ नारायणा तुमच्या चरणीं । भुक्ति मुक्तिचिया खाणी ॥ १ ॥ मोक्ष सर्वदां तिष्ठत । चरणीं जोडुनियां हस्तक ॥२॥ रिद्धी सिद्धी वोळंगती । चरणीं तुमचिया श्रीपती ॥ ३ ॥ निळा ह्मणे अवलोकितां । पाउलें सकुमार सायोज्यता ॥ ४ ॥

॥ १०३ ॥ तुमच्याचि चरणाचा महिमा । नेणा तुह्मी पुरुषोत्तमा ॥१॥ आह्मा दासाचें जीवन । घडे अमृताचेंचि पान ॥२॥ वृक्ष नेणती फळाची गोडी । भोक्तेची जाणती ते आवडी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जाणती संत । भक्त तुमचे ते भाग्यवंत ॥ ४ ॥

॥ १०४ ॥ दुभिन्नले जया पाय । तया सुखा उणें काय ॥ १ ॥ महिमा जाणे पृथुराजा । किंवा गौतमाची भाजा ॥ २ ॥ ध्यानीं ध्यातां चंद्र-मौळी । समाधिस्त नित्य काळीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे सनकादिक । संतहि जाणती सकळिक ॥ ४ ॥

॥ १०५ ॥ सर्वकाळ तुमच्या पदीं । मोक्ष मुक्ति रिद्धी सिद्धी ॥ १ ॥ करिती भक्ताचें पाळण । जे जे ध्याती हृदयीं चरण ॥२॥ तुमच्या चरणातें चिंतिती । वैकुंठीं ते पूज्य होती ॥ ३ ॥ निळा ह्मणे जगदोद्धारा । लागीं ते आले पंढरपुरा ॥ ४ ॥

॥ १०६ ॥ सिंधुतनया सेवितां पाय । तुमचे तल्लिन होउनी ठाय ॥१॥ ब्रह्मानंदाची राणीव । चरणरेणुमाजी सर्व ॥ २ ॥ ह्मणे हे न विसंबें मी आतां । युगें कल्पकोटी जातां ॥ ३ ॥ निळा ह्मणे सकुमार ते । विटे सांपडले आमुतें ॥ ४ ॥

॥ १०७ ॥ संत गाती सनकादिक । तुमचिये कौतुक कीर्तीचें ॥ १ ॥ तारिल्या शिळा गिळिला वन्ही । पर्वत उचलूनि धरिला वरी ॥ २ ॥ सागर सारुनी द्वारकापुरी । वसविली नगरी उदकांत ॥ ३ ॥ निळा ह्मणे गोवळवत्सें । झाला निजइच्छे क्षणमात्रें ॥ ४ ॥

॥ १०८ ॥ तारुनियां प्रचंड शिळा । उतरला पाळा मर्कटांचा ॥ १ ॥ करुनी सिंधु पायवाट । वधिले थाट राक्षसांचे ॥ २ ॥ गोवळवेशें कौंसा-दिकां । लाविल्या सिकां मर्दियेले ॥ ३ ॥ निळा ह्मणे ब्रह्मचारी । भोगोनियां नारी सोळा सहस्र ॥ ४ ॥

॥ १०९ ॥ नगरी नेली वैकुंठासी । कीर्ती हे ऐसी अद्भुतचि ॥ १ ॥ कंस वधिला भोमासुर । महिमा अपार हा घोष ॥ २ ॥ तारुनी शिळा उतरी कटका । हाही नेटका पुरुषार्थ ॥ ३ ॥ निळा ह्मणे नाथिला सर्प । भंगिला दर्प रावणाचा ॥ ४ ॥

॥ ११० ॥ अयोध्येसी जन्मले राम । पुरुषोत्तम मथुरेसी ॥ १ ॥ आनंद झाला दशरथाघरीं । गोकुळामाझारी तैसाचि ॥ २ ॥ ऋषीयज्ञ सिद्धी नेला । कृष्णें आणिला गुरुपुत्र ॥ ३ ॥ निळा ह्मणे वरिली सीता । येणें दुहिता भीमकाची ॥ ४ ॥

॥ १११ ॥ श्रीकृष्ण विचरे कुंजवनीं । तैसाचि दंडकारण्यीं श्रीराम ॥ १ ॥ एकें वधिला खर दूषण । एकें मर्दन कागबगा ॥ २ ॥ नासिक छेदनें शूर्पनखा । येणें पूतना देखा शोषियेली ॥ ३ ॥ निळा ह्मणे चरित्र माळा । रचिली स्वलीळा रामकृष्णें ॥ ४ ॥

॥ ११२ ॥ वदविली अरुपवाणी । वैदिक पुराणीं मिश्रीत ॥ १ ॥ ह्मणोनियां संतजन । करिती श्रवण बैसोनी ॥ २ ॥ अर्थ तात्पर्याचे घेती । आणि डोलविती मस्तक ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसें केलें । मज या विठ्ठलें दयाघनें ॥ ४ ॥

॥ ११३ ॥ श्रोते वक्ते होती सुखी । अध्यात्म बिखी भाविक ॥ १ ॥ ऐसा केला प्रसंग हरी । आरुष वैखरी वदउनी ॥ २ ॥ साबडेंचि परि रुचे ऐसें । केलें सौरसें आपुलिया ॥ ३ ॥ निळा ह्मणे आपुला गुणी । केली वोवणी अक्षरा ॥ ४ ॥

॥ ११४ ॥ जाणोनियां मनोभाव । केला सर्व परिपूर्ण ॥ १ ॥ ऐसेचि तुह्मी कृपासिंधु । दीनबंधु सर्वदा ॥ २ ॥ करुनियां कृपादृष्टी । केली वृष्टी अमृतें ॥ ३ ॥ निळा ह्मणे देउनी वर । मतिविस्तार वाढविला ॥ ४ ॥

॥ ११५ ॥ जाणोनियां मनींचा हेत । केलें सनाथ मजलागीं ॥ १ ॥ कृपावंत संत सद्गुरु । भवार्णव तारु मजलागीं ॥ २ ॥ बोलविली अरुषवाणी । श्रीहरिच्या गुणीं आपुलिये ॥ ३ ॥ निळा ह्मणे नवलचि केलें । अंकिता गौरविलें निज अंकीं ॥ ४ ॥

॥ ११६ ॥ पशूमुखें ज्ञानेश्वरें । कराविला उच्चारें वेदघोषु ॥ १ ॥ तैसेचि तुह्मीं मजही केलें । सामर्थ्यें वदविलें आपुलिया ॥ २ ॥ मी तो मुळींचाचि मतिमंद । जाणोनिया भेद अंतरींचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे अंगिकार । केलाजि वर देऊनियां ॥ ४ ॥

॥ ११७ ॥ मज तो माझें न केळेचि हीत । पतिता पतित आगळा ॥ १ ॥ परी तुह्मी लाविले कांसे । उतरा जैसे उतराल ॥ २ ॥ कर्महीन मतीहीन । न कळेचि ज्ञान विहिताचें ॥ ३ ॥ निळा ह्मणे धरिलें हातीं । हेचि निश्चिती मानियेली ॥ ४ ॥

॥ ११८ ॥ कृपाघनें वृष्टी केली । माझी निववीलीं निजांगें ॥ १ ॥ ह्मणोनियां वारंवार । याचे उपकार आठवितों ॥ २ ॥ न घेउनी कांहीं सेवा । धांविले कणवा आपुलिया ॥ ३ ॥ निळा ह्मणे सुखी केलें । हातीं धरिलें वरदानें ॥ ४ ॥

॥ ११९ ॥ सर्वांतरीं वास याचा । महदादी अणुचा हृदयस्थ ॥ १ ॥ नाहीं दुरी जवळी ऐसा । कोंदोनी दिशा भरलासे ॥ २ ॥ एकवीसही स्वर्गावरी । पाताळाभीतरी भुमंडळा ॥ ३ ॥ निळा ह्मणे सर्वांतरीं ॥ वसोनी वीटेवरी ठाकला ॥ ४ ॥

॥ १२० ॥ कांहीं करी ना हा करवी । असोनि जीवीं जीववी हीन ॥ १ ॥ संतचि ओळखती यासी । जाणतां आणिकांसीं दुर्लभ ॥ २ ॥ बुद्धीचिये पाठीं पोटीं । न देखे शेवटीं बुद्धी तया ॥ ३ ॥ निळा ह्मणे सत्ता याचि । न देखे विरंची आणी रुद्र ॥ ४ ॥

॥ १२१ ॥ जैसिया तैसा मिळोनियां । नेणवे ह्मणोनियां कोणासी ॥ १ ॥ गोडी साखर करितां भिन्न । वेगळी कैसेंन रूप धरी ॥ २ ॥ डोळा देखतां एकची दिसे । करितां जैसे भिन्न नये ॥ ३ ॥ निळा ह्मणे वाचा वदतां । दिसती ऐक्यता परि भिन्न ॥ ४ ॥

॥ १२२ ॥ सत्यासाठीं माझी चाली । संतीं केली आज्ञा ते ॥ १ ॥ विठ्ठल विठ्ठल ह्मणों मुखें । वाणूं सुखें गुण याचे ॥ २ ॥ काय आह्मा दासा चिंता । धणी पुरविता शिरावरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे निश्चिंतीनें । असों वचनें एकाचिया ॥ ४ ॥

॥ १२३ ॥ पशुमुखें वेदाच्या श्रुती । पढवा कीर्ती तुमचिये ॥ १ ॥ अचेतन भिंती चालवणें । हेंही करणें विचित्र ॥ २ ॥ तेरा दिवस उदकीं ठेवा । कागद देवा कोरडे ॥ ३ ॥ निळा ह्मणे नारायण । ब्राह्मणजन तुह्मा घरीं ॥ ४ ॥

॥ १२४ ॥ मृत प्राणी ते जिवविले । पुरुषही केले स्त्रियांचे ॥ १ ॥ हे तो तुमची सहज स्थिति । लोकांसी भक्ति प्रगटावया ॥ २ ॥ प्रसादेंची विधवेसी बाळ । जन्मविला केवळ भातलवंडा ॥ ३ ॥ निळा ह्मणे तुमची करणी । देवाहुनी अधिक ॥ ४ ॥

॥ १२५ ॥ अहो कृपेच्या सागरा । अहो भक्तकरुणाकरा ॥ भुक्ती-मुक्तीच्या दातारा । जगदोद्धारा विठोजी ॥ १ ॥ अहो त्रीविक्रमा वामना । रामा कृष्णा मधुसूदना ॥ दशरथात्मजा रघुनंदना । दानव-दमना मुरारि ॥ २ ॥ अहो चतुरामाजी सुजाणा । अहो अच्युता नारायणा ॥ अहो राधारुक्मिणिरमणा । दिनोद्धारणा गोविंदा ॥ ३ ॥ अहोजी वैकुंठनायका । विश्वचराचरपालका ॥ अनंत ब्रह्मांडव्यापका । यदुकुळटीळका श्रीहरी ॥ ४ ॥ अहो केशवा माधवा । जनार्दना श्रीवासुदेवा ॥ मुकुंदा दामोदरा यादवा । भक्तजनभावा लक्षीसा ॥ ५ ॥ अहो नृसिंहा श्रीधरा । मच्छ कूर्म वराह ऋषीकुमरा ॥ अहो परात्परा अति सुंदरा । श्रीरमावरा गुणनिधी ॥ ६ ॥ अहो पद्मनाभा शेषशयना । राजसा राजीवलोचना ॥ निळा ह्मणे सुखसंपन्ना । अहो निजनिधाना परमात्मया ॥ ७ ॥

॥ १२६ ॥ तुमच्या पायीं जडतां मन । नाहीं प्रयोजन शब्दाचें ॥ १ ॥ तरि हे कांह्मी चेतविली । गुणीं प्रवर्तविली मति माझी ॥ २ ॥ दिवस रात्री न पुरे लिहीतां । उठती चळथा अक्षराच्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे लाविला धंदा । न कळे गोविंदा लीला तुमची ॥ ४ ॥

॥ १२७ ॥ जेणें पृथ्वीसीं धरिलें । सूर्या प्रकाशें उठिले ॥ चंद्रबिंबीं अमृत ठेविलें । तेणें निववीत जगा तो ॥ १ ॥ गगना पवाडू दिधला । मेरु स्तंभ उभारिला ॥ गती पवनही उडविला । दाही दिशा फिरतसे ॥ २ ॥ जेणें अग्नीसी दीपन । जीवनीं ठेविलें जीवन ॥ आपोनिधी जळें पूर्ण । क्षीरें सागर भरियेला ॥ ३ ॥ नाना अन्नीं ठेविली तृप्ती । नाना परिमळ

पुष्प याती ॥ नाना रस स्वाद फळाप्रती । येवढी युक्ती कोणाची ॥ ४ ॥ अपार चांदणें फुलोरा । जेणें शोभविलें अंबरा ॥ पर्जन्याच्या करुनी धारा । जेणें पिकविलें धरणीतें ॥ ५ ॥ जेणें इंद्रादिकां देवां । पदीं स्थापुनी वांटिल्या सेवा ॥ जेणें मर्दुनी दैत्यां दानवां । केला सांभाळ भक्ताचा ॥ ६ ॥ जो या प्राणातें चाळीता । जीवा जिवणें ज्याचिया सत्ता ॥ मनीं संकल्पाचिया चळथा । उठवी सत्ता हे कोणा ॥ ७ ॥ जो या श्रुतीतें पढविता । परमामृतातें जीवविता ॥ सुर्या अंजन लेवाविता । अवघी सत्ता हे ज्याची ॥ ८ ॥ चराचर व्यापुनियां उगला । उभा विटेवरी ठाकला ॥ निळा ह्मणे तेणें केला । बुद्धी माझीये प्रकाशे ॥ ९ ॥

॥ १२८ ॥ सैंध दाटली अक्षरें । करितां माप नव्हे पुरें ॥ केली माझीया दातारें । अति वृष्टी कृपेची ॥ १ ॥ लिहितां न पुरे दिवसराती । वाढविला विस्तार तो मती ॥ जैसे क्षीराब्धीवरी येती । तरंग मिरवती असंख्य ॥२॥ नाना प्रमेय नाना कथा । नाना पदांचिया चळथा ॥ निघती त्या पंढरीनाथा । आवडती प्रियवादें ॥ ३ ॥ संतचरित्रें हरिचे गुण । केले पवाडे ते विंदान ॥ नाना पतीतांचें उद्धरण । केलें संरक्षण दासांचें ॥ ४ ॥ ऐशीया स्तवनीं लाविली वाचा । बडीवार हरिचिया नामाचा ॥ केला प्रतिपाळ तो दासाचा । वारंवार आठवितों ॥ ५ ॥ नाना नामें नाना चरित्रें । कल्याणरूपें अती पवित्रें ॥ श्रवणें पठणें गातां वक्रें । हरिच्या पदातें पाववितीं ॥ ६ ॥ आइती जोडुनियां ठेविली । होती ठाईंचि गुंफिली ॥ निळा ह्मणे तेचि वोपिली । माझिये वदनीं वरदानें ॥ ७ ॥

॥ १२९ ॥ नाहीं ऐसें उणेचि कोठें । भरतो पाटे तोंडवरी ॥ १ ॥ बाहेर येती वोसंडोन । चाऱ्ही कोन उथळोनी ॥ २ ॥ झाली आनंदा दाटणी । गर्जे वाणी त्या सुखें ॥ ३ ॥ निळा ह्मणे माझी सत्ता । नाहीं वदता विठ्ठल ॥ ४ ॥

॥ १३० ॥ ब्रह्मानंदा भरणी आली । तेची केली सामोरी ॥ १ ॥ वंचिलें नाहीं कोणापाशीं । होतें मानसीं धरिलें तें ॥ २ ॥ अवघें नाम विठोबाचें । स्वरूप त्याचें ध्यानीं मनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे देता हांके । उभाचि ठाके सन्मुख ॥ ४ ॥

॥ १३१ ॥ दुरी ठेलीं कर्माकर्मे । तुमच्या धर्मे विठोबा ॥ १ ॥ आळवितां मुखीं नाम । सकळही काम परिपूर्ण ॥ २ ॥ होतें संचित जोडलें

कांहीं । ठेविलें पायीं तुमचे तें ॥ ३ ॥ निळा ह्मणे माझें मज । वाटे गुज आतुडलें ॥ ४ ॥

॥ १३२ ॥ पायीं लीन होतां निळा । दिधली कळा प्रेमाची ॥ १ ॥ निवउनियां केला सुखी । ठेउनी मुखीं निजनाम ॥ २ ॥ माउलीची ऐशी जाती । बाळका प्रीती समजावी ॥ ३ ॥ निळा ह्मणे कृपावंत । साक्षभूत अंतरिंची ॥ ४ ॥

॥ १३३ ॥ तूंचि पंढरिनाथा । संचर तत्वता हृदयांत ॥ १ ॥ ऐसा प्रताप आणिका आंगीं । नाहीं ये युगीं विचरितां ॥ २ ॥ संगती अन्यत्र देव ते भूतें । आशा लोलींगते ते काये ॥ ३ ॥ निळा ह्मणे जन्ममरणा । करी निवारणा एक हरी ॥ ४ ॥

॥ १३४ ॥ गुण लावण्य संपत्ती । पांडुरंग बाळ मूर्ती ॥ सर्व सुखाची विश्रांती । चरणीं लोळती माहा सिद्धी ॥ १ ॥ विटे पाउलें समान । कांसे क्षीराब्धी परिधान ॥ हात कटावरी ठेऊन । तुळसीसुमन वनमाळा ॥ २ ॥ कटि मेखळा कटसूत्र । उदर नाभी ते पवित्र ॥ सांठवले बीजमात्र । नाना लोकरचनेचे ॥ ३ ॥ हृदयीं श्रीवत्सलांछन । पदक एका कळीं भूषण ॥ मुख नासीक लोचन । निढळीं चंदन कस्तुरिक ॥ ४ ॥ मुगुटीं सूर्यप्रभा झळाळ श्रवणीं कुंडलाचे ढाल ॥ नेत्रीं करुणेचे कल्लोळ । निववीत भक्तजनां ॥ ५ ॥ गरुड हनुमंत सन्मुख । मुख्य सेवेचे सेवक ॥ विराजला पुंडलीक । चंद्रभागा वाळुवंटीं ॥ ६ ॥ निळा उभा कर जोडून । चरणावरी ठेउनियां मन । तयासी तृप्तीचें भोजन । नामसंजीवनी दिधली ॥ ७ ॥

॥ १३५ ॥ नामासाठीं वोपी शांती । बैसवी पंगती संतांचिये ॥ १ ॥ ऐसा उदार त्रिभूवनीं । नाहीं वांचूनि एका हरि ॥ २ ॥ भुक्ती मुक्ती ज्याचे हातीं । दिव्य संपत्ती भोग सकळ ॥ ३॥ निळा ह्मणे देतां न ह्मणे । थोर लाहाने भाविके ॥ ४ ॥

॥ १३६ ॥ भक्त स्तवनें जें जें करिती । तें तें ऐकोनियां श्रीपती ॥ सुखें संतोषोनियां चित्तीं । दासा देती वरदानें ॥१॥ ध्रुवानें वनीं आराधिला । तैसाची उपमन्येंही स्तविला ॥ एक तो अढळपदीं स्थापिला । एका दिधला क्षीरसिंधु ॥ २ ॥ प्रल्हादाचें स्तवन गोड । साचें पुरवी अवघें

कोड ॥ अग्नी विपाचें सांकड । नेदी पडों शस्त्राचें ॥ ३ ॥ द्रौपदीनें स्तवितांचि तांतडी । नेसविता झाला तिचीं लुगडीं ॥ कौरवें लाजविलीं बापुडीं । अंगुष्ट तोही दिसों नेदी ॥ ४ ॥ गजेंद्राचिया स्तवनासाठीं । धांवे वैकुंठीहुनी उठाउठी ॥ निज करें घालुनियां मिठी । सोडवी संकटीं स्वामी माझा ॥ ५ ॥ रुक्मिणीचें पाणीग्रहण । करी ऐकोनियां तिचें स्तवन ॥ पांचाळीये हातींचें भाजीपान । करी भोजन स्तवनें तिच्या ॥ ६ ॥ निळा ह्मणे कृपामूर्ती । अपार भक्ताचिया स्तुती ॥ ऐकोनियां तोषलेती । मीही बाळमती विनवितों ॥ ७ ॥

॥ १३७ ॥ सर्वस्वें उदार । देतां न ह्मणे सान थोर ॥ १ ॥ ते हे पंढरिये धेंडें । उभें पुंडलीकापुढें ॥ २ ॥ अरिमित्रासम । देणें एक निजधाम ॥ ३ ॥ निळा ह्मणे नाहीं । जया आपपर कांहीं ॥ ४ ॥

---

## देवाचें ध्यान.

॥ १३८ ॥ आतां पाहेन वाडें कोडें । याचें रूपडें दृष्टीभरी ॥ १ ॥ आहे उभा ईटेवरी । न वजे पंढरि सांडूनियां ॥ २ ॥ येती त्यांसी आलिंगन । पाववी देऊन संतोषा ॥ ३ ॥ निळा ह्मणे दासाप्रती । वांटितो मुक्ति दर्शनें ॥ ४ ॥

॥ १३९ ॥ माझिये मनीं विश्रांती वाटे । देखतां गोमटे ईटे चरण ॥ १ ॥ तुळशीमाळा शोभल्या कंठीं । प्रकाश मुगुटीं रत्नांचा ॥ २ ॥ कुंडलाचे दीप्ती झळाळ । शोभले निढळ बुक्यानें ॥ ३ ॥ निळा ह्मणे आंगिचे कांति । सूर्यादि लोपती शशिमंडळें ॥ ४ ॥

॥ १४० ॥ सुहास्य वदन तुटती तारे । पाउले गोजिरे विटेवरी ॥ १ ॥ कटावरी ठेविले हात । आयुधें मंडित शंख चक्र ॥ २ ॥ पीतांबर वेष्टिला कांसे । मेखळे ठसे जडिताचे ॥ ३ ॥ निळा ह्मणे हृदयावरी । पदक तमारि तेंवि झळके ॥ ४ ॥

॥ १४१ ॥ त्रिठो लावण्याची राशी । जननयनासी पाहुणेरु ॥ १ ॥ पाहातिया तटस्थ लागे । फिरोंची मागें विसरती ॥ २ ॥ सुघटित अव-

घेंचि ठाण । भूषणा भूषण शोभवीत ॥ ३ ॥ निळा ह्मणे जडला जिवीं । त्रैलोक्य गोंसावी विठो माझा ॥ ४ ॥

॥ १४२ ॥ तमाळ शाम रूप मंडित । कटीं मिरवत करांबुजें ॥ १ ॥ पहातां धणी न पुरे मना । न संडे नयना निजानंद ॥ २ ॥ सर्वही भूषणें सर्वांगभरी । मनोहरी सुशोभित ॥ ३ ॥ निळा ह्मणे रुक्मिणीवामी । त्रैलोक्यस्वामी श्रीविठ्ठल ॥ ४ ॥

॥ १४३ ॥ देखती लोचनीं । निजात्मया अनुदिनीं ॥ १ ॥ त्यांच्या भाग्याचा तो महिमा । नेणे चतुर्मुख ब्रह्मा ॥ २ ॥ हरींसंगें हरिचेंचि रूप । झाली भावना तद्रूप ॥ ३ ॥ निळा ह्मणे अवलोकनें । तैसेंचि झालें अंगें मनें ॥ ४ ॥

॥ १४४ ॥ दोहीं डोळां अवलोकितां । धणी न पुरे पंढरिनाथा ॥ १ ॥ चित्त वेधलें चिंतनें । मनहि तदाकार ध्यानें ॥ २ ॥ वाचा कुंठीत राहिली । बुद्धिहि निमग्नचि ठेली ॥ ३ ॥ निळा ह्मणे अवघींच अंगें । रंगलीं त्याचीं विठ्ठलरंगें ॥ ४ ॥

॥ १४५ ॥ अवधियांचे मनोरथ । होती कृतार्थ भेटतां ॥ १ ॥ विठ्ठल विठ्ठल ह्मणतां वाचे । रूप त्याचें लक्षितां ॥ २ ॥ दर्शनाचा महिमा ऐसा । झाले पाशा भवमुक्त ॥ ३ ॥ निळा ह्मणे पांडुरंगें । केलें संगें सहवासी ॥४॥

॥ १४६ सुकृताचा होता सांठा । भूवैकुंठा ते आले ॥ १ ॥ सन्मुख देव भेटे तया । लागती पायां भाग्याचे ॥ २ ॥ न्याहाळिती दृष्टि मुख । कैवल्य सुख तुच्छ पुढें ॥३॥ निळा ह्मणे ब्रह्मानंदा । झाले तत्पदा अधिकारी ॥४॥

॥ १४७ ॥ न पुरे धणी गुण गातां । रूप दृष्टी अवलोकितां ॥ १ ॥ बरवा बरवा विठ्ठल हरी । माझे बैसला अंतरीं ॥ २ ॥ मुख लावण्याची खाणी । राही वामांगीं रुक्मिणी ॥३॥ निळा ह्मणे दृष्टी पुढें । दिसे कोंदलें रूपडें ॥ ४ ॥

॥ १४८ ॥ वाचे उच्चारिलें नाम । हृदयीं धरूनियां प्रेम ॥ १ ॥ तेंचि बीज फळा आलें । रूप दृष्टीगोचर झालें ॥ २ ॥ कळासले ध्यानीं मनीं । दिसे तेंचि जनीं वनीं ॥३॥ निळा ह्मणे पंढरिनाथ । अंतरबाह्य जेथें तेथें ॥४॥

॥ १४९ ॥ दिवसरात्रि हाचि धंदा । वर्णितों गोविंदा गुण कीर्ति ॥ १ ॥ स्वप्नामाजि शुषुप्ती आंत । जागृतिये मात याचिची ॥ २ ॥ खातां जेवितां बोलतां । आठवे कथा नित्य याची ॥ ३ ॥ निळा ह्मणे लगटोनि आलें । पीक चांगलें असंभाव्य ॥ ४ ॥

॥ १५० ॥ बोलों जातां वचनाक्षरें । माजि संचरे निरोपण ॥ १ ॥ ऐशी दाटली दाटणी । वाचा गुणीं गुंडाळिली ॥ २ ॥ नाना संकल्प ते मुराले । स्तवनींचि झाले सादर ॥ ३ ॥ निळा ह्मणे निमिषोनिमिष । झाले श्वासोश्वास अक्षर ॥ ४ ॥

॥ १५१ ॥ नाहीं उरविलें दुजें । तुमच्या तेजें झांकोळिलें ॥ १ ॥ माझिचि मज न दिसती । निजांगें दीप्तीप्रकाशें ॥ २ ॥ मी माझें हें नाटळेचि कांहीं । देहादेहीं विसर ॥ ३ ॥ निळा ह्मणे एकिएक । भोंदितां लेख पूर्णत्वें ॥ ४ ॥

॥ १५२ ॥ न कळे केव्हां दिवस गेला । रात्रीं झाला तमनाश ॥ १ ॥ निद्राचि नाहीं स्वप्न तें कैचें । निःशेष जागृतीचें विस्मरण ॥ २ ॥ भोक्ताचि नाहीं कैचा भोग । अनंगी अनंग हारविले ॥ ३ ॥ निळा ह्मणे ठाईं ठावो । देवीं देवो मावळला ॥ ४ ॥

॥ १५३ ॥ मुगुट कुंडलें वनमाळा । केशर कस्तुरीचा टिळा ॥१॥ विठो देखिला म्यां दिठी । अंगीं चंदनाची उटी ॥ २ ॥ जडित कंकणें मुद्रिका । कासे पितांबर नेटका ॥ ३ ॥ कटीं मेखळा विराजे । वाकि किंकणी तोडर गाजे ॥ ४ ॥ मुख लावण्याची खाणी । जैसा चंद्र पूर्णपणीं ॥ ५ ॥ निळा ह्मणे कटीं कर । अंगकांति मनोहर ॥ ६ ॥

॥ १५४ ॥ रूप देखतांचि लोचनीं । राहिलें तें ध्यानीं मनीं ॥ १ ॥ माझिया जिवाचें जीवन । विठ्ठल नामाचें मोहन ॥ २ ॥ चित्त विगुंतलें पायीं । देहभावहि नुरेचि देहीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे जीव प्राण । तेथेंचि राहिला जडोन ॥ ४ ॥

॥ १५५ ॥ उघडली सतेज खाणी । लावण्याची बरवेपणीं ॥ १ ॥ विठो सुंदरा सुंदर । रूप नागरा नागर ॥ २ ॥ मुख अमृत कूपिका । पूर्ण चंद्र उदयो लोका ॥ ३ ॥ निळा ह्मणे कटीं तटीं । मूर्ति साजिरी गोमटी ॥४॥

॥ १५६ ॥ दिव्य तेज मुसावलें। विठ्ठल चरणीं तें राहिलें ॥ १ ॥ झालें डोळीयां पारणें। तनु मना भुलवणें ॥ २ ॥ देवा दर्शनाची सुराणी। वाणी न पुरेचि त्या वदनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे चरण चुरी। रमा नित्य निरंतरी ॥ ४ ॥

॥ १५७ ॥ देखिली ते विटेवरी। समान पाउलें गोजिरीं ॥ १ ॥ माझे राहिलीं मानसीं। सर्व काळ अहर्निशी ॥ २ ॥ मुनिजनांचीं मानसें। रंगलीं जेथें सावकाशें ॥३॥ निळा ह्मणे योगिजन। ज्यातें बैसले पोटाळून॥४॥

॥ १५८ ॥ वाम चरणीं वाहे नीर। गंगा अमृताचे पाझर ॥ १ ॥ आवडे तें माझ्या मना। धणी न पुरेचि लोचना ॥ २ ॥ महिमा जोडला सामुद्रिका। ध्वज वज्र अंकुश ऊर्ध्वरेखा ॥ ३ ॥ निळा ह्मणे मंजुळ गाती। वाळे वांकी रुणझुणिती ॥ ४ ॥

॥ १५९ ॥ चरणीं भागिरथी गंगा। जन्मली उद्धरिते जगा ॥ १ ॥ ब्रिदावळी रुळती भार। तळीं लोळती असुर ॥ २ ॥ ध्वज वज्रांकित चिन्हें। विटेवरी ते समानें ॥ ३ ॥ निळा ह्मणे हृदयीं धरिलें। सनकादिकीं पोटाळिलें ॥ ४ ॥

॥ १६० ॥ नुठेचि मन वरुनियां। जडोनी ठेलें हरिच्या पायां ॥ १ ॥ बुद्धी निश्चयेंसि राहिली। परम विश्रांति पावली ॥ २ ॥ डोळे न धाती पाहतां। चरणीं विगुंतले तत्वता ॥ ३ ॥ निळा ह्मणे न पुरे धणी। करीन जीवें वोवाळणी ॥ ४ ॥

॥ १६१ ॥ देखतांचि विठ्ठल मूर्ति। झाली विश्रांति इंद्रियां ॥ १ ॥ डोळे मुख निवाले कान। देतां आलिंगन हृदयें भुजा ॥ २ ॥ पाणी पाद टाळिया नृत्यें। वाणी त्रिसत्य कीर्तनें ॥ ३ ॥ निळा ह्मणे जीवही धाला। सकळां फावला सुरवाड ॥ ४ ॥

॥ १६२ ॥ महा सुखा पारणें होये। आनंद राहे लिगटोनी त्या ॥ १ ॥ ऐशिया पावविलों विश्रांती। निमग्न वृत्ती इंद्रियांच्या ॥ २ ॥ मनही तेथुनी वेगळेंचि नोहे। पांगुळले पाय प्राणाचे ॥ ३ ॥ निळा ह्मणे रवी शशी। हारपले निशी दिवस दोन्ही ॥ ४ ॥

॥ १६३ ॥ सांगों जातां शब्दचि विरे । जेंवि अंधारे रविभेटी ॥ १ ॥ सागरीं ठाव बुडीही देतां । न लभेचि सर्वथा निर्बुजला ॥ २ ॥ यापरि शब्द न पवेचि तेथें । कैसेनि सुखातें अनुवादो ॥ ३ ॥ निळा ह्मणे जाणती संत । आहे सिद्धांत तेथींचा तो ॥ ४ ॥

॥ १६४ ॥ माझिये मनींचा फिटला वेहो । देखतांचि नाहो रुक्मिणीचा ॥ १ ॥ कळिकाळ तें काय बापुडें रंक । होउनि मश्यक ठेलें पुढें ॥ २ ॥ काम क्रोधा कैंची उरी । दोषां महामारी हो सरली ॥ ३ ॥ निळा ह्मणे निःसंदेहो । देहीं देहो हरपला ॥ ४ ॥

॥ १६५ ॥ देखतांचि यातें दिठी । पळती कोटी पापाच्या ॥ १ ॥ जेंवि उगवतांचि रवी । अंधकार न दावी मुख पुढें ॥ २ ॥ जन्ममरणयात्राचि फिटे । लाजती गोमटे अभ्यास ॥ ३ ॥ निळा ह्मणे महिमा ऐसा । पंढरिनिवासा भेटतां ॥ ४ ॥

॥ १६६ ॥ भाग्य माझें उभें ठेलें । संतीं दाविलें निधान ॥ १ ॥ आतां उणें कोठें कांहीं । न पडे ठायीं भरलेंसे ॥ २ ॥ जेथें पाहें तेथें आहे । न पाहतांही राहे कवळुनी ॥ ३ ॥ निळा ह्मणे व्यापुनी अंतरीं । गगनाही बाहेरी तेचि दिसे ॥ ४ ॥

॥ १६७ ॥ कृपादीप प्रकाशिला । विलया नेला अंधकार ॥ १ ॥ आतां दृष्टीपुढें दिसे । जेथें असे तें तैसें ॥ २ ॥ सत्यासत्य मिळणी झाली । अवघी फावली निवडितां ॥ ३ ॥ निळा ह्मणे उदयो केला । रवीचि उगवला नयनांत ॥ ४ ॥

॥ १६८ ॥ नेणों काय पूर्वार्जित । होतें सुकृत निक्षेपीचें ॥ १ ॥ तेणें हातीं धरुनियां । संतीं ठाया पावविलों ॥ २ ॥ विटेवरी दाविलें धन । होतें पोटाळुन महर्षी ज्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे बैसला ध्यानीं । ज्याचिये चिंतनीं सदाशीव ॥ ४ ॥

॥ १६९ ॥ सकुमार साजिरें ठाण । धरिलें जघन दोहीं करीं ॥ १ ॥ विटेवरि दिव्य रूप । कोटी कंदर्प वोवाळिले ॥ २ ॥ तुळसीमाळा वैजयंती । कौस्तुभ दीप्ती पदकांची ॥ ३ ॥ निळा ह्मणे हृदयावरी । दिधली थोरी द्विजपद्मा ॥ ४ ॥

॥ १७० ॥ चित्तीं माझे पांडुरंग। बैसला अभंग न ढळेसा ॥१॥ जातां दिवस जातां राती। स्वप्नीं जागृती शुषुप्ती तो ॥ २ ॥ देखतां डोळा ऐकतां कानीं। बोलतां वदनीं तोचि पुढें ॥ ३ ॥ निळा ह्मणे बुद्धीमन। गेलीं विरोन सामाजी ॥ ४ ॥

॥ १७१ ॥ पदार्थ मात्र पाहों जातां। प्रगटे अवचिता सामाजी ॥ १ ॥ ऐसा वेध लाविला मना। विसरों आपणा नेंदीचि ॥ २ ॥ सुख विपत्ती भोगिता भोग। वोडवि अंग आपुलेंचि ॥ ३ ॥ निळा ह्मणे ठावोचि रिता। नेदी हा सर्वथा राहों पुढें ॥ ४ ॥

॥ १७२ ॥ आर्त माझें पूर्ण झालें। याचीं पाउलें देखतां ॥ १ ॥ आतां कोठें न धांवे मन। राहिलें होउन अचंचळ ॥ २ ॥ याविण कांहीं नलगे जोडी। पुरली आवडी विषयाची ॥ ३ ॥ निळा ह्मणे ध्यानीं मनीं। राहो चिंतनीं हेंचि रुप ॥ ४ ॥

॥ १७३ ॥ नाहीं कोठें गोविला हेत। ठेविलें चित्त याचिवरी ॥ १ ॥ सगुण सुंदर देखिले दिठी। ईटे नेहटी तेचि पुरे ॥ २ ॥ वामभागीं विराजमान। स्वरुपीं समान रुक्मिणी ॥ ३ ॥ निळा ह्मणे लागला छंद। याचाचि वेध मनासीं ॥ ४ ॥

॥ १७४ ॥ माझिये मनीं बैसला हरी। नयना माझारी कोंदला ॥ १ ॥ भरोनियां मना बुद्धी। राहिला संधी इंद्रियांच्या ॥ २ ॥ पाहे तेथें आपणचि दिसे। स्वरुप विलसे पदार्थी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जेंजें कांहीं। भासे तेंही याचि रुपें ॥ ४ ॥

॥ १७५ ॥ बैसला तोचि माझिये ध्यानीं। कटीं कर दोन्ही वसविता ॥ १ ॥ नयनाचि माजी न वचे दुरी। आंतु बाहेरी कोंदला ॥ २ ॥ याविण नाठवे आणिक कांहीं। देहादेहीं तोचि तो ॥ ३ ॥ निळा ह्मणे दिवस राती। स्वप्नीं शुषुप्तीं जागृतींत ॥ ४ ॥

॥ १७६ ॥ याचिया ध्यानें हें चराचर। अवघें तदाकार मज भासे ॥ १ ॥ महि अंबु मारुत गगन। भासे हुताशन हाचि झाला ॥ २ ॥ चंद्र सूर्य तारांगणें। सुरासुरगण मनुष्यादी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जनीं वनीं। हाचि भरोनी राहिला ॥ ४ ॥

॥ १७७ ॥ गोमटे पाय देखिले दिठी । समान नेहटी ईटेचिये ॥ १ ॥ तेंचिपासुनी लागला छंद । याचिया वेध स्वरूपाचा ॥ २ ॥ कटावरी कर तुळसीमाळा । चंदनाचा टिळा मुगुट माथां ॥ ३ ॥ निळा ह्मणे वेढिलें वसन । विद्युल्लते समान तेज साचें ॥ ४ ॥

॥ १७८ ॥ घनःशाम मूर्ति राजीवलोचन । साठवलें त्रिभुवन उदरामाजी ॥ १ ॥ कौस्तुभ पदकें तुळसीमाळा कंठीं । कास हे गोमटी पीतांबरें ॥ २ ॥ लेईला अलंकार भुषणें परवडी । दिव्य रत्नें चोरवडीं खेवणें तयां ॥३॥ निळा ह्मणे माझे निवाले तनुमन । देखतांचि सुप्रसन्न वदन याचें ॥४॥

॥ १७९ ॥ माथां मोरपिसें कुंडलें गोमटीं । कस्तुरी लल्लाटीं रेखिली दिसे ॥ १ ॥ हृदयीं निकेतन श्रीवत्सलांछन । मूर्ती विराजमान शंख चक्र ॥ २ ॥ कटावरी कर उभा ईटेवरी । भोवताले फेरी संतजन ॥ ३ ॥ निळा ह्मणे तेंचि कळासलें मनीं । देखिलें लोचनीं ध्यान जैसें ॥ ४ ॥

॥ १८० ॥ लखलखिलें सुतेज माझिया नयनापुढें । चतुर्भुज रूपडें मेघःशाम ॥ १ ॥ तेणेंचि वेधिलें हृदयींचि राहिलें । मागें पुढें ठेलें वेष्टुनियां ॥ २ ॥ हृदयाचि भीतरी पाहातां बाहेरी । तेंचि चराचरीं दिसे माये ॥३॥ निळा ह्मणे तेणें हरिला देहभाव । सांगतां हा नवलाव वाटे येरा ॥४॥

॥ १८१ ॥ कैसा याचा वेध जाणती अनुभवी । जया आहे ठावी कृपा याची ॥ १ ॥ नये तें दावितां सांगतांहि परी । वर्ते जें माझारी भुलऊनियां ॥ २ ॥ नेदिची बाहेरी उमसो बुद्धी मना । भरुनियां भावना झांकोळिली ॥ २ ॥ निळा ह्मणे तोचि साक्ष माझ्या जिवीं । चाळक गोसावी ब्रह्मांडाचा ॥ ४ ॥

॥ १८२ ॥ चिमणाचि देखिला परि हा वाड झाला । गगनाहि फांकला प्रकाश वरी ॥ १ ॥ भरोनियां दाही दिशा कोंदाटला । पाताळा वरिही गेला पदांकु याचा ॥ २ ॥ स्वर्ग माळा अंगीं लेईला सुढाळ । कान्हो चक्रचाळ पंढरीचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे दिसे ईटेच्या नेहटी । परि हा व्यापुनी सृष्टी येथें उभा ॥ ४ ॥

॥ १८३ ॥ आरतीचें आरत होतें माझ्या मनीं । बहुत दिवस नयनीं प्रकाशलें तें ॥ १ ॥ भरोनियां कोंदलीं चौदाहि भुवनें । सुतेज केलीं

गगनें याचेनि तेजें ॥ २ ॥ आवडीचें निज प्रकाशलें गुज । आतां नाचेन भोज येणे छंदें ॥ ३ ॥ निळा ह्मणे दिशा व्यापुनियां मही । प्रकाश माझ्या देहीं संचरला तो ॥ ४ ॥

॥ १८४ ॥ नवल हा प्रकाश प्रकाशा वेगळा । झांकिलियाही डोळा पुढें दिसे ॥ १ ॥ नव्हे हा उजळिला सवेंचि मावळला । आत्मतेजें केला उदो नित्य ॥ २ ॥ ढवळा ना पिवळा काळा ना जांभळा । जिवींच्या जिवनकळा प्रकाशितु ॥ ३ ॥ निळा ह्मणे आजि आरतिचेनि व्याजें । कृपें पंढरिराजें वरिजे मज ॥ ४ ॥

॥ १८५ ॥ ध्यानीं चिंतनीं मानसीं । हरितें ध्यातां आहर्निशी ॥ तेचि होउनियां भक्तराशी । झाले विठ्ठलीं विठ्ठल ॥ १ ॥ किटकी भृंगी ऐसें रूप । तीव्र ध्यानें ते तद्दप ॥ विष्णु जेंवि शिवस्वरुप । शिवहि विष्णु चिंतनें ॥ २ ॥ नर तोचि नारायण । अर्जुनरूपें विलसे कृष्ण ॥ येरयेरे विराजमान । करितां ध्यान तद्रूपता ॥ ३ ॥ निरसोनियां अविद्याजात । देव तैसेचि झाले भक्त ॥ मोह ममता कामातीत । झाले सतत निजध्यासें ॥ ४ ॥ निळा ह्मणे अर्धनारी । रूप विलसे नटेश्वरी ॥ दोनी दाउनी एक शरिरीं । दोघां नाहीं दोनिपणें ॥ ५ ॥

॥ १८६ ॥ न पडे विसर याचा मना । झाली तद्रूप वासना ॥ मही व्यापुनियां गगना । दिसे नयना रूप पुढें ॥ १ ॥ जें जें आढळे दृष्टीपुढें । तें तें याच्या स्वरुपें मांडे ॥ व्यापुनी सकळामाजि वडे । वसे अंतरीं सकळांचे ॥ २ ॥ स्वरूप सांवळें सगुण । अंगकांति मेघवर्ण ॥ करीं धरुनियां जघन । दृष्टि आवलोकी पुंडलिका ॥ ३ ॥ कर्णीं कुंडलें विशाळ डोळे । जैसीं विकासलीं दिव्य कमळें ॥ हृदयावरी कंठमाळे । पदकीं रत्नें झळकती ॥ ४ ॥ कास पितांबरें घातली । मेखळा कटीं सूत्रें रेखिलीं ॥ पाउलें विटेवरी शोभलीं । निळ्या झालीं प्रसन्न तीं ॥ ५ ॥

॥ १८७ ॥ कृपा तुमची फळा आली । बुद्धी झाली निश्चळ ॥ १ ॥ नामचि एक उच्चारिलें । तेथेंचि बैसलें मन माझें ॥ २ ॥ इंद्रियांची पुरली धांव । बुद्धीभाव ठसावला ॥ ३ ॥ निळा ह्मणे निरंतर । न पडे विसर चित्तासी ॥ ४ ॥

॥ १८८ ॥ सर्वकाळ तेंचि वाटे । रूप पाहावें गोमटें ॥ १ ॥ जें का पुंड-लिकाचे द्वारीं । उभें ठेलें इटेवरी ॥ २ ॥ पितांबराचें परिधान । मुगुट कुंडलें विराजमान ॥ ३ ॥ निळा ह्मणे कौस्तुभ गळां । नाना पुष्पें तुळसीमाळा ॥ ४ ॥

॥ १८९ ॥ ध्यान राहिलें मानसीं । सर्वकाळ दिवानिशी ॥ १ ॥ जेणें धरिले कटीं कर । रूपें सावळा सकुमार ॥ २ ॥ न पुरे डोळियांची धणी । कीर्ति ऐकतांहि श्रवणीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे लांचावली । वृत्ति तेथेंचि गुंतली ॥ ४ ॥

॥ १९० ॥ झालें डोळियां पारणें । इंद्रियांहि पुरतेपणें ॥ १ ॥ विठो देखतांचि दिठी । जिवीं जिवा पडली मिठी ॥ ॥ २ ॥ बुद्धी निश्चयाचें घर । तेहि झाली तदाकार ॥ ३ ॥ निळा ह्मणे काया वाचा । मना संकल्प हा तयाचा ॥ ४ ॥

॥ १९१ ॥ देखतांचि ठसावलें । रूप हृदयीं हें चांगलें ॥ १ ॥ विठो लावण्याची कळा । मूर्ति मदनाचा पुतळा ॥ २ ॥ साळंकार उत्तम लेणीं । विराजलीं बरवेपणीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे तनुमन दिठी । विगुतली ते वरुनी नुठी ॥ ४ ॥

॥ १९२ ॥ बैसलें आसनीं । रूप चित्ताचें चिंतनीं ॥ १ ॥ दुजें नाठवे सर्वथा । आण तुझी पंढरिनाथा ॥ २ ॥ डोळिया आवडी । रुपीं तुमच्या तया गोडी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जीवनकळा । वेधीं वेधल्या त्या सकळा ॥ ४ ॥

॥ १९३ ॥ नावडे आणिक । बुद्धी झाली तदात्मक ॥ १ ॥ तेंचि बैसलें रुपडें । माजि डोळियां निवाडें ॥ २ ॥ लांचावली वाणी । न निघे ते तुमच्या गुणीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे श्रवणीं कीर्ति । हृदयीं अखंड सगुण मूर्ती ॥ ४ ॥

॥ १९४ ॥ ईटे साजिरीं पाउलें । कटीं कर विराजले ॥ १ ॥ तेचि आठवती मनीं । चित्त रातलें चिंतनीं ॥ २ ॥ तुळसीहार पदकें माळा । रूपाकृति घन सावळा ॥ ३ ॥ निळा ह्मणे वेधल्या वृत्ती । आनु कांहींचि त्या नेणती ॥ ४ ॥

॥ १९५ ॥ जिहीं अवलोकिला डोळां । हरिल्या त्याच्या जीवनकळा ॥ १ ॥ ऐसा अनादि हा बुडवणा । आहे ठावा विचक्षणा ॥ २ ॥ चित्तें वित्तें आपणा ऐसें । करुनी ठेवी निजध्यासें ॥ ३ ॥ निळा ह्मणे पडिल्या गांठी । न सोडी नष्ट हा शेवटीं ॥ ४ ॥

॥ १९६ ॥ रूप राहिलें चिंतनीं । सर्वकाळ ध्यानीं मनीं ॥ १ ॥ वाचा गुणीं लांचावली । मती विस्तारें फांकली ॥ २ ॥ ऐसी केली तुह्मी दया । कृपाळुवा पंढरिराया ॥ ३ ॥ निळा ह्मणे भूक तहान । गेली ठायींची हारपोन ॥ ४ ॥

॥ १९७ ॥ जिव्हाग्रीं ठेवितांची गोड । पुरे कोड सकळही ॥ १ ॥ तें या विठोबाचें नाम । सर्वदा निष्काम फळदातें ॥ २ ॥ उच्चारचि करितां ओठीं । जाळित कोटी पापाच्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे साधन ऐसें । सुलभचि नसे दुजें आन ॥ ४ ॥

॥ १९८ ॥ बैसला तो ध्यानीं मनीं । पाहातां लोचनीं विठ्ठल ॥ १ ॥ रूप गोजीरें सुंदर । वेधिलें अंतर मन बुद्धी ॥२॥ नाठवेचि कांहीं आतां । याविण चित्ता दुसरें ॥ ३ ॥ निळा ह्मणे लाविलें पिसें । मी मज तुमसें आठवितां ॥ ४ ॥

---

## कृष्णजन्मलीला.

॥ १९९ ॥ वसुदेवदेवकीचिये उदरीं । कृष्ण जन्मले मथुरेभितरीं ॥ कौंसाचिये बंदिशाळेमाझारी । श्रावण कृष्णाष्टमी मध्यरात्रीं ॥ १ ॥ अयोनिसंभव चतुर्भुज । शंख चक्र गदांबुज ॥ चहुं करीं आयुधें सुतेज । मुगुट कुंडलें वनमाळा ॥ २ ॥ कासे पीतांबर कासिला । कंठीं कौस्तुभ तेजागळा ॥ श्रीवत्सलांछन शोभला । माजी मेखळा जडिताची ॥ ३ ॥ मस्तकीं मुगुट रत्नखेवणी । रत्नमय कुंडलें उभय कर्णीं ॥ देखोनियां देवकी नयनीं । ह्मणे या कैसेनि आच्छादूं ॥ ४ ॥ देखतां वसुदेवहि विस्मित । ह्मणे बाळ नव्हे हा जगन्नाथ ॥ सायुधें भुषणें घवघवित । तेजःपुंज निजात्मा ॥ ५ ॥ देवकी लागोनियां पायांशीं । ह्मणे गोकुळा नेउनी लपवा यासी ॥ विदित झालिया रायासी । नेदि वांचों या बाळका ॥ ६ ॥ निळा

ह्मणे ऐशी चिंता । आकळुनी ठेली तयां उभयतां ॥ हें देखोनियां श्रीकृष्णनाथा । कळों सरलें हृद्गत ॥ ७ ॥

॥ १९८ ॥ मग बोले मंजुळा उत्तरीं । मज न्या जी गोकुळाभितरी ॥ ठेउनी नंदयशोदेच्या घरीं । तुह्मीं यावें तेच क्षणीं ॥१॥ ऐकोनी तयाचें उत्तर । वसुदेव विस्मित आणि चिंतातुर ॥ ह्मणे कैसा करावा विचार । बंधनें गोविलें मजलागीं ॥ २ ॥ ऐशिया मोहें सा कवळित । तंव तुटलीं बंधनें झाला मुक्त ॥ ह्मणे आतां हा कृष्णनाथ । नेईन गोकुळांत ठेवीन ॥ ३ ॥ मग घेउनियां निज बोधेशीं । आला वसुदेव गोकुळाशीं ॥ देउनियां सा नंदापासीं । ह्मणे हें स्विकारा बाळक ॥४॥ जन्मलें देवकीचिये उदरीं । परि हें ठेवितां नये कीं घरीं ॥ आहे कौंसाचें भय भारी । यालागीं तुह्मा हें कृष्णार्पण ॥ ५ ॥ ऐशिया उत्तरीं बोलिला । बाळक त्यापाशीं दिधला ॥ उघडोनी नंदें जो पाहिला । तंव तो देखिला चतुर्भुज ॥ ६ ॥ निळा ह्मणे वोळलें भाग्य । घरा आले पुसत चांग ॥ उद्धरावया सात्विक जग । केला वास तया घरीं ॥ ७ ॥

॥ १९९ ॥ कोटी मदनाचा हा बाप । प्रभा फांकली तेज अमुप ॥ भुषणें विराजलीं दिव्य स्वरूप । नंदें पाहिला निज नयनीं ॥ १ ॥ मग यशोदेपाशीं आणिला । ह्मणे हा वसुदेवें दिधला ॥ येरी ह्मणे हा चोरियेला । कोणाचा तानुला न कळे हें ॥ २ ॥ वसुदेव सदाचा भिकारी । वंदी कौंसाचिये चिरकाळ वरी ॥ बालक सुलक्षण हा निर्धारी । असेल सभाग्या समर्थाचा ॥ ३ ॥ येरु ह्मणे आहे पोटींचा । आत्मा जिवलगु हा आमुचा ॥ नाहीं वो आणिला लोकांचा । ह्मणोनियां देतों तुह्मांप्रती ॥ ४ ॥ येरी ह्मणे आमुचें कन्यारत्न । याच्या पालटा न्या करा यत्न ॥ कौंसा पुसतांचि तया दाऊन । चुकवा अरीष्ट सकळांचें ॥ ५ ॥ यावरी कृष्णातें निरऊन । वसुदेव निघाला माया घेऊन ॥ पुढती बंधनें पावला बंदिखान । विचित्र विंदान शक्तीचें ॥ ६ ॥ श्रीकृष्णदेवेसी अंतरावो । होतांचि प्राप्त झाला मोहो ॥ अविद्यायोगें चिंताप्रवाहो । महार्णवीं पडियला ॥ ७ ॥ निळा ह्मणे हिताहित । नाठवेचि कांहीं झाला भ्रांत ॥ मायादेवीचा हा प्रघात । झाला प्राप्त वसुदेवा ॥ ८ ॥

॥ २०० ॥ श्रीकृष्ण सांडुनी जातांचि दुरी । वसुदेवातें दैन्य अवदसा वरी ॥ मग देवकीजवळी देतां ते कुमरी । महा आक्रोशें गर्जिन्नली

॥ १ ॥ ऐकोनी कौंस भयचकित । असुर सैन्यक भयें कांपत ॥ सेवक धांवोनी रायातें ह्मणत । जन्मला सुत देवकीये ॥ २ ॥ माहाकाळ कृतांत ऐसा । गर्जे ब्रह्मांड कोंदल्या दिशा ॥ राजा ह्मणे हा आमुच्या वंशा । निर्दाळील निश्चयें आठवा ॥ ३ ॥ घेउ-नियां मग निशाचरभारा । आला बंदिशाळे सत्वरा ॥ सावध करिताती येरयेरा । ह्मणती विकळ जाऊं नका ॥ ४ ॥ भयभीत देवकीतें हाकारी । ह्मणे आठवा आणिवो बाहेरी ॥ येरी करुणा भाकुनियां भारी । विनवी एवढें तरी वांचावा ॥ ५ ॥ ऐसें बोलोनियां सुंदरी । आणोनी दिधली कौंसाकरीं ॥ येरु पाहे तंव ते कुमारी । ह्मणे आठवा लपविला ॥ ६ ॥ तोहि आणुनियां देई । येरी ह्मणे दुसरें नाहीं ॥ झाडा घेउनियां पाही । आण तुझीचि वाहातसें ॥ ७ ॥ येरु ह्मणे ईतें सोडूं । मग तयाचाहि सुड काढूं ॥ निळा ह्मणे गर्वारूढु । नेणे मदांध हरिमहिमा ॥ ८ ॥

॥ २०१ ॥ मग चरणीं कवळुनियां करतळें । आफळुं गेला प्रचंड शिळे॥ तंव ते गर्जोनियां अंतराळे । गेली निष्टोनी हाताची ॥ १ ॥ घोषगर्जें बोले गगनीं । असुरा कौंसा ऐक रे कानीं ॥ तुझिया निर्मुळा लागुनी । चक्रपाणी गोकुळीं वाढे ॥ २ ॥ नंदायशोदेच्या घरीं । बाळकृष्ण बाळ ब्रह्मचारी ॥ येउनी तो मथुरे भीतरी । करील संहार असुरांचा ॥ ३ ॥ तुजसहित दैत्य-बळी । मर्दुनी सांडील महीतळीं ॥ ऐशीं अक्षरें कर्णबिळीं । प्रविष्ट होतांचि कौंसाच्या ॥ ४ ॥ रायें घातली लोळणी । अकस्मात पडियेला धरणी ॥ मुगुट माथांचा उडोनी । गेला वदनीं धुळी भरे ॥५॥ नेत्र झाले पांडुरवर्ण। कंठीं बाष्प दाटला पूर्ण ॥ प्राण सांडीत सेवकजन । सावध करिती विलापें ॥ ६ ॥ एक घालिती विंजण वारा । वदनीं प्रोक्षिती आंबुतुसारा ॥ निळा ह्मणे नावेक शरिरा । कंपहि सुटला हरिधाकें ॥ ७ ॥

॥ २०२ ॥ येरीकडे गोकुळाभीतरी। येतांचि परमात्मा श्रीहरी ॥ विश्व-कर्मा येउनियां निमिषावरी । नगर शृंगारी कौतुकें ॥ १ ॥ निजेलिचि असतां नारीकुमरें। शृंगारिलीं वस्त्रें अळंकारें॥ वृद्ध होताती ते निमासुरे । रूपें मंडित योजिलीं ॥ २ ॥ धन कनक घरोघरीं । नाना धान्याचिया परी ॥ सुख सोहळा वर्ते शरीरीं । पलंग सुपत्या न्याहालीया ॥ ३ ॥ नाना फळ-फळावळी । सुमनें वरुषती वृक्षातळीं ॥ एकैक सुखाची न्हाळी । वर्ते गोकुळीं निजानंदें ॥ ४ ॥ कामधेनु ऐशीं गुरें । नंदिनीचिया परीचीं

वासुरें ॥ प्रातःकाळीं देखती नारीनरें । परम विस्मयें दाटलीं ॥ ५ ॥ लक्ष्मी न समाय गोकुळांत । लेणीं लुगडीं अळंकारमंडित ॥ धन संपत्ती नाहीं गणित । जेथें श्रीकांत वस्ती आला ॥ ६ ॥ निळा ह्मणे सुखाची भरणी । गाई गोवळा आली गौळणी ॥ सास्वते घोकिली तैशी वाणी । मधुर शब्दें आनुवादती ॥ ७ ॥

॥ २०३ ॥ कौंसें बैसोनियां सभेसी । विडा मांडियला पैजेसी ॥ ह्मणे जो वधील बाळकासी । जाऊनियां गोकुळा ॥ १ ॥ त्यासी देईन हें अर्ध राज्य । न करीं अन्यथा आपुली पैज ॥ जया साधेल हें काज । तेणें विलंब न करावा ॥ २ ॥ भगिनी पूतना प्रधानराशी । ऐकतांचि उठिलिये अति आवेशी ॥ ह्मणे जाउनियां गोकुळाशी । निर्दाळीन कुमर नंदाचा ॥ ३ ॥ आज्ञा घेउनियां ते त्वरित । विष स्तनामाजीं भरित ॥ ह्मणे पाजूनियां कृष्णनाथ । करीन घात शस्त्रेंविण ॥ ४ ॥ घेऊनियां बाळलेणीं । मनगटीं बांधिलीं खेळणीं ॥ जिवती वाघनखें माळा मणी । आंगडें टोपडें बाळंतविडा ॥ ५ ॥ मग सुखासनीं विराजित । दासी परिचारिका वेष्टित ॥ येउनियां गोकुळा आंत । यशोदेगृहीं प्रवेशली ॥ ६ ॥ निळा ह्मणे नवलकथा । वर्तेल ते येथें आतां ॥ पूतना पावेल सायोज्यता ॥ श्रीकृष्णनाथादर्शनें ॥ ७ ॥

॥ २०४ ॥ यशोदा ह्मणे हे राजभगिनी । कां पां आलिसे धांवोनी ॥ जाईल बाळका झडपोनी । कैसें करूं हे राक्षसी ॥ १ ॥ बहुत उपच्यारेंसी पूजिली । पूतना सन्मानें बैसविली ॥ मग ते ह्मणे गे यशोदे भली । पुत्रवंती झालिसी ॥ २ ॥ आणि नाहीं सांगोनियां धाडिलें । ऐसें निष्ठुरपण त्वां धरिलें ॥ श्रवणीं ऐकतांची धांवोनि आलें । आनंदलें हृदयांत ॥ ३ ॥ आणिलीं विचित्र बाळलेणीं । बाळंतविडाही तुजलागुनी ॥ आणिगे तान्हुलें पाहों दे नयनीं । ऐकोनी यशोदा मनीं गजबजिली ॥ ४ ॥ ह्मणे कैसें तरी करूं ईसी । राजभगिनी हे राक्षसी ॥ दिठाविल माझिया सकुमारासी । दिठीचि कठिण इयेचीं ॥ ५ ॥ मग ह्मणे आतांचि न्हाणिलें । बाळक पाळखीं निजविलें ॥ हें ऐकतांचि नवल केलें । बाळक उठलें न राहेची ॥ ६ ॥ निळा ह्मणे पूतना तेथें । रोषें बोले यशोदेतें ॥ काय गे नष्टपण हें तूतें ॥ मिथ्याचि झकविशी मजलागीं ॥ ७ ॥

॥ २०५ ॥ आतां तरी बाळका आणीं । आपुल्या करें मी लेववीन लेणीं ॥ यशोदा ह्मणे गांडिली हाणी । निवांत पोरटें नसेची ॥ १ ॥ मग जाउ-

नियां पालखी जवळी । ह्मणे मृत्यु पाचारितो तुतें वनमाळी ॥ उगाचि असतासि जरि ये काळीं । तरि वांचतासी काय करूं ॥ २ ॥ ऐसें बोलोनियां आणिला । पूतने वोसंगा बैसविला ॥ देखतांचि पूतने वोसंडला । उभड प्रेमाचा न सांवरे ॥ ३ ॥ सुंदरपणाची झाली सिमा । उपमेशीं मदना अंगीं काळिमा ॥ अवलोकुनियां पुरुषोत्तमा । तनुमनप्राणें निवाली ॥ ४ ॥ ह्मणे गे यशोदे साजणी । परम सुखाची हे लाधलीसी धणी ॥ जतन करीं हा पुत्रमणी । दुर्लभ भाग्येंचि पावलीसी ॥ ५ ॥ पूतना राक्षसी अति क्रूर । तेही देखोनियां कृष्णचंद्र ॥ नयनीं अश्रु आणूनियां वारंवार । श्रीमुखकमळ अवलोकी ॥ ६ ॥ निळा ह्मणे अगाध बुद्धी । होउनी परतली प्रालब्ध सिद्धी ॥ ह्मणे कार्य साधुनियां त्रिशुद्धी । जावें सत्वर राजभुवना ॥ ७ ॥

॥ २०६ ॥ पूतना ह्मणे भुकेला कान्हा । मग झडकरी उघडुनी लाविला स्तना ॥ यशोदा ह्मणे वो राजीवनयना । न सोसे दूध आणिकीचें ॥ १ ॥ स्तनीं लागतांचि त्याचें वदन । विष तें अमृतासमान ॥ शोषूनियां रक्त मांस जीवन । पंचहि प्राण आकर्षिले ॥ २ ॥ न सोसवे वेदनांतें पूतने । ह्मणे ओढीं ओढीं यशोदे तान्हें ॥ ऐसें बाळ हें मी काय जाणें । वेंचले प्राण धांव धांव ॥ ३ ॥ तंव तो न सुटेची सर्वथा । शिणल्या दासी परिचारिकाही ओढितां ॥ नानाशब्दें आक्रंदतां । बिहालीं तत्वता पळती लोकें ॥ ४ ॥ रक्त मांस अस्तींचें उदक । करुनियां चर्महीं शोषियले निःशेष ॥ देऊनियां सायोज्य सुख । महामुक्तस्थानीं स्थापियली ॥ ५ ॥ हें देखोनी दासी परिचारिका । भेणेंचि पळती अधोमुखा ॥ जाऊनियां मथुरालोका । सांगती वार्ता रायासी ॥ ६ ॥ निळा म्हणे ऐकतां कानीं । राजा चिंतावला बहुत मनीं ॥ पुसे वर्तमान तया लागुनी । कैसें वर्तलें तें सांगा ॥ ७ ॥

॥ २०७ ॥ तंव त्या करिती शंखस्फुरण । दीर्घस्वरें आक्रंदन ॥ तें ऐकोनियां नागरीक जन । हाहाभूत वोसरले ॥१ ॥ तयातें पुसतां त्या ह्मणती । दुःखार्णवीं पडिलों हो भूपती ॥ सांगतां पूतनेची गती । मूर्छित पडती धरणिये ॥ २ ॥ म्हणती जातांचि गोकुळाभीतरी । प्रवेशतां नंदयशोदे घरीं ॥ उभयतां येउनियां सामोरीं । बहुत सन्मानें गौरविलें ॥ ३ ॥ विडे उपचारें भोजन । पूतनाबाईतें तोषऊन ॥ मग आणिलें राजीवनयन । बाळ तान्हुलें दाखविती ॥ ४ ॥ तंव तें घनःशाम सावळें। राजीवाक्ष रूप रेखिलें ॥ बाळ लेणें विराजलें । नयनचि गोविले देखतां ॥ ५ ॥ मग तें घेउनियां जवळी ।

स्तनीं लावितांचि तात्काळीं ॥ सुरसुरा शोषुनियां वेल्हाळी । न सोडी-जिवें प्राण जातां ॥ ६ ॥ निळा म्हणे त्या सोडवितां । न सुटे पूतना आक्रं-दतां ॥ आह्मीही स्वशक्ति ओढितां । हरिले तत्वता प्राण तिचे ॥ ७ ॥

॥ २०८ ॥ स्नेह सरतां जैसा दीप । सूक्ष्म होत होतचि हारपे ॥ तया परी बाईचें स्वरूप । तेणें शोषुनी घेतलें ॥ १ ॥ नाहीं उरविलें शरीर । अवघेंचि केलें निराकार ॥ ऐसें देखोनियां सत्वर । आह्मी निघालों तेथुनी ॥ २ ॥ राया त्याची भेटी गोष्टी । न व्हावी तुम्हाही शेवटीं ॥ अकस्मात झालिया राहाटी । करील पूतनाबाई सारिखी ॥ ३ ॥ ऐसें ऐकतांची श्रवणीं । राजा पडे मुर्छीत धरणी ॥ ह्मणे गेली गेलीरे मायबहिणी । माझी पूतनेसारिखी ॥ ४ ॥ महाबळें अति उत्कंठ । मंत्रियांमाजि परमश्रेष्ठ ॥ आतां कायसी पाहों वाट । गेली नये त्या निजपंथें ॥ ५ ॥ मग रायातें संबो-धून । प्रधान आणि नागरीक जन ॥ म्हणती नव्हे भलें हें महा विघ्न । उदेलें देखत देखत ॥ ६ ॥ निळा ह्मणे याहीवरी । श्रीहरिचरित्राची थोरी ॥ अधिकें अधीक ते कुसरी । परिसावी सज्जनीं सादर ॥ ७ ॥

॥ २०९ ॥ घरोघरीं हेचि कथा । येरयेरा सांगती वार्ता ॥ ह्मणती रायासी पडिली थोर चिंता । पूतनाबाई निमालिया ॥ १ ॥ नवलचि तें ऐकतां परी । कैसी शोषिली निमिषावरी ॥ सांगती दासी त्या परिचारी। ऐका अपूर्व हे कथा ॥ २ ॥ म्हणती स्तना लावितांची वदन । शोषि-यले जीव प्राण ॥ पूतना रडे आक्रंदोन । ह्मणे धांव धांव ओढीं यशोदे ॥ ३ ॥ ओढितां न सुटेचि शोषिली । मुक्तिपंथेंचि ते लाविली ॥ अवघी देखोनियां तेथ भ्यालीं । सेवकें आलीं पळोनियां ॥ ४ ॥ येउनी रायातें जाणवलें । पूतनाबाईतें बोळविलें ॥ बाळें शोषुनियां घेतलें । परम आश्चर्य हें वाटे ॥ ५ ॥ राया घरीं दुःख थोर । वाढलें झाला चिंतातुर ॥ पुढें काय करील विचार । तें पाहावें नारीनर बोलती ॥ ६ ॥ निळा ह्मणे यावरी आतां । अपूर्व आहे पुढील कथा ॥ माभळभटासी गोकुळा जातां। होईल पूजा पिढीयांची ॥ ७ ॥

॥ २१० ॥ न कळेचि अदृष्टाची गती । न कळे कर्माकर्माची संभूती ॥ न कळे मृत्यूचीही रीती । कैशी घडवील कोण वेळ ॥ १ ॥ न कळे होणार तें बळिवंत । भोगणें भोगवील अकस्मात ॥ न कळे विधीचेंही लिखित । जें कां रेखियलें निढळीं ॥ २ ॥ कौंसरात्र चिंताग्रस्त । उठुनी बैसला सभेआंत ॥

प्रधान सेनाधीप समस्त । म्लान वदनें भासती ॥ ३ ॥ पुढील विचार सुचीतां । न सुचे कांहींची त्या तत्वता ॥ कृष्ण धाकेंचि त्याचिया चित्ता । धरचि कोठें न सांपडे ॥ ४ ॥ मग बोले कौंसासुर । सेना सिद्ध करा भार ॥ जाऊनियां अति सत्वर । वधा हो कुमर नंदाचा ॥ ५ ॥ तंव ते ह्मणती रायाप्रती । बळाची तेथें न चले युक्ति ॥ पहा ते पूतनेची शक्ति । इंद्रादिकांसी अलोट ॥ ६ ॥ निमिषमात्रें तिची शांती । ठेला करुनियां श्रीपती ॥ तंव त्यां माभळभट बोलती । नव्हे हें कार्य स्त्रियांचें ॥ ७ ॥ आह्मां ब्राह्मणाचें हें कृत्य । जाणे सकळांचेंही घटित ॥ द्याल आज्ञा तरी मी तेथें । जाउनियां साधीन कार्यार्थ ॥ ८ ॥ निळा ह्मणे बोलतां ऐसें । अवघे उल्हासले मानसें ॥ ह्मणती यथार्थ हें ऐसें । ऋषि बोलिले माभळ ॥ ९ ॥

॥ २११ ॥ मग वस्त्रें देउनी गौरविला । रायें बहुत सन्मानिला ॥ चालतां मार्गीं विचार सुचिला । ह्मणे टाकवीन तान्हुला निर्जनीं ॥ १ ॥ टिळे माळा टोपी शिरीं । श्रीमुद्राचि वोली पंचांग करीं ॥ धोकटी घेउनियां खांदियावरी । शुद्ध मुहुर्तें चालिला ॥ २ ॥ आला गोकुळासन्निधी । शुद्धाचमन केलें विधी ॥ मनीं कापट्याची बुद्धी । साक्षी तियेचा परमात्मा ॥ ३ ॥ नंदगृहीं प्रवेशला । येतां यशोदे देखिला ॥ पाट बैसावया दिधला । नमूनि पूजिला उपचारीं ॥ ४ ॥ स्वस्थ स्वस्थानीं बैसले । पंचांग काढुनियां उकलिलें ॥ वाचुनी चंद्रबळ दाविलें । आणि दिधलें आशीर्वादा ॥ ५ ॥ मग पुसे यशोदेप्रती । प्रसूतिकाळ कोणती तिथी ॥ तंव ते आणूनियां श्रीपती । द्विजातें दाखवी उल्हासें ॥ ६ ॥ देखतांची तो मदनमूर्ती । ठकल्या ठेल्या इंद्रियवृत्ती ॥ निळा ह्मणे समाधीस्थिती । पावली प्रतीति ब्राह्मणा ॥ ७ ॥

॥ २१२ ॥ परि तें कर्म बळोत्तर । नेदी राहों वृत्ती स्थिर ॥ स्वार्थ झोंबोनियां विखार । आणिला ओढोनी लोभावरी ॥ १ ॥ मग ह्मणे वो सुंदर बाळ । यशोदे नागर हें वेल्हाळ ॥ परि याचा जन्मकाळ । कैसा असेल पाहों तो ॥ २ ॥ कृष्ण पक्ष श्रावणमास । रोहिणी नक्षत्र अष्टमी दिवस ॥ मध्यरात्रीचा जन्म यास । दशा तों क्रूर दिसताहे ॥ ३ ॥ जन्मकाळीं या बारावा गुरु । शनी भोम हानिस्थानीं स्थिरु ॥ राहो केत आणि दिनकरु । देहात्यागातें सूचिती ॥ ४ ॥ याचेन सकल वंशहानी । करील कुळाची बुडवणी ॥ नये आलोकूं यातें नयनीं । टाकावा नेउनी

अरण्यांत ॥ ५ ॥ यशोदे न लावीं यासी उशिर । बाळ नव्हे हा मायावी खेचर ॥ कालचि पाहेपा केला संहार । पूतनेचा क्षणही न लागतां ॥ ६ ॥ निळा म्हणे ऐकोनि ऐसें । मांडिलें विदान परम पुरुषें ॥ जयाचें कर्म देखिलें जैसें । दिल्हें तया तैसें दानफळ ॥ ७ ॥

॥ २१३ ॥ बैसला होता पाटावरी । तोचि थरारिला ते अवसरी ॥ निष्ठोनियां पृष्ठीवरी । बैसला अवचिता निघातें ॥ १ ॥ पडिला पुढें दांतघशीं । उठितां बळी अति आवेशीं ॥ तंव वेढिला येउनियां चौपाशीं । घरोघरींच्या पिढियांनीं ॥ २ ॥ मग ह्मणे धांवा धांवा । याचिये हातींचें मज सोडवा ॥ नाडलों आपुल्या कापट्यभावा । नाहीं स्मरलों चांडाळ ॥ ३ ॥ अचेतन हे धांवती काष्टें । लक्षानुलक्ष कोट्यानुकोटे ॥ आतां केंचें जिणें येथें अदृष्टें । मारावया आणिलें ॥ ४ ॥ लोक हांसताती भोंवताले । ह्मणती कैसें हें नवल झालें ॥ आमुचेहि पाट येथें आले । मारूंचि बैसले माभळभटा ॥ ५ ॥ येथें न चले कोणाचेंचि कांहीं । ईश्वरइच्छेची हे नवाई ॥ ब्राह्मण ह्मणोनी सोडिला पाहीं । नागवा उघडा माभळभट ॥ ६ ॥ निळा ह्मणे लवडसवडी । पळतां भुय त्या झाली थोडी ॥ येउनियां कौंसाचिये देवडी । शंखस्फुरणें उभा ठेला ॥ ७ ॥

॥ २१४ ॥ ऐकोनी गजबजिली दैत्यसभा । धाकेंचि कौंसही ठाकला उभा ॥ तंव बीभत्स माभळभटाची शोभा । देखते झाले सकळही ॥ १ ॥ नागवा उघडा आणि बोडका । जीवत्वपांगें बुडाली शंका ॥ भोंवते देखतांही विषयालोकां । ह्मणे धांवा धांवा सोडवा ॥ २ ॥ पाटेंचि पुरविली माझी पाठी । लक्षानुलक्ष आले कोटी ॥ उठा उठा पळारे शेवटीं । मारिले जाल व्यर्थचि ॥ ३ ॥ दैत्य पाहाती चहूंकडे । शस्त्रपाणी वेंघले हुडे ॥ दुर्गा सांभाळिती चहूंकडे । ह्मणती न दिसे विघ्न डोळियां ॥ ४ ॥ राजा ह्मणे झांका त्यासी । पुसा काय तें वार्तेसी ॥ मग नेसउनियां वस्त्रासी । आणिला सभेसी पूसती ॥ ५ ॥ तो ह्मणे राया बळिया बाळ । उपजला तो आमुचा काळ ॥ विचित्र पाहातां त्याचा खेळ । लाविलीं पिढींची मज पाठीं ॥ ६ ॥ निळा ह्मणे रूपाकृती । सुंदरपणाची ओतली मूर्ती ॥ कोटी मदनाची अंगीं दीप्ती । न ढळती पातीं अवलोकितां ॥ ७ ॥

॥ २१५ ॥ ऐसें सांगतां माभळभटा । राया दचक बैसला मोठा ॥ मग पाचारूनियां प्रधान । दैत्यांप्रती काय बोले ॥ १ ॥ ह्मणे वाढविलेती बहुता

मानें । अपार संपदा देउनियां धनें ॥ आजि माझिया उपेगा येणें । बाळ कृष्ण वधणें भलत्यापरी ॥ २ ॥ नाना विद्या तुमच्या अंगीं । रूपें पालटुनी विचरतां जगीं ॥ मायारूपी ह्मणउनियां स्वर्गीं । देवही भिती तुह्मांसी ॥ ३ ॥ ऐसें असोनी माझिये गांठी । कायसी बाळका जळुची गोठी ॥ तुमचेनी बळें हे सकळही सृष्टी । आर्चित झाली मजलागीं ॥ ४ ॥ पूतना गेली ते तंव नारी । दुसरा भट तोहि भिकारी ॥ काय जाणों कैशापरी । देखोनी सळली तयासी ॥ ५ ॥ तो तंव अत्यंत सकुमार । सांगती अवघे लहान थोर ॥ सुंदरपणाचीही बहार । रूपा आली कृष्णाकृती ॥ ५ ॥ तरी तुह्मी जाउनियां तेथें । प्रेतरूपचि आणावा येथें ॥ निळा ह्मणे पाहोनियां त्यातें । करऊं अक्षवाणे आपणा ॥ ७ ॥

॥ २१६ ॥ ऐसा चिंतावोनियां मनीं । ह्मणे निमाली पूतना भगिनी ॥ माझिया राज्या आली हानी । ह्मणोनी माभळभट पाठविला ॥ १ ॥ तंव पिंडेदान त्या प्राप्त झालें । नवलचि अपूर्व हें ऐकिलें ॥ येउनी आह्मातें जाणविलें । नव्हे बाळ हें तान्हुलें श्रीहरी ॥ २ ॥ मग ह्मणे वो रिठासुरा ॥ जाउनी तुह्मी बाळकासी मारा ॥ देईन अर्धराज्य भारा । कार्यसिद्धी झालिया ॥ ३ ॥ मग रिठासुर तो मायावी । गुंफिली रिठेमाळ अति बरवी ॥ करीं घेउनियां सादावी । नंद चौबारा जाउनी ॥ ४ ॥ ह्मणे हें बाळका लेववितां । सर्व काळीं कंठीं असतां ॥ कोण्याहि भयाची तया वार्ता । स्पर्शोंचि नेणे सामर्थ्यगुणें ॥ ५ ॥ कदापिही नव्हे भूतबाधा । दिठीचें भय नाहीं त्या कदा ॥ ऐसें ऐकोनियां यशोदा । आवडी घाली हरिकंठीं ॥ ६ ॥ निळा ह्मणे पालखी बाळ । निजउनियां यशोदा वेल्हाळ ॥ मेळउनियां स्त्रिया सकळ । हास्यविनोदें बैसली ॥ ७ ॥

॥ २१७ ॥ तंव त्या रिठीयासी निघालीं वदनें । अति विक्राळ दाढा दशनें ॥ श्रीकृष्ण कंठींचें रुधिरपान । करावया उदितें ॥ १ ॥ कृत्रिमें जाणोनियां ते श्रीहरी । कवळुनि धरिलीं दोहीं करीं ॥ आणि घालुनियां मुखाभीतरीं । चावुनी धरणिये टाकिलीं ॥ २ ॥ त्याचें सिष्टकृत केलियावरी । आक्रोशें पाळणियांत रुदन करी ॥ तें ऐकोनी यशोदा सुंदरी । धांवली झडकरी काय झालें ॥ ३ ॥ तंव देखे शोणिताचे पुर । मांस मेदाचे संभार ॥ मग ह्मणे गे मरमर । बाळ महासर्पें खादलें ॥ ४ ॥ धांविल्या नगरनारी बाळ । घात केला ह्मणती सकळ ॥ ऐशी कैशी गे तूं

वेल्हाळा । यशोदे मारविलें बाळका ॥ ५ ॥ वाहाती शोणिताचे पुर । इतुकें कैचें गे त्या रुधिर ॥ काढूनियां पहा गे सत्वर । आहे प्राण कीं गेलासा ॥ ६ ॥ निळा ह्मणे जाउनी जवळी । काढुनी आणिला जों वनमाळी ॥ तव हास्यवदन नित्य काळीं । नाहीं कोमाइला ना दचकला ॥७॥

॥ २१८ ॥ मग ह्मणती अवघ्या जणी । धांवोनी पाहागे आणा पाणी ॥ डास वरखडा न्याहाळुनी । रक्त कोठुनी श्रवलें हो ॥ १ ॥ पाहाती तंव तो उत्तम अंगें । जेंवि कां उठियलें अनंगें ॥ नभापरी अलिप्त संगें । काय करिती आघात त्या ॥ २ ॥ नानापरीचीं अक्षवाणें । करी यशोदा वांटी दानें ॥ यथाविधी द्विजभोजनें । केलें जिताणें श्रीहरिचें ॥ ३ ॥ ह्मणती नवीचि रिठियाची माळा । घातली होती त्वां याचिया गळां ॥ ते काय झाली गे याचि वेळा। तेंचि अरिष्ट यासि होतें ॥ ४ ॥ ऐसा झाला घोषगजर । ऐकोनियां तो कौंसासुर ॥ ह्मणे बोळविला महावीर । केला चकाचुर रिठाही ॥ ५ ॥ करितां उपाय न चले यासी । कौंस भयाभीत मानसीं ॥ ह्मणे काळ हा जन्मला आह्मासीं । करील संहार काळाचा ॥ ६ ॥ निळा ह्मणे न चले युक्ती । यापुढें कापव्या समाप्ती ॥ सर्वांतरवासी हा श्रीपती । कर्मफळदाता निजसत्तें ॥ ७ ॥

॥ २१९ ॥ यावरी कौंस ह्मणे दैत्यादिकां । वधुनी येईल जो बाळका ॥ त्यासी अर्धराज्याची टिका । देईन छत्र सिंहासन ॥ १ ॥ मग तृणावृत धेनुकासुर । बग केसिया शकटासुर ॥ अघासुर सर्प विखार । चालिले भार दैत्यांचें ॥ २ ॥ कृष्णें ते ते संहारिले । नवल अद्भुतचि वो केलें ॥ निळा ह्मणे आहे वर्णिलें । श्रीवेदव्यासें पुराणीं ॥ ३ ॥

॥ २२० ॥ आतां पुढें बाळचरित्र । कृष्णक्रिडा अति विचित्र ॥ ऐकतां श्रवणीं होती पवित्र। गातां वक्ता शुचिर्भुत ॥ १ ॥ एक अजर एक अक्षर हे भगवत्कथा । श्रवणीं पडतांचि अवचिता ॥ कैवल्यपदप्राप्तीची योग्यता । पावे श्रोता वक्ता तात्काळ ॥ २ ॥ श्रीकृष्णाची हे बाळलीळा । अद्भुत सुखाचा सोहळा ॥ वेधूनियां नरनारी बाळा । गाई आणि गोवळा ब्रह्मप्राप्ती ॥ ३ ॥ ब्रह्मादिक दर्शना येती । सकळही देव आणि सुरपती ॥ गगनीं विमानें दाटती । सुमनें वरुषति सुरवर ॥ ४ ॥ श्रीकृष्णाचें नामकरण । विधिविधानें द्विजभोजन ॥ नंदयशोदे उल्हास पूर्ण । सुवासिनी ब्राह्मण सर्व जना ॥ ५ ॥ मंगळघोषाचिया गजरीं । निशाणें दुमदुमिलिया

भेरी ॥ टाळ मृदंग झणत्कारी । नाचती वैष्णव पदें गाती ॥ ६ ॥ निळा ह्मणे नगरवासी । प्रांतवासी देशवासी ॥ आले द्वीपांतरनिवासी । कृष्ण सोहळा पहावया ॥ ७ ॥

॥ २२१ ॥ रत्नखचित पालख । सूर्या ऐसा निर्मिला चोख ॥ निरालंबी गोउनी देख । महा उत्साह मांडिला ॥ १ ॥ महर्षि ऋषीही सकळिक । आले पहावया कवतुक ॥ अवलोकुनियां यदुनायक । करिती प्राणें कुरवंडीया ॥ २ ॥ आले गौळियांचे भार । नाना याती नारीनर ॥ नाना परीचे शृंगार । लेणीं लुगडीं मिरविती ॥ ३ ॥ वाणें घेऊनियां नारी । रत्नजडितें तबकें करीं ॥ देवांगना तैसियापरी । कृष्णें वैभवें मंडिता ॥४॥ पालखीं घालितां चक्रपाणी । नाना आल्हादें गाती गाणीं ॥ नाना स्वरें उमटल्या ध्वनी । उठती गगनीं पडिसाद ते ॥ ५ ॥ नामें ठेउनियां पाचारिती । गोविंदा गोपाळा यदुपती ॥ सच्चिदानंदा आनंदमूर्ती । जगपती श्रीपती अमरापिता ॥ ६ ॥ अच्युता अनंता अपारा । देवकीनंदना जगदोद्धारा ॥ मुनिमनमोहना सर्वेश्वरा । आत्मया श्रीवरा सर्वगता ॥ ७ ॥ सुंदरा राजीवलोचना । जगदाधीशा पंकजवदना ॥ योगीमानसमनोरंजना । सुखनिधाना सुखमूर्ती ॥ ८ ॥ मधुमाधवा मधुसूदना । त्रिविक्रमा वामन शंकर्षणा ॥ मुकुंदा मंदारा शेषशयना । राजीवाक्षा जनार्दना श्रीकृष्णा ॥ ९ ॥ निळा ह्मणे ऐशिया नामें । गर्जती गौळणी सप्रेम प्रेमें ॥ ऐकोनियां ते पुरुषोत्तमें । केलिया संभ्रमें अति वाड ॥ १० ॥

॥ २२२ ॥ पुढें ऋषीश्वरांची मांदी । बैसली होती सभासंधी ॥ तेही आशीर्वाद शब्दीं । मंत्रघोषीं गर्जिन्नले ॥ १ ॥ मंगळ तुराचे घोषगजर । दुंदुभी वाजविती सुरवर ॥ नंदरायाचें भाग्य थोर । देव वर्णिती निज मुखें ॥ २ ॥ निगम येउनी मूर्तिमंत । श्रीकृष्णाचीं स्तवनें करित ॥ कामधेनुहि क्षीरें स्रवत । तृप्ति सकळांसी द्यावया ॥ ३ ॥ देवगुरु जे बृहस्पती । तेहि आशीर्वादें कृष्णातें स्तविती ॥ शुक्राचार्यही प्रज्ञामूर्ती । कृष्णाचे वर्णिती कीर्तिघोष ॥ ४ ॥ उमा रमा रेणुका सती । लोपामुद्रा अरुंधती ॥ अक्षवाणें घेउनियां हातीं । आत्मया ओंवाळिती श्रीकृष्णा ॥ ५ ॥ अनुसूया परम पतिव्रता । अत्रिदेवाची जे कांता ॥ जीचिये उदरीं श्रीअवधूता । दत्तात्रया जन्म महामुनी ॥ ६ ॥ निळा ह्मणे तेही येउनी । हरीतें वोसंगा घेउनी ॥ आशीर्वादें अमृत बचनीं । गौरविती यशोदे ॥ ७ ॥

॥ २२३ ॥ ऐसे देव आणि ऋषेश्वर । हर्षें होउनियां निर्भर ॥ नंद-यशोदेचें वारंवार । वर्णिती भाग्य निजमुखें ॥१॥ न संपडे जो योगसाधनें । नाना तपें वेदाध्ययनें ॥ तो हा सगुणरूपें नारायण । क्रीडा करी याच्या घरीं ॥ २ ॥ यावरी गौळणीही अति सुंदरा । कडिये घेउनी सारंगधरा ॥ नेती उल्हासें निजमंदिरा । चुंबनें देउनी खेळविती ॥ ३ ॥ म्हणती कृष्णा रामा मेघःशामा । योगी मुनिजन मनोरमा ॥ सुलभ झालासी आजि तूं आम्हां । आवडी ऐसा वर्तसी ॥ ४ ॥ पूर्वार्जितें उत्तमें होतीं । सुकृतें सांचिया फळनिष्पत्ती ॥ मोडोनी आलिया तुझी हे मूर्ती । डोळेभरी अवलोकूं ॥ ५ ॥ ऐशिया उत्साहें त्या प्रमदा । नेती खेळविती गोविंदा ॥ मग पावोनियां परमानंदा । शयनीं परियंकीं निजविती ॥ ६ ॥ निळा म्हणे सुख विश्रांती । पावल्या ऐशिया सत्संगती ॥ पुढील कथा अपूर्व ख्याती । बाळपणींचि हरिकीर्ती ॥ ७ ॥

॥ २२४ ॥ कौंसा मनीं भयसंचारु । झाला तेणें चिंतातुरु ॥ बैसोनियां करी विचारु । कृष्णवधार्थ प्रयोग ॥ १ ॥ तें ऐकोनी उत्पात वार्ता । गोकुळींचिया लोकां समस्ता ॥ धैर्य नुपजेचि म्हणती आतां । जावें पळोनी दुरिदेशा ॥ २ ॥ तंव नंद म्हणे ऐका मात । जावोनी वसों दरकुटी आंत ॥ सोडुनियां जातां आपुला प्रांत । घरें दारें नुरतील ॥ ३ ॥ विचार मानला सकळांसी । गेलीं पळोनी दरकुटियेसी ॥ गांवीं नाहीं मुंगी माशी । ऐसे वोस पडियेले ॥ ४ ॥ उष्णा वारियाचे आघात । साउली न मिळेचि त्या वनांत ॥ तंव देखिल्या अकस्मात । माईक गाडा शकटासुर ॥ ५ ॥ यशोदा देखोनियां ते वेळीं । बाळकृष्ण निजवी गाडियातळीं ॥ तंव हा लाघविया वनमाळी । पदघातेंचि उडविला ॥ ६ ॥ तेणें तो आक्रंदला । घोषें दणाणिला ॥ जाउनी मथुरेमाजि पडिला । कौंसा सन्मुख शतचूर्ण ॥ ७ ॥ झाला शोणिताचा सडा । मांस विखुरलें चहूंकडा ॥ कौंस म्हणे रे शकटाहि गाढा । आजि लाविला मृत्युपंथें ॥ ८ ॥ निळा म्हणे गौळिये म्हणती । गाडा उडाला कैसिया रीती ॥ तळीं होता हा श्रीपती । थोर भाग्यें वांचला ॥ ९ ॥

॥ २२५ ॥ मग ओवाळुनियां मृत्तिका । घेतलें उचलुनी यदुनायका ॥ यशोदा म्हणे हें बाळका । वरुनी अरिष्ट चुकलें ॥ १ ॥ नव्हे शकट तो मायावी दैत्य । आला होता करावया घात ॥ कृष्णें ताडिला तो यथार्थ ।

पूतने ऐशी परी केली ॥ २ ॥ तेणें दिधली आरोळी । न्याहा उठे तो अंतराळीं ॥ परी नाहीं भयाची काजळी । सावध वनमाळी सर्व गुणें ॥ ३ ॥ ऐसे क्रमिले कांहीं दिवस । तंव रायें पाठविलें लोकांस ॥ मग येउनी गोकुळास । पुनरपी वस्ती राहिले ॥ ४ ॥ कृष्ण खेळतां अंगणीं । गडी म्हणती सारंगपाणी ॥ हाराळी नूतन हे कापुनी । चारूं वत्सासी आपुलिया ॥ ५ ॥ तंव तो तृणावृत दैत्य । हाराळिरूपें होता तेथ ॥ इच्छूनियां कृष्णघात । तंव तो हरीनें ओळखिला ॥ ६ ॥ म्हणे पळारे तुम्ही अवघे गडे । येथें दिसत असे हें कुडें ॥ रहा अवघे मागिलीकडे । आपण पुढें संचरला ॥ ७ ॥ तेणें देखतांचि श्रीहरी । वदनें काढिलीं तृणांकुरीं ॥ शतें सहस्र लक्षवरी । रूपें धरुनी ठाकला ॥ ८ ॥ भयानकें अति विक्राळे । दाढा दंत दीर्घ सिसाळे ॥ आवाळुवे चाटित आवेशबळें । कृष्णा अंगीं झगटला ॥ ९ ॥ निळा म्हणे कवळुनी मुष्टी । मुख्य तृणासुराची झोटी ॥ उपटुनियां भूमि नेहटी । शतचूर्ण करुनी सांडिला ॥ १० ॥

॥ २२६ ॥ ऐसा वैरिया मुक्तिदानीं । कृपावंत हा सारंगपाणी ॥ कौंसें ऐकोनियां श्रवणीं । परम खेद मानिजे ॥ १ ॥ कृष्णाजवळी होतीं मुलें । तिहीं तें आश्चर्य देखिलें ॥ वडिलां सांगती नवल झालें । कृष्णें मर्दिलें अपार दैत्यां ॥ २ ॥ कोट्यावत पसरुनी मुखें । आले कृष्णासन्निध तंव ते ॥ तेणें अति लाघवें कौतुकें । भूमीसी आपटुनी मारिले ॥ ३ ॥ त्यांचीं शरीरें पर्वतराशी । पडिल्या आहेत गांवापाशीं ॥ चला दाखवितों तुम्हांसी । म्हणउनी सकळिकांसी हाकारिलें ॥ ४ ॥ तिहीं तें देखोनियां दिठी । भयें कांपती आपुल्या पोटीं ॥ म्हणती अतुर्बळि हा जगजेठी । लेंकरूं कैसा म्हणावा ॥ ५ ॥ नंदहि विस्मयापन्न चित्तीं । म्हणे हे कोठुनी असुर येती ॥ याचिया हातें पावोनी शांती । जाताती मुक्तीपदातें ॥ ६ ॥ निळा म्हणे गांवींचे लोक । करिती अवघेचि कौतुक ॥ परी कौंसा अधिकाअधिक । क्षतें उमटती दुःखाचीं ॥ ७ ॥

॥ २२७ ॥ यावरी कोणे एके दिवशीं । कृष्णें घेउनी सौंगडियांशीं ॥ आला यमुनेचे प्रदेशीं । तंव गाई खिल्लारें देखिलीं ॥ १ ॥ तयामाजि अति चोखडे । वत्स गाईचे ते पाडे ॥ त्याचि ऐसें धरुनी रूपडें । वत्सासुर तेथ उभा ॥ २ ॥ कृष्ण ह्मणे रे हो गाडिहो ऐका । एकएक वत्स धरा नेटका ॥ मीही धरितों ह्मणउनी तंव कां । धांवला वत्सासुरावरी ॥ ३ ॥

तंव तो मायावी असुर । सिंगें पसरुनी पातला समोर ॥ मागें करित लत्ताप्रहार । आडवाचि उडे हाणावया ॥ ४ ॥ गौळी करिताति हाहाकार । मारिला मारिला नंदकुमर ॥ अचपळ हा नव्हेचि स्थिर । कासया वत्स धरूं गेला ॥ ५ ॥ याचिये वदनीं निघती ज्वाळ । नासापुटींहुनी धूम्रकल्लोळ । बरें नव्हे हा पातला काळ । प्राण घ्यावया प्रगटला ॥ ६ ॥ निळा ह्मणे धरिला कर्णीं । गुरगाळुनियां पाडिला धरणी ॥ मुष्टीघातेंचि चक्रपाणी । मोक्षपदातें पाठवी त्या ॥ ७ ॥

॥ २२८ ॥ महा वैरी निर्दाळिला । पैल वत्सासुर निवटिला ॥ ह्मणती अचोज हा बळिया झाला । नंदरायाचा कुमरु ॥ १ ॥ मात गेली कौंसासुरा । ऐकोनी झाला तो घाबरा ॥ विचारी आपुलिया कैवारा । न दिसे दुसरा ऐसा बळी ॥ २ ॥ जो तो जाउनी घातचि पावे । नये परतोनियां जीवें ॥ यावरी आतां शरण जावें । कवणिया वीरा महीतळीं ॥ ३ ॥ तंव तो उठोनी आघासुर । करी रायासी जोहार ॥ ह्मणे न व्हावें चिंतातुर विद्या अपार मजपाशीं ॥ ४ ॥ राया तुझिया हितावरी । करीन गोकुळाची बोहरी ॥ अवघेचि घालुनियां उदरीं । येईन कृष्णासमवेत ॥ ५ ॥ ऐसें तोषउनियां राया । ह्मणे न धरीं आतां भया ॥ कैशी रचूनियां माया करितों संहार सकळांचा ॥ ६ ॥ निळा ह्मणे गर्वारूढ । यापरी होउनिया मूढ ॥ काळासवें मांडुनियां होड । खेळों पाहे मश्यक ॥ ७ ॥

॥ २२९ ॥ येरीकडे आनंद गोकुळीं । गोप उठोनी प्रातःकाळीं । मिळाले नंदाच्या राउळीं । करिती जागें श्रीकृष्णा ॥ १ ॥ दसवंती ह्मणे गोवळांसी । निद्रित आहे हृषीकेशी ॥ पुढें जा घेउनी गोधनाशी । जागा झालिया येईल ॥ २ ॥ काल बहुत श्रमला कृष्ण । वत्सेसी करितां संघटण ॥ बळें वांचला सांगती जन । केलें मर्दन मग त्याचें ॥ ३ ॥ तेव्हां कळला तो असुर । होउनी वत्स आला क्रूर ॥ कृष्णें ताडितां निशाचर एक योजन पडियला ॥ ४ ॥ ऐकोनी म्हणती गोरक्षक । सत्वर पाठवा यदुनायक ॥ आम्ही जातों अवश्यक । पश्चिम दिशेसी सांगावें ॥ ५ ॥ मग ते हांकुनियां खिल्लारें । सवेग चालिले एकाचि भारें ॥ चौताळती गोधनें थोरें । आवेशेसी धांवती ॥ ६ ॥ निळा म्हणे नेणती पुढें । आघें पसरिलें ते जाभाडे ॥ तळीं महीवरी जेवढे । मेघमंडळापर्यंत ॥ ७ ॥

गोवळे आपोआप । जाती वदनामाजी त्याच्या ॥ १ ॥ पुढें चालतां मार्ग न दिसे । अंधःकारीं पडिले ऐसे ॥ मागें फिरावें तंव तो स्वासें । ओढुनी नेतसे पैलीकडे ॥ २ ॥ मग म्हणती येर येरासी । प्रातःकाळींचि झाली निशी ॥ गडदे पडिले न दिसे शशी । ग्रह तारांगणें ना भानु ॥ ३ ॥ पडिलों दरकुटिमाझारी । किंवा धुई दाटली भारी ॥ अथवा मेहुडे आले वरी । कांहींचि न दिसे न तर्के ॥ ४ ॥ जाभाडी मेळवितां अघासुर । परि मागें राहिला सारंगधर ॥ म्हणोनियां तो झाला स्थिर । तयाही सगट गिळावया ॥ ५ ॥ तंव दिवस घटिका चारी । आला चढोनियां वरी ॥ गाई गोवळे भिन्न अंधारीं । पडिली अघासुरा पोटीं ॥ ६ ॥ निळा म्हणे यावरी आतां । जागृत झालिया कृष्णनाथा ॥ पुढें कैशी वर्तली कथा । ते परिसावी सात्विकीं ॥ ७ ॥

॥ २३१ ॥ कृष्ण बळराम उठिले । मुखमार्जनातें सारिलें ॥ तंव दसवंतिया बोले । जेउनी जावें गोधनापाठीं ॥ १ ॥ गाई गोवळ खोळंबले होते । पुढें गेले ते निरुते ॥ मग आणुनियां भोजनातें । पुढें ठेविलीं रत्नताटें ॥ २ ॥ उभयतां जेउनियां उठिले । गोपशृंगार आणविले ॥ विचित्र चोळणे कसिले । काचे वेष्टिले सुरंग ॥ ३ ॥ शिरीं मोरविसा टोप । कर्णीं कुंडलां तेज अमूप ॥ केशर चंदनाचे विलेप । टिळे लल्लाटीं रेखियले ॥ ४ ॥ गुंजाहार घातले कंठीं । खांदीं कांबळी हातीं वेताटी ॥ मोहरी पावा गांजिवा पाठीं । माजि दिव्यान्नें भरियेलीं ॥ ५ ॥ दंडीं रुमाल करीं कंकणें । पाईं वाहाणा शोभलें लेणें ॥ ऐसे चालतां अतिसत्राणें । पुढें अघयातें ओळखिलें ॥ ६ ॥ एक चाभाडें गगनावरी । दुजें पृथ्वीची ऐसें निर्धारी ॥ गाई गोपाळ गेले भीतरी । निळा म्हणे हें जाणवलें ॥ ७ ॥

॥ २३२ ॥ मग ह्मणे गिळिले गोप । गाई खिल्लारांचे कळप ॥ तरि हा चिरुनियां सांडीन सर्प । घेईन सूड या सकळांचा ॥ १ ॥ कृष्ण शिरतां त्याच्या वदनीं । अघासुरा हर्ष न समाय मेदिनी ॥ ह्मणे कार्य साधलें हा चक्रपाणी । गिळिलीयावरि सर्व माझें ॥ २ ॥ ऐसा आनंदला अघ । तंव हा लाघविया श्रीरंग ॥ वाढला पाताळवरी स्वर्ग । नेदी चाभाडी मेळऊं त्या ॥ ३ ॥ नुगळवेचि तो उगळूं जातां । पुढेंहि न चलेचि तत्वता ॥ फाडुनी वदन केल्या चळथा । द्विभाग करुनी सांडियले ॥ ४ ॥ तेणें उघड्या पडिल्या गाई । गोवळ ह्मणती थोर नवाई ॥ निमिषमात्रेंचि गेली धुई ।

पाहा रे प्रकाश पडियला ॥ ५ ॥ कान्हो आतां येईल केव्हां । वृत्तांत तया हा नाहीं ठावा ॥ ऐसें स्मरणचि करित खेवा । देखिला श्रीहरि दृष्टीपुढें ॥ ६ ॥ निळा ह्मणे सांगती नवल । आजि आंधारिमाजीं गाई गोवळ ॥ पडिले होते आणि वायो प्रबळ । माघारेंहि सरों नेदी ॥ ७ ॥

॥ २३३ ॥ मग हांसोनियां बोलिजे कृष्णें । बेटे हो तुह्मी आवघेचि शाहणे ॥ सर्पें गिळिले होतेती प्राणें । कैसे तरी वांचतेती ॥ १ ॥ बरें झालें होतों मार्गें । तेणें वांचलेती रे प्रसंगें ॥ पैल पाहारे महा भुजंगें । चिरुनी सांडिला त्याच्या फाळी ॥२॥ पाहाती तंव भरोनियां दरा । पडिला वाहती शोणितधारा ॥ ह्मणती नवल हें सारंगधरा । कैसा चिरुनियां टाकिला ॥ ३ ॥ येणेंचि आह्मां गिळिलें होतें । नेणों देखोनी अंधःकारातें ॥ थोर विस्मय करिती तेथें । ह्मणती दाऊं वडिलांतें नवल हें ॥ ४ ॥ ऐसा अघासुर मर्दिला । कृष्णें पवाडा हा केला ॥ गोवळ नाचती विजयी झाला । श्रीहरी आला आमुचा सांगाती ॥ ५ ॥ कौंसातेंहि विदीत झालें । जाउ-नी वार्तिकीं सांगीतलें ॥ तेणें चकपक त्याचें गेलें । ह्मणे ओढवलें दुर्मरण ॥६॥ निळा म्हणे इकडे गाई । चरतां फांकल्या दिशा दाही ॥ वळत्या करुनियां त्या लवलाही । आणिल्या वृंदावनासमीप ॥ ७ ॥

॥ २३४ ॥ तंव पातला माध्यान्हकाळ । गोवळा भुकेची झाली वेळ ॥ मग पाहोनियां उत्तम स्थळ । सुरतरु शीतळ छायातळीं ॥ १ ॥ तेथें बैसविल्या पंगती । घोंगडी घालुनियां खालती ॥ कृष्ण ह्मणे गडियांप्रती । सिदोऱ्या एकत्र कालऊं ॥ २ ॥ गोवळ म्हणती बहुत बरें । कृष्णा तुझिया निज करें ॥ होईल अमृतचि तें दुसरें । जेऊं आदरें शेष तुझें ॥ ३ ॥ नारदें तें ऐकिलें कानीं । सांगे सत्यलोका जाउनी ॥ ब्रम्हयातें म्हणे चक्रपाणी । आजि ब्रम्हरस वांटितो ॥ ४ ॥ देवा जाउनियां तेथें । शेष घ्यावेंजि कृष्णहातें ॥ तरी हें पद राहेल निरुतें । नाहीं तरी आल्पायु ॥ ५ ॥ कृष्णशेषाचा हा महिमा । सांगतां अति निरोपमा ॥ पावोनियां निष्काम कामा । पद अच्युत सुखप्राप्ती ॥ ६ ॥ निळा म्हणे नारदवचनीं । ब्रम्हदेव चालिले तेथुनी ॥ पाहाती तंव वृंदावनीं । गोवळ नाचती चौफेरी ॥ ७ ॥

॥ २३५ ॥ मध्यें परमात्मा श्रीहरी । दधिओदन घेउनी करीं ॥ कवळ त्यांचिये मखीं भरी । आणि स्विकारी आपणही ॥ १ ॥ हें देखोनियां

न करिती गोवळ ॥ २ ॥ आम्ही याचें शेष घेणें । तैं ब्रम्हत्वा मुकणें ॥ यज्ञीं अग्रपूजेचें आवतणें । कैचें येईल मग आम्हां ॥ ३ ॥ यातें नाहीं यज्ञाचार । दीक्षा अथवा शिखासूत्र ॥ आम्ही सोंवळे निरंतर । करूं उच्चारु वेदाचा ॥ ४ ॥ सोवळें वोवळें नाहीं यासी । केलें अपोषण कर्मासी ॥ सेवितां याचिया उच्छिष्टासी । होईल प्रसवायासी निज मूळ ॥ ४ ॥ मग प्रायश्चित्तेंही घेतां । न फिटे विटाळ तो तत्वता ॥ ऐसें विचारुनियां विधाता। पालटी तत्वता ब्रम्हपण ॥ ६ ॥ निळा म्हणे ज्याचा तया । संदेह बांधी त्या नांव माया ॥ मग तो रूप पालटूनियां । झाला गोवळ वेषधारी ॥ ७ ॥

॥ २३६ ॥ यज्ञोपवित सांडिलें दुरी । शिखासूत्राची बोहरी ॥ करूनियां मोहरी करीं । काठी कांबळी गांजिवा ॥ १ ॥ ऊफराटी पडदणी खोविली टिरी । सुक्षम शेंडी बोडक्यावरी ॥ दृष्टि चोरुनियां माझारी । माजि गोवळांच्या नाचतो ॥२॥ येउनियां कृष्णाजवळा । मुख पसरी इच्छुनि कवळा ॥ तंव हा दाउनियां आणिका गोवळा । मुखीं भरी स्वानंदें ॥ ३ ॥ सर्वांग देखणा श्रीहरि । व्यापक सकळांचे अंतरीं ॥ ब्रह्मा पाडियला फेरी । नेदी शितबोटी आतळों ॥४॥ म्हणे ठकुनियां घेऊं आला । कैसेनि अधिकारी तो झाला ॥ नव्हे सोंगादि नमी दादुला । भल कोणाचा सांगाती ॥ ५ ॥ मग म्हणे वांकुल्या दावा यासी । न पवे भाग कृत्रिम वेषीं ॥ तुम्ही सेवा रे सावकाशी । आजिचिया सुखासी पार नाहीं ॥ ६ ॥ ऐसे जेविले समस्त । ब्रह्मा राहिला टोकत ॥ निळा म्हणे हा हृद्गत । जाणे सकळां अंतरिंचें ॥ ७ ॥

॥ २३७ ॥ ब्रह्मा विचार करी मनीं । ठकडा मोठा हा चक्रपाणी ॥ आतां येईल आंचवणी । तेथें उच्छिष्ट स्विकारूं ॥ १ ॥ एकचि सित उदंड याचें । पोटभरणें नाहीं साचें ॥ वचन पुजणें नारदाचे । म्हणोनी विरोळा झाला डोहीं ॥ २ ॥ तंव गोवळासी म्हणे श्रीकृष्ण । आजिचिया जेवणा आंचवण ॥ न घेईं तो आम्हां सज्जन । जिवलग प्राण निजाचा ॥ ३ ॥ गोवळ म्हणती भला भला । मनींचाची हेत जाणीतला ॥ आजिचिया धणी जोजो धाला । तो तो पावला समाधीसुखा ॥ ४ ॥ ऐसें बोलोनियां गोवळ । बैसले आत्मस्थितींची निश्चळ ॥ तंव ब्रह्मा डोहीं करी तळमळ । कां पां न येती चि आझुनी ॥ ५ ॥ मग डोकाउनी बाहेरी पाहे । मागती जळीं लीन होये ॥ म्हणे मी ब्रह्मा आणि विचंबला ठाय । धिग महत्व तें

माझें ॥ ६ ॥ चोरुनियां वत्सें गोवळ । नेऊं आडवूं हा गोपाळ ॥ सत्ताबळें घेउनी कवळ । मग ते देऊं याचे या ॥ ७ ॥ ऐसें विचारुनियां परमेष्ठी । राहिला निश्चळ कातरदृष्टी ॥ निळा ह्मणे हेंही जगजेठी । कळलें ह्मद्गत तयाचें ॥ ८ ॥

॥ २३८ ॥ यावरी म्हणे सवंगडियासी । वत्सें फांकलीं रे चौपासी ॥ वळुनी आणा धांवा सांसी । मग सावकासि बैसा सुखें ॥ १ ॥ तंव ते म्हणती हो वनमाळी । आजिचि वळती तुमची पाळी ॥ जाउनियां तूंचि सांभाळीं । आम्ही निष्काम आजिचेनी ॥ २ ॥ तुझिया शेषाची हे नवलाई । देहभाव आम्हा नुरेचि देहीं ॥ जाणें येणें कैचें काई । राहिलों ठायीं निश्चळपणें ॥ ३ ॥ देव म्हणे हे पावले खुणे । गडी माझे झाले शहाणे ॥ समाधी सर्वही गुणें । काय चतुराननें कीजे यांचें ॥ ४ ॥ यांचिये संगतीं वत्सें धालीं । ब्रम्हसुखातें पावलीं ॥ वियोगवार्ता नेणती भुली । निजस्थिती राहिली स्वरुपींची ॥ ५ ॥ ऐसें जाणोनियां श्रीपती । ह्मणे मी जातों आजिचे वळती ॥ तुम्ही निश्चळ रहा वृत्ती । कोणी सांगाती फांकों नका ॥ ६ ॥ निळा ह्मणे सांगोनी ऐसें । मोहरी पावा घेतला हर्षें ॥ वादन करितांचि पूर्व दिशे । वत्सेंहिं सांडुनी चालिला ॥ ७ ॥

॥ २३९ ॥ दुरी फांकला हा श्रीहरी । ब्रह्मया जाणवलें अंतरीं ॥ मग धांवोनि झडकरी । वत्सें गोवळें उचलिलीं ॥ १ ॥ ते तो होती समाधिस्थ । ब्रह्मा नेतो हें नेणती चि मात ॥ मग ते नेउनियां समस्त । सत्यलोकीं बैसविलीं ॥ २ ॥ यावरी येउनियां श्रीरंग । पाहे तंव न दिसे संग ॥ भलें झालें ह्मणतुसे मग । अवघे आपणचि हो सरला ॥ ३ ॥ ब्रह्मा आडवूं पाहे मज । तरी मी सांडीन त्याची पैज ॥ ऐसें म्हणोनियां श्रीराज । वैष्णवी माया विस्तारिली ॥ ४ ॥ आपण वत्सें आपण गोवळ । मोहऱ्या पावे घोंगडीं सकळ ॥ काठ्या पावे पाईतणे मेळ । झाला ते केवळ एकला एक ॥ ५ ॥ लुडे खुडे मुडके कान । गोरे सांवळे राजीवनयन ॥ बोलिका तोतिरे म्लान वदन । दैदिप्यमान तोही झाला ॥ ६ ॥ निळा ह्मणे होतें तैसें । होउनी ठेला तेवढेंचि जैसें ॥ नव्हती पाहिले कोणी ऐसे । ओळखोंचि नेणती अवलोकितां ॥ ७ ॥

॥ २४० ॥ तैशींच वत्सें जिचीं जैसीं । होतीं होउनी ठेला तैसीं ॥

मिसकीणे लातिरी । एके खाविरी डिंविरी ॥ एके अचपळें काविरी । झाला श्रीहरि सर्व रूपें ॥ २ ॥ देखतां गाईसी फुटे पान्हा । घरिंचिया लोभ उपजे मना ॥ ऐसें स्वरुपें होउनी नाना । खेळे वृंदावना चौपासी ॥ ३ ॥ येउनी ब्रह्मा पाहे डोळां । तंव पहिलीया ऐसाचि सोहळा ॥ ध्वजा कुंचे घागरमाळा । तोरणें पताका उभविलीया ॥ ४ ॥ सिंगें काहाळा मोहऱ्या पावे । गोवळ नाचताती सुहावे ॥ वरी धरुनियां चांदिवे । भोंवती खिल्लारें वत्साचीं ॥ ५ ॥ ब्रम्हा म्हणे आणिलीं केव्हां । म्यां तो लपविलीं होतीं एकिसवा ॥ जाउनियां पाहे तंव तो मेळवा । जेथिल तेथें तैसाची ॥ ६ ॥ निळा म्हणे लाविलें पिसें । ब्रम्हया येण्याजाण्याचाचि वळसे ॥ मग लज्जित होउनियां मानसें । करीत स्तवनें श्रीहरिचीं ॥ ७ ॥

॥ २४१ ॥ तंव कृष्णाभोंवते गोवळ । भासती चतुर्मुखचि सकळ ॥ करीत वेदघोष कल्लोळ । पदें क्रमें निरुक्तें ॥ १ ॥ ब्रह्मा ह्मणे हें नवल झालें । ते तेथिल येथें हे कोठुनी आले ॥ चतुर्मुखहि दिसती भले । न कळे महिमान श्रीहरिचें ॥ २ ॥ मग जोडुनियां पाणीतळ । चरणीं ठेऊं इच्छी निढळ ॥ त्राहें त्राहें जि मी केवळ। दास डिंगर कृष्णा तुझा ॥३ ॥ ऐसा एक संवत्सर। करीत होता नमस्कार ॥ ह्मणे वत्सें आणि कुमर । आणवाल तरी आणितों ॥ ४ ॥ इकडे कृष्ण गोवळमेळीं । आपणासवें आपण धुमाळी ॥ खेळत आला पर्वतातळीं । आणि वत्समुखें हुंबरला ॥ ५ ॥ चरतां पर्वत मस्तकीं गाई । ऐकोनी हुंकारल्या ते ठायीं ॥ मग उड्या घालुनियां पाही । पाजविती पान्हा वत्सासीं ॥ ६ ॥ निळा ह्मणे जगत्रयजीवन । वत्सें झाला असे आपण ॥ यालागीं स्नेहाचें महिमान । अधिका अधिक गाई पोटीं ॥ ७ ॥

॥ २४२ ॥ गवळी होते राखणाईत । ते ते ह्मणती झाला घात ॥ गाई बुजाल्या अकस्मात । पडणपात त्यां झाला ॥ १ ॥ मग ते आले पायवाटा । पाहाती गाई तंव सुभटा ॥ वत्सें पान्हा घेती घटघटा । पूर लोटले क्षीराचे ॥ २ ॥ नेणों क्षीरसिंधु सोहळा । पाहों आला कृष्णलीळा ॥ तेणें क्षीराचिया सुकाळा । केलें वत्सा आणि गौळियां ॥ ३ ॥ ऐसा झाला संध्याकाळ । तंव पातले गौळणींचे मेळ ॥ सांजवणी दुडिया घेउनि सकळ । करित गायनें सुस्वरें ॥ ४ ॥ गौळी ह्मणती पिंजल्या गाई । गोविंद ह्मणे दोहा साही ॥ आजि दुधासी उणेंचि नाहीं । न पुरती पात्रें तैसिचि क्षीरें

॥ ५ ॥ गोवळ आपुलालीये घरीं । रात्रीं वसती सुखशेजारी ॥ दिवसा जाती वनांतरीं । वत्सापाठीं हरिसंगें ॥ ६ ॥ निळा ह्मणे चतुरानन । आला गोवत्सें घेऊन ॥ ह्मणे नेणतां महिमान । चुकी झाली क्षमा कीजे ॥ ७ ॥

॥ २४३ ॥ तंव ते आणिले मागिले गोपाळ । सारिखेंचि धैर्य वीर्य प्रतापबळ ॥ हें देखोनियां विस्मित सकळ । ह्मणती द्विविध कैसेनि हे झाले ॥ १ ॥ तैसेचि वत्सें दोनी दोनी । एकएक गाईलागुनी ॥ सुखें पिऊं देती स्तनीं । आणि दुभती वोरसोनी यथेष्ट ॥ २ ॥ तंव ते आसुमाई गोटी । होती अघासुराचि पोटी ॥ तेचि सांगती वडिलावोटी । ह्मणती नवल वितलें ॥ ३ ॥ आजि आह्मां अवघियां वनीं । घातलें होतें सर्पें वदनीं ॥ मागें होता सारंगपाणी । तेणें तो चिरुनी टाकिला ॥ ४ ॥ मग वत्सें आणि गोवळ । आह्मी वाहेरी पडिलों सकळ ॥ त्याचे पाहाहो करवाळ । रक्तें पूर वाहाती ॥ ५ ॥ नवल तें ऐकोनि कानीं । लोक चालिले पाहावया नयनीं ॥ तंव ते पडिले वाळोनी । गंगाओघा सारिखे ॥ ६ ॥ ये गोष्टीसी झालें वर्ष । गोवळां वाटे एकचि निमिष ॥ निळा ह्मणे सेविलें शेष । तेणें सर्वदा समाधी ॥ ७ ॥

॥ २४४ ॥ ऐशीं अगाध चरित्रें याचीं । वर्णितां भागला शेष विरंची ॥ लोक ह्मणती हा सर्प विलेंचि । कैसेनि पां वांचला ॥ १ ॥ मग त्यां सांगे नारायण । यासी गेलें वर्ष होउन ॥ गोवळ वत्सें ब्रह्मसदन । पावोनी होते बैसले ॥ २ ॥ कालिची ते आले येथें । ह्मणोनी सांगती नूतन वार्ते ॥ द्विगुणपणें हे कैसेनि तुमतें । प्राप्त झाले कां नेणा ॥ ३ ॥ ऐसें सांगतां श्रीहरी । अवघ्यां जाणवलें अंतरीं ॥ परम लाघविया मुरारी । खेळ खेळे विचित्र ॥ ४ ॥ अघासुरा वधिल्यावरी । पुढें धेनुका बोहरी ॥ कैसी केली याचि परी । तेंहि सुजाण परिसतु ॥ ५ ॥ एकैक याचें कथानक । श्रवण भवबंधा मोचक ॥ म्हणोनियां सात्विक लोक । हेंचि ऐकती अनुदिनी ॥ ६ ॥ निळा म्हणे हे बाळक्रीडा । परी परमार्थसाधनाचा हुंडा ॥ श्रवण मनन होतांचि फुडा । ब्रह्मसाक्षात्कार पाविजे ॥ ७ ॥

॥ २४५ ॥ वत्सें वत्सप वनांतरीं । माजि परमात्मा श्रीहरी ॥ खेळतां खेळ नानापरी । पुढें धेनुक देखिला ॥ १ ॥ सांगतां अंगींची बरव । मृणाळिके ऐसी लव ॥ शृंगें सुवर्णाची ठेव । रत्नापरी नयन दोन्ही ॥ २ ॥

कर्ण जैसीं केतकीदळें । अति राजस पादतळें ॥ खुर शोभती रातोत्पळें । जेंवि जडुनी ठेविलीं ॥ ३ ॥ चारी चरण कर्दळीस्तंभ । हृदयावकाशीं सुक्षम नभ ॥ पाठीवरी त्रिवेणी भांब । पुच्छ स्वयंभ शेषफणी ॥ ४ ॥ कांबळी लोंबे कंठातळीं । विद्युत्प्राय टिळकु भाळीं ॥ वोसंड लवथवित मांसमेळीं । देखतां नव्हाळी डोळियां ॥ ५ ॥ गोवळ म्हणती कृष्णा पाहें । नवल वृषभ आला आहे ॥ चुकारिचाचि नवल नाहे । न्यावा धरुनी मंदिरा ॥ ६ ॥ निळा म्हणे ऐकोनि हरी । दृष्टि घालुनियां सामोरी ॥ म्हणे धेनुक हा निर्धारी । आलासे मुक्ती मागावया ॥ ७ ॥

॥२४६॥ ऐसें विचारुनियां मनीं ।ह्मणे सौंगडीयां सारंगपाणी ॥ बैल चांगला दिसतो नयनीं ॥ परी धरूं कैसा देइल ॥ १ ॥ तुह्मी व्हारे पैलीकडे । दुरी परते वेघोनि हुडे ॥ चौताळतां हा चहूंकडे । करील रगडा सकळांचा ॥ २ ॥ ते ह्मणती बरें कृष्णा । परी तूं सांभाळीं हो आपणा ॥ ऐसें ह्मणोनियां पळती राणा । गिरिशिखरीं वैसले ॥ ३ ॥ मग कास घालुनी गोपीनाथ । चालिला पुढें चुचकारित ॥ तंव तो म्हणे आजी कार्यार्थ । बरा साधला एकांतीं ॥ ४ ॥ जवळी यावयाची वाट पाहे । उगाचि स्तब्ध उभा राहे ॥ हें जाणोनियां यादवराय । अंग राखोनी चमकतु ॥ ५ ॥ ऐसा आटोपिला हरी । तंव तो मायावी आसुरी ॥ धाविन्नला तयावरी । शिंगें पसरुनी विस्तीर्णें ॥ ६ ॥ निळा म्हणे फुंपात उठी । चौताळ लागे पाठीं ॥ तंव हा परमात्मा जगजेठी । गांठी पडों नेदीचि ॥ ७ ॥

॥ २४७ ॥ शृंगे पसरिले जैसे शूळ । नेत्रींहुनि निघती ज्वाळ ॥ श्वासरंध्रीं धूम्रकल्लोळ । डरकिया अंतराळ दुमदुमितो ॥ १ ॥ मागें सरे पुढें धांवे । आडवाचि उडे उंचउंचावे ॥ ऐशीं दाउनियां लाघवें । हरिसन्निध पातला ॥ २ ॥ देव हाणे मुष्टीघातें । तेणें आर्डाय दुखवोनि तेथें ॥ सवेंचि सरसावोनियां वरिते । उपसों धांवे गोविंदा ॥ ३ ॥ दोघां मांडलें महार्णव । दाविती बळ प्रौढी गौरव ॥ मग धेनुकें करुनियां माव । कृष्णातळीं संचरला ॥ ४ ॥ येरें रगडुनी तेथेंचि धरिला । दोहीं शिंगीं हात घातला ॥ मग ते उपटुनी त्राहाटिला । निघात घातें खडकावरी ॥ ५ ॥ ऐसा करुनियां शतचूर्ण । रक्त मांस त्वचा भिन्न ॥ अस्ति तिळप्राय होऊन । गेल्या उडोनी दाहिदिशा ॥ ६ ॥ निळा ह्मणे ऐशियापरी ।

धेनुका मुक्तीची सिदोरी ॥ देउनी पाठविला श्रीहरी। आपुलिया निजधामा सुखवस्ती ॥ ७ ॥

॥ २४८ ॥ हें देखोनियां गोवळ । आले धांवोनियां ते सकळ ॥ कृष्णासी ह्मणती युद्ध तुंबळ । केलें तुवां वृषभेसी ॥ १ ॥ आह्मी देखिलें दुरुनी । होतों डोंगरीं बसोनी ॥ तो बैल नव्हे आह्मांलागुनी । कृष्णा कोण तो सांग पां ॥ २ ॥ येरु ह्मणे तो असुरु । तुह्मां भासला होता ढोरु ॥ कौंसरायाचा तो हेरु । जाता वधुनी सकळांतें ॥ ३ ॥ ऐसा जाणोनियां निभ्रांत । शांति पावविला तो आतां ॥ तुह्मी भयातें न धरितां । सुखें विचरा मत्संगें ॥ ४ ॥ माझिये भजनीं जे राहाती । त्यांचिया विघ्नांची मी शांती ॥ करूनियां सुखविश्रांती । तयां अर्पी सर्व सिद्धी ॥ ५ ॥ ऐसें ऐकोनियां हरिवचन । संतोषले सकळही जन ॥ मग नमस्कारुनियां उभय चरण । गोकुळाप्रती चालिले ॥ ६ ॥ निळा ह्मणे सांगती वडिलां । वनीं वर्तमान जो देखिला ॥ धेनुकासुर तो निपातिला । आजि कृष्णें युद्धसंधीं ॥ ७ ॥

॥ २४९ ॥ पूर्वील कथा अनुसंधान । राहिलें होतें करितां कथन ॥ मतिविस्ताराचें महिमान । स्फूर्ति फांकोन वाहावली ॥ १ ॥ माभळभट गेलियावरी । कागासुर तो माव करी ॥ येउनियां गोकुळाभीतरी । बिंबवृक्षावरी बैसला ॥ २ ॥ ह्मणे फोडुनियां दोन्ही डोळे । बाळका करीन मी आंधळें ॥ चुंचिघातें कंठनाळें । फोडीन वक्षस्थळीं बैसोनी ॥ ३ ॥ काय करील तें लेंकरूं । मनुष्य मानवी ते ईतरु ॥ आम्हां दैत्यांचा अहारु । कैसेनि येती ते मजपुढें ॥ ४ ॥ कौंसाचिये आज्ञेभेणें । करितों मनुष्यांचीं संरक्षणें ॥ आतां तो प्रेरिलेसे तेणें । आड आलिया निवटीन ॥ ५ ॥ आलिया त्याचिया कैवारा । आकळूं शकें मी इंद्रादिसुरां ॥ मज कोपलिया कृतांतवीरा । कोण सामोरा येऊं शके ॥ ६ ॥ निळा म्हणे ऐशिया मदें । मातला मनेसींचि अनुवादें ॥ कौंसा तोषवीन या आनंदें । प्रतीक्षा करी कृष्णाची ॥ ७ ॥

॥ २५० ॥ ऐसें जाणोनियां श्रीहरी । पाळखी निजविल्या रुदन करी ॥ न राहे अंकींही क्षणभरी । निजवितां सेजारी तैसाची ॥ १ ॥ काय करूं गे यशोदा ह्मणे । कां हें करिताहे रूदन ॥ दिठावलें माझें तान्हें । निंबलोणे

उतरी तया ॥ २ ॥ तरी न राहे रूदतां । अधिका अधिक आक्रंदतां ॥ यशोदा ह्मणे बाहेरी आतां । नेऊं तरी कोणीकडे ॥ ३ ॥ मग घेउनियां कडियेवरी । काग दाविला निंबावरी ॥ तया देखोनियां हास्य करी । मग ते सुंदरी हरिखली ॥ ४ ॥ ह्मणे निजउनियां येथें । करीन कामकाज भोंवतें ॥ ऐसें विचारुनियां चित्तें । ह्मणे कागातें अवलोकीं ॥ ५ ॥ ऐशापरी निजविला । क्षण एक काजकामीं गेला ॥ तंव काग तेथुनियां उठिला । झडपूं आला गोविंदा ॥ ६ ॥ देखोनी यशोदा घाबरी । हाहाकार केला इतरीं ॥ निळा ह्मणे तो असुरी । हरिचीवरी झेंपावला ॥ ७ ॥

॥ २५१ ॥ रूप विक्राळ भयानक । चुंचु वाढिले अधिका अधिक ॥ पक्ष पसरोनियां अधोमुख । रक्तवर्ण द्रिनेत्र ॥ १ ॥ क्रोधें झगटतां कृष्णशरिरीं । येरें पक्ष धरिले करीं ॥ उपटूनि सांडी पृथ्वीवरी । अपार वातें उसळले ॥ २ ॥ लोक मिळाले भोंवते । परी भितातीं देखोनियां त्यातें ॥ मग धरूनियां चुंचूतें । दोनी फाळीं करूं पाहे ॥ ३ ॥ अनंत हस्ताचा श्रीधर । काय ते काउळे किंकर ॥ परि तो मायावी असुर । खर्ग वोडणेसी ठाकला ॥ ४ ॥ कृष्णें लत्ताप्रहरें त्यासी । पाडियलें तोंडघसी ॥ धरूनियां निजकेशीं । आपणापाशीं ओढियला ॥ ५ ॥ दक्षिणकरें मुष्टिप्रहरीं । हाणितलें त्या शिरावरी ॥ मस्तक फुटतां मेंदूवरी । शोणित वाहे भडभडा ॥ ६ ॥ निळा ह्मणे दीर्घपापी । कागरूपिया अतिविकल्पी ॥ परि हा परमात्मा पुण्यप्रतापी । मोक्षपदासी पाठविला ॥ ७ ॥

॥ २५२ ॥ मग धांवोनियां यशोदा । हृदयीं आळंगी गोविंदा ॥ बारे तूतें अरिष्टेंची सदा । जें पासुनी जन्मलासी ॥ १ ॥ प्रथम पूतनेचा घात । दुजा भटाचा विपरितार्थ ॥ तिजा कागाचा हा अनर्थ । आम्हीं देखिला समस्तीं ॥ २ ॥ यावरी काय काय होईल । न कळे आह्मांतें तें पुढिल ॥ मागें शकटाचेंही नवल । मारिलेंचि होतें तुज कृष्णा ॥ ३ ॥ कैसे घरासचि पुसती । नाना परीचे उत्पात येती ॥ काय करूं रे श्रीपति । कैसा वांचसील काय जाणें ॥ ४ ॥ किती चिंता करूं खेद । मज हे न देखवती प्रमाद ॥ तंव गगनवाणीचे शब्द । ऐकती झाली निज कर्णीं ॥ ५ ॥ परमात्मा हा पूर्ण अवतार । उतरावया धराभार ॥ तुझीये उदरींचा कुमर । निवटिल असुर अपरमित ॥ ६ ॥ जे जे पापी अतुर्बळी । आहेत हे भूमंडळीं ॥ तितुकियांसिहि मांडुनी फळी । पाठवील सां यमपंथें ॥ ७ ॥

निळा ह्मणे ऐकोनि कानीं । यशोदा संतोषली मनीं ॥ टाळी पिटिली सकळही जनीं । थोर आश्चर्य वाटलें ॥ ८ ॥

॥ २५३ ॥ अवघे करुनी जयजयकार । हर्षें झाले सुखनिर्भर ॥ ह्मणती आतां वारंवार । भयसंकोच न धरावा ॥ १ ॥ तंव यशोदा ह्मणे पूर्वीही ऐसें । गर्गाचार्यें कथिलें विन्यासें ॥ राशिनक्षत्राचेनिया मिसें । उदंड भाषार्थ सांगितला ॥ २ ॥ पुढें वधील कौंसासुरा । सोडवील हा मातापितरां ॥ मथुरेसी उग्रसेना नृपवरा । भद्र सिंहासनीं बैसवील ॥ ३ ॥ करील धर्माचें पाळण । सकळ पांडवांचें संरक्षण ॥ भीमकीचेंही पाणिग्रहण । करील अरिवीरां मर्दुनी ॥ ४ ॥ वधूनियां भोमासुरा । सोळा सहस्र अंतःपुरा ॥ भणुनियां हा एकसरा । पुत्रापौत्रीं नांदेल ॥५॥ कौरवां वधील पांडवहातें । राज्यीं स्थापील हा धर्मातें ॥ उतरूनी भूभारातें । अवनी उत्फुल्लित करील ॥६॥ गोकुळींचिया नगरनारी । रंजवील हा नानापरी ॥ गोवळ गाईचा मनोहरी । क्रीडा करील कौतुकें ॥७॥ अतुर्बळिया नारायण । यशोदे तुझा हा नंदन ॥ नाटकी कौसाल कान्ह । करील पवाडे अगणित ॥ ८ ॥ निळा ह्मणे ते प्रसंगीं । स्मरलें अवघें यशोदेलागीं ॥ मग नाना वस्तु पदार्थ चांगी । वरुनी सांडी श्रीकृष्णा ॥ ९ ॥

॥ २५४ ॥ यावरी बगासुराची कथा । विचित्र आहे ते ऐकतां ॥ कृष्णकरें पावोनि घाता । महामुक्तीतें वरील ॥ १ ॥ मग तो बगरूपिया असुर । ध्यानस्त यमुनातीरीं स्थिर ॥ झांकुनियां उभय नेत्र । एकाचि पायावरी उभा ॥ २ ॥ कृष्णघातावरी चित्त । मनीं चिंतुनियां तिष्ठत ॥ ह्मणे केव्हां देखेन तो येथ । येतां खेळत जवळी कैं ॥ ३ ॥ बाळलीळे येतांचि जवळी । गटकाळीन जेवि मासोळी ॥ हें जाणोनियां वनमाळी । आला खेळिमेळीं गडियांसवें ॥ ४ ॥ तंव तो पक्षिया देखिला कैसा । राजहंस कां सरोवरींचा जैसा ॥ शोभायमान निश्चळ ऐसा । लेंकरें ह्मणती चला धरूं ॥ ५ ॥ कृष्ण ह्मणे रे पक्षी क्रूर । नका जाऊं त्यासमोर ॥ मत्स्याहारी महा निष्ठुर । पापकर्मा दुरात्मा ॥ ६ ॥ तुह्मी रहा एकीकडे । मागेंचि लपोनियां गडे ॥ जाउनी मी पाहातों पुढें । उघडितो नेत्र कीं नाहीं ॥ ७ ॥ पहा लपत लपतचि जातों । आणि देईल धरूं तरी आणितों ॥ परि तुह्मी करा जें सांगतों । दुरिची असा पैलाडी ॥ ८ ॥ तंव पानवथाचे अवघे लोक । पाहाती कृष्णाचें कौतुक ॥ ह्मणती नंदाचा

हा बाळक । पाहारे कैसा पिलंगतो ॥ ९ ॥ निळा ह्मणे जैसा चित्ता । हरणी देखोनियां तत्वता ॥ सुरके भूमिची आतौता । तैसाचि हाही वेग करी ॥१०॥

॥ २५५ ॥ त्याचिपरी हा मुरारी । पसरला न दिसेचि ऐसा दुरी ॥ चालतू उरगाचिया परी । परि तो असुरी लक्षित ॥ १ ॥ येतां देखोनियां कृष्णासीं । दैत्य हारखला मानसीं ॥ ह्मणे साधुनियां निजकार्यासी । जाईन अति त्वरेंसी उडोनियां ॥ २ ॥ ऐसें विचारुनियां मानसीं । पक्ष झाडी अति आवेशी ॥ ह्मणे कौंसाचिया पुण्यराशी । झालिया सन्मुख या काळें ॥ ३ ॥ आतां गिळुनियां नंदकुमारा । खोवीन मस्तकीं यशाचा तुरा ॥ मात जाणवीन राजेश्वरा । मथुरेसी जाउनी उल्हासें ॥ ४ ॥ ह्मणेन आतां राहें सुखी । माझिया बळें तूं इह लोकीं ॥ तोपवीन नृपति पुण्यलोकीं । आह्मा पाळक दैत्यांचा ॥ ५ ॥ परी हा मृत्युचि आला हें नेणतु । वृथाचि मनोरथ वाढवितु ॥ आपआपणासिची श्लाघवितु । महा मूर्ख तो पापराशी ॥ ६ ॥ मग अति आवेशें धांविला । कृष्णा झगटावया पातला ॥ तंव तो तेणें आसुडिला । तोंडघसी पडिला चरणातळीं ॥ ७ ॥ पक्ष धरुनियां दोहीं हातें । उपटुनियां सांडिले परौते ॥ लीला करुनियां गोपिनाथें । चरणघातें तुडविला ॥ ८ ॥ ऐशियापरी घाबिरा केला । चुंचीं धरूनियां घोळसिला ॥ ह्मणे मायाविया दाखवी आला । माया प्रतापु या काळें ॥९॥ बहुत दिवस मामाचें अन्न । भक्षिलें झाडा तो घेईन ॥ आजि मृत्युपंथें पाठवीन । गौरव करून ताडणाचा ॥ १० ॥ ऐसें बोलोनियां श्रीहरी । सोडिला तंव तो दीर्घ स्वरीं ॥ गर्जोनियां कृष्णावरी । अति तवकें उठीला ॥ ११ ॥ आधिच तंव तो निशाचर । रूप धरूनियां भयंकर ॥ कृष्णा गिळावया सत्वर । मुख पसरुनी धांविला ॥ १२ ॥ हें देखोनी लोक ह्मणती । गिळिला गिळिला रे श्रीपती ॥ वेगीं जाउनियां नंदाप्रती । मात जाणवा दसवंतिये ॥ १३ ॥ ऐसा झाला हाहाकार । कृष्णें तेचि क्षणीं अति सत्वर ॥ फोडुनियां भांडे दंतावळि चुर । करूनियां पाडिला ॥ १४ ॥ मग रगडुनियां पादघातें । मुरगाळिली मुंडी हातें ॥ दैत्य त्यागितां निज देहातें । शब्द केला अचाट ॥ १५ ॥ ह्मणे धांव धांव कौंसासुरा । तुझिये काजीं वेंचलों पुरा ॥ निळा ह्मणे मग सारंगधरा । वरुनी प्राणा ओंवाळिले ॥ १६ ॥

॥ २५६ ॥ यापरी करुनियां त्याची गती । निज धामा पाठविला

श्रीपती ॥ लोकही विस्मय पावोनि चित्तीं । न कळे ह्मणती हरिलीळा ॥ १ ॥ हाचि ईशाचाही ईश । जगाचा आदी हा जगदीश ॥ येथें दिसतो मानुषवेष । परि हा अध्यक्ष भुवनत्रया ॥ २ ॥ याचिया चरित्राची नवाई । एकेक सांगावी किती काई ॥ अगाधपणेंचि बाळत्वही । प्रथमचि पूतना शोषिली ॥ ३ ॥ पाठी माभळभटासी पिंडेदान । शकट पादघातेंचि उडवून ॥ यावरी कागबग निर्दाळून । रिठासुरा चाऊन सांडियेला ॥ ४ ॥ आघासुरही वनीं चिरिला । वत्सासुर तो धोपटिला ॥ धेनुक प्राणेसी विघडविला । तृणावृत लाविला मृत्युपंथें ॥ ५ ॥ ऐसी दिव्य चरित्राचिया खाणी । उघडिलिया येणें बाळपणीं ॥ पुढें जें करील तेंही नयनीं । पाहों आइकों निवाडे ॥ ६ ॥ निळा ह्मणे ऐसे जन । गोकुळींचे विस्मयापन्न ॥ पुढें केसियाचें आख्यान । तेंही सकळिक आइका ॥ ७ ॥

॥ २५७ ॥ अश्वरूपिया केसासूर । ठाणमाण अति सुंदर ॥ जैसा उच्चैश्रवा रहंवर । देवलोकीं इंद्राचा ॥ १ ॥ शोभिवंत तयाहुनी आगळा । असुमाई अवलोकितां डोळां ॥ पहावाचि ऐसा वेळोवेळां । आठवों नेदी आणिक ॥ २ ॥ शोधितांही सप्तद्वीपांतरु । नाढळेचि कोठें ऐसा वारु ॥ सुंदराहुनि अति सुंदरु । रूपें नागरु भुलवणा ॥ ३ ॥ दांडिमान कळाव्या डोळे । कर्ण जैसे केतकिदळें ॥ गुडघे सुंब मेजागळे । सर्वहि शृंगारमंडित ॥ ४ ॥ खोगिर जीन लगाम तोंडीं । इलाखे रिकेबियांची जोडी ॥ गाशा वागदोर दुमचिया दांडी । खुरुस नवरत्न खचितांचे ॥ ५ ॥ तंव संवगडियांसी खेळत । आले अकस्मात गोपीनाथ ॥ वारु देखोनि गडियां ह्मणत । पैल पहारे विचित्र तेजी ॥ ६ ॥ आह्मा रायें कंसासुरें । बैसावया अति आदरें ॥ धाडिलें हें वहन खरें । अनुवादिजे गडियासी ॥ ७ ॥ आतां यावरी घालुनी स्वारी । पाहों बैसोनियां घटिका चारी ॥ नये मना तरी माघारी । देऊं पाठउनी त्याचा त्या ॥ ८ ॥ परी तुह्मी राहोनियां दुरी । बैसोनि पहावें गोपुरावरी ॥ ऐसें सांगोनियां श्रीहरी । मग सांवरी आपणियां ॥ ९ ॥ आइता साज आहे वरी । रूपाकृती ही साजिरी ॥ मायावी हा जाणोनियां हरी । कास कासिली बळकट ॥ १० ॥ निळा ह्मणे मनोगत । आर्त केशियाचे उत्कंठित ॥ वरी बैसलिया कृष्णनाथ । नेईन दिगांता उडवुनी ॥ ११ ॥

॥ २५८ ॥ ह्मणोनियां तेथें उगाचि उभा । यावया जवळी पद्मनाभा ॥ तोहि सर्वसाक्षी वोथंबा । जाणे त्द्गत केशियाचें ॥ १ ॥ मग चालत

चालत मंजुळ चाली । हळु हळुचि गेला जवळी ॥ लगाम धरुनियां निज करतळीं । हातें कुरवाळी मुखांतरा ॥ २ ॥ मग रिकेबी देउनी पावो । चढला वरी यादवरावो ॥ हालों नेदितांचि नवलावो । घातला भार त्रिभुवनाचा ॥ ३ ॥ केशिया पाहे उडावया । तंव ओझें भारी नुचलवे पायां ॥ ह्मणे गेली व्यर्थचि माया । रचिलें एवढें लाघव तें ॥ ४ ॥ मग न चलवे ऐसें जाणोनि हरी । बरवा फोडिला चाबुकावरी ॥ केशिया त्दृदयींचि रुदन करी । ह्मणे घेतला प्राण निश्चयेंसी ॥ ५ ॥ हालों नेदीचि हा गोवळ । महाबळिया आमुचा काळ ॥ कृष्ण ह्मणे हें मुसळ । व्यर्थची पोसिलें बेटियानें ॥ ६ ॥ चारुनियां दाणा चारा । पुष्ट केला बहू थोर ॥ नाहीं मिनला चाबुकस्वार । तोंचिवरी शोभला ॥ ७ ॥ मग उतरला झडकरी । हातीं धरिली लगामदोरी ॥ तंव तो उपाई येउनियां वरी । हाणों धांवे टापेनें ॥ ८ ॥ मागें पेरवाळे झाडित । आडवाचि उडे मग कुकात ॥ तोंड पसरुनियां विचकी दांत । डसावया श्रीहरी ॥ ९ ॥ येरु आतळोंचि नेदी त्या अंगा । धरिलें आवरुनियां तुरंगा ॥ घायांतळीं आणुनि चांगा । ताडिला मुष्टिप्रहरें करूनी ॥ १० ॥ तेणेंचि तया आली तंव । ह्मणे कौंसा वेगीं धांव धांव ॥ वेंचलों जिवें करीं कणव । सोडवीं मज याच्या हातीं ॥ ११ ॥ तुझिया काजा वधावा हरी । ह्मणोनियां आलों येथवरी ॥ तंव हा लाघविया मुरारी । बैसला जिव्हारीं काय करूं ॥ १२ ॥ पायीं बांधोनियां टाकिलें । माझियाचि भूषणीं मज गोंविलें ॥ नाहीं अंतरीं हें मज कळलें । कैसें करूं त्दृदयासी ॥ १३ ॥ ऐसिया विलापें आक्रंदतां । प्राण सोडिले तत्वतां ॥ ह्मणे मी फिरोनियां मागुता । न येचि येथें श्रीकृष्णा ॥ १४ ॥ निळा ह्मणे ऐकोनी कृष्ण । ह्मणे वाग्देवी तुझी तुज प्रसन्न ॥ जा रे मुक्तिपदीं बैसोन । वस्ती करीं तेथें सुखें ॥ १५ ॥

॥ २५९ ॥ ऐसें केशियाचें हनन । केलें देखोनियां सकळ जन ॥ गोकुळींचे विस्मयापन्न । ह्मणती न कळे महिमान श्रीहरिचें ॥ १ ॥ कृत्रिम वेषिया तुरंगम । आला इच्छूनियां संग्राम ॥ कैसा जाणोनियां मेघःशाम । तयावरी सरसावला ॥ २ ॥ त्याची केलीचि कार्यसिद्धी । तोडूनियां आधिव्याधी ॥ बैसविला तो सभासंधी । मुक्तिस्थानीं मुक्तांचिये ॥ ३ ॥ वार्ता गेली कंसासुरा । मर्दिलें केशिया महाधीरा ॥ गोकुळीं आनंद नारीनरा । हर्षें साखरा वांटिती ॥ ४ ॥ कंस ह्मणे विपरीत भाग्य । झालें

ओढवलें उपसर्ग ॥ गेले माझे हे अंगलग । आतां विश्वास कोणाचा ॥ ५ ॥ गगन वाणी ऐकिली जेव्हां । सुत देवकीचा आठवा ॥ तोचि वधील दैत्यां सर्वां । तों हें विपरीत वर्तलें ॥ ६ ॥ गोकुळामाजि तुझा वैरी । नाहीं ऐकिलें हें भविष्यांतरीं ॥ एकचि वदली ते कुमारी । जे कां निष्टिली हातींची ॥ ७ ॥ व्यर्थचि पिडियेली देवकी । आणि वसुदेवही पुण्यश्लोकी ॥ होणार न चुकेचि कीं सेखीं । विघ्न आणिकचि उदेलें ॥ ८ ॥ निळा ह्मणे ऐसिया परी । कंस निमग्न दुःखसागरीं ॥ गेली ऐश्वर्याची थोरी । पडिला शरिरीं निचेष्टित ॥ ९ ॥

॥ २६० ॥ यावरी गौळणी सुंदरी । नेउनियां निजमंदिरीं ॥ खेळविती परमात्मया श्रीहरी । नाना उपचारीं पूजिती ॥ १ ॥ देउनियां चंदनउटी । केशरी टिळक लाविती ललाटीं ॥ नाना सुमनहार कंठीं । घालिती बरवंटी श्रीकृष्णा ॥ २ ॥ गुंफुनी सुमनटोप शिरीं । विचित्र तुरे खोंविती वरी ॥ लेवउनियां दिव्य आळंकारीं । वस्त्रें परिधानें गौरविती ॥ ३ ॥ एकी जाणविती विंजणवारा । एकी चवरी विंजिती सुंदरा ॥ ह्मणती वो नंदकुमरा । दासी आह्मी तुमचिया ॥ ४ ॥ शर्करा घृत परिपक्क लाडू । नाना स्वाद फळांचे घडू ॥ आणुनियां करिती सुरवाडू । कृष्ण वदनीं समर्पिती ॥ ५ ॥ एकी उचलुनियां कडिये घेती । एकी खांदिये बैसविती ॥ एकी हृदयींचि आळंगिती । चुंबन देती पैं एकी ॥ ६ ॥ निळा ह्मणे परब्रह्म सेजे । आवडी घेउनी निजती निजे ॥ ऐसिया सुखाचीं नाचती भोजें । परमात्मा आप्त झालिया ॥ ७ ॥

॥ २६१ ॥ आमुचा जिवलग सांगाती । जन्मोजन्मींचा हा श्रीपती ॥ एकीसवें एकी बोलती । आणि आळंगिती हृदयेंसी ॥ १ ॥ नाना परीच्या विनोदवार्ता । सांगती बोलविती अनंता ॥ तुझेनि भाग्यें भाग्यवंता । ह्मणती आह्मी संसारीं ॥ २ ॥ कृष्णा आत्मया सुखानंदा । परात्परा जी आनंदकंदा ॥ नित्या अचिंता अभेद्या । देवत्रया तूं वंद्य ॥ ३ ॥ ऐसा असोनियां आह्मां आरजा । खेळणें झालासी आजिच्या काजा ॥ धन्य आह्मीही गरुडध्वजा । तुझे पादपद्म देखतों ॥ ४ ॥ आणिखीही एक नवल थोर । परमात्मा तूं परात्पर ॥ आह्मांलागीं रूप साकार । आवडी ऐसेंचि धरियलें ॥ ५ ॥ कृष्णा ह्मणोनियां पाचारितां । वो ह्मणोनियां येसी धांवता ॥ येरवीं वेदाचियाही संमता । उरविसी रूप निर्धारीं ॥ ६ ॥

निळा ह्मणे ऐसिया प्रेमें । अनुसरल्या त्या भक्तिसंभ्रमें ॥ तैसेंचि जाणोनियां त्या परब्रह्में । पुरविले त्यांचे सोहळे ॥ ७ ॥

॥ २६२ ॥ मग त्या मिळोनियां सकळ जनीं । मध्यें बैसउनियां सारंगपाणी ॥ भोंवत्या खेळताती खेळणीं । नाचती नाचणीं गीतस्वरें ॥ १ ॥ कृष्णा ह्मणोनियां आळविती । मधुर स्वरें गायनें गाती ॥ तेणेंचि मिसें त्या कृष्णासि स्तविती । आणि रंजविती परमात्मया ॥ २ ॥ ह्मणती गे नंद यशोदेचें पुण्य । उरलें त्रैलोक्या पुरोन ॥ आह्मां झालें तें सुप्रसन्न । कृष्णाकृती या काळें ॥ ३ ॥ ह्मणोनियां जिवेंप्राणें । ओंवाळिती तनुमनें ॥ घालूनियां दिव्यासनें । वरी कृष्णातें बैसविती ॥ ४ ॥ करूनियां आनंद सोहळा । खेळती नानापरीच्या खेळा ॥ लई लई लखोटे पिंगे सकळा । फुगड्या घालिती निज बारें ॥ ५ ॥ हेटि मेटी कपाळ झेटी । पक्के घालिती नमन लल्लाटीं ॥ टोकर खडेही झेलिती बेटी । नाचती टिपरी घेउनियां ॥ ६ ॥ निळा ह्मणे ऐसियापरी । रंजविती जगदात्मयाहरी ॥ आणि घेउनियां अंकावरी । क्रीडा विनोदें खेळविती ॥ ७ ॥

॥ २६३ ॥ ह्मणती कृष्ण आवडे कैसा । जीवप्राण कापटिये जैसा ॥ एकी ह्मणती गे हा मानसा । भुलवणाचि सुंदरपणें ॥ १ ॥ यातें पाहों जातां दिठी । पहाते पहाणेंचि नुरे शेवटीं ॥ संचरोनियां हा पाठीपोटीं । करी आपणासारिखें ॥ २ ॥ वेधुचि लावियला मना । येणें गोविलें वो लोचना ॥ आमुच्या चित्ताचिया वासना । येणेंचि हिरोनियां घेतली ॥ ३ ॥ वाटे तयासिची परिचार । करुनी असावें निरंतर ॥ क्षणहि एक न व्हावा दूर । माया माहेर आमुचा हा ॥ ४ ॥ विनोद चर्चा याशींच करणें । आवडे कृष्णासीं बोलणें ॥ याविण दुजें नावडे मनें । हाचि पढिये सर्वस्व ॥ ५ ॥ न पडो याविण दुजें दृष्टी । नावडो याविण आणिखी गोष्टी ॥ विश्वआधि हा शेवटीं । पहावा पोटीं हेचि अवस्था ॥ ६ ॥ निळा म्हणे ऐशीं कृष्णें । हिरोनी घेतलियाचि मनें ॥ मग या राजीवलोचनें । मांडिलीं विंदानें आणिखी हीं ॥ ७ ॥

॥ २६४ ॥ घरीं आपुलिये मातेपाशीं । देखोनियां मागे शशी ॥ ह्मणे देईंवो खेळावयासी । आणुनी तो मज हातीं ॥ १ ॥ येरी ह्मणे परिसें ताता । गगनींचा तो नये हाता ॥ नको छळूं रे कृष्णनाथा । नाहीं तेंचि

येरी ह्मणे असाध्य तें असे । नाहींपणाचि सारिखें ॥ ३ ॥ राया घरींची संपदा । दुर्बळा घरीं कैची सदा ॥ येरु हांसोनियां गदगदा । मुखचंद्रातें दाखवितु ॥ ४ ॥ म्हणे पाहें दसवंतिये । हा गे जवळीच चंद्र आहे ॥ तारे तुटती लवलाहे । षोडशकळीं प्रकाशला ॥ ५ ॥ यशोदा म्हणे न कळे महिमा । तुझा आम्हां पुरुषोत्तमा ॥ दिठावसीलरे मेघःशामा । नको विंदानें करूं ऐसीं ॥ ६ ॥ निळा म्हणे ओंवाळून । सांडी वरुनी निंबलोण ॥ मग त्या वोसंगा घेउन । म्हणे भोजन करीं बापा ॥ ७ ॥

॥ २६५ ॥ मग वेसउनियां पाटावरी । ताटीं वाढिल्या नानापरी ॥ दूध दहीं तूप साय वरी । शर्करा तेही ठेवियली ॥ १ ॥ कृष्ण ह्मणे कालवीं आतां । जेववीं मज तें वो जेवितां ॥ येरी ह्मणे परिसें ताता । रुची त्याच्या भिन्नभिन्न ॥ २ ॥ येरु ह्मणे रसनायक । भिन्न कैचे वो आणिक ॥ येरी म्हणे तुझी एकैक । नवाईच शब्दाची ॥ ३ ॥ मग कालउनी एके ठायीं । ह्मणे कृष्णा आतां घेई ॥ येरु ह्मणे वेगळें देई । करुनियां हें ठाईचें ॥ ४ ॥ तंव ते ह्मणे नचले युक्ती । नको छळूं रे श्रीपती ॥ त्वांचि एकत्र करविलें अंतीं । मज कां ह्मणसी निवडीं हें ॥ ५ ॥ ऐसें कोणा आहे ज्ञान । मिश्रित झालें तें करीं भिन्न ॥ येरें पाल्वे झांकून । दाविले पदार्थ वेगळाले ॥ ६ ॥ निळा ह्मणे देखोनि माता । आश्चर्य मानी ते तत्वता ॥ ह्मणे याचिये हातीं सर्वही सत्ता । आहे सकळ विश्वाची ॥ ७ ॥

॥ २६७ ॥ यावरी गडियासी खेळत । आला यमुनेतीरा आंत ॥ क्रीडा करितां करितां आर्त । देखिलें ऐसें यमुनेचें ॥१॥ जैशा येउनियां गौळणी । कृष्णमुखीं घालिती लोणी ॥ मीचि अंतरलें गे पापिणी । होउनियां पाणी वाहातुसे ॥२॥ कृष्ण ह्मणे तुझिये पोटीं । आहे ती नवनिताचिया खोटी ॥ काढुनी गाळ तो जगजेठी । सुखें भक्षितु बैसला ॥ ३ ॥ हें देखोनियां ते गडे । ह्मणती बैसोनि एकीकडे ॥ माती खातो हा निवाडे । सांगों धांविले यशोदे ॥ ४ ॥ ह्मणती मृत्तिका आणुनी हरी । बैसला भक्षीत आवडी करी ॥ ऐसें ऐकोनियां सुंदरी । धांवली क्रोधें आवेशें ॥५॥ हातीं घेउनियां सिपुटी । आली जवळीकें नेहटी ॥ येरें देखोनियां ते दिठी । मृत्तिका लपउनी पळतुसे ॥ ६ ॥ निळा ह्मणे ह्मकारित । माया धांवे आटोपित ॥ नाटोपेचि मग ते ह्मणत । घरा आलिया ताडीन ॥ ७ ॥

॥ २६७ ॥ येरें शब्द ते ऐकोन । उभा ठाकला जगज्जीवन ॥ माता ह्मणे हे अवगुण । कां रे ऐसे करितोसी ॥ १ ॥ ठायीं वाढिलिया न जेविसी । आणि येथें माती खाशी ॥ येरु ह्मणे नाहीं ऐशी । प्रतिज्ञा मी दावीन ॥ २ ॥ तंव ते ह्मणे दावीं मुख । येरु ह्मणे तरी हें देख ॥ पाहे तंव माजी त्रैलोक्य । चंद्रसूर्य तारांगणें ॥ ३ ॥ मेरुकुळाचळ पर्वत । नदादि नदी-यांचे ओघ वहात ॥ सप्तहि सागर भरते येत । ऐसे देखत वदनामाजी ॥ ४ ॥ भोवंडी आली पहातां नयना । मग ह्मणे निमटी निमटी आतां वदना ॥ माव तुझी रे जगज्जीवना । न कळे चि आम्हां पराकृतां ॥ ५ ॥ मग धरूनियां तो करतळीं । आलिंगिला हृदयमेळीं ॥ विस्मयें दाटोनियां वेल्हाळी । आली घेउनी मंदिरा ॥ ६ ॥ निळा म्हणे सांगे लोकां । अपूर्व देखिलें म्यां कौतुका ॥ मृत्तिकामिसें माजी त्रैलोक्या । पाहिलें वदनीं हरिचीया ॥ ७ ॥

॥ २६८ ॥ गोवळसंगें चोरिया करी । शिकीं उतरुनीयां बाहेरी ॥ आणी फोडी आणि गोवळकरीं । कवळ देत लोणियाचे ॥ १ ॥ दूध तूप साय लोणी । दहीं हुडकुनियां आणी ॥ खाय लंवडी आणि पोरा लागुनी । देउनियां धणी सुखी करी ॥ २ ॥ देउनी समर्थ हा घेणार । सर्वां सर्वात्मा ईश्वर ॥ म्हणोनियां हा हुडकुनियां घर । आणी बाहेरी लपविलें ॥ ३ ॥ कोठेंहि उरों नेदिचि संचित । आणी बाहेरी ते अकस्मात ॥ वांटुनियां सौंगाडियां देत । आपणहि स्वीकारित त्यांच्या संगें ॥ ४ ॥ देखोनियां ते वृद्ध नारी । बोभाट करिती यशोदे द्वारीं ॥ म्हणती गे कुमरा आवरी । नव्हाडी केली गोरसाची ॥ ५ ॥ नित्य संवकलासे आमुचे घरीं । धांवोनी तो निशीच्या भरीं ॥ निद्रिस्त असतां सिकींचि उतरी । आणि गोवळां चारी गोरस ॥ ६ ॥ निळा म्हणे न सोसवे आतां । नित्य उपद्रव याचा होतां ॥ आणखीही गुह्य गोष्टी सांगतां । होईल लौकिक आमुचाची ॥ ७ ॥

॥ २६९ ॥ सुना कुमरी आमुचे घरीं । त्यांतेंही चाळउनियां निर्धारीं ॥ लोळे सेजे बाजावरी । आणखीही करी काय नेणों ॥ १ ॥ तयां नावडती ची भ्रतार । सासूसासरे भाऊ दिर ॥ करूनियां यासींचि परिचार । रतल्या निरंतर याचि संगें ॥ २ ॥ खातां जेवितां स्मरती यातें । लेतां नेसतां यापेंचि चित्तें ॥ कामकाजीं जैशी भ्रमितें । तैसिया उदास वर्तती ॥ ३ ॥ यशोदे याणेंचि लाविल्या चाळा । वेड्याचि केल्या सुनाबाळा ॥ देखतां

याचिया श्रीमुखकमळा । मग त्या नव्हतचि कोणाच्या ॥ ४ ॥ ऐसा चोर हा शिनळ । यशोदे आवरीं आपुला बाळ ॥ येणें बुडविलें आमुचें कुळ । न कळे आकळ खेळ याचा ॥ ५ ॥ सांगतां हे ऐशी गोष्टी । क्रोधचि उपजे तुझ्या पोटीं ॥ परी हा भला नव्हेचि शेवटीं । उभय कुळा बुडवणा ॥ ६ ॥ निळा म्हणे त्यांचीं वचनें । ऐकोनी यशोदा क्रोधें म्हणे ॥ काय गे बोल त्या माझें तान्हें । बाळक हें नेणें चोऱ्या करूं ॥ ७ ॥

॥ २७० ॥ नाहींचि तुम्हां भीडचाड । येथें करूं आल्याती बडबड ॥ कृष्ण माझा अवघ्यांसी गोड । तुम्हांसी कां गे वीट याचा ॥ १ ॥ जाऊं नेणेंचि बाहेरी । तयावरी घालितां गे तुम्ही चोरी ॥ आलगटा अवघ्याचि नारी । नसतींचि गाऱ्हाणीं आणितां ॥ २ ॥ घरीं काय त्या उणें झालें । जें तुम्हां घरीं दूध दहीं चोरिलें ॥ नेउनियां कोठें सांठविलें । कृष्ण खाणार तें किती ॥ ३ ॥ लेंकरूं माझें कोडिसवाणें । विकारमात्र कांहींची नेणे ॥ तयासी शिनळ चोर हें म्हणणें । फजीत पावणें आहे तुम्हां ॥ ४ ॥ जा गे आतां धरूनि आणा । खोटें शिनळिय येरी श्रीकृष्णा ॥ नाहीं तरी फजीतपणा । व्यर्थची पावाल या बोलीं ॥५॥ कृष्ण तो अंतर्बाह्य निर्मळ । जैसी का शुद्ध स्फटिक शिळ ॥ तया चोरियेचा लावितां मळ । जिव्हा काटतील तुमचिया ॥ ६ ॥ निळा म्हणे परिसोनी येरा । क्रोधेंचि चालिल्या आपुल्या घरा ॥ म्हणती चोरिये धरूनियां श्रीवरा । आणूं तैसाचि इयेपाशीं ॥ ७ ॥

॥ २७१ ॥ मग लाउनी सिंकिया चाहरी । बैसल्या जागत आपुल्या घरीं ॥ कवाडा आड आणि माजघरीं । सिंकिया जवळी भोंवताल्या ॥ १ ॥ पाटीये तळीं झांकोनी दीप । बैसल्या दवडोनियां झोंप ॥ तंव हा सच्चिदानंदस्वरूप । आला चोरिये त्याचि घरा ॥ २ ॥ गडी ठेऊनियां बाहेरी । चाहुली मारुनियां संचार करी ॥ तंव त्या सिंकियाचिया हारी । चांचपडतां सांपडल्या ॥ ३ ॥ तेणें हरिखेला अंतरीं । म्हणे आतां साधली चोरी ॥ बरा निवाड फावला वरी । निजल्या नारी नेणती ॥ ४ ॥ गोड चाखोनियां तें पाहे । हातोहातीं लांबवीत जाय ॥ दूध लोणी वरील साय । दहीं साजुक विरजलें ॥ ५ ॥ आपण खाये गडियां चारी । गोड आहे म्हणे हरी ॥ कुचकुचीतां हळुची करी । म्हणती बाहेरी निघावें ॥ ६ ॥ तंव साचल ऐकोनियां गौळणी । आवेशें धांविल्या अवघ्या जणीं ॥

दीप उघडिला तंव हा नयनीं । देखियला चोरियें भक्षितां ॥ ७ ॥ झडा घालुनियां वरी । कवळिला अवघ्या नारीं ॥ म्हणती कैसी करूनी चोरी । घरें आमुचीं बुडविलीं ॥ ८ ॥ निळा म्हणे बोलोनि ऐसें । चरणीं बांधती आवेशें ॥ तया कींव दावितुसे । म्हणे मी आलों भुलोनियां ॥९॥

॥ २७२ ॥ कालि माजुम घेतला होता । गडियांसवें म्यां नेणतां ॥ तेणेंचि आजि माझिया चित्ता । झाला विभ्रम ऐशापरी ॥ १ ॥ न यें सोडाल आजि तरी । तुमचे घरीं न करीं चोरी ॥ मस्तक ठेवितों पायांवरी । करा उपकार आजि मज ॥ २ ॥ एकी म्हणती विश्वास नाहीं । याचिया शब्दाचा वो कांहीं ॥ आजि सोडितां हा उद्यांही । ऐसेंचि करिल येउनी ॥ ३ ॥ अवघाचि चोरुनी गोरस । नित्य खातो सावकाश ॥ आमुचे घरीं नुरवी लेश । पहा माणसें रोडेलीं ॥ ४ ॥ आपुलिये हा सुटिकेसाठीं । उदंड सांगेल ऐशिया गोष्टी ॥ परि निष्ठुर आणि कपटी । या ऐसा नाहीं भूमंडळीं ॥ ५ ॥ आतां यासी न्यावें तेथें । यशोदे दावावें निरुतें ॥ तियेसि सत्य वाटत नव्हतें । फेडावा संदेह तियेचा ॥ ६ ॥ निळा म्हणे मग बांधोनी गळा । घुलकाविती अवघ्या बाळा ॥ गाळी वोपुनियां सकळा । आणिला धरुनी यशोदेपें ॥ ७ ॥

॥ २७३ ॥ म्हणती दसवंतीये देख देख । वोजे पाहें याचें मुख ॥ लोणी माखलें साजुक । आणि दहींही गिरबडलें तें वरी ॥ १ ॥ पाहे यशोदा जंव निर्धारीं । तंव माग देखे मुखावरी ॥ मग झडपिती अवघ्या नारी । कैसें बोलत होतीसी ॥ २ ॥ याचिपरी आमुच्या सुना । कुमारीही लाविल्या ध्याना ॥ सांगतां हें तुमच्या मना । सत्य नव्हतें वाटत ॥ ३ ॥ आतां शासन करिशील तरी । खोडी सांडील हा वो निर्धारीं ॥ नाहीं तरी नाकळे हरी । नित्य कलह तुम्हां आम्हां ॥ ४ ॥ लाडिका तरी बांध गळां । परी नको सोडूं हा मोकळा ॥ आम्ही उत्तीर्ण आपुल्या बोला । सांगोनियां या काळें ॥५ ॥ यावरी चोरिये देखतां । न सोडूं जिवें या तत्वता ॥ नेऊ-नियां निज एकांता । बांधों गांठीं जिवाचिये ॥ ६ ॥ येणें गोरसाची धुणी । करुनी फोडियेली दुधाणी ॥ त्याचाहि हिशेब तुज लागुनी । न देववे यशोदे सर्वथा ॥ ७ ॥ ऐसिया निकुरेसी त्या नारी । शिव्याहि देती तोंडचिवरी ॥ म्हणती यशोदे तुझी ही थोरीं । नुरेल यावरी जाणपां ॥ ८ ॥ निळा म्हणे

खादलें वित्त । देणें लागेल तुज तें सत्य ॥ ऐसेंहि दाउनियां संकेत । ताडिती कृष्णा निज करें ॥ ९ ॥

॥ २७४ ॥ देखोनि तें यशोदा ऐकोनि गोठी । क्रोधें संतप्त झाली पोटीं ॥ म्हणे हा चोरिया करितां महा हाटी । न राहेचि मी काय करूं ॥ १ ॥ किती तरी हे अपवाद । सोसूं जनाचे वेवाद ॥ उदंड सांगतांहि हा गोविंद । न संडिचि खोडी आपुली ॥ २ ॥ मग म्हणे तूं गोपाळा । न संडिशीची आपुला चाळा ॥ शिक्षा लावीन याचि वेळा । मग तूं शहाणा होशिल ॥ ३ ॥ यावरी नेदीं घरांत येऊं । तुजला न घालीं खाऊं जेऊं ॥ तुझिया खोडी माझा जिऊ । बहुत पिंतला या काळें ॥ ४ ॥ मग लाउनियां दावें गळां । नेऊनि बांधला त्या उखळा ॥ म्हणे न संडितां ऐसा चाळा । तुज सर्वथा न सोडीं ॥ ५ ॥ हांसती भोंवत्या अवघ्या नारी । म्हणती करिशील आतां चोरी ॥ नासिलें खादलें तें आजिवरी । फावलें ऐसें म्हणों नको ॥ ६ ॥ यावरी येशी आमुच्या घरा । चोरिये जरी दधीक्षीरा ॥ तरी नेउनियां कौंसासुरा । हातीं देऊं तुजलागीं ॥ ७ ॥ ऐसें बोलोनियां सुंदरा । गेल्या आपुलालिया मंदिरा ॥ यशोदा म्हणे रे चक्रधरा । घरीं काय उणें तुज ॥ ८ ॥ निळा ह्मणे बोले हरी । गोड न लागेचि तें निर्धारीं ॥ चोरियेचेंची आवडे भारी । करीन याहिवरी चोरिया ॥ ९ ॥

॥ २७५ ॥ ऐसें ऐकोनियां यशोदा । म्हणे तरी मी न सोडीं तूतें कदा ॥ अंतरलें काम माझा धंदा । राहें गोविंदा ऐसाचि ॥ १ ॥ बोलोनियां ते ऐसें गेली । आपुल्या कामावरी पडि झाली ॥ पुढें कृष्णें युक्ति केली । अति विचित्र ते ऐका ॥ २ ॥ मग त्या उपडुनियां उखळा । आला बाहेरी तया वेळा ॥ दावें तैसेंचि असतां गळां । उखळ आडकवी वृक्षेसी ॥ ३ ॥ विमलार्जुन कुबेरनंदन । नारदवचनें शाप पावोन ॥ होते राहिले वृक्ष होऊन । कृष्णचरणस्पर्शें उद्धरावया ॥ ४ ॥ त्याचें उदित झालें भाग्य । यालागीं येउनियां श्रीरंग ॥ करिते झाले तो प्रयोग । सावध मनें परियेसा ॥ ५ ॥ ते उभयतांहि शेजारी । वाढले होते दिव्य सहस्र वर्षेंवरी ॥ उंची पाहातां गगनोदरीं । शाखापल्लव डोलती ॥ ६ ॥ त्या उभयतां माजी उखळ । आडकउनी कृष्ण गोपाळ ॥ तया नेटीं देउनी चरणतळ । हेलावा देउनी उपटिले ॥ ७ ॥ तिहीं गर्जना केली कैसी । प्रळयकाळींची विद्युल्लता जैसी ॥ उद्धार पावोनियां हरिचरणासीं । वंदूनियां ते गेले ॥ ८ ॥ ऐको-

नियां तो घोषगजर । यशोदा धांवली अति सत्वर ॥ पाहे तंव तो सारंगधर । माजि वृक्षा पडियला ॥ ९ ॥ मग उचलुनियां करतळीं । आळंगिला हृदय मेळीं ॥ निढळ मेळउनी निढळीं । अवलोकी वदन क्षणक्षणा ॥ १० ॥ म्हणे भ्यालिसी गे माझी माय । थोर केला म्यां अन्याय ॥ उखळी बांधलीसी हा अपाय । थोर वरूनी चूकला ॥ ११ ॥ मग सोडुनियां कंठींचें दावें । मुख पुसी निज पल्लवें ॥ निळा ह्मणे याचीं लाघवें । नेणवतीचि ब्रह्मादिकां ॥ १२ ॥

॥ २७६ ॥ तेणें दणाणिलें गोकुळ । उतरंडीहि खचल्या सकळ ॥ धांविले गौळी आणि गोवळ । ह्मणती हा रवकल्लोळ कशाचा ॥ १ ॥ तंव ते देखती अवघे नयनीं । वृक्ष पडिले ते उन्मळोनी ॥ आश्चर्य करिती आपुलाले मनीं । ह्मणती हे कैसेनी उलंडले ॥ २ ॥ यशोदा सांगे तयांप्रती । बांधला होता म्यां श्रीपती ॥ तेणें येउनियां अवचिती । उखळ वृक्षाबुडीं अडकविलें ॥ ३ ॥ गौळणी सांगतां गाऱ्हाणें । मीहि संतापलें मनें ॥ तेणें गळा बांधोनियां तान्हें । उखळेंसीं म्यां गोविलें ॥ ४ ॥ गेलें आणिकिया कामासीं । कृष्णें उपडुनियां उखळासी ॥ वृक्ष मोडियले आवेशीं । माजी आपणही पडियेला ॥ ५ ॥ थोर चुकलें हें अरिष्ट । तळीं सांपडतां होता पिष्ट ॥ ऐसें बोलोनियां अदृष्ट । ताडी आपुलिया निज करें ॥ ६ ॥ निळा म्हणे घेउनी सासी । स्फुंदे यशोदा उकसाबुकसी ॥ ह्मणे माझिया हृषीकेशी । कोणीही देखों न शकती ॥ ७ ॥

॥ २७७ ॥ ह्मणे बा गौळणीचिया रागें । तुज म्यां बांधलें रे प्रसंगें ॥ तंव त्वां उपटुनियां श्रीरंगें । उखळ येथें आडकविलें ॥ १ ॥ परी तें नयेचि तुज उगवितां । म्हणोनियां बळें ओढिलें ताता ॥ तंव हे वृक्ष पडिले रे भाग्यवंता । अदृष्टें आमुच्या वांचलासी ॥२॥ मग त्या म्हणती गौळणी नारी । खेद न करीं वो सुंदरी ॥ त्वांचि हा परमात्मा श्रीहरी । मारिला होता निज हस्तें ॥३॥ गत गोष्टी काय ते आतां । न करीं यावरी जिवा परता ॥ उदंड गाऱ्हाणींही सांगतां । तूं तें तत्वता मानूं नको ॥ ४ ॥ आजिचाचि पाहें पां अनर्थ । केवढा चुकला अवचित घात ॥ अदृष्टाचा हा कृष्णनाथ । म्हणोनियां वांचला निज भाग्यें ॥ ५ ॥ आतां तरी सांभाळुनी । पहा हा भ्याला असेल मनीं ॥ हे केवढे वृक्ष पडिले अवनीं ।

घोर घोषें दणाणिले ॥ ६ ॥ निळा म्हणे यावरी यशोदा । पुसे भ्यालासी बा रे गोविंदा ॥ तंव तो हांसोनियां गदगदां । म्हणे मज भय कोणाचें ॥ ७ ॥

॥ २७८ ॥ देशें काळें वर्तमानें । न धरीं संकोच कांहीं मनें ॥ मी तों ऐसाचि हें शहाणे । जाणती सकळ सर्वद्रष्टे ॥ १ ॥ तंव तो आला अकस्मात । नारदमुनी गात नाचत ॥ वंदुनियां श्रीकृष्णनाथ । कीर्ति वर्णित कृष्णाची ॥ २ ॥ ह्मणे उद्धरिले विमलार्जुन । शापदग्ध हे कुबेरनंदन ॥ भविष्य जाणोनियां दर्शन । घ्यावया तुझें पातलों ॥ ३ ॥ परात्पर तूं परमानंद । योगी हृत्कमळींचा मकरंद ॥ सगुणरूपिया सच्चिदानंद । यशोदे अंकीं क्रीडसी ॥ ४ ॥ स्तवितां तूतें भागल्या श्रुती । मग त्या ठेलिया निवांती ॥ त्या गोपिकारूपें गोकुळा येती । तुजसीं अंगसंग करावया ॥ ५ ॥ मग नमुनी यशोदेप्रती । म्हणे धन्य तूं वो भाग्यवंती ॥ परमात्मा हा विश्वतोमूर्ती । तुझिये अंकीं विराजला ॥ ६ ॥ निळा म्हणे वदोनी ऐसें । नारद गेला निज उद्देशें ॥ यशोदा ऐकोनियां निज मानसें । परम संतोष पावली ॥ ७ ॥

॥ २७९ ॥ पुढें गाईचीं खिल्लारें । मागें गोवळ आपण भारें ॥ मुरलीवादन सप्तस्वरें । करीत चालत आनंदें ॥ १ ॥ पांवयाच्या तलालोरी । डफहुडूक त्या भीतरीं ॥ शंख कहाळा वाजवित कुसरी । गोवळ नाचती भोंवते ॥ २ ॥ गाई चरती पांगोनी वनीं । सुख संतोष चारा वदनीं ॥ कृष्णा दृष्टी अवलोकुनी । तृप्त जीवनीं यथाकाळें ॥ ३ ॥ सितळ छाया देखती जेथें । विलासें नाचत ठाकती तेथें ॥ टिपरी रुमाल घेउनी हातें । मोडिती अंगें नाना परी ॥ ४ ॥ हुतुतु हमामा विटीदांडू । सुरकाड्या लगोरिया घेउनी चेंडू ॥ झोंबिया घेउनी दाविती वाडू । आपुलालिया निज शक्ती ॥ ५ ॥ नाना उमाणी उगविती कोडी । सांगती काहाण्याही कडोविकडी ॥ गाती गाणीं अति आवडी । करिती उद्धार रागांचे ॥ ६ ॥ निळा ह्मणे माध्यान्ह काळीं । बैसोनी कळंबाचे तळीं ॥ काढिल्या सिदोऱ्या माजी वनमाळी । करिती आरोगणा स्वानंदें ॥ ७ ॥

॥ २८० ॥ गोवळ देती उष्टावळी । ह्मणती गोड हें वनमाळी ॥ घालूनियां श्रीमुख सा कमळीं । परम संतोषें स्वीकारी ॥ १ ॥ आवडीचें तेंचि तें गोड । भाव देखे ज्याचा वाड ॥ साचेंचि घे ये रानीं चाड । दांभीक अभिमानियांचें वोसंडी ॥ २ ॥ ऐसा करिती गदारोळ । घालिती येर-

येरा मुखीं कवळ ॥ ब्रह्मानंदाचा सुकाळ । हास्यविनोदें जेविती ॥ ३ ॥ नाना लवणशाखाच्या परी । नाना पत्रशाखा वाढिल्या वरी ॥ नाना अन्नाअन्नाच्या कुसरी । जेविती मुरारीसमवेत ॥ ४ ॥ ह्मणती आजच्या जेवणा । आह्मां श्रीहरी हा पाहुणा ॥ न ह्मणे उचिष्ट शिळें कोणा । अवधियांचें स्वीकारितु ॥ ५ ॥ ऐसे जेउनियां धाले । तंव गाईंचे कळप देखिले ॥ पाहती तंव नवल वर्तलें । बुजाल्या पळती जीवधाकें ॥ ६ ॥ निळा ह्मणे उठिला पाळा । अवलोकिती जो अवघे डोळां ॥ तंव त्या देखियल्या ज्वाळा । वणवा जळत चौफेरी ॥ ७ ॥

॥ २८१ ॥ पळावया न दिसे मार्ग । पक्षी जळताती भुजंग ॥ श्वापदांचे कोंडले तुंग । मृगव्याघ्रें कालवती ॥ १ ॥ वृक वराह पंचानन । ससे जंबुक सामर भेवन ॥ रानम्हैसे रोही हरीण । जीवधाकें मिसळती ॥ २ ॥ ज्वाळा लागती आकाशीं । धूम्रें कोंडिले रविशशी ॥ वृक्ष जळताती तेणें त्यासी । तडक फुटती सर्वांगीं ॥ ३ ॥ प्रचंड वाताचिया लोरीं । तुटती तेणें गगनोदरीं ॥ शिखा आंदोळती अंबरीं । तेणें फडत्कार वाजती ॥ ४ ॥ देखोनियां भ्याले सकळ । गवगविले अवघे गोवळ ॥ म्हणती आला अंतकाळ । गाई गोधना समवेत ॥ ५ ॥ ठिणगिया उडती असंख्यात । इंगळ येउनी पडती आंत ॥ आतां कैचा गोकुळप्रांत । मार्गचि नाहीं पळावया ॥ ६ ॥ निळा ह्मणे घालिती कंठीं । येरयेराचिया धांवोनी मिठी ॥ हें देखोनियां तो जगजेठी । ह्मणे रे कोणी भिऊं नका ॥ ७ ॥

॥ २८२ ॥ अग्नीची व्हावया शांती । उपाय आहे तुमच्याचि हातीं ॥ लावोनियां बैसा पातीं । डोळेची झांकुनी बळकट ॥ १ ॥ उघडे ठेवितां चेतेल वन्ही । मग तो नाटोपे आह्मां लागुनी ॥ सांडील अवघियांसीच जाळुनी । झांका ह्मणउनी निज नेत्र ॥ २ ॥ गोवळ ह्मणती कैसे डोळे । झांकउनी मारवितोसी रे सकळे ॥ येरू ह्मणे तुह्मां हें नकळे । तोटका या काळें ऐसाची ॥ ३ ॥ येथें न धरितांची विश्वास । जळाल अवघेही निःशेष ॥ ऐसें सांगोनियां त्यांस । डोळे निज करें धरविले ॥ ४ ॥ मग आपण वाढोनियां श्रीहरी । जहाला विराटरूपिया गगनवरी ॥ मुखपसरूनियां स्वासेंची करी । वोढियल्या अग्निज्वाळा ॥ ५ ॥ पोटीं घालुनियां दावानळ । जहाला पहिल्याचि ऐसा गोपाळ ॥ हें देखोनी अवघेची

गोवळ। बोटांसंधीं लक्षितां ॥ ६ ॥ तयां ह्मणे उघडा नेत्र । ऐकोनी बोलती ते सर्वत्र ॥ ह्मणती देखिलें हें चरित्र । तूंचि गगनवरी वादलासी ॥ ७ ॥ निजमुखें गिळिले ज्वाळ । तूंचि तूं काळाचाही काळ ॥ आजी देखिला तुझा खेळ । आह्मी आपुलिया निज दृष्टी ॥ ८ ॥ निळा ह्मणे बोलोनी ऐसें । लोळती पायांवरी उल्हासें ॥ मनीं जाणोनियां विश्वासें । हाचि परमात्मा ईश्वर ॥ ९ ॥

॥ २८३ ॥ नेत्र झांकविले ते हरी । कारण इतुलेंचि अभ्यंतरीं ॥ मज विराट झालियावरी । छळतील हे देखतां ॥ १ ॥ तंव ते भावार्थी चोखडे। त्यांणीं देखिलें तें निवाडें ॥ मग नाचती कृष्णापुढें । कीर्ति त्याची वर्णित ॥ २ ॥ ह्मणती मागेंही याचिपरी । केलीं चरित्रें तुवां हरी ॥ शोषिली पूतना निशाचरी । अघाबगांतें चिरिलें तें ॥ ३ ॥ तुझिये अंगीं सर्व कळा । नेतां ब्रह्मयानें आह्मां सकळां ॥ तैसेंचि होउनियां गोपाळा । दोहीं ठाईं राखिलें ॥ ४ ॥ आजि कळला तुझा महिमा । नेणतिया गोवळां जि आम्हां ॥ करीं अपराध आमुचे क्षमा । तुज उच्छिष्टें चारिलीं ते ॥ ५ ॥ वेड्या ह्मणोनी बोभाइलें । शिव्या देउनी आळविलें ॥ खेळतां डावहि मागितले । भांडण केलें नेणतां तुज ॥ ६ ॥ निळा ह्मणे सहस्रवरी । नमस्कार केले ऐसे हरी ॥ तेणेंचि तोषोनियां उत्तरीं । बोले तुह्मी सखे माझे ॥ ७ ॥

॥ २८४ ॥ ह्मणती आजि वांचलों जिवें । जवळी श्रीहरी होता सवें ॥ तंव ते गाईचे मेळावे । वाडियाकडे मोहरले ॥ १ ॥ मग ते चालिले गोवळ। वाजवीत वाद्यें खेळत खेळ ॥ शिंगें काहाळा घागरघोळ । चांदिवे ध्वजा उभारुनी ॥ २ ॥ ऐशिया परमानंदकल्लोळीं । गाई आलिया वाडिया जवळी ॥ तंव त्या गौळणीही सकळी । आलिया दुडिया घेउनी ॥ ३ ॥ गौळी वत्सा पाचारिती । गोधना दुहावेते करिती ॥ गाई सुरवाडें दुभती। वत्साहि पाजिती तृप्तीवरी ॥ ४ ॥ संवगडे ह्मणती चला घरा । जाऊं आतां सारंगधरा ॥ मग महा मोहच्छायें मंदिरा । चालिले गजरें मिरवत ॥ ५ ॥ तंव त्या तलगा गौळणी नारी । नानापरीच्या आरत्या करीं ॥ घेउनियां आत्मया श्रीहरी । ओंवाळिती निजभावें ॥ ६ ॥ विचित्र पुष्पांचिया माळा। आवडी घालिती हरीचिया गळां ॥ ऐसे मिरवत आले राउळा । येतां यशोदा देखिलें ॥ ७ ॥ तिणें करुनियां अक्षवाणें । ओंवाळिलें जिवें मनें ॥

तंव गोवळ बोलती बोलणें । झालें अपूर्व वनीं तें ॥ ८ ॥ निळा ह्मणे तें ऐकावया । निवाडें बैसली यशोदा माया ॥ गोवळ सांगती लागोनी पायां । थोर कौतुक देखिलें ॥ ९ ॥

॥ २८५ ॥ माते बळिया शिरोमणी । कृष्ण नाटक हा विंदानी ॥ आह्मां जळत जळतां वनीं । येणें रक्षिलें निमिषार्धें ॥ १ ॥ आह्मां जाळित आला वोणवा । विराटरूपी हा झाला तेव्हां ॥ मुखचि पसरुनियां अघवा । प्राशन केला दावानळ ॥ २ ॥ आह्मीं देखिलें तें नयनीं । दिव्य रूप याचें अवघ्या जणीं ॥ ऐसें ऐकोनियां ते जननी । परम आश्चर्यातें पावली ॥ ३ ॥ घरोघरीं हेचि वार्ता । विस्तारली गोवळ सांगतां ॥ एक ह्मणती हो श्रीअनंता । न ह्मणवी मानव यावरी ॥ ४ ॥ जे ते याचे अचाट खेळ । देखिले ऐकिले तुह्मीं ते सकळ ॥ कृष्ण हा परमात्मा केवळ । आह्मी मानूं आपुलाची ॥ ५ ॥ सकळांतरीं याचा वास । वसविले ते येणेंचि देश ॥ याविण रिताचि अवकाश । न दिसे कोठेंही धुंडितां ॥ ६ ॥ निळा ह्मणे प्रतीत ऐसी । बाणली गोवळां आदि सकळांसी ॥ मग ते तयातेंचि मानसीं । ध्याती पूजिती सर्वदा ॥ ७ ॥

॥ २८६ ॥ येरें दिवशीं घेउनी सवें । गोवळ खिल्लारांचे थवे ॥ यमुनातटाकीं नित्य नवे । खेळ खेळती विचित्र ॥ १ ॥ ह्मणे यारे चेंडूफळी । खेळों अवघे मिळोनी बळी ॥ ऐसें बोलोनियां वनमाळी । कास घालित नेटकी ॥ २ ॥ चेंडु घेउनियां श्रीहरी । हाणे डाव मागे वरी ॥ कान पिळा मग ते सारी । पाठीवरी बैसोनी ॥ ३ ॥ न सोडीची डाया तळीं येतां । मग तो हो कां कोणीहि भलता ॥ म्हणे विचारुनियां तत्वता । खेळा खेळ अवघेही ॥ ४ ॥ चिंतुनियां बरव्यापरी । चेंडू टाकीला कळंबावरी ॥ अडकलासा देखोनी हरी । अभ्यंतरीं संतोषला ॥ ५ ॥ होतें आधींचि आर्त मनीं । काळया आणावा नाथुनी ॥ मग म्हणे कैसेंरे करुनी । चेंडू तळीं उतरावा ॥ ६ ॥ निळा म्हणे म्हणती गडे । डोहो तळीं वृक्षही अवघड ॥ न धरीं कृष्णा याची चाड । करूं दुसरा नवा घरीं ॥ ७ ॥

॥ २८७ ॥ तंव सां ह्मणे रे गडिहो ऐका । उतरुनी हाचि आणूं निका ॥ असेल चपळ गडी जो नेटका । तेणें चढावें वृक्षावरी ॥ १ ॥ तंव ते ह्मणती नहो बाहेरी । आह्मी बळकट चढावया वरी ॥ वृक्षही उंच गगनोदरीं ।

डोहो भ्यासुर अक्षोभ हा ॥ २ ॥ ह्मणे गडिहो तरी तळींचि रहा । आणितों जाउनी चेंडू पहा ॥ ते ह्मणती रे अचपळा रहा । निमिस आह्मांवरी आणूं नको ॥ ३ ॥ एका दो कर्मी वांचलासी । तैसेंचि येथेंही पहातोसी॥ परी हे बुद्धी नव्हे ऐसी । वेळा सारिखिया नसताती ॥ ४ ॥ पाय निसरोनियां जाईल । अथवा खांची उपटी उपटेल ॥ हांसें इतरांचें होईल । आपणही जिवें घातावें ॥ ५ ॥ ऐसें न करिती शहाणे । विचारुनी पहाती सर्वगुणें ॥ मग हितावह तोचि धरणें । दृढ निश्चयें मानसीं ॥ ६ ॥ निळा ह्मणे सांगतां ऐसें । न मानिजे कृष्ण मानसें ॥ मनींचें कार्य जें अनारिसें । तें नेदिचि कळों कोणासी ॥ ७ ॥

॥ २८८ ॥ यावरी आपण वृक्षातळीं । जाउनियां वरी न्याहळी ॥ तंव ते ह्मणती अरे वनमाळी । आतुर बुद्धी करूं नको ॥ १ ॥ येथें हा आघाताचा ठावो । नेणसी तूं साचा भावो ॥ अणुमात्र निसरतां पावो । होईल निर्वाहो जीवित्वाचा ॥ २ ॥ आपुला घात दुर्जना हरिख । हें तो न करिती मूर्खही देख ॥ तुजपुढें तो शहाणे आणिक । नाढळेचि इये भुवनत्रयीं ॥ ३ ॥ नाइकोनियां आमुच्या उत्तरा । व्यर्थचि वेंचावें आत्मशरीरा ॥ दुःखी करुनी मातापितरां । समागमियां देशवटा ॥ ४ ॥ ऐसा विचार होईल हरी । नको चढों या वृक्षावरी ॥ ठेवितों तुझ्या पायांवरी । आह्मी सकळही मस्तक ॥ ५ ॥ परी तें नाइकोनियां कृष्ण । चढला वरी वैसे जाऊन ॥ तया ह्मणती अवघेजण । करीं हो सावधानपणें कार्य ॥ ६ ॥ तयांप्रति बहु बरें ह्मणे । जाणता त्रैलोक्याचे खुणे ॥ निळा ह्मणे चरित्र करणें । आहे दाखवणें तेंचि करी ॥ ७ ॥

॥ २८९ ॥ मग पाय ठेउनी खांदियेवरी । चेंडा झेंपावला हरी ॥ ऐसें देखोनियां इतरीं । केला कोल्हाळ खालुता ॥ १ ॥ ह्मणती रे नको नको हरी । जाऊं तिये खांदियेवरी ॥ आह्मां तुझी आई घरीं । गांजील ऐसें करूं नको ॥ २ ॥ तयांप्रती ह्मणोनी बरें । खांदी मोडियली भारें ॥ ते आपण एकचि सरें । पडियेला डोहांत ॥ ३ ॥ देखोनियां तें अवघे गडी । शंख करिती थडोथडी ॥ अंगें घालुनियां गडबडी । लोळती भुई आक्रंदत ॥ ४ ॥ ह्मणती गेला गेला रे महदाश्रय । तयाविण आह्मी पोरटीं काय ॥ नाहीं दावावया ठाय । तोंड आतां कोणीकडे ॥ ५ ॥ कांय ह्मणेल ते दसवंती ; लोकही आह्मां फजित करिती ॥ ह्मणती कां जाऊं

दिला श्रीपती । तुह्मीं तया झाडावरी ॥ ६ ॥ हाणोनी घेती उरावरी । मस्तका ताडिती निज करीं ॥ गाई हांबरडे हाणती वरी । दुःख भारी न सोसवे ॥ ७ ॥ गांवामाजी गेली वार्ता । लोकही धांविले ऐकतां ॥ नंद यशोदे प्राणांत अवस्था । हो सरली तेचि क्षणीं ॥ ८ ॥ घरोघरीं हाहाकार । शोक करिती नारी नर ॥ ठाकूनी आलीं तीर । तंव तो कहार गोवळांचा ॥ ९ ॥ यशोदा ह्मणे दावा हरी । केउता गेला गे मुरारी ॥ नंद ही दीर्घ रुदन करी । ह्मणे हारपला गोविंद ॥ १० ॥ दरिद्रिया हातीं रत्न । लागलें न थरे करितां यत्न ॥ तैसी परी झाली ह्मणोन । नंद लोळे गडबडां ॥ ११ ॥ असो तो दुःखार्णव सांगतां । पाषाण फुटती तत्वता ॥ मग संबोखुनियां उभयतां । लोक घेउनी घरा आले ॥ १२ ॥ एका कृष्णाविण नगर । ओस दिसे भयंकर ॥ दुःखार्णवीं नारी नर । पडिले तैसेचि मातापिता ॥ १३ ॥ निळा ह्मणे इकडे हरी । रिघोनियां सर्प विवरीं ॥ विखार काढिला बाहेरी । काळया तो नाथुनी ॥ १४ ॥

॥ २९० ॥ सप्त अहोरात्र होतां । तेथें कृष्ण जळा आतौता ॥ सांगतां युद्धाची ते वार्ता । सर्पीं विखारीं वेष्टिला ॥ १ ॥ बोलिला उदंड विरुद्ध वचनें । युद्धहि केलें अति सत्राणें ॥ परी या त्रैलोक्यजीवनें । लाविली दोरी तया नाकीं ॥ २ ॥ मग धरूनियां तें करीं । केलं नृत्य पृष्ठीवरी ॥ सवेंचि आणिला बाहेरी । आपण वरी बैसोनियां ॥ ३ ॥ देखोनियां अवघे गडी । हर्षें नाचती बागडी ॥ घेऊनियां गोकुळा गुढी । जाणविली वार्ता सकळांसी ॥ ४ ॥ ऐकतां हर्षले नागरीक । सामोरे आले ते सकळिक ॥ देखोनियां यदुनायक । लोटांगणें घालिती ॥ ५ ॥ देऊनियां आलिंगन । कृष्णें हरिला त्यांचा शिण ॥ मग समागमें अवघे जण । आले कृष्णमंदिरा ॥ ६ ॥ गाई वत्सा आणि गोवळां । आनंद नरनारी बाळां ॥ झाला ब्रह्मानंद सकळां । ह्मणे निळा हरिभेटी ॥ ७ ॥

॥ २९१ ॥ मग पाचारुनियां प्रांतवासी । द्विज आणिले भोजनासी ॥ जिताणें करुनियां श्रीकृष्णासी । ओंवाळिती अक्षवाणें ॥ १ ॥ काळया सर्प स्थापिला वरी । कळंबा तळीं यमुने तीरीं ॥ देखोनी सोहळा तो नरनारी । करिती आश्चर्य मानसीं ॥ २ ॥ पहा रे हें कृष्णचरित्र । एकाहुनी एक विचित्र ॥ नवलचि देखती आमुचे नेत्र । नित्यानित्य नूतन ॥ ३ ॥ हेचि घरोघरीं वार्ता । कथिती कृष्णचरित्र कथा ॥ गुढिया उभउनियां

चित्ता । माजी हर्ष न समाय ॥ ४ ॥ गाती नित्य नामावळी । तुळसी वृंदावना बैसोनि पाळी ॥ अवलोकुनियां मूर्ती सांवळी । करिती जिवें कुरवंडिया ॥५॥ म्हणती आमुचें थोर भाग्य । भाग्यें जोडला हा श्रीरंग ॥ याचा नित्य घडतां संग । काय करावें वैकुंठ ॥ ६ ॥ निळा म्हणे उत्साह ऐसा । मानुनियां निज मानसा ॥ करिती पूजा स्तविती ईशा । जगत्रयाच्या श्रीकृष्णा ॥ ७ ॥

॥ २०२ ॥ तंव आली वार्षिक यात्रा । करणें इंद्रपूजा सर्वत्रां ॥ गोरसें काढुनी कावडी भरा । हाकारी तराळ नंदआज्ञा ॥ १ ॥ जाऊनियां पर्वतासी । सुरपती पुजावा प्रतिवर्षी ॥ जागोनियां त्याची दिवसासी । निदसुरियां देती आठव ॥ २ ॥ म्हणती उच्छिष्ट न करावें गोरस । दूध दहीं तूप सायस ॥ लोणी भरूनियां कावडीस । रंग लावावा घागर माळा ॥ ३ ॥ ध्वजा कुंचे सिद्ध करा । वाद्या लावुनियां अपारा ॥ जावें परिवारेंसी सत्वरा । प्रातःकाळीं देवपूजे ॥ ४ ॥ गोवर्धनीं सुरारावो । पूजा इच्छी देखोनि भावो ॥ यालागीं सकळही समुदावो । जावें आपुल्या कल्याणा ॥ ५ ॥ मेघा तोषोनी यावरी । इच्छिलया ऐसी वृष्टी करी ॥ तेणें पिकती घुमरी । आणी गोधनेंही दुभती ॥ ६ ॥ निळा म्हणे ऐकोनि श्रवणीं । विस्मय मानी चक्रपाणी ॥ म्हणे मज प्रत्यक्षा सांडुनी । कैंचा इंद्र आणियला ॥ ७ ॥

॥ २०३ ॥ मग सांगे गडियां सुजाणां । जाता कावडी हिरोनी आणा ॥ काय करितो देवराणा । पाहों चरित्र तयाचें ॥ १ ॥ ऐसें सांगोनियां गडियांसी । प्रातःकाळींचि हृषिकेशी ॥ जाउनियां मार्ग प्रदेशीं । रोखुनियां बैसला ॥ २ ॥ तंव ते लोक सकळही । स्नानें करूनियां लवलाहीं ॥ वस्त्रें आळंकार घालुनी देहीं । वाद्यें वाजवित सुस्वरें ॥ ३ ॥ करूनि सकळिकां आरोळी । चला चला म्हणती उतावेळी ॥ मग मिरवित कावडी कल्लोळीं । नाचवितचि चालिले ॥ ४ ॥ वानीं पढती इंद्र प्रतापें । ठाईं ठाईं नाचती पडपे ॥ सोहळा देखोनियां तो गोप । म्हणती कृष्णा अवलोकीं ॥ ५ ॥ कैसा करीतुची हे गजर । आले अवघे नारीनर ॥ तंव कृष्ण म्हणे रे निर्भर । होउनी लुटा कावडी ॥ ६ ॥ निळा म्हणे ऐकोनि ऐसें । गोपाळ चौताळले आवेशें ॥ म्हणती आणा रे कृष्णपरेईशें । कावडी इकडेचि आणविल्या ॥ ७ ॥

॥ २९४ ॥ ते म्हणती रे हे सुरपतीची । पूजा आजी देवदेवाची ॥ उच्छिष्ट करूं नये हे कुळिंची । आली पद्धती चालत ॥ १ ॥ ऐसें ऐकोनियां गोवळ । धांविले जैसे कृतांतकाळ ॥ कावडी हिरोनियां सकळ । आणिल्या त्या हरिपाशीं ॥ २ ॥ तेणें जहाला हाहाकार । जहाले घाबिरे नारीनर ॥ म्हणे केला केला विक्षेप थोर । पूजेमाजी इंद्राचिये ॥ ३ ॥ अविवेकी हे धांवोनी आले । बळेंचि इंद्रभाग हिरोनी नेले ॥ यावरी आतां नव्हे भलें । क्षोभलिया सुरपती ॥ ४ ॥ कृष्णें उघडुनियां कावडी । गोवळ बैसविले परवडी ॥ म्हणे रे गडिहो सेवा गोडी । अवघियाचीच निवाडे ॥ ५ ॥ आजि आम्हीच इंद्र जहालों । पूजा घेउनियां तोपलों ॥ बरे उत्तम धणी धालों । तृप्तीवरी स्वीकारा ॥ ६ ॥ निळा म्हणे कृष्ण चंद्रु । आदी इंद्राचाही इंद्रु ॥ यावरी कृपेचा समुद्रु । करील कौतुक आसुमाई ॥ ७ ॥

॥२९५॥ यात्रा फिरोनियां माघारी। आली गोकुळाभीतरी ॥ उद्वेग करिती घरोघरीं । म्हणती अनर्थ वोढवला ॥ १ ॥ इंद्र कोपलिया वरी । अणुमात्रही वृष्टी न करी ॥ बरग पाडुनियां द्वारीं । उरों नेदिल सेपुट ॥ २ ॥ अनावृष्टी नव्हतां पीक । मरती दुष्काळें पिडती लोक ॥ अथवा अति वृष्टी करूनी सकळिक । बुडवील निमिषार्धें ॥ ३ ॥ भयचि अणुमात्र न वाटे कृष्णा । परी हा कोपलिया देवराणा ॥ करील एकाचे एक क्षणा । पळमात्रही न लगतां ॥ ४ ॥ हें असो भक्षिला गोरस । तृप्ती सांडी उद्गारास ॥ वाकुल्याही गोवर्धनास । कृष्ण म्हणे रे दाखवा ॥ ५ ॥ हें इंद्र देखोनियां दृष्टी । क्रोधें संतप्त झाला पोटीं ॥ मेघा पाचारूनियां म्हणे वृष्टी । करा निर्घातें गोकुळावरी ॥ ६ ॥ पाचारुनी संवर्तका । म्हणे गोकुळींची नुरवी मृत्तिका ॥ मुसळधारी वर्षोनी उदका । मेळवी नेउनी सागराच्या ॥ ७ ॥ येरु म्हणे बहुत बरें । आज्ञा केली ते सुरेश्वरें ॥ करीन परी एक दुसरें । पाहिजे मज साह्यार्थ ॥ ८ ॥ द्यावा सवें प्रचंड वात । करावया गोकुळाचा घात ॥ इंद्रें पाचारूनियां सातें त्वरित । म्हणे जावें याच्या संगें ॥ ९ ॥ निळा म्हणे स्वमुखें त्यासी । सांगे जाउनी गोकुळासी ॥ मोडुनियां तेथिचिया वृक्षासीं । घरां खोपटांसी उडवावें ॥ १० ॥

॥ २९६ ॥ संवर्तक वर्षेल जळधारीं । तुवांहि झगटावें तंव त्यावरी ॥ ऐसें सांगोनियां प्रेरिले वरी । पांचहि जण अति क्रोधें ॥ १ ॥ आज्ञा होतांचि

चालिले मेघ । पवन त्याही पुढें सवेग ॥ तेणें अभ्रें दाटली अनेग । पाडिला अंधःकार गोकुळावरी ॥ २ ॥ विजुवा झमकती लक्षवरी । कल्पांत काळींच्या जैशा हारी ॥ देखोनियां हे गजबज भारी । झाली गोकुळीं सर्व जनां ॥ ३ ॥ म्हणती कालिचि याचि इंद्रपुजे । विध्वंसिलें या नंदात्मजें । तेणेंचि क्षोभोनियां सहस्रांबुजें । मेघ धाडिले गर्जती ॥ ४ ॥ आतां जावें कोणीकडे । पळोनियां देवक्षोभापुढें ॥ अकस्मात अरिष्ट हें एवढें । आणिलें कृष्णें आम्हांवरी ॥ ५ ॥ मागिल्या अरिष्टांत वांचला । तेणेंचि बहुत बळ घेतला ॥ घात आमुचा येणें केला । गाईगोवळांसमवेत ॥ ६ ॥ तंव सुटला झुंजात वारा । मेघें घातल्या सरळ धारा ॥ निळा म्हणे नंदकुमरा । करणें त्याचा अवमान ॥ ७ ॥

॥ २९७ ॥ मग म्हणे गडियां आपण । उचलूं चला गोवर्धन ॥ तया तळीं सकळहि जन । घालूनियां संरक्षूं ॥ १ ॥ मग ते उभे करुनी फेरी । धरविला त्यांचे हातें गिरी ॥ आपणहि तेथें निमित्यावरी । एकी आंगोळी लावियली ॥ २ ॥ हाका देउनी उचलिती । एकचि हिल्लारी करा म्हणती ॥ उर मस्तक नेटीं लाविती । एक पाठी देती निजबळें ॥ ३ ॥ एक पडोनियां उचलिती पाय । एक म्हणती न धरारे भय ॥ एक उभे राहती ठायीं ठाय । कृष्ण बळिया आमुचा ॥ ४ ॥ तंव तो अनंतकोटीब्रम्हांडधीश । परमात्मा हा कृष्ण परेश ॥ विश्वलाघवी परम पुरुष । न करी तें काय स्वलीळा ॥ ५ ॥ आपेआप चालिला वरी । अंतरिक्षची निजसत्तागिरी ॥ धरुनी सकळांतें हाकारी । म्हणे बसा तळीं याचिये ॥ ६ ॥ आप भयेंचि धांविलीं सकळें । गाई गौळणी आणी गोवळें ॥ निळा म्हणे श्वापदें पक्षीकुळें । मुंगिया आदीकरुनी ॥ ७ ॥

॥ २९८ ॥ प्राणिमात्र पर्वतातळीं । राहिले ते निजानंदमेळीं ॥ नित्य हरिकीर्तीची नव्हाळी । श्रवण मनन करिताती ॥ १ ॥ सप्त आहोरात्रेवरी । पर्जन्यवृष्टी केली भारी ॥ विजा कडाडिती गगनोदरीं । तेणें ब्रम्हांड फुटों पाहे ॥ २ ॥ मुसळधारा खळखळाटें । नदियां पूर वहाती नेटें ॥ पवनवातें झडझडाटें । पाषाण जाती उडोनियां ॥ ३ ॥ परी तया पर्वतातळीं । पर्जन्यवात न पवेचि वळी ॥ हिंपुटी होउनियां ते जवळी । गेले इंद्रा सांगती ॥ ४ ॥ सप्त अहोरात्र पडिलों वरी । खणोनी सांडिली ते नगरी ॥ खडकावांचुनियां दुसरी परी । नुरेचि मृत्तिका ऐसें केलें ॥ ५ ॥ ऐकोनी हरिखेला सुरपती । बहुत मानवला साचे शक्ती ॥ परी गोकुळींच्या लोकांप्रती । नाहींचि

आढळला पर्जन्यवात ॥ ६ ॥ निळा म्हणे हरि दादुला । सकळिकां म्हणे बाहेरी चला ॥ अवघा मेघ ओसरोनि गेला । उन्हें पडिलीं खडखडाट ॥ ७ ॥

॥ २९९ ॥ लोक सकळहि बाहेरि येती । तंव निर्मळ गगन शुद्ध गभस्ती ॥ नवे चार धेनुवा चरती । आणि दुभती यथेष्ट ॥ १ ॥ तंव गडी अवघे मस्तकावरी । धरूनियां होते गिरी ॥ गर्वारूढ ते अंतरीं । आम्हीं पर्वत उचलिला ॥ २ ॥ कृष्ण येथें टाळाटाळी । करूनियां म्हणवी आपणा वळी ॥ ओझीं आमुचिये निढळीं । आपण मोकळा फुल झळका ॥ ३ ॥ कृष्णें जाणोनी मनोगत । म्हणे रे गडिहो काढा हात ॥ येरू म्हणती तूंचि त्वरित। जाई येथुनी वेगळा ॥ ४ ॥ ओझें आमुचिये निढळीं । उगीचि टेकिली तुवां आंगोळी ॥ यश घेउनियां वनमाळी । वाउगाचि मिरवसी आम्हांत ॥ ५ ॥ मग त्यांतें म्हणे श्रीहरी । मस्तक तुम्हीं काढा तरी ॥ सोडुनी पहातां नखाचि वरी । धरिला देखती सकळही ॥ ६ ॥ मग म्हणती उतरा आतां। एकल्या नुरवेचि तत्वतां ॥ चौफेरी मस्तकीं धरितां । कृष्णें काढिली आंगोळी ॥ ७ ॥ तंव ते दडपिली त्यांच्या भारें । मेलों मेलों म्हणती पोरें ॥ कृष्ण म्हणे तुम्ही वळिये कीं रे । धरा उचलुनी निज शक्ती ॥ ८ ॥ निळा म्हणे पुरुषोत्तमा । नेणवे म्हणती तुझा महिमा ॥ धांव धांव रे मेघःशामा । आम्हां वांचवीं खचता हा ॥ ९ ॥

॥ ३०० ॥ मग तो उतरूनियां गिरी । आले गोकुळाभीतरी ॥ तंव धांवोनियां नरनारी । लोटांगणें घालिती ॥ १ ॥ मेघीं मांगतां सुरपती । आनंदला होता चित्तीं ॥ तोचि आला गोकुळाप्रती । निज नयनीं पहावया ॥ २ ॥ तंव तों गोवळ पहिलियाची ऐसे । केळवती कां नोवरे जैसे ॥ गाई चौताळताती हर्षें । तैसेचि पाडे व्रज गोप हर्षें ॥ ३ ॥ गोवळ नाचती आनंदें । लाऊनियां नाना वाद्यें ॥ तैसेचि गोकुळींहि स्वानंदें । गौळीगौळणी मिरवती ॥ ४ ॥ इंद्र देखोनियां तें दृष्टी । विस्मयापन्न झाला पोटीं ॥ ह्मणे संवर्तकाचिये वृष्टी । पुढें कैसीं वांचलीं हीं ॥ ५ ॥ तस्मात परमात्मा हा श्रीहरि । कृष्णवेशें महीवरी ॥ अवतरला जाणोनियां अंतरीं । स्तवन करी निजमुखें ॥ ६ ॥ निळा ह्मणे शरणांगत । ह्मणवी घाली दंडवत ॥ त्राहें त्राहें म्यां महिमा नेणत । केला अपराध क्षमा कीजे ॥ ७ ॥

॥ ३०१ ॥ इंद्र ह्मणे गा देवदेवा । न कळती आम्हां तुझिया मावा ॥

कळासूत्री तूं विश्वलाघवा । करिसी घडामोडी स्वर्गाच्या ॥ १ ॥ निर्मिला तुवां चतुरानन । आपुलिये नाभीं देऊनि स्थान ॥ तुझिया सत्ता मही गगन । पंच महाभूतें वाढलीं ॥ २ ॥ तूं या आदिचिही आदी । विश्वीं विश्वात्मा तूं त्रिशुद्धी ॥ तुजवांचुनियां मना बुद्धी । कैंचें बोधव्य मंतव्य ॥ ३ ॥ तुवां अंतरिक्षीं धरिलें गगन । तुझिया आज्ञे विचरे पवन ॥ तुझिया सत्ता देदीप्यमान । सर्वदा हुताशन नवेचि ॥ ४ ॥ तुझिया तेजें प्रकाशे रवी । तुझिया क्षमा अचळ पृथ्वी ॥ तुझिया द्रावें सदा टवटवी । आपापती गंगोदकां ॥ ५ ॥ समर्था समर्थ तूं ईश्वर । होउनी नंदाचा कुमर ॥ केला पवाडा हा थोर । गोवर्धन उचलिला ॥ ६ ॥ आह्मीं तुझीं ह्मण्यागतें । महिमा नेणोनियां येथें ॥ पाठविलें जें पर्जन्यातें । त्या अपराधा क्षमा कीजे ॥ ७ ॥ कोणा नेणवे तुझी लीळा । देवत्रयां तूं आगळा ॥ निजानंदाचा पुतळा । सगुणरूपीया श्रीहरी ॥ ८ ॥ निळा ह्मणे ऐसी वाङ्मय पूजा । करूनियां कृष्णाविराटध्वजा ॥ आज्ञा घेउनियां अमरराजा । गेला आपुलिया भुवनामी ॥ ९ ॥

॥ ३०२ ॥ यावरी कौंस भयाभीत । कृष्णभयें उद्विग्नचित्त ॥ बैसला असतां निजमंदिरांत । तंव आला अकस्मात रजक बळिया ॥ १ ॥ वस्त्रें आणिलीं धोवट । उंच धोउनियां चोखट ॥ ह्मणे राया राय तूं वरिष्ठ । शोभती विशिष्ट तुज अंगीं ॥ २ ॥ मग ते लेऊं जों बैसला । तंव तो झगा पोकळ झाला ॥ ह्मणे थोर हा वेतियेला । व्यर्थचि नासिला ये शिवणारें ॥ ३ ॥ राजा हांसोनि बोले त्यासी । शिवणार काय करील यासी ॥ चिंतें व्यापिलें शरीरासी । तेणें हें कृशत्वासीं पावलें ॥ ४ ॥ गोकुळीं नंदाचिये घरीं । बाळ वाढे आमुचा वैरी ॥ पहा तो भाचाचि निर्धारी । परी मुळावरी आमुचिया ॥ ५ ॥ तया वधिलिया वांचून । निश्चळ नव्हे आमुचें मन ॥ रजक बळिया तें ऐकोन । ह्मणे न करा चिंता महाराजा ॥ ६ ॥ निळा ह्मणे गर्वारूढ । मंदबुद्धी जल्पवाड ॥ ह्मणे मी वारीन हें सांकड । एकदां डोळां मज दावीं ॥ ७ ॥

॥ ३०३ ॥ जरी तो येईल येथें हरी । तरी मी सहसा विलंब न करीं ॥ धोपटुनियां शिळेवरी । तेच क्षणीं टाकीन ॥ १ ॥ काळासम तुल्य माझें बळ । काय तें करील कृष्ण गोवळ ॥ लागों नेदितां एकही पळ । निमिषार्धेंची उपटीन ॥ २ ॥ गोकुळाचिये वाटेवरी । धुणें माझें निरंतरी ॥ परी तो

आलाचि पाहिजे वैरी । तुझा आणि माझाही ॥ ३ ॥ मागें पाठविले असुर । मायावी ते निशाचर ॥ ते काय बापुडे किंकर । माझिये बळ शक्तीपुढें ॥ ४ ॥ राया येथें एक वेळा । आणवीं पां तया गोवळा ॥ मग तूं कौतुक पाहें डोळां । मृत्युपंथें लावीन ॥ ५ ॥ आह्मी तुझे अंगलग । सेवक आणि वळिये चांग ॥ रोखुनियां असों मार्ग । माझें धुणें त्याचि पंथें ॥ ६ ॥ निळा ह्मणे ऐशा वचनीं । राजा संतोषविला मनीं ॥ मग तो उचिताते घेउनी । आला आपुलिया मंदिरा ॥ ७ ॥

॥ ३०४ ॥ राजा ह्मणे रजकहि गांठी । आहेत पांचशें आणिक जेठी ॥ मातंगकुळवई ही उग्र दृष्टी । सोडितां वरी झगटेल ॥ १ ॥ परी तो येथें येईल कैसा । आलिया कदाचित करील वळसा ॥ ऐसें विचारी जंव मानसा । तंव प्रधानहि पातले ॥ २ ॥ राजा तयांतें विचारी । आणवितां कैसें येथें हरी ॥ तंव ते ह्मणती युक्ति माझारी । हेचि उत्तम दिसतसे ॥ ३ ॥ येथें आपुले सैन्यक । अपार काळाहुनी अधिक ॥ कृष्ण येईल एकला एक । चारी अर्भकें घेउनी ॥ ४ ॥ तया मागें कैंची सेना । गोवळ गाईचा राखणा ॥ करितो घरींचि चार नाना । येथें काय बळ त्याचें ॥ ५ ॥ येतांचि आपुले शिवे आंत । शस्त्रपाणी करिती घात ॥ ऐसाचि साधावा कार्यार्थ । विचार हाचि मानला ॥ ६ ॥ निळा ह्मणे आणिती काळ । घरा प्रार्थुनियां ते सकळ ॥ ओढवलिया निदान वेळ । अघटितचि सहज घडे ॥ ७ ॥

॥ ३०५ ॥ ह्मणती पाठवावा अक्रुर । कृष्ण त्याचा मित्राचार ॥ त्याचें नुलंघी तो उत्तर । सहसा प्राण गेलिया ॥ १ ॥ देऊनियां उत्तम रथ । मूळ पाठवावा तो त्वरित ॥ सांगावें भेटीसी उद्यत । मामा तुझे कौंसरावो ॥ २ ॥ अक्रुरा सांगावा हाचि अर्थ । जरी तूं नाणिसी कृष्ण येथ ॥ तरी ममहस्तें तुझा घात । होईल जाण तेच क्षणीं ॥ ३ ॥ रायें अक्रुर पाचारिला । रथ देउनियां गौरविला ॥ ह्मणे जाउनियां आतां वहिला । भाचा आणीं भेटीसी ॥ ४ ॥ तयालागीं प्राण फुटे । घटिका पळहि निमिष न लोटे ॥ नाणितां लावीन मृत्युवाटे । तुज हें निर्धारें जाण पां ॥ ५ ॥ आजिचि घेउनियां तूं येसी । जरि कां आपुल्या निजमित्रासी ॥ तरि देउनियां निजभाग्यासी । गौरवीन तुज बहुमानें ॥ ६ ॥ निळा ह्मणे अक्रुर मनीं । ह्मणे हा पापी पापियाहुनी ॥ आणवितो कृष्ण निदानीं । आपुलिया प्राणा घातावया ॥ ७ ॥

॥ ३०६ ॥ कृष्ण बळियामाजि बलिष्ठ । कृष्ण अवघिया देवां श्रेष्ठ ॥ तैसाचि बळिरामही उद्भट । भरील घोट देखतां ॥ १ ॥ एक नवनागसहस्र-बळी । दुजा तंव तो कल्पांत शुळी ॥ येतांचि येथें निमिष मेळीं । करितील संहार कंसाचा ॥ २ ॥ कृष्ण परमात्मा ईश्वर । अनंतकोटीब्रह्मांडधर ॥ मायानियंता परात्पर । तया हा पामर आणवितो ॥ ३ ॥ पतंगा वडवान-ळेसी खेळणें । दर्दुर शेषातें गिळूं ह्मणे ॥ उलुकें रवितें संघट्टणें । केंवि जीवें प्राणी वांचिजेल ॥ ४ ॥ तैसिचि परी झाली यातें । जेंवि खद्योत झगटूं पाहे रवितें ॥ अरण्यमृगें शार्दूलातें । कैसेंनि भेटीसी आणिजे ॥ ५ ॥ परी येथें प्रालब्धचि बळी । घडवील घडावें तें तात्काळीं ॥ पहा त्या हिरण्य-कश्यपें आपुलियेचि नळीं । बैसविला नृसिंह पाचारुनी ॥ ६ ॥ निळा ह्मणे होणार होइल । बुद्धीही तैसीच प्रवर्तवील ॥ क्रियाहि शरीरीं उमटेल । भोगणें भोगवील प्राचीन ॥ ७ ॥

॥ ३०७ ॥ आठउनियां श्रीकृष्णचरण । अक्रुरें रायातें पुसोन ॥ चालिला रथावरी बैसोन । मार्गीं हरिगुण आठवितु ॥ १ ॥ गोकुळा पाठविला अक्रुर । परी कंसामनीं दचक थोर ॥ तेणें पाचारुनियां धनुर्धर । चौकिये बाहेर बसविले ॥ २ ॥ ह्मणे येतां देखोनियां कृष्णासी । युद्ध करावें अति आवेशीं ॥ उतरुनी त्याचिया मस्तकासी । मजपाशीं आणावें ॥ ३ ॥ रजका संगे निजमुखें । कृष्ण येतांचि धोपटीं मुखें ॥ तुझिये पाठीसि हे आसीके । सावध ठेविले धनुर्धर ॥ ४ ॥ मग बोलाउनियां मल्लजेठी । बैसविले ते द्वारवंटीं ॥ मातला हस्ती त्याचिये पुष्टी । कुळवई ठेवियेला ॥ ५ ॥ तया भोंवते आणिक कुंजर । उभे केले ते दळभार ॥ तंव इकडे जाउनियां अक्रुर । भेटला नंदयशोदेसी ॥ ६ ॥ निळा ह्मणे पुसे कृष्णा । तंव ते ह्मणती गेला राणा ॥ मग रथ तेथेंचि ठेउनी जाणा । चालिला दर्शना कृष्णाचिया ॥ ७ ॥

॥ ३०८ ॥ जातांचि गोकुळा बाहेरी । कृष्ण पाउलाचिया हारी ॥ उम-टल्या देखोनी महीवरी । प्रेमा अंतरीं न संडे ॥ १ ॥ चरणमुद्रांकित चिन्हें । देखोनि घाली लोटांगणें ॥ अंतर निष्ठेचें हें लेणें । लेउनी निमग्न ते ठाईं ॥ २ ॥ आनंदाश्रु गळती नेत्रीं । स्वेद रोमांच उठती गात्रीं ॥ कंप स्फुंदनें विकळ गात्रीं । सद्गदितु मुरकुंडें ॥ ३ ॥ सर्वसाक्षी नारायण । जाणोनियां त्याचें चिन्ह ॥ आला अति त्वरें धांवोन । तया उमजउन आलिंगी ॥ ४ ॥ दोघां-ची सरली भेटी । पडिली आनंदाची मिठी ॥ मग अचळ पुसोनियां मुख-

वटी । परम कृपेनें न्याहाळी ॥ ५ ॥ पुसे अंतरींचें गुज । तयापाशीं अधोक्षज ॥ येरें वंदुनियां चरणरज । मंजुळा उत्तरीं बोलतु ॥ ६ ॥ निळा ह्मणे स्तवन करी । मग ती स्तब्ध निमिषवरी ॥ अवलोकुनियां चरणावरी । ठेवी मस्तक क्षणक्षणा ॥ ७ ॥

॥ ३०९ ॥ मग सांगे गुह्य गोष्टी । मामा पाचारितो भेटी ॥ ईतुकेंचि ऐकोनियां पोटीं । कृष्णा आनंद न समाय ॥ १ ॥ मग म्हणे बळिरामासीं । जाऊं मामाचिये भेटीसी ॥ कृपा करुनियां अक्रुरासी । मूळ आम्हांसी पाठविला ॥ २ ॥ म्हणती बळिरामहि चलावें । वोरसें मामासी भेटोनी यावें ॥ आपणासिही जिवेंभावें । आर्त तयाचें अखंड ॥ ३ ॥ घेऊनि पांचशें गोवळ । समागमें आपुलें दळ ॥ निघते झाले उतावेळ । आले घरासी पुसावया ॥ ४ ॥ मग नंदयशोदे प्रती । उभयतांहि नमस्कार करिती ॥ मामासी भेटी जाऊं म्हणती । द्यावी आज्ञा आशीर्वादें ॥ ५ ॥ ते म्हणती कंस द्वेषी । महादुष्ट पापराशी ॥ देखतांचि घेतील रे दोघांसी । सर्वथा तेथें न जावें ॥ ६ ॥ निळा म्हणे ऐकोनी हरि । म्हणे न चिंतावें हें अंतरीं ॥ आम्हांसी आप्त या संसारीं । कोण मामाहुनी जिवलग ॥ ७ ॥

॥ ३१० ॥ आम्हीं लेंकुरें लळेवाडें । तुमचीं तैसीं त्याहि पुढें ॥ क्रीडा करुनी वाडे कोडें । येऊं भेटोनियां वोरसें ॥ १ ॥ नाहीं तया पोटीं मेळ । अत्यादरें धाडिलें असे मूळ ॥ अक्रूर सांगताहे केवळ । भेटी आमुची इच्छितो ॥ २ ॥ तुम्ही न धरावा संशय । तेथें आम्हां नाहीं भय ॥ मामा भेटी जातां काय । उद्वेग घडती भाचिया ॥ ३ ॥ ते म्हणती रे नव्हे कृष्णा । तुम्ही त्याचा भावार्थ नेणा ॥ कालिचि पहा पां पूतना । आली होती घातावया ॥ ४ ॥ केवढी दाउनियां माया । बसली तूतें स्तन द्यावया ॥ कृष्ण म्हणे मी धालों तिचिया । स्तनपानेंची आजिवरी ॥ ५ ॥ तिणें वेंचोनियां कायाशक्ती । आह्मांचि तोषविलें प्राणांतीं ॥ उपकार तिचेहि श्रीपती । म्हणे मुखें मी काय वानूं ॥ ६ ॥ निळा म्हणे बोलोनि ऐसें । न रहातीचि चालिले उद्देशें ॥ गोपिका गौळणिही ऐकोनि ऐसें । आल्या धांवत हरिपाशीं ॥ ७ ॥

॥ ३११ ॥ म्हणती नको नको जाऊं हरी । सांडोनी आम्हां कोठें दुरी ॥ तुज वांचुनियां संसारीं । कोण आम्हां जिवलग ॥ १ ॥ जातील प्राण तुतें

ातां । वियोग न साहवे ते व्यथा ॥ पळमात्रचि वेगळे पडतां । जेविं कां ासोळी जळांतील ॥ २ ॥ नव्हे अक्रूर हा ढींवर । करूं आला येथें ंहार ॥ जीवन नेलिया यदुवीर । आम्हां सहजाचि प्राणांतु ॥ ३ ॥ इतु- त्यांचीही येईल हत्या । जरि तूं कृष्णा नेसील आतां ॥ ऐसें बोलोनियां ामस्तां । लोळती कृष्णचरणावरी ॥ ४ ॥ वधूनि आम्हां आपुल्या हातें । ाई मग तूं जाणें तेथें ॥ करुनियां दीर्घ रुदनातें । उकसा बुकसी स्फुंदती ॥ ५ ॥ ामुचा जीव तूंचि प्राण । तुजविण न वांचों तुझीची आण ॥ नको आमुचें ं निर्वाण । पाहों आपुलें निज नेत्रीं ॥ ६ ॥ निळा म्हणे यावरी हरी । ांतवी तया निज उत्तरीं ॥ म्हणे आम्ही बरावरी । येऊं भेटोनी मामासी ॥ ७ ॥

॥ ३१२ ॥ नका होऊं खेदक्षीण । घ्या भाष माझें वंधन ॥ तुम्हांवांचु- नेयां मजही कोण । आहे तें आप्त इहलोकीं ॥ १ ॥ जैसा तुमचा मजवरी ाव । माझाही तैसाचि तुम्हांवरी जीव ॥ नाहीं येथें संदेहा ठाव । चित्ता चेत्त साक्ष असे ॥ २ ॥ तुह्मीं निरंतर मातेंचि ध्यातां । मीही न विसंवें ुम्हीचि देखतां ॥ ऐसें परस्परें बोलतां । लोटती उभयतां नेत्रीं पुर ॥ ३ ॥ वेयोग न साहवे कृष्णासी । साहि होती कासाविसी ॥ परी धैर्याचिया ाति आवेशीं । पुढील साधिती कार्यार्थु ॥ ४ ॥ भक्त कृपाळु श्रीहरी । ावघा प्रेमा भक्ताचि वरी ॥ साचि कार्या अवतार धरी । न विसंवे क्षण- ारी नव्हे परता ॥ ५ ॥ अनावरा आवरिलें जिहीं । जीवप्राण ठेऊनि पायीं ॥ ाही तयातें निज हृदयीं । सर्वकाळ आठवितु ॥ ६ ॥ निळा म्हणे संबो- खल्या । ऐसिया उत्तरीं स्थिराविल्या ॥ मनोहर करुनियां ठेविल्या । ापुलिये चिंतनीं सादर ॥ ७ ॥

॥ ३१३ ॥ मग लेइले दिव्य आलंकार । उभयतांहि बंधु अति नागर ॥ ुगुट कुंडलें एकावळी हार । झळकती पदकें जडिताचीं ॥ १ ॥ वाहुभुषणें ीरकंकणें । मुद्रिका अंगुळिया शोभल्या लेणें ॥ वेष्टुनी पीतांबराचीं ारिधानें । घेतलीं विशाणें निज करीं ॥ २ ॥ आधींचि मदनाचे हे बाप । देव्य तेज प्रभा अमुप ॥ सकळहि लावण्य साटोप । धरुनियां आली निज ास्ती ॥ ३ ॥ अवघेचि सुख मुसावलें । कृष्णाकृति तें वोतलें ॥ नयना पाहु- गेर देऊं आलें । जे जे देखती तयाच्या ॥ ४ ॥ कृष्ण लावण्याची मूर्ती । ळिदेवहि तैसीचि आकृती ॥ ठाणें माणें समान दीप्ती । प्रतापकीर्ति यश- ंत ॥ ५ ॥ दंडी मुद्रपी विराजमान । शोभले राजीवलोचन ॥ पाहों येती

मथुराजन । म्हणोनियां अधिक ठकारले ॥ ६ ॥ निळा म्हणे चांगुलपण । मूळ तें आधीं हेंचि जाण ॥ याहिवरी दिव्य भूषण । शोपिलें तेज अंगकांती ॥ ७ ॥

॥ ३१४ ॥ ऐसे बैसले रथावरी । भोंवते गोवळ चालती फेरी ॥ हें देखोनियां नगर नारी । असंत प्राण विकळ त्यांचें ॥ १ ॥ आतां कृष्णा येसील केव्हां । भेटसील प्राण शितळ तेव्हां ॥ आठव आमुचाहि धरावा । तेथें पाहुणेरीं गुंततां ॥ २ ॥ ऐकोनियां त्यांचीं वचनें । संतोषीजे उभयतां मनें ॥ मग त्या देउनी आश्वासनें । आज्ञा करिती ते अक्रुरा ॥ ३ ॥ आतां रथ चालवीं वेगीं । विलंब नव्हे ऐसा मार्गीं ॥ माता पिता गौळणी लागीं । रहाविलें अत्यादरें ॥ ४ ॥ मार्गीं चालतां परम संतोषीं । करिती संवाद येरयेरांसी ॥ ह्मणती धरिलिया अवतारासी । आजि झालें सार्थक ॥ ५ ॥ होतां मामासवें भेटी । पडेल जिवें जीवा गांठी ॥ परमानंद होईल सृष्टी । दुष्ट कंटक निमालिया ॥ ६ ॥ निळा ह्मणे ऐसिया लाभा । उभयतांहि अंगीं शौर्यशोभा ॥ दाटली तेणें ऐश्वर्य क्षोभा । जातसे हें अक्रुरा जाणवलें ॥ ७ ॥

॥ ३१५ ॥ करितांचि सीमा उल्लंघन । ह्मणती अक्रुरा ऐकें वचन ॥ तुवां जावें रथ घेउन । सांगावें वर्तमान रायासी ॥ १ ॥ तेणें आज्ञा वंदुनी शिरीं । चालिला पुढें वेगें करी ॥ बळराम कृष्ण गोवळ भारी । आले वळिया रजकापैं ॥ २ ॥ तंव तो वस्त्रें वाळवीत । उभा असे बळ प्रमत्त ॥ गोवळांतें असे पुसत । तुह्मी आलेती कोठुनी ॥ ३ ॥ ते ह्मणती गोकुळवासी । जातों रायाचे भेटीसी ॥ आदरें बोलाविलें कृष्णासी । आणि बळीरामा सुजाणा ॥ ४ ॥ येरु ह्मणे कोणता कृष्ण । गोवळ तुह्मी अवघे जण ॥ आलेती घोंगडी पांघरोन । जाल कैसेन रायापुढें ॥ ५ ॥ तंव कृष्ण बळिराम ह्मणे त्यांसी । आह्मां देई उत्तम वस्त्रांसी ॥ भेटोनी आलिया रायासी । देऊं उचित आणि तुझीं वस्त्रें ॥ ६ ॥ तंव तो ह्मणे भाग्यासी याल । बोलतांचि ऐसें ताडण पावाल ॥ राजवस्त्रें हीं तुह्मी ल्याल । तैंचि वेंचाल जिवें प्राणें ॥ ७ ॥ बळिरामें हें ऐकतांचि कानीं । ह्मणे वस्त्रें आणा रे लुटूनी ॥ शंका मात्र न धरितां मनीं । हरा आवडती ज्यां जैसीं ॥ ८ ॥ निळा ह्मणे धांवले सकळ । घळिये आतुर्बळी गोवळ ॥ तेथें झाला हालकल्लोळ । रजक बळिया धांविन्नला ॥ ९ ॥

॥ ३१६ ॥ येतां देखोनियां बळिरामें । आकळिला तो अति विक्रमें ॥ ह्मणे पापिया तुवां अधमें । बहुत केली कृष्णनिंदा ॥ १ ॥ तया दोषाचें प्रायश्चित्त । आजि घे पां यथोचित ॥ होईं देहापासूनि मुक्त । ह्मणोनी टांगेसी धरियला ॥ २ ॥ तेणेंहि उदंड वेंचिली शक्ती । परि तया पुढें न चलेचि युक्ती ॥ मग बोभाइला अदृष्टाप्रति । ह्मणे नाडलों रे अभिमानें ॥ ३ ॥ बळिया बळिष्ठ शिरोमणी । बळिराम आणि चक्रपाणी ॥ नेणतां महिमा वेंचिली वाणी । पावलों फळ तें सध्याचि ॥ ४ ॥ ऐसें बोलोनियां निश्चळ । अवलोकिलें स्वरूप सकळ ॥ झांकूनियां मग नेत्रकमळ । ध्यान हृदयीं दृढाविलें ॥ ५ ॥ तंव बळरामें वेग केला । अंगा भोंवता ओंवाळिला ॥ आणि तेथेंचि पहा हो मोवकिला । प्रचंड खडकीं निघातें ॥ ६ ॥ निळा म्हणे दिधली मुक्ती । उत्तम कैवल्याही परती ॥ कृपावंत हा श्रीपती । भक्तां वैरियां सारिखाचि ॥ ७ ॥

॥ ३१७ ॥ चिरें आणुनियां वेष्टले । गोवळ अवघेचि शृंगारले ॥ येरयेरां म्हणती भले । गौरव घ्यारे मामाचा ॥ १ ॥ चिरे गुंडिती माजेसी । उंच पटके ते पायासी ॥ झगे वेष्टुनियां शिरासी । विजारा टाकिती खांद्यावरी ॥ २ ॥ ऐसे शृंगारले गोवळ । पुढें चालिले भार सकळ ॥ तंव ते धनुरयागींचे वीर प्रबळ । घ्या घ्या म्हणोनी धांविले ॥ ३ ॥ कृष्णें बळरामें देखिले । अवघ्यांपुढें मग ते झाले ॥ धनुर्धारी वेग केले । परी तें न चले बळ त्यांचें ॥ ४ ॥ घ्या घ्या म्हणोनी हाका देती । शंखस्फुरणें ठाईंचि करिती ॥ परी ते गोवळची समस्तीं । वेष्टुनियां घेतले ॥ ५ ॥ धनुष्या लाउनियां बाण । विंधावे तों माजि मिरान ॥ गोवळीं घेतली ते हिरोन । आणि मोडुनी सांडिली ॥ ६ ॥ निळा ह्मणे एक एका । न पुरतीची युद्ध तवका ॥ निपातिले फेडिली शंका । आणि पुढें संचरले ॥ ७ ॥

॥ ३१८ ॥ मोडियला धनुर्याग । हाहाकार झाला मग ॥ आला आलारे श्रीरंग । बंधु बळिरामा समवेत ॥ १ ॥ आले ग्रामद्वारापासीं । धांविले सकळहि नगरवासी ॥ कृष्णरामाच्या सौंदर्यासी । पहावया उतावेळ ॥ २ ॥ उभयांचेंहि स्वरूप अति नागर । ऐकिलें होतें वारंवार ॥ आणि बळियेहि महा वीर । तेजप्रतापी आगळे ॥ ३ ॥ सदा निर्भय मानसीं । आले चौवारा हाटवटिसी ॥ जेविं कां सिंह गजशाळेसी । शिरतां शंका न धरिती ॥ ४ ॥ उभे रंगशिळेवरी । अवलोकिती नरनारी ॥ चढोनी माड्या

गोपुरी । गवाक्षद्वारीं पैं एकी ॥ ५ ॥ एक चढली भिंतीवरी । एक सन्मुखचि शेजारी ॥ कृष्णदर्शनीं आवडी भारी । नर बाळा नारी सारिखीचि ॥ ६ ॥ निळा ह्मणे हृत्कमळवासी । पूर्णब्रह्म तेजोराशी ॥ सगुणरूपिया हृषीकेशी । कोण मात यासीं नावलोकी ॥ ७ ॥

॥ ३१९ ॥ आले सन्यासी तापसी । योगी मुनिजन प्रांतवासी ॥ पंडित पुराणिक ज्योतिषी । वेदाभ्यासी याज्ञिक ॥ १ ॥ शस्त्रपाणि रिक्तपाणि । पहाती कृष्णातें ते दुरुनी ॥ अवलोकुनियां निज नयनीं । परम विस्मयातें पावती ॥ २ ॥ घरें सांडुनियां नारी । आल्या कोणींचि नसतां घरीं ॥ ह्मणती सर्वेचि जाइल गे श्रीहरी । आह्मी त्या दृष्टी न देखतां ॥ ३ ॥ मग जें उद्विग्न व्हावें मनीं । तें आतांच कां न यावें पाहोनी ॥ ऐशिया निश्चयातें करुनी । आलिया एकांतवासीहि त्या ॥ ४ ॥ जिया बाहेरी येणेंचि नाहीं । आपुलिया सभाग्यपणें कदा ही ॥ आल्या धांवोनियां त्या त्याही । कृष्णा दृष्टीं अवलोकूं ॥ ५ ॥ निळा ह्मणे घरा भाग्य । आलिया अव्हेरी कोण त्या मग ॥ अधिका अधीक लाहो सवेग । करुनियां संग्रहिती ॥६॥

॥ ३२० ॥ कृष्ण परमात्मा श्रीहरी । बळिराम शेषअवतार निर्धारी ॥ कैसे शोभले अळंकारीं । निजांगाचिये निज प्रभे ॥ १ ॥ मुगुट कुंडलें विशाळ डोळे । जैसीं विकासलीं सूर्यकमळें ॥ अंगकांती रूप सांवळें । पीतांबराचीं परिधानें ॥ २ ॥ कंठीं पदकें सुमनमाळा । कौस्तुभ एकावळी रुळती गळां ॥ बाहुभूषणें मुद्रिका सकळां । कांडोवाडी सुशोभित ॥ ३ ॥ सकुमार नागर अंगकांती । ज्याचिया तेजें रविशशीदीप्ती ॥ हुताशनीं रत्नों प्रकाश फांकती । ज्याचेनियां झगमगती तारांगणें ॥ ४ ॥ सुवर्ण म्हणती जें उत्तम । तें याचिये अंगकांती सुमहिम ॥ ऐसें सौंदर्य निरुपम । कृष्णाकृती वोसंडलें ॥ ५ ॥ जैसिया परी तैसा भासे । हेंहि अपूर्वचि एक असे ॥ कृष्णरूपें लाविलें पिसें । न स्मरती पहातां देहगेहा ॥ ६ ॥ निळा ह्मणे बैसली दृष्टी । कृष्णरूपीं ते सहसा नुठी ॥ नरनारी विस्मित पोटीं । अवलोकिती श्रीकृष्णा ॥ ७ ॥

॥ ३२१ ॥ निपुण म्हणती हा आमुचा गुरु । ज्ञानी म्हणती हा परात्परु ॥ योगी म्हणती योग साचारु । याचि पासुनी जन्मला ॥ १ ॥ याज्ञीक ह्मणती भासे कृष्ण । यज्ञरूपी हा नारायण ॥ वैदिकांही लागलें ध्यान ।

म्हणती वेद मूर्तिमंत हाचि दिसे ॥ २ ॥ मल्ला भासे वस्ताद जेठी । शासनकर्तिया नृपवर श्रेष्ठी ॥ शस्त्रपाणिया उग्रदृष्टी । संहारकर्ताचि कृष्ण दिसे ॥ ३ ॥ वृद्धां भासे सकुमार बाळ । तरुणांगीयां मदनमूर्तिचि केवळ ॥ ऐसा सर्वां सर्व हा सकळ । भासे जैसिया तैसाचि ॥४॥ कृष्णाकृती भुललीं लोकें । जाऊंचि विसरलीं स्त्रिया बाळकें ॥ तंव ते कुब्जा भरुनी तबकें । घेउनी आली सुपरिमळें ॥ ५ ॥ उत्तम सुवास चंदनगंध । केशर कुंकुम कस्तुरी शुद्ध ॥ सुमनहार गुंफिले विविध । सुमनतुरे नानापरी ॥ ६ ॥ जात होती राजमंदिरा । तंव त्या देखिलें नंदकुमरा ॥ म्हणे आजिचि हे पूजा सुंदरा । चर्चूं श्रीकृष्णा निजहस्तें ॥ ७ ॥

॥ ३२२ ॥ कंसराया पुजितें नित्य । परि तो असुरचि उन्मत्त ॥ काय पुरवील मनींचा हेत । दासी किंकर मी त्याची ॥ १ ॥ परमात्मा हा सर्वेश्वर । कृष्ण सुंदरां अति सुंदर ॥ चर्चनमिसें लावीन कर । अति मनोहर करीन पूजा ॥ २ ॥ मग येऊनियां ते निकट जवळी । मस्तक ठेवी चरणकमळीं ॥ ह्मणे चंदन चर्चीन हा करतळीं । जरि तूं आज्ञा देसील ॥ ३ ॥ नित्य रायातें चर्चितां । चातुर्य आलें माझिया हाता ॥ आतांही तेथेंचि जात जातां । तूतें देखिलें निज दृष्टी ॥ ४ ॥ मग तैसीचि मी येथें आलें । तुझिया चरणातें पावलें ॥ दासी विद्रुपचि परी मज ठेविलें । रायें याचि कार्यावरी ॥ ५ ॥ जाणोनी तिचा अंतर्भावो । प्रसन्न झाले देवाधिदेवो ॥ म्हणती तरी तूं अवश्यमेवो । चर्ची चंदन निज हस्तें ॥ ६ ॥ निळा ह्मणे आली पूजा । नाहींचि त्यागणें गरुडध्वजा ॥ जैसिया तैसें मग हा वोजा । करी देणें यथोचित ॥ ७ ॥

॥ ३२३ ॥ रेखिले निढळीं केशरी टिळक । तयावरी कस्तुरी परम सुरेख ॥ उत्तम कुंकूं जाउली देख । लाविलिया आरक्त अक्षता ॥ १ ॥ मग तो चंदन मलयागर । चर्चिला सुवासित अति परिकर ॥ यावरी काढुनी सुमनहार । उभयतां कंठीं ओपिले ॥ २ ॥ तुरे खोविले मस्तकावरी । तेणें शोभले बळरामहरी ॥ मग ठेवुनियां चरणावरी । मस्तक नमूं उभी ठेली ॥ ३ ॥ कृष्ण बोलिले प्रसन्नोत्तर । कुब्जे तुझा केला अंगिकार ॥ यावरी सुख निर्भर । सध्यांचि फळ पावसी ॥ ४ ॥ मग चरणीं चरण देउनी नेटीं । हातें धरुनियां हनुवटी ॥ उपटितांचि ते गोरटी । झाली नीट फोकसी ॥ ५ ॥ रंभेहुनियां रूप अधिक । झालें देखती अवघे लोक ॥

विस्मयें तेणें पडिले ठक । करिती कवतुक अंतरीं ॥ ६ ॥ निळा ह्मणे याचिये हातीं । सकळ ब्रह्मांडाच्या उत्पत्ती ॥ न करी तें काय एक श्रीपती । निमिषमात्रें निज सत्ता ॥ ७ ॥

॥ ३२४ ॥ राया जाणविती सेवक । अक्रुरें आणिला नंदबाळक ॥ तेणें मर्दुनी वळिया रजक । धनुर्यागहि भंगिला ॥ १ ॥ आतां येऊनियां चौवारी । उभा रंगशिळेवरी ॥ अवघ्या पहाती नगरनारी । लोकपरिवारीं मिळोनी ॥ २ ॥ उभयतां बंधु अति सुंदर । बळिराम आणि सारंगधर ॥ आणिखीही गोळियांचे कुमर । संवगडे भार पांच शतें ॥ ३ ॥ कृष्ण लावण्य रूपाकृती । चंद्रसूर्या दवडी परती ॥ अनंग तोही उपभूपती । ऐसें सौंदर्य हरि अंगीं ॥ ४ ॥ लोक मिळाले भोंवते । पाहातां धणी न पुरे त्यांतें ॥ जाऊंचि विसरले मागुते । शोधले चित्तें हरिरूपा ॥ ५ ॥ आणिक एक वितलें राया । कुब्जे चंदनें चर्चिलें तया ॥ करूनियां ते दिव्य काया । ठेविली कृष्णें क्षणार्धे ॥ ६ ॥ निळा म्हणे सांगतां ऐसें । थकित रावो निज मानसें ॥ देहीं देहातें नुमसे । चित्रींचे लेप तयापरी ॥ ७ ॥

॥ ३२५ ॥ यावरी पुढील कार्यार्थु । साधावया श्रीकृष्णनाथु ॥ चालिले राजभुवना आंतु । तंव दारवंटा समस्त मल्ल उभे ॥ १ ॥ ह्मणती कोठें रे करूनियां मेळ । चालिले ते अवघेहि गोवळ ॥ नेणोनियां राजाज्ञा बळ । जैसे टोळ सैराट ॥ २ ॥ पाठवा पुढें कृष्ण तोचि । आणील परवानगी तो रायाची ॥ तंव गोवळ ह्मणती रे हें वांयाची । जल्पतां मराल येचि क्षणीं ॥ ३ ॥ परवानगिये एकचि ठावो । बळिराम अथवा कृष्णदेवो ॥ सांडुनियां कंसरावो । रिघारे शरण वांचाल ॥ ४ ॥ तंव ते ह्मणती हीं कच्चीं पोरें । चणचणा बोलती न्यायनिष्ठुरें ॥ भयाचि नेणती हे गव्हारें । आपटा एकदोनी धरूनियां ॥ ५ ॥ त्यांचिया कैवारा कृष्णनाथ । येईल आपोआप धांवत ॥ मग करूनियां वरवळा समस्त । त्यासीहि वधूं निमिषार्धे ॥ ६ ॥ निळा ह्मणे चिंतुनी ऐसें । धांविले गोवळावरी अति आवेशें ॥ तंव ते ओढिले नागरपाशें । बळिरामें एकदांचि कवळिले ॥ ७ ॥

॥ ३२६ ॥ तंव कृष्ण ह्मणे बळिरामदेवा । आमुचाहि वांटा कांहीं ठेवा ॥ ते ह्मणती यावरी अवघा । तुमचाचि भाग निश्चितार्थे ॥ १ ॥ कुळवई आणि राजा कंस । अर्थार्थी हे दिधले तुह्मांस ॥ कृष्णजी ह्मणती हें नये

चित्तास । यांतहि वांटा पाहिजे ॥ २ ॥ बरें ह्मणोनियां बळिराम । यांतहि घ्या हो निमेनिम ॥ मग मिसळले जेंवि निरसावया तम । चंद्रसूर्य पौर्णिमेचे ॥ ३ ॥ तेथें झाला हाहाःकार । घ्या घ्या शब्द उठिला थोर ॥ कृष्ण नेटका झुजार । आणि बळिरामहि महाबळी ॥ ४ ॥ करूनियां मल्लां महामारी । निर्दाळिले एका निमिषावरी ॥ तंव तो कुळवई लोटिला निशाचरी । कृष्णें सोंडेसीचि धरियला ॥ ५ ॥ आसडुनियां तो महीवरी । उपटुनी दांत घेतले करीं ॥ ठोकितां तेणेंचि मस्तकावरी । ठिकरिया केलीं गंडस्थळें ॥ ६ ॥ निळा ह्मणे बळियाबळी । माजि ब्रह्मांडा एक वनमाळी ॥ यापरी करूनियां खंदळी । निर्दाळिले असुर ॥ ७ ॥

॥ ३२७ ॥ कुळवई मर्दुनियां उन्मत्त । उपटुनियां घेतले त्यांचे दांत ॥ बळिराम आणि कृष्णनाथ । आनंदें नाचत रणसौरे ॥ १ ॥ दोघेहि बंधु अति सुंदर । लावण्यगुणें गुणगंभीर ॥ हें देखोनियां महावीर । मुष्टीक चाणुर उठावले ॥ २ ॥ ते रायाचे परम आप्त । आतुर्बळी बळ प्रताप ॥ जयां देखतांचि अहा कंप । देवां दैत्यां मानवां ॥ ३ ॥ दंडी मुडपी उरीं शिरीं । अद्भुत बळाची उजरी ॥ काळा सम तुल्य ते निशाचरी । जेठिया वस्ताद मल्लाचे ॥ ४ ॥ तयाचिये दृष्टीपुढें । मेरुमांदार भासती खडे ॥ मल्लविद्येमाजी निधडे । वीर उन्नत शिघ्रकोपी ॥ ५ ॥ जयाचा सदा आडदरा । समुद्रवलयांकिता वीरा ॥ धाकें त्याचिया कौंसासुरा । देती करभार सर्वही नृप ॥ ६ ॥ निळा ह्मणे ते अग्रगण । जेठियां माजी शिरोरत्न ॥ भुजादंडातें थोपटून । राहिले उठोन पुढें उभे ॥ ७ ॥

॥ ३२८ ॥ कृष्ण बळिरामातें ह्मणती । गोवळे तुह्मीं अर्भक जाती ॥ मारिला ह्मणोनी कुळवई हस्तीं । तेणेंचि स्फुंदें स्फुंदूं नका ॥ १ ॥ बहुत दिवस खादलें लोणी । चोरिये वोसिली दुधाणी ॥ भितरूनियां भोगिल्या गौळणी । त्याचीहि झडती निघेल ॥ २ ॥ न विचारित पतंग जैसा । झडपूं धांवे दीप प्रकाशा ॥ तैसे तुह्मी नेणत कौंसा । राया सन्निध पावलेती ॥ ३ ॥ पिपीलिके फुटतां पक्ष । ह्मणे गगन लंघीन मी अंतरिक्ष ॥ परी मृत्यु पातलाहे प्रत्यक्ष । न लक्षेचि परी ते झाली तुह्मां ॥ ४ ॥ रजक मर्दुनियां बलौता । निदसुरियां धनुर्धरां समस्तां ॥ यश मानियेलें परि तें आतां । येचि क्षणीं जाणवेल ॥ ५ ॥ पूतना बाई माभळ भट । एक ते स्त्री एक ते भट ॥ काग बगादिदैत्य आदट । नेणती मल्ल संग्रामा ॥ ६ ॥ निळा ह्मणे ठकिलें

त्यांसी । तेचि पाहों येथ आलेसी ॥ ऐसें बोलोनियां अति आवेशीं । भुजा थापटोनी ऊठिले ॥ ७ ॥

॥ ३२९ ॥ ऐसें बोलोनियां ते उन्मत्त । ठोक फोडिले सक्रोधयुक्त ॥ आले सन्मुखचि धांवत । कृष्णबळिरामेसी झगटावया ॥ १ ॥ त्यां देखोनियां बळिराम । आणि हांसोनी बोलती मेघःश्याम ॥ तुह्मी करूं आलेती संग्राम । तरी निरउनियां स्त्रियां बाळां ॥ २ ॥ आजिवरी भोगिलिया संपत्ती । ज्यांच्या संगें सुख विश्रांती ॥ त्यांसी न पुसतां जाणें अंतीं । महा पंथीं हें उचित नव्हे ॥ ३ ॥ कौंसरायाचें वैभव । भोगिलें चिरकाळ वरी सर्व ॥ त्याचिये काजीं वेंचितां जीव । पावाल स्वमेव उत्तम गती ॥ ४ ॥ परी एक सांगतों विचार । संग्रामीं न सांडावा धीर ॥ जें जें वसउनियां शरीर । असेल विद्या ते ते दावा ॥ ५ ॥ बहुत वल्गना केली आतां । वस्तादातें न पुसतां ॥ या वरी तरीं निश्चळ चित्ता । करूनियां आठवा तयातें ॥ ६ ॥ निळा ह्मणे बोलोनी ऐसें । युद्धीं उठावले सरिसे ॥ मातंगा देखोनियां जैसे । सिंह पाडे भुकाळू ॥ ७ ॥

॥ ३३० ॥ मेळवितांचि हातीं हात । आसुडिले ते अकस्मात ॥ हें देखोनियां लोक समस्त । ठेले विस्मित अवलोकिती ॥ १ ॥ एक एका धरिती करीं । दाविती चिकाटियाच्या परी ॥ दंडिमुंडपी उरीं सिरीं । मारिती थडका परस्परें ॥ २ ॥ पायीं पाय आडवे तिडवे । गोउनी दाविती शक्तिवैभवें ॥ वज्र मिठियांचीं लाघवें । दाविती सुहावे येरयेरां ॥ ३ ॥ कोणीचि नाटोपती कोणा । चक्राकार भेदिती खुणा ॥ रगा लाविती चाऊनि दशना । आक्रोशें माना मुरगाळिती ॥ ४ ॥ शेंड्या उपडुनियां सांडिती । घे घे ह्मणोनियां झोंबती ॥ येरयेरां पृष्ठीवरी ताडिती । मिठिया घालिती येरयेरां ॥ ५ ॥ एक वरदी एक ईश्वर । उभय युद्धाचा परिचार ॥ परी लाघविया हा सारंगधर । आणि बळिराम अवतारिया ॥ ६ ॥ निळा ह्मणे वर्मभेदका । पुढें कवणाचा आवांका ॥ पाहोनी मृत्युकाळ नेटका । उपटुनी भूमीतें त्राहाटिले ॥ ७ ॥

॥ ३३१ ॥ नाकीं तोंडीं वाहे रुधिर । हातापायांचा झाला चुर ॥ मस्तक मेंदु उसळे बाहेर । मुष्टिक चाणुर निर्दाळिले ॥ १ ॥ तया देऊनि उत्तम गती । आनंदें बाळिरामकृष्ण नाचती ॥ तांडव • विसरे उमापती ।

कौसल्य तयांचें देखोनी ॥ २ ॥ मोहित होऊनियां नारी नर । अवलोकिती वळिराम आणि श्रीवर ॥ परम सुंदरा सुंदर । नागरा नागर भुलवणे ॥ ३ ॥ अवलोकितां कृष्णाकृती । लवोंचि विसरलीं नेत्रपातीं ॥ वळिराम देवाचीही मूर्तीं । राजस सकुमार त्याचिपरी ॥ ४ ॥ अंगीं यशाचें गौरव । रूप लावण्याची ठेव ॥ पहातां नयना न पुरे हांव । मना स्वमेव तेंचि होणें ॥ ५ ॥ यापरी तटस्थ सकळा । लागले नरनारी बाळा ॥ तेणें ब्रह्मानंद सुकाळा । झाली अधिकारी भोगिती ॥ ६ ॥ निळा ह्मणे यावरी रावो । पावेल मुक्तीचा गौरवो ॥ सोलीव सुखाचा स्वानुभवो । समर्पील कृष्ण तयासी ॥ ७ ॥

॥ ३३२ ॥ सभे कंस सिंहासनीं । वैमल्याचि आश्चर्य देखिलें नयनीं ॥ गेले चकपक अंगींचे निघोनी । संचरला मनीं श्रीकृष्ण ॥ १ ॥ राव भयाचिये भक्ती । कृष्णचि देखे सकळां भूतीं ॥ आपआपणासी ही अंतीं । कृष्णरूपेंचि देखतु ॥ २ ॥ जें जें देखे चाखे ऐके । तें तें कृष्णाचिया रूपें एके ॥ ऐसा वेधोनियां निष्टंके । ठेला निजसुखें निजकृष्णीं ॥ ३ ॥ सैन्य संपदा घरें दारें । स्त्रिया आदि करूनियां लेंकुरें ॥ कृष्णावांचुनियां दूसरें । नाढळेचि जागृतीं निद्रे स्वप्नांत ॥ ४ ॥ कृष्णदेव आले जवळी । हेंही नेणे तो ते काळीं ॥ कृष्णावलोकनीं हे नव्हाळी । लाधली भयें आणि द्वेषें ॥ ५ ॥ कृष्णचि या आसनीं शयनीं । कृष्ण भोजनीं त्या प्राशनीं ॥ कृष्णासी देखे जनीं वनीं । घेतला वेष्टुनी कृष्णरूपें ॥ ६ ॥ कृष्णावांचुनी नुरेचि कांहीं । जिवीं मनीं बुद्धीं देहीं ॥ कृष्णचि होउनियां लवलाहीं । कृष्णामाजी मिसळला ॥ ७ ॥ कृष्णीं कृष्ण तदाकार । होउनियां राजा कंसासुर ॥ पावला विश्रांतीचें घर । योगी साचार न लाहती जें ॥ ८ ॥ निळा ह्मणे निजात्मज्योती । कंसाहृदयीं जे बहु काळ होती ॥ ते कृष्णें शोपुनियां निगुती । ठेविला आपुलिये निजहृदयीं ॥ ९ ॥

॥ ३३३ ॥ अग्निसंस्कार देउनी त्यासी । संपादिलें उत्तर विधीसी ॥ मग निजगजरें उग्रसेनासी । स्थापिलें राज्यसिंहासनीं ॥ १ ॥ नवाचि ध्वज नवें छत्र । द्वाही फिरविली सर्वत्र ॥ साखरा वांटुनियां नगरांत । केले दानपात्र परम सुखी ॥ २ ॥ रायाचे पूर्वील जे प्रधान । सन्मानिले ते गौरऊन ॥ प्रजेसी सिरपाव देऊन । अधिकारी जन सुखी केले ॥ ३ ॥ यावरी मातापिता बंदिखानीं । होतीं सां वाहेरी काढुनी ॥ वाद्यें लाउनी

मंगळस्नानीं । बरव्या प्रकारीं पूजिलीं ॥ ४ ॥ वस्त्रें अलंकारें गौरविलीं । निजमंदिरातें आणियेलीं ॥ सिबिकायानीं बैसविलीं । घोषगजरें मिरवित ॥ ५ ॥ तये काळींचा तो आनंद । सांगावया मी मतिमंद ॥ जेथें परमात्मा गोविंद । संतोषवित मातापिता ॥ ६ ॥ निळा ह्मणे बोबड्या बोलीं । हरीची कीर्ती हे वाखाणिली ॥ संतीं पाहिजे उपसाहिली । नेणतें लळिवाड ह्मणोनियां ॥ ७ ॥

॥ ३३४ ॥ मी तों नेणें व्यासवाणी । अर्थ गुह्यार्थ जें जें पुराणीं ॥ बोलिले कवी प्रसाद वाणी । तेही अर्थ मी नेणें ॥ १ ॥ आपुलिये आवडीचिये भरीं । गौरविली म्यां हे वैखरी ॥ श्रवण करावी हे चतुरीं । ऐशी नव्हेची मुग्ध वाणी ॥ २ ॥ परी एक आहे विश्वास थोरु । स्वामी तुकया हा सद्गुरु ॥ न करील कदाही अव्हेरु । भाव माझा जाणोनी ॥ ३ ॥ कृष्णचरित्रीं हे वाग्वाणी । वदविली तिहींचि वर देउनी ॥ पुरविली माझी हे आयणी । आर्त जाणोनी अंतरिचें ॥ ४ ॥ निळा ह्मणे कृष्णार्पण । होतु कथिले ते कृष्णगुण ॥ ऐसी हे प्रार्थना करून । ठविला मस्तक चरणावरी ॥ ५ ॥

---

## ललित.

॥ ३३५ ॥ गोड माझी वाणी तुम्ही करुनि श्रीहरी । लावावी वैखरी कीर्तनस्तवनीं आपुलिये ॥ १ ॥ इतुलेंनिचि सार्थक माझ्या होईल जन्माचें । अभयदान तुमचें ऐसें झालियावरी ॥ २ ॥ बहुत दिवस आस्था मनीं वाहिली हेचि । करावी तुमची सेवास्तुती निजभावें ॥ ३ ॥ निळा ह्मणे चरणावरी ठेविली डोई । अपराध ते माझे कांहीं मना नाणावे ॥ ४ ॥

॥ ३३६ ॥ उचित अनुचित आह्मी नेणों नेणतीं । सर्वाविशीं मूढचि मती विदीत असावें ॥ १ ॥ ह्मणोनियां आतां कृपादृष्टी अवलोका । वैकुंठनायका नका उपेक्षा करूं ॥ हीन दीन मूर्ख परि शरण तुह्मांसी । आलों हृषिकेशी अंगिकारावा ॥ ३ ॥ निळा ह्मणे तुह्मी देवा कृपासागर । मी तंव किंकर लवण रेणु सानासा ॥ ४ ॥

॥ ३३७ ॥ तुमचीया बळें तुह्मांसवें खेळावें । आपुल्या नाडावें मतिवादें धांवतां ॥ १ ॥ याचिसाठीं क्षणक्षणा विनंती करीं । ठेवावें मजवरी अवलो-

कन कृपेचें ॥ २ ॥ तुह्मांसी न भजतां योग याग सायास। तेचि भवपाश होती फळें देउनी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जप तप ध्यान संपत्ती। कृपेविण तुमचे होती बंधना मूळ ॥ ४ ॥

॥ ३३८ ॥ ऐसिया वेगडी नका गोऊं आह्मांसी। अनुसरलों सेवेसी तुमचे नामचिंतनीं ॥ १ ॥ नाना मतांतरें त्यांचे अर्थ विपरीत। नेऊनियां घालित मुखीं काळाचे सर्व ॥ २ ॥ नाना तर्कवाद भेदबुद्धी जल्पन। कैचें समाधान तेथें दर्शन तुमचें ॥ ३ ॥ निळा ह्मणे देखोनी ऐसें वाटतसे भय। न सोडूं ते पाय तुमचे सांपडले विटे ॥ ४ ॥

॥ ३३९ ॥ असों चरणावरी तुमच्या ठेउनियां मन। करुनियां कीर्तन रूपीं तुमचिया दृष्टी ॥ १ ॥ होईल ते हो कैसी आमुची गती। नेणों योगयुक्ती तप साधन दुसरें ॥ २ ॥ सांगितलें संतीं करा नामाचा घोक। नलगे मग आणिक कृपा करील श्रीहरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे विश्वासें त्या राहिलों ठायीं। ठेउनियां पायीं जीवभाव सकळ ॥ ४ ॥

॥ ३४० ॥ न मागों कांहीं तुम्हां धन वित्त संपत्ती। सोसुनी विपत्ती नाम गाऊं आवडी ॥ १ ॥ न घेऊनियां भार जाणीव शाहाणीव माथां। करूं तुमची कथा नित्यकाळ आवडी ॥ २ ॥ बसउनी संतसमुदाय भोंवते। गाऊं नाचूं प्रेमें आठउनी तुमतें ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐशापरी सारूं आयुष्य। करुनियां दास्य राहों तुमचे चिंतनीं ॥ ४ ॥

॥ ३४१ ॥ पावो माझी हेचि सेवा। करितों नित्यानित्य देवा ॥ १ ॥ तुजचि आवडीच्या सुखें। गातों वाणितों तें मुखें ॥ २ ॥ पढतों ज्या ज्या नामावळी। वाजऊनियां हातें टाळी ॥ ३ ॥ निळा म्हणे ध्यानीं मनीं। जे कां चिंतीतों चिंतनीं ॥ ४ ॥

॥ ३४२ ॥ दुजें नेणोनियां कांहीं। आठवितों तूतें देहीं ॥ १ ॥ यासी साक्षी तूंचि कीं गा। अंतरींचा पांडुरंगा ॥ २ ॥ जेजे उठीती संकल्प। मनीं ते ते तुमचें रुप ॥ ३ ॥ निळा म्हणे चित्तें वित्तें। होतें जें जें कांहीं जातें ॥ ४॥

॥ ३४३ ॥ नामीं गोंवियली वाचा। मनीं संकल्प हा तुमचा ॥ १ ॥ ऐसा वेष्टलों जी हरी। हातें पायें अवघ्यापरी ॥ २ ॥ देखों जायें रुप तें दिठी। श्रवणीं त्याही तुमच्याचि गोठी ॥ ३ ॥ निळा म्हणे घरीं दारीं। देशीं तूंचि देशांतरीं ॥ ४ ॥

॥ ३४४ ॥ देतां घेतां येतां जातां । सदा तुझी सन्निधता ॥ १ ॥ नाहींचि कल्पांतीं वियोग । ऐसें व्यापियलें अंग ॥ २ ॥ स्वप्न निद्रे आणि जागृती । अवघे ठायीं तुझीचि स्तुती ॥ ३ ॥ निळा ह्मणे देखे ऐके । संगें तुझ्या जें जें चाखे ॥ ४ ॥

॥ ३४५ ॥ ठेउनियां भाव तुमचिये चरणीं । बैसेन श्रवणीं वैष्णव करितां कीर्तन ॥ १ ॥ याचिपरी सार्थक हा करीन काळ । जाऊं नेदीं निर्फळ ऐसें आयुष्य नरदेह ॥ २ ॥ यथामती वर्णीन तुमचे कीर्ति पवाडे । नाचोनी बागडे निर्लज्ज होउनी मानसीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे हेंचि आर्त निरंतर माझें । चरण यासी साक्ष तुझे पंढरीनाथा ॥ ४ ॥

॥ ३४६ ॥ राहो ध्यानीं मनीं हेंचि नित्य रुपडें । जे कां वाडें कोडें आलें पुंडलिका भेटी ॥ १ ॥ ठेउनियां इटे दोन्ही चरण सकुमार । विराजले कर सुंदर कटिप्रदेशीं ॥ २ ॥ ज्यातें चिंतीताती योगी मुनिजन मानसीं । संत ज्यातें भजती नित्य कीर्तन आवेशीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे त्याविण दुजें नलगे मज कांहीं । जाणें अंतरींचें पांडुरंग सकळही ॥ ४ ॥

॥ ३४७ ॥ याचिया रूपाचें चिंतन । करितां तनुमन वेधलें ॥ १ ॥ देहीं नुरतां देहभाव । झालों स्वयमेव तेंचि रूप ॥ २ ॥ नाईकती शब्दा श्रवण । दुजिया नयन न देखती ॥ ३ ॥ निळा म्हणे बाविरी ऐसी । दिसे लोकांसी भीती वरी ॥ ४ ॥

॥ ३४८ ॥ परि हा लावी वाटे श्रुतीचिये ॥ १ ॥ वेदविहितासी न पाडी अंतर । लाघविया थोर सूत्रधारी ॥ २ ॥ भोगुनी गौळणी होय ब्रम्हचारी । अलिप्तपणें चोरी दहीं दुध ॥ ३ ॥ निळा म्हणे सर्व अग्नि-संगें जळे । परि दोषा नातळे अग्नी जेंवी ॥ ४ ॥

॥ ३४९ ॥ त्रिवेणीसंगमीं बुडती बहुत । नेघे प्रायश्चित्त त्यांचें गंगा ॥ १ ॥ ज्यांचें कर्म जैसें भोगिती ते फळ । गंगा तों निर्मळ जैसी तैसी ॥ २ ॥ बुडती जहाजें वायुचिया संगें । परि दोष नलगे वायूसी तो॥ ३ ॥ निळा म्हणे तैसा परमात्मा श्रीहरी । वर्ते सर्वांतरीं अलिप्तपणें ॥ ४ ॥

॥ ३५० ॥ मागें पुढें अवघा हरी । घरीं दारीं हृदयांत ॥ १ ॥ या-विण रितें न दिसे कोठें । सानें मोठें अणुरेणु ॥ २ ॥ गगन दिशा मही-

तळीं । माजि पोकळी तोचि तो ॥ ३ ॥ निळा म्हणे मनाबुद्धी । माजी संधी इंद्रियांच्या ॥ ४ ॥

॥ ३५१ ॥ निःसिम भाव देखोनी हरी । केली स्वीकारी पूजा साची ॥ १ ॥ पत्र पुष्प तोय फल । घाली सकळ मुखींचि तें ॥ २ ॥ कांहींचि नेदी जाऊं वायां । पाहे भक्तांचिया हाताकडे ॥ ३ ॥ निळा ह्मणे संतोष मानीं । क्षीराब्धीहुनी परमामृता ॥ ४ ॥

॥ ३५२ ॥ भाविकाचें अवघेंचि गोड । करुनि कोड स्वीकारी ॥ १ ॥ भोळानाथ पंढरीचा । न करी दासाचा अतिक्रम ॥ २ ॥ न ह्मणे रुक्ष थोडें कांहीं । घाली अवघेंही मुखींचि तें ॥ ३ ॥ निळा ह्मणे कृपावंत । उभा तिष्ठत इटेवरी ॥ ४ ॥

॥ ३५३ ॥ राजा जाय तिकडे ऐश्वर्य संपत्ती । वैभवें चालती समागमें ॥ १ ॥ वसे वनामाजी तेथें सर्व सिद्धी । घेउनी समृद्धी वसती पाशीं ॥ २ ॥ नाहीं उणें धना वस्त्रा आणि भूषणा । अन्ना काष्ठा जीवना तृणा सैन्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे देवा तुह्मी लक्ष्मीधर । उभे कटीकर जयापासीं ॥ ४ ॥

॥ ३५४ ॥ यात्रे अलंकापुरा येती । ते ते आवडती विठ्ठला ॥ १ ॥ पांडुरंगें प्रसन्नपणें । केलें देणें हें ज्ञान ॥ २ ॥ भूवैकुंठ पंढरपुर । साहुनी थोर महिमा या ॥ २॥ निळा ह्मणे जाणोनी संत । येती धांवत प्रतिवर्षीं ॥ ३ ॥

॥ ३५५ ॥ वर्णितां महिमा तो अगाध । जेथें सिद्ध अवतरले ॥ १ ॥ पशुमुखें वदउनी श्रुती । निर्जीव भिंती चालविली ॥ २ ॥ सन्मुख पुढें अजाण वृक्ष । पिंपळ प्रत्यक्ष सोन्याचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐकोनी कीर्ति । चांगदेव येती दर्शना ॥ ४ ॥

॥ ३५६ ॥ पंढरपुरीं ज्ञानेश्वरी । मुक्तीकामारी वोळगती ॥ १ ॥ तेथें देव येथें भक्त । महिमा अद्भुत दोहींचा ॥ २ ॥ तेथें ध्यान येथें ज्ञान । परलोकसाधन दो ठाईं ॥ ३ ॥ निळा ह्मणे तेथें गरुड । येथें झाड अजाण तरु ॥ ४ ॥

॥ ३५७ ॥ एक भूवैकुंठ एक शीवपीठ । महीमा वरिष्ठ दोहींचा ॥ १ ॥ तेथें पेरिलें नुगवे शेतीं । अस्थी विरती येथें उदकीं ॥ २ ॥ चंद्रभागा चक्र-

तीर्थ । भीमा समर्थ इंद्रायणी ॥ ३ ॥ निळा ह्मणे तेथें हनुमंत । येथें अश्वत्थ कनकाचा ॥ ४ ॥

॥ ३५८ ॥ पंढरिये अनुष्ठान केलें चंद्रें । अलकापुरीं इंद्रें तपश्चर्या ॥ १ ॥ तेथें इंदु निष्कलंक अंगें । येथें आरोग्यभगें सुरेंद्रता ॥ २ ॥ हरिहररूपें पंढरिरावो । येथें तिन्ही देवो सिद्धरूपें ॥ ३ ॥ निळा ह्मणे तेथें भक्ती । येथें विरक्ती प्रगटली ॥ ४ ॥

॥ ३५९ ॥ ऐसा दोहीं स्थळींचा महिमा । अगाध उपमा नाहीं त्या ॥१॥ पंचक्रोशीमाजी भार । छबिने अपार मिरवती ॥ २ ॥ वैष्णव करिती नामघोष । नाचती उदास कीर्तनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे भुक्ती मुक्ती । जोडती विरक्ती अनायासें ॥ ४ ॥

॥ ३६० ॥ येऊनियां कृपावंतें । तुकयास्वामी सद्गुरुनाथें ॥ १ ॥ हात ठेविला मस्तकीं । देउनी प्रसाद केलें सुखी ॥ २ ॥ माझी वाढविली मती । गुण वर्णावया स्फूर्ती ॥ ३ ॥ निळा ह्मणे मी बोलतां । दिसे परी हे त्याची सत्ता ॥ ४ ॥

॥ ३६१ ॥ नाहीं माझा उरविला । संदेह अवघाचि फेडिला ॥ १ ॥ ह्मणोनियां साच्या सुखें । नाचें कीर्तनीं मी हरिखें ॥ २ ॥ बोलविती जें जें वाचे । तें तें अक्षर निश्चयाचें ॥ ३ ॥ निळा ह्मणे मी नेणें गती । अर्थ त्याचा ते जाणती ॥ ४ ॥

---

## करुणा.

॥ ३६२ ॥ चिंतीतों मी चिंतनीं । रूप तुमचें अनुदिनीं ॥ १ ॥ कराल कृपा ह्मणोनीयां । विठो पंढरीच्या राया ॥ २ ॥ मागें उद्धरिले बहुत । लहान थोरले पतीत ॥ ३ ॥ नेले वैकुंठासी । महा पापी महा दोषी ॥ ४ ॥ ऐसी ऐकोनियां मात । चरणीं विगुंतला हेत ॥ ५ ॥ निळा ह्मणे याचि लागीं । घेतों लाहो करितों सलगी ॥ ६ ॥

॥ ३६३ ॥ पायापाशीं जीव । ठेवियला तुमच्या भाव ॥ १ ॥ न्याल ह्मणोनियां सदना । विठ्ठल देवा कृपाघना ॥ २ ॥ आळवितों नामें । लाहो करुनियां प्रेमें ॥ ३ ॥ निळा ह्मणे दिवसराती । दुजें नेणोनियां चित्तीं ॥ ४ ॥

॥ ३६४ ॥ आणिखी उपाय । सांडीयले ते अपाय ॥ १ ॥तुमच्या नामाविण हरी । नेणों दुजी कांहीं परी ॥ २ ॥ सांगती साधनें । परी ते वाटती बंधनें ॥ ३ ॥ निळा ह्मणे देवा । जैसी तैसी घ्याहो सेवा ॥ ४ ॥

॥ ३६५ ॥ भोळा भाव माझा । जाणा तुह्मी गरुडध्वजा ॥ १ ॥ काय जाणें वेदोनीती । योगकळा आत्मस्थिती ॥ २ ॥ करितों कीर्तन । नामीं तुमचें अनुसंधान ॥ ३ ॥ निळा ह्मणे कराल कृपा । ह्मणोनियां वैकुंठ भूपा ॥ ४ ॥

॥ ३६६ ॥ कळासलें मनीं । तेंचि उपदेशा तों कानीं ॥ १ ॥ भवाब्धी हा तरावया । नाम तुमचें पंढरिराया ॥ २ ॥ आपणा आणि आणिकां । आड येऊं नेदूं शंका ॥ ३ ॥ निळा ह्मणे जीवेंसाठीं । करितों करुनीयां आटी ॥ ४ ॥

॥ ३६७ ॥ आटी तो आटणी । करुनी इंद्रीयां दाटणी ॥ १ ॥ कवळुनियां नामापाशीं । तुमच्या ठेवितो सायासीं ॥ २ ॥ नेदी घेऊं वावो । दुजा न देऊनियां ठावो ॥ ३ ॥ निळा ह्मणे ज्योती । जागवीतो दिवसराती ॥ ४ ॥

॥ ३६८ ॥ असो त्याची मात । गाऊं गीतीं पंढरिनाथ ॥ १ ॥ जेणें मनासीं विश्रांती । फावे इंद्रियां सुखशांती ॥ २ ॥ आळवितां नामें । भुवनें चौदाही संगमें ॥ ३ ॥ निळा म्हणे वैकुंठवासी । करी कृपा राहे पासीं ॥ ४ ॥

॥ ३६९ ॥ एकचि अक्षर वाचेसी येतां । पुढें वाढवितां विस्तारें ॥ १ ॥ कां हे चेष्टविली वाणी । माझी चक्रपाणी मी नेणें ॥ २ ॥ आईता जोडुनियां रस । लावितां सारांश निवडूनी ॥ ३ ॥ निळा म्हणे आतां तर जाणा । तुम्हीं सुजाणा कृपाब्धी ॥ ४ ॥

॥ ३७० ॥ जे जे बोलवितां बोल । अर्थ सखोल त्यामाजी ॥ १ ॥ आवडी ऐसें आपुले देवा । वदवा रंजवा आपणीया ॥ २ ॥ सारुनियां लौकिक लाज । नाचवा भोज कवतुकें ॥ ३ ॥ निळा म्हणे कृपातरणी । प्रकाशवाणी करुनीयां ॥ ४ ॥

॥ ३७१ ॥ एकाक्षरीं विस्तार करा । अर्थांतरा मेळवूनी ॥ १ ॥ हे तों माझी नव्हे युक्ति । चेतवणें स्फूर्ति तुमची हे ॥ २ ॥ वसंताच्या ईक्षणमात्रें । पल्लव पत्रें फळें वृक्षा ॥ ३ ॥ निळा ह्मणे रविकीर्णें । विकाशवणें कमळासी ॥ ४ ॥

॥ ३७२ ॥ कृपावंता दया मोठी । आदर पोटीं दासाचा ॥ १ ॥ ह्मणोनियां सांभाळ करा । नेदा अविचारा आतळों ॥ २ ॥ आपुलीये सेवेवीण । न ठेवा क्षण पळ एक ॥ ३ ॥ निळा ह्मणे प्रेमरसें । जेववा सरिसें सांगातें ॥ ४ ॥

॥ ३७३ ॥ आतां याचा घेउनी त्रास । आलों तुम्हांस शरण हरि ॥ १ ॥ घ्याल तरी सोडवून । या काळापासून पुण्य तुमचें ॥ २ ॥ आह्मासी तो न कळे गति । कैसी निर्गती करावी तें ॥ ३ ॥ निळा ह्मणे घ्या हो धर्म । काढा अकर्म कर्मांतुनी ॥ ४ ॥

॥ ३७४ ॥ तुम्हांविण कोणां सत्ता । आहे अनंता यदर्थी ॥ १ ॥ जन्म-मरणा हरूनियां । करीं निज छाया कृपेची ॥ २ ॥ कोण ऐसा आहे त्राता । भवभयहर्ता तुजविण ॥ ३ ॥ निळा ह्मणे ह्मणोनि आलों । तुमचा झालों शरणांगत ॥ ४ ॥

॥ ३७५ ॥ मागें उदंड साधनें केलीं । उत्तीर्णते झालीं कर्मफळें ॥ १ ॥ परि तुमचें नेदिती च प्रेम । वाढविती श्रम संसारींचा ॥ २ ॥ जया नाहीं मार्गेचि ठावा । काय तें गांवा पावविती ॥ ३ ॥ निळा ह्मणे काटवणीं । घालिती घालणीं जाणिवेच्या ॥ ४ ॥

॥ ३७६ ॥ म्हणोनियां विटलें मन । आलें परतोन माघारिया ॥ १ ॥ तुमाचिया नामस्मरणीं । रतलें चरणीं मुखावलें ॥ २ ॥ नाहीं येथें घात पात । पाववी निभ्रांत निज ठाया ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसिया आशा । राहिलें भरंवसा मानूनियां ॥ ४ ॥

॥ ३७७ ॥ माझिया भावाचें खंडण । नव्हे ऐसें करा दान ॥ मुखीं नाम तुमचें स्मरण । राहो चरणावरी दृष्टी ॥ १ ॥ आाणखी मी न मागें कांहीं । वसो प्रेम तुमच्या ठायीं ॥ करुनी कृपा आठव देई । आवडी कीर्तनीं सर्वदां ॥ २ ॥ सुखें भोगीन प्रालब्ध ठेवा । येईल तैसा वोढवोनी देवा ॥ मानामान न करीं हेवा । विसर न पडावा तुमचा चि ॥ ३ ॥ काय करतील निंदक जन । आसना ठायीं सावधान ॥ तुमचें करितां नित्य चिंतन । कैचें बंधन आम्हां दासां ॥ ४ ॥ गाईन गुण तुमचे गीतीं । विषयवासनादिकां शांती ॥ तुमच्या पायीं जडतां प्रीती । निळा विनंति करी ऐसी ॥ ५ ॥

॥ ३७८ ॥ कृपा करुनी माझी मती । वाढती केली तुम्हीं प्रीती ॥१॥ तरी पाववाजी पार । केलिये कथेचा विस्तार ॥ २ ॥ वदवावी वैखरी । देहा अवसान तोंवरी ॥ ३ ॥ निळा म्हणे न सांडावा । अभिमान आपुला जी देवा ॥ ४ ॥

॥ ३७९ ॥ अवलोकुनी माझिया भावा । करावा देवा अंगीकार ॥ १ ॥ जेणें तुमची घडेल सेवा । होईन दैवा पात्रभूत ॥ २ ॥ धरिल्या जन्माचें सार्थक । घडेल लोक मानवती ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसें करा । अहो दातारा पंढरीच्या ॥ ४ ॥

॥ ३८० ॥ दीनबंधु आत्मयारामा । सुखविश्रामा विश्वजनका ॥ १ ॥ परात्परा पुरुषोत्तमा । आगमानिगमा जगवंद्या ॥ २ ॥ निर्विकल्पा निरंजना । सुखनिधाना गुणमूर्ती ॥ ३ ॥ अगा ये निळयाच्या दातारा । रुक्मिणीवरा श्रीविठ्ठला ॥ ४ ॥

॥ ३८१ ॥ गोपीवल्लभा कमलाकांता । अनाथनाथा श्रीविठ्ठला ॥ १ ॥ तुमचा दास झालों आतां । करा जि सरता पायापें ॥ २ ॥ गाऊनियां नामावळी । नाचेन टाळी वाजवित ॥ ३ ॥ निळा म्हणे घ्याल सेवा । पात्र दैवा तैं झालों ॥ ४ ॥

॥ ३८२ ॥ केव्हां भेटी देसी जीवाच्या जीवना । सुखाच्या निधाना पांडुरंगा ॥ १ ॥ वोरसलें मन नित्य वाट पाहे । नयनीं निज नये दिवसरात्रीं ॥२॥ आला जातो दिवस मास घटिका पळ । प्राण हा विव्हळ तुजलागीं ॥ ३ ॥ हुरहुरी चित्त सदा उत्कंठित । न पुरेचि हा हेत चिंता वाटे ॥ ४ ॥ केव्हां येईल सार्थकाची वेळ । येसी कृपाळ धांवोनियां ॥ ४ ॥ निळा म्हणे आतां न लावावा उशीर । भेटोनी अंतर निववावें ॥ ५ ॥

॥ ३८३ ॥ पाहावीं पाउलें नयनीं हेंचि आर्त । देखिलिया चित्त समाधान ॥ १ ॥ क्षणभंगुर हा येथींचा पसारा । याचिलागीं करा त्वरा आतां ॥ २ ॥ पाहोनी श्रीमुख धरीन हृदयीं । मग हो भलतें कांहीं देहा प्राणा ॥ ३ ॥ आल्याचें सार्थक हेंचि नरदेहा । नाहीं तरि हे हा हा भूत सर्व ॥ ४ ॥ म्हणोनी लवलाहो करितों याचिसाठीं । तुमच्या व्हावी भेटी पायासवें ॥ ५ ॥ निळा म्हणे आतां विलंब न करावा । येऊनियां देवा सांभाळावें ॥ ६ ॥

॥ ३८४ ॥ धांवोनी मी येतों परि नेणें मारग । तूंचि लागवेग करीं आतां ॥ १ ॥ अनाथ मी दीन रंक शरणांगत । म्हणऊनियां त्वरित सांभाळावें ॥ २ ॥ अहो दीनानाथा दीनबंधु देवा । मनींचा हा उगवावा हेत माझा ॥ ३ ॥ तुम्हां तो येविशीं न लगती सायास । प्रगटावया दिवस मास पळ ॥ ४ ॥ मी तों सर्व भावें आहें बुद्धीहिन । नेणें करूं ध्यान स्तवन पूजा ॥ ५ ॥ निळा म्हणे तुम्ही कृपेचे सागर । जाणतां अंतर सर्वसाक्षी ॥ ६ ॥

॥ ३८५ ॥ धराल जरी चित्तीं न लगेचि तरी वेळ । आहेती सकळ कळा हातीं ॥ १ ॥ क्षणेंचि सगुण क्षणेंचि निर्गुण । क्षणेंचि प्रसन्न होतां दासा ॥ २ ॥ क्षणेंचि निर्मिले चतुर्दश लोक । देव ब्रम्हादिक चौदा मनु ॥ ३ ॥ झकवाल तरी ठकडे देवां ब्रम्हादिकां । भेटाल तरि भाविकां नलगे वेळ ॥ ४ ॥ ऐसें संत मुनी जाणती सकळ । क्रीडा तुमचा खेळ ठावा तयां ॥ ५ ॥ निळा म्हणे माझें अंतरींचें आर्त । जाणतां सतत साक्ष तुम्ही ॥ ६ ॥

॥ ३८६ ॥ कळासूत्री तुम्ही नाटका नटक । देव ब्रम्हादिक आज्ञाधार ॥ १ ॥ न सांगतां कळे सर्व अंतरींचें । सकळहि जीवाचें मनोगत ॥ २ ॥ माझेविशीं कां हा मांडिला आळस । भेटीचा वोरस वांया धाडा ॥ ३ ॥ जीवित्वाची ऐसी मांडिली फरारी । झालों भूमीवरी भार वृथा ॥ ४ ॥ श्लाघ्यचि न वाटे जिणें झालें ओस । धरिलें उदास तुम्ही देवा ॥ ५ ॥ निळा म्हणे धीर नुपजे चि आतां । तुम्हीं तों अनंता मोकलिलें ॥ ६ ॥

॥ ३८७ ॥ अनाथाची कोण पाववील हांक । तुम्हीं तो नाईक ब्रम्हांडाचे ॥ १ ॥ मी एक दुर्बळ येतों काकुलती । नेणा चि श्रीपति काय करूं ॥ २ ॥ कोण तुम्हांपासीं जाणवील मात । होऊनि कृपावंत मजवरी ॥ ३ ॥ तुम्हांसी तो धंदा बहुत बहुतांचा । तयामाजि कैंचा आठव माझा ॥ ४ ॥ जेथें थोर थोर संत मुनीश्वर । सनकादिक सुरवर भीड त्यांची ॥ ५ ॥ निळा म्हणे व्यर्थ गेलों वांयाविण । केला उरला सिण जन्मवरी ॥ ६ ॥

॥ ३८८ ॥ सांभाळिलें बहुतां ऐकिली प्रशंसा । तुम्हीं जगदाधीशा युगायुगीं ॥ १ ॥ म्हणऊनियां आसे लागलों नेणता । बुडऊनि याथितां संसार ॥ २ ॥ आतां माझी कोण करील बुझावण । तुम्हीं उदासीन झाल्यावरी ॥ ३ ॥ कोणिये ब्रम्हांडीं रहिवास तुमचा । लाग माग त्याचा

न पडे ठायीं ॥ ४ ॥ अंतरलों बहु दूर दूर देशीं । कोण सांगायासी येईल तेथें ॥ ५ ॥ निळा म्हणे माझें प्रालब्धचि खोटें । म्हणऊनि वैकुंठें त्याग केला ॥ ६ ॥

॥ ३८९ ॥ लाज वाटे जीव करी तळमळ । चिंते वक्षस्थळ व्यापियेलें॥१॥ पडिलों निढळ न सुचेचि विचार । तुम्हीं तों निष्ठुर धरियेलें ॥ २ ॥ कैसेनि भेटी होईल पायासी । उचडल्या राशी पापाचिया ॥ ३ ॥ काय नेणों पूर्वी केलें आचरण । तें आलें मोडोन फळभारें ॥ ४ ॥ नामाच्या चिंतनें नव्हे त्याची शांती । ऐशी काळगती विपरित ॥ ५ ॥ निळा म्हणे नेणें आपुलिया मती ॥ परि तुम्ही श्रीपति सर्व जाणा ॥ ६ ॥

॥ ३९० ॥ गेलें वेंचोनियां वय याचिपरी । चिंता महापुरीं वाहावलों ॥ १ ॥ धरियेला होता तो विश्वास मानसीं । येणें काळें त्यासी क्षय आला ॥ २ ॥ आतां कोठवरी धरावा तो धीर । न दिसे पायीं थार तुमचिये ॥ ३ ॥ मागें कितेकासी तुह्मी उठाउठीं । येऊनि धरिलें पोटीं निववीलें ॥ ४ ॥ माझे वेळे कांहो पडिला ऐसा फेर । कर्म बळोत्तर ओढवलें ॥ ५ ॥ निळा म्हणे करूं किती तरी शोक । वचनाचाहि एक आश्रय नये ॥ ६ ॥

॥ ३९१ ॥ नाहींचि केलें समाधान । माझें म्हणवून क्षिती वाटे ॥ १ ॥ आतां कधीं समोखाल । हातीं धराल प्रीतीनें ॥ २ ॥ मागें बहुतां सांभाळिलें । आजि तें केलें ब्रिद मिथ्या ॥ ३ ॥ निळा म्हणे निवडलें खोटें । माझेंचि वोखटें अदृष्ट ॥ ४ ॥

॥ ३९२ ॥ नाहीं घडली कमाई तैसी । मागें जैसी संतांची ॥ १ ॥ म्हणोनियां उपेक्षीलें । ऐसिये लोटिलें भवार्णवीं ॥ २ ॥ जे काम क्रोधा ऐसें । कवळती भासे जळचर ॥ ३ ॥ निळा म्हणे काढिल कोण । येथें धांवोन मज आतां ॥ ४ ॥

॥ ३९३ ॥ नाहीं भजन पूजन केलें । पुर्वी हें आलें स्वानुभवा ॥ १ ॥ तुम्हीं अव्हेरिलें देवा । करितां धांवा नाईका ॥ २ ॥ कैसेनि करुणा कराल आतां । मजवरी अनंता मी नेणें ॥ ३ ॥ निळा म्हणे गेलों वायां । आजि या ठाया पावोनी ॥ ४ ॥

॥ ३९४ ॥ गोमटा म्हणती मानव देहो । केला उपाव फळ देतो ॥ १ ॥ तरी कां माझा विफळ गेला । धांवा केला तुमचा तो ॥ २ ॥ कांहीं च न करा आश्वासन । उद्विग्न मन यासाठीं ॥ ३ ॥ निळा म्हणे यावरि काय । कीजे उपाय तो नेणें ॥ ४ ॥

॥ ३९५ ॥ शोकार्णवीं पडिलें मन । तुमचें न देखोन स्वागत ॥ १ ॥ उदासीन धरिलें देवा । तुम्ही बांधवा दीनाच्या ॥ २ ॥ माझेंचि कर्म बलोत्तर । नेघा समाचार म्हणोनी ॥ ३ ॥ निळा म्हणे पडलों सांदीं । संसारबंदीं न सुटेची ॥ ४ ॥

॥ ३९६ ॥ तुम्ही तों कृपेचे सागर । परि दुस्तर कर्म माझें ॥ १ ॥ म्हणोनियां नये करुणा । माझीया दुर्गुणा देखोनी ॥ २ ॥ नेणें जप तप ध्यान कांहीं । पडिलों प्रवाहीं प्रपंच्या ॥ ३ ॥ निळा म्हणे केली सेवा । माझी हे देवा न पवे चि ॥ ४ ॥

॥ ३९७ ॥ किती तरी चिंता करूं । धीर धरूं कोठवरी ॥ १ ॥ आला दिवस बुडोनी जातो । अतिशयचि रहातो केला तो ॥ २ ॥ निश्चयें माझा अव्हेर केला । यावरी विठ्ठला कळों आलें ॥ ३ ॥ निळा म्हणे आधार नेदा । कांहींचि गोविंदा चित्तासी ॥ ४ ॥

॥ ३९८ ॥ निंदील कोणी मज तो निंदू । अथवा स्तुतिवादु करोत सुखें ॥ १ ॥ परि मी गाइन पंढरिनाथा । गुण तत्वता तुमचेचि ॥ २ ॥ आवडी आईक तूं कानीं । अथवा सागुनी वोसंडीं तूं ॥ ३ ॥ निळा म्हणे देउनि बळ । वदवीतो कृपाळ विश्वजनिता ॥ ४ ॥

॥ ३९९ ॥ आळवीन क्षणक्षणा । नारायणा या नामें ॥ १ ॥ या हो या हो पंढरिनाथा । कृपावंता सामोरे ॥ २ ॥ आलियाचा हरा सिण । द्या जि आलिंगन धांवोनी ॥ ३ ॥ निळा म्हणे परस्परें । असादरें आदर ॥ ४ ॥

॥ ४०० ॥ सोरत आलों तुमच्या नामें । पुरें ग्रामें ठाकित ॥ आतां चरण दावा दिठी । घाला कंठीं निर्माल्य ॥ २ ॥ उसंतितां रानें वनें । पुरलें पेणें येथवरी ॥ ३ ॥ निळा म्हणे आलिंगन । द्या हो घालून कर कंठीं ॥ ४ ॥

॥ ४०१ ॥ आतां पुरवा मनींचा हेत । करा हे उदित भेटिसी ॥ १ ॥ रूप पहावया डोळे । माझे भुकेले बहुकाळ ॥ २ ॥ चरण वदांवया भाळ । करी तळमळ अखंड ॥ ३ ॥ निळा म्हणे पुरवा कोड । जाणा चाड अंतरींची ॥ ४ ॥

॥ ४०२ ॥ कोण भाग्याचे ते लोक । केलें कौतुक तुम्ही ज्यांचें ॥ १ वागउनियां कडिये खांदीं । निजात्मपदीं स्थापियलें ॥ २ ॥ ज्याचिया वचनासाठीं उडी । घालुनी तातडी उभें ठाके ॥ ३ ॥ निळा म्हणे दिवस राती । जयाप्रती न विसंबा ४ ॥

॥ ४०३ ॥ काय नेणों आचरण केलें । जया आलिंगिलें हृदयेंसी ॥ १ ॥ हें तो न कळे माझिये मती । याचि लागीं चित्तीं व्याकुळ ॥ २ ॥ कोण्या भजनें प्रसन्न व्हाल । आपुला म्हणवाल शरणांगत ॥ ३ ॥ निळा म्हणे दिवाभीता । जेंवि कां सविता उबगला ॥ ४ ॥

॥ ४०४ ॥ आंधळिया उगवोनी रवी । न दिसेचि तेंवि मज झालें ॥ १ ॥ तेंवी तुम्ही स्वतःसिद्ध हरी । परि मी माझारी भ्रांतीतमा ॥ २ ॥ रोग्या रसने कैंची गोडी । जे ते निवडी रस स्वाद ॥ ३ ॥ निळा म्हणे वेडिया गोत । नाढळे धन वित्त दरिद्रिया ॥ ४ ॥

॥ ४०५ ॥ तुम्ही देवा प्रत्यक्ष असा । परि मी कैसा ओळखों ॥ १ ॥ जेव्हां प्रगटोनी भेटी द्याल । तेव्हांचि फावाल सुरवाडे ॥ २ ॥ निर्धना निक्षेप असोनी धन । जेंवि तें न देखोन दैन्य भाकी ॥ ३ ॥ निळा म्हणे झाली परी । तैसीच मज हरि नेणतां ॥ ४ ॥

॥ ४०६ ॥ एकदां तरी देखिल्याविण । कैसेनि मी कोण ओळखें ॥ १ ॥ अमृताची ऐकिल्या गोडी । रसने ते फुडी केंवि लाभे ॥ २ ॥ क्षीराब्धी हे शेषशयन । जगीं न देखोन अनोळखा ॥ ३ ॥ निळा म्हणे त्यापरी देवा । नये स्वानुभवा काय करूं ॥ ४ ॥

॥ ४०७ ॥ एकदां तरी दाखवा डोळां । तेचि वेळोवेळां आठवीन ॥ १ ॥ स्वरूप तुमचें पुरुषोत्तमा । अहो मनोरमा विश्वाचिया ॥ २ ॥ मग मी तुम्हां न करीं पीडा । संदेह येवढा निवारिल्या ॥ ३ ॥ निळा म्हणे अंतर जाणा । यदर्थीं कृपणा नये होऊं ॥ ४ ॥

॥ ४०८ ॥ अंतरींचें जाणा वर्म । कर्माकर्म फळ दाते ॥ १ ॥ तरि कां माझा अव्हेर केला । काय तो देखिला स्वभाव दुष्ट ॥ २ ॥ नेणें करूं तुमची सेवा । परि मी देवा नाम जपें ॥ ३ ॥ निळा म्हणे यावरि आतां । येईल चित्ता तैसें करा ॥ ४ ॥

॥ ४०९ ॥ मी तो दीन नेणें रंक । परि तुम्ही चाळक ब्रम्हांडा ॥ १ ॥ केले अपराध क्षमा करा । काय म्यां दातारा विनवावें ॥ २ ॥ येवढेंचि आहे माझे हातीं । यावें काकुलती तुम्हांसी तें ॥ ३ ॥ निळा म्हणे उचिता जागा । आपुल्या हो श्रीरंगा पंढरिच्या ॥ ४ ॥

॥ ४१० ॥ आपुलें तुम्हीं न संडावें । कर्म स्वभावें आहे तें ॥ १ ॥ सांभाळावें नामधारका । निरसुनी पातका भेटी द्यावी ॥ २ ॥ सूर्य न संडी प्रकाश जेंवी । रक्षी पद्वी जे आहे ॥ ३ ॥ निळा म्हणे त्यापरी देवा । आमुचा करावा प्रतिपक्ष ॥ ४ ॥

॥ ४११ ॥ जया जो वांटा भागा आला । पाहिजे केला जतन तोचि ॥ १ ॥ आम्ही कराव्या पापरासी । निरसन तयासी तुम्ही कीजे ॥ २ ॥ लोहो न संडितां लोहपणा । परिसें ततक्षणा पालटावें ॥ ३ ॥ निळा म्हणे अंधार निशी । रवी त्या प्रकाशी निज तेजें ॥ ४ ॥

॥ ४१२ ॥ ऐकिला तुमचा अगाध महिमा । दोषियां अधमां तारि-तसां ॥ १ ॥ म्हणोनियां जि आलों शरण । सत्य मानूं संतवाणी ॥ २ ॥ यावरी कराल अव्हेर तरी । लागेल श्रीहरि बोल तुम्हां ॥ ३ ॥ निळा ह्मणे आमुचें जिणें । आहे हें वायां ये ठायींचें चि ॥ ४ ॥

॥ ४१३ ॥ असतें उत्तम सुकृत जरि गांठी । तरी कां ऐसी आटी पडती देवा ॥ १ ॥ लाजोनियां आजि पळतसां माघारे । ऐकोनी उत्तरें करुणेचीं हीं ॥ २ ॥ नये कांहीं मना सेवा माझी भक्ति । तरिच धरिलें चित्तीं उदासीन ॥ ३ ॥ निळा म्हणे माझा पुरता आला वीट । देखोनी आदट कर्मबळी ॥ ४ ॥

॥ ४१४ ॥ गेलेती आपुल्या ब्रिदातें विसरोनी । ऐसें धरिलें मनीं निष्ठुरपण ॥ १ ॥ येरवीं ऐकोनि धांवतसां धांवा । तें आजि केशवा काय झालें ॥ २ ॥ आटाहास्य तुम्हां मारितां आरोळी । नाईकाचि

टाळी बैसउनी ॥ ३ ॥ निळा म्हणे माझें कर्म आलें आड । न चले चि कैवाड तुमचा देवा ॥ ४ ॥

॥ ४१५ ॥ दाटलिया धुई आच्छादी रवी तेजा । त्याचिपरि माझा दोष बळी ॥ १ ॥ न चले चि पुढें तुमची ही युक्ति । सुदर्शन हातीं असोनियां ॥ २ ॥ काय चाले बळ सागराचें वडवानळीं । करित उठी होळी जीवनाची ॥ ३ ॥ निळा ह्मणे तैशा परी जी अनंता । माझीया संचिता न जिकावें ॥ ४ ॥

॥ ४१६ ॥ दोरिचाचि सर्प परि होय मारक । संदेहकारक नोळखतां ॥ १ ॥ तैसी परी केली तुह्मां माझ्या कर्में । सांडविलें नेमें स्वधर्मासी ॥ २ ॥ लटिक्याचि झकवणें दचक बैसला । परि तो प्राणा गेला हरुनियां ॥ ३ ॥ निळा ह्मणे तुह्मां कुंठितचि केलें । ऐसें माझें झालें कर्म बळी ॥ ४ ॥

॥ ४१७ ॥ लटिक्या भूताची लटिकी भूतबाधा । झाली करवी खेदा जाणतिया ॥ १ ॥ तैसें तुह्मां केलें माझिया संचितें । देवपणहि थितें ही रचिलें ॥ २ ॥ लटिकीचि जळीं दाऊनियां छाया । झकविलें राया श्वापदाच्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे स्वप्नीं सिंहाचें रुपडें । देखोनियां पडे मदोन्मत्त ॥ ४ ॥

॥ ४१८ ॥ लोभियानें धन केलें भूमिगत । दगडही थित घालुनी वरी ॥ १ ॥ तैसें तुह्मी देवा केलें आपणासी । कळंक यशासी लावियला ॥ २ ॥ बुडविलें राज्य रायें सुरापानें । नसतां सावधान राज्यकार्या ॥ ३ ॥ निळा म्हणे आळसें बुडविला संसार । न गमतां व्यवहार साउकारें ॥ ४ ॥

॥ ४१९ ॥ देवपण तुह्मी गमाविलें देवा । नाईकोनी धांवा येणें काळें ॥ १ ॥ न करा धांवणें केल्या कंठस्फोट । क्रिया ऐशी नष्ट धरियेली ॥ २ ॥ प्रेतापासीं हांका देतां तें नाईके । थोटावला ठाके शोक नाना ॥ ३ ॥ निळा म्हणे नये करूं आतां आस । तुमची हें चित्तास कळों आलें ॥ ४ ॥

॥ ४२० ॥ नेणा कांहीं तुम्ही आपुलिया मुखें । इतरांचीं दुःखें पिडीती तें ॥ १ ॥ यातना बहुवस संसार कांचणी । जाचती जाचणी जन्म जरा

। २ ॥ व्याधीचे वळसे दरिद्राची पीडा । मृत्यूचा येवढा होतां मार । ३ ॥ निळा म्हणे सांपडली काळा हातीं । नुगवती गुंती उगवीतां ॥ ४ ॥

॥ ४२१ ॥ मृत्यूची अवस्था नेणोंचि अमृत । पीडा भाग्यवंत दरिद्राची । १ ॥ तैसे तुह्मी नेणा आमुचे तळमळे । भोगितां सोहळे आपुले चि ॥ २ ॥ सिंधु काय जाणे तहानेची बाधा । पयोनिधी क्षुधा कैसी असे ॥ ३ ॥ निळा ह्मणे रवी न देखे अंधारें । उष्मा सुधाकरें कवणे काळीं ॥ ४ ॥

॥ ४२२ ॥ सूर्य प्रकाशाचा नेणेचि महिमा । रात्रीचिया तमा न देखोनी ॥ १ ॥ क्षीरसिंधु नेणे तृप्ती कैसी असे । क्षुधेचे वळसे ईतरांसी । २ ॥ कल्पतरू नेणे औदार्य आपुलें । दैन्यचि देखिलें नाहीं तेणें ॥ ३ ॥ अमृता नाठवे अमरत्व कैसेंही । मृत्युचि त्या नाहीं ह्मणोनियां ॥ ४ ॥ कामधेनु नेणे कामनेचा मोस । अपूर्णता तीस नातळतां ॥ ५ ॥ निळा ह्मणे तैसे तुह्मी पांडुरंगा । नेणां चि वियोगा व्यापकपणें ॥ ६ ॥

॥ ४२३ ॥ एक देशी आह्मी एकट एकले । आशेचे बांधले जन्मोजन्मीं । १ ॥ ह्मणउनी इच्छूं तुमचा आश्रय । पाहावेसे पाय वाटताती ॥ २ ॥ बहु काळवरी वियोगें पीडलों । जराव्याधी केलों कामाविस ॥ ३ ॥ निळा ह्मणे न या सोडवणें हरि । तरि मज संसारीं हेंचि भवे ॥ ४ ॥

॥ ४२४ ॥ आशाबद्ध देखोनियां विटताती लोक । द्यावयासी भीक नाहीं म्हणुन ॥ १ ॥ तैसे तुम्ही नव्हे लक्ष्मीचे कांत । सदा भाग्यवंत औदार्येसी ॥ २ ॥ आपुल्या संसारें आपणचि दुःखी । करिती काय सुखी इतरासी ते ॥ ३ ॥ निळा म्हणे येतों तुम्हां काकुळती । नुपेक्षाल श्रीपति म्हणोनियां ॥ ४ ॥

॥ ४२५ ॥ नाहीं तुम्हांपासीं कवणेविसीं उणें । नांदतसां गुणें संपत्तीच्या । १ ॥ न करावा अव्हेर तुम्ही अनाथाचा । बडिवार तुमचा हाचि असे । २ ॥ देऊं म्हणाल तरी ब्रम्हांड तुमचें । अंगीं ऐश्वर्याचें सामर्थ्य ही । ३ ॥ निळा म्हणे भेटी न लावा उशिर । क्षणेंचि अवतार धरुनी याका ॥ ४ ॥

॥ ४२६ ॥ पाचारितां यावें बोळवितां जावें । हें तों न संभवे तुह्मां-पासीं ॥ १ ॥ जेथील तेथेंचि प्रगटाल रुपडें । आपुलें सुरवाडें भक्तां-

चिया ॥ २ ॥ जाणें येणें नाहीं तुह्मां कदाकाळीं । असां भूमंडळीं व्यापूनियां ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसें जाणोनियां मनीं । करितों अनुदिनीं स्तवन तुमचें ॥ ४ ॥

॥ ४२७ ॥ कराल सांभाळ तरि ते तुमची कीर्ति । मी तो बाळमति नेणें दुजें ॥ १ ॥ बैसलों विश्वासें आळवित नांवा । तुमच्या दयार्णवा निरंतर ॥ २ ॥ नुपेक्षाल मज हा वाटे भरंवसा । आहे कीर्तिठसा तुमचा जगीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे नेणें दुजी परी आतां । येईल तें चित्ता सुखें करा ॥ ४ ॥

॥ ४२८ ॥ न सांडाल तुह्मी आपल्या विहिता । परि मी करितों चिंता मूर्खपणें ॥ १ ॥ रवि केंवि सांडी आपला प्रकाश । अमृता मिठांश जिववीता ॥ २ ॥ परी मी अधीर न धरितां धीर । करीं करकर रुसोनियां ॥ ३ ॥ निळा ह्मणे झाले अपराध ते क्षमा । करा पुरुषोत्तमा विनवूं काय ॥ ४ ॥

॥ ४२९ ॥ ब्रह्मादिकां न लभे तुमचें दर्शन । तेथें काय दीन अनाथ मी ॥ १ ॥ रुसोनी इच्छीतों भेटीचें गौरव । भक्तिहीन भाव अपुरता ॥ २ ॥ काजवे पाचारी जेंवि दिनकरा । निज परंपरा नाठवुनी ॥ ३ ॥ निळा ह्मणे तैसे अपराध हे माझे । न धरावे श्रीराजें मनावरी ॥ ४ ॥

॥ ४३० ॥ अहो अज्ञानतिमिरनाशा । जगदाधीशा आदिसूर्या ॥ १ ॥ देवा विठोजी कृपाघना । लेववा अंजना निज नेत्रीं ॥ २ ॥ आपुलिये रूपीं सोरसु करा । हातीं धरा मज आतां ॥ ३ ॥ निळा ह्मणे चिंतन चित्तीं । हेंचि दिवस रातीं राहिलें ॥ ४ ॥

॥ ४३१ ॥ भोगायतन शरीर माझें । व्यर्थचि ओझें वागविलें ॥ १ ॥ सार्थक होय याचें तैसें । करा जि सौरसें आपुलिया ॥ २ ॥ करूनियां कृपादान । सांभाळा दीन अनाथा ॥ ३ ॥ निळा ह्मणे चरणीं ठेवा । स्मरणीं देवा नामाचे ॥ ४ ॥

॥ ४३२ ॥ त्रिभुवनपति अहो देवा । दीनबांधवा विठोजी ॥ १ ॥ भावा माझ्या द्याजी थार । आपुल्या निरंतर चरणापें ॥ २ ॥ तेणें सार्थक होईल काळ । सुमंगळ देह माझा ॥ ३ ॥ निळा ह्मणे सुफळ जीणें । होईल स्मरणें नामाचिया ॥ ४ ॥

॥ ४३३ ॥ हेचि चिंता दिवस राती । राहिली चित्तीं न ढळे ते ॥ १ ॥ कराल माझा अंगीकार । किंवा दूर भोवंडाल ॥ २ ॥ बहुत जन्म घेतां कष्टी । झालों हिंपुटी दुःख शोकें ॥ ३ ॥ निळा ह्मणे यावरी आतां । राखा अनंता चरणापें ॥ ४ ॥

॥ ४३४ ॥ तुमच्या पायीं माझें हित । होईल निश्चीत हें चि वाटे ॥ १ ॥ आणखी कोणा शरण जाउं । आहे उपावू तुम्हां हातीं ॥ २ ॥ सहज कृपा अवलोकाल । तरि पाववाल निज ठाया ॥ ३ ॥ निळा ह्मणे संचित माझें । आड श्रीराजें न घालावें ॥ ४ ॥

॥ ४३५ ॥ विजयध्वज उभारला । तुमचा मिरवला तिहीं लोकीं ॥ १ ॥ करितां दासाचें धांवणें । एकाचि स्मरणें नामाच्या ॥ २ ॥ संतहि बडिवार वर्णिती । हाचि श्रीपति नित्यानी ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐकोनि वचनें । धरिला मनें विश्वास ॥ ४ ॥

॥ ४३६ ॥ भवाब्धीचें सखोल पाणी । बुडाले प्राणी बहुसाल ॥ १ ॥ येथें उतार न दिसे कोणा । थोरा लहाना नागवण ॥ २ ॥ सत्व कर्में स्वर्गा जाती । तमें पडती अधःपातीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे रजतमात्मक । पावती लोक नरदेहा ॥ ४ ॥

॥ ४३७ ॥ शुद्ध सत्व कैंचा गांठीं । जेणें संवसाटी तुम्हांसी ॥ १ ॥ ह्मणोनी देवा वाटे भय । कैसेनि अपाय चुकती हे ॥ २ ॥ यज्ञें स्वर्ग न चुके कदा । अध्ययनें संपदा भस्र लोक ॥ ३ ॥ निळा ह्मणे रजतमें योनी । भोगायतनीं चौऱ्यायशीं ॥ ४ ॥

॥ ४३८ ॥ ऐसिये सांपडलों संदी । सर्वदा द्वंद्वीं काळाचे ॥ १ ॥ कैसी सुटका होईल आतां । न लक्षे चि सत्ता कर्मगती ॥ २ ॥ नैष्कर्म्य ऐसें भासे । परि तें नेतुसे सकामीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे देखोनि भ्यालों । ह्मणोनि आलों शरण तुम्हां ॥ ४ ॥

॥ ४३९ ॥ आतां यावरी संदेहपुरीं । नका श्रीहरी लोटूं मज ॥ १ ॥ लाऊनियां आपुलिये कासे । न्या मज तैसे परपारा ॥ २ ॥ कर्माची तो न कळे गती । नेणों पाववितील कोण्या ठाया. ॥ ३ ॥ निळा म्हणे तुमचे हातीं । आहे श्रीपति मौकळिक ॥ ४ ॥

॥ ४४० ॥ आतां पुरवा मनींचा हेत । करा हें उदित भेटीसी ॥ १ ॥ रूप पहावया डोळे । माझे भुकेले बहु काळ ॥ २ ॥ चरण वंदावया भाळ। करी तळमळ अखंड ॥ ३ ॥ निळा म्हणे पुरवा कोड । जाणा चाड अंतरींचीं ॥ ४ ॥

॥ ४४१ ॥ न घाली मी सांकडें । तुम्हां संसाराचें कोडें ॥ १ ॥ नामें गाईन आवडी । पुढें नाचोनी बागडी ॥ २ ॥ ध्याईन मानसीं । रूप तुमचें अहर्निशी ॥ ३ ॥ निळा म्हणे यावरि करा । कृपा रुक्मादेवीवरा ॥ ४ ॥

॥ ४४२ ॥ ठेवा पायांपासीं । राहेन मी सावकाशी ॥ १ ॥ करूनियां तुमचें ध्यान । मुखीं नामाचें चिंतन ॥ २ ॥ नेदीं कांहीं आड येऊं । आशा कल्पनेचा भेऊ ॥ ३ ॥ निळा म्हणे तुमची करूं । सेवा चरण हृदयीं धरूं ॥ ४ ॥

॥ ४४३ ॥ दंभ मान नका । देऊं वैकुंठनायका ॥ १ ॥ तुमचीं गाऊं द्या निश्चळ । गुण नामें सर्व काळ ॥ २ ॥ शांती क्षमा दया । सा हि नका पंढरिराया ॥ ३ ॥ निळा ह्मणे निरूपाधी । ठेवा माझी चरणीं बुद्धी ॥ ४ ॥

॥ ४४४ ॥ सर्वकाळ चित्त ठायीं । राहो पायीं तुमचिये ॥ १ ॥ ऐसें करा कृपादान । कर जोडून विनवितों ॥ २ ॥ सर्वकाळ ध्यानीं मनीं । न पडो चिंतनीं विसर ॥ ३ ॥ निळा ह्मणे पंढरिराजा । करा हो माझा अंगिकार ॥ ४ ॥

॥ ४४५ ॥ अनुसरलों जिवें भावें । नेणों आपुलें परावें ॥ १ ॥ तुह्मांविण पंढरिनाथा । नाठवे कांहींचि सर्वथा ॥ २ ॥ चित्तें मनें काया वाचा । जिवीं संकल्प हा तुमचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे दिवस राती । नाहीं विसराची भ्रांती ॥ ४ ॥

॥ ४४६ ॥ उमटलें वरी । होतें तैसें तें अंतरीं ॥ १ ॥ आतां नवजाय झांकीलें । बुद्धी वाचे वोसंडलें ॥ २ ॥ दीप अंधारीं ठेविला । प्रकाश न झांके फांकला ॥ ३ ॥ निळा ह्मणे पांडुरंगें । चेतविलीं माझीं अंगें ॥ ४ ॥

॥ ४४७ ॥ मग हळुचि बोले अमृतवाणी । मागा म्हणोनी निज भक्तां ॥ १ ॥ मुक्त होइन सेवाऋणा । द्या हो वरदाना इच्छेच्या ॥ २ ॥ तुम्हांसी जें जें वाटे गोड । मागा कोड पुरतें ॥ ३ ॥ निळा म्हणे भक्त त्या म्हणती । आम्हांसि प्रीति तुमची चि ॥ ४ ॥

॥ ४४८ ॥ काय द्याल तुम्हीं देवा । घ्यावी सेवा आमुचीच ॥ १ ॥ पुर्वीपासुनि करित आलों । कळासलों अभ्यासें ॥ २ ॥ द्याल तें तें अवघें मिथ्या । आम्ही सत्या न संडूं ॥ ३ ॥ निळा म्हणे जीवन आम्हां । पुरुषोत्तमा दास्यत्व ॥ ४ ॥

॥ ४४९ ॥ नामें तुमचीं गाऊं मुखें । राहों सुखें चिंतनीं ॥ १ ॥ आणखी नेघों द्याल तरी । पढों वैखरी गुण तुमचे ॥ २ ॥ ठाकों उभे संतमेळीं । करूं धुमाळी हरिकथा ॥ ३ ॥ निळा म्हणे नित्य नवी । सेवा घ्यावी कृपाळुवा ॥ ४ ॥

॥ ४५० ॥ सेल दिली मागा ऐसी । जें जें तुम्हांसी आवडे ॥ १ ॥ तरी द्या हो आपुलें नाम । अखंडित प्रेम नैसर्गीक ॥ २ ॥ सर्व काळ राहो चित्तीं । सगुण मूर्ती तुमची हे ॥ ३ ॥ निळा म्हणे नित्य नवी । कीर्तनीं द्यावी निज आवडी ॥ ४ ॥

॥ ४५१ ॥ अहो निर्विकल्प तरु देवा । फळें पुरवा इच्छिलीं ॥ १ ॥ तरी द्या हो चतुर्भुज । स्वरूप निज निजाचें ॥ २ ॥ करीन पूजा समाधान । निश्चळ मनें आपुलीया ॥ ३ ॥ निळा म्हणे आवडी ऐसी । पायांपाशीं जाणविली ॥ ४ ॥

॥ ४५२ ॥ निरंतर नाम वदनीं । निज रूप ध्यानीं आठवितों ॥ १ ॥ आणखी देवा कांहीं नेणें । मिरवूं भूषणें भक्तीचीं ॥ २ ॥ योग साधन न कळे मंत्र । निगमशास्त्र व्युत्पत्ती ॥ ३ ॥ निळा म्हणे अज्ञान हरि । आहें परी सर्व मी ॥ ४ ॥

॥ ४५३ ॥ सर्व गुणीं गुणमंडिता । सर्व रूपीं रूप शोभिता ॥ सर्वीं सर्व तूं अनंता । यश वागविता निज कीर्ति ॥ १ ॥ ऐसी असोनियां शक्ति । दवडा ना कां माझी आर्ती ॥ चरण पहावया चित्तीं । वर्ते चिंता अनिवार ॥ २ ॥ काय नाहीं तुमच्या हातीं । सकळ ब्रह्मांडांच्या व्यक्ती ॥ घडा मोडा निमिषाप्रती । धरा आवडती रूपें तैसीं ॥ ३ ॥ मासा कांसव डुकर होणें । नृसिंह वामन रूप ठेंगणें ॥ ब्रह्मचर्य आणि फरश धरणें । वंश निपातनें क्षत्रियाचा ॥ ४ ॥ परमात्मा आणि राज्य करी । एकपत्निव्रत शिळा तारी ॥ सत्यवचनीं एक बाण धरी । रावणारि मदन-

मूर्ती ॥ ५ ॥ नंदानंदन गुणातीत । लीलाविग्रही ऐश्वर्यनाथ ॥ कामिनी भोगुनी कामातीत । उच्छिष्टें स्वीकारित गौळियांचीं ॥ ६ ॥ बौध्य कलंकिया हयग्रीवा । नामें रूपें नटलेति देवा ॥ निळा म्हणे माझिया भावा । रूप भेटवा चतुर्भुज ॥ ७ ॥

॥ ४५४ ॥ सर्वकाळ खंती वाटे । कैं तो भेटे मज आतां ॥ १ ॥ न लोटे पळ युगा ऐसें । रात्रि दिवसें सम झाली ॥ २ ॥ करुणामुखें भाकीं किवो । येवो येवो ह्मणउनी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जाणवा मात । तुह्मी संत एकांतीं ॥ ४ ॥

॥ ४५५ ॥ भक्तप्रिये येवो आई । विठाबाई कृपाळे ॥ १ ॥ न साहे वियोग प्राण फुटे । उदास वाटे तुजविण ॥ २ ॥ कोणा जीवन भोजन मागों । कोणा सांगों जड भारी ॥ ३ ॥ निळा ह्मणे धांवोनि यावें । मज हें द्यावें जीवदान ॥ ४ ॥

॥ ४५६ ॥ मोकलितां धाय । नाईकसी कैसी माय ॥ १ ॥ सांडियलें दूर देशीं । नये करुणा कांहीं ऐशी ॥ २ ॥ वेष्टिलें श्वापदीं । अहंकार मोहमर्दी ॥ ३ ॥ निळा म्हणे यावरि आई । धांव घाली वो विठाई ॥ ४ ॥

॥ ४५७ ॥ आतां येउनी सांभाळीं । केला माझा ळळा पाळीं ॥ १ ॥ होसील तूं कृपावंत । तरि कां ऐसें विपरित ॥ २ ॥ बाळकासी मोहे । नीति पाळावीसी आहे ॥ ३ ॥ निळा म्हणे आतां । नाहीं धीर माझ्या चित्ता ॥ ४ ॥

॥ ४५८ ॥ प्रेमभाते तुम्हां हातीं । आम्ही नेणती भुकेलों ॥ १ ॥ झडकरी आतां भोजन घाला । उसिर झाला मग काय ॥ २ ॥ क्षुधा पिडलों जातील प्राण । मग धांवोन काय फळ ॥ ३ ॥ निळा म्हणे कृपावंते । येवो माते विठ्ठले ॥ ४ ॥

॥ ४५९ ॥ वियोगाच्या दुःखें । आळवितों करुणा मुखें ॥ १ ॥ कृपावंते माझे आई । धांव घालीं वो विठाई ॥ २ ॥ देउनियां भेटी । आतां अवलोकावें दिठी ॥ ३ ॥ निळा म्हणे प्रेमपान्हा । पाजीं लाऊनियां स्तना ॥ ४ ॥

॥ ४६० ॥ पाळुनीयां लॅळे । बहुतें वाढविलीं बाळें ॥ १ ॥ मजचि कां वो मोकलिलें । विउनी उदास चि टाकिलें ॥ २ ॥ नाहीं दिलें स्तन-

पान । नेणें खाऊं जेऊं अन्न ॥ ३ ॥ निळा ह्मणे दुजें कोण । करील सांगा प्रतिपाळण ॥ ४ ॥

॥ ४६१ ॥ धांवोनियां येसी । प्रेम पान्हा तूं पाजिसी ॥ १ ॥ तरिच वांचतील प्राण । नाहीं तरी आलें मरण ॥ २ ॥ मायेविण बाळा । वरी कोणाचा कळवळा ॥ ३ ॥ निळा ह्मणे निज निगुती । पाळण पोषण तुझ्या हातीं ॥ ४ ॥

॥ ४६२ ॥ नेणसी अव्हेरु । तरि कां केला वो उसीरु ॥ १ ॥ माझे विकळ झाले प्राण । वियोग न साहे दारुण ॥ २ ॥ किती करूं शोक । तान लागलीसे भूक ॥ ३ ॥ निळा ह्मणे वेगें । धांव घालीं पांडुरंगे ॥ ४ ॥

॥ ४६३ ॥ नको पाहों अंत । उडी घालीं वो त्वरित ॥ १ ॥ माझे वांचतील प्राण । क्षुधे तृषे बोळवण ॥ २ ॥ बाळा जाणसी उचित । माउली तूं कृपावंत ॥ ३ ॥ निळा ह्मणे गंगे । माये माझे पांडुरंगे ॥ ४ ॥

॥ ४६४ ॥ कोठें विगुंतली । नेणों कोणें गोंवियली ॥ १ ॥ माझी न करीं आठवण । गेली बाळका विसरोन ॥ २ ॥ न लावावा उसीर । नेणों कां झाली निष्ठुर ॥ ३ ॥ निळा म्हणे काय माझें । फार मानियलें ओझें ॥ ४ ॥

॥ ४६५ ॥ अवगुणी देखीलें । म्हणोनियां उपेक्षीलें ॥ १ ॥ माझें वोढवलें कर्म । करी आळी नेणें धर्म ॥ २ ॥ तेणेंचि नेणों संतापली । क्षोभें करुणा हारविली ॥ ३ ॥ निळा म्हणे नये । मोहें पाळावया माय ॥ ४ ॥

॥ ४६६ ॥ सांडियलें बाळा । कैसी निष्ठुर हे वेल्हाळा ॥ १ ॥ ऐसीं बोलतील सकळें । नारी नरें हांसती बाळें ॥ २ ॥ माय नव्हे म्हणती लांव । ऐसे उपहासिती सर्व ॥ ३ ॥ निळा म्हणे सर्व जनीं । ऐसी होईल टेहणी ॥ ४ ॥

॥ ४६७ ॥ राग आला तरी । माय बाळा ते नाव्हेरी ॥ १ ॥ राखे त्याची भूक तान । न मारी कापूनियां मान ॥ २ ॥ शांतउनी स्तनीं । लावी तया न्याहाळुनी ॥ ३ ॥ निळा म्हणे धरी । अंकीं तया माया करी ॥ ४ ॥

॥ ४६८ ॥ जरी अवगुणी आन्यायी । बाळा नुपेक्षी कीं आई ॥ १ ॥ झाल्या अपराधाच्या कोटी । घालुनियां साहे पोटीं ॥ २ ॥ कुरवाळुनी मोहें । तया पाजी प्रेमपेहे ॥ ३ ॥ निळा म्हणे अंकीं । घेउनी पहुडे त्या परियंकीं ॥ ४ ॥

॥ ४६९ ॥ न विसंबेचि माउली बाळा । अद्भुत स्नेहाचा कळवळा ॥ १ ॥ तुम्ही तों जाणतसां नित्य । तरि कां ऐसें विपरित ॥ २ ॥ आजि निष्ठुर मानसें । आम्हां पीडियलें उपवासें ॥ ३ ॥ निळा म्हणे शोकें सिण । झाला जाऊं पाहे प्राण ॥ ४ ॥

॥ ४७० ॥ बरें जाणवलें मग । करी येऊनियां लगबग ॥ १ ॥ अवलोकुनी कृपादृष्टी । धरी कवळुनियां पोटीं ॥ २ ॥ वोरसली मोहें । लावी स्तनीं पाजी पेहे ॥ ३ ॥ निळा म्हणे दुरी । न वजे बैसोनियां घरीं ॥ ४ ॥

॥ ४७१ ॥ जाणे पाळूं लळा । आदि अवसान सोहळा ॥ १ ॥ आपुलिया बाळकातें । मोहें प्रतिपाळी त्यातें ॥ २ ॥ खाऊं जेऊं घाली । ऐसी कृपाळु माउली ॥ ३ ॥ निळा म्हणे दुरी । न वचे सांडुनियां क्षणभरी ॥ ४ ॥

॥ ४७२ ॥ कृपावंत माये । तान्हयाचे झटे साहे ॥ १ ॥ नेदी चि हे रागा हातीं । करी बुझाउनी प्रीती ॥ २ ॥ पुरउनियां आळी । कृपादृष्टी त्या न्याहाळी ॥ ३ ॥ निळा म्हणे झणें । दिसेल हें केविलवाणें ॥ ४ ॥

॥ ४७३ ॥ खेळवी चालवी । हातीं धरुनियां नाचवी ॥ १ ॥ ऐसी कृपेची ओतली । माझी विठाई माउली ॥ २ ॥ जाणे भुक तहान । वारा लागों नेदी ऊन ॥ ३ ॥ निळा ह्मणे लाड । पुरवी करूनियां कोड ॥ ४ ॥

॥ ४७४ ॥ बहुतें आळिकरें । इनें वाढविलीं लेकुरें ॥ १ ॥ आहे आधिलाचि अभ्यास । नव्हे कोणा ही उदास ॥ २ ॥ अपत्य पाळवी । तया खाववी जेववी ॥ ३ ॥ निळा ह्मणे घरीं । तया न विसंबे दारीं ॥ ४ ॥

॥ ४७५ ॥ देउनी भातुकें । पुढें नाचवी कौतुकें ॥ १ ॥ हांसोनियां नवल करी । कृपादृष्टी तयावरी ॥ २ ॥ बोबडें बोलणें । त्याचें ह्मणे कोडिसवाणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे प्रीती करी । खेळविसा उरावरी ॥ ४ ॥

॥ ४७६ ॥ गाउनियां आल्हर मुखें । निजीं निजवी त्या सुखें ॥ १ ॥

आवडि ते नीच नवी । वस्त्रें अळंकार लेववी ॥ २ ॥ माझे दिठावेल ह्मणे । उतरीं वरुनी निंबलोणे ॥ ३ ॥ निळा ह्मणे आई । परम कृपाळु विठाई ॥ ४ ॥

॥ ४७७ ॥ देश काळ वर्तमान । तया नाढळे चि भिन्न ॥ १ ॥ जया कृपावंत माय । विठाई कवळुनी राहे ॥ २ ॥ आपुले पारिखे । नेणती ते इच्या सुखें ॥ ३ ॥ निळा म्हणे केली । ओळखी ठायींची ते भली ॥ ४ ॥

॥ ४७८ ॥ निरंतर तुमच्या नामाचें स्मरण । आठवीन गुण वेळोवेळां ॥ १ ॥ रुप दृष्टी पाय ध्याईन मानसीं । हाचि अहर्निशीं निजध्यास ॥ २ ॥ आवडी बैसली अविट अंतरीं । नव्हे क्षणभरी विसरु ते ॥ ३ ॥ निळा म्हणे चित्ता चिंतनाचा लाहो । रुक्मादेवीनाहो साह्य झाला ॥ ४ ॥

॥ ४७९ ॥ करीन कैवाड हाचि अनुदिनी । तुमच्या चिंतनीं पांडुरंगा ॥ १ ॥ नेदी जाऊं वांया घटिका एकी पळ । करूं सर्वकाळ हेचि चर्चा ॥ २ ॥ संतसमागमें गाऊं नित्य नामें । आपुलिया प्रेमें आवडिच्या ॥ ३ ॥ आठवूं सुंदरु रूप मनोहर । कटावरी कर ठेविले ते ॥ ४ ॥ निळा म्हणे माझी मनींची आवडी । दाविली उघडी करूनियां ॥ ५ ॥

॥ ४८० ॥ सत्य आणि मिथ्या जाणा अंतरींचें । तुह्मी सकळांचे सर्व जाणा ॥ १ ॥ म्हणउनियां करा अनाथाचा धांवा । उठाउठी देवा पाचारितां ॥ २ ॥ न चले झांकिलें तुह्मांपुढें कांहीं । असा अंतर्बाहीं व्यापुनियां ॥ ३ ॥ जिवीं एक दावी बोलोनि आणीक । तरि मज सकळिक दुषिती संत ॥ ४ ॥ निळा ह्मणे माझें सबाह्य अंतर । तुह्मी निरंतर जाणतसां ॥ ५ ॥

॥ ४८१ ॥ सर्वज्ञ सर्वदा तुह्मी सर्वसाक्षी । ह्मणउनि कैं पक्षीं हरिभक्तांचे ॥ १ ॥ खरें खोटें कळे तुम्हां वारावरी । संकल्प अंतरीं उठितां चि ॥ २ ॥ जया तैसें फळ नेमुनी ठेवितां । जोडुनियां देतां काळा हातीं ॥ ३ ॥ कर्मा ऐसें फळ भोगविता सकळ । करुनियां काळ पुढें सत्ता ॥ ४ ॥ निळा म्हणे जैसें माझें आचरण । तैसें करा दान कृपानिधी ॥ ५ ॥

॥ ४८२ ॥ आम्ही नेणों भाव कैसा· भक्तिरस । म्हणवूं तुमचे दास एक्या गुणें ॥ १ ॥ मुखें गाऊं नाम पवाडे श्रीहरी । उभे महाद्वारीं

ठाकोनियां ॥ २ ॥ नेणों ज्ञान ध्यान मंत्र योगकळा । आसन मुद्रा डोळा लक्ष कैसें ॥ ३ ॥ तत्व संख्या नेणों नित्यानित्य ज्ञान । आठऊं चरण सकुमार ते ॥ ४ ॥ निळा म्हणे अगा रुक्मादेविवरा । आतां उचित करा आपुलें तें ॥ ५ ॥

॥ ४८३ ॥ आह्मी तों आपुलें निवेदिलें पायीं । अंतरींचें नाहीं वंचियलें ॥ १ ॥ तुह्मी सर्व जाणा जाणतां अंतर । काय परिहार वाउगाची ॥ २ ॥ सोडविलीं ऐशीं बहुतें अनाथें । अनुसरतां नामातें तुमचीया ॥ ३ ॥ निळा ह्मणे मी ही झालों शरणांगत । ऐकोनियां मात मागिलाची ॥ ४ ॥

॥ ४८४ ॥ याचिलागीं तुमचा करितसें धांवा । रात्रंदिवस देवा आळउनी ॥ १ ॥ नेणें जप तप स्नान संध्या विधी । जड माझी बुद्धी प्रज्ञाहीन ॥ २ ॥ नाहीं आश्रमाचें घडलें विहीत । न कळे उचित नित्यादिक ॥ ३ ॥ निळा ह्मणे माझा कैसा परिपाक । वैकुंठनायक तुह्मी जाणा ॥ ४ ॥

॥ ४८५ ॥ सांगावें उगउनी न कळे तयासी । तुह्मी तो मानसीं साक्ष माझे ॥ १ ॥ विश्वाचे व्यापक चाळक चित्ताचे । साक्षी अंतरींचे जेथें तेथें ॥ २ ॥ ब्रह्मादिक देव तेहि आज्ञाधार । तुमचे किंकर काळ काम ॥ ३ ॥ निळा ह्मणे माझा करा अंगिकार । हेंचि निरंतर विनवितसें ॥ ४ ॥

॥ ४८६ ॥ नका पाहूं माझे क्रिया आचरित । भक्त भागवत नव्हे ज्ञानी ॥ १ ॥ आठवितों नाम नेणें दुजी परी । मी माझें श्रीहरि नाहीं गेलें ॥ २ ॥ गुंतलोंसे पाशीं मोह ममता आशा । अहो जगदाधीशा पांडुरंगा ॥ ३ ॥ निळा ह्मणे करा यावरी कैवार । आहां करुणाकर ह्मणोनियां ॥ ४ ॥

॥ ४८७ ॥ सोडविलीं ऐसीं बहुतें आयकें । भूतळीं पातकें तरलीं नामें ॥ १ ॥ बोलियले संत पुराणीं व्याख्यानें । तारिलीं चिंतनें महापापी ॥ २ ॥ अजामेळ गणिक पौंड्रिक जरा व्याध । नाहीं अपराध विचारिले ॥ ३ ॥ निळा ह्मणे तोचि धरिला विश्वास । घालुनियां कास नाम गातों ॥ ४ ॥

॥ ४८८ ॥ आणिक तों युक्ति नाहीं माझ्या हातीं । आहें मूढमति म्हणनियां ॥ १ ॥ वारंवार तह्मां करितों सूचना । नामें दयाघना उच्चा-

रुनी ॥ २ ॥ पतितपावन ऐसी ब्रिदावळी । रुळते पायांतळीं प्रतिज्ञेची ॥ ३ ॥ निळा ह्मणे तिचा प्रताप दाखवा । माझा हा निरसावा अहंभाव ॥ ४ ॥

॥ ४८९ ॥ गाईन कीर्तनीं गुण नाम पवाडे । तुमचे तुह्मांपुढें आवडीनें ॥ १ ॥ भावा ऐसे माझ्या व्हाजी पांडुरंगा । मग मी आलें भागा करीन तें ॥ २ ॥ नाचेन सन्मुख चरणावरी दृष्टी । धरुनी प्रेम पोटीं आळवीन ॥ ३ ॥ निळा ह्मणे तुह्मी चरितें अपार । केलीं ते प्रकार आठवीन ॥ ४ ॥

॥ ४९० ॥ आम्ही न मागों ऐसा कधीं । कृपानिधी वर द्याल ॥ १ ॥ आपुल्या पायीं वसवा चित्त । माझें अखंडित दुजें न मगों ॥ २ ॥ युगें जातां कल्प कोडी । न करूं जोडी आणिक ॥ ३ ॥ निळा म्हणे राहो ध्यानीं । तुमचें मनीं रुपडें ॥ ४ ॥

॥ ४९१ ॥ दृष्टी देखावासाचि वाटे । हृदय फुटे त्यालागीं ॥ १ ॥ उभा कटावरी कर । मूर्ती सकुमार गोमटी ॥ २ ॥ भेटीलागीं मन व्याकुळ । न लोटे पळ युग वाटे ॥ ३ ॥ निळा म्हणे न तुटे आधी । कृपानिधी न भेटतां ॥ ४ ॥

॥ ४९२ ॥ येउनी केव्हां भेटी द्याल । समोखाल मज आतां ॥ १ ॥ वाट पाहें दिवसराती । न लगे चित्तीं अन्न गोड ॥ २ ॥ धन मान गोतवित्त । न रुचे मात मज त्याची ॥ ३ ॥ निळा म्हणे जीवदान । द्या मज भेटोन आतां ॥ ४ ॥

॥ ४९३ ॥ माझे बोल नव्हती फोल । जाणे विठ्ठल अंतरींचे ॥ १ ॥ पुरवील तोचि मनिंचा हेत । येईल धांवत करुणाब्धी ॥ २ ॥ वागवितो दया पोटीं । आम्हांसाठीं कृपाळु ॥ ३ ॥ निळा म्हणे भरंवसेनि । नामें वदनीं आळवितां ॥ ४ ॥

॥ ४९४ ॥ नाहीं लौकिकासीं काज । माझें गुज तो जाणे ॥ १ ॥ अंतर्बाह्य ठावें तया । येइल बाह्या पसरुनी ॥ २ ॥ हाचि निश्चय माझा मनीं । विश्वास वचनीं संतांच्या ॥ ३ ॥ निळा म्हणे निर्भय चित्तें । भेटी त्यातें पाचारी ॥ ४ ॥

॥ ४९५ ॥ नाहीं उपेक्षिलें कोणा । थोरा लहाना निवडुनी ॥ १ ॥ ऐसी संत देती ग्वाही । पुराणेंही गर्जती ॥ २ ॥ आम्ही आतां न फिरों मागें । करूं वेगें वेगुची ॥ ३ ॥ निळा म्हणे पळे पळ । साधूं काळ भेटीचा ॥ ४ ॥

॥ ४९६ ॥ आम्ही दासीं कीजे दास्य । सहसा उपहास न करावे ॥ १ ॥ नेणों कां हे पडिले दृष्टी । आली गोष्टी वाचे ते ॥ २ ॥ निरोपाध तुमचें लेणें । निर्विकार गुणें संपन्न ॥ ३ ॥ निळा म्हणे गुणातीता । रूपमंडिता विठोबा ॥ ४ ॥

॥ ४९७ ॥ मागण्याची न करूं गोष्टी । तुम्हां पोटीं भय वाटे ॥ १ ॥ नामचि तुमचें पुरे देवा । न करूं हेवा आणिक ॥ २ ॥ माझें आहे स्वाधीन मन । न इच्छीं मान धन कांहीं ॥ ३ ॥ निळा म्हणे सत्य साचा । हाचि संकल्पाचा निर्धार ॥ ३ ॥

॥ ४९८ ॥ तुम्ही जाणा अंतरींचें । लटिकें साचें श्रीहरी ॥ १ ॥ आतां माझी कांहीं नका । मनीं शंका वागवूं ॥ २ ॥ नाहीं पदरा घालित पिळा । द्या जि गोपाळा म्हणउनी ॥ ३ ॥ निळा म्हणे वदनीं राहो । नाम अहो विठ्ठला ॥ ४ ॥

॥ ४९९ ॥ मागें उदंड जोडी केली । कोठें आली सांगातें ॥ १ ॥ आतां पुरे नाम वाचे । सार्थकाचें कारण ॥ २ ॥ कोठें जाऊं खाऊं फेरे । मतांतरें अनेक ॥ ३ ॥ निळा म्हणे नारायणा । भाव जाणा अंतरींचा ॥ ४ ॥

॥ ५०० ॥ माझी बुद्धी झाली वेडी । दिधली बुडी हरिनामीं ॥ १ ॥ नुमजे येथें विगुंतली । न करीं बोली आणिक ॥ २ ॥ सांडियेले वादावाद । छंद बंद आणीक ॥३॥ निळा म्हणे तुमच्या पायीं । जडली ठायीं न ढळे चि॥४॥

॥ ५०१ ॥ आवडोनि रूप मनीं । धरिलें वदनीं हरिनाम ॥ १ ॥ नलगे आणिक कांहीं चिंता । गोड चि आतां यावरी ॥ २ ॥ काय करूं ते आसनमुद्रा । कृपासमुद्रा तुजविण ॥ ३ ॥ निळा म्हणे दिधलें संतीं । नाम एकांतीं तें चि गोड ॥ ४ ॥

॥ ५०२ ॥ कराल तरी कृपा देवा । हात ठेवा मस्तकीं ॥ १ ॥ मग मी

राहीन निश्चितें । तुमच्या दानें वरदाच्या ॥ २ ॥ धरुनियां राहेन कंठीं । नामें पोटीं उच्चार ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसा हेत । उत्कंठित मानसीं ॥ ४ ॥

॥ ५०३ ॥ गोड नाम तुमचें देवा । गोड सेवा तुमची ते ॥ १ ॥ गोड तुमची कीर्ती वाणीं । गोड श्रवणीं ऐकतां ॥ २ ॥ गोड तुमचें रूप दृष्टी । गोड पोटीं प्रेम तें ॥ ३ ॥ गोड निळा तुमचे पायीं । गोड डोयी ठेविता ॥ ४ ॥

॥ ५०४ ॥ गोडा गोड तुमचें नाम । गोड जन्म स्मरणें त्या ॥ १ ॥ गोड वाचा पढतां गीत । गोड चित्त चिंतनें ॥ २ ॥ गोड ध्यानें तुमच्या मन । गोड स्तवनें गुण वाणीं ॥ ३ ॥ गोड निळा कीर्तन मेळीं । गोड रंगीं नाचता ॥ ४ ॥

॥ ५०५ ॥ गोड तुमची क्रीडावळी । गोड गातां नित्य काळीं ॥ गोड भक्तभावें बळी । तूं वनमाळी त्यापाशीं ॥ १ ॥ गोड तुमचीं नामें गाती । गोड कीर्तनीं उभे ठाकती ॥ गोडा गोड तूं श्रीपती । त्याची भुक्ति मुक्ति तुंचि तूं ॥ २ ॥ गोड त्याचें स्वानुभव । तुमच्या पायीं ठेविला जीव ॥ गोड भक्ति दृढ भाव । तुमचे चरणीं लिगटले ॥ ३ ॥ गोड त्याचें याती कुळ । गोड सत्कर्म तें सोज्वळ ॥ गोड त्याचें बुद्धीबळ । तुज धरिलें निश्चयें ॥ ४ ॥ निळा म्हणे त्याची मती । गोड कीर्तनीं नवी स्फुर्ती ॥ गोड तुमची सगुण मूर्ती । हृदयीं त्याचे स्थिरावली ॥ ५ ॥

॥ ५०६ ॥ माझिया मनें धरिला विश्वास । तुमच्या नामीं घातली कास ॥ नाहीं उपेक्षा आणि आळस । तुमच्या ठायीं शरणांगता ॥ १ ॥ बहुतां सांभाळिलें देवा । केला बहुतांचा कुढावा ॥ बहुतां दानें वाढल्या सेवा । बहुतां स्थापिलें निजपदीं ॥ २ ॥ बहुतीं गाईलें तुम्हां गीतीं । बहुतीं स्तविलें तुम्हां स्तुति ॥ बहुतां ध्यानीं तुमची मूर्ती । आळंगिली हृदयांत ॥ ३ ॥ बहुतीं तुम्हां आराधीलें । बहुतीं पूजनीं तुम्हां पूजिलें ॥ बहुतीं यज्ञावदानीं यजिलें । बहुतीं पाहिलें ज्ञानदृष्टी ॥ ४ ॥ बहुतीं वेद स्तवन-मिसें । तुमचे कवळीले मानसें ॥ बहुतीं योगादि सायासें । लाविलें पिसें आपणीयां ॥ ५ ॥ तुम्ही पुरलेती त्याचिया भावा । सर्वज्ञपणें जि व्यापका देवा ॥ घेउनी सेवा आपुलिया गांवा । नेलें केशवा निज वस्ती ॥ ६ ॥ ऐसी ऐकोनियां संतवाणी । मिठी विश्वासें घातली चरणीं ॥ निळा म्हणे माझी आरुषवाणी । लावावी गुणीं आपुलिये ॥ ७ ॥

॥ ५०७ ॥ माझी पूजा हेंचि अर्चन । तुमचें नाम संकीर्तन ॥ नेणें करूं वेदाध्ययन । नेणें आसन योगाचें ॥ १ ॥ म्हणोनि येतों काकुळती । अत्यंत मूढ आहे माझी मती ॥ नेणें करूं तुमची स्तुती । अहो जगत्पती पुराणपुरूषा ॥ २ ॥ कैसें होइल तें मी नेणें । भूत भविष्य वर्तमानें ॥ अल्पबुद्धी माझें जिणें । मूढपणें वर्तणुक ॥ ३ ॥ यालागीं तुमचें धरिलें नाम । तुमचे स्तवनीं ठेविलें प्रेम ॥ न कळे आणिक न चले नेम । साधन दुर्गम मज वाटे ॥ ४ ॥ नेणें तिर्था पर्यटण । नेणें मंत्राचें पुरश्चरण ॥ नेणें योगयाग सांख्यज्ञान । नेणें करूं ध्यान तुमची पूजा ॥ ५ ॥ नेणें कैसी माझी करुणा । येईल तुम्हां नारायणा ॥ नेणें वर्णूं तुमच्या गुणा । नेणें धारणा व्रत निष्ठा ॥ ६ ॥ नाहीं वाचा संस्कार । नाहीं घोकिलें जी अक्षर ॥ नेणें करूं यज्ञाचार । स्वधर्म तोहि विधीयुक्त ॥ ७ ॥ निळा ह्मणे सर्वांपरी । आहें मूर्ख मी श्रीहरि ॥ ताराल ऐसिया नवल तरी । तुमची थोरी प्रगटेल ॥ ८ ॥

॥ ५०८ ॥ बहुतां देउनि अभयदानें । गौरविलें आपल्या मानें ॥ घालुनी शांतीचीं आसनें । ब्रह्मसाम्राज्यीं बैसविलें ॥ १ ॥ ध्यान तन्मयाचीं छत्रें । माथां झळकती विचित्रें ॥ अगाध कीर्तीचीं दिव्य वस्त्रें । प्रल्हादादिकां समर्पिलीं ॥ २ ॥ नारदा निर्लोभ वागेश्वरी । नाम स्मरणाची वैखरी । देउनी दिव्य आळंकारी । देवां दैत्यांमाजि मिरविला ॥ ३ ॥ व्यासा वाल्मीका अगाध मती । देउनी वंद्य केलें त्रिजगतीं ॥ जनक पृथु हे भूपती । आपुले पंगतीं बैसविले ॥ ४ ॥ अर्जुनादिकांसी आपुलें । ऐश्वर्य देउनी थोराविलें ॥ सांख्य सिद्धांत उपदेशिले । रणीं वागविले रथवारू ॥ ५ ॥ उद्धवा मैत्रेया कृपा वोगरिली । निजात्मज्ञानें तृप्ति केली ॥ भक्त कृपाळु माउली । गौरविली निज बाळकें ॥ ६ ॥ निळा नेणते निपटणें कांहींचि खाऊं जेऊं नेणें ॥ वाढविलें ते स्तनपानें । नामचिंतने आपुलिया ॥ ७ ॥

॥ ५०९ ॥ निवृत्तीनाथासि ठेविलें उन्मनीं । सोपानदेवा नामसंकीर्तनीं ॥ मुक्ताबाई निजमुक्तिस्थानीं । निजानंदीं गौरविलें ॥ १ ॥ ज्ञानदेवा दिधली समाधी। नामदेवा स्थापिलें निज पदीं ॥ परसा भागवताची वाग्नदी । सुस्नात केली कीर्तनें ॥ २ ॥ वछरा आणि विसोबा खेचर

कानुपात्रा मिराबाई परम सुंदर ॥ अंतोबा नरहरि सोनार । चरणीं थार दिधला त्यां ॥ ३ ॥ गोरा सांवता कूर्मदास । सगुण स्वरूप भेटले त्यांस ॥ नरसी मेहता पिपा भानुदास । केला वास त्यांच्या हृदयीं ॥ ४ ॥ ऐका जनार्दन स्वरूप स्थिती । जनजसवंताची परम प्रीति ॥ कबिराचीं पुष्पें करुनी अंतीं । निजधामाप्रती पाठविलें ॥ ५ ॥ तुकयासीं विमानीं वाहिलें । संतोबासीं वैराग्यें न्हाणिलें ॥ निजस्थान पालखीं निजविलें । निज भुवनीं आपुलिये ॥ ६ ॥ निळा म्हणे आपुलीं बाळें । कडिये घेउनी पुरवी लळे ॥ स्नेहाळु माउली कळवळे । प्रेम देउनी वाढवी ॥ ७ ॥

॥ ५१० ॥ प्रेम देउनी सरतें केलें । आपुल्या नामें गौरविलें ॥ माझिये वाचे शृंगारिलें । गुणरत्नीं अमोघीं ॥ १ ॥ सर्व गुणीं गुणभरिता । सर्व रूपीं रूपमंडिता ॥ सर्व कळा तूं कुशळता । साजती अनंता ब्रीदें चरणीं ॥ २ ॥ सर्व गोमटा धरी त्या नामें । सर्व गोमटा करी त्या कर्में ॥ सर्व गोमटा जाणत्या धर्में । सर्वां सर्व गोमटा तूं ॥ ३ ॥ मुख सुंदर अंगकांती । रूप सुंदर मदनमूर्ती ॥ यश सुंदर तुमची कीर्ति । अहो जगत्पती जगदात्मिया ॥ ४ ॥ निळा तुमचा शरणांगत । तुमचे नामीं ठेविलें चित्त ॥ तुमच्या ब्रीदावळी पढत । करावा सनाथ म्हणउनी ॥ ५ ॥

॥ ५११ ॥ गाइलेचि गातां गीतीं । पवाडे तुमचे जि श्रीपती ॥ सहसा धणी न पुरे चित्तीं । सारितां रातिदिवस युगें ॥ १ ॥ अनंता युगीं अनंत खेळ । अनंत नामां रूपांचे मेळ ॥ अनंत संपादिले जे निर्मळ । पढतां वाचे उल्हासु ॥ २ ॥ क्षीराब्धिशयन वैकुंठवास । अमरावती सत्यलोक कैलास ॥ अष्टाहि दिक्पाळांचे वेष । भरले सावकाश निजात्मरूपें ॥ ३ ॥ मच्छ कच्छ वराह रूपें । नृसिंह वामन परशुराम प्रतापें ॥ राम कृष्ण बौध्यादि अमूपें । मिरविलीं स्वरूपें क्षुल्लकादी ॥ ४ ॥ नाना स्वर्गें सृष्टी रचना । नाना ऋषी रूपें वसउनी स्थाना ॥ नाना संतरूपा नारायणा । निळा विज्ञापना करी तुमची ॥ ५ ॥

॥ ५१२ ॥ अगा ये षड्गुण भाग्यवंता । समग्र लक्ष्मीचिया कांता ॥ समग्र यशातें तूं धरिता । समग्र ऐश्वर्यता तुज अंगीं ॥ १ ॥ समग्र औदार्य लक्षणीं । समग्र वैराग्याची खाणी ॥ समग्र ज्ञानशिरोमणी । समग्र षड्गुणीं संपन्ना ॥ २ ॥ यशें थोराविला मारुती । बिभीषण केला लंकापती ॥

औदार्य देउनी कर्णाहातीं । कीर्ति दिगांतीं फांकविली ॥ ३ ॥ ज्ञानें उपदेशिला चतुरानन । ऐश्वर्यें वाढविला अर्जुन ॥ वैराग्यशुकातें बोधून । ब्रह्मसनातन पावविला ॥ ४ ॥ निळा ह्मणे ईहीं अगाध लक्षणीं । वंद्य सुरासुरां तूं त्रिभुवनीं ॥ माझी अलंकारुनियां वाणी । प्रवर्तवावी स्तवनीं आपुलिया ॥ ५ ॥

॥ ५१३ ॥ आतां माझिया भक्तिभावा । पालटा देवा नेंदावा ॥ १ ॥ मग मी नाचेन कीर्तनमेळीं । नामावळी आळवित ॥ २ ॥ ओंवाळुनी सांडीन काया । वरुनि पायां जिव प्राण ॥ ३ ॥ निळा ह्मणे वाढता प्रेमा । पुरुषोत्तमा करावा ॥ ४ ॥

॥ ५१४ ॥ विश्वास माझा जतन करा । विश्वंभरा पायांपें ॥ १ ॥ मग मी तुम्हां न वचें दुरी । ठेवीन वरी जीवभाव ॥ २ ॥ आळवीन उत्तम नामें । तुमचींच प्रेमें सन्मुख ॥ ३ ॥ निळा म्हणे कूर्मदृष्टी । करा वृष्टी अमृतें ॥ ४ ॥

॥ ५१५ ॥ बहुतां दिवसां भेटी आलों । सांभाळिलें पाहिजे ॥ १ ॥ आलिंगनें निवती प्राण । सुफळ जिणें मग माझें ॥ २ ॥ हेत मनींचा होईल पूर्ण । दृष्टी चरण देखतां ॥ ३ ॥ निळा म्हणे हरेल सीण । बोळवण जन्माची ॥ ४ ॥

॥ ५१६ ॥ अवघ्या चि दुःखाचा परिहार । चरणीं थार झालिया ॥ १ ॥ आतां देवा नुपेक्षावें । आश्वासावें प्रीतीनें ॥ २ ॥ बहुत श्रमित होउनी आलों । वांयां धाडिलों न पाहिजे ॥ ३ ॥ निळा म्हणे कृपावंता । चरणीं आतां मज रक्षा ॥ ४ ॥

॥ ५१७ ॥ पाचारितां धांवोनि यावें । ऐसें द्यावें वरदान ॥ १ ॥ मग मी तेणें राहेन सुखें । चिंतन मुखें करीं तुमचें ॥ २ ॥ आळवीन आवडी नामें । गाईन प्रेमें गुण गीतीं ॥ ३ ॥ निळा म्हणे उदारपणें । करा हो देणें कृपेचें ॥ ४ ॥

॥ ५१८ ॥ मूढमती परि मी वाचे । नाम तुमचें उच्चारीं ॥ १ ॥ नेणें कांहीं न कळे हित । परि मी भक्त ह्मणवितों ॥ २ ॥ अज्ञान चि परि मी दास ।

धरिली कास न सोडीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे भलत्या परी । अंगीकारीं विठोबा ॥ ४ ॥

॥ ५१९ ॥ जे जे तुह्मां शरण आले । ते ते नेले निज धामा ॥ १ ॥ पुढें जे आणिक भजती नवे । त्यांच्या भावें त्यां देसी ॥ २ ॥ ऐसे अपार युगायुगीं । करितां जगीं उपकार ॥ ३ ॥ निळा ह्मणे माझी चिंता । असों द्या अनंता विनवितों ॥ ४ ॥

॥ ५२० ॥ वाचा नाम संकीर्तनीं । मानस तुमच्या निश्चयो ध्यानीं ॥ नेत्र हे तुमच्या अवलोकनीं । चालावें चरणीं तीर्थयात्रे ॥ १ ॥ करीं करावें तुमचें पूजन । श्रवणीं करावें गुणांचें श्रवण ॥ चित्तें सदा तुमचें चिंतन । घ्राणीं अवघ्राण निर्माल्य तुळसी ॥ २ ॥ बुद्धीसी तुमची बोधकता । जीवीं तुमची राहो आस्था ॥ तुमचे चरणीं निश्चळ माथा । अखंडता अखंड ॥ ३ ॥ सकळ इंद्रियां तुमची प्राप्ती । भगवद्भावना राहो भूतीं ॥ द्वेषाद्वेष तो तुमटो चित्तीं । द्यावें श्रीपति हें दान ॥ ४ ॥ कामक्रोधाचें न व्हावें दर्शन । नका आसे तृष्णेचें बंधन ॥ ठेवा आपुल्या पायीं जीवन । द्यावें समाधान सर्वदा मना ॥ ५ ॥ कीर्तन नित्य काळ देवा तुझें । उतरीं मी हें माझें ओझें ॥ आपुल्या गुणीं नाचवी भोजें । जिव्हा नामीं रंगों द्या ॥ ६ ॥ निळा ह्मणे कृपानिधी । माझी मोडावी द्वैतबुद्धि ॥ अवघी तोडुनियां उपाधी । स्थापा निज पदीं शरणांगता ॥ ७ ॥

॥ ५२१ ॥ भाव भक्ति विलासिया । परिसा विनंती पंढरिराया ॥ १ ॥ आम्हां दासां सांभाळिजे । देउनी प्रेम गौरविजे ॥ २ ॥ जैसी तुमची आहे ख्याती । तैसी चि चालों द्या जि पुढती ॥ ३ ॥ नाहीं तरी होईल हांसें । लोकीं ब्रीद लटिकें दिसे ॥ ४ ॥ तुह्मी आह्मां उपेक्षिलें । तरी हीनत्व सांगा कोणा आलें ॥ ५ ॥ निळा ह्मणे पुढिला चाली । वाट पाहिजे रक्षिली ॥ ६ ॥

॥ ५२२ ॥ धर्म तरी आहे ऐसा । मार्ग सहसा रक्षावा ॥ १ ॥ नाहीं तरी भांबावती । अवघी भरती आडरानें ॥ २ ॥ ह्मणोनियां माझा करा । विश्वंभरा सांभाळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे येतां लोकां । अनुभव शंका फिटेल ॥ ४ ॥

॥ ५२३ ॥ बोलिलों तें तुम्हां उणें । कीजे क्षमा नारायणें ॥ १ ॥ आपुलिये मी तळमळें । दुःखें चावळलों तें कळे ॥ २ ॥ समर्थाची गति मति । कोण जाणे कैसी रीति ॥ ३ ॥ निळा ह्मणे उचित करा । जैसे आपुले ते दातारा ॥ ४ ॥

॥ ५२४ ॥ कांहीं मानदंभासाठीं । नाहीं केली म्यां हे अटी ॥ १ ॥ तुह्मीं तो जाणतां अंतर । काय तेथें परिहार ॥ २ ॥ लोकनिंदा वाटे बरी । आम्हां भूषण तें श्रीहरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे वहातीं करा । वाट पुढें जगदोद्धारा ॥ ४ ॥

॥ ५२५ ॥ आह्मां ताराल जरि श्रीहरि । कीर्ति तुमची वाढेल तरि ॥ १ ॥ पुढें हि चोखाळती वाटा । भाव भक्तीचा चोखटा ॥ २ ॥ विश्वासें त्या दृढावती । आमुची देखोनि उत्तम गती ॥ ३ ॥ निळा ह्मणे जी सर्व जाणा । हातीं तुमचे अवघ्या खुणा ॥ ४ ॥

॥ ५२६ ॥ आह्मी नेणतीं नेणतीं । सुजाण तुह्मी कमळापती ॥ १ ॥ अवघे अंतरींचे जाणा । सर्वसाक्षी तूं देखणा ॥ २ ॥ माझें करितां समाधान । लाभ कोणा होईल मान ॥ ३ ॥ कां हें बोलियेला निळा । तुह्मी जाणतां कळवळा ॥ ४ ॥

॥ ५२७ ॥ कां जी कृपावंता झालेति निष्ठुर । नाईका उत्तर करुणेचें ॥ १ ॥ काय अजामेळा होता पुण्यरासी । नेला वैकुंठासी नामोचारें ॥ २ ॥ गणिका ते वेश्या काय आचरली । राम ह्मणतां नेली निजधामा ॥ ३ ॥ जराव्याधें पायीं विंधीयला बाण । तो तुह्मी आपण तारियेला ॥ ४ ॥ निषाद तो कोळी श्रीरामा सन्मुख । येतां दिलें सुख निववीला ॥ ५ ॥ पूतना ते पाजी विष स्तनपानीं । ते सायोज्यसदनीं बैसविली ॥ ६ ॥ गजेंद्र तो काय तप आचरला । धांवा ह्मणतां नेला सोडवूनी ॥ ७ ॥ वैरियाचा बंधु केला लंकापती । चिरंजीव पद्धती बैसउनी ॥ ८ ॥ निळा ह्मणे माझा नाहीं पुरविला । हेत चि राहिला दर्शनाचा ॥ ९ ॥

॥ ५२८ ॥ अहो देवा कृपामूर्ती । गुणसंपत्ती निधाना ॥ १ ॥ पिंड पदीं समर्पिला । आह्मी अपुला जीवभाव ॥ २ ॥ न मागों कांहीं अणुमात्र । कृपापात्र करावें ॥ ३ ॥ निळा ह्मणे विज्ञापना । परिसा दीना रंकाची ॥ ४ ॥

॥ ५२९ ॥ नाहीं कोणा उपेक्षिलें । बहुतां केलें सनाथ ॥ १ ॥ माझे-चि विशीं आळस केला । कां जि विठ्ठला मी नेणें ॥ २ ॥ प्रालब्धाचा ठेवा जैसा । आम्हां तैसा ओढवला ॥ ३ ॥ निळा ह्मणे गेलों वांया । तुमच्या पायां न देखतां ॥ ४ ॥

॥ ५३० ॥ आतां कधीं सांभाळाल । आम्हां ठेवाल चरणापें ॥ १ ॥ दिवसरात्रि खंती वाटे । हृदय फुटे वियोगें ॥ २ ॥ येउनी आतां भेटी द्यावी । यावरी गोसावी प्रीतीनें ॥ ३ ॥ निळा ह्मणे चरणीं माथा । कृपावंता ठेवितों ॥ ४ ॥

॥ ५३१ ॥ महर्षी देव स्तविती ज्यातें । कृतांजुळी हातें जोडुनियां ॥ १ ॥ तो हा उभा विटेवरी । रम्य तीरीं चंद्रभागे ॥ २ ॥ शुक नारद गाती कीर्तनीं । ज्यातें अनुदिनीं सुस्वरें ॥ ३ ॥ निळा म्हणे ब्रम्हादिक । ज्याचिये सेवक आज्ञेचे ॥ ४ ॥

॥ ५३२ ॥ जाणे पाळूं लळा । माता स्नेहातुर बाळा ॥ १ ॥ ऐसें जाण-तसां सकळ । तरि कां लावियला वेळ ॥ २ ॥ उपेक्षिलें ये परदेसी । एक-लें चि मज उपवासी ॥ ३ ॥ निळा ह्मणे यावरी करा । समाधान हृदयीं धरा ॥ ४ ॥

॥ ५३३ ॥ दोहीं डोळां घालुनी वाती । पाहे वाट दिवसराती ॥ १ ॥ केव्हां येसिल वो धांवोनी । प्रेमपान्हा पाजिसी स्तनीं ॥ २ ॥ पांचहि प्राण ठेविले कंठीं । तुज चि भेटावयासाठीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे माझी आई । न धरी निष्ठुर वो विठाबाई ॥ ४ ॥

॥ ५३४ ॥ मागें पाळिलीं पोसिलीं । अपत्यें त्वां वाढविलीं ॥ १ ॥ ऐसें बोलियले संत । लटिकी वाटे ते ते मात ॥ २ ॥ हें गे मज चि उपेक्षिलें । नाहीं समाधान केलें ॥ ३ ॥ निळा ह्मणे येऊनियां । भेटें पुरवीं माझा थाया ॥ ४ ॥

॥ ५३५ ॥ संतवचनें खरीं होती । वाढेल जगीं तुमची कीर्ती ॥ १ ॥ जरी माझें समाधान । कराल देउनी आलिंगन ॥ २ ॥ नाहीं तुह्मां जाणें येणें । कांहीं कोठुनियां धांवणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे विश्वंभरा । प्रगटा हृदयीं वास करा ॥ ४ ॥

॥ ५३६ ॥ काय करूं तैसें ज्ञान । जेणें अभिमान खवळे तें ॥ १ ॥ राहो भाव तुझ्या चरणीं । गर्जो वाणी गुणकीर्ति ॥ २ ॥ काय करूं व्युत्पत्ती तैसी । जेणें वादासी मूळ होय ॥ ३ ॥ निळा म्हणे अहंकार वाढे ॥ नलगे वेडें वैराग्य तें ॥ ४ ॥

॥ ५३७ ॥ अगा ये भूवैकुंठपीठा । सकळां वरिष्ठा देवांचिया ॥ १ ॥ अनाथ मी शरणांगत । करा स्थापित निज सेवे ॥ २ ॥ षड्गुण ऐश्वर्य भाग्यवंता । अहो रमाकांता श्रीविठ्ठला ॥ ३ ॥ निळा ह्मणे विश्वंभरा । करुणाकरा मज तारीं ॥ ४ ॥

॥ ५३८ ॥ गोपाळपुरनिवासिया । अगा ठाकलीया विटेवरी ॥ १ ॥ पद्मनाभा शेषशयना । अगा ये सूदना दैत्यकुळा ॥ २ ॥ चतुर्दश भुवना व्यापका देवा । माझिया भक्तिभावा चित्त द्यावें ॥ ३ ॥ निळा ह्मणे अपरमिता । अगा ये अनंता महदादी ॥ ४ ॥

॥ ५३९ ॥ करा माझा अंगीकार । पतीतपावन थोरब्रीदा ॥ १ ॥ उपेक्षितां हांसती लोक । म्हणती सेवक जड झाले ॥ २ ॥ मग ते तुम्हां होईल लाज । अंतरेल काज पुढील ही ॥ ३ ॥ निळा म्हणे अपकीर्ती अंगा । न ये पांडुरंगा करावें तें ॥ ४ ॥

॥ ५४० ॥ आठवला तो माझिये मनीं । कटीं कर दोन्ही वसविता ॥ १ ॥ न गमे दिवस न गमे राती । लागते खंती प्राण फुटे ॥ २ ॥ जीव ही होतो कासावीस । कैं तें रूप देखेन ॥ ३ ॥ निळा ह्मणे भेटवा आतां । ठेवितों माथा चरणावरी ॥ ४ ॥

॥ ५४१ ॥ दीन मी अनाथ तुमचे रंक । मागतों भीक मज द्यावी ॥ १ ॥ नेउनि घाला पायांवरी । निरवा श्रीहरि कृपाघना ॥ २ ॥ नुपेक्षावें शरणांगता । जरी मी नेणता दास तुमचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे अवघे संत । मिळोनि स्वहित करा माझें ॥ ४ ॥

॥ ५४२ ॥ विनवूनियां विठ्ठलदेवा । हातीं धरवा मज आतां ॥ १ ॥ तुमचिया भिडा अंगीकार । करील साचार ततक्षणीं ॥ २ ॥ जरि मी अन्यायी अपराधी । तरी कृपानिधि तुह्मी संत ॥ ३ ॥ निळा ह्मणे विनवूं काय । तुह्मी बापमाय अपस मी ॥ ४ ॥

॥ ५४३ ॥ पोटींचेंचि परी नेणतें बाळ । नेणें काळ वेळ मागतां ॥ १ ॥ आळी त्याची देखोनियां । पुरविती थाया मायबापें ॥ २ ॥ जरी उदंड आहेती पोरें । तरी ते थोरे जाणती चि ॥ ३ ॥ निळा ह्मणे मी निपटणें वेडें । बोलणें बोबडें कानीं घ्यावें ॥ ४ ॥

॥ ५४४ ॥ सेवक चि परि स्थापिला पदीं । मग त्याचिये बुद्धी कोण तुके ॥ १ ॥ तैसें चि केलें मज ही देवा । निक्षेप अवघा दावूनियां ॥ २ ॥ आईता वांटा दिधली जोडी । कवडीनें कवडी सांचिली ते ॥ ३ ॥ निळा ह्मणे देवा आभार चि केले । मज सेवका गौरविलें आपुलिया ॥ ४ ॥

॥ ५४५ ॥ प्रताप तुमचा आहे चि जैसा । करितां जी तैसा वडिवारही ॥ १ ॥ नव्हे जें कोणा तें करुनी दावीतां । अघटित घडवीतां निमिषमात्रें ॥ २ ॥ स्त्रियांचे पुरुष पशुमुखें श्रुती । चालविल्या भिंती उदकीं वह्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे माझा करा अंगीकार । तरी महिमा थोर वाढेल तुमचा ॥ ४ ॥

॥ ५४६ ॥ कीर्ति ऐकोनि आलों दारा । माझा करा सांभाळ ॥ १ ॥ जतन करीन तुमचें नाम । धरुनी प्रेम निज कंठीं ॥ २ ॥ भाव माझा बोलेसी ठेवा । घ्या हो सेवा दिननिसी ॥ ३ ॥ निळा ह्मणे संकल्पेसी । पायांपासीं कंठीन ॥ ४ ॥

॥ ५४७ ॥ सर्वकाळ जागवीन । आळवीन सुस्वरें ॥ १ ॥ नामें तुमचीं अहो देवा । श्रीमाधवा गोविंदा ॥ २ ॥ करीन हें चि दास्य कोडें । कीर्तन पुढें आवडी ॥ ३ ॥ निळा ह्मणे येईल मना । द्या हो वरदाना तेव्हां मज ॥ ४ ॥

॥ ५४८ ॥ हा तों तुमचा सहज गुण । करावें पाळण दासाचें ॥ १ ॥ नेणपणें म्यां विनविलें । पाहिजे क्षमा केलें तें ॥ २ ॥ धीर नाहीं माझे मनीं । केली ह्मणोनि विज्ञापना ॥ ३ ॥ निळा ह्मणे रमावरा । क्षमा करा अपराध ॥ ४ ॥

॥ ५४९ ॥ उणें पुरें बोलिलों आधीं । तें आपुलिये बुद्धि सारिखें ॥ १ ॥ तुम्ही तो देवा कृपामूर्ती । सकळां अर्थी पुरवितां ॥ २ ॥ पशु पक्षी सांभाळिले । स्मरतां नेले निजधामा ॥ ३ ॥ निळा ह्मणे तुमच्या घरीं । वाढे थोरी दासाची ॥ ४ ॥

॥ ५५० ॥ काळया सर्प गजेंद्र नाग । जटायु पतंग उद्धरिला ॥ १ ॥ कुब्जा दासी गणिका वेश्या । व्याध हि मांसाहारि तो ॥ २ ॥ भिल्ल पापी अजामेळ दोषी । पूतना राक्षसी उद्धरिली ॥ ३ ॥ निळा म्हणे तुमचा ऐसा । कीर्तीचा ठसा तिहीं लोकीं ॥ ४ ॥

॥ ५५१ ॥ आह्मी देवा भक्तीहीन । नेणों ज्ञान योगाचें ॥ १ ॥ ह्मणोनि येतों काकुळती । पुढतोपुढतीं तुह्मांसी ॥ २ ॥ भाव नाहीं न कळे ज्ञान । कैसें साधन करावें तें ॥ ३ ॥ निळा ह्मणे दिवस राती । उद्वेग चित्तीं राहिला हा ॥ ४ ॥

॥ ५५२ ॥ माझिया मना समाधान । द्यावें वचन अभयाचें ॥ १ ॥ निर्भय तेणें राहेन सुखें । हरिनाम मुखें आळवित ॥ २ ॥ नलगे महिमा मान प्रतिष्ठा । न म्हणे वैकुंठा मज न्या हो ॥ ३ ॥ निळा म्हणे आपुल्या पायीं । ठेवाल ठायीं राहेन ते ॥ ४ ॥

॥ ५५३ ॥ अथवा विनंती परिसा देवा । मज या निरवा संतजना ॥ १ ॥ राहेन त्यांचिया सहवासेसी । सेवा मिरासि करुनियां ॥ २ ॥ देतील तो सेवीन ग्रास । होइल सपोस तेणें तनु ॥ ३ ॥ निळा ह्मणे ते सांगती गोष्टी । धरीन कर्णपुटीं अर्थ त्यांचे ॥ ४ ॥

॥ ५५४ ॥ उगा चि राहेन संतापासीं । सेवुनी चरणांसी निरंतर ॥ १ ॥ पुसेन तया सांडुनी लाज । आपुलीये गुज अंतरींचें ॥ २ ॥ फेडितील ते मनिंची शंका । वचनें चि एका क्षणमात्रें ॥ ३ ॥ निळा ह्मणे उणें चि नाहीं । त्याचिये पायीं निजानंदा ॥ ४ ॥

॥ ५५५ ॥ भाग्यें जोडे सत्संगती । जरि होये हातीं सुकृत ॥ १ ॥ भाव शुद्ध संचित गांठीं । तरिच भेटी तयासवें ॥ २ ॥ शुद्धचर्या आचरण । लाभती चरण तरि हातीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे सज्जनसंग । देवा भाग दुर्लभ तो ॥ ४ ॥

॥ ५५६ ॥ विश्वास अंतरींचा जाणोनी । नाम ठेवा माझ्या वदनीं ॥ रूप मनाचें आसनीं । कृपा करुनी बैसवा ॥ १ ॥ करीन तैसी घ्यावी सेवा । विश्वास पालटों न द्यावा ॥ आईका विनविलें तें देवा । अहो पंढरीनिवासा ॥ २ ॥ माझिये बुद्धीसी धैर्य द्यावें । सेवेसी इंद्रियां राबवावें ॥ आपु-

ळींये कीर्तनीं राखावें । प्रेम माझें सर्वदां ॥ ३ ॥ गर्व अभिमान दवडावा । आळस निद्रा परती ठेवा ॥ विसर तुमचा न पडे देवा । देईं सेवा हें दान ॥ ४ ॥ निळा ह्मणे कृपासिंधु । तुह्मी साचार दीनबंधु ॥ अह्मा ह्मणोनि घेतला छंदु । येवढें आर्त पुरवावें ॥ ५ ॥

॥ ५५७ ॥ अगा ये नरकासुरमर्दना । कुशदैत्यनिकंदना ॥ अगा कौंस-मधुकैठमूदना । अगा मर्दना हिरण्याक्षा ॥ १ ॥ अगा वृत्रासुरनिहंत्या । हिरण्यकश्यपा विदारित्या ॥ अगा रावण संहारित्या । कुंभकरणादी राक्षसां ॥ २ ॥ अगा रिठासुराच्या वैऱ्या । सहस्र भुजांच्या वधणारा ॥ अगा निवटिया भोमासुरा । सत्यभामावरा गोविंदा ॥ ३ ॥ अगा ये कालिया-दमना । शकटासुरविध्वंसना ॥ अगा शिशुपाळवक्रदंतहनना । जरासंध भंजना कागबगा ॥ ४ ॥ अगा वळींबंधना असुरारी । अगा अरिमन्मथ तमारी ॥ अगा ताटिकापूतनारी । गोवर्धनधारी बळिवंता ॥ ५ ॥ अगा ये केशियादमना । तृणासुरधेनुकहनना ॥ अगा मरिची सुबाहु उद्धरणा । त्रिशिरा खर दूषण प्राणहर्त्या ॥ ६ ॥ अगा ये विरोचन जळांधरअंतका । अहिरावणमहिरावणघातका ॥ कबंध वाळीच्या हंतका । रघुकुळटिळका सांबहरणा ॥ ७ ॥ अगा ये शंखासुरचिरणारा । मच्छरूपिया पोहणारा ॥ शुंभानिशुंभांचिया घातणारा । मोहनीरूपधरा दैत्यांतका ॥ ८ ॥ अगा ये अपार भक्तपाळका । पंढरी भूवैकुंठनायका ॥ विश्वचराचरव्यापका । अभय वरदायका निळयाच्या ॥ ९ ॥

॥ ५५८ ॥ नरकासुरा वधिलें जेणें । मुरुसी मर्दुनी घेतलें ठाणें ॥ वृत्रा-सुराचें हरिलें जिणें । तारकासुरा प्राणहानी केली ॥ १ ॥ मधुदैत्याचें मूदन । हिरण्याक्षाचे घेतले प्राण ॥ हिरण्यकश्यपा विदारून । काळयवन दग्ध केला ॥ २ ॥ रिठासुर दाढे चाविला । अघा बगासुर तो चिरिला ॥ तृणासुर सहजेंचि मर्दिला । शकट मोडिला पादघातें ॥ ३ ॥ उपटिलीं धेनुकासुराचीं शिंगें । कंस चाणुर ते वधिले रागें ॥ केशियाचीं मोडिलीं टांगें । गोकुळीं श्रीरंगें बाळपणीं ॥ ४ ॥ परशुरामें वधिला सहस्रार्जुन । एकवीस वेळां क्षत्रियांचें कंदन ॥ रामें ताटिका खरदूषण । नासीकछेदन शूर्पनखे ॥ ५ ॥ रावणकुंभकर्ण रामें मर्दिले । कितेक निशाचरातें आटिलें ॥ ऐसे पवाडे संपादिले । बहु वेळां उतरिले धराभार ॥ ६ ॥ निळा ह्मणे

ने ते अवतारीं । भक्त रक्षुनी दैत्यां मारी ॥ ऐसिया चरित्राची हारी । माळा
ळाविल्या कल्पादी ॥ ७ ॥

॥ ५५९ ॥ कृपाळु भक्तांचा कैवारी । क्रोध दैत्यांदानवांवरी ॥ एका
तारीं एका मारी । एका उद्धरी नाममात्रें ॥ १ ॥ एका घरीं एका दारीं ।
एका हृदयीं एका परवरी ॥ एका धुंडितां अष्टही प्रहरीं । न संपडे माझारी
त्रैलोक्या ॥ २ ॥ एकपत्नीव्रत दशरथा घरीं । रेणुकानंदन हा ब्रम्हचारी ॥
मुंजिया बटु बळिच्या द्वारीं । महा व्यभिचारी नंदाचा ॥ ३ ॥ मोहनी
रूपें संदोपसंद । मोहुनी परस्परें करवील वध ॥ वृंदेसी करुनियां शकट
भेद । वधिला जळांधर रणरंगीं ॥ ४ ॥ मत्स्यें केला शंखोद्धार । कूर्में
पेलला धराभार ॥ वराहें हिरण्याक्ष असुर । मर्दुनी धरा धरिली निज
दंतीं ॥ ५ ॥ नृसिंहें हिरण्यकश्यप विदारिला । वामनें बळी पाताळीं
घातला ॥ परशुरामें सहस्रार्जुन वधिला । पृथ्वीचा केला दान धर्म ॥ ६ ॥
रामें रावणाचें मर्दन । केलें देवाचें बंदीमोचन ॥ कृष्णें काळयवना जाळून ।
कंस चाणुर निवटिले ॥ ७ ॥ बौध्यें मोडविला दैत्ययज्ञ । वेदनिंदा निज
मुखें करून ॥ कलंकिया म्लेंछाचेंनि कंदन । पुढील कार्यार्थ हा असो ॥ ८ ॥
ऐसे अवतार घेउनी हरि । भूभार हरिले नानापरि ॥ आपुलिया दासाचें
रक्षण करी । संत चराचरीं गर्जती ॥ ९ ॥ चतुराननरूपें सृष्टीचें सृजन ।
विष्णुरूपें प्रतिपाळण ॥ रुद्ररूपें परम क्षोभोन । करील संहार सक-
ळांचा ॥ १० ॥ शंभु त्रिपुरातें संहारी । गजासुराचा मस्तक उतरीं ॥ गणेश-
रूपें नृत्याच्या गजरीं । एका दैत्या चुरी पदघातें ॥ ११ ॥ ऐसीं हे चरित्रें
श्रवण करितां । ठावो नुरे चि दोषा दुरिता ॥ ब्रह्मानंदें श्रोता वक्ता ।
मुक्ति सायोज्यता पावती ॥ १२ ॥ नाना रूपें नाना नामें । नाना अवतार
नाना कर्में ॥ धर्म रक्षिले ते सुखसंभ्रमें । निळा सप्रेमें गर्जत ॥ १३ ॥

॥ ५६० ॥ आम्ही तों जिवें वेंच केला । तुमच्या बोलावरी देवा ॥ १ ॥
हें तें तुम्हांसी नव्हे चि ठावें । किती वेळ दावावें बोलोनि ॥ २ ॥ जैसी
असो तैसी चि तरी । कायसी थोरी मग तुमची ॥ ३ ॥ निळा ह्मणे
कायां चि शीण । केला यावरून दिसतसे ॥ ४ ॥

॥ ५६१ ॥ निवेदिलें पायांपाशीं । जें जें मानसीं होतें तें ॥ १ ॥ आतां
उचित तैसें करा । आह्मी तो संसारा आंचवलों ॥ २ ॥ काय नाहीं तुमच्या

ह्मतीं । वचनीं तिष्ठती महा सिद्धी ॥ ३ ॥ निळा ह्मणे तुमच्या संगें । पांडु-रंगें वर्तिजे ॥ ४ ॥

॥ ९६२ ॥ आतां माझा अंगिकार । करा थार पायापें ॥ १ ॥ लाउ-नियां आपुल्या गुणीं । माझी वाणी रंजवा ॥ २ ॥ बाळी भोळी करीन सेवा । तुमची देवा ते घ्यावी ॥ ३ ॥ निळा ह्मणे विनवूं नेणें । तरी पोसणें मी तुमचें ॥ ४ ॥

॥ ९६३ ॥ अगाध महिमा तुमचा देवा । काय म्यां वाणावा मूढ-मति ॥ १ ॥ उगा चि म्हणवीं तुमचा दास । करुनियां आस पायांची ॥ २ ॥ शब्द चातुर्य कांहींचि नेणें । बोबडे बोलणें घ्या कानीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे आपुला म्हणवा । भलतैसा ठेवा भलतेथें ॥ ४ ॥

॥ ९६४ ॥ जेववाल तें चि जेवीन मुखें । पांघरवाल सुखें पांघरेन ॥ १ ॥ बैसवाल तेथें चि बैसेन उगा । निजवाल जागा न सोडीं तो ॥ २ ॥ जैसें कराल मी होईन तैसा । न करुनियां आशा आणिकांची ॥ ३ ॥ निळा ह्मणे जें कराल तें तें । होईन आज्ञेतें नुलंघीं ॥ ४ ॥

॥ ९६५ ॥ पांडुरंगा दयाघना । गुणनिधाना सुखसिंधु ॥ १ ॥ भाव माझा जाणोनियां । ठेवा जि पायां जवळीकें ॥ २ ॥ भक्तवत्सल मनमोहना । राजीवनयना निजात्मया ॥ ३ ॥ निळा म्हणे करुणाकरा । विश्वंभरा विश्वजनिया ॥ ४ ॥

॥ ९६६ ॥ अहो देवा कृपावंता । करा मज अनाथा सनाथ ॥ १ ॥ निरउनियां संतजना । करा मना बोध माझ्या ॥ २ ॥ अरुप वाणी बोबडीं वचनें । केलीं स्तवनें परिसावीं ॥ ३ ॥ निळा म्हणे आवडी जाणा । करीं विज्ञापना म्हणउनी ॥ ४ ॥

॥ ९६७ ॥ नित्य नूतन गाऊं गुण । करूं जागरण कीर्तनीं ॥ १ ॥ तेणें तुमची होईल कृपा । निरसन तापा भवरोगा ॥ २ ॥ जाती खंडोन जन्मां-तरें । पुढें हि फेरे खावे ते ॥ ३ ॥ निळा म्हणे विश्वास चित्तीं । हा चि श्रीपती मानियेला ॥ ४ ॥

॥ ९६८ ॥ उद्दंडाचें धांवणें केलें । तुम्ही तें ऐकिलें पुराणीं ॥ १ ॥ म्हणोनियां विश्वास झाला । संतीं ही सांगितला बहुतां परि ॥ २ ॥ माझें हि

मज हित चि वाटे । करितां गोमटें कीर्तन ॥ ३ ॥ निळा म्हणे न सोडीं पाय । होईल काय हो तें सुखें ॥ ४ ॥

॥ ५६९ ॥ अहो तुम्ही कृपावंता । किती आतां विनवावें ॥ १ ॥ न द्या चि कांहीं प्रत्युत्तर । ऐसे निष्ठुर कैंवि तरी ॥ २ ॥ नेणों दासाचा त्रास आला । दिसे मांडिला अव्हेर ॥ ३ ॥ काय करुणा चि हारविली । विपरीत झाली दशा दिसे ॥ ४ ॥ निळा म्हणे म्हातारपण । आलें दारुण नुठवेसें ॥ ५ ॥

॥ ५७० ॥ ठेवाल तेथें राहेन सुखें । यावरी हरिखें आपुलिया ॥ १ ॥ न वंचीं मी हे सेवेसी काया । धाडाल ठाया जाईन त्या ॥ २ ॥ द्याल ग्रास तो घालीन मुखीं । न करीं आणिखी सोस कांहीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे कराल आज्ञा । न मोडीं माज्ञा तुमची ते ॥ ४ ॥

॥ ५७१ ॥ ठेउनी चित्त पायांवरी । करीन चाकरी मनोभावें ॥ १ ॥ भोगवाल ते भोगीन भोग । न वंचीं अंग तिळतुल्य ॥ २ ॥ आज्ञा तुमची वंदीन शिरीं । धरीन अंतरीं सांगितलें ॥ ३ ॥ निळा म्हणे अखंड निरत। राहेन सतत सेवेचिये ॥ ४ ॥

॥ ५७२ ॥ धाडाल तेथें जाईन देवा । सांगाल सेवा ते चि करिन ॥ १ ॥ लेववाल तें लेईन लेणें । मिरवीन भूषणें कराल तें ॥ २ ॥ सांगाल ते चि ऐकेन गोष्टी । धरुनियां पोटीं राहेन अर्थ ॥ ३ ॥ निळा म्हणे येईन मागें । तुम्ही न्याल संगें त्या चि स्थळा ॥ ४ ॥

॥ ५७३ ॥ करूं येईल अंगिकार । तरि करा फार काय बोलों ॥ १ ॥ नाहीं घोकिलें ऐकिलें कांहीं । सेवा घडली नाहीं वैष्णवांची ॥ २ ॥ स्वधर्म विधी न कळे आचार । कैसा तो प्रकार साधनाचा ॥ ३ ॥ निळा म्हणे आहें मूढ दगड । ठायींचीच जड बुद्धी माझी ॥ ४ ॥

॥ ५७४ ॥ असाधारण माझे बोल । तुमचे फोल कृपेविण ॥ १ ॥ म्हणोनियां धांवा करीं । करा सामोरी दृष्टी आतां ॥ २ ॥ काय करूं तैशा व्युत्पत्ती । तुम्हां जल्पती नेणोनियां ॥ ३ ॥ निळा म्हणे नामोच्चारीं । तुमचीये मोहरीं कृपेतें ॥ ४ ॥

॥ ५७५ ॥ तुम्ही संत दयाघन । आम्हां म्हणऊन विनवितों ॥ १ ॥

सलगी केली पायांपासीं । करा अपराधासी क्षमा सा ॥ २ ॥ मी तों नेणतें चि अपत्य । तुम्ही संत मायबाप ॥ ३ ॥ निळा म्हणे बोबडे बोल । बोलेन शिकवाल तुम्ही ते ॥ ४ ॥

॥ ५७६ ॥ कवळुनियां कृपामोहें । माझे संदेह निरसिले ॥ १ ॥ लांचाविली माझी वाणी । आपल्या गुणीं वळुनियां ॥ २ ॥ नाचों शिकवितां पुढें । धरुनियां कोडें करकमळीं ॥ ३ ॥ निळा म्हणे माझीं गात्रें । तुम्ही सूत्रें चेष्टविलीं ॥ ४ ॥

॥ ५७७ ॥ नाम सांडुनी मुक्ती घेणें । हीं तों लक्षणें अधमाचीं ॥ १ ॥ आह्मां विष्णुदासां धर्म । नित्य नेम कथेचा ॥ २ ॥ काय करूं त्या व्युत्पत्ती । वडील हांसती पूर्वज ॥ ३ ॥ निळा ह्मणे करावी सेवा । आवडी देवा हे माझी ॥ ४ ॥

॥ ५७८ ॥ राहोनियां सत्संगती । गावी कीर्ती तुमचीच ॥ १ ॥ हें चि देईं नलगे दुजें । अंतर माझें जाणोनी ॥ २ ॥ धन मान नलगे देवा । अवघा ठेवा गुंडुनी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जगदाधीशा । हे चि आशा बहु काळ ॥ ४ ॥

॥ ५७९ ॥ नाहीं लौकिकासी काम । गाईन नाम सर्वदा ॥ १ ॥ हें चि माझें भांडवल । विठ्ठल विठ्ठल खरें नाणें ॥ २ ॥ नेघों भुक्ती नेघों मुक्ती । प्रेम विरक्ती हरिनामीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे साधन सार । तुमचा उच्चार नामाचा ॥ ४ ॥

॥ ५८० ॥ काय काज कोणासवें । विठ्ठल देवें वांचुनी ॥ १ ॥ काय नाहीं चरणांपासीं । पाहिजे ज्यासीं तें तेथें ॥ २ ॥ ह्मणोनियां जीवेंसाटीं । करुनी नेहटी बैसलों ॥ ३ ॥ निळा ह्मणे सभाग्य धणी । पुरवील आयणी सकळ ही ॥ ४ ॥

॥ ५८१ ॥ तुमचे पायीं आमुचें निज । नाहीं काज लौकिकीं ॥ १ ॥ रिद्धी सिद्धी फुकासाठीं । नेघों गोठी नाईकों सा ॥ २ ॥ लेववा भक्तीचीं लक्षणें । तीं चि भूषणें आवडती ॥ ३ ॥ निळा ह्मणे कृपानिधी । फेडा आधीं हे माझी ॥ ४ ॥

॥ ५८२ ॥ सुखें जन्मांतरें घेऊं । नामें आळवूं श्रीहरिचीं ॥ १ ॥ नाहीं

आह्मां त्याचें कोडें । संसार वापुडें तें काय ॥ २ कळीकाळाचें भय तें किती । पायां पडती यमधर्म ॥ ३ ॥ निळा ह्मणे सर्व हि सिद्धी । रुळती पदीं हरिनामें ॥ ४ ॥

॥ ५८३ ॥ नामेंचि तुमचीं आळवितां । न पुरे धणी पंढरिनाथा ॥ १ ॥ या चि सुखें कल्पकोडी । जातां वेळ वाटे घडी ॥ २ ॥ जडतां नामीं निजध्यास । नाहीं काळ गणना त्यास ॥ ३ ॥ निळा म्हणे निश्चय माझा । जाणतां तुम्ही पंढरिराजा ॥ ४ ॥

---

## देवभक्तांचें परस्पर प्रेम.

॥ ५८४ ॥ निज भक्ताची आवडी । सांभाळी त्या घडीघडी ॥ १ ॥ राखोनियां भूक तान । करी त्याचा बहु मान ॥ २ ॥ वस्त्रें भूषणें पुरवी । चिंता त्याची वाहे जिवीं ॥ ३ ॥ निळा म्हणे त्याचें उणें । नेदी पडों कवण्या गुणें ॥ ४ ॥

॥ ५८५ ॥ परम कृपेचा सागर । भक्तवत्सल करुणाकर ॥ १ ॥ ऐसीं वागवितो नांवें । भक्तिलागीं निज वैभवें ॥ २ ॥ म्हणवी दासाचा अंकित । शरणांगतां शरणांगत ॥ ३ ॥ निळा म्हणे साच चि करी । न वजे पासुनी तया दुरी ॥ ४ ॥

॥ ५८६ ॥ जिहीं जोडिला विश्वासें । निज निष्ठेच्या मानसें ॥ १ ॥ मुखें आळविलें नाम । याचें धरूनियां प्रेम ॥ २ ॥ बैसली आवडी । याच्या पायीं दिली बुडी ॥ ३ ॥ निळा म्हणे त्याच्या घरा । धांवे करी येरझारा ॥ ४ ॥

॥ ५८७ ॥ न पडे विसर । याचा जया निरंतर ॥ १ ॥ हा ही न विसंबे तयासी । जवळी राहे अहर्निशी ॥ २ ॥ चर्चा करिती याच्या गोष्टी । देव तया पाठीपोटीं ॥ ३ ॥ निळा म्हणे अन्नपान । तया पुरवी आच्छादन ॥ ४ ॥

॥ ५८८ ॥ ऐकोनियां संतवाणी । चक्रपाणी संतोषे ॥ १ ॥ म्हणे यारे

भिऊं नका । माझिया सेवकां भय नाहीं ॥ २ ॥ नाम मुखीं न संडावें । भजा भावें संतांसी ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसी हरी । आज्ञा करीं निज दासां ॥ ४ ॥

॥ ५८९ ॥ निर्भय असा माझ्या बळें । कळिकाळें ते रंके ॥ १ ॥ सुखें करा हरिची कथा । तुमची चिंता मज आहे ॥ २ ॥ पाचाराल ते चि घडी । येइन तांतडी धांवत ॥ ३ ॥ निळा म्हणे अमृतवचनें । दे वरदानें दासांसी ॥ ४ ॥

॥ ५९० ॥ सोडुनी तया न वचे दुरी । त्याचा करी प्रतिपक्ष ॥ १ ॥ म्हणे मी त्यांचा ते ही माझे । नव्हती दुजे कल्पांती ॥ २ ॥ मी तूं म्हणतां वेगळें न हो । मुळींचे आहों एकएकीं ॥ ३ ॥ निळा म्हणे देवभक्तां । एकात्मता ठायींची ॥ ४ ॥

॥ ५९१ ॥ स्वामी एक म्हणवी दास । आवडीस रूप केलें ॥ १ ॥ मुळींचें दोघां एकपण । परी हें भिन्न दाखविलें ॥ २ ॥ एक म्हणे धांवा धांवा । एक कुडावा करी त्याचा ॥ ३ ॥ निळा म्हणे नवल वाटे । साने मोठे नव्हती हे ॥ ४ ॥

॥ ५९२ ॥ एक बैसे सिंहासनीं । कर जोडुनी एक उभा ॥ १ ॥ एक पूजा स्वीकारित । एक करित निजांगें ॥ २ ॥ मुळीं पाहतां दोघे एक । परी कौतुक दाखविलें ॥ ३ ॥ निळा म्हणे सेवक स्वामी । पुरुषोत्तमीं हें मिथ्या ॥ ४ ॥

॥ ५९३ ॥ बोलिलों तें क्षमा करा । विश्वंभरा अपराध ॥ १ ॥ सेवकांनीं कीजे सेवा । तुम्ही तों देवा देवो चि ॥ २ ॥ चावळलों ते सलगी केली । उपसाहिली पाहिजे ॥ ३ ॥ निळा ह्मणे न कळे लीला । अकळ कळा तुमची ते ॥ ४ ॥

॥ ५९४ ॥ प्रवेश राउळाभीतरीं । केला संतमुनेश्वरीं ॥ १ ॥ तंव तो घननीळ सांवळा । उभा विटेवरी देखिला ॥ २ ॥ कांसे मिरवे पीतांबर । विराजित कटीं कर ॥ ३ ॥ मुख सुहास्य चांगलें । केशर निढळीं रेखिलें ॥ ४ ॥ अंग प्रत्यांगीं भूषणें । दिव्य माळा, करकंकणें ॥ ५ ॥ निळा म्हणे संत भेटी । उतावेळ घाली मिठी ॥ ६ ॥

॥ ५९५ ॥ धांवोनियां झोंबे कंठीं । कृपादृष्टि अवलोकी ॥ १ ॥ म्हणे श्रमलेती मार्गी येतां । बैसा आतां अविश्रम ॥ २ ॥ घडीघडी जिविंची मात । सांगे पुसे आर्त आवडीचें ॥ ३ ॥ निळा म्हणे कृपाघनें । बहुत मानें गारविलें ॥ ४ ॥

॥ ५९६ ॥ पुसे क्षेम भक्तांलागीं । म्हणतसे मार्गी श्रमलेती ॥ १ ॥ प्रति वरुषीं भेटी देतां । सांभाळितां येउनी ॥ २ ॥ नाहीं तुमचे उत्तीर्ण झालों । कधीं आलों गांवासी ॥ ३ ॥ निळा म्हणे आभारला । प्रसन्न झाला दासासी ॥ ४ ॥

॥ ५९७ ॥ म्हणे मी येइन तुम्हांसवें । गांवा न्यावें आपुलिया ॥ १ ॥ ठाकेल ते करीन सेवा । माझा न करावा अव्हेर ॥ २ ॥ राहेन तुमचिये संगतीं । सुख विश्रांती कारणें ॥ ३ ॥ निळा म्हणे येणें रूपा । तुमची कृपा देव म्हणे ॥ ४ ॥

॥ ५९८ ॥ भक्त सेवेच्या उपकारें । बहुत आभारें दाटलों ॥ १ ॥ काय उत्तीर्ण व्हावें यासी । रुक्माईसी विचारी ॥ २ ॥ देतां कांहींच न घेती । उदास वृत्ती सर्वदा ॥ ३ ॥ निळा म्हणे जिवीं चि जडलें । तिहीं मज केलें अंकित ॥ ४ ॥

॥ ५९९ ॥ मज हि भीड नुलंघवे । जें त्या पुसावें मनोगत ॥ १ ॥ सर्वही भावें सेवाऋणी । मजचि करुनी सोडियलें ॥ २ ॥ आशा मात्र नाहीं यासी । जे कां देहासी नाठविती ॥ ३ ॥ निळा ह्मणे घातली मिठी । कल्पकोटी न सुटेसी ॥ ४ ॥

॥ ६०० ॥ देतां कांहीं चि न घेती । भुक्ति मुक्ति रिद्धी सिद्धी ॥ १ ॥ म्हणोनियां संकट थोर । वाटे दुस्तर मज यांचें ॥ २ ॥ वैकुंठासी नेऊं म्हणतां । विटती तत्वतां ऐकोनी ॥ ३ ॥ निळा म्हणे रंगले रंगीं । माझिया निजांगीं लिगटले ॥ ४ ॥

॥ ६०१ ॥ निरोप मागावया संत । आलों राउळा समस्त ॥ १ ॥ चरणीं ठेऊनियां माथा । विनविती पंढरिनाथा ॥ २ ॥ म्हणति कृपा असों द्यावी । उपेक्षा आमची न करावी ॥ ३ ॥ निळा म्हणे पंढरिनाथा । वियोग न साहे सर्वथा ॥ ४ ॥

॥ ६०२ ॥ सद्गदित झाले कंठ । नेत्रीं अश्रु चालती लोट ॥ १ ॥

एकी चि परी देवा भक्तां। बाधी वियोगाची व्यथा ॥ २ ॥ देव स्फुंदे भक्त रडे। एक पहाती एकाकडे ॥ ३ ॥ निळा म्हणे न सुटे मिठी। येरयेरां पडली गांठी ॥ ४ ॥

॥ ६०३ ॥ पंढरिहुनी गांवा जातां। वाटे खंती पंढरिनाथा ॥ १ ॥ आतां बोळवीत यावें। आमुच्या गांवा आम्हांसवें ॥ २ ॥ तुम्हांलागीं प्राण फुटे। वियोगदुःखें पूर लोटे ॥ ३ ॥ निळा म्हणे पंढरिनाथा। चला गांवा आमुच्या आतां ॥ ४ ॥

॥ ६०४ ॥ देव चालिला सांगातें। भक्त जाती ज्या ज्या पंथें ॥ १ ॥ परम आनंद उभयतांसी। देवभक्तां सुखाच्या रासी ॥ २ ॥ चालतां मारगीं। कथा कीर्तन प्रसंगीं ॥ ३ ॥ निळा म्हणे देवभक्तां। परम विश्रांती चालतां ॥ ४ ॥

॥ ६०५ ॥ भक्तांचिया गांवा आला। देव परमानंदें धाला ॥ १ म्हणे नवजायें येथुनी। आतां भक्तांसी टाकुनी ॥ २ ॥ सिण माझा हरला भाग। गोड वाटे याचा संग ॥ ३ ॥ निळा म्हणे विजयी झाले। देवा भक्त घेउनी आले ॥ ४ ॥

॥ ६०६ ॥ यात्रेहुनि आले गांवा। घेउनियां विठ्ठल देवा ॥ १ ॥ भक्त पूजिती आदरें। टाळ विणे मृदंगस्वरें ॥ २ ॥ दिंड्या पताका छत्रिने। नृत्य हरिकथा गायनें ॥ ३ ॥ निळा म्हणे निज भुवनीं। पूजिती स्तविती अनुदिनीं ॥ ४ ॥

॥ ६०७ ॥ देव घरा आला। भक्ति सन्मानें पूजिला ॥ १ ॥ पाहुणेर पंगती। संत द्विजवृंदें शोभती ॥ २ ॥ पुढें आरंभुनी कथा। बुके माळा गंधाक्षता ॥ ३ ॥ निळा म्हणे ब्रम्हानंदें। नाचती उभयतां आनंदें ॥ ४ ॥

॥ ६०८ ॥ देव आदरें म्हणे भक्तां। घ्या हो भुक्ति मुक्ति आतां ॥ १ ॥ भक्त म्हणती नेघों देवा। पुरे आम्हां तुझी चि सेवा ॥ २ ॥ रिद्धी सिद्धी तरी घ्यारे। भक्त त्यागिती धिःकारें ॥ ३ ॥ निळा म्हणे करुनी साटी। बैसले चरणीं घालुनी मिठी ॥ ४ ॥

॥ ६०९ ॥ भक्त पहावया तांतडी। नाम चि ऐकोनि घाली उडी ॥

निज दासाचीं हा सांकडीं । न देखे नाईके सर्वथा ॥ १ ॥ ऐसा भक्तां ऋणाइत । सर्वदा सेवेसी तिष्ठत ॥ मागें पुढें सांभाळित । त्याच्या प्रेमासी भुलला ॥ २ ॥ गजेंद्रा संकटीं सोडविलें । इच्छित उपमन्या दिधलें ॥ ध्रुवासी नेउनियां स्थापिलें । गगनीं वैसविलें अढळपदीं ॥ ३ ॥ गणिका पक्षियातें बोभातां । घालुनी विमानीं ते तत्वता ॥ नेली वेकुंठासी त्वरिता । निज भुवनीं सन्मानिली ॥ ४ ॥ तैसा चि पुंडलिकासाठीं । उभाचि इटेच्या नेहटी ॥ युगें गेलीं परि हा गोठी । न करी चि कदा ही वैकुंठींची ॥ ५ ॥ बळिचा झाला द्वारपाळ । यशोदेनंदाचा हा बाळ ॥ कंसचाणुरादिकां काळ । सारथी कृपाळ अर्जुनाचा ॥ ६ ॥ धर्मा घरीं तरि हा मंत्री । विवेक युक्ती प्रमाणसूत्री ॥ गुण लावण्याचा धात्री । विचार सांगे स्वहिताचा ॥ ७ ॥ भीष्म द्रोणाचा हा प्राण । सांगाती विदुराचा भगवान ॥ द्रौपदिलज्जेचें निवारण । वस्त्रें अपार पुरविलीं ॥ ८ ॥ निळा ह्मणे भक्तासाठीं । नित्य करुणा वाहे पोटीं ॥ शंख चक्रादि आयुधें मुष्टी । भक्तरक्षण करावया ॥ ९ ॥

॥ ६१० ॥ भाव भक्तीचा भुकेला । दास दासांचा अंकिला ॥ न वजे दुरी उभा ठेला । अवघा झाला त्यांचा चि ॥ १ ॥ भक्तवचनें ऐके कानीं । भक्त आवडी पाहे नयनीं ॥ भक्त हृदयीं अलिंगुनी । निज ऐश्वर्य अर्पी त्यां ॥ २ ॥ भक्तां मानी जिवप्राण । त्यांसीं न विसंबे एक हि क्षण ॥ त्यांचें वागवी हा भूषण । निंबलोण उतरी त्यां ॥ ३ ॥ जीव भाव देवावरी । जिहीं ठेविला निज निर्धारीं ॥ देवावीण दुसरी परी । तुच्छ मानिलें संसारा ॥ ४ ॥ नलगे वैकुंठ त्याचिये चित्तीं । कैवल्यातें परतें करिती ॥ देवाविण ते नेघों ह्मणती । मोक्ष मुक्ती फुकटा ॥ ५ ॥ देवाविण रिद्धी सिद्धी । ओंवाळुनी सांडिती त्या उपाधी ॥ देवा वेगळी त्याचिये बुद्धी । नाहींचि विश्रांती आणिक ॥ ६ ॥ निळा ह्मणे त्यांचिये घरीं । राहे होउनी अंकित हरी ॥ भक्तकाज हा कैवारी । ब्रीदें वागवी सर्वदा ॥ ७ ॥

॥ ६११ ॥ वोरसोनियां भक्तासाठीं । धांवे वैकुंठींहुनी उठाउठी ॥ हात ठेऊनियां कटीं । उभा द्वारीं ठाकला ॥ १ ॥ देखोनियां पुंडलिकासी । वास केला तयापाशीं ॥ अवलोकुनियां निज भक्तांसी । परम विश्रांती पावला ॥ २ ॥ जे जे येती दर्शनासी । भुक्ति मुक्ति वांटी त्यांसी ॥ गाती वाणिती जे यासी । त्यां ने वैकुंठासी निज गजरें ॥ ३ ॥ ने घे त्यांची अतिशय सेवा । जिहीं आळ-

विलें याचिया नांवा ॥ धांवोनि त्यांचा करी कुडावा । आपुलिया गांवा ने त्यासी ॥ ४ ॥ न ह्मणे चि दिवस रात्री कांहीं । सदा भक्ताचिये वाही ॥ निळा ह्मणे त्याच्या चि देहीं । प्रगटे नव्हे निराळा ॥ ५ ॥

॥ ६१२ ॥ अवघा कळा याचे हातीं । न करी काय एक श्रीपती ॥ विष पाजितां अमृतीं । केली तृप्ती प्रल्हादा ॥ १ ॥ चंद्रहास्याचा कैवारी । रक्षिलें त्या महामारी ॥ राज्य देऊनियां मुरारी । वैष्णवांमाजि श्रेष्ठ केला ॥ २ ॥ आर्जुनाची प्रतिज्ञा गहनु । देखोनि दिवसा लोपिला भानु ॥ जयद्रथासी यमसदनु । प्राप्त केला तात्काळीं ॥ ३ ॥ गर्भीं रक्षिला परि-क्षिती । सुदर्शन चक्र घेउनी हातीं ॥ उदरीं प्रवेशोनियां श्रीपति । छेदिली शक्ति अनिवार ॥ ४ ॥ द्रौपदीच्या वस्त्रहरणीं । उडी घालुनी ततक्षणीं ॥ केली वस्त्राची पुरवणी । लाजविलीं कौरवें ॥ ५ ॥ गजेंद्रें संकटीं धांवा केला । वैकुंठीं यातें तो जाणों आला ॥ येउनी तांतडी मग सोडविला । विमानीं नेला बैसवुनी ॥ ६ ॥ निळा ह्मणे ऐसीं किती । तारिलीं ताराल तुह्मी पुढती ॥ जयां तुमच्या नामीं प्रीती । ते ते होती आप्त तुम्हां ॥ ७ ॥

॥ ६१३ ॥ कांहीं चि सदैव दुबळे । न म्हणे हा बाळे नारीनर ॥ १ ॥ जयापरी तैसा होय । बापमाय सकळांचा ॥ २ ॥ शरणांगताचिया नांवें । पशु हि उद्धरावे पक्षिया ॥ ३ ॥ निळा ह्मणे जीव जीवा । वंद्य हा देवां मानवांसीं ॥ ४ ॥

॥ ६१४ ॥ परम विश्रांती पावली । अवघी येणें सुखी केली ॥ १ ॥ आवडी वंदिती पूजिती । दर्शना जे याच्या येती ॥ २ ॥ नाम उच्चारिती वाचे । नित्य कोड करी त्यांचे ॥ ३ ॥ निळा ह्मणे भक्तांसाठीं । धरी रूपें अनंतकोटी ॥ ४ ॥

॥ ६१५ ॥ भक्तांलागीं पुढारला । येउनी पुढें उभा ठेला ॥ १ ॥ सिण भाग हीं न विचारी । युगानयुगीं विटेवरी ॥ २ ॥ सोहळा अधिकें अधिक । करी भक्ताचें कौतुक ॥ ३ ॥ निळा ह्मणे बहुमानें । संतां पूजी वांटी दानें ॥ ४ ॥

॥ ६१६ ॥ भक्तांचिया घरा आला । सुख विश्रांति पावला ॥ १ ॥ उपकार ते वेळोवेळां । आठवी घननीळ सांवळा ॥ २ ॥ नाहीं कळिकाळा

हे भ्याले । अग्नि विष वाटुनी प्याले ॥ ३ ॥ निळा ह्मणे आभारला । ह्मणवी भक्तांचा आंकिला ॥ ४ ॥

॥ ६१७ ॥ न विसंबे त्यां घटिका पळ । त्याचिपासीं सर्वकाळ ॥ १ ॥ उत्तीर्णत्वा लागीं हरि । त्याची परिचर्या करी ॥ २ ॥ न ह्मणे दिवस रात्री कांहीं । संचरोनी वसे त्याच्या देहीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे भक्तां घरीं । गुणें नामें रूपें हरी ॥ ४ ॥

॥ ६१८ ॥ भक्त देव देवतार्चन । भक्त माझें पूजा ध्यान ॥ १ ॥ भक्ताविण भजों कोणा । ह्मणे वैकुंठींचा राणा ॥ २ ॥ भक्त माझा विधी जप । भक्त चि योग याग तप ॥ ३ ॥ निळा ह्मणे भक्तावरी । ऐसी निष्ठा सांगे हरी ॥ ४ ॥

॥ ६१९ ॥ भक्त पूजिती भगवंता । भगवंत पूजी आपुल्या भक्तां ॥ १ ॥ ऐसा प्रीतीचा कळवळा । परस्परें हा सोहळा ॥ २ ॥ भक्त देवातें चि उमगी । देव हि धांवे तयालागीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे एकींएक । वसोनि भिन्नत्वाचें वीक ॥ ४ ॥

॥ ६२० ॥ भक्तीं देवातें पूजिलें । देवें भक्तां सन्मानिलें ॥ १ ॥ ऐसे भजती येरयेरा । जैसे जळ आणि जळगारा ॥ २ ॥ भक्त देवाजवळी वैसे । देव भक्तां घरीं वसे ॥ ३ ॥ निळा ह्मणे देवा भक्तां । सर्वकाळीं एकात्मता ॥ ४ ॥

॥ ६२१ ॥ देवामाजी भक्त असे । भक्ता अंगीं देव दिसे ॥ १ ॥ ऐशी परस्परें मिळणी । जेविं प्रभा आणि तरणी ॥ २ ॥ भक्त देवातें चि भजती । देवें भक्तीं ठेविली प्रीति ॥ ३ ॥ निळा ह्मणे एक वंकी । जैसा अळंकार कनकीं ॥ ४ ॥

॥ ६२२ ॥ आमोद न सोडी कर्पुर । किंवा प्रभेतें रविकर ॥ १ ॥ तैसे चि देव आणि भक्त । येरयेरीं विराजित ॥ २ ॥ जेंवि साखरेतें गोडी । चंदन सौरभ्या न सोडी ॥ ३ ॥ निळा ह्मणे अवकाश नभ । दोन्ही एक चि ते स्वयंभ ॥ ४ ॥

माउलियेतें बाळ । माय बाळातें स्नेहाळ ॥ २ ॥ येरयेरां नव्हती भिन्न । सर्वकाळीं सन्निधान ॥ ३ ॥ निळा म्हणे लवणा नीरा । जेंवि सोनें अळंकारा ॥ ४ ॥

॥ ६२४ ॥ भिन्न दावूनियां एक । एकीं भिन्नत्वाचें बीक ॥ १ ॥ जेंवि बिंब प्रतीबिंब । दोन्ही एक चि ते स्वयंभ ॥ २ ॥ जैसी गोडी आणि गुळ । कापुर तो चि परिमळ ॥ ३ ॥ निळा म्हणे देवा भक्ता । निवडी कोण भिन्न आतां ॥ ४ ॥

॥ ६२५ ॥ वेडें वांकुडें बोलिलें । निळा पाहिजे उपसाहिलें ॥ १ ॥ देवा तुम्ही रमाकांत । भक्त तुमचे चरणांकित ॥ २ ॥ सूर्य जेंवी नव्हे कीर्ण । सागर लहरी तो समान ॥ ३ ॥ निळा म्हणे तूं व्यापक । भक्त एकदेशी क्षुल्लक ॥ ४ ॥

॥ ६२६ ॥ पुंडलीक पूजा करी । विधी षोडश उपचारीं ॥ १ ॥ देखोनियां त्याचा भावो । उभा वैकुंठींचा रावो ॥ २ ॥ बुका अर्पी तुळसीमाळा । केशर चंदनाचा टिळा ॥ ३ ॥ निळा म्हणे स्थिरावला । देखोनि भक्तातें भुलला ॥ ४ ॥

॥ ६२७ ॥ पुंडलीक म्हणे देवा । आतां करावा वास येथें ॥ १ ॥ असों एका जिवें प्राणें । मीतूंपणें वोसंडुनी ॥ २ ॥ बहुत बरें म्हणती देव । ठेविले पाव विटेवरी ॥ ३ ॥ निळा म्हणे नव्हे तुटी । युगापाठीं युग जातां ॥ ४ ॥

॥ ६२८ ॥ अनुरागें भजती देवा । त्यांच्या भावा साक्षी तो ॥ १ ॥ म्हणोनियां मागें पुढें । धांवे कोडें सांभाळी ॥ २ ॥ भुके ताने करी चिंता । लागों नेदी त्यां ऊनवारा ॥ ३ ॥ निळा म्हणे अंतरसाक्षी । सदा कैं पक्षी दासाचा ॥ ४ ॥

॥ ६२९ ॥ भेटावया भक्तजनां । उभा चि राणा पंढरीचा ॥ १ ॥ अवलोकितो दिशा चारी । येती वारकरी ज्या पंथें ॥ २ ॥ आलियाचा राखे मान । करी समाधान यथाविधी ॥ ३ ॥ निळा म्हणे दोषा खंड । चुकवी दंड यमाचा ॥ ४ ॥

॥ ६३० ॥ ज्याचा केला अंगीकार । न मानी भार त्याचा हा ॥ १ ॥

चंद्रहास्य अर्जुनाचा । पुंडलीकाचा कैवारी ॥ २ ॥ नामदेवा कबिरासी । वागवी सांवत्यासी निज अंकीं ॥ ३ ॥ निळा म्हणे एकनाथा । न विसंबे सर्वथा तुकयासीं ॥ ४ ॥

॥ ६३१ ॥ गणगोत अवघें धन । आम्हां चरण विठोबाचे ॥ १ ॥ आणिखी दुजें नेणों कांहीं । चाड चि नाहीं धनमानें ॥ २ ॥ देवाविण वाटती ओस । वैकुंठ कैलास नावडती ॥ ३ ॥ निळा म्हणे आवडी जाणें । पुरवी खुणें जिवींचें तो ॥ ४ ॥

॥ ६३२ ॥ कांहीं काय मांडेल जेव्हां । मज चि प्रगट होणें तेव्हां ॥ १ ॥ जवळि च आहे भेऊं नका । माझिया बळें दुर्जन लोकां ॥ २ ॥ तुह्मा गांजिती द्वेषिती । त्यांची समूळ विनशती ॥ ३ ॥ निळा ह्मणे भगवद्वाणी । ऐसी प्रविष्ट झाली श्रवणीं ॥ ४ ॥

॥ ६३३ ॥ भक्तद्वेषाचीं उत्तरें । ऐकतां चि कर्णद्वारें ॥ १ ॥ त्यांचें करी निर्दाळण । हरूनियां जीव प्राण ॥ २ ॥ दुर्योधन दुःशासना । ससैन्य निःपातिलें कर्णा ॥ ३ ॥ निळा ह्मणे भक्तद्वेषें । हिरण्यकश्यपा झालें कैसें ॥ ४ ॥

॥ ६३४ ॥ देवादेव मुगुटमणी । करी टेहणी दासा घरीं ॥ १ ॥ शिण त्या होऊं नेदी भाग । वोढवी अंग त्या अंगीं ॥ २ ॥ शुभाशुभ त्याचीं कर्में । वारूनी दुर्गमें सुखी करी ॥ ३ ॥ निळा ह्मणे आपणासरी । करूनियां करी बहुमान ॥ ४ ॥

॥ ६३५ ॥ गाय वत्सा देखतां दृष्टी । मोहें उठी पान्हा ये ॥ १ ॥ चाटी तया देउनी थणीं । भरी दुधाणी इतरांची ॥ २ ॥ तैसा चि हा पंढरिनाथ । करी सनाथ निज वत्सा ॥ ३ ॥ निळा ह्मणे दासासंगें । तारी जगें त्रिविध ॥ ४ ॥

॥ ६३६ ॥ पापी आणि दुराचारी । सहपरिवारी संतांच्या ॥ १ ॥ तरले आणिक तरती पुढें । दिधलें येवढें सामर्थ्य त्या ॥ २ ॥ तुह्मी देवा कृपावंत । केले निज भक्त आपणासे ॥ ३ ॥ निळा ह्मणे जगदोद्धारा ।

॥ ६३७ ॥ संतरूपें तुह्मी चि धरा। विश्वंभरा अवतार ॥ १ ॥ ह्मणोनि महिमा कीर्ती जगीं। वागविती अंगीं सामर्थ्य ॥ २ ॥ बोलउनी रेडा चालविती भिंती। विमानीं होती उपविष्ट ॥ ३ ॥ निळा ह्मणे मानवी तनु। जाती घेऊन वैकुंठा ॥ ४ ॥

॥ ६३८ ॥ अगाध कीर्ति वाढले संत। केलीं विख्यात चरित्रें ही ॥ १ ॥ अग्नींत उभे विष चि प्याले। नाहीं ते भ्याले महा शस्त्रा ॥ २ ॥ वंदुनि आज्ञा बोले पशु। करी श्रुतिघोषु दीर्घ स्वरें ॥ ३ ॥ निळा ह्मणे ठेऊनी उदकीं। कागद हि मेखी कोरड्या वह्या ॥ ४ ॥

॥ ६३९ ॥ आळी करितां नामदेव। जेविती स्वयमेव सांगातें ॥ १ ॥ सांवत्याचे उदरीं बैसे। पुंडलीका वसे दृष्टीपुढें ॥ २ ॥ कुर्म्याचिये धांवे भेटी। मेहत्या कंठीं माळ ओपी ॥ ३ ॥ निळा ह्मणे निर्जनवासी। संतोबासी न विसंबे ॥ ४ ॥

॥ ६४० ॥ तुकोबाचे कीर्तनमेळीं। नाचे कल्लोळी स्वानंदें ॥ १ ॥ क्षिरापती वाटी हातें। काला हि सांगातें करूं धांवे ॥ २ ॥ उदकामाजि रक्षी वह्या। आलिंगी बाह्या पसरुनी ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐशा कीर्ती। वाढवी श्रीपती दासांच्या ॥ ४ ॥

॥ ६४१ ॥ एकोबाची सेवा करी। वाहे घरीं जीवन ॥ १ ॥ गंधाक्षता तुळसीमाळा। पुरवी सोहळा करी ऐसा ॥ २ ॥ करुनी सडा संमार्जन। पाळित वचन आज्ञेचें ॥ ३ ॥ निळा ह्मणे यापरि हरी। विराजे घरीं दासांचे ॥ ४ ॥

॥ ६४२ ॥ वैराग्याचा मेरु तो गोराकुंभार। तोडियले कर आणेसाठीं ॥ १ ॥ महाद्वारीं कथा श्रवण करितां। टाळी वाजवितां निघती नवे ॥ २ ॥ तुह्मी देवा कृपादृष्टी अवलोकिला। त्हृदयीं तो धरिला प्रीतिकरीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे तुह्मां दासाचा अभिमान। अवतार ह्मणऊन धरणें लागे ॥ ४ ॥

॥ ६४३ ॥ केला प्रतिपक्ष आपुल्या अभिमानें। तोडिलीं बंधनें बहुतांचीं ॥ १ ॥ जिहीं उच्चारिलें अनुतापें नाम। त्यांचें मरणजन्म निवारिलें ॥ २ ॥ कोणीयें यातीचा हो कां कोणी एक। केलें कवतुक त्याचें

तुह्मी ॥ ३ ॥ निळा ह्मणे सजना जातीचा कसायी। रंका बंका तीं हि उद्धरिलीं ॥ ४ ॥

॥ ६४४ ॥ नरसिंह मेहता गुजराती ब्राह्मण। धरिला अभिमान त्याचा तुह्मी ॥ १ ॥ द्वारकेसी त्याच्या हुंड्या भरियेल्या। सोभनासी नेल्या वस्त्रें पेव्या ॥ २ ॥ जन जसवंत राय राजेश्वर। केला त्याचा थोर बहुमान ॥ ३ ॥ निळा ह्मणे कुबा कुलाल हरिभक्त। पीपा रजपुत प्रिय तुह्मां ॥ ४ ॥

॥ ६४५ ॥ सुरदास आंधळा पंजाबी ब्राह्मण। गातां तुमचे गुण धन्य झाला ॥ १ ॥ विसोबा खेचर चांगा वटेश्वर। नरहरी सोनार पाटक नामा ॥ २ ॥ जिवलग तुह्मां सांगाती जीवाचे। विभागी भाग्याचे केले तुह्मी ॥ ३ ॥ निळा ह्मणे भेद नाहीं तुह्मां संतां। दाविली भिन्नता प्रीतीसाठीं ॥ ४ ॥

॥ ६४६ ॥ ह्मणउनि तुह्मां नित्य आठविती। या हो या हो ह्मणती पांडुरंगा ॥ १ ॥ तुह्मी धांवोनियां येतां बरावरी। पुरवितां श्रीहरि आर्त त्यांचें ॥ २ ॥ न साहे वियोग तुह्मां उभयतां। देवा आणि भक्ता एक अंकी ॥ ३ ॥ निळा ह्मणे दोन्ही पिंड एक जीव। जाणती हा भाव निगमादीक ॥ ४ ॥

॥ ६४७ ॥ अमृत गोडिये नाहीं भिन्नपण। प्रभा रविकीर्ण जयापरी ॥ १ ॥ अळंकार सोनें काय तें वेगळें। डोळियां बुबळें वेगळिक ॥ २ ॥ नभा अवकाशा कोण भिन्न करी। वस्त्रतंतुपरि देव भक्त ॥ ३ ॥ निळा म्हणे प्राण तो चि प्रभंजन। नव्हती ते भिन्न एक एका ॥ ४ ॥

॥ ६४८ ॥ देव तो चि भक्त नाहीं वेगळिक। जळगार उदक जयापरी ॥ १ ॥ येरयेरामाजि एकपणीं भिन्न। करुनी सौजन्य भोगिताती ॥ २ ॥ सौरभ्य चंदन परिमळ सुमन। नव्हती ते भिन्न एक एका ॥ ३ ॥ निळा ह्मणे रत्ना जेंवि रत्नकीळ। दोनांवी निर्मळ एकी सिळा ॥ ४ ॥

॥ ६४९ ॥ तुह्मां आह्मां नित्य भेटी। नाहीं तुटी कल्पांतीं ॥ १ ॥

कैंचा पटु तंतुविण ॥ ३ ॥ निळा ह्मणे आम्हांवीण । नाहीं चि देवपण तुह्मांसी ॥ ४ ॥

॥ ६५० ॥ आधीं भक्त पाठी देव । प्रगटे भाव देखोनी ॥ १ ॥ काचोळी पाठी कण । भुस निकण मग दाणा ॥ २ ॥ आधी तंतु पाठी वस्त्र । कनका अळंकार रूप करी ॥ ३ ॥ निळा ह्मणे भक्ताविण । कैंचें देवपण देवासीं ॥ ४ ॥

॥ ६५१ ॥ आदि मग हे अनादि बोली । निशीनें प्रगटिली सूर्य-महिमा ॥ १ ॥ अर्थ याचा आणा चित्ता । मग विचारितां कळेल ॥ २ ॥ कडु चि नसतां कैंचें गोड । उष्मेविण सुरवाड छायेचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे पुत्रेंविण । न शोभे बापण वायाणें ॥ ४ ॥

॥ ६५२ ॥ देव अंगें निराभास । भक्त रूपस चांगला ॥ १ ॥ म्हणो-नियां ते आणिती रूपा । दर्पणीं पहा पां जेंवि नभ ॥ २ ॥ नामें रूपें मंडित केला । शृंगारिला अळंकारें ॥ ३ ॥ निळा ह्मणे भक्त जनक । देव बाळक या हेतु ॥ ४ ॥

॥ ६५३ ॥ भक्त करिती तैसा होय । ठेविला ठाय तया स्थळीं ॥ १ ॥ पाचारिती भाविती जेथें । प्रगटे तेथें रूप धरी ॥ २ ॥ जे जे उपचार करिती भक्त । ते ते स्वीकारित बाळापरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे भक्तापासीं । नाहीं यासी दुराग्रह ॥ ४ ॥

॥ ६५४ ॥ भक्तांचिये मनीं जैसें । करी हा तैसें वर्तन ॥ १ ॥ नेदि होऊं आज्ञाभंग । वोढवी सर्वांग सेवेसी ॥ २ ॥ स्तंभीं पाचारितां हाके । होउनी ठाके नरहरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे उभा द्वारीं । केला विटेवरी मग ठाके ॥ ४ ॥

॥ ६५५ ॥ ठायींचा हा ऋणानुबंध । प्रीतिवाद उभयतां ॥ १ ॥ ह्मणोनि एक एकाधीन । जाणती उण खुण येरयेरां ॥ २ ॥ देव जाणे अंतरींचें । केलें भक्ताचें प्रतिपादी ॥ ३ ॥ निळा ह्मणे भिन्न भाव । नाहीं देव-भक्तांचा ॥ ४ ॥

॥ ६५६ ॥ देवा भक्तां भिन्नपण । देखती जन मूर्ख ते ॥ १ ॥ सविता

तोचि नारायण । वेद प्रमाण हा अर्थ ॥ २ ॥ म्हणती व्यासोनारायण । मिथ्या वदती हें काय ॥ ३ ॥ निळा म्हणे अर्जुन कृष्ण । नरनारायण भिन्न तनु ॥ ४ ॥

॥ ६५७ ॥ भक्तांचिया मनोभावा । सारिखे देवा तुम्ही वर्ता ॥ १ ॥ आवडीचा न करा भंग । अंतरंग म्हणोनियां ॥ २ ॥ धर्मा घरीं उच्छिष्ट काढा । अर्जुना पुढा सारथ्य ॥ ३ ॥ निळा म्हणे बळिच्या द्वारीं । होउनी भिकारी भिक मागा ॥ ४ ॥

॥ ६५८ ॥ श्रुती देवाच्या कणिया खाणें । श्लाघ्य अन्नें विदुराच्या ॥ १ ॥ द्रौपदी हातींचें भाजीपान । मानी समान पंचामृता ॥ २ ॥ मुद्गला घरींचा वेचक पाक । मानी अधिक क्षीराब्धीहुनी ॥ ३ ॥ निळा म्हणे नामयासवें । बैसोनि जेवावें परम प्रीती ॥ ४ ॥

॥ ६५९ ॥ नीच कामीं न धरी लाज । भक्तकाज कैवारी ॥ १ ॥ सेवकांचा हा शिरोमणी । म्हणवी करुनी दासत्व ॥ २ ॥ उगाळी गंधें पुरवी माळा । वाहे जळा मस्तकीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे होउनी वाण्या । आणि गोण्या भक्तां घरीं ॥ ४ ॥

॥ ६६० ॥ सांगतां महिमा पंढरीचा । अपार वाचा वेदांचिये ॥ १ ॥ सहज चि क्षेत्रा जाईन म्हणतां । धांवे सायोज्यता सामोरी ॥ २ ॥ विठ्ठलराज देखतां दिठी । वास वैकुंठीं ते चि क्षणीं ॥ ३ ॥ निळा म्हणे आलिंगन । देतां समाधान जिवशिवा ॥ ४ ॥

॥ ६६१ ॥ गुण लावण्याची खाणी । विठोजी मुगुटमणी सकळांचा ॥ १ ॥ जाणे अंतरींचा भाव । देवादिदेव पूजनीय ॥ २ ॥ ब्रम्हादिक लागती पायीं । सुरपती तो हि आज्ञांकित ॥ ३ ॥ निळा म्हणे लागला भाग्यें । हातीं अनुरागें गीतीं गातां ॥ ४ ॥

॥ ६६२ ॥ जयाची तुम्हांसी करणें चिंता । तयातें पुरवितां आनकळित ॥ १ ॥ आलिया गेलियाचेनि हातें । सभाग्य तयातें धरूं धांवा ॥ २ ॥ कांहीं चि उणें त्याचिये घरीं । न पडावें अंतरीं हे इच्छा ॥ ३ ॥ निळा म्हणे ऋणवईपणा । होतसां नारायणा उत्तीर्ण ॥ ४ ॥

॥ ६६३ ॥ न कळे चि प्रेम याची गोडी । धांवे तांतडी नाम घेतां ॥ १ ॥

रानीं वनीं । साउली धरुनी चाले सवें ॥ ३ ॥ निळा म्हणे पुरवी भुके । वागवी भातुकें खांद्यावरी ॥ ४ ॥

॥ ६६४ ॥ सत्य भोळा देव कृपेचा सागर । न मोडी उत्तर संत आज्ञा ॥ १ ॥ भाविकाची सेवा न म्हणे फार थोडी । स्वीकारी आवडी आपुलीये ॥ २ ॥ अनन्य प्रीतीचें तुळसीपत्र जळ । मानी सर्व काळ तृप्ती तेणें ॥ ३ ॥ निळा म्हणे त्याचा करी बहुमान । अनाथ म्हणऊन सांभाळी त्या ॥ ४ ॥

॥ ६६५ ॥ आलें शरण त्याचा करी प्रतिपाळ । न म्हणे हा दुर्बळ सदैव कांहीं ॥ १ ॥ नेदी लागों वारा कल्पनेचा तया । न वजे पासोनीयां दुरी कोठें ॥ २ ॥ ब्रह्मरस मुखीं घाली नामामृत । नेदी तुटों आर्त आवडीचें ॥ ३ ॥ निळा म्हणे यासीं भक्ताचा अभिमान । उभा म्हणऊन युगें जातां ॥ ४ ॥

॥ ६६६ ॥ देवासी दासाचा कळवळा । माये बाळावरी जैसा ॥ १ ॥ नेदी मोडों भूक तहान । करें कुरवाळून स्तन पाजी ॥ २ ॥ दिठावेल म्हणोनी प्राण । निंबलोण उतरी त्या ॥ ३ ॥ निळा म्हणे करुनी कोड । पाळी लाड प्रीतीनें ॥ ४ ॥

॥ ६६७ ॥ लेवविले अळंकार । केलें थोर वाढउनी ॥ १ ॥ आपुली दृष्टी निववीतां । मी तों नेणतां ळळेवाड ॥ २ ॥ गोड घांस मुखीं भरा । जेवितां पाचारा आवडी ॥ ३ ॥ निळा म्हणे शिकवा बोलों । पुढें चालों आपणा ॥ ४ ॥

॥ ६६८ ॥ खेळविलें अंगावरी । अळंकारीं शोभविलें ॥ १ ॥ मी तों नेणें नेणपणें । होती शहाणे विस्मित ॥ २ ॥ परस्परें अनुवादती । एक सांगती एकापें ॥ ३ ॥ कैसा निळा भाग्यवंत । मायबाप संत जवळी त्या ॥ ४ ॥

॥ ६६९ ॥ पोसणा चि परी आवडला । मानु दिधला पुत्रपणा ॥ १ ॥ मागें पुढें सांभाळिती । त्याचें चि करिती कोड सदा ॥ २ ॥ खांदीं कडिये घेउनी सुखें । बोलों हरिखें शिकविती ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसे लोकं । वाणिती कौतुक परस्परें ॥ ४ ॥

॥ ६७० ॥ कोटी जन्म घेईन देवा । करीन सेवा तुमची च ॥ १ ॥ भुक्ति मुक्ति नका आड । घालूं सांकड मज वाटे ॥ २ ॥ काय करूं ते आत्म-

स्थिति । खंडण करिती भजनाचें ॥ ३ ॥ निळा म्हणे राहो ठायीं । विश्वास पायीं तुमचिये ॥ ४ ॥

॥ ६७१ ॥ जिहीं भाव धरिला ठायीं । बुडी दिधली तुमच्या पायीं ॥ त्यासी करुणेची करुनी सोई । आपणापासीं बैसविलें ॥ १ ॥ प्रल्हादा संकटीं रक्षिलें । ध्रुवासीं अक्षयपदीं बैसविलें ॥ उपमन्या नेउनियां रक्षिलें । क्षीराब्धी वैभव देउनी ॥ २ ॥ उद्धवासी ब्रह्मरस पाजिला । अर्जुना निजबोध अर्पिला ॥ द्रौपदीचा लळा पाळिला । वस्त्राभरणें पुरविलीं ॥ ३ ॥ गौळणींचे प्रिय संवाद । नित्य भक्षणें त्यांचें दुग्ध ॥ गोवळासवें हुंबरी साद हमामा हुतुतु खेळणें ॥ ४ ॥ जिहीं तुमचें धरिलें प्रेम । आवडी वदनीं गाइलें नाम ॥ त्यांचा करुनियां संभ्रम । निजानंदा पात्र केलें ॥ ५ ॥ नामदेवा ज्ञानदेवा । निवृत्तिनाथा चांगदेवा ॥ एकोबा तुकोबाचिया भावा तैसे चि वर्ता श्रीहरी ॥ ६ ॥ निळा म्हणे मी तों दीन । सकळ संतांचा चरणरेण ॥ तुमच्या स्तवनें ठेविलें मन । येईल उचिता तैसें करा ॥ ७ ॥

॥ ६७२ ॥ नाहीं कोणा उपेक्षिलें । सकळां सन्मानें स्थापिलें ॥ आपुलिये पदीं बैसविलें । देणें दिधलें अपार ॥ १ ॥ चुळा एका दुधासाठीं । स्तवितां चि उपमन्यें जगजेठी ॥ करूनियां क्षीराब्धीची वाटी । लाविली ओठीं तयाचिये ॥ २ ॥ बापा अंकीं बैसावया । ध्रुवानें स्तविलें विनवूनियां ॥ निश्चळपद त्यासीं देउनियां । अक्षयपदीं बैसविलें ॥ ३ ॥ सुदामदेव तो वरासाठीं । आला मागावया द्वारके भेटी ॥ त्यासी रचुनियां गोमटी । सुवर्ण नगरी समर्पिली ॥ ४ ॥ पक्षियासी पाचारिलें । तिये गणिकेशीं विमानीं वाहिलें ॥ नक्रा भेणें हांकारिलें । त्या गजेंद्रा नेलें निजधामा ॥ ५ ॥ बिभीषण भेटी धांवोनी आला । लंकेचें राज्य दिधलें त्याला ॥ चिरंजीव करुनियां बैसविला । आपुला शरणांगत म्हणउनी ॥ ६ ॥ पहा हो वनींचीं ते वनचरें । निळा ह्मणे रिसें आणि वानरें ॥ आलिंगुनियां रघुवीरें । आपुले पंगती जेवविलीं ॥ ७ ॥

॥ ६७३ ॥ खग मृग राक्षस वानर । दैत्य दानव निशाचर ॥ सिद्धचारण विद्याधर । नागनी खार कीटकादी ॥ १ ॥ चतुष्पदें जळचरें मनुष्ययाती । दासी वेश्या भिल्लिणी किती ॥ कोळी अंत्यज अधम जाती । उद्ध-

शरण येतां चि ते निश्चिती । निजधामाप्रती पाठविले ॥ ३ ॥ न ह्मणोनी नरनारी बाळकें । उत्तम अधम कनिष्ट लोकें ॥ नामें चि पाचारितां मुखें । नेले ते निजसुखें वैकुंठा ॥ ४ ॥ निळा ह्मणे ब्रीदें चरणीं । वागवी ह्मणवी भक्तांचा ऋणी ॥ ऐसी आख्या जे वेदीं पुराणीं । ते चि राहाटी चालवी ॥ ५ ॥

॥ ६७४ ॥ नामें आळवितां ओठीं । तुम्हां पोटीं भय वाटे ॥ १ ॥ नेणों कांहीं मागतील । किंवा येतील वैकुंठा ॥ २ ॥ काय वांटू किती देऊं । म्हणोनियां जिऊ निर्बुजला ॥ ३ ॥ ऐसें जाणोनी लपालेती । घेतलें चित्तीं भय वाटे ॥ ४ ॥ याचि लागीं उत्तर न द्या । कळलें गोविंदा मनोगत ॥ ५ ॥ निळा म्हणे सुखी असा । न मागों सहसा आण तुमची ॥ ६ ॥

॥ ६७५ ॥ ऐकोनि संत हांसतील । तुम्हांसी येईल मग लाज ॥ १ ॥ कौल दिला राहे सुखें । न म्हणों मुखें दे ऐसें ॥ २ ॥ मागावें तें आम्हां चि जवळी । आहे नामावळी पढों सुखें ॥ ३ ॥ आणिखी तुमची नाहीं आशा । ठेवा कैशा मुक्तिहि त्या ॥ ४ ॥ निळा म्हणे आपुल्या चि सुखें । असों हरिखें अखंडित ॥ ५ ॥

॥ ६७६ ॥ ऐसें ऐकोनियां उत्तर । देव म्हणे उदार धीर तुम्ही ॥ १ ॥ तुमच्याचि काजा रूपासी येणें । मजलागीं धरणें अवतार ॥ २ ॥ तुम्ही माझे मी तुमचा । आहे चि ठायींचा ऋणानुबंध ॥ ३ ॥ निळा म्हणे देवा-भक्तां । ऐसी एकात्मता हो सरली ॥ ४ ॥

॥ ६७७ ॥ देव म्हणे भक्तराजा । अव्हेर माझा न करावा ॥ १ ॥ भोजनकाळीं पाचारावें । मज ही घ्यावें सांगातें ॥ २ ॥ भोजनीं तुमच्या तृप्ती मज । काजें काज तुमचिया ॥ ३ ॥ निळा म्हणे अंतर नका । असो एकएका माझारी ॥ ४ ॥

॥ ६७८ ॥ राहेन आतां तुमच्या संगें । हें चि मागें भक्तासीं ॥ १ ॥ हें चि द्या आतां उदारपणें । माझें करणें रूप नांव ॥ २ ॥ विश्रांतीचें माझें घर । तुह्मी जें शरीर धरिलें तें ॥ ३ ॥ निळा ह्मणे भक्तांपासीं । भाकीं ऐशी कींव देव ॥ ४ ॥

॥ ६७९ ॥ तुह्मी दिधलें वैकुंठभुवन । शेषशयन मजलागीं ॥ १ ॥ नाहीं तरी जाणता कोण । होतों निर्गुण निराभास ॥ २ ॥ नामरूप कैंचें मज ।

तुह्मी चित्तें सहज वाढविलें ॥ ३ ॥ निळा ह्मणे आपुल्या दासां । देतो ऐसा वडिवार ॥ ४ ॥

॥ ६८० ॥ भक्तां घरींचें करीन काम । त्यांचेंच नाम वागवीन ॥ १ ॥ भक्तरूपें विराजलों । स्थिरावलों हृदयीं त्या ॥ २ ॥ भक्तसुखें सुखावत । त्यांच्या चि क्रीडत देहसंगें ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसा देव । दाखवी प्रभाव आपुला ॥ ४ ॥

॥ ६८१ ॥ भक्तावीण देवा कोण । सोयरा सज्जन तिहीं लोकीं ॥ १ ॥ यालागीं त्याचीं च वास पाहे । आज्ञेंत राहे भक्तांचिया ॥ २ ॥ आवडी ऐसीं रूपें धरी । भक्तांचें करी सांगितलें ॥ ३ ॥ निळा म्हणे लोकीं तिहीं । भक्ताविण आप्त नाहीं देवा ॥ ४ ॥

॥ ६८२ ॥ भक्ताविण देवालागीं । पुसतें जगीं कोण दुजें ॥ १ ॥ नाम हि नव्हतें रूप हि नव्हतें । कैसेनि जाणतें कोण तया ॥ २ ॥ परे हि परता पर-देसी होता । केला भक्तीं सरता आपुल्या बळें ॥ ३ ॥ निळा म्हणे तो देव सा केला । भक्ति आणिला नामरूपा ॥ ४ ॥

॥ ६८३ ॥ देवावीण भक्तांचें संकट । कोण तें अरिष्ट निवारितें ॥ १ ॥ कोणासी शरण जातें तेव्हां । कळीकाळ जेव्हां आकळूं येतां ॥ २ ॥ संसार जेव्हां करितां ओढी । तडातोडी भंवताली ॥ ३ ॥ निळा ह्मणे तें चुकविलें । अनर्थ वारिले कृपावंतें ॥ ४ ॥

॥ ६८४ ॥ देव नसतां भक्तांचीं विघ्नें । कोण जन्ममरणें निवारितें ॥ १ ॥ कोणासी म्हणते धांवा धांवा । करितां कुडावा कोण दुजा ॥ २ ॥ कोण नेता वैकुंठासी । आपुले विश्रांतीसी निज घरा ॥ ३ ॥ निळा ह्मणे देवा-वीण । संसार बंधन न तुटतें ॥ ४ ॥

॥ ६८५ ॥ चौऱ्यायशी लक्ष योनिभ्रमतीं । फेरे खाती यातना ॥ १ ॥ संक-टापासुनी सोडविता । कोण हो होता देवावीण ॥ २ ॥ निष्काम करुनी ठेविता दासां । कोण होता ऐसा देवावीण ॥ ३ ॥ निळा ह्मणे निर्लोभ शांती । कोण देता हातीं भक्तांचिये ॥ ४ ॥

॥ ६८६ ॥ कैसेनि आकळतें मन । देवावीण भक्तांचें ॥ १ ॥ काम

क्रोधा लोभा शांती । कैसेनि होती मग त्याची ॥ २ ॥ काळदंड चुकविता । कोण होता दर्वांण ॥ ३ ॥ निळा म्हणे मोकळा भक्तां । करुनी ठेविती कोण पदीं ॥ ४ ॥

॥ ६८७ ॥ कोण करितें समाधान । देवावीण भक्तांचें ॥ १ ॥ ब्रम्ह-सनातन पाववितां । कोण या होता भक्तांसी ॥ २ ॥ नाना कल्पनेचीं व्यसनें । तोडितें बंधनें कोण सांगा ॥ ३ ॥ निळा म्हणे जन्मजरा । यातना अघोरां न चुकत्या ॥ ४ ॥

॥ ६८८ ॥ म्हणवीते शरणांगत । कोणाचे भक्त देवावीण ॥ १ ॥ कोणापासीं हा परिहार । देते संसारयातनेचा ॥ २ ॥ कोण देवाविण येते । भक्तांसी सोडविते भयांतुनी ॥ ३ ॥ निळा म्हणे देव आणी भक्त । येरयेरा होत साह्य सदा ॥ ४ ॥

॥ ६८९ ॥ भक्त म्हणती अहो देवा । वियोग न व्हावा तुम्हां आह्मां ॥ १ ॥ इतुकेनि चि दोघे ही सुखी । मिसळतां एकएकी संतुष्ट ॥ २ ॥ आम्ही गाऊं तुमचे गुण । करावें श्रवण सादर तुम्ही ॥ ३ ॥ निळा म्हणे कमळापती । आहे हातीं तुमचे हें ॥ ४ ॥

॥ ६९० ॥ तुमचीं नामें गाऊं मुखें । तुह्मी तीं सुखें ऐकावीं ॥ १ ॥ नका यासी व्यवधान । मेळवा नयन नयनासी ॥ २ ॥ हाके सवें धांवोनि यावें । नुपेक्षावें सर्वथा ॥ ३ ॥ निळा म्हणे हृदयीं वास । करा सावकाश आमुचिये ॥ ४ ॥

॥ ६९१ ॥ तुम्ही देवा कृपावंत । आम्ही अनाथ दुर्बळें ॥ १ ॥ म्हणो-नियां थोरपण तुम्हां । येतें पुरुषोत्तमा आमुचेनि ॥ २ ॥ समानपणें असतों तरी । तुमची थोरी न दिसती ॥ ३ ॥ निळा म्हणे लोखंडें जैसा । दिधला परिसा बडिवार ॥ ४ ॥

॥ ६९२ ॥ तुमचे चरणीं राहो मन । करा हें दान कृपेचें ॥ १ ॥ नामीं तुमचे रंगो वाचा । अंगीं प्रेमाचा आयुर्भावो ॥ २ ॥ हृदयीं तुमची राहो मूर्ति । वाचे कीर्ति पवाडे ॥ ३ ॥ निळा म्हणे ठेवा ठायीं । जीवभाव पायीं आपुलीये ॥ ४ ॥

॥ ६९३ ॥ भक्तीं आराधिला देव । जाणवला भाव देवासी तो ॥ १ ॥

बहुत बरें म्हणती भक्ता । न वजे परता जवळुनियां ॥ २ ॥ सुखी असा माझ्या बळें । पुरवीन लळे इच्छाल ते ॥ ३ ॥ निळा म्हणे कृपाळु हरी । भक्तांवरी तुष्टमान ॥ ४ ॥

॥ ६९४ ॥ मागें पुढें उभा राहे । भरुनी पाहे डोळे त्या ॥ १ ॥ प्रेमासी दृष्टी लागेल ह्मणें । उतरी निंबलोण वरुनियां ॥ २ ॥ पोटीं साला परम प्रीती । आळंगी श्रीपती ह्रदयेंसी ॥ ३ ॥ निळा म्हणे करुणा बहुत । झाला या मोहित भक्तांसी ॥ ४ ॥

॥ ६९५ ॥ भक्तां चि साठीं रूपें धरी । पवाडे करी असंख्य ॥ १ ॥ भक्तांसी मानी आपुले सखे । नेदी पारिखे दिसों त्या ॥ २ ॥ कृपावस्त्र पांघुरवी । जवळी बैसवी आपणा ॥ ३ ॥ निळा म्हणे तृप्तीवरि । ब्रह्मरस भरी मुखांत ॥ ४ ॥

॥ ६९६ ॥ जिणें मरणें नाहीं आतां । हरिच्या भक्तां कल्पांतीं ॥ १ ॥ त्याच्या ध्यानें तैसें चि आलें । आपुला विसरले देहभाव ॥ २ ॥ जडोनि ठेली अखंडता । एकात्मता हरिरूपीं ॥ ३ ॥ निळा म्हणे झाले संत । गुणातीत निजबोधें ॥ ४ ॥

॥ ६९७ ॥ पूर्ण कृपा झाली तया । गेलों लगटोनियां निज चरणीं ॥ १ ॥ न देखती ते हरिवीण । जनीं जनार्दन कोंदला ॥ २ ॥ आनंदें त्या आळविती । बोसणती हरिनामें ॥ ३ ॥ निळा म्हणे देव चि झाले । भावा आले तयाचिया ॥ ४ ॥

॥ ६९८ ॥ कैसी सांपडली वेळ । तया केवळ लाभाची ॥ १ ॥ देव चि झाले चित्तें वित्तें । गण गोतें सहीत ॥ २ ॥ न ये चि विकल्पाचा वारा । त्याचिया शरिरा आतळों ॥ ३ ॥ निळा ह्मणे पहाती तेथें । देवापरतें न देखती ॥ ४ ॥

॥ ६९९ ॥ एकीं देव अनेकीं देव । नेणे चि भाव पालटों ॥ १ ॥ देव चि भासे धरामंडळ । सुक्षम स्थूळ महदादी ॥ २ ॥ अन्न जीवन भूक तहान । देव चि भोजन तृप्तीचें ॥ ३ ॥ निळा म्हणे अंगें मनें । जीवें प्राणें देव चि ते ॥ ४ ॥

॥ ७०० ॥ आपपरते नोळखती । अवघा चि देखती विठ्ठल ॥ १ ॥

पूर्ण होउनी ठेलें काम । आत्माराम देह त्याचा ॥ २ ॥ विठ्ठल कानीं विठ्ठल घ्राणीं । विठ्ठल नयनीं मनामाजी ॥ ३ ॥ निळा म्हणे विठ्ठल अंगें । रंगलें रंगें विठ्ठलाच्या ॥ ४ ॥

## देवाबरोबर लडिवाळपणाचे बोल.

॥ ७०१ ॥ बरें होणार ते झाली माझी गती । हळहळ किती वाढवावी ॥ १ ॥ परि तुमच्या ब्रीदा लागला कळंक । दुराविल्या एक मश्यक मी ॥ २ ॥ होती वाढविली कीर्ति तिहीं लोकीं । ते आजी निष्टंकी वाहविली ॥ ३ ॥ ह्मणती शरणांगत येणें उपेक्षिला । लौकिक हा झाला भला काय ॥ ४ ॥ समर्था चुकल्या भला कोणिहि हांसे । अनाथासी नसे शंका कांहीं ॥ ५ ॥ निळा ह्मणे जागा आपुल्या उचिता । आह्मी तो संचिताधीन झालों ॥ ६ ॥

॥ ७०२ ॥ लाभ अथवा हानी करितां व्यवसाय । आह्मां ते विपाय फळा आले ॥ १ ॥ एका लाभा पात्र केलें तिहीं लोकीं । आह्मां नेलें सेखी ऐशा थरा ॥ २ ॥ फजितीसी उणें नाहीं लोकांमाजी । अंतरविलें काजीं संसारिकां ॥ ३ ॥ नव्हता कळों आला निश्चयाचा भावो । येणें काळें देवो निष्ठुरसा ॥ ४ ॥ गेले होऊनियां न चले आयुक्ति । होणार ते गति हो कां सुखें ॥ ५ ॥ निळा ह्मणे लाजे झाली प्राणसंधी । न ये करुणानिधी कृपा तुह्मां ॥ ६ ॥

॥ ७०३ ॥ लाजविली सेवा लाजविली भक्ति । वैराग्य विरक्ति लाजविली ॥ १ ॥ ऐसा चि घडोनि आला हा प्रसंग । हांसविलें जग आपुल्या ब्रीदा ॥ २ ॥ आमुचें होणार तें चि वोढविलें । तुमचे कीर्ती आलें हीनपण ॥ ३ ॥ कैसे दीनानाथ ह्मणवाल जि आतां । आह्मां उपेक्षितां अनाथांसी ॥ ४ ॥ सिणलों भागलों संसारें गांजिलों । ह्मणोनियां आलों शरण तुह्मां ॥ ५ ॥ निळा म्हणे काय जाणोनि नेणते । झालेति यशातें दवडुनियां ॥ ६ ॥

॥ ७०४ ॥ नित्य नूतन तुह्मी नवे । आह्मी तो जिवें वेंचतों ॥ १ ॥ जाणें येणें आह्मां आटी । कल्पकोटी तुह्मां जिणें ॥ २ ॥ सुखदुःख आह्मां

भोग । तुह्मी तो अनंग निजरूपें ॥ ३ ॥ निळा म्हणे जगदाधीशा । आम्ही आशा बांधलों ॥ ४ ॥

॥ ७०५ ॥ आणिकांसी मागे आशेचें बंधन । सदाचा वराडी असोनी आपण ॥ १ ॥ काय म्हणावें यावरि आतां । नष्टाचा परम नष्ट हा चि हा पहातां ॥ २ ॥ भक्ताच्या हाताची पहातसे वास । कांहीं देतील म्हणउनी टोकत चि बैसे ॥ ३ ॥ जळ फळ पुष्प देतां कांहीं चि न सोडी । देऊं जातां चि घाली हा तोंडीं ॥ ४ ॥ आशेचा बांधला देव हा कैसा । काय निवारील आमुची आशा ॥ ५ ॥ भक्त नेदिती तैं उपवासी चि बैसे । काय खाईल जवळी कांहिंचिया नसे ॥ ६ ॥ निळा म्हणे हा अनाथ बापुडा । जाणती संत परि न बोलती भीडा ॥ ७ ॥

॥ ७०६ ॥ याज्ञिक मंत्रें अवदान देती । त्याहुनि अधिक या उच्छिष्टा बोराची प्रीती ॥ १ ॥ हे काय अवगुण नव्हती सांगा । प्रत्यक्ष ठाउके चि आहेती जगा ॥ २ ॥ सांडुनियां सेजे लक्ष्मी ऐसी । भोगितो विद्रुप कौंसाची दासी ॥ ३ ॥ घरींचीं दहीं दुधें या न लगती गोडें । चोरटा लोकांचीं मोडितो कवाडें ॥ ४ ॥ श्रुतिस्मृतीचीं हीं वचनें नेघोनियां कानीं । हांसे श्लाघे शिव्या देतां गौळणी ॥ ५ ॥ निळा ह्मणे याची खोडी चि हे ऐशी । ते बोलोनि काय मानली यासी ॥ ६ ॥

॥ ७०७ ॥ आणिखिही याचीं उदंड वर्मे । बोलतां चि ते नासी आमुचीं कर्में ॥ १ ॥ ह्मणोनियां याचें भय चि वाटे । बोलों जाय तंव बोलणें चि कुंठे ॥ २ ॥ वेद हि ना बोले चि भेउनी याला । देखोनि यातें मग मौन्यें चि ठेला ॥ ३ ॥ काळ हि कांपे याचिया धाकें । सासिहि गिळुनी आपण चि ठके ॥ ४ ॥ ना बोलती योगी याचिया भेणें । ध्यानीं चि बैसले बसउनी रानें ॥ ५ ॥ संत हि याची न करित गोठी । धरुनी राहिले उगले चि पोटीं ॥ ६ ॥ अणुमात्र याचीं बोलतां चि कर्में । मरणासि चि मारुनी हरि तो जन्में ॥ ७ ॥ धीटपणें निळा बोलिला कांहीं । बोलतां चि लाविला आपुला वाही ॥ ८ ॥

॥ ७०८ ॥ एवढासा माझा भाव तो कायी । तेवढा चि तुमचिये ठेविला पायीं ॥ १ ॥ परी तुमचें अगाध देणें । जाणवलें यावरि उदारपणें ॥ २ ॥ एवढिसी माझी मति ते किती । तेवढि चि वाढवुनी केली सरती ॥ ३ ॥

एवढेसे तुह्मां गाईलें जि देवा । तेवढे चि स्वीकारुनी तोषलेती भावा ॥ ४ ॥ एवढी शी माझी वाचा ते किती । तेवढि चि आपुलिये लाविली स्तुति ॥ ५ ॥ एवढासा निळा एवढीसी भक्ती । अपार चि तुह्मी मानिली प्रीती ॥ ६ ॥

॥ ७०९ ॥ कांहीं चमत्कार देखती । विश्वासें तरि वाटे प्रीती ॥ १ ॥ ऐसा विपरित आहे मोळा । जाणा येथींचा जी गोपाळा ॥ २ ॥ येऱ्हवीं कोणी फुकासाठीं । नाम नुच्चरिती ओंठीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे नारायणा । ह्मणोनि दाविली सूचना ॥ ४ ॥

॥ ७१० ॥ आधीं च अविश्वासी जन । ह्मणती कैंचा नारायण ॥ १ ॥ कोण तारिले या काळें । लटिकीं बोलती पाल्हाळें ॥ २ ॥ लटिके संत लटिका देव । लटिकें चि पाप पुण्य सर्व ॥ ३ ॥ निळा ह्मणे आमुच्या त्यागें । तुह्मांसी निंदिजेल जगें ॥ ४ ॥

॥ ७११ ॥ भक्तिपंथें न चले कोणी । वाट जाईल मोडोनी ॥ १ ॥ जरि अनाथा धांवणें । न कराल तुह्मी थोरपणें ॥ २ ॥ आमचा जन्म वायां गेला । शब्द तुह्मांसी लागला ॥ ३ ॥ निळा ह्मणे नव्हे भली । पुढें वाट खोळंबली ॥ ४ ॥

॥ ७१२ ॥ येईल चिचासी तें करा । तुह्मी आतां विश्वंभरा ॥ १ ॥ आमुचें वायां गेलें जिणें । नांदा तुम्ही देवपणें ॥ २ ॥ केली आम्ही तोंडपिटी । फजित व्हावया शेवटीं ॥ ३ ॥ निळा म्हणे निजाभिमान । तुम्ही सांडिला इमान ॥ ४ ॥

॥ ७१३ ॥ वांयां संतांची ही बोली । वचनें त्यांचीं लाजविलीं ॥ १ ॥ लटिका चि केला कीर्तिघोष । येथें तो आवघी च निरास ॥ २ ॥ माझा चि मज अनुभव झाला । नाहीं सावाधांवा केला ॥ ३ ॥ निळा ह्मणे पालट बुद्धि । दिसे तुमचे कृपानिधी ॥ ४ ॥

॥ ७१४ ॥ येईल चित्तासी तुह्मां उचित । आपुलें संचित भोगूं आह्मी ॥ १ ॥ काय समर्थासी विनवावें रंकें । कोण त्याचें ऐके वचन तेथें ॥ २ ॥ थोरा घरीं थोरा होतो बहुमान । कोण पुसे दीन याचकासी ॥ ३ ॥ निळा ह्मणे आम्ही मानिला विश्वास । तो दिसे निरास अवघी येथें ॥ ४ ॥

॥ ७१५ ॥ एकपणाचा घेउनी त्रास । नेंदी च दुसऱ्यास आड येऊं ॥ १ ॥ ऐसा मुळींचा चि चोरटा हरि । चोरीचिवरि मन याचें ॥ २ ॥ पंचामृतें पांच हि विषयें । चाटुनियां जाय बराबरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे याचे शोधितांहि मार्ग । न लगे चि अनंग हातीं चि हा ॥ ४ ॥

॥ ७१६ ॥ येतो जातो न दिसे परी । नित्य व्यभिचारी चित्ताचा ॥ १ ॥ ऐसा चि याचा चोरटा खेळ । आहे चक्रचाळ मुळींचा चि ॥ २ ॥ नेदि कळों न दावी च अंग । उमटों चि माग कैसा तो ॥ ३ ॥ निळा ह्मणे सायास करितां । होताती वृथा आमुचे ते ॥ ४ ॥

॥ ७१७ ॥ हरुनियां घ्यावें चित्त । आवघें चि वित्त धन माझें ॥ १ ॥ हे तों नव्हे उचित तुह्मां । पुरुषोत्तमा विचारा ॥ २ ॥ दर्शनाचें हें चि फळ । सोडावें निढळ करुनियां ॥ ३ ॥ निळा ह्मणे होईल टीका । माजि या लोकां तुमची च ॥ ४ ॥

॥ ७१८ ॥ गोविलें इंद्रियां । पाय दिठी दावूनियां ॥ १ ॥ ऐसा लाघवी नाटकी । चोर चैतन्य चेटकी ॥ २ ॥ गुणीं गुणाचा वोतला । रूपाकृती उभा ठेला ॥ ३ ॥ निळा ह्मणे पुंडलीकें । आणिला भुलवावया लोकें ॥ ४ ॥

॥ ७१९ ॥ बहुतां येणें नागविलें । हरुनी सर्वस्वहि नेलें ॥ १ ॥ कळूं जातां याची गोठी । जिवीं जिवा घाली मिठी ॥ २ ॥ पाहिला चि पुरे । उरों नेदी त्या दुसरें ॥ ३ ॥ निळा ह्मणे चेटकी ऐसा ॥ स्वभाव याचा सांडिल कैसा ॥ ४ ॥

## भक्ति व भाव यांचें सामर्थ्य.

॥ ७२० ॥ आवडोनि रूप मनीं । धरिलें वदनीं हरिनाम ॥ १ ॥ साचें सांग झालें सकळ । आलियाचें फळ नरदेहा ॥ २ ॥ रुचला संतसमागम । आपुलिया धर्म कुळाचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे भगवत्कथा । गातां ऐकतां निज मोक्ष ॥ ४ ॥

॥ ७२१ ॥ याचि लागीं हरी । उभा चंद्रभागे तीरीं ॥ १ ॥ भक्तांचिये हांके सवें । उडी घालोनियां पावे ॥ २ ॥ नेदी पडों दिठी । काळाची

सा घाली पोटीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे नामावरी । सर्वस्वें हा उदार हरी ॥ ४ ॥

॥ ७२२ ॥ भाव शुद्ध तरी । प्रगटे येउनी अंतरीं ॥ १ ॥ उरों नेदी तया भिन्न । करी आपणा समान ॥ २ ॥ भरोनियां सृष्टी । आपण चि सा पाठीपोटीं ॥ ३ ॥ निळा म्हणे राहे । कवळुनियां अंतर्बाहे ॥ ४ ॥

॥ ७२३ ॥ नेंदी त्या दुसरें । लागों आणिकाचें वारें ॥ १ ॥ युगायुगीं त्याचा । म्हणवी सोयरा निजाचा ॥ २ ॥ लेववुनी लेणीं । मिरवी अळंकार भूषणीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे शांती दया । वोपी भुक्ति मुक्ति तया ॥ ४ ॥

॥ ७२४ ॥ अंतरींचा जाणे भेद । प्रगटी आनंद सा तैसा ॥ १ ॥ देव माझा चतुर ऐसा । जैशा तैसा क्षणमात्रें ॥ २ ॥ भाविकांचे अंगीं चि लोळे । शहाण्या नाढळे अभाविकां ॥ ३ ॥ निळा म्हणे परी । सर्वांतरीं साक्षी हा ॥ ४ ॥

॥ ७२५ ॥ जिहीं धरुनी हरी मनीं । हृदयीं वदनीं रंजविला ॥ १ ॥ त्याचा झाला अंकित ऐसा । घरिंचा जैसा म्हणियारा ॥ २ ॥ न संगतां करी सर्व । जाणे गौरव दासाचें ॥ ३ ॥ निळा म्हणे दिवसनिशीं । त्याचपाशीं सर्वदा ॥ ४ ॥

॥ ७२६ ॥ निज ध्यास लागला मनीं । हा चि चिंतनीं दिवसरात्रीं ॥ १ ॥ न सुटे चि करूं कैसें । लाविलें पिसें गोवळें ॥ २ ॥ येउनि जाउनि पुढें चि उभा । लाविलें भांबा मन माझें ॥ ३ ॥ निळा म्हणे न वचें दुरी । भरला शरीरीं न सुटे चि ॥ ४ ॥

॥ ७२७ ॥ नेंदी करूं काज काम । स्मरवी नाम आपुलें ॥ १ ॥ मागें पुढें उभा चि असे । लाविलें पिसें श्रीरंगें ॥ २ ॥ खातां जेवितां जवळि च राहे । परता चि नोहे काय करूं ॥ ३ ॥ निळा ह्मणे घातली मिठी । आपणासाठीं मज केली ॥ ४ ॥

॥ ७२८ ॥ भक्त हाका ऐकावया । पसरुनियां कान उभा ॥ १ ॥ कोणी गांजील एखादा । म्हणोनि गदा सांभाळी ॥ २ ॥ सर्व काळ सावधान । निज जन रक्षणा ॥ ३ ॥ निळा ह्मणे घाली उडी । भक्त सांकडीं देखोनी ॥ ४ ॥

॥ ७२९ ॥ जाणें सकळां अंतरींचा । भाव साचा मिथ्या तो ॥ १ ॥ तर
करी तैसा चि मान । जैसें भजन ज्यापासीं ॥ २ ॥ जेंवि एक चि स्वातीजळ
सर्पी गरळ हिरा भूमी ॥ ३ ॥ निळा म्हणे एक चि हरी । जैशापर
तैसा चि ॥ ४ ॥

॥ ७३० ॥ परम कृपावंत हरी । दीनोद्धारीं तिष्ठतु ॥ १ ॥ भुक्ति मुक्ति
घेउनी हातीं । द्यावया प्रति निजदासा ॥ २ ॥ चारी मार्ग अवलोकित
येती वागवित आर्त त्यांचें ॥ ३ ॥ निळा ह्मणे सगुण वेषें । उभा चि अ
ईटेवरी ॥ ४ ॥

॥ ७३१ ॥ ज्याची आस करिती लोक । देव सकळिक आणि ऋष
॥ १ ॥ तो हा येउनी इटे उभा । राहिला लोभा भक्तीचिया ॥ २ ॥ नित
काळ सिद्ध मुनी । ज्यातें चिंतनीं चिंतिती ॥ ३ ॥ निळा ह्मणे वैष्ण
गाती । ज्यातें वर्णिती वेदशास्त्रें ॥ ४ ॥

॥ ७३२ ॥ याचीं अनुष्ठानें ध्रुव आणि प्रल्हाद । भोगिताती पद वरि
तें ॥ १ ॥ जेथें नाहीं होणें निमणें संसारा । काळाचा आडदरा अनोळ
॥ २ ॥ शुका नारदासी हा चि नित्य जप । जिव्हेसी आलाप हरिनामा
॥ ३ ॥ निळा ह्मणे ते हि झाले हरि चि ऐसे । नाम निज ध्यासें महिम
ऐसा ॥ ४ ॥

॥ ७३३ ॥ भावें पाचारितां । विठ्ठल नामें आळवितां ॥ १ ॥ येस
धांवत । माउली तूं कृपावंत ॥ २ ॥ देसी प्रेम पान्हा । मुखीं घालुनिय
स्तना ॥ ३ ॥ निळा ह्मणे घेसी । तया अंकीं खेळविसी ॥ ४ ॥

॥ ७३४ ॥ भक्तांचिये भुके । प्रेम पागविसी भातुकें ॥ १ ॥ घालुनिय
निज मुखीं । एकाएकीं करिसी सुखी ॥ २ ॥ पुरउनी आळी । घेस
कडिये ते चि काळीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे बापमाय । एका अं
दोन्ही होय ॥ ४ ॥

॥ ७३५ ॥ आम्ही स्वामीचिया बळें । येथें असों खेळें मेळें ॥ १ ॥ ना
गाउनी आवडी । करूं पदाच्या घडमोडी ॥ २ ॥ करून कीर्त
सोहळा । रंजवूं नारीनराबाळां ॥ ३ ॥ निळा म्हणे दिवसराती । केव
नेणों येती जाती ॥ ४ ॥

॥ ७३६ ॥ आठवितां याचे पाय । गेलें निरसोनी संसारभय ॥ १ ॥ अवघा काळ अवघी वेळ । स्मरणें याचिया सुमंगळ ॥ २ ॥ सदैव आह्मी भूमंडळीं । पढों हरिच्या नामावळी ॥ ३ ॥ निळा ह्मणे यावरी आतां । नेणों जन्ममरणचिंता ॥ ४ ॥

॥ ७३७ ॥ ऐसा जोडियला दातार । करुनी नामाचा उच्चार ॥ १ ॥ आम्ही भाग्यवंतीं जनीं । पायीं याचे विश्वासोनी ॥ २ ॥ नेंदी जाऊं कोठें दुरी । पुरवी अवघें चि हा घरीं ॥ ३ ॥ निळा म्हणे त्वरित आला । फळा अर्थ तो चिंतिला ॥ ४ ॥

॥ ७३८ ॥ न वजों यावरी आतां कोठें । सांडुनी चरण हे गोमटे ॥ १ ॥ जोडलें तें भाग्ययोगें । येणें काळें संतसंगें ॥ २ ॥ दुभिन्नले वरुषोनी वरी । प्रेम अमृताच्या धारी ॥ ३ ॥ निळा म्हणोनी सांटी । केली जिवें देउनी मिठी ॥ ४ ॥

॥ ७३९ ॥ धन्यरूप झाला काळ । करितां कथा गदारोळ ॥ १ ॥ आजि पोखल्या आयणी । प्रेम सुखाचिया जेवणीं ॥ २ ॥ होउनी ठेला दिव्यरूप । पुण्य निरसोनियां पाप ॥ ३ ॥ निळा म्हणे निमग्नता । झाली मन बुद्धी चित्ता ॥ ४ ॥

॥ ७४० ॥ होतें पूर्वार्जित । उत्तम संग्रहीं संचित ॥ १ ॥ तें चि उत्तीर्णत्वा लागीं । झालें सन्मुख ये प्रसंगीं ॥ २ ॥ भोग मोक्ष फळें । निवारलीं शांतिबळें ॥ ३ ॥ निळा म्हणे सहज चि आला । ओघ अमृताचा हा जिव्हाळा ॥ ४ ॥

॥ ७४१ ॥ ब्रह्मीभूत होते काया । श्रीहरि पायां अनुसरतां ॥ १ ॥ परि हा विश्वास नुमटे मनीं । जाती म्हणउनी निरया गांवा ॥ २ ॥ जिहीं केला हा सायास । पावले पदास ते संत ॥ ३ ॥ निळा म्हणे अनुभवसिद्ध । ऐसा प्रसिद्ध कलियुगीं ॥ ४ ॥

॥ ७४२ ॥ धराल तरी धराल चित्तीं । संशयनिवृत्ती करुनियां ॥ १ ॥ या हो विठोबाच्या नामें । साधनें दुर्गमें लाजविलीं ॥ २ ॥ सहज चि उच्चार करितां वाचे । सायोज्यांचे अधिकारी ॥ ३ ॥ अनन्य भावें शरणांगत ।

होता पतित उद्धरिले ॥ ४ ॥ न मागोनियां धन संपत्ती । भाव भक्ति भुकेला ॥ ५ ॥ निळा म्हणे अंतर जाणे । अधम न म्हणे उत्तम हा ॥ ६ ॥

॥ ७४३ ॥ आईका हो संत तुम्ही मुनेश्वर । माझिये निर्धार अंतरींचा ॥ १ ॥ विठोबावांचुनी न मनीं चि दैवत । न धरी माझें चित्त भाव कोठें ॥ २ ॥ काय मतांतरें करूं ते साधनें । हरिनाम कीर्तनें वांचुनियां ॥ ३ ॥ निळा म्हणे न लगे वायूची धारणा । तत्त्वसंख्या कोणा कामा आली ॥ ४ ॥

॥ ७४४ ॥ भोळा माझा पंढरिनाथ । धांवे त्वरित पाचारिल्या ॥ १ ॥ न पाहे मान प्रतिष्ठा त्याची । घेतली ज्याची स्तुति येणें ॥ २ ॥ अनार्थे दिनें भाविकें ते । आवडती चित्तें जीवापरी ॥ ३ ॥ निळा म्हणे पाळी लळा । अखंड सोहळा करुनियां ॥ ४ ॥

॥ ७४५ ॥ वाचा वेधली हरिकीर्तनीं । श्रवण श्रवणीं गोडावले ॥ १ ॥ नेत्रीं बैसलें हरिचें रूप । पूजनीं पडप उभय करां ॥ २ ॥ प्रदक्षणे सोकले चरण । अष्टांग आलिंगन नमस्कारा ॥ ३ ॥ निळा म्हणे हेंचि कोड । अव-घिया चाड विठ्ठलीं ॥ ४ ॥

॥ ७४६ ॥ अवघीं च अंगें वेष्टोनि ठेलीं । हरिचिये रंगलीं निज सेवे ॥ १ ॥ तेणें चि वाटे कृतकृत्यार्थ । चुकले अनर्थ जन्मजरा ॥ २ ॥ सर्व काळ सुखीं सुख । हरिखीं हरिख कोंदला ॥ ३ ॥ निळा म्हणे पुरले नवस । आलिया नरदेहास फळ झालें ॥ ४ ॥

॥ ७४७ ॥ सुफळ जिणें हरिच्या भजनें । चुकलीं पतनें यमजाच ॥ १ ॥ नित्य करितां हरिकीर्तन । गातां गुण निज आवडी ॥ २ ॥ घडतां संत-समागम । हरिचें प्रेम दुणावलें ॥ ३ ॥ निळा म्हणे साधिली वेळ । सकळां हि मंगळ मंगळाची ॥ ४ ॥

॥ ७४८ ॥ ऐकोनियां दासवाणी । चक्रपाणी संतोषे ॥ १ ॥ म्हणे तुम्ही प्राणसखे । बोलतां मुखें प्रीतिवादें ॥ २ ॥ सर्वही काळ माझी चि चाड । तरि मजहि कोड तुमचें चि ॥ ३ ॥ निळा म्हणे न फिटे धणी । भक्ता आणि देवाची ॥ ४ ॥

॥ ७४९ ॥ ईसारें गोविला । अवघा आंखुनी ठेविला ॥ १ ॥ देउनियां

अहंभावो । भक्ति सांठविला देवो ॥ २ ॥ नामाचें चिंतन । करुनी केला हा स्वाधीन ॥ ३ ॥ निळा म्हणे जिवेंसाटीं । करुनी सामाविला पोटीं ॥ ४ ॥

॥ ७५० ॥ देव चि झाले अंगें । देवा भजतां अनुरागें ॥ १ ॥ शुक प्रल्हाद नारद । अंबरुषी रुकमांगद ॥ २ ॥ निवृत्ती ज्ञानेश्वर सोपान । नामा सधना आणि जाल्हण ॥ ३ ॥ कूर्मा विसोबा खेचर । सांवता चांगा वटेश्वर ॥ ४ ॥ कबीर सेना सूरदास । नरसी मेहता भानुदास ॥ ५ ॥ निळा म्हणे जनार्दन एका । देव चि होउनी ठेला तुका ॥ ६ ॥

॥ ७५१ ॥ एकाहुनी आगळे एक । झाले हरिभक्त अनेक ॥ १ ॥ भक्ती निजज्ञानें वैराग्यें । देव चि होउनि ठेले अंगें ॥ २ ॥ प्रेमभक्ति अनुसरले । विठ्ठल देवें ते पूजिले ॥ ३ ॥ निळा म्हणे सांगों किती । न पुरे अल्प माझी मती ॥ ४ ॥

॥ ७५२ ॥ हरिरूप ध्यानीं हरिनाम वदनीं । हरिच्या चिंतनीं तद्रूपता ॥ १ ॥ हरी तयां अंतरीं हरी तयां बाहेरी । रक्षी निरंतरीं श्रीहरी त्यां ॥ २ ॥ हरी तयां आसनीं हरी तयां भोजनीं । हरी तयां शयनीं निद्रा करी ॥ ३ ॥ निळा ह्मणे हरी देह गेह दारा । हरी दुजा वारा लागों नेदी ॥ ४ ॥

॥ ७५३ ॥ ऐसे हरिचे दास हरिनामीं रंगले । हरी चि होउनी ठेले एकाएकीं ॥ १ ॥ आपपर तयां न दिसे चि पाहतां । विश्वीं एकात्मता अवलोकिती ॥ २ ॥ काम क्रोध लोभ मोह ममता माया । पळताती देखोनियां आशा तृष्णा ॥ ३ ॥ निळा ह्मणे त्यांच्या दर्शनें चि मुक्त । होताती पतीत महापापी ॥ ४ ॥

॥ ७५४ ॥ नित्य वदनीं हरिचें नाम । अंतरीं प्रेम विसावलें ॥ १ ॥ त्यांच्या भाग्या नाहीं सीमा । पुरुषोत्तमा प्रिय झाले ॥ २ ॥ आवडती ते सर्वदा हरी । न वचे दुरी पासुनी त्यां ॥ ३ ॥ निळा ह्मणे मेघःशाम । पुरवी काम सर्व त्यांचे ॥ ४ ॥

॥ ७५५ ॥ भक्ति भाव बळकाविला । देव धांविला सोडवणें ॥ १ ॥ ह्मणे मज द्या पालटासी । सोडा भावासी जाऊं द्या ॥ २ ॥ ते म्हणती तूं लटिका देवो । आह्मी धरिला भावो न सोडूं ॥ ३ ॥ निळा ह्मणे भावासाठीं । पडली मिठी देवें न सुटे ॥ ४ ॥

॥ ७५६ ॥ भ्याला देव देखोनि भक्तां । ह्मणे मी आतां केउता पळों । १ ॥ जीवेंसी चि इहीं केली सांटी । सोडवितां मिठी न सोडिती ॥ २ ॥ ुक्तिमुक्ति देतों यासी । परि हे उदासी न घेती त्यां ॥ ३ ॥ निळा म्हणे ाक्ति मोकलीतां आशा । देव चि फांसां पडिलों म्हणे ॥ ४ ॥

॥ ७५७ ॥ देव म्हणे भक्त हो कांहीं तरी घ्यारे । ते म्हणती उरे मीण चि ातां ॥ १ ॥ याल तरि नेईन वैकुंठलोका । ते म्हणती नका बंदीखान तें । २ ॥ रिद्धि सिद्धि देईन तुम्हां । ते म्हणती आम्हां विटाळ तो ॥ ३ ॥ ेचारी देव करावें कैसें । कैवल्याही ऐसें नेघों म्हणती ॥ ४ ॥ आतां ावडेल तरी तें मागा । देईन सांगा जीवींचें तें ॥ ५ ॥ निळा म्हणे हृदयीं ्यान । द्या हो जीवन नाम तुमचें ॥ ६ ॥

॥ ७५८ ॥ भक्ति भाव चि बांधिला गांठीं । आला उठाउठी देव तेथें । १ ॥ म्हणे मज घ्या सोडायासी । ते म्हणती ठकिसी नेघों तुज ॥ २ ॥ ठकी च माया धरिसील रूपें । लपसील खोपे रिघोनियां ॥ ३ ॥ न सोडूं ाव जाई तूं आतां । विनवी देव भक्तां काकुळती ॥ ४ ॥ भावही घ्यारे ाक्तिही घ्यारे । मजही घ्यारे तुमचा चि मी ॥ ५ ॥ निळा म्हणे साधिलें ाज । भक्ति आपुली पैज जिंकीयेली ॥ ६ ॥

॥ ७५९ ॥ देवाचें वर्म सांपडला भाव । न व जाये जवळुनी आडकला ेव ॥ १ ॥ देव म्हणे माझी नव्हे चि सुटका । भावेंविण म्हणती देवो चि ठटिका ॥ २ ॥ वर्म हें यासी दाविलें कोणे । संतासी ठाउकें येर कोणीही ेणे ॥ ३ ॥ निळा म्हणे भक्तासी तिहीं चि दाविलें । न सोडिती आतां जिवेंसी बांधलें ॥ ४ ॥

---

## नामाचा महिमा.

॥ ७६० ॥ काय करावीं तपसाधनें । हरिनाम चिंतनें सर्व सिद्धी ॥ १ ॥ हागे वाल्मीक राम चि झाला । प्रल्हादें जिंकिला द्वंद्वसमूह ॥ २ ॥ गजेंद्र पशु नाम चि जपतां । मुक्ति सायोज्यता भोग भोगी ॥ ३ ॥ निळा म्हणे हरिनाम वाड । मुक्तिचें सांकड नाहीं आम्हां ॥ ४ ॥

॥ ७६१ ॥ नेघों आम्ही कदा भुक्ति आणि मुक्ति । हरिनामीं विश्रांती सर्व जोडे ॥ १ ॥ काय कराव्या त्या रिद्धी आणि सिद्धी । वाउग्या उपाधी भजना गोंवा ॥ २ ॥ न लगे आम्हां कांहीं मान्यता बहु मान । जेणें अभिमान खवळे अंगीं ॥ ३ ॥ निळा म्हणे दुरी दुराऊ जाणीव । न लगे शहाणीव नाडील ते ॥ ४ ॥

॥ ७६२ ॥ एक गाऊं आह्मी विठोबाचें नाम । सकळ हि धाम मंगळाचें ॥ १ ॥ इतर साधनें फळ काम देती । पुनरपी आणिती गर्भवासा ॥ २ ॥ योग याग स्वर्ग काम फळदाते । ह्मणोनियां सांतें दूषिती संत ॥ ३ ॥ निळा ह्मणे नाहीं विकार हरिनामा । पाववी निज धामा स्वस्ति क्षेम ॥ ४ ॥

॥ ७६३ ॥ आला स्वानुभवा । बहुतांसी हा आहे ठावा ॥ १ ॥ उच्चार या हरिनामाचा । तरणोपाव चि भवसिंधूचा ॥ २ ॥ सांगितला संतीं । प्रतिती पाहोनियां अंतीं ॥ ३ ॥ निळा म्हणे निश्चयाचा । सुगमोपाव हा मोक्षाचा ॥ ४ ॥

॥ ७६४ ॥ हरिचें नाम चि एक पुरे । सकळां साधनांचिये धुरे ॥ १ ॥ पावावया वैकुंठासी । लहान थोरां विश्वासी यांसी ॥ २ ॥ न लगे जाणें वनांतरा । सांडोनियां घरादारा ॥ ३ ॥ निळा म्हणे मुक्तिपदा । जावयाची हे संपदा ॥ ४ ॥

॥ ७६५ ॥ नामाचे चि घोष । करुनी निर्दाळिले दोष ॥ १ ॥ वाट घेणा वाल्हाकोळी । अजामेळा पडतां जळी ॥ २ ॥ गणिका आणि पशु गज । प्रल्हाद दैत्याचा आत्मज ॥ ३ ॥ निळा म्हणे प्रसिद्ध ख्याती । नामापासीं भुक्ति मुक्ति ॥ ४ ॥

॥ ७६६ ॥ तरले तों असंख्यात । सांगों जातां न लगे अंत ॥ १ ॥ एका हरिच्या नामासाठीं । भरल्या विमानाच्या कोटी ॥ २ ॥ नाना याति स्त्रिया पुरुष । वनचर श्वापदादी राक्षस ॥ ३ ॥ निळा ह्मणे कीटक पतंग । पावले नामें पद अभंग ॥ ४ ॥

॥ ७६७ ॥ आतां हि जे गाती नामें । ते पावती निजात्मधामें ॥ १ ॥ ऐसी नामा अंगीं शक्ती । आहे ठेविली श्रीपति ॥ २ ॥ मुख्य पाहिजे

विश्वास । निद्रा सांडुनियां आळस ॥ ३ ॥ निळा म्हणे जे जे गाती । ते ते परमपदा जाती ॥ ४ ॥

॥ ७६८ ॥ जेथुनियां येणें चि नाहीं । फिरोनियां कांहीं संसारा ॥ १ ॥ तया नांव परमपद । लाभती मुग्ध हरिनामें ॥ २ ॥ पहा नवलाव हा कैसा । वानरां रिसां पदप्राप्ती ॥ ३ ॥ निळा म्हणे श्रीराम सेवे । नामानुभावें मर्कट ते ॥ ४ ॥

॥ ७६९ ॥ आम्हां सांपडलें वर्म । हरिभक्तीचें सुगम ॥ १ ॥ याचें आळवावें नाम । हृदयीं धरुनियां प्रेम ॥ २ ॥ वाजवुनी टाळी । सुखें नाचावें राउळीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे संतीं । दाविलें हें कृपावंतीं ॥ ४ ॥

॥ ७७० ॥ म्हणवी कामारी । दास्य करी यांच्या द्वारीं ॥ १ ॥ ऐसा भक्तांसी भुलला । नाम गातां आतुडला ॥ २ ॥ नेणे यांविण आणीक । शेषशाई वैकुंठ लोक ॥ ३ ॥ निळा म्हणे निःसीम भावें । भजले विके त्यांच्या नांवें ॥ ४ ॥

॥ ७७१ ॥ अखंड भूतदया मानसीं । वाचे नाम अहर्निशी ॥ तया न विसंबे हृषिकेशी । मागें मागें हिंडतसे ॥ १ ॥ जिहीं परकारणीं वेंचिलें । शरीर आयुष्य आपुलें ॥ धन वित्त ही वंचिलें । तयां विठ्ठलें सन्मानिजे ॥ २ ॥ जिहीं गाइलें नित्य नाम । अंतरीं धरुनियां प्रेम ॥ तया वस्तिसी निज धाम । निर्मुनियां ठेविलें ॥ ३ ॥ जिहीं धरिला संतसंग । दुराविलें त्रिविध जग ॥ तया सखा पांडुरंग । निजानुभवें जोडला ॥ ४ ॥ निळा म्हणे सद्गुरु भक्ति । दास्य ब्राह्मणांचे अनुरक्ती ॥ तया लागीं हा श्रीपति । करी सांगाती आपुला ॥ ५ ॥

॥ ७७२ ॥ जे जे होउनियां अनुरक्त । झाले विरक्त हरिनामें ॥ १ ॥ त्यांचे अंगीं विसावला । हृदयीं चि राहिला प्रगटोनी ॥ २ ॥ नेंदी उरों दुसरेपणें । त्याचेनि प्राणे जीवें जितु ॥ ३ ॥ निळा ह्मणे घालुनी मिठी । यातें कल्प कोटी न विसंबे ॥ ४ ॥

॥ ७७३ ॥ लाजोनियां समाधी सुख । ठाके अधोमुख हरिभेटी ॥ १ ॥ म्हणोनियां रतले दास । करिती उल्हास नित्य नवा ॥ २ ॥ ऐकोनियां नामावळी । धांवोनी कवळी हृदयीं यां ॥ ३ ॥ निळा ह्मणे जवळी ठाके । नेदी पारिखें दिसों चि ॥ ४ ॥

॥ ७७४ ॥ सहज चि नाम आलें वाचे । करीत दोषांचें निर्मूळ ॥ १ ॥ ऐसी व्यास गर्जे वाणी । महिमा पुराणीं विख्यात ॥ २ ॥ पापी चांडाळ दुरात्मे ते । नामें चि सरते वैकुंठीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे गणिका वाल्हा । अजामेळ उद्धरिला गजेंद्र ॥ ४ ॥

॥ ७७५ ॥ तरले नामें अनेक तरती । वैकुंठा जाती घोषगजरें ॥ १ ॥ ऐसा याचा कीर्तिमहिमा । उत्तमा अधमा सरिसाची ॥ २ ॥ कलियुगीं तो सुगम सार । नामोच्चार हरीचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे अनुतापेंसी । गाती वैकुंठासी ते जाती ॥ ४ ॥

॥ ७७६ ॥ नाहीं संदेह करी हा पाठ । पावसी वैकुंठ हरि म्हणतां ॥ १ ॥ जैसे प्रल्हाद उपमन्या धुरु । करितां नामोच्चारु वरिष्ठ पदीं ॥ २ ॥ नेदी हा आघात लागों वारा । धांवेल सामोरा स्वामी माझा ॥ ३ ॥ निळा ह्मणे घेईल वोसंगा । नेईल जेथें जगा गम्य नाहीं ॥ ४ ॥

॥ ७७७ ॥ हें चि परमार्थाचें सार । हरिचिया उच्चार नामाचें ॥ १ ॥ जिहीं केला पावले ते । वैकुंठीं सरते सुखी झाले ॥ २ ॥ गातां वानितां हरिगुण रासी । झाले त्रैलोक्यासी पूज्य ते ॥ ३ ॥ निळा ह्मणे निका उपावो । सांपडला ठावो वैष्णवां ॥ ४ ॥

॥ ७७८ ॥ निजात्मप्राप्तीलागीं सार । हरिचिया उच्चार नामाचा ॥ १ ॥ हें चि बीज हें चि गुज । हें चि निज निजाचें ॥ २ ॥ ऐसें संतीं पुरस्करुनी । सांगितलें कानीं येऊनियां ॥ ३ ॥ निळा ह्मणे परम प्राप्ती । नामीं चि विश्रांति हरिचिया ॥ ४ ॥

॥ ७७९ ॥ ऐकोनियां हरिनाम घोष । पळती दोष दिगंता ॥ १ ॥ जेंवि हनुमंताचिये हांके । कांपती धाकें निशाचरें ॥ २ ॥ अथवा पडतां चि रविकीर्ण । जाय हारपोन अंधःकार ॥ ३ ॥ निळा म्हणे घोकिलें जिहीं । घेतला तिहीं अनुभव हा ॥ ४ ॥

॥ ७८० ॥ नामें तुमचीं गाउनी छंदें । ब्रम्हानंदें नाचेन ॥ १ ॥ धरुनियां दृष्टीपुढें । पाहेन रूपडें सुरेख ॥ २ ॥ वारंवार क्षणक्षणा । ठेवीन चरणावरी माथा ॥ ३ ॥ निळा म्हणे पुरवा कोंड । तुम्ही चि चाड जाणोनी ॥ ४ ॥

॥ ७८१ ॥ केला माझा अंगीकार । ठेविले कर जेणें कटीं ॥ १ ॥ आतां सुखा नाहीं उणें । नामस्मरणें याचिया ॥ २ ॥ तीर्थें व्रतें तपोवनें । वसती स्थानें भासती ॥ ३ ॥ निळा म्हणे साधन सिद्धि । दर्शनें उपाधी निरसिल्या ॥ ४ ॥

॥ ७८२ ॥ आठवितां नामें सुखाची संतुष्टी । लाभें लाभ कोटी सुकृताचा ॥ १ ॥ म्हणउनि हा चि घेउनियां छंद । गातुसे गोविंद विठ्ठल हरी ॥ २ ॥ ज्याचिया स्मरणें हरे द्वैतबाध । अवघा चि उपाध माया भ्रांती ॥ ३ ॥ निळा म्हणे नित्य वैष्णवां साधनु ॥ हें चि अनुसंधान दिवसराती ॥ ४ ॥

॥ ७८३ ॥ नित्यानंद घोषें करितां हरिचें कीर्तन । श्रोते आणि वक्ते होती परम पावन ॥ १ ॥ आणिक हि लोक तरती त्यांच्या सहवासें । बाळ्याभोळ्या भाविकांसी लाभ अनयासें ॥ २ ॥ जेथें नित्य नाम घोष टाळिया गजर । तेथें रंगीं नृत्य करी रुक्मिणीवर ॥ ३ ॥ निळा ह्मणे तो चि प्रसन्न होउनी दासासी । भुक्ति आणि मुक्ति ठेवी त्याच्या सहवासीं ॥ ४ ॥

॥ ७८४ ॥ केले सुखी फार । कांहीं न करितां विचार ॥ १ ॥ कोण याती कैसें कुळ । नामें आळवितां कृपाळ ॥ २ ॥ केले वरिष्ठ सकळां । प्रेम देउनियां गळां ॥ ३ ॥ निळा ह्मणे वाढविले । वैकुंठीं ते सरते केले ॥ ४ ॥

॥ ७८५ ॥ जिव्हाग्रीं ठेवितां चि गोड । पुरे कोड सकळही ॥ १ ॥ तें या विठोबाचें नाम । सर्वदा निष्काम फळदातें ॥ २ ॥ उच्चार चि करितां ओंठीं । जाळित कोटी पापाच्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे साधन ऐसें । सुलभ चि नसे दुजें आन ॥ ४ ॥

॥ ७८६ ॥ विठोबा विठोबा नामोच्चार गोड । सरे येथें चाड सकळिकांची ॥ १ ॥ गाथा आईकत्या एक चि नव्हाळी । वैकुंठ राउळीं वसावया ॥ २ ॥ न लगती सायास करणें योगाभ्यास । नाचतां उदास कीर्तनमेळीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे जन्म चुके थोड्यासाठीं । उच्चारितां ओंठीं ऐशीं नामें ॥ ४ ॥

॥ ७८७ ॥ रात्रि पळे येतां चि सविता । सिंहगर्जनें कुंजर चळता ॥ १ ॥ तैसें हरिभक्तां सांकडें । येतां चि पळे दृष्टिपुढें ॥ २ ॥ महालक्ष्मीचें वारें ।

येतां चि दरिद्र घे माघारें ॥ ३ ॥ निळा म्हणे हरिच्या स्मरणें । हारपोनि जाती जन्ममरणें ॥ ४ ॥

॥ ७८८ ॥ काय सांगों सुखानंद । झाला अंतरीं तो बोध ॥ १ ॥ भजतां तुम्हांसी विठ्ठला । मनीं प्रेमा वोसंडला ॥ २ ॥ नाठवे चि कांहीं आतां । ऐसा वेध झाला चित्ता ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐशी परी । झाली नवल चि वाटे हरी ॥ ४ ॥

॥ ७८९ ॥ केला जिहीं नामपाठ । तयां वैकुंठ मोकळें ॥ १ ॥ न साधे जें योगयागें । कथाप्रसंगें सुलभ तें ॥ २ ॥ कीर्तनाचे घोष जेथें । होती तेथें हरि उभा ॥ ३ ॥ निळा म्हणे सुलभ ऐसें । आन साधन चि नसे कलि-युगीं ॥ ४ ॥

॥ ७९० ॥ जो जो काळ कीर्तनीं जाय । तो तो होय सार्थक ॥ १ ॥ घटिका पळही न वचे वांया । चुकवी अपायापासुनी ॥ २ ॥ न लगे जन्मां-तरा येणें । पुढती मरणें मागुती ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसा निका । उपाय नेटका सकळांसी ॥ ४ ॥

॥ ७९१ ॥ पतना न्यावे जिहीं दोषीं । कीर्तनीं तयासी हा रस ॥ १ ॥ जैसें बीज भाजिल्या अंतीं । नुगवे चि शेतीं पेरिल्या ॥ २ ॥ तैशीं जळती कर्माकर्में । एका हरिनामें गर्जतां ॥ ३ ॥ निळा म्हणे श्रोता वक्ता । होती उभयतां शुचिर्भूत ॥ ४ ॥

॥ ७९२ ॥ जेणें कीर्तनीं धरिली निष्ठा । झाला वरिष्ठां वरिष्ठ तो ॥ १ ॥ पहा प्रल्हाद दैत्यवंशीं । झाला देवासी परम पूज्य ॥ २ ॥ नामाशिंपी विष्णुदास । यवन कबिरास बहुमान ॥ ३ ॥ निळा ह्मणे कीर्तनरंगीं । रंगले जगीं धन्य झाले ॥ ४ ॥

॥ ७९३ ॥ नारद वैष्णवांचा शिरोमणी । नाचे कीर्तनीं सर्वदा ॥ १ ॥ देवो चि त्याची पूजा करी । आणि नमस्कारी भेटतां ॥ २ ॥ ऐसा घरीं बहुमान त्याचा । ऐसा कीर्तनाचा बडिवार ॥ ३ ॥ निळा म्हणे तिहीं लोकांत । कीर्तनें विख्यात हरिभक्त ॥ ४ ॥

॥ ७९४ ॥ यमधर्मही इच्छी भेटी । हरिभक्तां दृष्टी पहावया ॥ १ ॥ ह्मणे त्यांच्या मुखें कथा । होईन ऐकतां पावन मी ॥ २ ॥ जिहीं भुलविला

हरी । कीर्तन गजरीं करूनियां ॥ ३ ॥ निळा ह्मणे धन्य ते वाणी । गर्जत गुणीं सर्वदां ॥ ४ ॥

॥ ७९५ ॥ इंद्र चंद्र महेंद्र सर्व । मानवती देव हरिभक्तां ॥ १ ॥ म्हणती इहीं चि केला ऋणी । चक्रपाणि कीर्तनें ॥ २ ॥ नेंदि तिये वैकुंठासी । आपणा चि पाशीं गोंवियला ॥ ३ ॥ निळा ह्मणे हे सदैव सदां । कीर्तनें गोविंदा रंजविती ॥ ४ ॥

॥ ७९६ ॥ कीर्तन केलें ब्रह्मानंदें । ध्रुव प्रल्हादें एकनिष्ठ ॥ १ ॥ तयां केलें सुखसंपन्न । त्रैलोक्यीं मान वाढउनी ॥ २ ॥ तैसे चि शुक नारदमुनी । पावले कीर्तनीं समाधिसुख ॥ ३ ॥ निळा ह्मणे बहुतां संतां । कीर्तनें अद्वैता मेळविलें ॥ ४ ॥

॥ ७९७ ॥ कीर्तनाचा घोष गजर । ऐकतां अपार उद्धरले ॥ १ ॥ ऐसे किती सांगावे ते । कीर्तनें सरते वैकुंटीं ॥ २ ॥ आदिकरुनी स्त्रिया बाळें । कीर्तनकल्लोळें हरिपदीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे श्रोते वक्ते । एकात्मतेतें पावले ॥ ४ ॥

॥ ७९८ ॥ सांगों जातां न कळे वाचा । महिमा कथेचा अपार ॥ १ ॥ श्रवणें पठणें हरिची कीर्ति । नाना याति उद्धरल्या ॥ २ ॥ चतुष्पदें श्वान सुकरें । श्रवणद्वारें मुक्ति त्यां ॥ ३ ॥ निळा ह्मणे कीटक पक्षा । कीर्तनें वृक्षा हरिप्राप्ती ॥ ४ ॥

॥ ७९९ ॥ कीर्तनरंगें रंगलें जें जें । तें तें सहजें हरिप्रीय ॥ १ ॥ येर मुमुक्षु जे जे होती । कीर्ननें पावती ते लाभा ॥ २ ॥ महा अनुष्ठान हरिची कथा । नित्य जोडतां सुखप्राप्ती ॥ ३ ॥ निळा ह्मणे कैवल्यपद । पाववी अभेद हरिकीर्ति ॥ ४ ॥

॥ ८०० ॥ सुखें भिक्षा मागोन खावें । हरिचें करावें कीर्तन ॥ १ ॥ कलियुगीं हें साधनसार । भवसिंधु पार पाववितें ॥ २ ॥ नेघोनियां गुणदोष । करावे घोष हरिनामें ॥ ३ ॥ निळा म्हणे सुगम सिद्धी । तुटती उपाधी सकळही ॥ ४ ॥

॥ ८०१ ॥ कोणाची हि न धरुनी आशा । भजावें जगदीशा कीर्तनें ॥ १ ॥ मग तो कृपेचा सागर । उतरील पार भवसिंधु ॥ २ ॥ तोडुनियां ममता

जाळ । करील कृपाळ वरी कृपा ॥ ३ ॥ निळा म्हणे आवडी त्यासी । कीर्तनापाशीं तिष्ठतु ॥ ४ ॥

॥ ८०२ ॥ हरिच्या पढोनियां नामावळी । करिती होळी महा दोषा ॥ १ ॥ ते चि धन्य देहधारी । या माझारि कलियुगा ॥ २ ॥ सत्य वाणी सत्य चि क्रिया । जे आचरोनियां वर्तती ॥ ३ ॥ निळा ह्मणे त्यांचिया संगें । उद्धरीजे जगें अनायासें ॥ ४ ॥

॥ ८०३ ॥ नामापाशीं भुक्ति मुक्ति । ज्ञान विरक्ति हरिनामीं ॥ १ ॥ नामापासीं दया शांती । साधना समाप्ती हरिनामीं ॥ २ ॥ नामें प्राप्त नित्यानंद । स्वरूपावबोध हरिनामें ॥ ३ ॥ नामीं तिष्ठती रिद्धी सिद्धी । तुटती उपाधी हरिनामें ॥ ४ ॥ निळा ह्मणे हरिनाम सार । उतरी भव-पार हरिनाम ॥ ५ ॥

॥ ८०४ ॥ नाम तारक हें श्रीहरी । गर्जतां तुमचें भवसागरीं ॥ १ ॥ ऐसें जाणोन वैष्णवजन । करिती नित्यानी कीर्तन ॥ २ ॥ नलगे तया खटाटोप । नामस्मरणें निरसे पाप ॥ ३ ॥ निळा ह्मणे वरवी युक्ति । झाली भाग्य भाविकां प्राप्ति ॥ ४ ॥

॥ ८०५ ॥ अमृताहुनि गोड हरी । नाम उच्चारितां वैखरी ॥ १ ॥ घेतां न विटे चि हे रसना । अधिका अधिक आवडी मना ॥ २ ॥ चित्तासी विश्रांती । इंद्रियें सुखावलीं ठातीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे गोडागोड । सेवितां सरे अवघी चाड ॥ ४ ॥

॥ ८०६ ॥ सकळ मंत्रा वरिष्ठ सार । विठ्ठल नाम त्रिअक्षर ॥ १ ॥ वाचे उच्चार करितां जप । प्रगटे देहीं विठ्ठलरूप ॥ २ ॥ त्रिविध तापाचें हि हरण । विठ्ठल नाम उच्चारण ॥ ३ ॥ निळा ह्मणे सुगम सिद्धि । विठ्ठल नामाची समाधी ॥ ४ ॥

॥ ८०७ ॥ संत एकांतीं बैसले । सर्वही सिद्धांत शोधिले ॥ ज्ञानदृष्टी अवलोकिलें । सारांश काढिलें निवडुनि ॥ १ ॥ तें एक श्रीहरिचें नाम । सकळ पातकां करी भस्म ॥ अधिकारी उत्तम आणि अधम । चारी वर्ण नरनारी ॥ २ ॥ विठ्ठलनामें उच्चार ओंठीं । मूर्ती पाहतां दृष्टी ॥ लाभे ब्रह्मतेची पुष्टी । वाढे पोटीं निज शांती ॥ ३ ॥ देखतां कांपती त्या काळ ।

हरिच्या ऐसें अंगीं बळ ॥ प्रगटे वैराग्य अढळ । तुटती मळ ममतेचे ॥ ४ ॥ महा दोषाची झाडणी । अहंभावादिकांची गाळणी ॥ उभय कुळें बैसउनी । जाती विमानीं वैकुंठा ॥ ५ ॥ ऐसा नामाचा प्रताप । नेदी उरों पुण्यपाप॥ भंगुनियां त्रिविध ताप । ठाकती सद्रूप होउनी ॥ ६ ॥ दृश्य नुरे साचिये दृष्टी । ब्रह्मानंदें कोंदे सृष्टी ॥ निळा ह्मणे धरितां कंठीं । बीजमात्र हरिनाम ॥ ७ ॥

॥ ८०८ ॥ विठ्ठलनामाचा प्रताप । लेश उरों नेंदी पाप ॥ १ ॥ त्रिविध तापाची बोहरी । विठ्ठलनामाच्या उच्चारीं ॥ २ ॥ दैन्य दुःख निर्दाळिलें । विठ्ठल नामें ऐसें केलें ॥ ३ ॥ निळा ह्मणे शांती सुखें । विठ्ठल विठ्ठल ह्मणतां मुखें ॥ ४ ॥

॥ ८०९ ॥ लोंढा आला सात्त्विकाचा । पूर अद्भुत या प्रेमाचा ॥ १ ॥ तेणें लागती बोसाणें । स्वानंद चि नामस्मरणें ॥ २ ॥ मनोमीन तळपताती । गोड अर्थातें कवळिती ॥ ३ ॥ निळा ह्मणे उभय तीरें । श्रोते वक्ते निर्मळ निरें ॥ ४ ॥

॥ ८१० ॥ श्रवणकथेचें सादर । करिती नर सभाग्य ते ॥ १ ॥ सुख पावोनियां विश्रांती । मोक्षपदा जाती सुखरूप ॥ २ ॥ अगाध महिमा भगवद्गुणीं । संत पुराणीं गर्जती ॥ ३ ॥ निळा ह्मणे हरिचें नाम । सकळा भस्म करी पापा ॥ ४ ॥

॥ ८११ ॥ नामें तारिले पातकी । मुक्त झाले मृत्युलोकीं ॥ १ ॥ ऐसे बोलियले वाल्मीक । महाभारतीं व्यासादिक ॥ २ ॥ कलियुगीं हरिकीर्तन । करितां तरले अधमजन ॥ ३ ॥ निळा म्हणे असंख्यात । हरिच्या नामें झाले संत ॥ ४ ॥

॥ ८१२ ॥ शिंपी सोनार चांभार। ब्राह्मणादि नारी नर ॥ १ ॥ हरिच्या कीर्तनें हरिचे भक्त । होऊनि ठेले जिवन्मुक्त ॥ २ ॥ सुतार कुंभार यवन । अंसजादी हीन जन ॥ ३ ॥ निळा म्हणे क्षेत्री शूद्र । वैश्यहि पावले मुक्तिपद ॥ ४ ॥

॥ ८१३ ॥ योगाभ्यास साधतां चि सांग । येती उपसर्ग सिद्धीचे ॥ १ ॥ कैंची तेथें हरिसी भेटी । विवंचना शेवटीं काळाची ॥ २ ॥ विचारितां

ज्ञान अभिमान वाढे । नसते चि झगडे जाणिवेचे ॥ ३ ॥ निळा म्हणे जे हरिनाम जपती । मुक्त चि ते होती निःसंशयें ॥ ४ ॥

॥ ८१४ ॥ एका हरिच्या नामा चि साठीं । चढला वैकुंठीं गजेंद्र पशु ॥ १ ॥ द्वंद्वाचिया महामारी । ओढितां जळचरीं जळा आंत ॥ २ ॥ तैसा चि प्रल्हाद नाम चि गातां । शस्त्र अग्नी घाता विष न करी ॥ ३ ॥ निळा ह्मणे हरिचे भक्त । हरिनामें मुक्त बहुत झाले ॥ ४ ॥

॥ ८१५ ॥ शुक प्रल्हाद हरिच्या नामें । गातां सुख संभ्रमें निवाले ॥१॥ त्यांनीं उघडुनियां हे मार्ग । दाविली जगा हरिभक्ती ॥ २ ॥ तैसा चि नामा विष्णुदास । पावला सौरस परब्रह्मीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे दाउनी तुका । गेला एकाजनार्दन ॥ ४ ॥

॥ ८१६ ॥ आणिखीही उदंड संतजन । राहिले व्यापून महीतळीं ॥ १ ॥ नामें चि पावन केले दोषी । उद्धार आणिकांशीं करूनियां ॥ २ ॥ गर्जती तेणें ब्रह्मानंदें । हरिनाम पदें आळविती ॥ ३ ॥ निळा ह्मणे निमग्न झाले । हरिपदा पावले हरिनामें ॥ ४ ॥

॥ ८१७ ॥ जन्म जरा तुटती रोग । धरितां अनुराग हरिनामीं ॥ १ ॥ ऐसा अनुभव सांगती संत । पावले प्रतीत आंगें चि ते ॥ २ ॥ तरोनि आपण आणिका तारिती । जड जीवा दाविती मार्ग सोपा ॥ ३ ॥ निळा ह्मणे नाम वरिष्ठ साधना । माजी त्रिभुवना आख्या याची ॥ ४ ॥

॥ ८१८ ॥ नामें दोषी अजामेळ । परम चांडाळ तारियेला ॥ १ ॥ पुराणीं हा महिमा व्यासें । वर्णिला उद्देशें वाल्मीकें ही ॥ २ ॥ जे जे नामीं रतले प्राणी । वाहिले विमानीं श्रीहरिनें ॥ ३ ॥ निळा ह्मणे पावले पार । नामें चि अपार भवसिंधुच्या ॥ ४ ॥

॥ ८१९ ॥ नाम चि एक विठोबाचें । अवघ्या साधनांचें शिरोरत्न ॥ १ ॥ उच्चार मात्र करितां ओठीं । प्रगटे पोटीं हरिरूप ॥ २ ॥ विश्वास चि पाहिजे आधीं । अंतर शुद्धी कारण हें ॥ ३ ॥ निळा ह्मणे नुरवी दोष । हरी निःशेष जन्ममृत्यु ॥ ४ ॥

॥ ८२० ॥ ऐक्यरूपें हरिहर । उभा कटीं कर विटेवरी ॥ १ ॥ तो म्यां देखियला दिठी । भूवैकुंठीं पंढरिये ॥ २ ॥ तुळसीमाळ वैजयंती । वेढिला

संतीं मुनिवरीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे विश्रांती मना । झालें लोचनां पारणें ॥ ४ ॥

॥ ८२१ ॥ हरिची कथा अमृतरस । गोड ग्रास नामावळी ॥ १ ॥ तेणें करूं सर्वदा तृप्ती । क्षुधे निवृत्ती तृषेची ॥ २ ॥ अजर अमर होते काया । अविद्या माया निरसोनी ॥ ३ ॥ निळा ह्मणे कीर्तनीं सिद्धी । लाभे समाधी हरिभक्तां ॥ ४ ॥

॥ ८२२ ॥ नामें चि पावन केली क्षिती । घोषें निज शांती पातका ॥ १ ॥ जये गांवीं जये देशीं । वसती त्यांसी सुख लाभ ॥ २ ॥ सुदर्शन फिरे वरी । विघ्ना वोहरी करावया ॥ ३ ॥ निळा म्हणे कळीकाळ कांपे । नांदती प्रतापें हरिजन ॥ ४ ॥

॥ ८२३ ॥ अवघा काळ हें चि ध्यान । तुमच्या चिंतन नामाचें ॥ १ ॥ करूं देवा हे मृदना । ठेउनी चरणांवरी दृष्टी ॥ २ ॥ गुण चरित्रें श्रवण करूं । अर्थ विवरूं मानसीं ते ॥ ३ ॥ निळा म्हणे अवघा धंदा । कीर्तन गोविंदा तुमचें तें ॥ ४ ॥

॥ ८२४ ॥ तप साधन हें चि माझें । गाईन तुझें नाम हरी ॥ १ ॥ आणिका साधनीं उबग आला । विश्वास उपजला येचि विशीं ॥ २ ॥ कळा कुसरी न येती मना । वांचुनी चिंतना तुमचिया ॥ ३ ॥ निळा म्हणे वाचे बोली । पडिली चाली याची परी ॥ ४ ॥

॥ ८२५ ॥ न धरे धीर धरितां मनीं । न संडे वदनीं गुणनाम ॥ १ ॥ अट्टाहासें गर्जना करी । खवळली वैखरी नाटोपे ॥ २ ॥ चरित्राचे उठती भार । जिव्हे अक्षर न संडे ॥ ३ ॥ निळा ह्मणे लाविला चाळा । न कळे कळा हे तुमची ॥ ४ ॥

॥ ८२६ ॥ बरवा ओढवला हा रंग । भक्तीं प्रसंग तुमचा ॥ १ ॥ तेणें सुखें मातली वाचा । नित्य कीर्तनाचा नट नाच ॥ २ ॥ गाऊं वानूं आपुल्या छंदें । तुमचीं पदें आवडी ॥ ३ ॥ निळा म्हणे गळती नयन । प्रेमें स्फुंदन सद्गद ॥ ४ ॥

॥ ८२७ ॥ संत ऐकती निवाडे । बैसोनि पुढें गुण तुमचे ॥ १ ॥ तैसे चि गाऊं तयांपासीं । आर्त मानसीं धरुनियां ॥ २ ॥ जया जेथें पडेल रुची ।

बोलों तैसे चि सारांश ॥ ३ ॥ निळा ह्मणे अपार पेणें । बोळलें देणें तुमचें हरि ॥ ४ ॥

॥ ८२८ ॥ सकळ मंत्रांमाजी मंत्र उत्तम । दोनी अक्षरें जपतां राम ॥ निरसोनियां मायादि भ्रम । पाविजे निज धाम अनायासें ॥ १ ॥ तैसा चि मंत्रराज प्रसिद्ध । त्रि अक्षरीं जपतां गोविंद ॥ नरनारी बाळकें शुद्ध । पावती अच्युतपदातें ॥ २ ॥ चतुराक्षरी मंत्र सरळ । जपतां नारायण श्रीगोपाळ ॥ चतुर्भुज होती सकळ । स्वरूपता पावती ॥ ३ ॥ त्रि अक्षरी मंत्रसार । विठ्ठल नामाचा उच्चार ॥ निळा ह्मणे करितां नर । न ये समोर कळीकाळ त्या ॥ ४ ॥

॥ ८२९ ॥ असो आतां हें बोलणें । आह्मी निर्भय एक्या गुणें ॥ १ ॥ सांगीतलें करूं काम । हातें टाळी मुखें नाम ॥ २ ॥ गुण वानूं नानापरी । आज्ञा त्याची वंदुनी शिरीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे राजा धरी । हातीं तया सभाग्य करी ॥ ४ ॥

॥ ८३० ॥ तुमच्या कीर्तनें पावलों पार । भवसिंधूचा लहान थोर ॥ पशुपक्षी दैत्य निशाचर । नारी नर बाळकें ॥ १ ॥ पुण्यपावन तुमची कथा । एकाक्षर श्रवणीं पडतां ॥ झाडा करुनियां दोषा दुरिता । कलिमल तत्वता विध्वंसती ॥ २ ॥ हरिनामाच्या घोष गजरीं । ध्वनी रिघतां चि कर्णविवरीं ॥ भितील पातकांचिया हारी । दिशा लंघोनी पळताती ॥ ३ ॥ आनंदासी उणें चि नाहीं । कोंदोनी ठाके अंतर्बाही ॥ नाना चरित्राची नवाई । श्रोते ऐकोनि संतोषती ॥ ४ ॥ गिरी उचलिला गोवर्धन । निज मुखें प्राशिला हुताशन ॥ काळया आणिला नाथून । मिसें जाऊन चेंडुवाच्या ॥ ५ ॥ वत्सें गोवळे चतुराननें । नेतां अवघीं आपण चि होणें ॥ स्तनीं लावितां पूतनाशोषण । केलीं विंदानें अघटित ॥ ६ ॥ परता सारुनियां सागर । माजी रचिलें द्वारकापुर ॥ निद्रा न मोडितां नारीनर । मथुरा नेऊन सांठविली ॥ ७ ॥ काळयवनासी ठकिलें कैसें । मुचकुंदावरी नेला पळत्या मिसें ॥ जाळुनी त्याचे केले कोळसे । आपण निराळा साक्षपणें ॥ ८ ॥ भाजीदेठें तृप्त होणें । पांडवां नेणतां ऋषी भोजनें ॥ परिक्षितीसी गर्भींच रक्षणें । अपूर्व विंदानें श्रीहरिचीं ॥ ९ ॥ यशोदेचें स्तनपान करित । नंदा कडिये विराजे तेथ ॥ गोपिकांचे मनोरथ । पूर्ण

करित रासक्रीडे ॥ १० ॥ गौळणी रंजवी नानापरी । दहीं दूध लोणी त्यांचें चोरी ॥ उणें पडतां त्यांचिये घरीं । अधिक चि करी वाढु-नियां ॥ ११ ॥ गाई मागें धांवे रानीं । घोंगडें काठी पांवा घेउनी ॥ नाना परींचीं खेळे खेळणीं । लीलाविग्रही अवतारी ॥ १२ ॥ ऐशीं अगाध दिव्य चरित्रें । गाती ऐकती त्यांचीं गात्रें ॥ अवघीं होउनियां पवित्रें । जाती वैकुंठा निळा ह्मणे ॥ १३ ॥

## संत महिमा.

॥ ८३१ ॥ धन्य त्याची तया माय प्रसवली । ज्याची निष्ठा जडली विठ्ठलरूपीं ॥ १ ॥ विठ्ठल आसनीं विठ्ठल भोजनीं । विठ्ठल शयनीं न विसं-बती ॥ २ ॥ त्याचे सर्व काम पूर्ण मनोरथ । करील हा नाथ पंढरीचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे ज्याचा हेत पांडुरंगीं । रंगले ते जगीं धन्य झाले ॥ ४ ॥

॥ ८३२ ॥ काय त्यांचा महिमा वानूं वारंवार । हरिभक्त थोर भूमं-डळीं ॥ १ ॥ ज्याचिये भेटीचें आर्त ब्रह्मादिकां । पूज्य सकळ लोकां विश्वा झालें ॥ २ ॥ यमधर्म वास पाहे नित्य काळ । ह्मणे धन्य वेळ भेटती ते ॥ ३ ॥ निळा ह्मणे सर्व भाग्यें चोजविती । रिद्धि सिद्धि येती वोळं-गणें ॥ ४ ॥

॥ ८३३ ॥ कळिच्या काळा नागवती । जिहीं विठ्ठल धरिला चित्तीं ॥ १ ॥ ते चि देव झाले अंगें । अहं मोह ममता त्यागें ॥ २ ॥ देहें चि असोनि देहातीत । भोगीं अभोक्ते सतत ॥ ३ ॥ निळा म्हणे नामासाठीं । विठ्ठल सांठविला पोटीं ॥ ४ ॥

॥ ८३४ ॥ नेणती ते आपपर । विश्वीं झाले विश्वंभर ॥ १ ॥ नाहीं देहाची भावना । करितां नाम संकीर्तना ॥ २ ॥ हरिच्या नामामृतें धाले । गिळुनी ब्रह्मांडा राहिले ॥ ३ ॥ निळा म्हणे अवघ्या चि परी । झाले व्यापक चराचरीं ॥ ४ ॥

॥ ८३५ ॥ काम क्रोध पळती दुरी । माया तृष्णा आपापरी ॥ १ ॥ विठ्ठल नामाचिया गजरें । दोष गेले दिगांतरें ॥ २ ॥ अहं ममता देश-

घडी । आशा चिंता झाली वेडी ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसें झालें । हरिच्या नामें हरि चि केलें ॥ ४ ॥

॥ ८३६ ॥ दृश्य नेणती आभास । अवघा ब्रह्मींचा प्रकाश ॥ १ ॥ तया नाहीं दुजी परी । एकाविण उरली हरी ॥ २ ॥ अवघे चि नेणोनी जाणते । अवघ्यां राहिले आतौते ॥ ३ ॥ निळा ह्मणे जनीं वनीं । अवघ्या अंगें जनार्दनीं ॥ ४ ॥

॥ ८३७ ॥ नाहीं भिन्नत्व उरलें । अवघ्या अंगें अवघें झालें ॥ १ ॥ नेणती ते मानामान । जन तैसें तयां वन ॥ २ ॥ न लगे साधन त्यां संपत्ती । देव चि झाले सर्वां भूतीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे एकाएकीं । एक चि होउनि ठेले लोकीं ॥ ४ ॥

॥ ८३८ ॥ एक्या जिवें एक्या भावें । एक चि एकले एक्या देवें ॥ १ ॥ एकाएकीं एक चि झाले । एका अंगीं विरोनि गेले ॥ २ ॥ एक चि केलें निजानुभवें । एक चि झाले एक्या नांवें ॥ ३ ॥ निळा ह्मणे एकाएकीं । एक चि झाले तिहीं लोकीं ॥ ४ ॥

॥ ८३९ ॥ उच्चारितां नाम वाचे । झालें त्याचें स्वरूप चि ॥ १ ॥ नाहीं तया उरलें दुजें । आत्मतेजें जग भासे ॥ २ ॥ ब्रह्मानंदीं निमग्नवृत्ति । विराजती स्वानंदें ॥ ३ ॥ निळा ह्मणे गुणातीत । अखंडित निज बोधें ॥ ४ ॥

॥ ८४० ॥ अंगीं ऐश्वर्य येउनी बाणे । तुमचे भक्तीचीं लक्षणें ॥ १ ॥ तैं तो मान्य होय जगीं । विश्व वंदी तयालागीं ॥ २ ॥ शांती क्षमा आलिया वस्ती । संतलक्षणाची प्रशस्ती ॥ ३ ॥ काम क्रोध मोडली चाली । सर्व भूतीं साम्यता झाली ॥ ४ ॥ तुटोन गेले आशापाश । नुरोनि कल्पना निःशेष ॥ ५ ॥ निळा ह्मणे नाहीं ममता । कृपा तुमची ते अनंता ॥ ६ ॥

॥ ८४१ ॥ भूतीं भगवंत देखिला । मानामान सहज चि गेला ॥ १ ॥ तुमचे कृपेची हे जाती । स्वरूपीं वेध झाला वृत्ती ॥ २ ॥ द्वेषाद्वेष निंदा नेणें । चिंता असुया पळती भेणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे भूतमात्रीं । झाला कृपेसी तो धात्री ॥ ४ ॥

॥ ८४२ ॥ सर्वकाळीं एकात्मता । जोडली त्या भाग्यवंता ॥ १ ॥ ज्याचा गेला अहंकार । गळोनियां मद मत्सर ॥ २ ॥ जें जें दृष्टीपुढें देखे ।

तें तें हरिरूपें ओळखें ॥ ३ ॥ निळा ह्मणे नित्य केला । पूर्ण बोधें उदो झाला ॥ ४ ॥

॥ ८४३ ॥ आपणा सारिखे । देखे नाढळे पारिखे ॥ १ ॥ गुरु कृपा तो लाधला । व्यापुनी चराचर एकला ॥ २ ॥ निंदा स्पर्धा द्वेषाद्वेष । तुटले कामक्रोध पाश ॥ ३ ॥ निळा ह्मणे पात्र सुखा । झाला एकाएकीं देखो ॥ ४ ॥

॥ ८४४ ॥ मानामान संकल्प आशा । तुटला मोहजाळ फांसा ॥ १ ॥ तया गुरुचिया भक्ता । नुरे चि कोठें गोंवा गुंता ॥ २ ॥ सर्वांतरीं आपुलें रूप । देखती नेणतां विकल्प ॥ ३ ॥ निळा ह्मणे कर्मातीत । झाले होउनी कर्मी रत ॥ ४ ॥

॥ ८४५ ॥ सुखाची च ओतली । मूर्ति याची ठसावली ॥ १ ॥ अविच्छिन्न भगवद्बुद्धी । सर्व भूतीं निरावधी ॥ २ ॥ मोह ममता कैंची आतां । आशा कल्पना हरिच्या भक्तां ॥ ३ ॥ निळा ह्मणे सनकादिकां । अनुभव तैसा याचा निका ॥ ४ ॥

॥ ८४६ ॥ विठ्ठल नामें वाहे टाळी । ब्रह्मानंदाच्या कल्लोळीं ॥ १ ॥ निजात्मसुखाचा सोहळा । विठ्ठल आला किती डोळां ॥ २ ॥ सकळ हि सुकृतें ओळलीं । विठ्ठलरूपें उभीं ठेलीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे जडली बुद्धी । नित्य हरिनामें समाधी ॥ ४ ॥

॥ ८४७ ॥ श्रीहरिच्या संकीर्तनें । तुटलीं बंधनें बहुतांचीं ॥ १ ॥ होउनियां उपरती । राजा परिक्षिती उद्धरला ॥ २ ॥ कीर्तनें नारद मुक्त शुक । आणि सनकादिक प्रल्हाद ॥ ३ ॥ निळा म्हणे हरिची कथा । एकात्मता देवभक्तां ॥ ४ ॥

॥ ८४८ ॥ जडोनियां ठेली । वृत्ति पायीं लिगटली ॥ १ ॥ मुखीं नामाची गर्जना । हरिचा आठव क्षणक्षणा ॥ २ ॥ रूपाचें चिंतन । तेथें चि गुंतलें मन ॥ ३ ॥ निळा म्हणे दिलें । देह पायीं समर्पीलें ॥ ४ ॥

॥ ८४९ ॥ तेथें चि बैसलें । मन नुठी कांहीं केलें ॥ १ ॥ ईटेवरी विराजती । चरण ते चि आठवती ॥ २ ॥ कटीं कर तुळसीमाळा । ध्यानीं बैसला तो डोळा ॥ ३ ॥ निळा म्हणे भूकतान । गेली विसरोनियां मन ॥ ४ ॥

॥ ८५० ॥ मावळली खंती । देहीं देहाची विस्मृती ॥ १ ॥ पांडुरं ध्यानीं मनीं । रूप बैसलें लोचनीं ॥ २ ॥ न ये कळों दिवसराती । स्व निद्रा ना जागृती ॥ ३ ॥ निळा म्हणे अखंडता । विठ्ठलरूपीं तादात्म्यता ॥ ४ ॥

॥ ८५१ ॥ दिसे तो चि जनीं वनीं । विठ्ठल हृदयीं त्रिभुवनीं ॥ १ ॥ लेणें नेसणें भूषणें । विठ्ठल वस्त्रें परिधानें ॥ २ ॥ अन्न भोजन उदक पान । विठ्ठल सुषुप्ती शयन ॥ ३ ॥ निळा म्हणे वाचा बोली । विठ्ठल होऊनियां ठेली ॥ ४ ॥

॥ ८५२ ॥ भूतीं भूतात्मा देखतां । ठेली जडोनि एकात्मता ॥ नाढळे गुणदोष वार्ता । नमन नम्रता त्यां अंगीं ॥ १ ॥ धन्य त्यांचें जन्मकर्म । सम नाढळे ज्या विषम ॥ गळोनियां क्रोध काम । झाले निष्काम निर्लोभ ॥ २ ॥ संकल्प नासले विकल्प । पुण्य कैंचें तया पाप ॥ ठेलें स्वरूपीं स्वरूप । विठ्ठल रूप विठ्ठलीं ॥ ३ ॥ अहंकार नुरे उरीं । झाले व्यापक चराचरीं ॥ निजानंदाची उजरी । सन्मुख तयां सर्वदा ॥ ४ ॥ निळा ह्मणे स्थैर्य बुद्धी । निर्द्वंद्व झाले निजात्मसिद्धी ॥ सच्चिदानंद पदोपदीं । कैवल्य सुखें डुल्लतो ॥ ५ ॥

॥ ८५३ ॥ बोलणें त्याचें तें निःशब्द । देखणें देखती सच्चिदानंद ॥ करणें चाळितां आत्मबोध । विषयीं विषय ब्रह्मरूप ॥ १ ॥ जाणें येणें आणिकां दिसे । अचळपणें तें जैसें तैसें ॥ कल्लोळ सागरीं उससे । रश्मि जैसे निज बिंबीं ॥ २ ॥ न मोडे त्या अखंडता । घेतां देतां सर्व ही करितां ॥ हांसतां खेळतां बोलतां । निजीं निजतां यथा सुखें ॥ ३ ॥ लेणीं अळंकारहि मिरविती । जयापरि तैसे चि दिसती ॥ न मोडतां स्वरूप स्थिती । चित्तीं चिंतन सर्वदा ॥ ४ ॥ निळा ह्मणे गुणातीत । देही देहातें नातळत ॥ होउनियां ठेले संत । अखंडित अखंड ॥ ५ ॥

॥ ८५४ ॥ अखंडता ते झाली ऐसी । विठ्ठल राहिला मानसीं ॥ ध्यानीं मनीं लोचनासीं । अहर्निशीं निज बोध ॥ १ ॥ जनीं वनीं जनार्दन । नाढळे त्या भिन्नाभिन्न ॥ एकात्मता अनुसंधान । नित्य दर्शन विठ्ठलीं ॥ २ ॥ देहीं असोनी देहातीत । गुणीं गुणातें नातळत ॥ विषयीं विषयापासुनी मुक्त । भोगी भोगासक्त नव्हती ते ॥ ३ ॥ नित्य निरामय निर्गुण । जगदात्मा जो आनंदघन ॥ विटेवरी पाउलें समान ।

॥ ४ ॥ निळा म्हणे विठ्ठल जपें । सांडिले ते पुण्यपापें ॥ संकल्प सोडिले विकल्पें । त्रिविध तापें स्वानुभवी ॥ ५ ॥

॥ ८५५ ॥ देतां कांहीं चि न घेती । संत उदासीन चित्तीं ॥ १ ॥ त्रैलोक्यींचा मान धन । नावडे तया देवाविण ॥ २ ॥ नाहीं आस्था देहावरी । आशा तृष्णा कैंची उरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे ते देवचि झाले । कल्पकल्पांतीं संचले ॥ ४ ॥

---

## संतांचें स्तवन.

॥ ८५६ ॥ माझें माझें हातीं हीत । दिधलें संत मुनेश्वरीं ॥ १ ॥ काय उत्तीर्ण होऊं कैसा । उपकारें आकाशा झांकोळिलें ॥ २ ॥ जिहीं पाजिलें अमृत धणी । तयां कांजवणी काय देऊं ॥ ३ ॥ निळा म्हणे रत्न पालटा । सागरगोटा काय तुके ॥ ४ ॥

॥ ८५७ ॥ जीवभाव ठेऊं पायीं । तरि तो काय लटिका चि ॥ १ ॥ याचिलागीं लिगटलों । पायीं जडलों न ढळेसा ॥ २ ॥ जेथें संतचरणरज । पडती सहज मी तेथें ॥ ३ ॥ निळा म्हणे याविण आतां । न दिसे अर्पितां उत्तीर्णपणा ॥ ४ ॥

॥ ८५८ ॥ जेणें छत्र सिंहासन । दिधलें आसन तृणाचें सा ॥ १ ॥ काय उत्तीर्ण होइजे रंकें । तेंवि म्यां मशकें संतचरणा ॥ २ ॥ ज्याचिया कृपा ब्रह्मानंद । पावलों अगाध अक्षयी तो ॥ ३ ॥ निळा ह्मणे सामराज्यें लेणें । लेवविलें ईक्षणें कृपेचिया ॥ ४ ॥

॥ ८५९ ॥ अंतरींचें मनोगत । तुह्मी तों संत जाणतसां ॥ १ ॥ तरी वियोग नका आतां । तुमच्या भजना भजनासी ॥ २ ॥ आठव करितां दिवसरातीं । उल्हास चित्तीं मना द्यावा ॥ ३ ॥ निळा ह्मणे कृपाघना । विज्ञापना हे माझी ॥ ४ ॥

॥ ८६० ॥ भाग्याची उजिरी । दिसे यावरि वोढवली ॥ १ ॥ ह्मणोनियां कृपावंत । झाले संत मायबाप ॥ २ ॥ पाचारुनी देती मोहें । प्रेम पेहे पाजिती ॥ ३ । निळा ह्मणे सांगती कानीं । माझें मजलागुनी स्वहित ॥ ४ ॥

॥ ८६१ ॥ निज सायासें जोडुनी । होते निक्षेपुनी ठेविले ॥ १ ॥ तें चि दिधलें माझ्या हातीं । आजि संतीं कृपादान ॥ २ ॥ कल्पादीचें पुरातन । जे महा धन परमार्थिक ॥ ३ ॥ निळा ह्मणे पोटा आलों । ह्मणोनि झालों अधिकारी ॥ ४ ॥

॥ ८६२ ॥ उपायाच्या करितां श्रेणी । परि जेथ कोणी न पवे चि ॥ १ ॥ तया पाववीलों ठायां । संतीं करूनियां निज कृपा ॥ २ ॥ ज्याचे प्राप्तीलागीं योगी । धांवती मार्गीं सुषुम्नेच्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे सिद्ध मुनी । ज्यातें अनुदिनी चिंतिती ॥ ४ ॥

॥ ८६३ ॥ सुखी केलें सुखी केलें । संतीं दाविलें निज हित ॥ १ ॥ जन्मोजन्मीं दास त्यांचा । पोसणा ठायींचा पुरातन ॥ २ ॥ नित्य आपुला आठव देती । आणि पुरस्कारिती निज सेवे ॥ ३ ॥ निळा ह्मणे हें चि त्यांचें । वर्तन ठायींचें पूर्वापार ॥ ४ ॥

॥ ८६४ ॥ हरिभक्त माझे जिवलग सांगाती । सांभाळुनि नेती परलोका ॥ १ ॥ वचनें चि त्यांच्या होय महा लाभ । करी पद्मनाभ कृपादृष्टी ॥ २ ॥ मोहादि बंधनें जाती तुटोनियां । कळिकाळहि पायांतळीं दडे ॥ ३ ॥ निळा ह्मणे मुक्त मोकळिया वाटा । जावया वैकुंठा त्यांच्या संगें ॥ ४ ॥

॥ ८६५ ॥ धरिती ज्या हातीं संत कृपावंत । पाळी पंढरिनाथ लळा त्याचा ॥ १ ॥ न विसंबे त्या घडी पळ युग मानी । दिसों नेदी जनीं किविलवाणे ॥ २ ॥ पाजी प्रेमपेहे वाहे तया अंकीं । ह्मणे हे लाडकी तान्ही माझी ॥ ३ ॥ निळा ह्मणे दावी स्वहिताचा पंथ । नेदी त्या आघात येऊं आड ॥ ४ ॥

॥ ८६६ ॥ गजेंद्राच्या संगें नाडीया उद्धार । प्रल्हादें असुर उद्धरीले ॥ १ ॥ हनुमंतें जुत्पत्ती रिस आणि वानर । पावले पार भवसिंधु ॥ २ ॥ बिभी-षणें राक्षस लावियेले भक्ती । केली पावन क्षिती धर्मराजें ॥ ३ ॥ निळा ह्मणे तैसे संतीं उद्धरिले । नव जाती बोलिले संख्यारहित ॥ ४ ॥

॥ ८६७ ॥ म्हैसीपुत्रा मुखें बोलवणें श्रुती । चालवणें भिंती बैसोनियां ॥ १ ॥ नव्हे हा सामान्य महिमा संतांचा । नैवेद्य हातींचा मूर्ति जेवी ॥ २ ॥ उदकामाजि वह्या ठेऊनि कोरड्या । दाखवणें रोकड्या विश्वजना ॥ ३ ॥ निळा ह्मणे तिहीं संगें चि तारणें । दीनें उद्धरणें नवल कोण ॥ ४ ॥

॥ ८६८ ॥ जिहीं निमिषमात्रें देह पालटिला । स्त्रियेचा चि केला पुरुष उभा ॥ १ ॥ साचें नवल कोण तारिती जड जीवा । यालागीं घडावा संत-संग ॥ २ ॥ जिहीं फिरविलें औंढयाचें देवालय । बोलविले बोल मूर्तिकरवीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे जिहीं प्रेतें जिवविलीं । वरदें उपजविलीं बाळें स्त्रिया ॥ ४ ॥

॥ ८६९ ॥ ते चि संत ते चि संत । ज्यांचा हेत विठ्ठलीं ॥ १ ॥ नेणती कांहीं टाणे टोणें । नामस्मरणें वांचुनी ॥ २ ॥ काया वाचा आणि मनें । धाले चिंतनें डुल्लती ॥ ३ ॥ निळा ह्मणे विरक्त देहीं । आठव चि नाहीं विषयांचा ॥ ४ ॥

॥ ८७० ॥ त्याचे पायीं माझी बुद्धी । जडली कधीं न ढळेसी ॥ १ ॥ ज्याचे ध्यानीं मनीं हरी । नामें वैखरी उच्चार ॥ २ ॥ नित्य कीर्तनांचे घोष । करिती उल्हास आवडी ॥ ३ ॥ निळा ह्मणे त्यांची गोठी । ऐकतां पोटीं सुख वाटे ॥ ४ ॥

॥ ८७१ ॥ जया नाहीं आपपर । सांगतां विचार स्वहिताचा ॥ १ ॥ जेणें देव जोडे जोडी । दाविती परवडी त्या साचा ॥ २ ॥ संदेहाचे तोडिती पाश । सहज उपदेश बोलणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे अनुताप उठी । ऐकतां गोठी भाविकां ॥ ४ ॥

॥ ८७२ ॥ सुदिन होय साधकांसी । जरि ते अनायासी भेटती ॥ १ ॥ बोध प्रतापाची वाणी । गर्जविती गुणीं श्रीहरिच्या ॥ २ ॥ ऐकती त्यांचें हरे पाप । निरसे ताप त्रिविध ॥ ३ ॥ निळा ह्मणे भूतळींचे । देव चि साचे बोलते ते ॥ ४ ॥

॥ ८७३ ॥ हरावया कलिचे दोष । साच हे अंश श्रीहरिचे ॥ १ ॥ ह्मणोनियां सामर्थ्य अंगीं । वागविती जगीं निभ्रांत ॥ २ ॥ भक्तिलेणें लेऊ-नियां । विचरती माया लाघवी ॥ ३ ॥ निळा ह्मणे संदेह नाहीं । इह्यर्थी कांहीं त्रिसत्य ॥ ४ ॥

॥ ८७४ ॥ बोलिले शब्द निश्चयाचे । प्रतीतीं साचे आले ते ॥ १ ॥ माझा मज चि परिचय झाला । संतीं दाविला हितार्थ ॥ २ ॥ निमिषमात्रें सावध केलें । आपुलिये लाविलें निज सेवे ॥ ३ ॥ निळा ह्मणे उपकार त्यांचा । सहस्र वाचा न वर्णवे ॥ ४ ॥

॥ ८७५ ॥ तो चि वाणिती आनंद । परमानंद अंतरींचा ॥ १ ॥ जनीं लावावया गोडी । कीर्ती परवडी पोकारिती ॥ २ ॥ आपण पावोनियां सुखा । आणिकां हरिखा मेळविती ॥ ३ ॥ निळा ह्मणे निगमादिक । ज्याचें कौतुक वानिती ॥ ४ ॥

॥ ८७६ ॥ पाहोनियां आले ठाव । संत गांव सुखाचा ॥ १ ॥ त्या चि दाविताती वाटा । सुगमा वैकुंठा जावया ॥ २ ॥ बाळ्या भोळ्या सात्विक लोकां । करुनी नेटका उपदेश ॥ ३ ॥ निळा ह्मणे परोपकारा । लागीं वसुंधरा विचरती ॥ ४ ॥

॥ ८७७ ॥ हें चि त्यांचें नित्य काम । दावणें धर्म विहिताचे ॥ १ ॥ ज्याचें तया स्वहित जोडे । ऐसें उघडें बोलती ॥ २ ॥ निःसीम पांडुरंगीं भक्ति । उपजे विरक्ति भाविकां ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसी वाणी । वदती पुराणीं प्रतिपाद्य ॥ ४ ॥

॥ ८७८ ॥ वैष्णव वसती जये स्थळीं । तेथें धुमाळी कथेची ॥ १ ॥ विठ्ठल देव नाचे उभा । दाटे सभा संतांची ॥ २ ॥ सुखी होती महानुभाव । पावती ठाव तत्पदीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे नारीनर । होती तत्पर परमार्थी ॥ ४ ॥

॥ ८७९ ॥ संतांपासीं अपार सुख । हरिखा हरिख वोसंडे ॥ १ ॥ बोलती वचनें ते चि वेद । शास्त्रानुवाद विहिताचे ॥ २ ॥ पुरातन ज्या ज्या उत्तम वाटा । दाविती चोखटा भाविकां ॥ ३ ॥ निळा ह्मणे यांचा धंदा । हा चि सर्वदा गुण वाणीं ॥ ४ ॥

॥ ८८० ॥ हरिकीर्तनाच्या योगें । आह्मांसी जगें जाणीजे ॥ १ ॥ नाहीं तरी होतों ठावा । कोठें देवा कोणासी ॥ २ ॥ जेंवि वोहळासी प्रतिष्ठा । पावतां तटा गंगोदका ॥ ३ ॥ निळा ह्मणे प्रकाश दीप्ति । चंद्रज्योती वन्हीसंगें ॥ ४ ॥

॥ ८८१ ॥ संतांचा वास जये स्थळीं । तेथें रवंदळी पापाची ॥ १ ॥ काम क्रोध जाती विलया । ममता माया देशधडी ॥ २ ॥ तृष्णे कल्पनेचा गांव । वोस ठाव संदेहा ॥ ३ ॥ निळा ह्मणे अहंकारा । मद मत्सरा उरी नुरे ॥ ४ ॥

॥ ८८२ ॥ गर्जविती भगवद्गुणीं । सर्वदा वाणी नीति घोषें ॥ १ ॥ तेणें चि पावन करिती जगा । भवभयभंगा पावउनी ॥ २ ॥ भाग्याचे ते पावती तेथें । वसती जेथें हरिभक्त ॥ ३ ॥ निळा ह्मणे त्यांच्या गोठी । ऐकतां कोटी सुखाच्या ॥ ४ ॥

॥ ८८३ ॥ ऐश्वर्याचीं वचनाक्षरें । वदती मधुरें तत्वदार्ती ॥ १ ॥ श्रवण करिती सात्विक लोक । पावती सुख कैवल्य ॥ २ ॥ भोगुनियां नित्यानंदा । सुखें निज पदा लिगटती ॥ ३ ॥ निळा ह्मणे हे संतसाधु । आर्तबंधु दीनाचे ॥ ४ ॥

॥ ८८४ ॥ मार्ग दाउनी गेले आधीं । दयानिधी संत पुढें ॥ १ ॥ तेणें चि पंथें चालों जातां । न पडे गुंता कोठें कांहीं ॥ २ ॥ मोडुनियां नाना मतें । देती सिद्धांतें सौरसु ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसे संत । कृपावंत सुखसिंधु ॥ ४ ॥

॥ ८८५ ॥ सांपडली वाट । आम्हां वैकुंठाची नीट ॥ १ ॥ सहज वचनीं विश्वासता । संत संगती लागतां ॥ २ ॥ वारलें दुर्घट । होतें भ्रांतीचें कचाट ॥ ३ ॥ निळा म्हणे सुखी । झालों पूर्विली ओळखी ॥ ४ ॥

॥ ८८६ ॥ सहज चि होतों उभा । संतसेवेचिया लोभा ॥ १ ॥ तंव काढिला निक्षेप । हातीं दिला तो अमूप ॥ २ ॥ नाहीं चि अंत जया । किती माप लाऊं तया ॥ ३ ॥ निळा म्हणे दिवसराती । न पुरे करितां गणती ॥ ४ ॥

॥ ८८७ ॥ केली पायवाट । उल्लंघिला मायाघांट ॥ १ ॥ जिहीं हरी आठविला । जिवें हृदयीं धरिला ॥ २ ॥ जिंकोनियां काळा । वरि गेले भूमंडळा ॥ ३ ॥ निळा म्हणे ब्रह्मैशान । पावोनी लाविलें निशाण ॥ ४ ॥

॥ ८८८ ॥ ऐशिया सुखाची मांदुस । झाली रूपस विठाई ॥ १ ॥ मांडुनियां इटे ठाण । धरिला जघन द्वयकरीं ॥ २ ॥ रूपाकृती मानव वेष । ईशाईश जननी हे ॥ ३ ॥ निळा म्हणे भक्तांसाठीं । फिरे वाळुवंटीं उघडी हे ॥ ४ ॥

॥ ८८९ ॥ देखोनियां संतमेळा । कीर्तन सोहळा धांव घाली ॥ १ ॥ आईकावया आपुलीं नामें । गुणसंभ्रमें नित्य नवे ॥ २ ॥ बैसोनियां प्रेम

वांटी । नाचे परवडी मग सर्वें ॥ ३ ॥ निळा म्हणे आपुल्या सुखें । वांटी हारिखें भुक्ति मुक्ति ॥ ४ ॥

॥ ८९० ॥ संतांपासीं आर्त याचें । सांगे जिवींचें निज गुज ॥ १ ॥ उपदेशिला चतुरानन । तें चि ब्रह्मज्ञान अनुवादें ॥ २ ॥ उद्धवा आणि अर्जुनासी । सांगितलें संतांसी तें देत ॥ ३ ॥ निळा म्हणे भुललासी भक्ति । वाढवी प्रीति यालागीं ॥ ४ ॥

॥ ८९१ ॥ भक्तांचा चि वोरस देवा । धांवे सेवा करूं त्यांची ॥ १ ॥ जें जें गोड वाटे मनीं । तें तें वदनीं भरी तयां ॥ २ ॥ अपूर्ण तेथें पूर्ण करी । पुरवी कामारी होउनी ॥ ३ ॥ निळा म्हणे रक्षी हेत । उभा तिष्ठत त्यांपासी ॥ ४ ॥

॥ ८९२ ॥ कोठें फावों येतां मग । निश्चळ ऐसा हा प्रसंग ॥ १ ॥ आजि संतसंगगुणें । हरिचीं नामें उच्चारणें ॥ २ ॥ अनायासें चि कथा कीर्ति । जोडली याची संगती ॥ ३ ॥ निळा ह्मणे फळोन्मुख । झालें परमार्थिक सुख ॥ ४ ॥

॥ ८९३ ॥ अंधःकारीं प्रकाश दावी । दीप रवीपुढें मिथ्या ॥ १ ॥ तैशीं प्राप्तांपुढें ज्ञानें । युक्तीचीं दिनें लेवासे ॥ २ ॥ जिवे मेवे गोडिये निके । परि ते फिके परमामृतीं ॥ ३ ॥ निळा म्हणे दाविती भाव । परि ते स्वमेव संत भिन्न ॥ ४ ॥

॥ ८९४ ॥ पाहोनियां सकळ मतांतरें । बैसला धुरें जाणतियां ॥ १ ॥ परि ते दुर्लभ निपुण ज्ञानी । जे कां जाणोनी नेणते ॥ २ ॥ बोलती उदंड सारांश गोष्टी । परत्वीं भेटी विरुळे ते ॥ ३ ॥ निळा म्हणे वरदळवेसी । नुतरती कसीं तयापुढें ॥ ४ ॥

॥ ८९५ ॥ सूर्य न देखे अंधःकारा । अग्नि जेंवी सीत ज्वरा ॥ १ ॥ तेंवि हरिभक्तां सांकडें । येऊं चि न शके तयापुढें ॥ २ ॥ हनुमंतासी भूतबाधा । नव्है कल्पांतींही कदा ॥ ३ ॥ निळा म्हणे दत्तात्रया । न बाधी मोह ममता माया ॥ ४ ॥

॥ ८९६ ॥ उष्णें न तपे चि सुधाकर । सीतें न पिडे वैश्वानर ॥ १ ॥

तेंवि हरिभक्तांतें हरी । नेदी बुडों भवसागरीं ॥ २ ॥ गगन न पडे स्तंभेविण । तान्हा न फुटे चि जीवन ॥ ३ ॥ निळा म्हणे उदया येतां । न देखे अंधःकारातें सविता ॥ ४ ॥

॥ ८९७ ॥ सांडुनी गुणदोषाची मात । करावा संग्रात संतांचा ॥ १ ॥ साधकां हे सुगम वाट । वस्ति वैकुंठ पावावया ॥ २ ॥ नित्य करितां हरिची कथा । दोषा दुरिता संहार ॥ ३ ॥ निळा ह्मणे धरिल्या चित्तीं । भाविकां लाभती स्वानुभव ॥ ४ ॥

॥ ८९८ ॥ देवासाठीं घेउनी जोग । अवघा चि भोग सजियला ॥ १ ॥ ते चि एक बळिये गाढे । कांपे त्यांपुढें कळिकाळ ॥ २ ॥ आशा मात्र नाहीं ज्यांसी । शांतिसुखासी लिगटले ॥ ३ ॥ निळा ह्मणे हरिच्या ध्यानें । गेले विसरोन देहभावा ॥ ४ ॥

॥ ८९९ ॥ ते चि धन्य ते चि धन्य । सुकृती जन नरदेहीं ॥ १ ॥ जिहीं करुनी नामपाठ । भरला घोट द्वैताचा ॥ २ ॥ निरसुनियां ममता माया । कीर्तनें काया प्रक्षाळिली ॥ ३ ॥ निळा ह्मणे अंतरसाक्षी । केला कैं पक्षी जगाचा ॥ ४ ॥

॥ ९०० ॥ गर्जत जाती ब्रह्मानंदें । हरिचीं पदें हरिभक्त ॥ १ ॥ धाक त्यांचा कळिच्या काळा । कांपे चळचळां देखोनी ॥ २ ॥ विबुद्ध अवघें करिती मान । तीर्थें वंदन चरणाचें ॥ ३ ॥ निळा म्हणे धन्य ते जगीं । झाले श्रीरंगीं रंगतां ॥ ४ ॥

॥ ९०१ ॥ हरिच्या नामें हरिचे दास । झाले सकळिकांस वंद्य जगीं ॥ १ ॥ समोर त्यांच्या नये काळ । कळिचा अमंगळ म्हणउनी ॥ २ ॥ वदनीं त्यांच्या निघतां घोष । पळती दोष इतरांचे ॥ ३ ॥ निळा ह्मणे केली वाट । सोपी वैकुंठप्राप्तीची ॥ ४ ॥

॥ ९०२ ॥ मुक्ति येती धांवोनियां । प्रीतिं वरावया हरिभक्तां ॥ १ ॥ रिद्धी सिद्धी वोळगे येती । समागम इच्छिती पुरुपार्थ ॥ २ ॥ शांति क्षमा दया सिद्धी । सारिती उपाधी येऊनियां ॥ ३ ॥ निळा म्हणे निरहंकृती । न ढळे परती नैराश्य ॥ ४ ॥

॥ ९०३ ॥ हरिच्या भजनें हरिचे भक्त । झाले विख्यात भूमंडळीं ॥ १ ॥

तरोनी आपण तारिलें आणिकां । वैकुंठनायका प्रिय झाले ॥ २ ॥ ज्यांचे ध्यानीं मनीं हरी । राहिला निरंतरी दृष्टिपुढें ॥ ३ ॥ निळा ह्मणे अवघे चि सांग । केले उभय भोग भोगुनियां ॥ ४ ॥

॥ ९०४ ॥ सांपडली हे सुगम वाट । हरिचिया पाठ नामाचा ॥ १ ॥ ब्रह्मानंदें करिती घोष । कीर्तनीं उल्हास नित्यानी ॥ २ ॥ हरिचिया प्रेमें रंगोनियां गेले । देहींचे विसरले देहभाव ॥ ३ ॥ निळा ह्मणे जिंकोनि काळा । भोगिती सोहळा वैकुंठींचा ॥ ४ ॥

॥ ९०५ ॥ पुण्यपावन त्यांची वाणी । जगदोद्धरणीं प्रवर्तली ॥ १ ॥ सद्विवेक अमृतपूर । चालती उद्गार वाचे ते ॥ २ ॥ भगवद्भजन परमार्थ वाणी । जे वेदीं पुराणीं बहु मान्य ॥ ३ ॥ निळा ह्मणे अद्भुत रस । गोड सारांश हितकर्ता ॥ ४ ॥

॥ ९०६ ॥ ऐकतां श्रवणीं परमानंद । उपमर्दे कंद मायेचा ॥ १ ॥ घोषगजरें गर्जे वाचा । जो श्रुतिशास्त्राचा गुह्यार्थ ॥ २ ॥ परम रसाळ मधुराक्षरें । चालती सुस्वरें हरिभजनें ॥ ३ ॥ निळा ह्मणे सुमंगळ । ऐश्वर्य कल्लोळ प्रेमाचे ॥ ४ ॥

॥ ९०७ ॥ घडो त्याचा समागम । ज्याचें प्रेम विठ्ठलीं ॥ १ ॥ सहज त्याच्या ऐकतां गोठी । परमार्थ पोटीं दृढावे ॥ २ ॥ अनुतापासी दुणीव चढे । वैराग्य वाढे चढोवढी ॥ ३ ॥ निळा ह्मणे वाढे भाव । संचरे स्वानुभव निजांगीं ॥ ४ ॥

॥ ९०८ ॥ हरिचिया भजनें हरिचे जन । करिती पावन पतितांसी ॥१॥ ऐसा त्यांचा अगाध महिमा । निरुपमा तो न वर्णवे ॥ २ ॥ देऊनियां परमार्थ सिद्धी । पावविती पदीं श्रीहरिच्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे सत्संगसुख । गणितां अधिक परमामृता ॥ ४ ॥

॥ ९०९ ॥ अलभ्य लाभ ते सत्संगती । घरासी चि येती चोजवित ॥ १ ॥ ज्याचे ध्यानीं मनीं देव । राहिला राव पंढरीचा ॥ २ ॥ त्याहुनि अधिक आहे कोण । काळहि आपण सेवा करी ॥ ३ ॥ निळा ह्मणे तिष्ठती द्वारीं । होउनी कामारी रिद्धी सिद्धी ॥ ४ ॥

॥ ९१० ॥ नित्यानंदाचिया घरा । विवेक पैल तीरा पावविती ॥ १ ॥

ते चि सद्गुरु संतजन । निजात्मज्ञान फळ दाते ॥ २ ॥ वदनीं वसविली वेदोनिती । स्वधर्म स्थापिती सकळांचे ॥ ३ ॥ निळा ह्मणे नेती धामा । वैकुंठग्रामा विश्रांती ॥ ४ ॥

॥ ९११ ॥ संता ऐसा उदार एक । त्रैलोक्यनायक श्रीविठ्ठल ॥ १ ॥ आणिखी न ये तुळणे दुजा । धुंडितां समाजा त्रिभुवनीं ॥ २ ॥ ज्याचिया वचनें भवसिंधु नुरे । माया भुर रे दूरी पळे ॥ ३ ॥ निळा ह्मणे सगुणावतार । ते चि परात्पर श्रीहरिचे ॥ ४ ॥

॥ ९१२ ॥ वहुत भाग्यें भूखंडळा । आले सकळां उद्धराया ॥ १ ॥ वर्तोनियां दाविती लोकां । पाविती परिपाका आणिकांही ॥ २ ॥ सहज त्यांचा क्रीडा खेळ । हा चि मंगळ सुखकर्ता ॥ ३ ॥ निळा ह्मणे हें महीतळ । ज्यांचिया अढळ धर्म क्रिया ॥ ४ ॥

॥ ९१३ ॥ हरिभक्तीच्या जाणोनी नीति । त्या चि उपदेशिती भाविकां ॥ १ ॥ पडों नेदिती अडचणी गोवा । जातां देवा भेटिसी ॥ २ ॥ वैसउनियां सुखासनीं । पावविती धानीं वैकुंठा ॥ ३ ॥ निळा ह्मणे देउनी संग । ठेविती अभंग हरिपदीं ॥ ४ ॥

॥ ९१४ ॥ सारुनी अवघीं च मतांतरें । जे लटिक्यासी खरें मानिती ॥ १ ॥ एक चि दृढाविती भावो । जेणें देवो जोडे तो ॥ २ ॥ सत्य भजन सत्य भक्ती । सत्य चि वोधिती परमार्थ ॥ ३ ॥ निळा ह्मणे एका चि वचनीं । ब्रह्मसनातनीं भेळविती ॥ ४ ॥

॥ ९१५ ॥ धन्य त्याचा शुद्ध भावो । आराधीला देवो पंढरिचा ॥ १ ॥ धन्य त्याचें जन्मकर्म । गाईलें नाम विठोबाचें ॥ २ ॥ धन्य त्याची देहक्रिया । आन उपाया नातळती ॥ ३ ॥ निळा ह्मणे धन्य झाले । जे या गेले शरण हरी ॥ ४ ॥

॥ ९१६ ॥ कल्पनातीत झालें मन । जैसें गगन निरभ्र ॥ १ ॥ ह्मणोनियां ऐक्या आलें । स्वरूपीं ठेलें निश्चळ ॥ २ ॥ नित्यानंदें झाली तृप्ती । देखतां भूतीं भगवंत ॥ ३ ॥ निळा म्हणे जडलें पदीं । निरावधी विठ्ठलीं ॥ ४ ॥

॥ ९१७ ॥ भोळा देव दाखविला । आम्हां केला सन्मुख ॥ १ ॥ पंढ-

रिये ईटेवरी । उभा द्वारीं पुंडलिका ॥ २ ॥ संतीं केला परोपकार । आम्हां उद्धार दीनांचा ॥ ३ ॥ निळा म्हणे जवळी नेलें । हातीं दिलें निरउनी ॥ ४ ॥

॥ ९१८ ॥ न हों अविश्वासी तैसे । अधम जैसे कृतघ्न ॥ १ ॥ केले उपकार ते संतीं । आठवूं चित्तीं प्रीतीनें ॥ २ ॥ ते चि करिती साभिमानें । सत्य वचनें आपुलीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे न सांडूं वाट । दाविली नीट संतीं ते ॥ ४ ॥

॥ ९१९ ॥ शोधुनियां आले संत । हिताहित जगाचें ॥ १ ॥ ते चि वचनें अनुवादती । सकळां नीति प्रमाणें ॥ २ ॥ सत्यासत्य ठावें तयां । पाहोनियां ठेविलें ॥ ३ ॥ निळा म्हणे गुंता गोवा । कांहीं चि जिवा न करिती ॥ ४ ॥

॥ ९२० ॥ उत्तीर्ण त्याचें नव्हिजे आतां । जीव हि अर्पितां थोडा चि ॥ १ ॥ ओंवाळुनी सांडूं काया । वरुनी पायां संतांच्या ॥ २ ॥ मायबापा काय द्यावें । कैसें व्हावें उतराई ॥ ३ ॥ निळा म्हणे ज्याची कृपा । जन्म खेपा निवारी ॥ ४ ॥

॥ ९२१ ॥ ज्यांचीं वचनें ऐके देव । पंढरिराव प्रीतीनें ॥ १ ॥ भेटविती भेटे तया । पसरूनियां निज कर ॥ २ ॥ जें जें तया वाटे गोड । तें तें कोड पुरउनी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जवळी राहे । त्यांची पाहे निज वास ॥ ४ ॥

॥ ९२२ ॥ दृढ विश्वासें हरिसी भजतां । सायोज्यता पावले ॥ १ ॥ ऐसे भक्त नेणों किती । झाले वानिती पुराणें ॥ २ ॥ जिहीं केलें पिंडदान । पदीं मन प्राणेंसी ॥ ३ ॥ निळा म्हणे त्यांची कीर्ति । संतहि गाती कीर्तनीं ॥ ४ ॥

॥ ९२३ ॥ भवसिंधु त्यां पायवाट । माया घाट उतरले ॥ १ ॥ गर्जत विठोबाच्या नामें । गेले व्योमें निज पंथें ॥ २ ॥ परब्रह्मा वरावरी । भेटले हरि विश्वात्मया ॥ ३ ॥ निळा म्हणे जोडलीं पदें । ब्रह्मानंदें डुल्लती ॥ ४ ॥

॥ ९२४ ॥ नामचिंतनें जडली प्रीति । भगवद्भावना सर्व भूतीं ॥ १ ॥ हें चि परमार्थी साधनें । मुखीं नाम हृदयीं ध्यान ॥ २ ॥ विषयभोगीं

विलोभता । मोह न बाधी त्या ममता ॥ ३ ॥ निळा म्हणे निज ध्यासें । झाले मुक्त शुका ऐसे ॥ ४ ॥

॥ ९२५ ॥ मी चि माझा विस्मय करीं । नवल परि देखोनी ॥ १ ॥ कैसीं येणें पांडुरंगें । अंगीं अंगें लपविलीं ॥ २ ॥ पळही मात्र विसर देहीं । न पडे चि ठायीं व्यापियलें ॥ ३ ॥ निळा म्हणे नाम वाचे । गुण त्याचे आठवती ॥ ४ ॥

॥ ९२६ ॥ कैंची आतां जिवा उरी । आंत बाहेरी कोंदला ॥ १ ॥ नेदी पडों कोठें उणें । वाचा करणें चाळितु ॥ २ ॥ भोग भोक्ता आपण झाला । वाटुनी प्याला अभिमाना ॥ ३ ॥ निळा नामें रूपें नाहीं । भासे देहीं विठ्ठल ॥ ४ ॥

॥ ९२७ ॥ अवघ्या अंगें अवघे झालों । अवघे चि ल्यालों अळंकार ॥ १ ॥ अवघ्या ठायीं अवघ्या देहीं । अवघ्यां नाहीं वेगळा ॥ २ ॥ अवघ्यां जवळी अवघ्यां दुरी । अवघ्यां परि सारिखा ॥ ३ ॥ अवघा निळा अवघ्यां संगें । अवघ्या रंगे रंगला ॥ ४ ॥

॥ ९२८ ॥ संतांचिया समागमें । गाऊं नामें आवडी ॥ १ ॥ काय आमचें करील काळ । कळीचे मळ नातळतां ॥ २ ॥ हरिच्या नामें शुचिर्भूत । वाचा पुनीत करचरण ॥ ३ ॥ निळा ह्मणे घडी घडी । करूं हे जोडी नित्य नवी ॥ ४ ॥

॥ ९२९ ॥ अपार संत झाले क्षिती । ऐकिले ऐकाल पुढेंही होती ॥ १ ॥ जे जे झाले हरिचे दास । करितां कीर्तनें सांडुनी आस ॥ २ ॥ दर्शनें मुक्ति आणिकां देती । उद्दंड पावन केल्या याती ॥ ३ ॥ निळा ह्मणे सनकादिक । आदि करुनी अनामिक ॥ ४ ॥

॥ ९३० ॥ पशु पक्षी श्वापद याती । भृंग पतंग कीटक जाती ॥ १ ॥ हरितें भजतां हरिरूप झालीं । निजानंदीं निमग्न ठेलीं ॥ २ ॥ दैत्य दानव निशाचर । मानव याती नारीनर ॥ ३ ॥ निळा ह्मणे भजतां हरी । अगाधपणें पावले थोरी ॥ ४ ॥

॥ ९३१ ॥ एक एकाहुनी आगळे । ओंविले संत कंठमाळे ॥ १ ॥ नेणों विराजलेती हरि । प्रभा फांकली दिगांतवरी ॥ २ ॥ संत चरित्रें सुंदरें ।

परिधान केलीं दिव्यांबरें ॥ ३ ॥ संतनामें निळा ह्मणे । मुगुट कुंडलें करकंकणें ॥ ४ ॥

॥ ९३२ ॥ पुरातन मी शरणांगत । आहें स्थापित सद्गुरुचा ॥ १ ॥ ह्मणोनि संत पाळिती मातें । देउनी भातें प्रेमरस ॥ २ ॥ जेउनी उरला प्रसाद देती । निकट बैसविती जवळीकें ॥ ३ ॥ निळा ह्मणे क्षणक्षणा । देती स्मरणा श्रीहरिच्या ॥ ४ ॥

॥ ९३३ ॥ मस्तक माझा पायांवरी । राहो निरंतरी संतांच्या ॥ १ ॥ इतुलेन मी कृतकृत्य । होईन निश्चित संसारीं ॥ २ ॥ धरिलया जन्माचें सार्थक । भवभयमोचक साधन हें ॥ ३ ॥ निळा ह्मणे नलगे फार । करणें विचार यावरी ॥ ४ ॥

॥ ९३४ ॥ एक चि आशीर्वाद देती । जरि अवलोकिती कृपेनें ॥ १ ॥ तरि त्या पाववितो पदा । जेथें सर्वदा रमती मुनी ॥ २ ॥ निश्चयाचें देणें त्याचें । हरिती जीवाचें जीवपण ॥ ३ ॥ निळा ह्मणे अगाध वाचा । संत वरदाचा महिमा हा ॥ ४ ॥

॥ ९३५ ॥ पावले ते झाले सुखी । ज्यांची वोळखी संतचरणीं ॥ १ ॥ कीटक पतंग पशुयाती । मानस सत्संगती उद्धरले ॥ २ ॥ जिहीं विश्वास धरिला पायीं । तरले ते डोहीं भवाब्धीच्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे निर्वाणरूप । पावले स्वरूप श्रीहरिचें ॥ ४ ॥

॥ ९३६ ॥ नामधारक हरिचे दास । करिती नाश पापाचा ॥ १ ॥ वसती त्यांच्या सहवासें ते । होताती सरते वैकुंठीं ॥ २ ॥ यमधर्म लागती पायां । लोकत्रया माजी धन्य ॥ ३ ॥ निळा ह्मणे हरिहर देव । करिती राणीव त्याच्या घरीं ॥ ४ ॥

॥ ९३७ ॥ धन्य काळ आजिचा दिवस । हरिचे दास भेटले ॥ १ ॥ दंडवत घालीन पायां । करीन काया कुरवंडी ॥ २ ॥ पाप ताप दैन्य गेलें । येथुनी पाउलें देखतां ॥ ३ ॥ निळा ह्मणे पावलों फळ । केलिया निर्मळ सुकृतातें ॥ ४ ॥

॥ ९३८ ॥ संतसंगें हरे पाप । संतसंगें निरसे ताप ॥ संतसंगें निर्विकल्प । होय मानस निश्चळ ॥ १ ॥ संतसंगें वैराग्य घडे । संतसंगें विरक्ती जोडे ॥

संतसंगें निज शांती वाढे । साधन हृदयीं अखंडित ॥ २ ॥ संतसंगें हरिची भक्ति । संतसंगें ज्ञान विरक्ति ॥ संतसंगें भुक्ति मुक्ति । साधका वरिती अनायासें ॥ ३ ॥ निळा ह्मणे साधुसंग । महाभाग्याचें हें भाग्य ॥ सेविती ते स्वरूप चांग । पावती आत्मया श्रीहरिचें ॥ ४ ॥

॥ ९३९ ॥ ब्रह्म संपत्ती वरी तया । आवडे जया संतसंग ॥ १ ॥ त्रिकाळज्ञानी होय तो नर । आत्म साक्षात्कार भोग प्राप्ती ॥ २ ॥ शांती दया क्षमा सिद्धी । बोलतां समाधी चालतां त्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे एवढा लाभ । जोडे त्या स्वयंभ भाग्यवंता ॥ ४ ॥

॥ ९४० ॥ अढळ वैराग्य प्रगटे अंगीं । बसतां संगीं संतांचिया ॥ १ ॥ दिव्य भोगीं विटे मन । मृत्तिकेसमान सोनें रुपें ॥ २ ॥ परमामृतीं नाहीं चाड । अप्सरा दुवाड वाटती त्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे इह लोकींचे । भोग ते साचे वमनापरि ॥ ४ ॥

॥ ९४१ ॥ सद्गुरुकृपा वोळली तयां । जे पंढरिराया अनुसरले ॥ १ ॥ भक्ति ज्ञान वैराग्यशिळ । शांती अढळ निर्वैरता ॥ २ ॥ भूतदया मानसीं वसे । मातले प्रेमरसें गर्जती ॥ ३ ॥ निळा ह्मणे हृदयीं ध्यान । मुखीं नामचिंतन अहर्निशी ॥ ४ ॥

॥ ९४२ ॥ कृपा केली संतजनीं । लाविलों भजनीं श्रीहरिच्या ॥ १ ॥ नाहीं तरी जातों वायां । लक्ष भोगावया चौऱ्यायसी ॥ २ ॥ आणिका साधनीं गुंता चि पडता । अभिमान वाढता नित्य नवा ॥ ३ ॥ निळा ह्मणे धांवणें केलें । सुपंथें लाविलें नीट वाटे ॥ ४ ॥

॥ ९४३ ॥ बरें झालें शरण गेलों । संतीं लाविलों निज सोई ॥ १ ॥ म्हणती पंढरपुरींचा हाट । करीं बोभाट हरिनामें ॥ २ ॥ येईल तो वरावरी । धरील श्रीहरी हृदयेंसी ॥ ३ ॥ निळा म्हणे एके चि खेपे । खंडती पापें सकळही ॥ ४ ॥

॥ ९४४ ॥ ऐसा संतांचा उपकार । काय मी पामर आठवूं ॥ १ ॥ करूनियां अनुमोदन । दिधलें वचन अभयाचें ॥ २ ॥ ह्मणती करीं नामपाठ । न करीं खटपट याविण ॥ ३ ॥ निळा ह्मणे कृपावंत । करील सनाथ श्रीहरी ॥ ४ ॥

॥ ९४५ ॥ सुरवर इच्छा करिती सांची । नित्य हरिभक्तांची भेटावया ॥ १ ॥ ह्मणती धन्य हरिचे दास । सर्वदां उदास देहभावीं ॥ २ ॥ दर्शनें यांच्या सर्वही सिद्धी । तुटती उपाधी जन्ममरणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे वैकुंठवासी । रंगला प्रेमासीं यांचिया ॥ ४ ॥

॥ ९४६ ॥ ह्मणोनियां संतजना । देती आलिंगना पूजिती ॥ १ ॥ यांचिया मुखें ऐकती कथा । मानिती परमार्था फळ आलें ॥ २ ॥ ह्मणती आजी धन्य झालों । प्रसाद पावलों संतांचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे उत्साह देवा । मानला वैभवा देखोनियां ॥ ४ ॥

॥ ९४७ ॥ उदार संत उदार संत । जया तैसा हेत पुरविती ॥ १ ॥ अपार देणें अपार देणें । पावती पेणें वैकुंठींचें ॥ २ ॥ न सरे ऐसें न सरे ऐसें । देती सहवासें निजात्मसुख ॥ ३ ॥ निळा ह्मणे यांचिये पायीं । निज वस्ती देई देवा मज ॥ ४ ॥

॥ ९४८ ॥ पूर्ण केला पूर्ण केला । पूर्ण केला मनोरथ ॥ १ ॥ घरा आले घरा आले । घरा आले कृपाळु ॥ २ ॥ सांभाळिलें सांभाळिलें । सांभाळिलें अनाथा ॥ ३ ॥ केला निळा केला निळा । केला निळा पावन ॥ ४ ॥

॥ ९४९ ॥ अंतरींचा जाणती हेत । कृपावंत मग होती ॥ १ ॥ सर्व जाण सर्व जाण । संत निपुण ये अर्थी ॥ २ ॥ देखोनियां आर्तिकांसी । करिती त्यांसी निज बोध ॥ ३ ॥ निळा ह्मणे विठ्ठल मंत्रीं । देती श्रोत्रीं उपदेश ॥ ४ ॥

॥ ९५० ॥ भाव भक्ती भाग्यवंत । तयां संत भेटती ॥ १ ॥ येर ते भाग्यें जाती वायां । न भजतां पायां संतांच्या ॥ २ ॥ वचनीं यांचे विश्वास धरिती । धन्य ते होती उभय लोकीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे या सज्जनापायीं । जीवभाव जिहीं समर्पिला ॥ ४ ॥

॥ ९५१ ॥ संतकृपा त्यांसी चि फळे । ज्यांचें चित्त वोळे परमार्थी ॥ १ ॥ काय उणें सुखा मग । संतसंग जोडतां ॥ २ ॥ देव चि हातीं लागे तयां । संत जयां प्रसन्न ॥ ३ ॥ निळा ह्मणे संतांपासीं । आहे अनायासीं सर्व सिद्धी ॥ ४ ॥

॥ ९५२ ॥ संत वारें आलें वरी । चराचरीं तो धन्य ॥ १ ॥ संत सेवा

घडली ज्यासी । प्रसन्न त्यासी देव सकळ ॥ २ ॥ संतवचनीं विश्वासला । पूज्य तो झाला त्रिभुवनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे संतभेटी । निरसन कोटी संदेहां ॥ ४ ॥

॥ ९५३ ॥ रंगले ते संतसंगें । झाले अंगें शुद्ध बुद्ध ॥ १ ॥ देव चि संत देव चि संत । आणिकांहीं करित देव चि ते ॥ २ ॥ कैंचें तेथें व्यवधान । ब्रह्म सनातन पाववितां ॥ ३ ॥ निळा ह्मणे न लभे देवा । आणिती भावा त्या संत ॥ ४ ॥

॥ ९५४ ॥ उभारुनी बाहो ध्वज । सांगती पैज घेउनी ॥ १ ॥ विठ्ठल ह्मणा विठ्ठल ह्मणा । कळिकाळ आंकणा मग तुह्मां ॥ २ ॥ लहानां थोरां नारीनरां । करिती हांकारा विश्वाचिया ॥ ३ ॥ निळा ह्मणे तत्वता बीज । देताती सहज निवडुनी ॥ ४ ॥

॥ ९५५ ॥ नाहीं तरि संत झकवित कोणा । थोरलहाना सारिखे चि ॥ १ ॥ नाहीं तेथें काने कोंचे । उघड्या वाचे उच्चार ॥ २ ॥ न लगे पूजनासी धन वित्त । एक चि चित्त भाव पुरे ॥ ३ ॥ निळा ह्मणे उपदेश देती । कानीं सांगती विठ्ठल ह्मणा ॥ ४ ॥

॥ ९५६ ॥ एक चि वचन मानस पायीं । ठेविलें नवाई काय सांगों ॥ १ ॥ धन्य ते संत धन्य ते संत । जाणती हृद्गत सकळांचें ॥ २ ॥ दवडुनी अभिमान देवो चि देती । आणिकांही करिती आपणासे ॥ ३ ॥ निळा ह्मणे अघटित चर्या । लागतां चि पायां पालटती ॥ ४ ॥

॥ ९५७ ॥ वर्णितां चरित्रें न पुरे धणी । वाचा लांचावली हरिच्या गुणीं ॥ स्वानंदाची उघडली खाणी । नामस्मरणीं मातली ॥ १ ॥ अधिक अधिक स्फूर्तीचा प्रसर । आगळीं अक्षरें चालती भार ॥ नेणों फुटले हे चिदांबर । मेघवृष्टी न्यायें होतसे ॥ २ ॥ आवरितांही नावरे मती । लिहितां न पुरे हे दिवसराती ॥ न कळे काय केलें संतीं । देउनी प्रसाद आपुला ॥ ३ ॥ अवघें चि उघडुनियां भांडार । दृष्टी दाविलें सारासार ॥ लेववुनियां ते अळंकार । केले समोर बोलावया ॥ ४ ॥ अक्षरें वाचे येती । ते ते प्रमयेसीचि उठती ॥ नेणों गुंफुनी ठेविलीं होतीं । ते चि प्रसादीं वोपिलीं ॥ ५ ॥ नाहीं वाचेसी गुंता गोवा । तात्पर्यार्थ चि हा अघवा ॥ ऐसा योजुनियां बरवा । मुहुर्त दिधला समर्थीं ॥ ६ ॥ निळा आईसा पिठावरी ।

रेघा ओढीत बैसला घरीं ॥ दैव मोडोनी आलें वरी । होतें संचितीं ह्मणउनी ॥ ७ ॥

॥ ९५८ ॥ भावें ओजावली भूमिका । वरी कृपाघन वोळला निका ॥ संतीं बीज दिधलें फुका । तें चि पेरिलें ते चि क्षणीं ॥ १ ॥ वाफलें ते बरावरी । कणसें दाट आल्या घुमरी ॥ पिकलें न समाये अंबरीं। चहुं कोनीं सारिखें चि ॥ २ ॥ निळा केला भाग्यवंत । सवंगीतां नावरे पीक अद्भुत ॥ राशिवा केला न लगे अंत । माप करितां नावरेसा ॥ ३ ॥ उमाणूं जातां अधिक चि वाढे । दिसों चि लागे पुढें पुढें ॥ सांजे भरलें सीग न मोडे । मोडती गाडे ओढितां ॥ ४ ॥ नवल पिकाची हे धणी । होती संतकृपेची पेरणी ॥ पुरे उरे नव्हे चि उणी । पदरीं भरुनी बैसलों ॥ ५ ॥ निळा झाला सदैव आतां । अपार लेखा चि नव्हे चित्ता ॥ सांठवूं जाणतां नेणतां । राहो भरितां उरलें तें ॥ ६ ॥

॥ ९५९ ॥ सोडोनियां चाती पोतीं । कृपा करुनी दिधलीं हातीं ॥ १ ॥ संत उदार उदार । लुटविलें निज भांडार ॥ २ ॥ होतें सायासें जोडिलें । निक्षेपीचें तें दाविलें ॥ ३ ॥ निळा ह्मणे उदारपणा । मेरु संतांच्या ठेंगणा ॥ ४ ॥

॥ ९६० ॥ न करिती चि कांहीं वाणी । देतां पुरविती आयणी ॥ १ ॥ म्हणती घ्यारे घ्या निज मुखें । अवघ्यां एक चि धन सारिखें ॥ २ ॥ नाहीं वांटितां भागले । सदासर्वदा हरिखले ॥ ३ ॥ निळा म्हणे पूर्णपणें । नेदिती पडों कोठें उणें ॥ ४ ॥

॥ ९६१ ॥ खाती आपण जें जेविती । तें चि आणिकां ही वाढिती ॥ १ ॥ आजि बहुता भाग्यें भेटी । झाली चरणीं पडली मिठी ॥ २ ॥ नाहीं चि आम्हांसी वंचिलें । निज गुज अवघें चि आपुलें ॥ ३ ॥ निळा ह्मणे कृपा-वंत । केलें अनाथा सनाथ ॥ ४ ॥

॥ ९६२ ॥ अर्थ अवघे चि याचे हातीं । जया देऊं जे बोलती ॥ १ ॥ तों ते तात्काळ चि पावले । जगामाजी धन्य झाले ॥ २ ॥ नाहीं चि वेळ काळ गुंती । देतां रंक थोर नेणती ॥ ३ ॥ निळा म्हणे अवलोकनें । तोडिती भवाचीं बंधनें ॥ ४ ॥

॥ ९६३ ॥ ते चि भक्त भागवत । संतसेवे जे निरत ॥ १ ॥ शुद्ध त्यांचा भक्तिभावो । संत वरदें लाभे देवो ॥ २ ॥ संतवचनीं विश्वासती । सत्य परमार्थ त्यांचे हातीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे संतसेवा । घडे त्या उदयो झाला देवा ॥ ४ ॥

॥ ९६४ ॥ संतीं जयां हातीं धरिलें । ब्रह्मसनातन ते पावले ॥ १ ॥ आणिकां दुर्लभ जें साधनें । यांच्या प्राप्त अवलोकनें ॥ २ ॥ फळ अनापेक्ष पावती । प्राणियांचिये संगती ॥ ३ ॥ निळा ह्मणे कल्पतरु । सामान्य दाते हे ईश्वरु ॥ ४ ॥

॥ ९६५ ॥ संतीं केला अंगीकार । मज हा निर्धार वाणला ॥ १ ॥ त्यांचिया बोलें अभयदानें । निःशंक वचनें हीं ऐसीं ॥ २ ॥ नाहीं कोठें गोवागुंती । अक्षरें चालती गुंफिलीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे सत्यासाठीं । जाणती चावटी माझी ते ॥ ४ ॥

॥ ९६६ ॥ संतीं ठेविलें निश्चळ ठायीं । चित्त हें पायीं आपुलीये ॥ १ ॥ तेणें समाधान वृत्ती । नव्हे चि स्थिती पालट ॥ २ ॥ अखंडता राहिलें ध्यान । होउनी उन्मन मनाचें ॥ ३ ॥ निळा ह्मणे कृपा केली । जाणों आली या अर्थें ॥ ४ ॥

॥ ९६७ ॥ अवलोकिलें कृपादृष्टी । केली वृष्टि वचनामृतें ॥ १ ॥ अंकुरले भाववीज । कारण निज अंतरींचें ॥ २ ॥ संतांची हे सहज स्थिती । आठव देती स्मरणाचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे धांवोनि येती । आणि उपदेशिती निज गुह्य ॥ ४ ॥

॥ ९६८ ॥ आपण चि ते येती घरा । देखोनि बरा निज भाव ॥ १ ॥ आप्तपणें आलिंगिती । मनींचा पुरविती हेत सकळ ॥ २ ॥ अनाथ अनन्य देखोनी रंक । करिती कौतुक खेळविती ॥ ३ ॥ निळा म्हणे लाविती सेवे । आपुलिया वैभवें गौरविती ॥ ४ ॥

॥ ९६९ ॥ चोजवीत घरा येती । ज्याचा देखती शुद्ध भाव ॥ १ ॥ ऐसे करुणाघन हे संत । करिती हेत परिपूर्ण ॥ २ ॥ पाचारुनियां हृदयीं धरिती । निकट बैसविती जवळी त्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे अनुभव झाला । तो चि दाविला बोलोनी ॥ ४ ॥

॥ ९७० ॥ मी तों संतांचें पोसणें । देती समर्थी तें चि खाणें ॥ १ ॥ अवघी चुकली जाचणी । उण्या पुऱ्याची सोसणी ॥ २ ॥ करूं सांगितलें काज । चिंता दवडुनीयां लाज ॥ ३ ॥ निळा ह्मणे फिटली खंती । जिणें मरणें सांचे हातीं ॥ ४ ॥

॥ ९७१ ॥ मस्तक माझा पायांवरी । या वारकरी संतांच्या ॥ १ ॥ प्रतिवर्षी पंढरपुरा । जाती महाद्वारा हरिभेटी ॥ २ ॥ भेटी त्यांची इच्छी मन । करिती कीर्तन अनुदिनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे लोटांगण । घालित जाईन सामोरा ॥ ४ ॥

॥ ९७२ ॥ एवढा मनिंचा पुरवा हेत । पंढरिनाथ भेटवा ॥ १ ॥ मग मी तुमच्या न सोडीं पायां । करीन काया कुरवंडी ॥ २ ॥ कृपासिंधु तुह्मी संत । पुरवा आर्त हें माझें ॥ ३ ॥ निळा ह्मणे झालों दास । नका उदास धरूं आतां ॥ ४ ॥

॥ ९७३ ॥ तुमच्या पायीं ठेविलें मन । एवढें चि धन मजपाशीं ॥ १ ॥ जरि हा देव दाखवाल । अभय द्याल वचनाचें ॥ २ ॥ तरि हा प्राण ओंवाळीन । जिवें चरण न सोडीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे कृपा करा । यावरि धरा मज हातीं ॥ ४ ॥

॥ ९७४ ॥ जाणोनियां मनोगत । ठेवा हात मस्तकीं ॥ १ ॥ करा माझें समाधान । देउनी वचन अभयाचें ॥ २ ॥ आहे देवा तुम्हां हातीं । उगऊं गुंती जाणतां ॥ ३ ॥ निळा ह्मणे वचनाधीन । नारायण तुमचिया ॥ ४ ॥

॥ ९७५ ॥ भेटवाल पढंरिनाथ । तुह्मी चि संत कृपाळु ॥ १ ॥ ह्मणोनि येतों काकुळती । पुढतोपुढतीं कींव भाकीं ॥ २ ॥ इतरांची मी न करीं आस । झालों दास तुमचा चि ॥ ३ ॥ निळा ह्मणे ठेवा पायीं । यावरि कायी विनवूं मी ॥ ४ ॥

॥ ९७६ ॥ जाणतसां जरी अंतरींचें । तरि कां हो वाचे वदवितां ॥ १ ॥ केविल्वाणे तुमचे दास । देखतां उपहास होतील ॥ २ ॥ जग निंद्य आधीं करा । मग तुह्मी धरा निज करीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐशी रीत । नाहीं चि शोभत संतांसीं ॥ ४ ॥

॥ ९७७ ॥ आणिका ते ही विठ्ठल करिती । लागले संगती भाविक सा

॥ १ ॥ यांचा वारा लागेल ज्यासी । येती त्यासी मुक्तीही वरूं ॥ २ ॥ घडतां त्यांचें अवलोकन । होती पावन महा पापी ॥ ३ ॥ निळा ह्मणे त्यांची भेटी । ते चि गांठी विठ्ठलेसी ॥ ४ ॥

॥ ९७८ ॥ उत्तम संचित होतें गांठीं । तेणें चि या भेटी संतांसवें ॥ १ ॥ सुकृतासी आलीं फळें । भावबळें लगटोनी ॥ २ ॥ त्याच्या भाग्या आले भाग्यें । लाधले संग संतांचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे पूर्णते आले । जिहीं या सेविलें संतचरणा ॥ ४ ॥

## बोधपर अभंग.

॥ ९७९ ॥ नको बोलों शब्द वावगे विवाद । आठवा गोविंद ध्यानीं मनीं ॥ १ ॥ सकळही तुमचें होईल कल्याण । जरि या गाल गुण विठोबाचे ॥ २ ॥ लटिका चि वडिवार बोलों जाल वाचा । तरि होईल काळाचा अति क्रोध ॥ ३ ॥ निळा ह्मणे पहा विचारुनी दृष्टी । धरा हित पोटीं होईल तें ॥ ४ ॥

॥ ९८० ॥ सांगेन तें हित धरा अवघे मनीं । नका मानूं कोणी विट याचा ॥ १ ॥ बरें शिकवितां बरें तें मानावें । वाईटा त्यागावें त्यागवितां ॥ २ ॥ पुढें सुख विश्रांती मागें राहे कीर्ति । ऐसिया पद्धति संतांचिया ॥ ३ ॥ निळा ह्मणे देवें बोलविलें बोल । घ्याल ते ते व्हाल सुखीअर्थ ॥ ४ ॥

॥ ९८१ ॥ परस्त्रीसंगें घडती दोष । बुडे वंश पापें त्या ॥ १ ॥ यमधर्म घाली बंदीं । नव्हे कधीं सुटिकासी ॥ २ ॥ पूर्वज अधःपतना जाती । मग ते शापिती अति क्रोधें ॥ ३ ॥ निळा ह्मणे पातित्य ऐसें । वरी संग दोषें परस्त्रीच्या ॥ ४ ॥

॥ ९८२ ॥ पापें पूर्वज नरका जाती । पापें चि बुडती धर्म सकळ ॥ १ ॥ पापें चि कुळ भंगा जाय । वंशासी होय अपघात ॥ २ ॥ पापें चि यश कीर्ति पळे । पापें चि सोहळे दरिद्राचे ॥ ३ ॥ निळा ह्मणे घडतां पापें चि पतनीं । पतडी यातनीं पूर्वजेसी ॥ ४ ॥

॥ ९८३ ॥ पाप तया नांव परदारा गमन । पाप तें परधन अपहार ॥ १ ॥ पाप तेंचि निंदा परपीडा द्वेष । पाप तें चि उपहास पुढिलांचे ॥ २ ॥ पाप तेंचि जीवीं विषयाची आसक्ति । पाप तें अभक्ति कुळाचारी ॥ ३ ॥ निळा ह्मणे पाप मुख्य तें चि साचें । नावडे देवाचें नाम मुखीं ॥ ४ ॥

॥ ९८४ ॥ किंचित् सुख आगळें दुःख । पावती अवश्यक व्यभिचारी ॥ १ ॥ क्षयो व्याधी भगें पडती । जगनिंद्य होती हे आधीं ॥ २ ॥ पुढें राजा दंड करी । सर्वस्व हरी देखतां ॥ ३ ॥ निळा म्हणे हांसती लोक । थुंकिती थुंक तोंडावरी ॥ ४ ॥

॥ ९८५ ॥ भीड भाड जाय उडोनी लौकिक । शेवटींचा रंक तोही दापी ॥ १ ॥ दावितां तो तोंड लाजे भरले सभे । मग वाळे उभें सल चि जैसें ॥ २ ॥ सुहृद जन ते अवमान करिती । निष्ठुर बोलती त्रासवचनें ॥ ३ ॥ निळा ह्मणे मग होय दैन्यवाणें । हो काय तैसें जिणें भूमिभार ॥ ४ ॥

॥ ९८६ ॥ आहारे काय जोडी केली । नर्कासी धाडिलीं उभय कुळें ॥ १ ॥ उपजतां तुज संतोषले सर्व । बुडविलें नांव त्यांचें ही त्वां ॥ २ ॥ असत्याची वाचे सदा राबणुक । चोरी सिनळिक न संडसी ॥ ३ ॥ निळा ह्मणे वृथा हाहाभूत जन्म । केला ऐसें अकर्म आचरोनी ॥ ४ ॥

॥ ९८७ ॥ पापासवें जिणें ज्याचें । वृथा चि त्याचें झालेपण ॥ १ ॥ भोगितां भोग रडे मग । ह्मणे मी जगनिंद्य झालों ॥ २ ॥ सांगतां हित नाहीं ऐकिलें । वडिलीं दाविलें विहित तें ॥ ३ ॥ निळा ह्मणे आतां पडियेला खोळे । गिळीयेला काळें व्याधी सर्पें ॥ ४ ॥

॥ ९८८ ॥ अभीशापासीं कारण । मुख्य संभाषण परस्त्रीचें ॥ १ ॥ सहज एकांतीं बोलूं जातां । उपजे विकल्पता सकळांसी ॥ २ ॥ मग तें अपघातासीं मूळ । करी तात्काळ नावरत ॥ ३ ॥ निळा ह्मणे प्रमादी ऐसी । प्रमदेपासीं अखंड ॥ ४ ॥

॥ ९८९ ॥ बाप बंधु वेगळा करुनी । इतरां लागुनी बाधक ॥ १ ॥ ह्मणोनि परांगनेसवें । सलगी नव जावें एकांतीं ॥ २ ॥ जरी उदंड दंडक झाला । तरी तो त्याला नाडक चि ॥ ३ ॥ निळा ह्मणे ते विकल्पखाणी । प्रमदा सज्जनीं वाळावी ॥ ४ ॥

॥ ९९० ॥ जरी झाला तपस्वी थोर । तरी असावें दूर परस्त्रीसी ॥ १ ॥ गुरुनींही एकांतासी । नव जावें स्त्रियांसीं उपदेशा ॥ २ ॥ वसतां एकत्र आनोविन । होईल जघन्य निमीषें ॥ ३ ॥ निळा ह्मणे जतन करा । शाहाणे विचारा ऐसें आतां ॥ ४ ॥

॥ ९९१ ॥ याचिलागीं परांगना । मानिती हुताशनापरी ज्ञाते ॥ १ ॥ जवळी गेल्या जाळूं शके । ह्मणोनि धाकें पळती त्या ॥ २ ॥ आधीं तों न करिती संभापण । मा एकांत दर्शन कैंचें त्यां ॥ ३ ॥ निळा ह्मणे शुचि-र्भूत । वसती निर्धूत जनीं वनीं ॥ ४ ॥

॥ ९९२ ॥ शहाणे ते चि परस्त्रीपाशीं । क्षणहि सहवासीं न बैसती ॥ १ ॥ येती जाती तरी ते दुरी । चौघांभीतरीं सांचिसवें ॥ २ ॥ तेथें कैंचा विकल्प वाढे । शूर ते गाढे निवडले ॥ ३ ॥ निळा ह्मणे काळासी धाक । इतरांचा लेख काय तेथें ॥ ४ ॥

॥ ९९३ ॥ इतर साधनीं उपाव । करिती ते ते आह्मां देव ॥ १ ॥ काय जाणिलें तिहीं । पडिले साधनांचे वाहीं ॥ २ ॥ कोण लाभ केसी गती । काय पावती ते अंतीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे नेणों आह्मीं । तुमच्या नामेंविण स्वामी ॥ ४ ॥

॥ ९९४ ॥ वाउग्या खटपटा । नावडती तैशा चेष्टा ॥ १ ॥ जेणें भ्रंश पावे बुद्धी । न पाववी स्वरूप सिद्धी ॥ २ ॥ घालिती घालणी । काय करूं ते बोलणी ॥ ३ ॥ निळा ह्मणे मिथ्या वाद । काय करावे ते छंद ॥ ४ ॥

॥ ९९५ ॥ एका हरिच्या नामेंविण । कली दुर्गम साधन ॥ १ ॥ ह्मणो-नियां न येती मना । करोत जैसी ज्या भावना ॥ २ ॥ आह्मां हरिभक्तां दूषण । छंदें वंद अवलक्षण ॥ ३ ॥ निळा ह्मणे नाणूं दृष्टी । ऐसी अभागी करंटीं ॥ ४ ॥

॥ ९९६ ॥ घेऊनियां कृत्रिम सोंगें । नानापरिच्या नटती रंगें ॥ १ ॥ आपण बुडोनियां बुडविती । लावुनि आणिकांही संगती ॥ २ ॥ जाउनि एकांतीं बैसणें । करूनी चावटी बोलणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे उपदेशिती । विषय आत्मरूप शिष्यांप्रती ॥ ४ ॥

जे या दूपिती नामासी । कृत्रिम करिती उपदेशासी ॥ २ ॥ सांगती पाखांड । बोल बोलोनियां वितंड ॥ ३ ॥ निळा ह्मणे जाती । घेउनी नर्का शिष्यांप्रती ॥ ४ ॥

॥ ९९८ ॥ विठ्ठल विठ्ठल वदतां वाणी । चक्रपाणी संतोषे ॥ १ ॥ ह्मणोनियां लाहो करा । अहो अवधारा अवघे ही ॥ २ ॥ येणें चि नामें वैकुंठासी । गेले पापरासी बहु मागें ॥ ३ ॥ निळा ह्मणे सांगती संत । उभवुनी हात पुराणांतरीं ॥ ४ ॥

॥ ९९९ ॥ येणें चि साधनें । तुटती संसारबंधनें ॥ १ ॥ ह्मणोनियां करा लाहो । स्मरा रकुमादेवी नाहो ॥ २ ॥ येईल धांवता । धांवोनियां पाचारितां ॥ ३ ॥ निळा ह्मणे हरी । कृपावंत दीनावरी ॥ ४ ॥

॥ १००० ॥ रानीं वनीं घरीं दारीं । वसतां उच्चारीं हरिनाम ॥ १ ॥ तेणें चि माया उतरोनि घांट । पावसी वैकुंठ सहज वृत्ती ॥ २ ॥ नलगे करणें खटाटोप । करीं हा चि जप नामाचा ॥ ३ ॥ निळा म्हणे होईल ऋणी । हा चक्रपाणी तुझा मग ॥ ४ ॥

॥ १००१ ॥ होय अंतरीं पालट । करितां पाठ हरिनामें ॥ १ ॥ देवा ऐसे देव चि होती । जे या भजती विठ्ठला ॥ २ ॥ ऐसा याचा प्रताप ठसा । प्रगटे सरिसा नामजपें ॥ ३ ॥ निळा ह्मणे लटिकें नव्हे । पहा स्वानुभवें आपुलिया ॥ ४ ॥

॥ १००२ ॥ आंतु बाहेरी सर्वांपासीं । परि हा कोणासी नाढळे ॥ १ ॥ मोहियलीं मायाभ्रमें । संसार संभ्रमें ह्मणोनियां ॥ २ ॥ विस्मरणें चि हा न पडे दिठी । स्वार्थ पोटीं विषयाचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे गेलीं वांया । ऐसा पावोनियां नरदेह ॥ ४ ॥

॥ १००३ ॥ येथें येउनी केलें कायी । विठ्ठल नाहीं आठविला ॥ १ ॥ आहा रे मूढा भाग्यहीना । नेलासी पतना मोहभ्रमें ॥ २ ॥ नाहीं केली सुटिका कांहीं । ये चि प्रवाहीं पडिलासी ॥ ३ ॥ निळा ह्मणे लाहोनि हातीं । केली माती आयुष्या ॥ ४ ॥

॥ १००४ ॥ आतां तरी विचार करीं । ध्यायीं अंतरीं विठ्ठला ॥ १ ॥ नाहीं तरी व्यर्थ चि जासी । पुढें चौऱ्यायशी भोगावया ॥ २ ॥ जिणें मरणें

याहुनी दुःख । कोणतें अधिक सांग पा ॥ ३ ॥ निळा ह्मणे जरा व्याधी । नाना उपाधी दरिद्रें ॥ ४ ॥

॥ १००५ ॥ ऐशा सोसुनियां यातना । कांरे मना वीट न ये ॥ १ ॥ बुद्धिहीना मतिमंदा । किती आपदा ऊसंतिसी ॥ २ ॥ कधीं पावेल परिपाक । बुद्धि विवेका स्पर्शेल ॥ ३ ॥ निळा ह्मणे रिसा मापें । विषय संकल्पें मवितोसी ॥ ४ ॥

॥ १००६ ॥ जें जें करिसी तें तें वृथा । पंढरिनाथा न भजतां ॥ १ ॥ दिसे पुढें परी ते माया । जाईल विलया क्षणमात्रें ॥ २ ॥ पुत्र पत्नी बंधु पशु । भासे आभासु परि मिथ्या ॥ ३ ॥ निळा म्हणे वित्त गोत । नेणसी नाशवंत हे सकळ ॥ ४ ॥

॥ १००७ ॥ सुख वाटे परी हें दुःख । भोगविल नर्क परिपाकीं ॥ १ ॥ ह्मणोनियां सांडीं आशा । भजें सर्वेशा विठ्ठला ॥ २ ॥ जेणें कधीं चि न ये तुटी । लाभे कोटी कल्प जिणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे पावसी पदा । जेथें आनंदा निजवस्ती ॥ ४ ॥

॥ १००८ ॥ सांगतां आतां न वाटे खरें । भोगितां बरें जाणवेल ॥ १ ॥ तेव्हां कोणी न ये कामा । हिरोनी श्रमा घ्यावया ॥ २ ॥ यमजाच होतां दंड । न चले खंड धन देतां ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसी गती । होउनि पुढती गर्भवास ॥ ४ ॥

॥ १००९ ॥ भवसिंधु तरावया । भजावें राया पंढरिच्या ॥ १ ॥ करील तो चि तरणोपावो । दाविल ठावो निजाचा ॥ २ ॥ जेथें वाजतां नलगे वारा । दिशा अंबरा शिवों नेदी ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसिये घरीं । निजवील वोवरी पर्यंकीं ॥ ४ ॥

॥ १०१० ॥ एकलें चि यावें एकलें चि जावें । जोडिलें न ये सवें देखती सर्व ॥ १ ॥ परि या मायाभ्रमें कैसा केला गुंता । न पुरती संचिता भोगितां भोगा ॥ २ ॥ पुन्हा जन्म पुन्हा मरण चि सांगातीं । यमदंड पावती गर्भवास ॥ ३ ॥ निळा ह्मणे नये विकृति कंटाळा । टोके जेंवि काउळा वमनासाठीं ॥ ४ ॥

॥ १०११ ॥ [illegible]

देईल भिकारी । कोण सेवा त्याची करी ॥ २ ॥ जाती तया घरा । जेथें लक्ष्मीचा वारा ॥ ३ ॥ निळा ह्मणे हीना । आड टाकिली कल्पना ॥ ४ ॥

॥ १०१२ ॥ भाग्यहीन द्वाड । तया बुद्धि करी नाड ॥ १ ॥ सुख तें सन्मुख । तया तें चि भासे दुःख ॥ २ ॥ हित अनहिता वारी । देखोनियां पळे दुरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे उफराटें । प्राक्तन होऊनियां भेटे ॥ ४ ॥

॥ १०१३ ॥ नष्टा सज्जना एक चि वाट । परि अनिष्ट इष्ट फळें ॥ १ ॥ एका उत्तम वैकुंठ वास । जाणें निरयास हें एका ॥ २ ॥ जातां येतां सारिखे चि दिसती । परि ते पावती पद भिन्न ॥ ३ ॥ निळा म्हणे अचिंत्य फळ । भोगवी कपाळ ज्याचें त्या ॥ ४ ॥

॥१०१४॥ आपणा समान केलें त्यासी । धरिलें ज्यासी निज हातीं ॥१॥ ऐसा देवो कृपासिंधु । ह्मणोनि बंधु दीनांचा ॥ २ ॥ हीनत्व देखोनि भक्तां अंगीं । लाजे जगीं त्याचेनि ॥ ३ ॥ निळा म्हणे करुनी थोर । चालवी बडिवार निजांगें ॥ ४ ॥

॥ १०१५ ॥ आंवरुनियां ज्यांनीं चित्त । ठेविलें सतत हरिचरणीं ॥ १ ॥ झाली त्याची कार्यसिद्धी । तुटल्या व्याधि जन्म जरा ॥ २ ॥ एकविध भजले देवा । उतरले भव समुद्रातें ॥ ३ ॥ निळा म्हणे निश्चळ पदा । पावले गोविंदा आठवितां ॥ ४ ॥

॥ १०१६ ॥ हा चि उपाव सुगम सार । तरणें संसार जया नरा ॥ १ ॥ नाम गातां गोविंदाचें । फिटे जिवाचें जिवपण ॥ २ ॥ भुक्ति मुक्ति वोळंगे येती । अंगीं चि ठाकती दया क्षमा ॥ ३ ॥ निळा म्हणे अवघीं च सुखें । येती हरिखें चोजवित ॥ ४ ॥

॥१०१७ ॥ गुंतली ते आशा । पडिली मोहजाळ फांसा ॥ १ ॥ न देखोनियां श्रीहरी । कर्ता भोक्ता या संसारीं ॥ २ ॥ अवघी चि त्याची सत्ता । करवी करितो तत्वता ॥३॥ निळा म्हणे ऐसी । नेणोनि होती कासाविसी ॥४॥

॥ १०१८ ॥ अभिमानाच्या भुली । ज्या त्या कर्मीं लिप्त झाली ॥ १ ॥ नेणोनियां ज्ञान मूढें । भोगासक्त पुढें पुढें ॥ २ ॥ ह्मणती अंगें आम्हीं केलें । सहजें जें जें घडोनि आलें ॥ ३ ॥ निळा म्हणे मत्तें ऐसीं । गुंतलीं ते काळपाशीं ॥ ४ ॥

॥ १०१९ ॥ एकला चि हरि । नेणोनियां चराचरीं ॥ १ ॥ करिती निंदा आणि द्वेष । घेऊनियां गुणदोष ॥ २ ॥ क्षणीक पसारा । मायीक मानियेला खरा ॥ ३ ॥ निळा म्हणे गेलीं । ऐशीं च कितेकें नाडलीं ॥ ४ ॥

॥ १०२० ॥ प्रत्यक्ष जनीं जनार्दन । नेणोनियां कथी ज्ञान ॥ १ ॥ काय तैसीं ते वाच्याळें । करिती चावटी तोंडबळें ॥ २ ॥ नाहीं अंगीं हरिची भक्ति । दाविती कोरडी च विरक्ति ॥ ३ ॥ निळा म्हणे नेणतां वर्म । केलें पाठी लागे कर्म ॥ ४ ॥

॥ १०२१ ॥ कुरूप्या नांव चंद्रकळा । परि तो काळा रंग वरी ॥ १ ॥ नांवा ऐसें कर्तृत्व नाहीं । तरि तें कायी नपुंसक ॥ २ ॥ घोळण्या नांव लक्षुमण । करितें भर्जन लाह्यांचें ॥ ३ ॥ निळा म्हणे गुसळिती रवी । परि ते न दावी प्रकाश ॥ ४ ॥

॥ १०२२ ॥ अश्व पाहतां तो सोज्वळा । म्हणती निळा शुभ्रासी ॥ १ ॥ तैसें नांवापासीं काये । करणी आहे विचित्र ॥ २ ॥ केश विंचरिती फणी । तरि काय वहिणी शेषाची ॥ ३ ॥ निळा म्हणे सुगरणी । नांवें केरसुणी झाडिती ॥ ४ ॥

॥ १०२३ ॥ सांवळ्या नांव क्षीरसागर । वृथा चि मांजर गाजरीं ॥ १ ॥ काय तैसीं तें वायाणें । लटिकीं च भूषणें मिरविती ॥ २ ॥ शुभा नांवें विकती शेणी । मृगजळ पाणी काय खरें ॥ ३ ॥ निळा म्हणे पाखांड करिती । जगीं म्हणविती गोसावी ॥ ४ ॥

॥ १०२४ ॥ सांगती एक करिती एक । जोडिती पातक दुर्बुद्धी ॥ १ ॥ हिताहित न विचारिती । दुर्भरा भरिती महा पापें ॥ २ ॥ यम प्रहार होती पुढें । नेणोनियां मूढें वर्तती ॥ ३ ॥ निळा ह्मणे अंगा येईल । तेव्हां जाणवेल भोगितां ॥ ४ ॥

॥ १०२५ ॥ वाचे शब्द असत्याचे । हें चि दुर्जनाचें भांडवल ॥ १ ॥ पुढिलांतें उपहासिती । आणि मानिती संतोष ॥ २ ॥ निंदा द्वेष अहंकार । मद मत्सर वाढते. ॥ ३ ॥ निळा ह्मणे नर्का जाणें । आहे पुरश्चरणें त्याचीं हे ॥ ४ ॥

॥ १०२६ ॥ विद्यामानें गर्वताठा । धरुनी प्रतिष्ठा वाढविती ॥ १ ॥

नेणती जेणें देव हातीं । लागे ते युक्ति हारविली ॥ २ ॥ काम्यनिशिद्धीं आदर थोर । जप ते अघोर मंत्रांचे ॥ ३ ॥ निळा ह्मणे यातना थोरी । नर्की अघोरीं पडावया ॥ ४ ॥

॥ १०२७ ॥ जारण मारण स्तंभन मोहन । वशीकरण उच्चाटण आवडती ॥ १ ॥ येणें चि सिद्धी मिरविती जगीं । अशुचि अनुरागी निरंतर ॥ २ ॥ जड्या बुड्या हातीं सिरीं । ताईताभीतरीं वागविती ॥ ३ ॥ निळा ह्मणे चिरकाळ नर्की । वसावया कुंभपाकीं पुर्वजेंसी ॥ ४ ॥

॥ १०२८ ॥ सर्पे मुखीं च धरिलें विष । मानुनी पियुष अत्यादरें ॥ १ ॥ आणिका डंखुनी वधवी प्राणा । तैसी त्या दुर्जना चाहाडी गोड ॥ २ ॥ नागवूनि भलियां संतोष मानी । कैसा तो पतनीं न पडेल सांगा ॥ ३ ॥ निळा ह्मणे जें जोडिलें सायासें । तें चि तया हि ऐसें भोगणें पुढें ॥ ४ ॥

॥ १०२९ ॥ दुर्जन तो चि पुढीलांचें सुख । देखोनियां दुःख मानी जिवीं ॥ १ ॥ तापल्या तेलीं पडतां चि सीतळ । जैसा उठी ज्वाळ भडका करी ॥ २ ॥ पुढिलांचे उत्तम गुण । ऐकोनियां उत्थापन करूं धांवे ॥ ३ ॥ निळा ह्मणे यातना त्यासी । केंवि नर्कवासी नव्हती सांगा ॥ ४ ॥

॥ १०३० ॥ विंचु नांगी विष धरी । खोमडे वरी मृत्यु सा ॥ १ ॥ जैसें कर्म तैसें फळ । हें तों अढळ न चुके चि ॥ २ ॥ चोऱ्या करितां तुटती हात । पावती घात जिवितेंसी ॥ ३ ॥ निळा ह्मणे सिनळीकरितां । झुरती उभयतां नाक कान ॥ ४ ॥

॥ १०३१ ॥ आजिवरि काळ वृथा चि गेला । जेथुनियां झाला सृष्टीक्रम ॥ १ ॥ ऐसे चि नाना धरितां वेष । न तुटती पाश कर्माचे ॥ २ ॥ केव्हां स्वर्ग केव्हां नर्क । केव्हां दुःखदायक संसार ॥ ३ ॥ निळा ह्मणे न पुरे घडी । ओढाओढी कल्प जातां ॥ ४ ॥

॥ १०३२ ॥ स्वप्नीं देखिलें तें जागृतिये नाहीं । हारपोनियां ठायीं ठावो चि नुरे ॥ १ ॥ ते चि परी झाली माझिया मानसा । संसार तमासा क्षणें चि विरे ॥ २ ॥ कैंची हे संपत्ति धन वित्त पशु । लटिका चि आभासु मायीक तो ॥ ३ ॥ निळा म्हणे एक सत्य हरिचें नाम । येर अवघा चि श्रम मिथ्याभूत ॥ ४ ॥

॥ १०३३ ॥ सोनें असे सोनेपणें । अळंकार लेणें होय जाय ॥ १ ॥ तैसें चराचर होतां जातां । वस्तु अखंडता अखंड ॥ २ ॥ नाना मृगजळ दिसे भासे । भूमिका ते असे कोरडी च ॥ ३ ॥ निळा म्हणे घटमट मोडी । अवकाश परवडी नाहीं तया ॥ ४ ॥

॥ १०३४ ॥ येती जाती वर्षती मेघ । गगन तें अभंग जैसें तैसें ॥ १ ॥ तैसीं च ब्रह्मांडें अनेक होती जाती । स्वरूप तें अद्वैतीं अद्वैत ॥ २ ॥ नाना नटिया नट वेष । परि तो आपणांस भिन्न नव्हे ॥ ३ ॥ निळा ह्मणे नाना वस्त्राकार तंतु । दाउनी आपणातु आपण ॥ ४ ॥

॥ १०३५ ॥ जिवाचाही जीव माझ्या शिवाचा शीव । पंढरीचा देव मन बुद्धी इंद्रियें ॥ १ ॥ आईका हो श्रोते तुह्मी संत सज्जन । मी माझें हें जतन कोण करी यावरी ॥ २ ॥ नयनाचे हि नयन माझ्या घ्राणाचें घ्राण । श्रवणाचे हि श्रवण तो चि रसनेची रसना ॥ ३ ॥ त्वचेचीही त्वचा माझे वाचेची वाचा । बोलविसी बोलाचा तो चि अर्थ तात्पर्य ॥ ४ ॥ कराचे हि कर माझ्या चरणाचे चरण । चैतन्याचें चैतन्य तो चि मनाचें मन ॥ ५ ॥ निळा ह्मणे भुक्ति मुक्ति विरक्ति ज्ञान । शांति क्षमा दया तो चि सिद्धी साधन ॥ ६ ॥

॥ १०३६ ॥ सुखानंदाची राणिव । भागा आली फावली सर्व ॥ १ ॥ घ्याल ते घ्या रे धणीवरी । असाल जे जे या अधिकारी ॥ २ ॥ फुकासाठीं बोलोनि आलें । घरासी देव हें चांगलें ॥ ३ ॥ निळा ह्मणे उबग नका । मानूं अवघे हि ऐका ॥ ४ ॥

॥ १०३७ ॥ न सांपडे ऐसी कधीं । वेळ लागली ते संधी ॥ १ ॥ हरिचे गुण वाचे यावे । श्रवणीं श्रवण ते करावे ॥ २ ॥ गेलीं जातील वर्षें काळ । आयुष्या वेंचुनियां निर्फळ ॥ ३ ॥ निळा म्हणे यालागीं करा । वेगें आतां चित्तीं धरा ॥ ४ ॥

॥ १०३८ ॥ गेला फिरोनियां दिवस । न ये घटिका लव निमिष ॥ १ ॥ आहे तो चि भरा हातीं । महा लाभाची संपत्ती ॥ २ ॥ मागें नागवलीं फारें । गेलीं वांया नारीनरें ॥ ३ ॥ निळा ह्मणे म्हणोनि जागा । सांडनी घोरबार वाउगा ॥ ४ ॥

॥ १०३९ ॥ संत आज्ञा सादवित । जातों सकळांचें हि हित ॥ १ ॥ नाईकोनी सोडाल । फळ कनिष्ठ तरी पावाल ॥ २ ॥ आह्मी उत्तीर्ण आपुलिया । उचिता ठेलों सांगोनियां ॥ ३ ॥ निळा ह्मणे यावरि आतां । बोल न ठेवावा मागुता ॥ ४ ॥

॥ १०४० ॥ आज्ञापिलें जें श्रीहरी । ते चि वदली हे वैखरी ॥ १ ॥ नाहीं माझें येथ वीर्य । जाणे ज्याचें तो चि कार्य ॥ २ ॥ येईल जरी हे प्रतीति । धरा तरी हें हित चि चित्तीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे सांडिजे येरी । नास्तिक वादी परते दुरी ॥ ४ ॥

॥ १०४१ ॥ याच पायीं मनोरथ । पूर्ण काम सकळ हि आर्त ॥ १ ॥ ह्मणोनियां धरिला जिवें । हा चि संतीं मनोभावें ॥ २ ॥ इच्छिलिया पदा । नेतो देउनी सुख संपदा ॥ ३ ॥ निळा ह्मणे खंडी मूळ । वासनात्मकाचें तात्काळ ॥ ४ ॥

॥ १०४२ ॥ अवघिया चि ज्ञानें अवघीं चि जाणें । परि एक नेणें आत्मज्ञान ॥ १ ॥ बोल तितुके बोल चि वरी । परि न चढे पायरी प्राप्तीची ॥ २ ॥ आपुलें चि हित आपण नेणे । वरी आणिकां शाहाणें करूं धांवे ॥ ३ ॥ निळा म्हणे ठकुनी लोकां । आपण हि नर्का जात सवें ॥ ४ ॥

॥ १०४३ ॥ चाडिया मुखें दाणा पडे । तरि तो निवडे कणभारें ॥ १ ॥ तैसें कडवळ फोकिलें नोव्हे । सोंपट चि राहे वाढोनियां ॥ २ ॥ तैसें सद्गुरुमुखींचें वचन । पाववी निज स्थान पदातें ॥ ३ ॥ वाचाळ ज्ञानें ऐकतां गोष्टी । वाउग्या चि शेवटीं भरोवरी ॥ ४ ॥ निळा म्हणे सांप्रदाय शुद्ध । उपजवी बोध गुरु शिष्या ॥ ५ ॥

॥ १०४४ ॥ नाहीं वारी पळमात्र घडी । गेले कल्पकोडी याचिपरी ॥ १ ॥ आतां कधीं मोकळा होसी । मग या पावसी परमार्था ॥ २ ॥ पावोनि उत्तम नरदेहा ऐसी । बहुवेळा आयुष्यासी नासियलें ॥ ३ ॥ निळा म्हणे अधमा हिंडोनी योनी । त्रास नुपजे मनीं अझुन कैसा ॥ ४ ॥

॥ १०४५ ॥ आशाबद्धा नाहीं मान । बहुत सन्मानं नैराश्या ॥ १ ॥ याचिलागीं विचार करा । हित तें धरा मानसीं ॥ २ ॥ भजतां देवा

देव चि होती । विस्मरणें जाती अधःपाता ॥ ३ ॥ निळा म्हणे ममता बाधी । नित्य समाधी निःसंगा ॥ ४ ॥

॥ १०४६ ॥ अंतर कोणा नेदी सहसा । आपुलिया दासा सांभाळी ॥ १ ॥ परम कृपावंत हरी । नामोच्चारीं प्रगट होय ॥ २ ॥ याची निष्ठा बाणली ज्यासी । कदाहि त्यासी न विसंबे ॥ ३ ॥ निळा म्हणे जवळ चि राहे । ऐसा भक्त मोहें मोहितु ॥ ४ ॥

॥ १०४७ ॥ विश्वास याचा न वाटे जया । विन्मुख तया नरदेहो ॥ १ ॥ जाईल भोगावया योनी । दुःखदायिनी चौऱ्यायशी ॥ २ ॥ पुढती जन्म पुढती मरण । पुढती पतन अधःपात ॥ ३ ॥ निळा म्हणे पडती फेरा । यातना थोरा भोगावया ॥ ४ ॥

॥ १०४८ ॥ जाईल तेथें तें चि फळ । दुःख कल्लोळ यमजाच ॥ १ ॥ हरिभक्तीसी विन्मुख होती । ते ते जाती अधःपाता ॥ २ ॥ दुःख शोक व्याधी पीडा । अपघात रोकडा हा चि त्यासी ॥ ३ ॥ निळा ह्मणे सुकृत नेणें । वेष्टिले गुणें मायेचिया ॥ ४ ॥

॥ १०४९ ॥ सार्थकाचा ऐसा काळ । केला अमंगळ मूढ जनीं ॥ १ ॥ येउनियां नरदेहासी । नेणें स्वहितासी आपुलिया ॥ २ ॥ धिक त्याचें झालें जिणें । विना स्मरणें श्रीहरिचिया ॥ ३ ॥ निळा ह्मणे त्याची जोडी । अवघी कुळवाडी पापात्मक ॥ ४ ॥

॥ १०५० ॥ ऐकोनियां भक्तवचनें । देव संतोपले मनें ॥ १ ॥ म्हणती आहे नामापासीं । संदेह न धरावा मानसीं ॥ २ ॥ संत बोलिले तें खरें । साच चि मानावें उत्तरें ॥ ३ ॥ निळा ह्मणे संतोपविलें । कृपावचनीं या विठ्ठलें ॥ ४ ॥

॥ १०५१ ॥ आतां अवघे हरिचे जन । करा हो चिंतन नामाचें ॥ १ ॥ देव नुपेक्षील सर्वथा । करा कथा कीर्तनें ॥ २ ॥ टाळ मृदंग लावा भेरी । नाचा गजरीं हरिनामें ॥ ३ ॥ निळा ह्मणे वैकुंठवासी । येती भेटीसी तुमचीये ॥ ४ ॥

॥ १०५२ ॥ पाहोनियां हरिकीर्तन । होती प्रसन्न देव तुम्हां ॥ १ ॥ सनकादिक येती भेटी । कथा गोमटी ऐकावया ॥ २ ॥ संत महंत येउनी

पुढें । बैसती गाढे कीर्तनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे पांडुरंग । रंगीं रंग मेळविल ॥ ४ ॥

॥ १०५३ ॥ सोहळा तो देखोनियां । लागती पायां मोक्ष मुक्ति ॥ १ ॥ जये रंगीं नाचे हरि । कीर्तनगजरीं सत्संगें ॥ २ ॥ तेथें कोण पाड येरा । साधन संभारा तर्कवादा ॥ ३ ॥ निळा ह्मणे योगयाग । ठाकती मुग आरोगुनी ॥ ४ ॥

॥ १०५४ ॥ कीर्तनें धुवट केलें लोकां । दोष कळंकापासुनी ॥ १ ॥ टाळिया हरिनामाच्या घोषें । पळती त्रासें कलिमल ॥ २ ॥ स्वानुभवें वेधल्या वृत्ती । श्रोते हि होती चतुर्भुज ॥ ३ ॥ निळा ह्मणे कीर्तन सुखें । हरिलीं दुःखें बहुतांचीं ॥ ४ ॥

॥ १०५५ ॥ कथाश्रवणें विरक्ति जोडे । निज शांती वाढे उल्हासें ॥ १ ॥ कथाश्रवणें परमानंद । प्रगटे स्वानंद निज हृदयीं ॥ २ ॥ कथाश्रवणें उपाधी तुटे । भवाब्धी आटे निःशेष ॥ ३ ॥ निळा ह्मणे कथाश्रवणें । हरती मरणें जन्म जरा ॥ ४ ॥

॥ १०५६ ॥ कथा श्रवणें स्वरूप सिद्धी । लागे समाधी सात्विकां ॥ १ ॥ ऐसा लाभ जोडे जोडी । बैसतां आवडी हरिकथे ॥ २ ॥ कथाश्रवणें परिहार दोषां । होताती पाशमुक्त पापी ॥ ३ ॥ निळा ह्मणे हरिकथा श्रवण । करी बोळवण जन्ममृत्या ॥ ४ ॥

॥ १०५७ ॥ कथाश्रवणें उपजे विरक्ति । कथाश्रवणें वाढे शांति ॥ कथाश्रवणें परमानंदप्राप्ति । पापी उद्धरती कथाश्रवणें ॥ १ ॥ कथाश्रवणें उपाधी तुटे । कथाश्रवणें भवाब्धि आटे ॥ कथाश्रवणें सच्चिदानंद भेटे । समूळ तुटे मायाजाळ ॥ २ ॥ कथाश्रवणें स्वरूपस्थिती । कथाश्रवणें विषय समाप्ती ॥ कथाश्रवणें निजात्मप्राप्ती । होय उपरती कथाश्रवणें ॥ ३ ॥ कथाश्रवणें मीपण नुरे । कथाश्रवणें अभिमान विरे ॥ कथाश्रवणें कल्पना हि झुरे । ब्रह्म साक्षात्कारें भेटिसी ये ॥ ४ ॥ निळा म्हणे प्रथम पायरी । हरिकथा श्रवण मनन वरी ॥ निजध्यासें आत्मया हरी । भेटिजे निर्धारी साक्षात्कारें ॥ ५ ॥

॥ १०५८ ॥ संतोष तरुचें हें फळ । आलें रसाळ पक्कदशे ॥ १ ॥ सेविती ते तृप्त होती । ब्रह्मता पावती सनातन ॥ २ ॥ रुचि ऐसें आवडे

तयां । विरक्तां संसारियां सुखदातें ॥ ३ ॥ निळा म्हणे श्रवणपुटीं । लावितां चि पुष्टीकारक ॥ ४ ॥

॥ १०५९ ॥ भवरोगें जे पिडले लोक । तिहीं अवश्यक सेवावें ॥ १ ॥ महा मात्रा हरिकीर्तन । उतरलें रसायण निज निगुती ॥ २ ॥ मागें बहुतां गुणासी आलें । आरोग्य चि ठेविलें करुनियां ॥ ३ ॥ निळा म्हणे सांगतां फार । होईल विस्तार नामें त्यांचीं ॥ ४ ॥

॥ १०६० ॥ वंदुनि तुकया सद्गुरूचे चरण । ब्रह्मानंदें गर्जोनि पूर्ण ॥ स्वानुभवभरें हांकारुन । औषध घ्या घ्या म्हणतुसे ॥ १ ॥ निजात्म नगरीहुनी धडफुडा । वैद्य आलों गा या तुमच्या चाडा ॥ तोडीन नाना व्याधींचा झगडा । करीन रोकडा अमरा ऐसा ॥ २ ॥ जे औषधीचेनि सुवासमेळें । द्वैत रोग उठोनि पळे ॥ अहं कुपिताचे पेटाळें । उमळोनियां सगळें तात्काळ पडे ॥ ३ ॥ घेतां माझीं दिव्य औषधें । सनकादिकांसी निघालीं दोंदें ॥ महर्षि मातले ब्रह्मानंदें । जाणिजे नारदें प्रतीत हे ॥ ४ ॥ अहं विषानळें घेरला । सदाशिवहि झिजणी पडिला ॥ त्रिविध तापें होता आहाळला । तो म्यां उपचारिला निजात्मवैद्यें ॥ ५ ॥ देउनि स्मरणाचें रसायण । हरिलें बद्धतेचें कठीणपण ॥ देहातीत करूनियां जाण । ठेविला करून पूर्वी जैसा ॥ ६ ॥ क्षराक्षरातीत वृक्षाची मुळी । ते म्यां प्रल्हादाचिये हृदयकमळीं ॥ घातली होती ह्मणोनि विषकल्लोळीं । वांचला अग्नज्वाळीं शस्त्रघातीं ॥ ७ ॥ ऐसे एकैक स्वानुभव । सांगतां नवल साची ठेव ॥ कैंचा उरेल अहंभाव । जाईल ठाव सांडुनियां ॥ ८ ॥ ऐशा नाना प्रकारच्या दिव्य औषधी । देउनि उपचारिलीं लक्षावधी ॥ भ्रमें भ्रमलीयांचिये शुद्धी । उपाव त्रिशुद्धी मज हातीं ॥ ९ ॥ ह्मणोनियां आलों गा धांवत । विश्वास पहावया द्या हो हात ॥ नाडीं नाडिलेती केला घात । फुटली धात ईतकारें ॥ १० ॥ विषय कुपथ्याचेनी भरें । त्रिविध तापें तापलेती ज्वरें ॥ अहंममतेचें लागलें वारें । बद्धता थोरे देहबुद्धी ॥ ११ ॥ ममाभिमानेंसी कुंथत । भेदबुद्धीचे नि विकारें बरळत ॥ मी माझें लटिकें चि बोलत । पडिलेती लोळत शुद्धि नाहीं ॥ १२ ॥ विधीचा न साहे चि वारा । अविधी जातसां चाचरा ॥ तेणें चि सन्निपात विकारा । प्रबळ शरिरा वाढली तृष्णा ॥ १३ ॥ न चलवे ऐक्याचिये भूमिके । विपरीत ज्ञानाचे खातसे झोंके ॥ अंधारीं पडिलेती न देखोनी निकें । सत्यागें चि लटिकें

मानुनी ॥ १४ ॥ तयासी एक चि विचार । क्षणमात्रें चि होईल उतार ॥ घ्या माझें वचन हें साचार । द्वैत कल्पना संचार न करावा ॥ १५ ॥ एक चमत्कारिक औषध देईन । वैराग्यवल्लीचें रसायण ॥ वरी गाळिये अभेदमात्रेसी सेवन । चिदैक्यभावें करावें ॥ १६ ॥ सांडुनी रसने रसाची गोडी । नित्यानित्य विवेक आवडी ॥ प्रत्यगावृत्ति धारणा फुडी । निरसेल गाढी भ्रमभावना ॥ १७ ॥ पथ्येसी असावें निरंतर । हा नेंदावा विपरीत ज्ञानाचा संचार ॥ माझिये वचनीं विश्वास धरा । धरितां साचार हरेल व्यथा ॥ १८ ॥ मागें स्यां थोरथोरांकारणें । दिधलीं होतीं हे रसायणें ॥ नांवें सांगों तरी शास्त्रें पुराणें । उद्दंड व्याख्यानें गर्जताती ॥ १९ ॥ अर्जुन वांचविला नाना सांकडीं । उद्धव उपचारिला काढाकाढी ॥ शुक वामदेवादिक परवडी । ऋषींचीं भवभयसांकडीं निवारिलीं ॥ २० ॥ ऐसे उपचारिले बहुत जन । संख्यारहित विचक्षण ॥ आतां ही हें रसायण । सेविती ते होऊन आरोग्य ठाती ॥ २१ ॥ निळा ह्मणे वस्ताद माझा । शिरीं असतां सद्गुरुराजा ॥ निवारील रोग घेउनी पैजा । धरितां वोजा विश्वास मनीं ॥ २२ ॥ यापरि सादाउनियां सकळां । जातों आपुलिया निजात्मस्थळा ॥ रामराम करुनियां ह्मणे निळा । कृपा अखंडित असों द्यावी ॥ २३ ॥

॥ १०६१ ॥ चव्हाटिया दंतकथा । माजी अनर्था कारण ते ॥ १ ॥ शुद्धभावें हरिकीर्तन । करितां जनार्दन संतोषे ॥ २ ॥ चातुर्यवाणी रंजवण । थिसा खंडण प्रेमाचें ॥ ३ ॥ निळा ह्मणे घडती दोष । निंदा उपहास इतरांचे ॥ ४ ॥

॥ १०६२ ॥ एक चि नाम विठोबाचें । उच्चारितां वाचे उणें काय ॥ १ ॥ रिद्धी सिद्धी लोटांगणीं । येती धांवोनि चोजवीत ॥ २ ॥ भुक्ति मुक्ति जवळुनियां । नवजाती ठाया आन कोठें ॥ ३ ॥ निळा ह्मणे सर्व ही सुखें । वसती हरिखें जवळी त्या ॥ ४ ॥

॥ १०६३ ॥ उपदेशिला एक चि सार । मज ही उच्चार नामाचा ॥ १ ॥ ह्मणती न पडे साधनफंदीं । होशिल दोंदी काळाचा ॥ २ ॥ करीं संतसमागम । गाईं हरिनाम कीर्तनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसा संतीं । केला निजप्रीति उपदेश ॥ ४ ॥

॥ १०६४ ॥ नलगे जाणें वनाप्रती । अथवा एकांतीं बैसणें ॥ १ ॥

विठ्ठल विठ्ठल ह्मणा कां वाचे । सकाळार्थाचें कारण हें ॥ २ ॥ नलगे आसन मुद्रा माळा । साधनें कळा योगस्थिति ॥ ३ ॥ निळा ह्मणे उधळण सार । नलगे निराहार व्रतचर्या ॥ ४ ॥

॥ १०६५ ॥ सांगितलें वर्म एवढें चि करीं । नियता उच्चारीं हरिचें नाम ॥ १ ॥ नलगे कोठें जाणें येणें । कर्मबंधनें तुटतील ॥ २ ॥ योगसाधन पवनाभ्यास । न करीं सायास अडचणीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे हरिच्या नामें । चुकती जन्में यमप्रहार ॥ ४ ॥

॥ १०६६ ॥ सकळ साधनां वरिष्ठ सार । विठ्ठल नामाचा उच्चार ॥ आणखी नका वोरवार । शीण चि उरेल पुढती ॥ १ ॥ धांवा ह्मणोनि अवघे वेगीं । चित्त चि ठेवा पांडुरंगीं ॥ संसाराची तुटेल मागी । फिटेल धगी त्रिविधा ॥ २ ॥ आवडी नाचतां पैं गातां । पांडुरंग प्रेमदाता ॥ अवघी तोडुनियां चिंता । करील माथां वैसणें ॥ ३ ॥ ऐसें जाणोनियां निरुती । करा हरिनामें आवृत्ति ॥ मग हा कळिकाळाचे हातीं । नेदिल तुह्मां सर्वथा ॥ ४ ॥ निळा ह्मणे सुगम ऐसें । संतीं दाविलें सोरसें ॥ जतन करिती जे मानसें । ते तों पावती सर्वथा ॥ ५ ॥

॥ १०६७ ॥ कर्में वांटिलीं चहूं वर्णां । क्षत्रिय वैश्य आदी ब्राह्मणा ॥ वेद-पुरुषा नारायणा । गुणविवंचना तुज हातीं ॥ १ ॥ यज्ञ षट्कर्म ब्राह्मणांसी । क्षात्रदान क्षत्रियांसी ॥ कृषीगोरक्षवाणिज्य वैश्यासी । सेवा शूद्रासी याचिते ॥ २ ॥ नामें स्तोत्रें स्त्रियांदिकांसी । सेवा वांटिली अधिकारेंसी ॥ संत सनकादिक योगियांसी । स्वानुभव सिद्धांत दिधले ॥ ३ ॥ कथा कीर्तन सकळ लोकां । आधिलांपासुनी अनामिकां ॥ तरणोपाय विश्वव्यापका । केला नेटका विधिमार्ग ॥ ४ ॥ निळा ह्मणे ऐसिया परी । कृपा करुनियां श्रीहरी ॥ जीव तारिले भवसागरीं । भक्तकैवारी ह्मणोनियां ॥ ५ ॥

॥ १०६८ ॥ आतां निज प्रेमाची हे जाती । देहभावीं नुरे स्फूर्ति ॥ अव-घिया संसारें निवृत्ति । देवो चित्तीं सर्वदा ॥ १ ॥ ओंकिलें अन्न जैसें राहे । कोणी फिरोनियां न पाहे ॥ विषय देखोनि तैसें होये । महा वैराग्य त्या नांवें ॥ २ ॥ एक आत्मा न दिसे दुजें । ज्ञान त्या नांव बोलिजे ॥ विरक्ति निर्लो-भता ते सहजे । देहममता न बाधी ॥ ३ ॥ साहे सर्वांचे अपराध । क्षमा त्या नांव तें अति शुद्ध ॥ सोसी अंगीं दुःखादिबाध । निर्द्वंद्व निर्मत्सर द्वेष

न करितो ॥ ४ ॥ निळा ह्मणे ते चि शांति । सर्वदा आनंदमय चित्तवृत्ती ॥ दया तें भजन सर्वां भूतीं । भक्ती ते देवा न विसंबे ॥ ५ ॥

॥ १०६९ ॥ भूतीं उपद्रव दिधला । ताडिला अथवा निस्तेजिला ॥ तेणें चित्तीं दाहो झाला । अधिभौतिक बोलिला तो ताप ॥ १ ॥ देहीं प्रगटे रोग व्याधी । तेणें आहाळली तापें बुद्धि ॥ लोळे न पुरे दुःखावधी । अध्यात्मिक त्रिशुद्धी तो ताप ॥ २ ॥ दैवें अति वृष्टी कां अनावृष्टी । राजिकें लुटिलें झाला कष्टी ॥ आगीनें जळतां नावरे संकटीं । तो अधिदैव ताप बोलिजे ॥ ३ ॥ ऐसे त्रिविधताप सत्संगती । विवेकश्रवणें विलया जाती ॥ ह्मणोनि कीर्तनीं बुद्धिमंतीं । अवश्य श्रवणार्थी बैसावें ॥ ४ ॥ निळा ह्मणे होईल लाभ । ब्रह्मानंदा निघती कोंब ॥ प्रसन्न होउनी पद्मनाभ । सीतळ करील सर्वार्थी ॥ ५ ॥

॥ १०७० ॥ संचित प्रालब्ध क्रियमाण । न सुटे प्राणिया भोगिल्याविण ॥ यालागीं करावें हरिचें स्मरण । तुटेल बंधन मग त्याचें ॥ १ ॥ सत्कर्म करितां विधियुक्त । माजी निषेधाचा पडे आघात ॥ सांग अथवा अव्यंग होत । होय तें संचित निश्चयेंसी ॥ २ ॥ उत्तम अधम कर्म घडती । जाणतां नेणतां पदरीं पडती ॥ ते चि संचितें होउनी ठाती । पुढें भोग द्यावया ॥ ३ ॥ पापपुण्यात्मक कर्मे घडलीं । भोगितां उर्वरीत जे राहिलीं ॥ फळ द्यावया उभीं ठाकलीं । प्रालब्धें लाभालाभदायकें ॥ ४ ॥ क्रियमाणें जें आतां आचरे । सत्कर्मे अथवा अकर्माकारें ॥ जें जें निपजे नित्य व्यवहारें । क्रियमाण ऐसें बोलिजे तें ॥ ५ ॥ आतां तिहींचें ही निस्तरण । घडे जेणें ते ऐक खूण ॥ संचितें घडे जन्ममरण । उत्तम अधम योनिद्वारें ॥ ६ ॥ जे जे योनीं धरी जो जन्म । तेथींचें विहित तो चि त्या स्वधर्म ॥ सांग नव्हतां भोगणें कर्म । नव्हे चि सुटिका कल्पांतीं ॥ ७ ॥ आतां भक्ते ही योनीं जन्म होतां । अनुतापें भजे जो भगवंता ॥ नामें त्याचीं गातां वानितां । दहन संचिता भक्तियोगें ॥ ८ ॥ यावरी प्रालब्धें भोग येती अंगा । भोगितां स्मरे जो पांडुरंगा ॥ निस्तरे प्रालब्धा तो वेगा । पावे अंतरंगा श्रीहरितें ॥ ९ ॥ जें जें नित्यानी आचरत । तें ब्रह्मार्पण जो करित ॥ अहंकृती न धरी फळ कामरहित । क्रियमाण जाळीत निष्कामता ॥ १० ॥ याचिलागीं निळा ह्मणे । कर्मपाश तुटती येणें ॥ विठोबाचिया नामस्मरणें । यातायाती चुकती ॥ ११ ॥

॥ १०७१ ॥ मिळाले गोपाळ बैसले पाळीं । मध्यें वनमाळी विराजला

॥ १ ॥ यारे ह्मणती खेळ मांडूं । विटीदांडू लगोरीचा ॥ २ ॥ हुंबरी बारे नाचों फेरे । टिपरी अखरे भोंवताली ॥ ३ ॥ निळा ह्मणे गाउनी वाचे । कान्होबाचे पवाडे ॥ ४ ॥

॥ १०७२ ॥ सांगितलें संतजनीं । उगवुनी कानीं बीजाक्षरें ॥ १ ॥ विठ्ठल जपतां विठ्ठल होसी । न धरीं मानसीं संशय ॥ २ ॥ करीं कीर्तन वाजवीं टाळी । राहेल वनमाळी हृदयांत ॥ ३ ॥ निळा ह्मणे पडे आंठी । साधन संकटीं आणिकां ॥ ४ ॥

॥ १०७३ ॥ सांगतों हें मनीं धरा । हित करा आपुलें ॥ १ ॥ जा रे पंढरीस आधीं । कृपानिधी भेटेल ॥ २ ॥ अवघींच सुखें अलौकिकें । देईल एके दर्शनें ॥ ३ ॥ निळा ह्मणे रिद्धी सिद्धी । मुक्तिपदीं लागती ॥ ४ ॥

॥ १०७४ ॥ न वाटे हें सांगतां खरें । न येतां वरें स्वानुभवा ॥ १ ॥ बुद्धि मलीन झाली कामें । संसारसंभ्रमें मन वेडें ॥ २ ॥ कैसेन येईल हे प्रतिती । विश्वास चित्तीं नुपजतां ॥ ३ ॥ निळा ह्मणे खरें कुडें । दृष्टी निवडे पारखिया ॥ ४ ॥

॥ १०७५ ॥ पुढें जाणवेल हें पहातां । अंगा येतां क्षीणत्व ॥ १ ॥ मग तो नलगे कांहीं हातीं । होईल माती आयुष्या ॥ २ ॥ ह्मणोनियां करा वेग । धरा अनुराग हरिभजनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे पुढिल वेळ । आहे अति काळ कठीण तो ॥ ४ ॥

॥ १०७६ ॥ मज तों सांभाळिलें संतीं । धरिलें हातीं दीन ह्मणू ॥ १ ॥ सांगतां न ये विश्वास लोकां । बाधी अशंका ज्याची त्या ॥ २ ॥ मी तों बोलें साचिया सत्ता । पुढें विचारितां कळेल ॥ ३ ॥ निळा ह्मणे जुनाट नाणें । नव्हे हें उणें पारखितां ॥ ४ ॥

॥ १०७७ ॥ अहो एका भाविक । संत आर्तक मुमुक्षते ॥ १ ॥ शुद्धचर्या आचरण । हें चि पूजन संतांचें ॥ २ ॥ नलगे सांगावें मागावें । जाणती स्वभावें हृद्गत ते ॥ ३ ॥ निळा ह्मणे अकस्मात । भेटती संत भावशुद्धी ॥ ४ ॥

॥ १०७८ ॥ आर्त जीवींचें जाणती । तया भेटती नस्वरीत ॥ १ ॥ करितां नामाचें चिंतन । देती वोरसोन निज लाभ ॥ २ ॥ भाव देखोनियां

चित्तीं । प्रसन्न होती तात्काळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे सर्व जाण । हें चि ओळखण संतांचें ॥ ४ ॥

॥ १०७९ ॥ संत कैसेनि भेटती । कैसेनि होती कृपावंत ॥ १ ॥ सांगा निगुती हें आह्मांसी । तुमच्या पायांसी लागतों ॥ २ ॥ काय तें करावें पूजन । काय तें धन समर्पावें ॥ ३ ॥ निळा ह्मणे शरण जावें । कैसें विनवावें कोण युक्ती ॥ ४ ॥

॥ १०८० ॥ आर्त सर्वदां वाहती । संत भेटावेसे चित्तीं ॥ १ ॥ तयांपासीं त्यांचा भाव । संतभेटीचा उपाव ॥ २ ॥ नाहीं तयां धन वित्त । कांहीं वेंचावें लागत ॥ ३ ॥ निळा ह्मणे निश्चयेंसी । संत भेटती तयासी ॥ ४ ॥

॥ १०८१ भाविकांची उत्तम जाती । विश्वास धरिती संतवचनीं ॥ १ ॥ तयां फळे त्यांचा भाव । प्रगटे देव हृदयांत ॥ २ ॥ जाणीवेचा नाहीं फुंद । शुद्धबुद्ध होती ते ॥ ३ ॥ निळा ह्मणे त्यांची स्थिती । न ये ते गती जाणतिया ॥ ४ ॥

॥ १०८२ ॥ संतप्रसाद लाधले । ते चि धाले ब्रह्मरसें ॥ १ ॥ सदा नामीं जडली प्रीति । ते चि करिती उच्चार ॥ २ ॥ भक्ति भाग्य वोसंडलें । वैराग्य आलें मोडोनी ॥ ३ ॥ निळा ह्मणे अंगीं शांति । क्षमा विश्रांति ज्ञानाची ॥ ४ ॥

॥ १०८३ ॥ देव आले त्यांचिया देवा । करितां सेवा आवडी ॥ १ ॥ तेही झाले संत चि अंगें । करिती संगें आणिकां ॥ २ ॥ सहज त्यांची वर्तणुक । अवघ्यां अधिक साधनां ॥ ३ ॥ निळा ह्मणे बोलती गोष्टी । त्या चि रहाटी वेदाच्या ॥ ४ ॥

॥ १०८४ ॥ ब्रह्मानंद सुसावला । अंगीं बाणला आयुर्भावें ॥ १ ॥ संतवचनामृतें तृप्ति । झाली विश्रांति इंद्रियां ॥ २ ॥ मन बैसलें ऐक्यासनीं । निश्चळ आसनीं सुखाचिये ॥ ३ ॥ निळा ह्मणे लाभ ऐसा । जोडे सरिसा संतसंगें ॥ ४ ॥

॥ १०८५ ॥ नित्य कथाश्रवणीं प्रीति । चित्तवृत्ति अर्थांतरीं ॥ १ ॥ ते चि अधिकारी या सुखा । स्वानुभव निका पावती ॥ २ ॥ जया बोलतां

चालतां । एकात्मता न खंडे ॥ ३ ॥ निळा म्हणे आलें घरा । सुख माहेरा विश्रांति ॥ ४ ॥

॥ १०८६ ॥ ऐसी जोडलिया सत्संगती । परम विश्रांति भाविकां ॥ १ ॥ ब्रह्मानंदाचें पारणें । नित्य स्मरणें श्रीहरिच्या ॥ २ ॥ सकळ ही लाभाच्या संपत्ती । सामोऱ्या धांवती परमार्थिक ॥ ३ ॥ निळा म्हणे कृत्य झालें । ज्यालागीं आले नरदेहा ॥ ४ ॥

॥ १०८७ ॥ मी ज्या बोलिलों निगुती । संतकृपेच्या त्या युक्ती ॥ १ ॥ येरवी हें काय जाणें । प्रसादाचें करणें त्यांचिया ॥ २ ॥ छाया चित्र नाचवितां । प्रकाशितां दीप त्यासी ॥ ३ ॥ निळा म्हणे माझें कर्म । जाणती वर्म ते संत ॥ ४ ॥

॥ १०८८ ॥ ते चि माझे सर्वसाक्षी । आहेति कैंपक्षीं ह्मणोनि ॥ १ ॥ काय केलें इतरां जनां । भरली भावना त्रिविधा ॥ २ ॥ ठावें ज्याचें तया वर्म । आणिकां दुर्गम जाणतियां ॥ ३ ॥ निळा ह्मणे व्याली जाणें । वांझे वायाणें तिडकांचें ॥ ४ ॥

॥ १०८९ ॥ अर्थ जाणती अनुभवी । खूण ठावी जयां ते ॥ १ ॥ संतकृपेची ते जाति । कवणे रिती ते कैसी ॥ २ ॥ कळे तया खरें खोटें । धीट पाटे प्रसादिक ॥ ३ ॥ निळा ह्मणे अंतरींचें । प्रेम साचें कीं लटिकें ॥ ४ ॥

॥ १०९० ॥ झगमगी काजीवे । रात्रीं दिवसा नव्हे ठावें ॥ १ ॥ म्हणोनियां न ये मोला । नाश पदरीं असे त्याला ॥ २ ॥ दिसे पतंगाचा रंग । नाहीं धुतला तोंवरी चांग ॥ ३ ॥ निळा ह्मणे परमहंस । झाला बहुरुपी परि ते फोस ॥ ४ ॥

॥ १०९१ ॥ ज्याचें अंतर तया ठावें । उमटेल बाहेरी क्रियाभावें ॥ १ ॥ ह्मणोनियां धीर करा । माजिघरींचें येईल दारा ॥ २ ॥ नव्हे आघा तुरडा खेळ । सत्ता ज्याची त्याचें बळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे आहे धणी । शिरीं संपन्न सर्वां गुणीं ॥ ४ ॥

॥ १०९२ ॥ ज्याचा आहे त्या अभिमान । मी तों रंक अनाथ दीन ॥ १ ॥ नलगे देणें हा परिहार । होईल सत्याचा आदर ॥ २ ॥ जेणें केलेंसे

पुढारें । त्याचें तया उणें पुरे ॥ ३ ॥ निळा ह्मणे मी मापारी । उभा धणी शिरावरी ॥ ४ ॥

॥ १०९३ ॥ नाठवी तो स्वयें द्यावी आठवण । हे तों आहे खूण सद्गुरूची ॥ १ ॥ ऐसीया प्रकारें बोधवितां शिष्या । अंतरीं प्रकाशा काय उणें ॥ २ ॥ आपुलें स्वराज्य फावे आपणांसी । नित्य सदाभ्यासीं तद्रूपता ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐशी सद्गुरूपें कळा । परि आहे विरळा बोधक तो ॥ ४ ॥

॥ १०९४ ॥ प्राणी प्राण अर्पे । तेथें अर्पी तें समर्पे ॥ १ ॥ ऐशी प्रेम आहे कळा । परी तो बोधक विरळा ॥ २ ॥ दृश्याचिये पाठीं । दृश्य लोपे द्रष्टाची उठी ॥ ३ ॥ निळा ह्मणे ज्ञानें । ज्ञेय राहिजे होऊन ॥ ४ ॥

॥ १०९५ ॥ नाना मतांतरें शब्दाच्या व्युत्पत्ती । पाठांतर होती वाचाळ ते ॥ १ ॥ माझ्या विठोबाचें वर्म आहे दुरी । कैंची तेथें उरी देहभावा ॥ २ ॥ यज्ञ योग जप तप अनुष्ठान । राहे ध्येय ध्यान ऐलाडी तें ॥ ३ ॥ निळा ह्मणे विषयीं उपरती चित्ता । व्हावी सप्रेमता आवडीची ॥ ४ ॥

॥ १०९६ ॥ नाहीं शब्दाधीन वर्म आहे दुरी । नव्हे तंत्रमंत्रीं अनुभव तो ॥ १ ॥ हर्षामर्ष अंगीं आंदोळती लाटा । कामक्रोधें तंटा सांडियेलें ॥ २ ॥ न सरे ते भक्ति विठोबाचे पायीं । उपरती नाहीं जेथें चित्ता ॥ ३ ॥ निळा ह्मणे सुख देहनिरसनें । येर ते वचनें व्यर्थ वांया ॥ ४ ॥

॥ १०९७ ॥ सांगेन खूण परि हें नकळे । नुघडतां डोळे बुद्धीचे ॥ १ ॥ याचिलागीं चित्तशुद्धी । करा हो उपाधी निरसुनी ॥ २ ॥ दावितां ही न दिसे वर्म । ठाक त्या कर्म आड उभें ॥ ३ ॥ निळा ह्मणे दोषा धुणी । गर्जवा वाणी हरिनामें ॥ ४ ॥

॥ १०९८ ॥ तो चि जाणे अंतरींचें । लटिकें साचें सर्वद्रष्टा ॥ १ ॥ कैसें चाले तया पुढें । निवडी कुडें बरावरी ॥ २ ॥ हें तों आहे सकळां ठावें । लटिक्या भावें न पविजे ॥ ३ ॥ निळा ह्मणे अभिमान होतां । टकिला विधाता शेष नेदीं ॥ ४ ॥

॥ १०९९ ॥ त्रिविधाच्या बुद्धी तिन्ही । वर्तती गुणीं आपुलाल्या ॥ १ ॥ जैसी क्रिया तैसें फळ । हें तों सकळ जाणती ॥ २ ॥ उत्तम मध्यम अधम

भेद । जाणती विपद जाणते ॥ ३ ॥ निळा ह्मणे आपुलाल्या परी । उमटती अंतरीं भाव भिन्न ॥ ४ ॥

॥ ११०० ॥ ज्याचें देणें त्याचें नाम । गावें प्रेम धरूनियां ॥ १ ॥ नाहीं तरी घडती दोष । अंगीं निःशेष कृतघ्नता ॥ २ ॥ पिंड वाढे ज्याच्या अन्नें । त्याचे चि वानें वाढवावें ॥ ३ ॥ निळा ह्मणे माझे दाते । सरते पुरते संतजनीं ॥ ४ ॥

॥ ११०१ ॥ निर्वैरता सर्वां भूतीं । दया शांती आणि करुणा ॥ १ ॥ केली कृपा नारायणें । ऐसीं चिन्हें उमटतां ॥ २ ॥ क्षमा अंगीं निर्मत्सर । वाणी उच्चार नामाचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे नम्रता अंगीं । मोहत्यागीं ममतेच्या ॥ ४ ॥

॥ ११०२ ॥ अवघें देखे ब्रह्मरूप । गुण दोष पाप नातळे ॥ १ ॥ त्याची झाली चित्तशुद्धी । कृपानिधी तोषला ॥ २ ॥ हरिच्या भजनीं अत्यादर । पडेल विसर संसारें ॥ ३ ॥ निळा ह्मणे विठ्ठल ध्यानीं । चित्तीं मनीं बैसला ॥ ४ ॥

॥ ११०३ ॥ उपाधीचा उबग आला । मनीं आवडला सत्संग ॥ १ ॥ तयासीं देवें चि कृपा केली । भ्रांति निरसली बुद्धीची ॥ २ ॥ कल्पनेचा पुसला ठाव । देहभाव हरपला ॥ ३ ॥ निळा ह्मणे निरभिमान । झालें उन्मन मनाचें ॥ ४ ॥

॥ ११०४ ॥ फळलें तया जन्मांतर । न पडे विसर नामाचा ॥ १ ॥ अत्यादरें हरिची भक्ति । झाली विरक्ति विषयाची ॥ २ ॥ कामक्रोधां गिळिलें शांति । अहंकार समाप्ति मदमत्सरा ॥ ३ ॥ निळा ह्मणे अचिंतन । लागलें अनुसंधान हरिरूपीं ॥ ४ ॥

॥ ११०५ ॥ सुखें करावें भोजन । गर्जावे गुण श्रीहरीचे ॥ १ ॥ ल्यावें लेणें अळंकार । असावें सादर हरिकथे ॥ २ ॥ यथाविधी भोगितां भोग । हृदयीं पांडुरंग आठवावा ॥ ३ ॥ निळा ह्मणे न लिंपे कर्मा । हरिनाम धर्मा अवलंबितां ॥ ४ ॥

॥ ११०६ ॥ गर्जतां विठोबाच्या नामें । जाळिलीं कर्में शुभाशुभें ॥ १ ॥ रिघाले अवघियां बाहेरी । विठ्ठल अंतरीं धरूनियां ॥ २ ॥ कैंचें तयां

मायाजाळ । विराली तळमळ कल्पनेची ॥ ३ ॥ निळा ह्मणे भोग साग । साचे पांडुरंग हो सरला ॥ ४ ॥

॥ ११०७ ॥ एका विठ्ठलीं चि ठेविला । जिहीं निश्चय आपुला ॥ १ ॥ ते चि विठ्ठल झाले आतां । मोह सांडुनियां ममता ॥ २ ॥ देवावीण सहसा कांहीं । दुजें तयां उरलें चि नाहीं ॥ ३ ॥ निळा म्हणे स्वानुभव ल्याले । विठ्ठल चि अंगें होउनि ठेले ॥ ४ ॥

॥ ११०८ ॥ झाली भाग्याची उजरी । दृष्टी देखतां चि पंढरी ॥ १ ॥ ठेविले तों कर कटीं । जेणें अवलोकिला दिठी ॥ २ ॥ चंद्रभागे केलें स्नान । भक्ता पुंडलिकाचें दर्शन ॥ ३ ॥ निळा म्हणे वैकुंठवासी । प्राणी होईल तो निश्चयेसी ॥ ४ ॥

॥ ११०९ ॥ याचे पायीं धरिल्या भाव । भेटेल देव निश्चयें ॥ १ ॥ नव्हे अन्यथा भाषण । ठावी खूण संतांसी हे ॥ २ ॥ निज करें कुरवाळून । देईल आलिंगन आत्यादरें ॥ ३ ॥ निळा म्हणे येईल दारा । देव सामोरा धांवोनियां ॥ ४ ॥

॥ १११० ॥ आपुली धणी पुरे तों घ्यावें । उरलें ठेवावें तेसें चि ॥ १ ॥ भरला आहे हा सागर । न लगे अंत पार कोणासी ॥ २ ॥ उदंड मागें झाले सुखी । आतां ही आणखी पावतील ॥ ३ ॥ निळा म्हणे नित्य नवा । आहे हा ठेवा जगादीचा ॥ ४ ॥

॥ ११११ ॥ आहे आरुष बोलणें । नव्हे नाणें टांकसाळी ॥ १ ॥ नका घेऊं खऱ्यासाठीं । येईल तुटी एखादा ॥ २ ॥ पाहतां ठसा कळेवरी । अभ्यंतरीं गैरसाळ ॥ ३ ॥ निळा म्हणे निवडुनी ठेवा । आतां देवा एकीकडे ॥ ४ ॥

॥ १११२ ॥ वाचे बोलविलें देवें । मज हें काय होतें ठावें ॥ १ ॥ सहज नामें आळवितां । ओघ आला हा अवचिता ॥ २ ॥ संत जाणती अंतर । कीं हा रखुमाईचा वर ॥ ३ ॥ निळा म्हणे पुसिली गोठी । न ये सांगतां ते गोमटी ॥ ४ ॥

॥ १११३ ॥ उगा चि वदवितां कां गा । वाचा माझी पांडुरंगा ॥ १ ॥ कोणा न रुचे ऐकतां । हांसों लागती तत्वतां ॥ २ ॥ म्हणती रचिलें हें

पाखांड । सैरा वाजविलें तोंड ॥ ३ ॥ निळा म्हणे आतां ठेवा । दिल्हा घोकार तो हा देवा ॥ ४ ॥

## जनांस शिक्षा.

॥ ११९४ ॥ आशाबद्धाचिया मुखें । निघे अक्षर तें तें फिकें ॥ १ ॥ श्रवणीं बैसोनियां श्रोता । विटे ऐकुनी त्याची कथा ॥ २ ॥ न करुनियां नमस्कार । अव्हेरिती नारीनर ॥ ३ ॥ निळा ह्मणे जळो जिणें । सदां त्याचें लाजिरवाणें ॥ ४ ॥

॥ ११९५ ॥ भुंकोनियां उठी । श्वान लागे भलत्या पाठीं ॥ १ ॥ ऐसा देह स्वभावगुण । नेणें भला बुरा कोण ॥ २ ॥ तैसा चि तो अति वादी । अविवेकी सदां क्रोधी ॥ ३ ॥ निळा ह्मणे ओळखी सांडी । आलें तैसें बरळे तोंडीं ॥ ४ ॥

॥ ११९६ ॥ नेणोनियां आपपर । करी भलत्यासवें वैर ॥ १ ॥ वावधुक ते काजेंविण । तोडुनी सांडी सन्निधान ॥ २ ॥ सर्वकाळ अविवेक । करुनी प्रस्थावे बाधक ॥ ३ ॥ निळा ह्मणे भोगी फळें । दुःखाचींच प्राचीन बळें ॥ ४ ॥

॥ ११९७ ॥ भलते वेळे भलतें चि करी । निर्भीड सर्वदा अंतरीं ॥ १ ॥ न ह्मणे कर्म हें निषिद्ध । आलें मना तें चि शुद्ध ॥ २ ॥ लाजेचापें डोळा । खाणोनी मांडिला निराळा ॥ ३ ॥ निळा ह्मणे अवाच्य बोले । छंदें आपुलिया चि डोले ॥ ४ ॥

॥ ११९८ ॥ न राहे चि क्षण हि भरी । कदा निश्चळ अंतरीं ॥ १ ॥ वाचाळ धांवे तैसें । कार्येंविण निरुद्देशें ॥ २ ॥ करी बोलतां प्रमाद । वाढवूनि वादावाद ॥ ३ ॥ निळा ह्मणे महा मूर्ख । करी सकळांसवें दुःख ॥ ४ ॥

॥ ११९९ ॥ नेणे आपुल्या हितावरी । बोले त्यासी चि विरुद्ध करी ॥ १ ॥ जाणावा तो जन्मांतर । पूर्व दोषाचा विकार ॥ २ ॥ सर्व काळ अल्प बुद्धी । नेणे बोलों सभासंधीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे तया दिसे । अवघें जग चि वेडें ऐसें ॥ ४ ॥

॥ ११२० ॥ नीच यातीसीं संगती। आवडे ज्या अहोराती ॥ १ ॥ तो चि ओळखावा दोषी। दुराचारी पापराशी ॥ २ ॥ नेणे आपुला विधिधर्म। करी मना आलें कर्म ॥ ३ ॥ निळा ह्मणे नर्कवासी। करी घालुनी पूर्वजांसी ॥ ४ ॥

॥ ११२१ ॥ आणिकाची संपत्ती। देखोनि दुःख मानी चित्तीं ॥ १ ॥ ऐसा पातकी चांडाळ। अशुचि तो सर्वकाळ ॥ २ ॥ करी सज्जनाची निंदा। आपण दरिद्री सर्वदा ॥ ३ ॥ निळा ह्मणे सहजे गांठीं। बांधी यातनेच्या कोटी ॥ ४ ॥

॥ ११२२ ॥ वदवी असत्याची वाणी। माजि निंदेची पुरवणी ॥ १ ॥ जळो जळो त्याचें तोंड। पचतें पापाचें चि कुंड ॥ २ ॥ कुश्चिळ सर्वदा अंतरीं। इतरांचिया घातावरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे भोगिल पीडा। नर्कवासी होउनी किडा ॥ ४ ॥

॥ ११२३ ॥ वर्माचा चि स्पर्श करी। क्षुद्र धरुनियां अंतरीं ॥ १ ॥ न धरी पातकाचें भय। नेणे पुढें होईल काय ॥ २ ॥ इच्छी सदा अभ्यंतरीं। परधन पराचिया नारी ॥ ३ ॥ निळा ह्मणे त्याची भेटी। होतां सुकृताची आटी ॥ ४ ॥

॥ ११२४ ॥ पिसाळलें श्वान। डसे भलत्या वसवसून ॥ १ ॥ नेणे आपुले पारिखे। घारले ते आपल्या दुःखें ॥ २ ॥ सुरापानीं भुलोनि जैसा। भोगी आपणा आणिकासरिसा ॥ ३ ॥ निळा ह्मणे तैसी परी। जिवितां महा मूर्ख करी ॥ ४ ॥

॥ ११२५ ॥ नाहीं विठोबाचें प्रेम। गाणीव श्रम वृथा चि तो ॥ १ ॥ काय करिती आपुल्या दैवा। भुली वैभवा जाणिवेच्या ॥ २ ॥ भरावें पोट हें चि जाणती। नरदेहा धाडिती व्यर्थ वांया ॥ ३ ॥ निळा ह्मणे गिळिलें कर्में। पुढें मरणजन्में अनिवारें ॥ ४ ॥

॥ ११२६ ॥ आतां अभक्त कातर। मळिन जयाचें अंतर ॥ १ ॥ दाऊनियां वरदळ वेष। मना अंगीं आशापाश ॥ २ ॥ वाचे सात्विक बोलणें। विषयीं वासनेचें ठाणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे घेउनी सोंगें। मिरवे चार करीत उगे ॥ ४ ॥

॥ ११२७ ॥ नावडे पंढरी । कथा करी दारोदारीं ॥ १ ॥ नको त्याचें संभाषण । वाटे भेटीसवें शीण ॥ २ ॥ सांगे ब्रह्मज्ञान वरी । नाहीं प्रेम तें अंतरीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे पोटभरू । उगे चि करिती गुरुगुरु ॥ ४ ॥

॥ ११२८ ॥ नाढळे कधीं ही पंढरी । नका सांगों त्याची थोरी ॥ १ ॥ मिथ्या करितीं ते चार । सोंग कथेचा विस्तार ॥ २ ॥ नाहीं प्रेमा पांडुरंगीं । चित्त विषयसेवा भोगी ॥ ३ ॥ निळा ह्मणे दावी जैसें । नाहीं अंतर झालें तैसें ॥ ४ ॥

॥ ११२९ ॥ ऐसीं चि देखिलीं उदंडें । जळो त्यांचीं काळीं तोंडें ॥ १ ॥ मुखें सांगती परमार्थ । स्वार्थ अंतरीं अनर्थ ॥ २ ॥ अनुताप दाविती वैराग्यें । वरी अंतरबाह्य रंगे ॥ ३ ॥ निळा ह्मणे उगी चि रीति । पडली संसारीं कुंथिती ॥ ४ ॥

॥ ११३० ॥ कोण तया लेखी । नाहीं विठ्ठलीं ओळखी ॥ १ ॥ करिती तितुकें पोटासाठीं । गाणें नाचणें आटाआटी ॥ २ ॥ कळा दाविती व्युत्पत्ती । चातुर्य जाणिवेची संपत्ती ॥ ३ ॥ निळा ह्मणे संतांपुढें । येतां लाजती तीं माकडें ॥ ४ ॥

॥ ११३१ ॥ निर्भीड बोलणें । ज्याचें आपस्वार्थी जिणें ॥ १ ॥ त्याचिये संगतीचें फळ । होय चित्तासी खळबळ ॥ २ ॥ परदुःख नेणतां । करी परान्नें पुष्टता ॥ ३ ॥ निळा ह्मणे दावी सोंग । ऐसा त्यजावा मातंग ॥ ४ ॥

॥ ११३२ ॥ होईल अंगीं बळ । तरी फजीत करावे ते खळ ॥ १ ॥ जे कां करुनियां पाखांड । लटिकें चि वाढविती बंड ॥ २ ॥ भोंदिती भाविकां । कथुनी परमार्थ तो लटिका ॥ ३ ॥ निळा ह्मणे तोंडें सांगे । तैसे नाचरोनियां अंगें ॥ ४ ॥

॥ ११३३ ॥ जाणिवेचा झाला फुंद । भाग्यमंद नेणे तो ॥ १ ॥ सांगतां हि न मानी हित । करी आघात आपुला ॥ २ ॥ मना आला अर्थ काढी । ओढे ओढी अहंतेचे ॥ ३ ॥ निळा ह्मणे द्वैतबुद्धी । नये तो कधीं परिपाका ॥ ४ ॥

॥ ११३४ ॥ तत्वता न कळे । आलें मना तें चावळे ॥ १ ॥ खरियासी मानी

खोटें । खोटें खऱ्या ऐसें वाटे ॥ २ ॥ अंध न देखे निवाडु । तम तैसा हा चि उजिवडु ॥ ३ ॥ निळा ह्मणे बुद्धि मळिन । नेणे पाप कीं हें पुण्य ॥४॥

॥ ११३५ ॥ चातुर्य मिरवी । कळा व्युत्पत्ति दाखवी ॥ १ ॥ परि तें अवघें वांया गेलें । एका न भजतां विठ्ठलें ॥ २ ॥ गायनाची कळा । आसनें मुद्रेचा सोहळा ॥ ३ ॥ निळा ह्मणे जें जें करी । सोंग चि तें तें अवघें वरी ॥ ४ ॥

॥ ११३६ ॥ व्युत्पत्तीचें ज्ञान । सांचवणी तें जीवन ॥ १ ॥ नव्हे पांडुरंग कृपा । नाना मंत्रें करितां जपा ॥ २ ॥ उपवास पारणीं । नाम उच्चारितां वाणी ॥ ३ ॥ निळा ह्मणे न पवे सेवा । ऐसी सर्वात्मका देवा ॥ ४ ॥

॥ ११३७ ॥ जें जें बोले तें विकळ । नाहीं विठ्ठलीं कळवळ ॥ १ ॥ कोरडें चि शब्दज्ञान । नाहीं प्रेमाचें जीवन ॥ २ ॥ जाणे तर्क वितर्क मति । समर्पक समयीं स्फूर्ती ॥ ३ ॥ निळा ह्मणे पडिली हातीं । जाणीवेच्या नुगवे गुंती ॥ ४ ॥

॥ ११३८ ॥ जाणिवेचें ज्ञान । तर्कवादाचें जल्पन ॥ १ ॥ काय करूं तो गोमटा । भरला अहंकाराचा फांटा ॥ २ ॥ बोले तें तें तायें तायें । नेणे परमार्थाची सोये ॥ ३ ॥ निळा ह्मणे तैसी चि गतीं । पावे आपुलिया मती ॥ ४ ॥

॥ ११३९ ॥ बोलणें परमार्थ । आशा अंतरीं अनर्थ ॥ १ ॥ काय करूं ते व्युत्पत्ती । बहुरूप्याची संपत्ती ॥ २ ॥ रसाळ वाचेसी बोलणें । माळा मुद्रांचीं भूषणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे गेली । वांया न भजतां विठ्ठलीं ॥ ४ ॥

॥ ११४० ॥ आणिकांतें उपदेशी । आपण मळिन मानसीं ॥ १ ॥ बोले ते ते धूर्त वादें । लटिक्या चि प्रेमें रडे स्फुंदे ॥ २ ॥ सोंग परमार्थ हा सार । आशा अंतरीं विखार ॥ ३ ॥ निळा ह्मणे देहाभिमानें । गेलीं भोगिती ते पतनें ॥ ४ ॥

॥ ११४१ ॥ नेणोनियां आत्महित । करिती घात अभिमानी ॥ १ ॥ नसतीच वाढवुनियां उपाधी । पडती मधीं संदेहा ॥ २ ॥ नाठवुनियां विठ्ठल देवा । करिती सेवा भूतांची ॥ ३ ॥ निळा ह्मणे जन्मोनि गेला । वृथा चि पडिला निरयांत ॥ ४ ॥

॥ ११४२ ॥ आपणा नोळखे । झाले ठायीं चि पारिखे ॥ १ ॥ विस्मय हा वाटे मना । कैसी भ्रमाची भावना ॥ २ ॥ निज विसराचिया हातें । हारविले हो आपणीयातें ॥ ३ ॥ निळा ह्मणे घरिंच्या घरीं । आपआपणियासी चि चोरी ॥ ४ ॥

॥ ११४३ ॥ ठायीं मी चि नाहीं ह्मणे । हारपलों भ्रांतिगुणें ॥ १ ॥ लोकां ह्मणे धांवा धांवा । मज आपणा भेटवा ॥ २ ॥ प्रभा सूर्यातें गिवसी । गोडी पुसे साखरेसी ॥ ३ ॥ निळा ह्मणे लहरी साधु । भेटावया करी खेदु ॥ ४ ॥

॥ ११४४ ॥ सर्वी असतां सर्वपणें । मी हें ह्मणे अविद्या गुणें ॥ १ ॥ पाहतां आधीं अविद्या चि वावो । तेथें मीपणाचा कैंचा ठावो ॥ २ ॥ मी ही नाहीं तूं ही नाहीं । एकीं एकत्व नुमसे पाहीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे न होनी कांहीं । नसोनी असे आपुल्या ठायीं ॥ ४ ॥

॥ ११४५ ॥ मी माझें पाहतां न देखे चि दिठी । आदि मध्य शेवटीं विचारितां ॥ १ ॥ टवाळ हे मिथ्या अविद्येचें भान । चेईलिया स्वप्न जैसें होय ॥ २ ॥ मृगजळ नदी आभासला पूर । न भिजे उखर कोरडें चि ॥ ३ ॥ निळा ह्मणे कांति दिसे ते वाउगी । वेगळा उरगीं पासुनी सा ॥ ४ ॥

॥ ११४६ ॥ पूर्णापासुनी झालें आख । शेखीं पूर्ण चि नुरे लेख ॥ १ ॥ पूर्णी असतां पूर्णपण । नेणे आपणा आपण ॥ २ ॥ दशक वाढउनी शेवटीं । पूर्णपणें घाली पोटीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे कांहीं चि नाहीं । तें चि या बीज विश्वा पाहीं ॥ ४ ॥

॥ ११४७ ॥ विटेवरी कैवल्यगाभा । राहिला उभा पंढरिये ॥ १ ॥ आलीयासी देतो धणी । सर्वा गुणीं संपन्न हा ॥ २ ॥ भुक्ती मुक्ती देतो रिद्धी । स्थापीतो पदीं अधिकारिया ॥ ३ ॥ निळा ह्मणे पुरवी कोड । उरों चि सांकड नेंदी हा ॥ ४ ॥

॥ ११४८ ॥ नाहीं विश्वास जया गांठीं । न पाहती दिठी पंढरी ते ॥ १ ॥ अदृष्ट साचें हीन झालें । न देखती पाउलें विटेवरी ॥ २ ॥ लक्ष चौऱ्यायशीं यातना भोग । सोशिती अभंग दैन्यवाणे ॥ ३ ॥ निळा ह्मणे नाडले बांया । दुर्लभ पावोनियां नरदेह ॥ ४ ॥

॥ ११४९ ॥ धिक् त्याचें जन्मांतर । न देखे पंढरपुर महा पापी ॥ १ ॥ अहारे कर्मा बलवत्तरा । नेला अघोरा भोगावया ॥ २ ॥ नेदी चि उपजो विश्वास मनीं । पंढरी हे नयनीं देखावया ॥ ३ ॥ निळा ह्मणे संग्रह होतां । पापाचा आईता उघडला तो ॥ ४ ॥

॥ ११५० ॥ न देखे जो पंढरिनाथ । झाला हाहाभूत जन्म त्याचा ॥ १ ॥ वांया गेला पतना नेला । नाहीं आठविला हरि ह्मणुन ॥ २ ॥ कैंचें तया पंढरपुर । पदरीं अपार दोषमळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे देईल झाडा । जाउनी पुढां यमदंड ॥ ४ ॥

॥ ११५१ ॥ वाळिलें जें पंढरिनाथें । त्याचें कोण कार्य येथें ॥ १ ॥ घाला आपणा बाहेरी । नका सांगों त्याची थोरी ॥ २ ॥ आगम पाहिला वेदांत । चित्त विषयापें सतत ॥ ३ ॥ धनें मानें केले वेडे । सुख नेणती ते बापुडे ॥ ४ ॥ मान इच्छा चाड जीवीं । काय करूं ते गोसावी ॥ ५ ॥ जाती ह्मणोनी आना ठाया । निळा दुरी पासुनी तयां ॥ ६ ॥

॥ ११५२ ॥ पांडुरंगा न पाहाती । ज्ञान गाडेवर बोलती ॥ १ ॥ त्यांचें न व्हावें दर्शन । देवा दुषीती ह्मणउन ॥ २ ॥ नाईकावे त्यांचे बोल । विठ्ठल कृपेवीण फोल ॥ ३ ॥ निळा ह्मणे करिती कथा । अवघी पोकळ त्यांची वृथा ॥ ४ ॥

॥ ११५३ ॥ जया नावडे पंढरी । निरयवासी तो अघोरी ॥ १ ॥ विठोबासी निंदी वाचा । यमदंड तो पावे साचा ॥ २ ॥ न घे विठोबाचें नाम । वृथा गेला त्याचा जन्म ॥ ३ ॥ निळा ह्मणे प्रेतरूप । त्याचें पुण्य तें चि तें पाप ॥ ४ ॥

॥ ११५४ ॥ विठ्ठल नाहीं ज्या ठाउका । परमार्थ चि त्याचा लटिका ॥ १ ॥ करितो तें पोटासाठीं । बाष्कळ अवघीच चावटी ॥ २ ॥ दावील तें जाणा सोंग । धरुनी परमार्थाचें अंग ॥ ३ ॥ निळा ह्मणे टिळे माळा । धरिला वृथा तो भोंपळा ॥ ४ ॥

॥ ११५५ ॥ असोतु ऐसियाच्या गोठी । काय करुनी लाभा तुटी ॥ १ ॥ गाऊं विठ्ठलु सांवळा । आठवूं तो वेळोवेळां ॥ २ ॥ जया चरणीं ब्रीदभार । वांकि किंकिणी झणत्कार ॥ ३ ॥ निळा ह्मणे तुळसीमाळा । पदक एकावळी गळां ॥ ४ ॥

## पंढरीनाथ व पंढरीमहात्म्य.

॥ ११५६ ॥ माझा बोल खरा चाल खरा । मति विस्तारा फांकविली ॥ १ ॥ विठ्ठल देवें केली कृपा । दाविला सोपा निज पंथ ॥ २ ॥ यावें जावें पंढरपुरा । आपुल्या माहेरा वस्तीसी ॥ ३ ॥ निळा ह्मणे घातली सुती । माझिये हातीं कृपाघनें ॥ ४ ॥

॥ ११५७ ॥ जाउनियां भीमातटीं । नाचों वाळुवंटीं पंढरिये ॥ १ ॥ होतील लाभाचिया कोटी । पहातां दृष्टी विठ्ठला ॥ २ ॥ भुक्ति मुक्ति आपुल्या सुखें । येती हरिखें सामोऱ्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे परमार्थ धणी । होईल आयणी फिटोनी ॥ ४ ॥

॥ ११५८ ॥ जाईन ह्मणतां चि पंढरपुरा । कळिकाळा दरारा उपजे मनीं ॥ १ ॥ यमधर्माचिया दंडासी चुकला । आणि पूज्यमान झाला तिहीं लोकां ॥ २ ॥ विधी ह्मणे तया निषेधु चि नाहीं । कर्माकर्मप्रवाहीं न पडे चि तो ॥ ३ ॥ निळा ह्मणे तेणें आनंदवुनी सकळां । नेलें आपुल्या कुळा वैकुंठासी ॥ ४ ॥

॥ ११५९ ॥ योगी चिंतिती चिंतनीं । ध्यानीं मनीं रूप ज्याचें ॥ १ ॥ तो हा अकल्पीत चि आला । उभा केला पुंडलिकें ॥ २ ॥ हृत्कमळीं चतुरानन । ज्यातें स्तवून पूजितु ॥ ३ ॥ निळा ह्मणे शिव हि चिंती । ज्यातें एकांतीं सर्वदा ॥ ४ ॥

॥ ११६० ॥ सांपडला ठेवा । आतां पात्र झालों दैवा ॥ १ ॥ माझ्या वडिलांची हे जोडी । होती पुरातन चोखडी ॥ २ ॥ जगादीचें जुनें । टांकसाळी खरें नाणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे माझ्या दैवें । हातीं लागलें पडिल ठावें ॥ ४ ॥

॥ ११६१ ॥ हिंडवितां देश । न ये तुटी ज्या लाभास ॥ १ ॥ चाले सर्व घेणें देणें । कोठें कांहीं न पडे उणें ॥ २ ॥ पारखीतां भलें । कसीतां ही उतरलें ॥ ३ ॥ निळा ह्मणे निवडी नाहीं । एकसारिखें चि अवघें ही ॥ ४ ॥

॥ ११६२ ॥ जुनाट पारखी । पारखिलें सनकादिकीं ॥ १ ॥ आतां

कोण काढी खोडी । मोडूं जातां फाडो वाडी ॥ २ ॥ दुरुनी देखतां चि कळे । निवती देखण्याचे डोळे ॥ ३ ॥ निळा ह्मणे खऱ्या वित्ता । बोल कोण ठेवी आतां ॥ ४ ॥

॥ ११६३ ॥ वजनीं ही नव्हे उणें । तुकुनी पहातां सुजाणें ॥ १ ॥ झिजलें ना कुहिजलें । नित्य नवें चि चांगलें ॥ २ ॥ नलगे घालावी निशाणी । वारंवार क्षणक्षणीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे कोठें तरी । नेतां देश देशांतरीं ॥ ४ ॥

॥ ११६४ ॥ घडूं जातां अळंकार । होती अवघे चि शृंगार ॥ १ ॥ नलगे उजळा ही देणें । शोभती अंगींच्या बरवेपणें ॥ २ ॥ आंतु बाहेरी सारिखें । न ये हीनपणा वीकें ॥ ३ ॥ निळा ह्मणे सुधा माल । हातीं लागला सुढाळ ॥ ४ ॥

॥ ११६५ ॥ तिहीं लोकां जें दुर्लभ । होतें निक्षेपिलें स्वयंभ ॥ १ ॥ वेदराय सनकादिकीं । पोटाळुनियां एकाएकीं ॥ २ ॥ तें चि मुळिचें भांडवल । नांव पावलें विठ्ठल ॥ ३ ॥ निळा ह्मणे इटेवरी । ठविलें पुंडलिकें तें द्वारीं ॥ ४ ॥

॥ ११६६ ॥ नित्य निरामय सागरीं । मथन करुनी विचार मुरीं ॥ १ ॥ काढिला नवनिताचा गोळा । तो हा ईटेवरी सांवळा ॥ २ ॥ जया तया लागे गोड । हरी क्षुधा अवघी चाड ॥ ३ ॥ निळा ह्मणे दैवें हातीं । लागला जिहीं गाइला गीतीं ॥ ४ ॥

॥ ११६७ ॥ वेद शोधितां शिणले । मग ते मौन चि राहिले ॥ १ ॥ देखोनि निजात्मा निर्मळा । नेणती गोरा कीं सांवळा ॥ २ ॥ हा ऱ्हस्व दीर्घ न ये माना । बाळ वृद्ध किंवा तरुणा ॥ ३ ॥ निळा ह्मणे तो हा येथें । आला भेटों पुंडलीकातें ॥ ४ ॥

॥ ११६८ ॥ उभा ठेला इटेवरी । प्रभा दाटली अंबरीं ॥ १ ॥ विठो कैवल्याचा गाभा । व्यापुनियां ठेला नभा ॥ २ ॥ नेणती कुसरी । ब्रम्हादिक ज्याची थोरी ॥ ३ ॥ निळा म्हणे भक्तिसुखा । भुलोनियां आला देखा ॥ ४ ॥

॥ ११६९ ॥ चिमणें ठाण कटीं कर । मूर्ति सांवळी सकुमार ॥ १ ॥ होय डोळियां पारणें । पहातां दिसे राजसवाणें ॥ २ ॥ जडोनि ठेले

सनकादिक । चरणीं ठेवुनियां मस्तक ॥ ३ ॥ निळा म्हणे ओंवाळिती । संत प्राणांचिया ज्योती ॥ ४ ॥

॥ ११७० ॥ निजानंद सुसावला । विठ्ठल झाला रूपाकृती ॥ १ ॥ तेणें लांचावलीं मानसें । लाविलें पिसें संतजनां ॥ २ ॥ नित्य त्यातें चि अवलोकिती । आणि वानिती गुण वाचे ॥ ३ ॥ निळा म्हणे नाचती रंगीं । करिती जगीं उत्साहा ॥ ४ ॥

॥ ११७१ ॥ टाळ विणे मृदंगेसीं । येती गजरेंसी मिरवत ॥ १ ॥ छत्रिने पताका गरुड टके । घेउनी हरिखें अवलोकिती ॥ २ ॥ म्हणती जन्म सुफळ झाला । आजि देखिला परात्पर ॥ ३ ॥ निळा म्हणे विठ्ठल हरी । ठेवुनी अंतरीं सुखावती ॥ ४ ॥

॥ ११७२ ॥ विठ्ठल मूर्ति पाहतां दिठी । पळती कोटी पापाच्या ॥ १ ॥ मग तो आविर्भवे अंतरीं । दिसे बाहेरी चहूंकडे ॥ २ ॥ दुजें येऊं चि नेदी आड । रूपची दुवाड मायाकृत ॥ ३ ॥ निळा म्हणे व्यापुनी दिशा । ठाके सरिसा दृष्टीपुढें ॥ ४ ॥

॥ ११७३ ॥ कैसी वानूं त्याची थोरी । ज्याची चराचरीं जीवनकळा ॥ १ ॥ आदिकरूनी ब्रम्हादिक । शेवटील कीटक धरुनियां ॥ २ ॥ चंद्र सूर्य तारांगणा । दीप्ति हुताशना ज्याचेनी ॥ ३ ॥ निळा म्हणे महिमा ज्याचा । वर्णितां वाचा वेद मुके ॥ ४ ॥

॥ ११७४ ॥ नाना तर्कें विचार केला । शेखीं राहिला नेणवे चि ॥ १ ॥ ते हे निर्गुण निराभास । झाले रूपस इटेवरी ॥ २ ॥ वेद पुराणें नाना शास्त्रें । शिणलीं वक्त्रें वानितां ॥ ३ ॥ निळा म्हणे भक्तांसाठीं । उभा करकटीं राहिला ॥ ४ ॥

॥ ११७५ ॥ नेमुनियां ठेविले जेथें । वसती तेथें ते देव ॥ १ ॥ ऐसा समर्थ पंढरिनाथ । तो हा मोहित भक्तीसुखा ॥ २ ॥ जेणें निर्मुनी पांच हि तत्वें । राखिलीं समत्वें निज आज्ञा ॥ ३ ॥ निळा म्हणे ब्रह्मांडें भुवनें । स्वर्गे आनानें रचिगलीं ॥ ४ ॥

॥ ११७६ ॥ अष्ट हि दिग्गज आणि दिक्पाळ । थावरिले कुळाचळ

निज सत्ता ॥ १ ॥ तो हा परमात्मा श्रीहरी । येउनी इटेवरी ठाकला ॥ २ ॥ जेणें सागर सप्तावृतीं । भरिले उचंबळती सर्वदा ॥ ३ ॥ निळा ह्मणे ज्याचे-नी रवी । नित्य नवा मिरवी प्रकाश ॥ ४ ॥

॥ ११७७ ॥ सकळा मंगळाचें धाम । ज्याचेनि विश्राम विश्रांती ॥ १ ॥ तो हा पंढरीचा रावो । सकळां ठावो कल्याणा ॥ २ ॥ ज्याचेनि सुखा सुखपण । ज्याचेनि त्रिभुवन रूपस ॥ ३ ॥ निळा ह्मणे ज्याचेनि निगमा । आणिली गरिमा जाणिवेची ॥ ४ ॥

॥ ११७८ ॥ ज्याचें मोक्षा मोक्षत्व देणें । मुक्तीसी स्थापणें मुक्तत्वीं ॥ १ ॥ तो हा जगज्जनक मुरारी । उभा भीमातीरीं पंढरिये ॥ २ ॥ जेणें शांतिसी शांतीपद । दिधला आनंद आनंदा ॥ ३ ॥ निळा ह्मणे जेणें वेद । केला प्रबुद्ध पढवुनी ॥ ४ ॥

॥ ११७९ ॥ धांवोनियां वाडेंकोडें । आलों भेटी तुम्हांपुढें ॥ १ ॥ झड-करी उठोनियां आतां । क्षेम द्या हो पंढरिनाथा ॥ २ ॥ न करितां उदास । वाटेल आगळा हा रस ॥ ३ ॥ निळा ह्मणे प्रेमा । न खंडावा पुरुषो-त्तमा ॥ ४ ॥

॥ ११८० ॥ विठ्ठल विठ्ठल ह्मणोनि छंदें । ब्रह्मानंदें नाचेन ॥ १ ॥ धरू-नियां दृष्टीपुढें । रूप चोखडें सुरेख ॥ २ ॥ वारंवार क्षणक्षणा । ठेवीन चर-णावरी माथा ॥ ३ ॥ निळा ह्मणे पुरवा कोड । जाणोनि चाड हे माझी ॥ ४ ॥

॥ ११८१ ॥ आत्मा सकळांचा श्रीहरी । तो हा उभा पंढरपुरीं ॥ १ ॥ ह्मणोनियां देव येती । दर्शना ऋषींच्या पंगती ॥ २ ॥ प्रतिवर्षीं उपासक । येती यात्रे सनकादिक ॥ ३ ॥ निळा ह्मणे त्रैलोक्यदाता । विठो लक्ष्मीचा भर्ता ॥ ४ ॥

॥ ११८२ ॥ पाहोनि हरिकीर्तन । होती प्रसन्न देव तुह्मां ॥ १ ॥ सन-कादिक येती भेटी । कथा गोमटी ऐकावया ॥ २ ॥ संत महंत येउनी पुढें । बैसती गाढे किर्तनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे पांडुरंग । रंगीं रंग मेळवील ॥ ४ ॥

॥ ११८३ ॥ नाना मत मतांतरें । वेद सुस्वरें स्तविती ज्या ॥ १ ॥ तो हा येउनी पंढरीसी । भक्तांपासीं तिष्ठतु ॥ २ ॥ जयालागीं आराधनें ।

योगयोगाचीं साधनें ॥ ३ ॥ निळा ह्मणे कथा कीर्ती । जया रुचे सत्संगती ॥ ४ ॥

॥ ११८४ ॥ वसवुनियां चराचर । उभा नागर इटेवरी ॥ १ ॥ सगुण रूपें भासे लोकां । परि हा नेटका निरामय ॥ २ ॥ दैत्यांतक चि ह्मणती यासी । परि हा सकळांसी भक्षक ॥ ३ ॥ भक्तांपासीं गुंतला दिसे । परि हा वसे अणुरेणीं ॥ ४ ॥ कर्ता भोक्ता वाटे सकळां । परि हा वेगळा अलिप्त ॥ ५ ॥ निळा ह्मणे नये चि मना । करितां विवंचना श्रुति शास्त्रांसी ही ॥ ६ ॥

॥ ११८५ ॥ उमटलीं खडकावरी । पदें गोजिरीं विष्णूचीं ॥ १ ॥ देखोनियां ते सात्विक जन । करिती पिंडदान तये पदीं ॥ २ ॥ पंढरिये नारदाश्रमीं । भीमासंगमीं पुष्पावती ॥ ३ ॥ निळा ह्मणे दक्षिण गया । उद्धरावया पूर्वजां ॥ ४ ॥

॥ ११८६ ॥ नामस्मरणें चि श्रीहरी । दासां दुरिता दूरी करी ॥ १ ॥ तो हा पंढरिये ठाके । गुंतोनियां भक्तां भाके ॥ २ ॥ हरिभक्तां यां उद्धरी । तत्संगें आणिकांतें तारी ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसी कीर्ती । सनकादिक संत गाती ॥ ४ ॥

॥ ११८७ ॥ आला स्वइच्छा पंढरपुरा । सांडुनियां क्षीरसागरा ॥ १ ॥ पुढें देखोनियां इटे । चरण ठेविले गोमटे ॥ २ ॥ दोन्ही हात कटावरी । ठेवुनी परमात्मा श्रीहरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जगदोद्धार । करीत उभा निरंतर ॥ ४ ॥

॥ ११८८ ॥ सकुमार सुंदर । अंगकांति मनोहर ॥ १ ॥ विठो घननीळ सांवळा । लावण्य मदनाचा पुतळा ॥ २ ॥ कसीयेला पितांबर । चरणीं ब्रीदाचा तोडर ॥ ३ ॥ निळा ह्मणे माळा कंठीं । मुगुटीं मोरविसावेटी ॥ ४ ॥

॥ ११८९ ॥ तापत्रयाचें हि हरण । ते हे गोजिरे श्रीचरण ॥ १ ॥ आले पुंडलिकाचिये भेटी । ठेले इटेच्या नेहटी ॥ २ ॥ सकळ हि सामुद्रिका ओळी । शोभती उभय पादतळीं ॥ ३ ॥ निळा म्हणे ज्यातें ध्याती । देवत्रयादि ऋषी पंगती ॥ ४ ॥

॥ ११९० ॥ विठोजि कृपेचा सागर । दीनबंधु करुणाकर ॥ १ ॥ म्हणोनियां स्तविती संत । होउनी याचे चरणीं रत ॥ २ ॥ उपेक्षुनियां न सांडी

कोणा । शरणांगता थोरा लहाना ॥ ३ ॥ निळा म्हणे धरिलें हातीं । तया मग न सोडी कल्पांतीं ॥ ४ ॥

॥ ११९१ ॥ आम्हां सुखा नाहीं चि उणें । सेवा गुणें स्वामींचिया ॥ १ ॥ अवघ्या ब्रम्हांडाच्या सूत्रीं । गाऊं वक्त्रीं गुण त्याचे ॥ २ ॥ जेणें उद्दंड सभाग्य केले । निज दास आपुले भूमंडळीं ॥ ३ ॥ निळा म्हणे उपेक्षूं नेणे । आपुलिया स्मरणें नामाच्या ॥ ४ ॥

॥ ११९२ ॥ अर्चूनियां पुंडलिका । विश्वव्यापका राहविलें ॥ १ ॥ थोर उपकार केला लोकां । भक्तां भाविकां तारियलें ॥ २ ॥ आणूनियां वैकुंठवासी । सगुण रूपेंसी भेटविला ॥ ३ ॥ निळा म्हणे ब्रम्हादिक । देव हि सकळिक मानवले ॥ ४ ॥

॥ ११९३ ॥ सुकाळ झाला नारीनरां । चराचरां मुक्तीचा ॥ १ ॥ विठोबाच्या दर्शनमात्रें । ऐकतां श्रोत्रें गुण साचे ॥ २ ॥ नित्य नवा चि उत्साह वाढे । हृदयीं न संडे आनंद तो ॥ ३ ॥ निळा ह्मणे जगदोद्धारा । उपाय बरा योजिला हा ॥ ४ ॥

॥ ११९४ ॥ सहज चि घरींहूनियां यावें । विठ्ठला पहावें रुक्मिणी ॥ १ ॥ न लभे चि जो कां ब्रह्मादिकां । तो या लोकां दाखविला ॥ २ ॥ भेटी चि घेतां बराबरी । सन्मानें करी गौरव ॥ ३ ॥ निळा ह्मणे भाग्यवंत । करी सनाथ अनाथा ॥ ४ ॥

॥ ११९५ ॥ गुण वर्णितां भागला शेष । महिमा विशेष न कळे तो ॥ १ ॥ वेद हि ठकोनि ठेले मौन । पार नेणोन स्वरूपाचा ॥ २ ॥ पुराणें हि कुंठित झालीं । अपार खोली नेणवे ते ॥ ३ ॥ निळा ह्मणे तो चि हा येथें । आणिला समर्थे पुंडलिकें ॥ ४ ॥

॥ ११९६ ॥ दर्शन याचें आदरें घेतां । ओपी सायुज्यता मुक्तितें ॥ १ ॥ न मानी कोणा साने थोर । दाता उदार जगदानी ॥ २ ॥ शरणांगताचा आदरी । वैषम्य अंतरीं असे चि ना ॥ ३ ॥ निळा म्हणे भाव चि गांठीं । देखतां सांटी करूं धांवे ॥ ४ ॥

॥ ११९७ ॥ बहुत याचक सांभाळिले । जे जे झाले शरणांगत ॥ १ ॥

नाना वर्ण नाना याती । धरिले हातीं नुपेक्षुनी ॥ २॥ केले वरिष्ठ सकळा-
लागीं । मिरविले निजांगीं आपुलिये ॥ ३ ॥ निळा म्हणे उबग नेणे ।
करितां देणें कृपेचें ॥ ४ ॥

॥ ११९८ ॥ घांट गर्जे महाद्वारीं । विठ्ठलनामें वागेश्वरी ॥ १ ॥ निळा
उभा रंगशिळे । प्रेमें गळती दोन्ही डोळे ॥ २ ॥ इटे उभा तो देखिला ।
भाव भक्ति आलिंगिला ॥ ३ ॥ निळा म्हणे आवडी पोटीं । हृदय सांठ-
विला संपुष्टीं ॥ ४ ॥

॥ ११९९ ॥ बिजापोटीं महा तरु । होता फांकला तो थोरु ॥ १ ॥
सविताबिंब दिसे सान । प्रकाशिलें त्रिभुवन ॥ २ ॥ तेंवि विठ्ठल विटेवरी ।
भासे परि तो चराचरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जीवन जीवा । प्राण प्राणाचा
आघवा ॥ ४ ॥

॥ १२०० ॥ नाम रूप नातळे ज्यासी । परात्पर ऐसी वदती ॥ १ ॥
तो हा आला पंढरपुरा । समाचारा भक्तांच्या ॥ २ ॥ ओळखिला पुंडलिकें ।
केलें निकें पूजन ॥ ३ ॥ निळा ह्मणे इटेवरी । स्थापिला तीरीं चंद्रभागे ॥ ४ ॥

॥ १२०१ ॥ भक्त उत्तीर्णत्वालागीं । राहिला युगीं युगें जातां ॥ १ ॥
न फिटे चि तरी त्याचें ऋण । भक्त संपन्न वैभवें ॥ २ ॥ देती अन्न आच्छा-
दन । ह्मणती येथून नवजावें ॥ ३ ॥ निळा ह्मणे केला उभा । जो या
नभा व्यापक ॥ ४ ॥

॥ १२०२ ॥ म्हणती ज्यातें परात्पर । तो हा उभा कटीकर ॥ १ ॥ रूपें
गोजिरा सगुण । अवलोकितां निवे मन ॥ २ ॥ मुगुट कुंडलें मेखळा । कांसे
मिरवे सोनसळा ॥ ३ ॥ निळा ह्मणे संतभेटी । उतावेळ सदा पोटीं ॥ ४ ॥

॥ १२०३ ॥ संतभेटीचें आरत । उभा चि राहिला तिष्ठत ॥ १ ॥ बाप
कृपाळु श्रीहरि । वाट पाहे निरंतरीं ॥ २ ॥ धांव घालूनियां पुढें । आलिंगी
त्या वाडेंकोडें ॥ ३ ॥ निळा ह्मणे नवा चि नित्य । सोहळा भक्तांचा
करित ॥ ४ ॥

॥ १२०४ ॥ भक्तकृपाळू माउली । कटीं कर उभी ठेली ॥ १ ॥ मोर्हें
पाहे मुखाकडे । भेटावया वाडेंकोडें ॥ २ ॥ परम प्रीतिचा वोरस । सदा-
सर्वदा उल्हास ॥ ३ ॥ निळा ह्मणे सुप्रसन्न । भक्तांलागीं हास्यवदन ॥ ४ ॥

॥ १२०५ ॥ मुसावलें मुसें । प्रेम भक्तांचे वोरसें ॥ १ ॥ भरूनियां विठ्ठलरूप । इटे टाकलें चिद्रूप ॥ २ ॥ सांवळे सुंदर । कसूनियां पीतांबर ॥ ३ ॥ निळा ह्मणे पदकें गळां । वैजयंती सुमनमाळा ॥ ४ ॥

॥ १२०६ ॥ गरुड हनुमंत । पुढें सेवेसी तिष्ठत ॥ १ ॥ उभा वैकुंठनिवासी । देव येती दर्शनासी ॥ २ ॥ महाद्वारीं गरुडध्वज । गगनीं झळके तेजःपुंज ॥ ३ ॥ निळा ह्मणे कथा कीर्ति । संत सन्मुख नाचती ॥ ४ ॥

॥ १२०७ ॥ झाली कीर्तनाची दाटी । चंद्रभागे वाळुवंटीं ॥ १ ॥ संत गर्जती आनंदें । हरिचीं नामें नाना छंदें ॥ २ ॥ टाळ मृदंग झणत्कार । नामें कोंदलें अंबर ॥ ३ ॥ निळा ह्मणे वैकुंठवासी । झाला सुलभ हरिभक्तांसीं ॥ ४ ॥

॥ १२०८ ॥ देऊनियां आपुलें प्रेम । करी भक्तांचा संभ्रम ॥ १ ॥ आधीं निष्काम संपत्ती । तया वोपी भुक्ति मुक्ति ॥ २ ॥ निश्चळ शांति क्षमा दया । सेवेलागीं अर्पी तया ॥ ३ ॥ निळा ह्मणे महा भाग्य । तें त्या समर्पी वैराग्य ॥ ४ ॥

॥ १२०९ ॥ नाना अवतार धरिले जेणें । देवांसी उणें आणियेलें ॥ १ ॥ तो हा संतांचिये भारीं । उभा तीरीं चंद्रभागे ॥ २ ॥ तुळसीपत्र बुका मागे । धन वित्त नलगे ह्मणतसे ॥ ३ ॥ निळा ह्मणे अंतरींचा । भाव साचा ओळखे ॥ ४ ॥

॥ १२१० ॥ नाम चि एक उच्चारिलें । ते हि नेले निजधामा ॥ १ ॥ ऐसा याचा कीर्तिघोष । वर्णिती शेष निगमादिक ॥ २ ॥ जिहीं अवलोकिला दिठी । धन्य सृष्टीमाजि ते ॥ ३ ॥ निळा ह्मणे यात्रे येती । ते ते पावती इच्छिलें ॥ ४ ॥

॥ १२११ ॥ मागें तुह्मी वांटिलें लोकां । सनकादिकां पर्यंत ॥ १ ॥ अधम ते हि थोराविले । आपणा केले सारिखे ॥ २ ॥ नाहीं विचारिली याती । धरिलें हातीं प्रीतीनें ॥ ३ ॥ काय त्याचें क्रियाकर्म । कांहीं धर्म न विचारा ॥ ४ ॥ उदारपणा नाहीं सीमा । पुरुषोत्तमा तुमचिया ॥ ५ ॥ निळा म्हणे सरते पुरते । केले किती वर्णावे ॥ ६ ॥

॥ १२१२ ॥ राहिला उभा इटेवरी । भक्तकैवारी ह्मणउनी ॥ १ ॥ जे जे येती ज्या ज्या भावें । तें त्या द्यावें नो बोलतां ॥ २ ॥ भुक्ति मुक्ति

वांटी एका । लाविल्या फुका रिद्धी सिद्धी ॥ ३ ॥ निळा ह्मणे सर्वाधिकारी । प्रेम भांडारी भक्त केले ॥ ४ ॥

॥ १२१३ ॥ केली कीर्ति अलोलिक । फुटली हांक त्रैलोक्यीं ॥ १ ॥ दोषी दुराचारी जन । केले पावन दर्शनें ॥ २ ॥ नामासाठीं मुक्ति फुका । हा ही नेटका बडिवार ॥ ३ ॥ निळा ह्मणे यात्रेसी येती । ते ते होती कृतार्थ ॥ ४ ॥

॥ १२१४ ॥ सर्व तीर्थें चहूं भागें । होती अंगें सुस्नात ॥ १ ॥ देव उभा ह्मणोनी तीरीं । सरोवरीं महिमा हा ॥ २ ॥ सकळां तीर्थां अधिष्ठान । ईटे चरण शोभले ॥ ३ ॥ निळा ह्मणे विठ्ठल ह्मणतां । सायुज्यता घर रिघे ॥ ४ ॥

॥ १२१५ ॥ आले भेटी संत जन । गर्जे गगन हरिनामें ॥ १ ॥ टाळ विणे मृदंग भेरी । छबिने अंबरीं झळकती ॥ २ ॥ विठ्ठलदेव धांवती पुढें । भेटती कोडें जिवलगा ॥ ३ ॥ निळा ह्मणे आलिंगनें । नव्हती भिन्न वेगळे ॥ ४ ॥

॥ १२१६ ॥ एक एका अवलोकिती । एक मिसळती एकांत ॥ १ ॥ संत ते चि झाले देव । संतीं देव विराजे ॥ २ ॥ येरायेरां मिठी पडे । आतां निवडे तें कैसें ॥ ३ ॥ निळा ह्मणे भक्तिसुखें । झाले सारखे उभयतां ॥ ४ ॥

॥ १२१७ ॥ ज्याचें करूनियां चिंतन । संत चरणीं होती लीन ॥ १ ॥ तो हा चंद्रभागे तीरीं । ठेऊनी हात कटावरी ॥ २ ॥ उभा राहिला तिष्ठत । वाट भक्तांची पाहात ॥ ३ ॥ निळा ह्मणे मुनिजनां । ज्याची निस उपासना ॥ ४ ॥

॥ १२१८ ॥ आराधिला पुंडलिकें । जननी पूजुनियां जनकें ॥ १ ॥ त्याच्या भावासी भुलला । भेटी धांवोनियां आला ॥ २ ॥ सहस्र सोळा परिवारेंसी । वस्ति केली तयापाशीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे पाचारिले । देवसमुदाय आणिले ॥ ४ ॥

॥ १२१९ ॥ पाहा भूवैकुंठ पंढरी । धरिली सुदर्शनावरी ॥ १ ॥ कैसा महिमा वर्णावा । जेथें वास विठ्ठल देवा ॥ २ ॥ संत सनकादिका

योगी । नित्य कीर्तनीं ठाकती ॥ ३ ॥ निळा म्हणे सात्विक जन । तरती पातकी पावन ॥ ४ ॥

॥ १२२० ॥ धन्य धन्य पुंडलिका । केला तरणोपाय लोकां ॥ १ ॥ एका दर्शनें चि उद्धार । केलें पावन चराचर ॥ २ ॥ चंद्रभागा पंढरपुर । भक्त आणि हरिहर ॥ ३ ॥ निळा म्हणे सुलभ केलें । भूमी वैकुंठ आणिलें ॥ ४ ॥

॥ १२२१ ॥ दर्शना धांवोनियां जे येती । तयां मुक्ति वोळंगती ॥ १ ॥ ऐसें जोडूनि ठेविलें । युगायुगीं उभें केलें ॥ २ ॥ हृत्कमळीं ब्रम्हादिक । ज्यातें पूजिती सनकादिक ॥ ३ ॥ निळा म्हणे कीर्ति घोष । न संडे त्रैलोक्यीं उल्हास ॥ ४ ॥

॥ १२२२ ॥ संत सनकादिक देव । भेटावया आले सर्व ॥ १ ॥ देवा भक्तांतें पूजिती । महिमा अद्भुत तो वर्णिती ॥ २ ॥ पावन केलीं पुंडलिकें । म्हणती नरनारी बाळकें ॥ ३ ॥ निळा ऐकोनियां ते वाणी । मिठी घालूं धांवे चरणीं ॥ ४ ॥

॥ १२२३ ॥ देवा भक्तांचा सोहळा । वाचे गाती वेळोवेळां ॥ १ ॥ म्हणती धन्य पंढरपुर । पुंडलीक मुनेश्वर ॥ २ ॥ चंद्रभागा पद्मतीर्थ । वेणुनादीं जन कृतार्थ ॥ ३ ॥ निळा म्हणे पांडुरंगा । भेटी तापत्रय भंगा ॥ ४ ॥

॥ १२२४ ॥ चंद्रभागे करितां स्नान । होती पातकी पावन ॥ १ ॥ पुंडलिकासी नमस्कार । करितां पूर्वजां उद्धार ॥ २ ॥ वेणुनादीं काला वांटी । तृप्ती पूर्वजां वैकुंठीं ॥ ३ ॥ निळा म्हणे पिंडदान । दक्षिण गया अधिष्ठान ॥ ४ ॥

॥ १२२५ ॥ उमटलीं विष्णुपदें । गयावर्जनीं जे प्रसिद्धें ॥ १ ॥ नारद क्षेत्री पंढरपुरी । अद्भुत पदाची त्या थोरी ॥ २ ॥ ऋणत्रया मुक्त-जन । देतां पदीं पिंडदान ॥ ३ ॥ निळा म्हणे गोपाळपुरीं । विठ्ठल वेणु वादन करी ॥ ४ ॥

॥ १२२६ ॥ पुष्पवतीच्या संगमीं । नारद मुनीच्या आश्रमीं ॥ १ ॥ विष्णु आपण क्रीडा करी । उमटलीं पदें तैं गोजिरीं ॥ २ ॥ गाई गोपाळ

संगती । वेणुवादनाची प्रीति ॥ ३ ॥ निळा म्हणे वांटी काला । आपण मध्यें अवघ्या मुलां ॥ ४ ॥

॥ १२२७ ॥ पांवा वाजवी मोहरी । बार दमामा दुंबरी ॥ १ ॥ नाचे गोपाळाच्या छंदें । क्रिडा करी ब्रम्हानंदें ॥ २ ॥ सांगोनी येरयेरा काहाणी । कोडी उगविती उमाणी ॥ ३ ॥ निळा म्हणे नाना सोंगें । संपा दिलीं पांडुरंगें ॥ ४ ॥

॥ १२२८ ॥ यमुनेच्या जो विहारीं । तो चि हा उभा पंढरपुरीं ॥ १ ॥ दह्यां दुधाचा सुकाळ । कार्तीकीये पर्वकाळ ॥ २ ॥ नवनिताचे गोळे । क्षिरामृताचे कल्लोळे ॥ ३ ॥ निळा म्हणे अळंकार । वस्त्रें मिरवी रमावर ॥ ४ ॥

॥ १२२९ ॥ वरी बुकियाचे धूसर । अत्तर कस्तुरी केशर ॥ १ ॥ तुळसी नाना सुमनमाळा । दिव्यांबराचा सोहळा ॥ २ ॥ पांडुरंगा ओंवाळिती । नारीनरें अवलोकिती ॥ ३ ॥ निळा म्हणे दिपावळी । सोडिती चंद्रभागा जळीं ॥ ४ ॥

॥ १२३० ॥ ओंवाळिती विठोबासी । निसानिस परमादरेंसी ॥ १ ॥ नवनिताचीं विलेपनें । पंचामृतें आभिषेचनें ॥ २ ॥ नाना उपभोग अर्पिती । नैवेद्य माळा पुष्पयाती ॥ ३ ॥ निळा म्हणे नामघोषें । करिती आनंद त्या उल्हासें ॥ ४ ॥

॥ १२३१ ॥ भाग्याचे ते नारीनर । अवलोकिती निरंतर ॥ १ ॥ उजळुनियां ताटीं ज्योती । वधुवरांतें ओंवाळिती ॥ २ ॥ नित्य पंढरीचा वास । उपमा नाहीं त्या सुखास ॥ ३ ॥ निळा म्हणे वेकुंठवासी । नित्य हरि जयापासी ॥ ४ ॥

॥ १२३२ ॥ भक्तां भाग्य घरा आलें । उभे चि ठेले सन्मुख ॥ १ ॥ म्हणे विठ्ठल माझें नांव । सांगों गांव वेकुंठा ॥ २ ॥ भेटावया तुम्हां आलों । निर्बुजलों वियोगें ॥ ३ ॥ निळा म्हणे पुंडलिका । भेटे सखा प्रीतीनें ॥ ४ ॥

॥ १२३३ ॥ पुंडलीक म्हणे हरी । राहे वरी विटे उभा ॥ १ ॥ अवलोकन वेळोवेळां । श्रीमुख डोळां रूप तुझें ॥ २ ॥ अलभ्य लाभ लक्ष कोटी ।

झाले भेटी दिली तुम्ही ॥ ३ ॥ निळा म्हणे मग पुंडलिक । करी पूर्वक विधी पूजा ॥ ४ ॥

॥ १२३४ ॥ भक्त देखोनियां श्रीहरी । केला घरीं वास पुढें ॥ १ ॥ म्हणे न वजे येथुनियां । युगें गेलिया कल्पकोटी ॥ २ ॥ प्रसन्न झाले निज भक्तासी । म्हणती मुक्तिसी वांटीन येथें ॥ ३ ॥ निळा म्हणे कृपावंत । राहिले तिष्ठत मग उभे ॥ ४ ॥

॥ १२३५ ॥ भुक्ति मुक्तीचें माहेर । वसविलें पूर पंढरी ॥ १ ॥ सुख वाश्रांतीसी आले । संतां पाचारिलें सज्जना ॥ २ ॥ कथा कीर्तनें मोहळा । छविने मेळा पताकांचा ॥ ३ ॥ निळा म्हणे पंचक्रोशी । नामें घोषीं दुम-दुमित ॥ ४ ॥

॥ १२३६ ॥ जे जे येती वारकरी । भेटों हरि धांवे सां ॥ १ ॥ म्हणे माझे अंतरंग । आले जिवलग भेटीसी ॥ २ ॥ करुनी प्रीतीचा सोहळा । अवलोकी डोळां क्षणक्षणा ॥ ३ ॥ निळा म्हणे आवडी ऐसा । होउनी सरिसा ठाके पुढें ॥ ४ ॥

॥ १२३७ ॥ एकाचिया हुंड्या भरी । एका घरीं दास्यत्व ॥ १ ॥ एकाचीं हा पेरी शेतें । घरें हातें शाकारी ॥ २ ॥ एकीं केलीं फेडी रिणें । गोणिया दाणे एका घरीं ॥ ३ ॥ निळा म्हणे पुरला सर्वां । देखोनि भावा अंतरींच्या ॥ ४ ॥

॥ १२३८ ॥ पुंडलीक पांडुरंग । संतसंग पद्माळे ॥ १ ॥ चंद्रभागा वाळ-वंट । भूवैकुंठ पंढरी ॥ २ ॥ वेणुनाद गोपाळपुर । पुष्पावती सार संगम ॥ ३॥ निळा म्हणे झाला मेळा । या भूगोला उद्धारा ॥ ४ ॥

॥ १२३९ ॥ पंढरिये केला वास । निज भक्तांस तारावया ॥ १ ॥ म्हणे यारे अवघे वर्ण । आदि ब्राम्हण करुनियां ॥ २ ॥ जया वैकुंठासी जाणें । तया हें पेणें पंढरी ॥ ३ ॥ निळा म्हणे सुकाळ केला । भक्तां ओळला कुवासा ॥ ४ ॥

॥ १२४० ॥ करुनी चंद्रभागे स्नान । अभिवंदन पुंडलीका ॥ १ ॥ पढ़ें जाती विठोबासी । वैकुंठवासी ते होती ॥ २ ॥ कथाश्रवण प्रदक्षणा ।

नाहीं गणना सुकृता सा ॥ ३ ॥ निळा म्हणे पूर्वजेसी । होती विमानेंसी प्रविष्ट ॥ ४ ॥

॥ १२४१ ॥ सहज गेलों पंढरपुरा । विश्वंभरा भेटीसी ॥ १ ॥ तो हा उभा इटेवरी । देखिला श्रीहरि जगदात्मा ॥ २ ॥ ज्याचिया तेजें धवळलें नभ । हा जगदारंभ अंगकांती ॥ ३ ॥ निळा म्हणे ब्रम्हादिकां । व्यापक लोकां सकळां जो ॥ ४ ॥

॥ १२४२ ॥ कौलें पिकली परलोक पेठ । हे भूवैकुंठ पंढरी ॥ १ ॥ नाम मुद्रा खरें नाणें । घेणें देणें लाभवरी ॥ २ ॥ ब्रम्हानंदें भरिलीं पोतीं । प्रेमें उथळती सीगवरी ॥ ३ ॥ निळा म्हणे जाऊं हाटा । करूं सांठा न सरेसा ॥ ४ ॥

॥ १२४३ ॥ विठ्ठल केणें मागें पुढें । विके उघडें सुरवाडिक ॥ १ ॥ एक ते घेती देती एक । तरि हें अधिक भरलेंसे ॥ २ ॥ युगें गेलीं करितां माप । निगमाहि अमूप नये माना ॥ ३ ॥ निळा म्हणे भाविकां जोगें । झालें हें अनुरागें आवडिच्या ॥ ४ ॥

॥ १२४४ ॥ पुंडलिकें शेत केलें । पिकविलें अपार ॥ १ ॥ संवगिता नावरे एका । मग सकळ लोकां हांकारी ॥ २ ॥ यारे म्हणे बांधा मोटा । करा सांठा न्या घरा ॥ ३ ॥ निळा म्हणे कल्पवरी । लुटिती परी सरेना ॥४॥

॥ १२४५ ॥ नाना लोक धांवोनि येती । रासी भरिती आईसा ॥ १ ॥ घेउनी जातां विश्वजना । नव्हे चि उणा माल फार ॥ २ ॥ युगें गेलीं वहातीं लोक । न सरे चि पीक वोसंडलें ॥ ३ ॥ निळा म्हणे पुंडलिकें । केलीं लोकें सभाग्य ॥ ४ ॥

॥ १२४६ ॥ कण चि आले हे घनदाट । कणिसें ताट नाढळे ॥ १ ॥ लुंगी भुस नाहीं कोंडा । पीक ब्रम्हांडा न समाये ॥ २ ॥ सनकादिकां आणि देवां । पुरेसें मानवा प्राणिमात्रा ॥ ३ ॥ निळा म्हणे तिहीं लोकां । केला पुंडलिकें सुकाळ ॥ ४ ॥

॥ १२४७ ॥ एक जोडी बहुतें खाती । भाग्यवंत म्हणती जन त्यासी ॥ १ ॥ परि सा आणिक साहित्यासी । नव्हे तैसा जोडी याची ॥ २ ॥

एकला एक चि पुंडलिका । जोडी त्रैलोक्या पुरविली ॥ ३ ॥ निळा म्हणे न सरे तरी । अद्यापि वरी तैसे चि ॥ ४ ॥

॥ १२४८ ॥ पुंडलीकें पिकविलें । विश्वा पुरलें न्यावया ॥ १ ॥ त्रैलोक्यमणि लागला हातीं । लोक ते किती नेतील ॥ २ ॥ विश्वनिर्मीता ज्याचे द्वारीं । निरंतरी तिष्ठत ॥ ३ ॥ निळा ह्मणे भाग्य त्याचें । अपार वाचे न वर्णवे ॥ ४ ॥

॥ १२४९ ॥ महिमा याचा चतुर्मुखा । न करवे चि लेखा वर्णितां ॥ १ ॥ सनकादिक हि नित्य येती । पूजा करिती देवभक्ता ॥ २ ॥ सुरवर आणि मुनिजन । संत सज्जन नित्य स्तविती ॥ ३ ॥ निळा ह्मणे सकळ हि तीर्थें । होती कृतार्थें दर्शनें ॥ ४ ॥

॥ १२५० ॥ विनंति माझी एकीं ऐका । अहो पुंडलिका महा मुनी ॥ १ ॥ ठाव द्यावा चरणापासीं । मज विठोबासी विनउनी ॥ २ ॥ अंगीकारा रंका दीना । विज्ञापना हे माझी ॥ ३ ॥ निळा ह्मणे सांभाळावें । मज हें द्यावें वरदान ॥ ४ ॥

॥ १२५१ ॥ पंढरपुरा जाऊं चला । भेटों रखुमाई विठ्ठला ॥ १ ॥ जन्ममरणाचें खंडण । अवलोकितां दृष्टी चरण ॥ २ ॥ पुंडलिका वंदूनियां । लागों विठोबाच्या पायां ॥ ३ ॥ निळा ह्मणे घेउनी कडे । नेतील वैकुंठा रोकडे ॥ ४ ॥

॥ १२५२ ॥ संत येताती सनकादिक । सोहळा पाहों तो कौतुक ॥ १ ॥ चंद्रभागे निमज्जन । परिसों हरिचें हरिकीर्तन ॥ २ ॥ संतसज्जनाचिया भेटी । करूं स्वानंदाची लुटी ॥ ३ ॥ निळा ह्मणे पंढरपुरीं । सेवूं काला वांटिती हरि ॥ ४ ॥

॥ १२५३ ॥ काला करिती संतजन । सवें त्यांच्या नारायण ॥ १ ॥ वांटी आपुल्या निज हस्तें । भाग्याचा तो पावे तेथें ॥ २ ॥ लाही सित लागे हातीं । दोष देखोनियां त्या पळती ॥ ३ ॥ निळा ह्मणे क्षीराचा बुंद । लागतां पावे ब्रह्मानंद ॥ ४ ॥

॥ १२५४ ॥ मुखीं पडतां चि ते शेष । करी नाश कल्मषा ॥ १ ॥ पावु-

नियां ब्रह्मपदा । ओपी संपदा अनैश्वरा ॥ २ ॥ शांती क्षमा दया सिद्धी । येती समृद्धी ओळंगण्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे सर्व हि सुखें । वरिती हरिखें शेष घेतां ॥ ४ ॥

॥ १२५५ ॥ श्रवणीं कुंडलें ढाळ देती । हिरया पंगती दंत तैसे ॥ १ ॥ तुळसी वैजयंती माळा । पदकीं कीळा रत्नज्योती ॥ २ ॥ नेत्र जैशीं रातोत्पलें । दिव्य कमळें विकासलीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे । तत्पदवासी । भक्तराशी भोंवताल्ले ॥ ४ ॥

॥ १२५६ ॥ जडित मुद्रिका बाहुभूषणें । करीं करकंकणें सुशोभितें ॥ १ ॥ पितांबरें घातली कास । हेमरत्नास जिंकीयलें ॥ २ ॥ उभा ठेउनी कटावरी हात । दृष्टी न्याहाळित पुंडलिक ॥ ३ ॥ निळा ह्मणे हरिघनसांवळा । कमळमाळा डोलती ॥ ४ ॥

॥ १२५७ ॥ सुंदर उटी मलयागरें । वेढिलीं चिरें पापेचीं ॥ १ ॥ मोरपिसें मुकुटावरी । मुरली अधरीं वाजवितु ॥ २ ॥ घनःश्याम हा मदनमूर्ती । झळके दीप्ती पदकाची ॥ ३ ॥ निळा ह्मणे पांडुरंग । संतसंग भोंवताला ॥ ४ ॥

॥ १२५८ ॥ अंगकांति प्रकाशली । सूर्या दिधली किंचितसी ॥ १ ॥ तेणें चि प्रकाशला भानु । झाला तो नयनु त्रैलोक्या ॥ २ ॥ तैसें चि चंद्रा जीवनामृत । दिधलें किंचित श्रीहरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे तेणें चि जगें । निववित अंगें मयंकु ॥ ४ ॥

॥ १२५९ ॥ ऐसा उदार देवादेवो । पंढरिरावो सुखसिंधु ॥ १ ॥ ज्याचें देणें न सरे कधीं । कल्पावधी पर्यंत ॥ २ ॥ देवां दैत्यां शेषादिकां । सप्तहिलोकां मानवासी ॥ ३ ॥ निळा म्हणे ठाया ठावो । जाणें भावो अंतरिंचा ॥ ४ ॥

॥ १२६० ॥ पहा ज्याचें तयाची परी । जीवन भातें याऱ्या करीं ॥ १ ॥ देऊं जाणे यथाविधी । जैसा भाव तैसी सिद्धी ॥ २ ॥ उंच नीच अधिकारें । पावती आपुलाल्या व्यापारें ॥ ३ ॥ निळा म्हणे ज्यापरि रवी । ज्याचे त्रेसमाय तया दावी ॥ ४ ॥

॥ १२६१ ॥ पांडुरंगा तुमची लीळा । विचित्र कळा जाणतीया ॥ १ ॥ ह्मणोनियां शरणागत । देव हि ओकत ऋषी तुमचे ॥ २ ॥ हृत्कमळीं आराधिती । नित्य पूजिती दृढ निष्ठा ॥ ३ ॥ निळा ह्मणे दर्शना येती । नाना स्तविती स्तुतिवादें ॥ ४ ॥

॥ १२६२ ॥ तिहीं लोकीं फुटली हांक । वैकुंठलोक पर्यंत ॥ १ ॥ भेटों गेला पुंडलिकासी । हृदयनिवासी जगाचा ॥ २ ॥ दोषियां पापियां उद्धरीत । आणि हांकारित भाविकां ॥ ३ ॥ निळा ह्मणे ठेवुनी हात । कटावरी तिष्ठत इटे उभा ॥ ४ ॥

॥ १२६३ ॥ भेटी गेला पुंडलिका । हें सनकादिकां जाणवलें ॥ १ ॥ मग ते धांवोनि आले । उभयता भेटले देवभक्तां ॥ २ ॥ करूनियां पूजाविधी । लागती पदीं स्वानंदें ॥ ३ ॥ निळा ह्मणे मंत्रांजुळी । वोपिती निढळीं दिव्य सुमनें ॥ ४ ॥

॥ १२६४ ॥ सनकादिक ह्मणती देवा । भुललेति भावा भक्ताच्या ॥ १ ॥ तरि जे येथें दर्शना येती । द्यावी त्यां मुक्ति सायुज्यता ॥ २ ॥ देव ह्मणती बहुत बरें । करूं आदरें मान त्यांचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसी मात । ऐकिली साद्यंत संतमुखें ॥ ४ ॥

॥ १२६५ ॥ पुढरले विठ्ठलहरी । केली नगरी वैकुंठ ॥ १ ॥ सुदर्शन ठेविलें तळीं । ह्मणे कल्पजळीं बुडों नेदी ॥ २ ॥ तैसे चि धरिले क्षेत्रावरी । ह्मणती हे नगरी रक्षावी ॥ ३ ॥ निळा ह्मणे या पुंडलिकें । यापरी लोकें उद्धरिलीं ॥ ४ ॥

॥ १२६६ ॥ एकंदर देवें आज्ञा केली । पुंडलिका दिधली निज भाक ॥ १ ॥ जे जे तुझिया क्षेत्रासी येती । त्यां त्यां उत्तम गति पाठवीं ॥ २ ॥ उत्तम अधम न ह्मणे कांहीं । रिगम चि नाहीं दोषा येथें ॥ ३ ॥ निळा ह्मणे हे पंचक्रोशी । जाणा वाराणसी समान ॥ ४ ॥

॥ १२६७ ॥ नारद येवुनी पंढरियेसी । स्थळ पुंडलिकासी मागती ॥ १ ॥ भीमा पुष्पावती संगम । योजिला आश्रम तयाप्रती ॥ २ ॥ विष्णुपदें उमटलीं जेथें । करविला तेथें रहिवास ॥ ३ ॥ निळा ह्मणे पिंडदान । करिती मज्जन जे स्थळीं ॥ ४ ॥

॥ १२६८॥ क्रीडा करी गोपाळपुरीं । आपण श्रीहरि गोवळांसवें ॥ १ ॥ वेणुवादन सप्तस्वरें । वेधी जिव्हारें सकळांचीं ॥ २ ॥ नृत्य करी नाना छंदें । नाचवी विनोदें सवंगडियां ॥ ३ ॥ निळा ह्मणे दधिओदन । काला कालवून जेवितु ॥ ४ ॥

॥१२६९॥ मीत बुंद प्राप्त ज्यासी । निजात्मसुखासी तो पावे ॥ १ ॥ जेथें उभे संतजन । नारायण समवेत ॥ २ ॥ तया सुखा उणें नाहीं । लोकीं तिहीं पूज्य तो ॥ ३ ॥ निळा ह्मणे हरिचे शेष । करित नाश कल्मषा ॥ ४ ॥

॥ १२७० ॥ वाढी कवळ श्रीहरि हातें । आड वैष्णवातें करुनियां ॥ १ ॥ ह्मणोनियां अभिमान सांडा । घ्या हो तोंडा भरुनी ॥ २ ॥ हिरोनियां त्रिविध ताप । व्हाल निष्पाप सकळार्थें ॥ ३ ॥ निळा ह्मणे दैवें आजी । पावलें तें माजी वैष्णवांच्या ॥ ४ ॥

॥ १२७१ ॥ येथिल लाभ घडे ज्यासी । तो त्या सुखासी अधिकारी ॥ १ ॥ जेथें वसती नारायण । लक्ष्मी आपण वैकुंठीं ॥ २ ॥ तेथें चि तो हि पावेल सत्य । भोगी अद्वैत निजसुखा ॥ ३ ॥ निळा ह्मणे ब्रह्मादिकां । न लभे चि एका अभिमानें ॥ ४ ॥

॥ १२७२ ॥ पुंडलिकें आणिला घरा । त्रैलोक्य सोयरा कुटुंबाळु ॥ १ ॥ सोळा सहस्र आतां पुरे । कन्या कुमरे दास दासी ॥ २ ॥ गाई गोधनाचे वाडे । गोपाळ सवंगडे समवेत ॥ ३ ॥ निळा ह्मणे वस्ती दाट । केली वैकुंठ पंढरी ॥ ४ ॥

॥ १२७३ ॥ विठ्ठल विठ्ठल ह्मणतां वाचे । स्वरूप त्याचें आठवे ॥ १ ॥ शामसुंदर कटिकर । रूप मनोहर तेजस्वी ॥ २ ॥ दिव्य सुमनें तुळसीमाळा । मळवट पिवळा रेखियला ॥ ३ ॥ निळा म्हणे मुगुटावरी । खोविल्या मंजुरी कोंवळिया ॥ ४ ॥

॥ १२७४ ॥ राही रुक्मिणी सत्यभामा । पुरुषोत्तमा वामसव्य ॥ १ ॥ पुंडलिक दृष्टीपुढें । उभे देहुडे सनकादिक ॥ २ ॥ जय विजय महाद्वारीं । गरुड शेजारीं हनुमंत ॥ ३ ॥ निळा म्हणे भोंवते संत । कीर्तनें करित चौफेरी ॥ ४ ॥

॥ १२७५ ॥ पंढरिये पांडुरंग । भोंवता संग संतांचा ॥ १ ॥ मिळउनियां

सुरवरपाळा । करवी सोहळा कीर्तनें ॥ २ ॥ भुक्ति मुक्ति फुकासाठीं । आलिया वांटी याचकां ॥ ३ ॥ निळा म्हणे जगदोद्धारा । लागीं नागरा रूप धरी ॥ ४ ॥

॥ १२७६ ॥ भक्त आवडी ऐसें रूप । धरी हा बाप मदनाचा ॥ १ ॥ नेदीं पडों अंतर कोठें । पाहिजे नेटें साचि ऐसा ॥ २ ॥ एकापुढें कटीकर । श्यामसुंदर इटेवरी ॥ ३ ॥ निळा म्हणे नृसिंहरूपें । प्रगटे प्रतापें शुष्क काष्ठीं ॥ ४ ॥

॥ १२७७ ॥ जेणें आणियेली क्षिती । रसातळींहुनी वरुती ॥ १ ॥ तो हा उभा कृपावंत । ठेवुनी कटावरी हात ॥ २ ॥ ज्याचे नाभीकमळीं-हून । जन्म पावे चतुरानन ॥ ३ ॥ निळा ह्मणे कमळानारी । ज्याचे चरणीं वास करी ॥ ४ ॥

॥ १२७८ ॥ जेणें रचियेलें भूगोळा । एकवीस स्वर्ग लाउनी माळा ॥ १ ॥ तो हा इटे उभा ठेला । भक्त पुंडलीकें पूजिला ॥ २ ॥ ज्याचे चरणींहूनि गंगा । उद्धरीत चाले जगा ॥ ३ ॥ निळा ह्मणे गति मति । माझी आहे ज्याचे हातीं ॥ ४ ॥

॥ १२७९ ॥ चौदा भुवनें पोटीं । सकळ तीर्थे ज्या अंगुष्ठीं ॥ १ ॥ तो हा देखियेला डोळां । विटो घननीळसांवळा ॥ २ ॥ जों जों दिसे दृश्याकार । तों तों जयाचा विस्तार ॥ ३ ॥ निळा ह्मणे उत्पन्न होती । जीवें जेथें लया जाती ॥ ४ ॥

॥ १२८० ॥ अवघे वर्ण बावन्न परी । शब्दीं शब्दांच्या कुसरी ॥ १ ॥ आयते दिले जोडुनियां । स्वामी सद्गुरु तुकया ॥ २ ॥ नलगे करणें चि घडामोडी । अर्थीं अक्षरें उघडीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे कृपावंता । कैसेनि उत्तीर्ण होऊं आतां ॥ ४ ॥

॥ १२८१ ॥ आठवितां चि रूप मनीं । जाय कल्पना विरोनी ॥ १ ॥ आतां तूं चि तूं अवघा । मी हें नुरे माझिया भागा ॥ २ ॥ बुद्बुद आपुला पाहे । तंव तो सिंधु चि होउनी राहे ॥ ३ ॥ निळा ह्मणे बोलवा बोली । बोला तुह्मी ते आपुली ॥ ४ ॥

॥ १२८२ ॥ महर्षि सिद्ध सनकादिक । संत ज्याचे उपासक ॥ १ ॥

तो हा पुंडलीका भेटी । आला उतावेळ पोटीं ॥ २ ॥ शिवाचिये ध्यानीं मनीं । योगी चिंतिती चिंतनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे रमा दासी । ह्मणवी सेऊनियां चरणासी ॥ ४ ॥

॥ १२८३ ॥ आळवूं आह्मी विठोबासी । नेणों आणिकासी रंजवूं ॥ २ ॥ राग कळा घात मात । स्वर संगीत मूर्छना ॥ २ ॥ ताल ग्राम छंद बंद । गीत प्रबंध कंपित ॥ ३ ॥ निळा ह्मणे प्रेमें वाणी । गर्जवूं गुणीं श्रीहरिच्या ॥ ४ ॥

॥ १२८४ ॥ वसती पायांपासीं । रिद्धि सिद्धि मुक्ति दासी ॥ १ ॥ तो हा उभा कटीकर । राही रुक्माईचा वर ॥ २ ॥ भुक्ति मुक्ति दासी वांटी । दर्शनें चि फुकामाटीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे चिंतिती मुनी । ज्यातें ध्यानीं अनुदिनी ॥ ४ ॥

॥ १२८५ ॥ कैवल्याचा गाभा । व्यापुनियां ठेला नभा ॥ १ ॥ तो हा सगुण वेषधारी । उभा चंद्रभागे तीरीं ॥ २ ॥ धुंडिती पुराणें । वेदश्रुती ज्याकारणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे अवघे देव । ज्याचे ह्मणविताती अवयव ॥ ४ ॥

॥ १२८६ ॥ इंद्रादिकां देवां । पदीं स्थापुनी वांटी सेवा ॥ १ ॥ तो हा येउनी पंढरिये । इटेवरी उभा ठाये ॥ २ ॥ चिंतिती चतुरानन । ईश्वराचें ध्येय जो ध्यान ॥ ३ ॥ निळा म्हणे ज्यातें गीतीं । सदा वेदश्रुती गाती ॥ ४ ॥

॥ १२८७ ॥ उपनिषदांच्या मती । ज्याच्या स्तुतीवादें घुमती ॥ १ ॥ तो हा सुंदर नागर । इटे उभा कटीकर ॥ २ ॥ रमा होऊनियां दासी । नित्य सेवीत चरणांसी ॥ ३ ॥ निळा म्हणे लीला चि करी । ब्रह्मांडाच्या भरोवरी ॥ ४ ॥

॥ १२८८ ॥ घोकउनी वेदा । जेणें आणियेलें बोधा ॥ १ ॥ तो हा पंढरपुरनिवासी । नित्य उभा भक्तांपासी ॥ २ ॥ सूर्या अंगीं कांती । ज्याच्या प्रकाशाची दीप्ती ॥ ३ ॥ निळा म्हणे दिलें । चंद्रासी अमृतें चि भरिलें ॥ ४ ॥

॥ १२८९ ॥ नेऊनियां बळी । जेणें घातला पाताळीं ॥ १ ॥ तो हा देवाचाही देवो । इटे उभा ठेउनी पावो ॥ २ ॥ शेषाचे शयनीं । होता निद्रित अनुदिनी ॥ ३ ॥ निळा म्हणे करी । मंथन क्षीराचें सागरीं ॥ ४ ॥

॥ १२९० ॥ धरियेला गिरी । सात दिवस बोटावरी ॥ १ ॥ तो हा पुंडलीका वर । देऊनियां उभा स्थीर ॥ २ ॥ नाथीला कालिया । यमुने बुडी देऊनियां ॥ ३ ॥ निळा म्हणे झाला । वत्सें गोवळे जो एकला ॥ ४ ॥

॥ १२९१ ॥ उतरिला धराभार । जेणें घेउनियां अवतार ॥ १ ॥ तो हा भक्तें पुंडलीकें । गोंवीयेला घेउनी भाकें ॥ २ ॥ शिळीं बांधिला सागर । निर्दाळिला दशाशीर ॥ ३ ॥ निळा म्हणे नारी । सोडवूनि राज्य करी ॥ ४ ॥

॥ १२९२ ॥ शोपिली पूतना । विषें भरूनी आली स्तना ॥ १ ॥ तो हा पुंडलीका द्वारीं । उभा परमात्मा श्रीहरी ॥ २ ॥ कंस आणि जरासंध । जेणें मर्दीले मागध ॥ ३ ॥ निळा म्हणे फरशधारी । केली क्षत्रियां बोहरी ॥ ४ ॥

॥ १२९३ ॥ मच्छ कूर्म वराह झाला । नृसिंह वामन होउनी ठेला ॥ १ ॥ तो हा इटे सौम्यरूप । कोटी कंदर्पाचा बाप ॥ २ ॥ परशुराम कृतांत काळ । अयोध्यावासी नृप गोवळ ॥ ३ ॥ निळा म्हणे बौध्य कलंकी । होउनी वेगळा नाटकी ॥ ४ ॥

॥ १२९४ ॥अगाध महिमा पढंरीचा । काय तो वाचा कवळेल ॥ १ ॥ येती यात्रे मुक्त होती । जे या देखती विठ्ठला ॥ २ ॥ नलगे दुजें तपसाधन । घडतां स्नान चंद्रभागे ॥ ३ ॥ निळा ह्मणे भूमीवरी । क्षेत्र हें पंढरी वैकुंठ ॥ ४ ॥

॥ १२९५ ॥ तळींवरी सुदर्शन । करीत छेदन महा पापा ॥ १ ॥ प्रत्यक्ष उभा देव चि भेटे । हें ही कोठें आन ठायीं ॥ २ ॥ एकी क्षेत्र प्रदक्षणा । तुळसी पानावरी तोखे ॥ ३ ॥ निळा ह्मणे चंद्रभागे । स्नानें भंगे पाप ताप ॥ ४ ॥

॥ १२९६ ॥ वेणुनादीं लाभे काला । उणें साला मग काय ॥ १ ॥ ब्रह्मादें कोंदे सृष्टी । शीत चि ओंठीं लागतां ॥ २ ॥ देतां पदीं पिंडदाना । पितृगणा उद्धार ॥ ३ ॥ निळा ह्मणे देव चि ऋणी । एक स्नानीं पझाला ॥ ४ ॥

॥ १२९७ ॥ जो देखे एकदां तरी । हें पंढरी वैकुंठ ॥ १ ॥ मुती तया

तेव्हां चि जोडे यात्रा त्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे प्रत्यक्ष भेटी । ते तो लुटी निजानंदा ॥ ४ ॥

॥ १२९८ ॥ मिरवी अंगीं अवतार लेणीं । विराजित कीर्ति भूषणीं ॥ मुगुट कुंडलें कोटी तरणी । तैसें तेज बंबाळ ॥ १ ॥ कंठीं शोभला कौस्तुभमणी । पदकीं चरित्र रत्नाच्या खेवणी ॥ बाहुभूषणें दिव्याभरणीं । जडित कंकणें सुशोभितें ॥ २ ॥ भक्त स्तवनाच्या सुमनमाळा । वेदमर्यादा कटीं मेखळा ॥ शास्त्रें वसनें सोनसळा । पुराणें ठसे उमटले ॥ ३ ॥ शंख चक्र पद्म गदा । शोभल्या भुजा त्या सायुधा ॥ असुरमर्दनीं झळकती सदा । मोक्षदानीं वैरियां ॥ ४ ॥ संतसनकादिक उदरवासी । भरला आनंद सावकासी ॥ नाभिकमळीं प्रजापतीसी । ठाव दिधला अखंड ॥ ५ ॥ लक्ष्मी अर्धांगीं विराजली । चरण सेवितां निमग्न झाली ॥ तोडर दानवांचा सिसाळी । वाम चरणीं रूळतसे ॥ ६ ॥ गंगा वामांगुष्ठीहुनी । जन्मली उद्धरावया अवनी ॥ महा दोषाची करीत धुनी । चालिली पूर्व समुद्रा ॥ ७ ॥ सकळ देवांचे समुदाये । सिद्धही येती वंदिती पाये ॥ नारद कीर्तनीं उभा ठाये । नृत्य करी स्वानंदें ॥ ८ ॥ निळा ह्मणे उदार ऐसा । भक्त चकोरा चंद्रमा जैसा ॥ पुंडलीकाच्या भावासरिसा । इटे उभा ठाकला ॥ ९ ॥

॥ १२९९ ॥ सुदर्शन धरिलें शिरीं । क्षेत्रा भोंवते फिरे वरी ॥ जगदात्मा राज्य करी । पांडुरंग तेथींचें ॥ १ ॥ शिव सांगे स्कंदापती । पंचक्रोसीमाजी वस्ती ॥ क्रुमी कीटकादि जीवयाती । ते ते होती चतुर्भुज ॥ २ ॥ नरनारी तेथींचे जन । हरिसन्निध हरिची समान ॥ नित्य करिती अवलोकन । प्रत्यक्ष रूप विष्णूचें ॥ ३ ॥ भूमंडळींचीं सकळ तीर्थें । होती चंद्रभागेसी सुस्नातें ॥ माध्यान्हकाळीं येउनी तेथें । करिती मार्जनें नित्यानी ॥ ४ । पुंडलीक मुनीश्वर । घेउनी पूजेचे संभार ॥ मातापिता आणि हरिहर । पूजी विठोबारायातें ॥ ५ ॥ जे जे प्राणी यात्रेसी येती । ते ते वैकुंठीं चि वसती ॥ प्रत्यक्ष श्रीहरितें भेटती । पुन्हा न येती संसारा ॥ ६ ॥ सकळ देवांचें देवतार्चन । मुनीजनांचें ध्येय जें ध्यान ॥ संतसनकादिकांचें जीवन । उभें असे ईटेवरी ॥ ७ ॥ नाम स्मरतां चि पावन करी । दर्शनानें चि पतितासी उद्धरी ॥ युगें गेलीं परि हा दूरि । न वजे चि भक्तापासुनी ॥ ८ ॥ देव भक्त तीर्थ क्षेत्र । चारी सन्निध ऐसे विचित्र ॥ पाहतीयाचे धन्य नेत्र । स्वयें पंचवक्र

सोळासहस्र अंतःपुर । सहित रुक्मिणी रहिवासली ॥ १० ॥ निळा ह्मणे यात्रेसी येती । पुण्या त्यांचीया नाहीं मिती ॥ पाउला पाउलीं यज्ञ चि घडती । प्रत्यक्ष भेटती परब्रह्मा ॥ ११ ॥

॥ १३०० ॥ अचळ धरा तैसें पीठ । पायातळीं मिरवे ईट ॥ १ ॥ दोन्ही पाउलें समान । जैसे योगीयाचे नयन ॥ २ ॥ जानु जंघ ते स्वयंभ । जैसे कर्दळीचे स्तंभ ॥ ३ ॥ कसीयेलें पीत वसन । झळके विद्युल्लते समान ॥ ४ ॥ शेष बैसला वेटाळां । तैसा कटिबंध मेखळा ॥ ५ ॥ समुद्र खोलीये विशाल । तैसें नाभीचें मंडळ ॥ ६ ॥ तुळसी मंजरिया गळां । जैशा सुटल्या मेघमाळा ॥ ७ ॥ दिग्गजाचे शुंडादंड । तैसे कटीं कर प्रचंड ॥ ८ ॥ पूर्णिमेचा उदो केला । तैसा मुखचंद्र शोभला ॥ ९ ॥ जैसीं नक्षत्रें झमकती । तैसीं कुंडलें चमकती ॥ १० ॥ सूर्य मिरवे नभमंडळा । तैसा केशराचा टिळा ॥ ११ ॥ क्षीराब्धीचे चंचळ मीन । तैसें नेत्रीं अवलोकन ॥ १२ ॥ जैसें मेरूचें शिखर । तैसा माथां मुगुट स्थिर ॥ १३ ॥ इंदु प्रकाशें वेढिला । तैसा क्षीरोदकें वेष्टिला ॥ १४ ॥ तृप्तीलागीं चातकपक्षी । निळा तैसा ध्यान लक्षी ॥ १५ ॥

॥ १३०१ ॥ निर्गुण निरामय संचलें । गुणातीत रूपा आलें ॥ परात्परातें सगुण झालें । उभें ठाकलें इटेवरी ॥ १ ॥ कोटी कंदर्पाची दीप्ति । विराजली अंगकांति ॥ गुण लावण्याची संपत्ती । विठ्ठलमूर्ती गोजिरी ॥ २ ॥ पहातां चि प्रवेशे अंतरीं । मनीं मनातें मोहरी ॥ चित्तीं चैतन्यातें भारी । देहभावा उरी उरों नेदी ॥ ३ ॥ जीवाचें हरुनियां जीवपण । नेदी उरों मीतूंपण ॥ वंदितां चि याचे चरण । करी बोळपण अहंकारा ॥ ४ ॥ निळा ह्मणे भक्तपती । आला पुंडलिकाचिये आर्ती ॥ अवघी जाणती नेणती । केली सरती पायांपें ॥ ५ ॥

॥ १३०२ ॥ रूपीं गुंतलीं मानसें । ध्यानीं मुनिजना ज्याचें पिसें ॥ तें चि हें सुंदर स्वरूप कैसें । धरिलें भक्त कैवारा ॥ १ ॥ अंगीं चंदनाची उटी । तुळसीमाळा हार कंठीं ॥ बुका शोभला ललाटीं । रत्नें मुगुटीं झळकती ॥ २ ॥ कर्णीं कुंडलें सुढाळें । नेत्र उत्फुल्लित जैसीं कमळें ॥ दंत हिरियाचीं द्विदळें । सोलींव तैसे ळळकती ॥ ३ ॥ कंठीं कौस्तुभ आणि पदकें । श्री-

॥ ४ ॥ हात ठेवुनी कटावरी । कासे पीतांबराची परी ॥ नाना ठसे उमटले वरी । मेखळा रत्नें वरवंटा ॥ ५ ॥ चरण सकुमार साजिरे । पाउले अत्यंत गोजिरे ॥ वांकी घुंगरू झणत्कारें । करिती चेइरे आनंदा ॥ ६ ॥ संतस-मुदाये देवढे । गर्जती गुणनाम पवाडे ॥ वैष्णव नाचती वागडे । ब्रह्मानंद पिकला ॥ ७ ॥ राही रुक्मिणी सत्यभामा । परिवार वेष्टित पुरुषोत्तमा ॥ अगाध पंढरिये हा महिमा । देव विमानीं दाटले ॥ ८ ॥ निळा ह्मणे पुरला हेत । ठेविलें पायांपासीं चित्त ॥ सांठवुनियां हृदयांत । रूप पावलों विश्रांति ॥ ९ ॥

॥ १३०३ ॥ हा गे पहा इटे उभा । सच्चिदानंदाचा हा गाभा ॥ १ ॥ देखे सकळांचे ही भाव । अध्यक्ष हें याचें नांव ॥ २ ॥ जेथें तेथें जैसा तैसा । नव्हे न्यून पूर्ण ऐसा ॥ ३ ॥ निळा ह्मणे माझ्या जिवीं । ठेला जडोनी तो गोसांवी ॥ ४ ॥

॥ १३०४ ॥ बोलाविल्यावांचुनी आला । उभा पाठीसी ठाकला ॥ अवचितां पुंडलिकें देखिला । मग पूजिला उपचारीं ॥ १ ॥ ह्मणे आजी हें नवल झालें । मज अनाथा सांभाळिलें ॥ ब्रीद आपुलें साच केलें । सुयाणें घडलें स्वामीचें ॥ २ ॥ देव ह्मणती तुझिया भावा । देखोनि पावलों विसांवा ॥ उभा राहोनि करीन सेवा । नवजें आतां येथुनी ॥ ३ ॥ पंच माहापातकी येती । ते ही येथें मुक्त होती ॥ ऐसा पुरस्करूनी पुंडलिकाप्रती । वरु दिधला त्रि-वाचा ॥ ४ ॥ निळा ह्मणे सात्विक जन । करिती येथें हरिकीर्तन ॥ ते तों ब्रह्मसनातन । पावती वचन हें सत्य ॥ ५ ॥

॥ १३०५ ॥ वारकरी संत पंढरिसी जाती । सप्रेमें गर्जती नामघोषें ॥ १ ॥ लोटांगणीं त्यांसी जाईन आवडी । ओंवाळीन कुडी वरूनी पायां ॥ २ ॥ धन्य केला वंश तारिले पातकी । डोलतां पताकीं गगन शोभे ॥ ३ ॥ टाळ श्रुति वाद्यें मृदंगाच्या ध्वनी । क्रमिताती अवनी ब्रह्मानंदें ॥ ४ ॥ पढती ब्रीदावळी करिती जयजयकार । टाळीया अंबर सादु देत ॥ ५ ॥ निळा ह्मणे माझे सखे विष्णुदास । जातातीं पंढरीस प्रति वरुषीं ॥ ६ ॥

॥ १३०६ ॥ पावलों प्रसाद इच्छा केली तैसी । झालें या चित्तासी स-माधान ॥ १ ॥ मायबाप माझा उभा कृपादानी । इटे सम जोडनी पदांबजें

॥ २ ॥ सांभाळीसी येऊं नेंदी चि उणीव । अधिकार गौरव राखे तैसे ॥ ३ ॥ निळा ह्मणे सर्व जाणे अंतर्बाहे । जया तैसा राहे कवळुनियां ॥ ४ ॥

॥ १३०७ ॥ देखतां चि इटेवरी । समान पाउलें साजिरीं ॥ १ ॥ माझें लांचावलें मन । नुटी बैसलें वरून ॥ २ ॥ न सुटे मुंगीयेसी गुळ । जेंवि भ्रमरा आमोद कमळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे तैसें झालें । मक्षिके मोहळें गोविलें ॥ ४ ॥

॥ १३०८ ॥ सगुण स्वरूप तुमचें हरी । शोभलें तें इटेवरी ॥ १ ॥ तेणें लागली टकमक । डोळियां नावडे आणिक ॥ २ ॥ मना बुद्धीसी ही भुली । इंद्रियें गुंफोनि राहिलीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे तनु प्राण । गेलीं आपणा विसरोन ॥ ४ ॥

---

## ज्ञानपर अभंग.

॥ १३०९ ॥ छाया मंडपींचीं चित्रें दिसती । तैसी सृष्टि भासतसे ॥ १ ॥ परि त्या आधार दीपज्योती । कातडी नुसती येऱ्हवीं ते ॥ २ ॥ तेंवि आत्मप्रभा भासे । जग हें विलसे नानाकृती ॥ ३ ॥ निळा ह्मणे गगनीं रवि । दावुनी जेंवि अलिप्त ॥ ४ ॥

॥ १३१० ॥ निर्विकार असोनि आत्मा । अवघ्या भूतग्रामा प्रकाशी ॥ १ ॥ एरवीं करी ना करवी । जेंवि रवि निज व्योमीं ॥ २ ॥ लोह चळे चुंबकयोगें । परि तो अंगें न सिवे त्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे आत्मसत्ता । वर्तणें भूतां कर्मतंत्रीं ॥ ४ ॥

॥ १३११ ॥ जें जें कांहीं होय जाय । त्या त्या लय अद्वैतीं ॥ १ ॥ तें अद्वैत हि लोपल्या पाठीं । आपणा चि पोटीं आपण ॥ २ ॥ तया नांव स्वरूप ह्मणती । जें निज एकांतीं एकलें ॥ ३ ॥ निळा ह्मणे दावुनियां नामरूपा । नये चि पडपा विश्वाकृती ॥ ४ ॥

॥ १३१२ ॥ अवघें होउनी कांहीं चि नव्हे । आपुल्या स्वभावें आपण ॥ १ ॥ तया नांव आत्मतत्व । शुद्ध सत्व मायादी ॥ २ ॥ ध्वनि बीज ओंकार

रूपं । तें ही स्वरूप ऐलाडी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जाणों जातां । जाणोनि नेणता वेद जेथें ॥ ४ ॥

॥ १३१३ ॥ भेद चि याचा नये हाता । जाणिवा जाणतां नाना परी ॥ १ ॥ मत मतांतरें वृथा चि होती । याच्या न पवती दारवंटा ॥ २ ॥ पाहों जातां बुद्धीचे डोळे । होताती आंधळे समोर या ॥ ३ ॥ निळा ह्मणे नेदी चि कोणा । देखों आपणां लपवितसे ॥ ४ ॥

॥ १३१४ ॥ आत्मा नाहीं चि देखिजे ऐसा । उजळितां प्रकाशा रवि-कीर्ण ॥ १ ॥ असोनियां पाठीं पोटीं । न देखेचि दृष्टी देखण्या ॥ २ ॥ लेउनियां सर्वांगभरी । असोनि बाहेरी नाढळे ॥ ३ ॥ निळा ह्मणे उगम जैसा । न देखे चि सहसा सागर ॥ ४ ॥

॥ १३१५ ॥ याचिमाजी होती जाती । जिव या नेणती आत्मया ॥ १ ॥ नवल याची लाघवी माया । यातें नेंदेउनियां विस्तार ॥ २ ॥ जेथें तेथें उभी चि आड । होउनियां कवाड भ्रांतिचें ॥ ३ ॥ निळा ह्मणे ब्रह्मादिकां । याचिपरी लोकां झकविलें ॥ ४ ॥

॥ १३१६ ॥ अवघियांचे असोनि देहीं । अंतर्बाही न दिसे चि ॥ १ ॥ जेंवि साखरेमाजी गोडी । न दिसे उघडी असतां ही ॥ २ ॥ वाद्य दिसती न दिसे नाद । जेंवि कां स्वाद भोजनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे तैसा आत्मा । न दिसे चि भूतग्रामा कवळुनी ॥ ४ ॥

॥ १३१७ ॥ आंतु बाहेरि देखणा चि दिसे । परि तो आभासे दृश्य ऐसा ॥ १ ॥ ज्ञानेंचिविण वांया गेला । बोध मावळला सत्याचा ॥ २ ॥ त्याविण दिसते देखते कोण । परि ये नागवण भ्रांतीची ॥ ३ ॥ निळा ह्मणे आठ-व न धरे । तेणें चि अंतरे हातोहातीं ॥ ४ ॥

॥ १३१८ ॥ पदार्थमात्रीं आठवे जरी । नलगे चि तरी साधन ॥ १ ॥ एरवीं दिसे देखणा तो चि । पाहिजे त्याची परि कृपा ॥ २ ॥ अवघा चि वसोनि अवघे ठायीं । दिसे दाखवी ही अवघ्यांतें ॥ ३ निळा ह्मणे भोगी त्यागी । तो चि जगीं जगदात्मा ॥ ४ ॥

॥ १३१९ ॥ नये चि साच हा प्रतीती । असोनियां भूतीं भगवंत ॥ १ ॥

कर्माकर्मे लागलीं पाठी । बैसले दृष्टी मळ सांचे ॥ २ ॥ सत्य चि परि तें असत्य वाटे । भोगिती अदृष्टें आपुलालीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे कर्मतंत्रीं । गुंतलीं यंत्रीं मायेच्या ॥ ४ ॥

॥ १३२० ॥ माया ह्मणिजे नसतें चि दिसे । गगनीं जैसे दोनी चांद ॥ १ ॥ असे एक भासे आणीक । तया नांव मायीक पसारा ॥ २ ॥ सत्यावरी न पडे दृष्टी । विकल्प परिपाठी घालितु ॥ ३ ॥ निळा ह्मणे प्रत्यक्ष लपवी । लटिकें चि रुढवी भ्रांतीजाळ ॥ ४ ॥

॥ १३२१ ॥ बुद्धिसि निश्चय नाहीं साचा । तो चि भ्रांतीचा मूळारंभ ॥ १ ॥ तया चि नांव ह्मणिजे वेडें । असोनि पुढें न देखे हित ॥ २ ॥ लज्जा मात्र हारपोनि जाये । नागिवे चि ठाये उभे मग ॥ ३ ॥ निळा ह्मणे न धरी धीर । न मनीं उत्तर सांगीतलें ॥ ४ ॥

॥ १३२२ ॥ जेथें जेणें केला वास । तो चि वाटे त्यास निजग्राम ॥ १ ॥ एरवीं सर्व हि भूमंडळ । आहे हें स्थळ याचें चि ॥ २ ॥ अवघें चि पाहोनि फिरोनि आला । परि त्या विसरला निजठाया ॥ ३ ॥ निळा ह्मणे घेतलें सोंग । तें चि त्यासी मग गोड वाटे ॥ ४ ॥

॥ १३२३ ॥ कोठें वसे झाडाचिवरी । कोठें पोखरी विवरांत ॥ १ ॥ कोठें जळीं वसे स्थळीं । कोठें अंतराळीं अंतरिक्ष ॥ २ ॥ कोठें पर्वतीं दरकुटी आंत । कोठें वनांत झाडखंडीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे चिखलीं शेणीं । वसे पाषाणीं काष्ठांत ॥ ४ ॥

॥ १३२४ ॥ कोठें ग्रामीं कोठें पुरीं । कोठें सागरीं दरियांत ॥ १ ॥ कोठें सांदीं कोंदीं बिळीं । कोठें वारुळीं धुळीमाजी ॥ २ ॥ कोठें बोले बोलवटीं । वसे तळवटीं शिखरावरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे वसे शिरीं । केशाभीतरी कोठें वस्त्रीं ॥ ४ ॥

॥ १३२५ ॥ लवेमाजी उत्पन्न एक । रक्त शोक पशुदेहीं ॥ १ ॥ मांसाहारी जळाहारी । तृणाहारी फळभक्षी ॥ २ ॥ कोठें धान्य भक्षुनि अन्नें । कोठें माशनें पवनाच्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे जन्म जेथें । रुचे तेथें चि तया ॥ ४ ॥

॥ १३२६ ॥ अवघें चि हें कर्मफळ । ओढवलें सकळ जगत्रया ॥ १ ॥ स्वर्ग

मृत्यु पाताळ लोक । कर्म बाधक ह्मणोनियां ॥ २ ॥ कर्मातीत झाले नर । तया लोकांतर मग कैंचें ॥ ३ ॥ निळा ह्मणे पृथक् होती । ह्मणोनि भोगिती पृथकार्ते ॥ ४ ॥

॥ १३२७ ॥ एकीं च नसतां एकपण दुजेपण कैंचें । ह्मणउनियां न चले कांहीं तेथें शब्दाचें ॥ १ ॥ पहातेपहाणें जेथें विरमोनि जाय । घेणें देणें कैंचें तेथें सांगावें काय ॥ २ ॥ दृश्य चि नाहीं द्रष्टत्वाचा फिटला पांग । काया वाचा मन चि नाहीं धारणायोग ॥ ३ ॥ निळा ह्मणे जेथें सुख सुखपणा नये । निजानंदीं निजानंद हारपले ठाय ॥ ४ ॥

॥ १३२८ ॥ निर्माण चि नाहीं त्याचें काय वर्णावें । जाणिव चि न रिघे तेथें काय जाणावें ॥ १ ॥ ह्मणउनियां येथें अवघा खुंटला वाद । विरोनियां गेला अवघा अभेदीं भेद ॥ २ ॥ जागृति ना निद्रा जेथें नाहीं सुषुप्ती । तुर्या ना उन्मनी कैंची स्वप्नाची भ्रांती ॥ ३ ॥ निळा ह्मणे अनुभव तेथें अनुभवितें कैचें । निमोनियां गेलें ऐक्य उरलें मुळींचें ॥ ४ ॥

॥ १३२९ ॥ मूळ डाळ बीजीं अवघे शाखा पल्लव । फळीं पुष्पीं विस्तारला परि तें चि सर्व ॥ १ ॥ तेसा एक बीजरूप इटेवरी उभा । विश्वाकारें प्रकटला व्यापुनियां नभा ॥ २ ॥ सर्व हि होउनि देवो देवी आपण चि सकळ । भूत व्यक्ति नाना वर्ण सूक्ष्म स्थूळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे एकाविण नाहीं दुसरें । एकीं एकपण ही नुरे सेवटिलें सरे ॥ ४ ॥

॥ १३३० ॥ सदाचा हा धाला सदाचा भुकेला । सदाचा निजेला जागा सदा ॥ १ ॥ ऐसीये परिचा आंतुला माजणी । वरिला सवासिणी सदा चि मी ॥ २ ॥ सदाचा बोलिका सदाचा हा मुका । सदाचा हा लटिका खरा सदा ॥ ३ ॥ सदाचा हा वेडा सदाचा हा कुडा । सदाचा हा निभिडा भीड सदा ॥ ४ ॥ सदाचा हा दाता सदाचा मागता । सदाचा हा रिता भरला सदा ॥ ५ ॥ निळा ह्मणे सदा जवळी ना हा दुरी । सदा सर्वांतरीं नसोनि वसे ॥ ६ ॥

॥ १३३१ ॥ ऐसियाचे घरीं ऐसी चि मी सदा । न करुनी कांहीं धंदा सर्व हि करी ॥ १ ॥ सदा चि निष्काम सदा मी सकाम । सदा रूप नाम नूतन माझें ॥ २ ॥ सदा नाहिंपणें सदा माझें जिणें ॥ सदा होणें निभणें माझा वांटा ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसें बोले मायादेवी । अबोलण्याची गांवीं वसोनियां ॥ ४ ॥

॥ १३३२ ॥ कोठें चि हा नसे कोठें ही न दिसे । कोठें चि अमुकासे न ह्मणे कोणी ॥ १ ॥ कोठें याचें होणें कोठें याचें निमणें । कोठुनी येणें जाणें न तर्केची ॥ २ ॥ कोठें याची स्थिति कोठें याची प्रीति । कोठें याची वसाति न कळे कोणा ॥ ३ ॥ कोठुनि याचें मूळ कोठुन याचें कूळ । वर्णावयास आढळ न कळे गोत्र ॥ ४ ॥ निळा ह्मणे याती न दिसे रूपाकृती । नये चि कोणे व्यक्ती विचार करितां ॥ ५ ॥

॥ १३३३ ॥ आप आपणा नेणता । निर्मी ब्रह्मांडाच्या चळथा ॥ १ ॥ काय सांगों नवलपरी । ऐसी याची आकळ चोरी ॥ २ ॥ अंगें आपण निराकार । प्रकटोनि दावी जगदाकार ॥ ३ ॥ निळा ह्मणे महर्षि देवा । न कळती ऐशा याच्या मावा ॥ ४ ॥

॥ १३३४ ॥ बहुरूपी हा एकला । नानाकारें नटें नटला ॥ १ ॥ पुरुषाकृति स्त्रिया बाळें । होउनी कोणा ही नातळे ॥ २ ॥ नामें रूपें वस्त्राभरणें । रसस्वाद नाना खाणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे फळें पुष्पें । पर्णें मूळें भिन्न चि रूपें ॥ ४ ॥

॥ १३३५ ॥ इंद्रियांची पुरली धांव । मनासी ठाव विश्रांति ॥ १ ॥ तया नांव ब्रह्मप्राप्ति । जेथ उपरति चित्ताची ॥ २ ॥ बुद्धीची ही जाणीव विरे । तर्क मतांतरें मुरडलीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे कुंठित गती । पांगुळले ठाती पंचप्राण ॥ ४ ॥

॥ १३३६ ॥ आत्मा करी ना करवी । अलिप्तपणें वर्ते जीवीं ॥ १ ॥ साक्ष नव्हे ना असाक्ष । उपेक्षा करीना कैंपक्ष ॥ २ ॥ जैसें गगनीं अभ्र गळे । गगन अलिप्त त्या वेगळें ॥ ३ ॥ निळा ह्मणे सन्निधानें । लोह चाले चुंबक नेणे ॥ ४ ॥

॥ १३३७ ॥ नाहीं चि उरला रिता । ठावो याविण तत्वता ॥ १ ॥ अणू रेणू महदाकाश । साहिमाजी याचा वास ॥ २ ॥ होतां जातां सहस्रवरी । ब्रह्मांडाच्या भरोवरी ॥ ३ ॥ निळा ह्मणे अखंडता । नव्या जुन्याही हा परता ॥ ४ ॥

॥ १३३८ ॥ येती जाती होती मरती । नानाकार भूतव्यक्ती ॥ १ ॥ हा तो आहे जैसा तैसा । अनादिरूपें आपणा चि ऐसा ॥ २ ॥ नहोनियां

सूक्ष्म स्थूळ । वृद्ध तरुण अथवा बाळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे एकला एक । नहोनि एक ना अनेक ॥ ४ ॥

॥ १३३९ ॥ एकीं एकपणा ठाव । नसोनि झाला सर्वा सर्व ॥ १ ॥ जैसें गगन घटीं मठीं । दिसोनि आपण आपुल्या पोटीं ॥ २ ॥ येणें होणें नाणी मनें । आपींआप संचलेपणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे याची कळा । नेणे हा हि न देखे डोळा ॥ ४ ॥

॥ १३४० ॥ ऐसा आपीं आपरूप । करूनि त्रैलोक्या साटोप ॥ १ ॥ नाहीं वेंचला उणा झाला । जैसा तैसा चि संचला ॥ २ ॥ दाउनीयां चराचर । लपवी अंगीं न मानी भार ॥ ३ ॥ निळा ह्मणे नट लाघवी । नेदी कळों ठेवाठेवी ॥ ४ ॥

॥ १३४१ ॥ एकापासुनीयां हरी । घाली आणीका पदरीं ॥ १ ॥ ऐसे खेळ याचे निके । खेळे आलके सेलकें ॥ २ ॥ रडवी हांसवी एका । दाऊनि लपवी पाडी चुका ॥ ३ ॥ निळा ह्मणे खेळा । नाहीं रूप याच्या ताळा ॥ ४ ॥

॥ १३४२ ॥ धन वित्त दारा सुत । गण गोत मृगांबु हें ॥ १ ॥ आपण चि स्वयें दृश्यत्वा येतां । भासवी तत्वता दृश्यजात ॥ २ ॥ निजांगें जेविं विलसे छाया । तेविं हे माया मिथ्यात्वें ॥ ३ ॥ निळा म्हणे मुख्य बिंबेविण । भासविती कोण प्रतिबिंबा ॥ ४ ॥

॥ १३४३ ॥ गंगा पवित्र सर्वागुणीं । स्पर्शें विटाळे रांजणीं ॥ १ ॥ तेविं चैतन्य अवघें एक । भूतभेदें त्या कळंक ॥ २ ॥ भूमिका नाहीं खंडण केली । उत्तम अधम संगें झाली ॥ ३ ॥ निळा ह्मणे धर्माधर्म । वर्णानुरूप क्रियाकर्म ॥ ४ ॥

॥ १३४४ ॥ दोष वसे पात्रांतरीं । आत्मा निर्मळ चराचरीं ॥ १ ॥ सर्पामुखीं वसे विष । मधुमक्षिके सारांश रस ॥ २ ॥ स्वातिजळें मुक्ताफळ । शुक्ति सर्पी हाळाहळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे उपाधिभेदें । दाविती निवाड शुद्धाशुद्धें ॥ ४ ॥

॥ १३४५ ॥ ब्राह्मण सोंवळाचि सर्वकाळ । वसे अनामिकीं विटाळ ॥ १ ॥ हे तो याति स्वभाव गुण । इष्ट कनिष्ठ अनादि भिन्न ॥ २ ॥ अवघे

ठायीं पंचभौतिक । आत्मा सकळां व्यापक एक ॥ ३ ॥ निळा ह्मणे गुण वांटणी । योनी विभाग चहूंवर्णी ॥ ४ ॥

॥ १३४६ ॥ शुद्ध सात्विकी ब्राह्मण । सत्व रज मिश्रित क्षत्रिया जाण ॥ १ ॥ रजतमें वैश्य निर्माण । शूद्रा तमो गुण निर्मीता ॥ २ ॥ नाना याति नाना भेद । यांपासुनी शाखा विविध ॥ ३ ॥ निळा ह्मणे निषिद्ध तमीं । अनामिकादि पापकर्मी ॥ ४ ॥

॥ १३४७ ॥ अवघें टाळूनी निमित्त । वरुनी बोलत आपणा ॥ १ ॥ ऐसी करितो हरि लाघवें । सर्व हि ठावें सर्वज्ञा ॥ २ ॥ बुद्धि बुद्धीचा हा जानिता । स्फूर्ति प्रसविता स्फूर्तीचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे आपुल्या गोडी । तया आवडी स्तवनाची ॥ ४ ॥

॥ १३४८ ॥ नेणोनि पारिखे । आत्मा आपणा न देखे ॥ १ ॥ न देखोनि दुजें कांहीं । आपिआप असे पाहीं ॥ २ ॥ नामा रूपा येणें । नाहीं होणें ना निमणें ॥ ३ ॥ निळा म्हणे नव्हे जागे । निज स्वप्न ना वाउगे ॥ ४ ॥

॥ १३४९ ॥ कांहीं चि नहोनि विस्तारला । बहुरूपी हा एकला ॥ १ ॥ नवल विचित्र हें चि वाटे । कैसा नटोनि ठेला नटें ॥ २ ॥ एका ऐसा नहोनी एक । नानाकारें हा अनेक ॥ ३ ॥ निळा म्हणे नट लाघवी । शेखीं वेगळा गोसांवी ॥ ४ ॥

॥ १३५० ॥ नातळोनियां नामरूपा । येवढया वाढविलें संकल्पा ॥ १ ॥ न कळे याची माव कोणा । देवादैत्यां विचक्षणा ॥ २ ॥ वेद श्रुति धांडोळितां । कार्य कारणा हि हा परता ॥ ३ ॥ निळा म्हणे हा अनुमाना । नये योगिया मुनिजना ॥ ४ ॥

॥ १३५१ ॥ आपणा दाउनी भुरळे केले । ठकुनी माझें मीपण नेलें ॥ १ ॥ आतां जाऊं कोणीकडे । पळों तरी तो मागें पुढें ॥ २ ॥ धांवा म्हणोनी बोलों जाय । तंव बोलातें गिळुनी आपणचि ठाये ॥ ३ ॥ ऐकों जाय याच्या गोठी । तंव तो शब्दा पाठी पोटीं ॥ ४ ॥ देखों जातां देखणें चि होय । दृश्यादृश्य हा नुरवीचि माये ॥ ५ ॥ सुगंध घेतां आपण चि नाक । गंधाचा गंध हा चि एक ॥ ६ ॥ मी माझें मज न दिसे चि कोठें । बहुता जुगाचे हरिले सांठे ॥ ७ ॥ ठकुनियां निळा अवघा चि नेला । सकळ ही त्याचें आपण चि झाला ॥ ८ ॥

॥ १३५२ ॥ नवल चि एक वाटे मज । कैसें गुज अनुवादों ॥ १ ॥ आपुली आपण वाईल झाला । आपण चि व्याला आपणासी ॥ २ ॥ मागें पुढें एकला एक । दाविले अनेक परी मिथ्या ॥ ३ ॥ निळा म्हणे हा चराचरा । वसवूं अंतरा बाहेरी ॥ ४ ॥

॥ १३५३ ॥ कैची याला वाईल आई । नामरूप तें ही लटिकेंचि ॥ १ ॥ मूळ चि नाहीं डाळ ते कैचे । लटिके माचे काय म्हणों ॥ २ ॥ हात पाय नाक ना डोळे । देखणें आंधळे नातळे चि ॥ ३ ॥ निळा म्हणे कांहीं चि नव्हे । तो चि हा अवघें श्रुति बोले ॥ ४ ॥

॥ १३५४ ॥ सत्याक्षरें माझी वाणी । प्रवर्तली गुणीं तुमचिया ॥ १ ॥ दाविले ते तुम्ही अर्थ । बोली यथार्थ मांडियेले ॥ २ ॥ नाहीं कांहीं मतांतरीं । वदली वैखरी हे माझी ॥ ३ ॥ निळा म्हणे हे वाक्य पूजा । गरुडध्वजा प्रीत्यर्थ ॥ ४ ॥

॥ १३५५ ॥ जिकडे जिकडे चाले रवी । प्रभा नीच नवी सांगातें ॥ १ ॥ तैसें केलें माझे वाचे । तुम्ही सामर्थ्याचें बोलणें ॥ २ ॥ उजळिल्या दाही दिशा । करूनी प्रकाशा निजबोधें ॥ ३ ॥ निळा ह्मणे ससा चाली । वाट दाविली तुम्ही ते ॥ ४ ॥

॥ १३५६ ॥ माझें चि मज नवल वाटे । मी चि भेटें मजलागीं ॥ १ ॥ निजात्मबोधें उदो केला । प्रकाश दाटला कोंदोनी ॥ २ ॥ कोठें कांहीं चि न दिसे दुजे । निजात्मतेजें जग भासे ॥ ३ ॥ निळा ह्मणे अवघे ठायीं । मी चि नाहीं दुजी परी ॥ ४ ॥

॥ १३५७ ॥ पाहाणें पाहाते । गेले हारपोनियां निरुते ॥ १ ॥ मी हि नाहीं तूंहि नाहीं । आपींआप अंतरबाहीं ॥ २ ॥ उदो अस्तु सविता नेणें । जेथें तेथें आपुलेपणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे नभीं नभ । जेवी दाऊनियां प्रतिबिंब ॥ ४ ॥

॥ १३५८ ॥ एकापासुनी झालें विश्व । विश्वामाजी एक चि अंश ॥ १ ॥ जैसे शून्यापासुनी अंक । झाले भांदितां नुरे चि लेख ॥ २ ॥ शून्या नुठितां शून्यपणें । कैंचें एकाएक होणें ॥ ३ ॥ निळा ह्मणे भक्त चि नाहीं । कैंचा देव ही तये ठायीं ॥ ४ ॥

॥ १३५९ ॥ विश्व अवघें मायाभास । माया ब्रम्हीं नाहीं चि मोस

॥ १ ॥ जेविं वन्हि सूर्यकांती । प्रगटतां कीर्ण त्या नेणती ॥ २ ॥ शुक्तिका प्रसवे मुक्ताफळ । जळिचें परी त्या नेणे चि जळ ॥ ३ ॥ निळा म्हणे धूम्रा वन्ही । नाहीं चि तयातें प्रसवोनी ॥ ४ ॥

॥ १३६० ॥ माया ब्रम्हींचा आभास । नाहीं ब्रह्मीं ते निःशेष ॥ १ ॥ यालागीं दिसे ते टवाळ । रत्न चि ते रत्नकीळ ॥ २ ॥ सूर्य चि सूर्यातें प्रकाशी । न देखोनियां तम तेजासी ॥ ३ ॥ निळा ह्मणे स्वसंवेद्या । नातळे विद्या ना अविद्या ॥ ४ ॥

॥ १३६१ ॥ आत्मा निघोट निर्मळ । नातळे तो मायामळ ॥ १ ॥ जेवीं मृगजळातें भानु । प्रगटुनियां वेगळा भिन्नु ॥ २ ॥ आत्मबिंब नव्हे छाया । तैसी स्वरूपीं मिथ्या माया ॥ ३ ॥ निळा ह्मणे हे स्वानुभवें । विचारितां होईल ठावें ॥ ४ ॥

॥ १३६२ ॥ कृपा केली संतजनीं । अर्थ दाविले उघडुनी ॥ १ ॥ ते चि प्रगट केले आतां । नाहीं बोलिलों मी स्वतः ॥ २ ॥ नेणों काय केलें संतीं । माझी चेतउनियां मती ॥ ३ ॥ निळा ह्मणे ओढा वारा । नाहीं तोंडा ना अक्षरा ॥ ४ ॥

॥ १३६३ ॥ सर्वां माजी गगन आहे । परी धरितां चि नये काय ॥ १ ॥ तैसें नाकळे चि तें शब्दातें । जेवीं खद्योतें रवीभेटी ॥ २ ॥ सागरीं पडतांचि लवण कणू । निवडितां भिन्नु न निवडे ॥ ३ ॥ निळा ह्मणे तैशा परी । बोलतां चि वैखरी लीन तेथें ॥ ४ ॥

॥ १३६४ ॥ नाहीं ह्मणतां अवघे तेंचि । आहे ह्मणतां चि दावितां नये ॥ १ ॥ ह्मणोनियां न चले शब्द । राहे वेवाद ऐलाडी तो ॥ २ ॥ डोळा देखणा देखे सर्व । न देखे वरव आपुली तो ॥ ३ ॥ निळा ह्मणे तेवी जाणों जातां । जाणणें चि तत्वता वस्तु होये ॥ ४ ॥

॥ १३६५ ॥ हात पाय इंद्रियें मिळोनी मेळा । चला ह्मणती पाहों डोळां ॥ १ ॥ देखणें चि नव्हती देखती काये । अवघीयाचा देखणा डोळा चि आहे ॥ २ ॥ आतां डोळिया डोळा पाहों ह्मणे । तंव आपआपणीया न चले पाहाणें ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसिया परी । जाणों जातां जाणणें चि हरि ॥ ४ ॥

॥ १३६६ ॥ वाचेतें वदवी रसनेतें चाखवी। नेत्रातें दाखवी परि त्या दुरी ॥ १ ॥ बुद्धी बोधविता चित्ता चेतवीता। देहीं देहातीता कैसेनि दाऊं॥ २ ॥ भावा भावातीत अद्वैता अद्वैत। ज्यातें श्रुती ह्मणत नेती नेती ॥ ३ ॥ निळा ह्मणे कांहीं नव्होनियां जें आहे। दाविती त्याचि सोय सद्गुरु संत ॥ ४ ॥

॥ १३६७ ॥ दृष्टिविण देखणें रसनेविण चाखणें। शब्देंविण बोलणें ऐसे आहे ॥ १ ॥ चरणेंविण चालणें निजकरेंविण घेणें। श्रवणेंविण ऐकणें तेथींचें गुज ॥ २ ॥ चित्तेंविण चिंतणें बुद्धीविण जाणणें। मनेंविण अनुभवणें अनुभव्यातें ॥ ३ ॥ निळा ह्मणे गगनें गगना आलिंगन। पवनासवें गमन पवना जेंवी ॥ ४ ॥

॥ १३६८ ॥ पाहों जातां देखणें तें चि। जाणतां जाणणें चि होईजे अंगें ॥ १ ॥ आतां तें कैसें सांगावें यावरि। बोलतां चि वैखरि गिळुनि जाये ॥ २ ॥ बुद्धीच्या प्रवेशें बुद्धी चि हरपे। मन जेथ संकल्पें सहित विरे ॥ ३ ॥ निळा ह्मणे चित्ता नुरे चित्तपण। आनंदा मुरवण आनंदें त्या ॥ ४ ॥

॥ १३६९ ॥ ह्मणोनियां शब्द न पवे चि तत्वता। बुद्धिचिया माथा वळघे कोण ॥ १ ॥ मना पवना कोंवि घडेल संचार। श्रुती परात्पर ह्मणती ज्यातें ॥ २ ॥ नाद बिंदु कळा ज्योती हे बोलणीं। आरौती निर्वाणीं विरती तेथें ॥ ३ ॥ निळा ह्मणे वर्म नेणति ते सकळे। वाचकें वाचाळे संतावीण ॥ ४ ॥

॥ १३७० ॥ होऊनियां ते चि राहीले निवात। रूपीं अखंडित रमती संत ॥ १ ॥ नित्य निरामय अखंड अद्वय। ध्याती देवत्रय ज्यातें सदा ॥ २ ॥ एकविस स्वर्गातें कवळुनि राहीलें। सूर्या प्रकाशिलें जेणें तेजें ॥ ३ ॥ निळा ह्मणे कृपा करूनियां सद्गुरु। देती अभय करु त्यासी फावे ॥ ४ ॥

॥ १३७१ ॥ हरीवीण आहे कोण। सान मोठें वेगळें ॥ १ ॥ सर्वांचा ही सर्वसाक्षी। अध्यक्षी हें नाम त्या ॥ २ ॥ कर्मा ऐसें देता फळ। सत्ता केवळ हे ज्याची ॥ ३ ॥ निळा ह्मणे ईटे उभा। परि हा नभा व्यापक ॥ ४ ॥

॥ १३७२ ॥ समोर सदा सर्वांकडे। मागें पुढें वेष्टित ॥ १ ॥ कां हो नेणा हरि ऐसा। जैसा तैसा परिपूर्ण ॥ २ ॥ उदका अंगीं जैसा रसु। गगनीं अवकाशु घनदाट ॥ ३ ॥ निळा ह्मणे अंतर्बाहे। त्याविण आहे कोण दुजें ॥ ४ ॥

॥ १३७३ ॥ सगुण निर्गुण कल्पनेचा भास। वस्तु अविनाश व्यापकत्वें ॥ १ ॥ स्वानुभवें पाहीं लटिकें साच नाहीं। परिपूर्ण अवघा ही आत्माराम ॥ २ ॥ आपलाचि सादु अंतराळीं जेवीं। दुजें नवीन दावी दुजेपण ॥ ३ ॥ लटिके ह्मणों जातां साच तया पोटीं। दर्पणींची भेटी आपणासवें ॥ ४ ॥ स्वप्नामाजी जेवीं नाना परिवार। प्रबोधीं साचार एकला चि ॥ ५ ॥ निळा ह्मणे रज्जु भासे सर्पपणें। झकवीलें तेणें नेणतीया ॥ ६ ॥

## देवप्राप्ति.

॥ १३७४ ॥ जीवाचा ही जीव तूं चि प्राणांचा प्राण। नयनाचें हि नयन तूंचि घ्राणाचें घ्राण ॥ १ ॥ सर्वहि इंद्रियभाव तूं चि माझे श्रीहरी। तुजविण न दिसे पाहतां मज मी माझारी ॥ २ ॥ चित्ताचें हि चित्त तूं चि मनाचें मन। श्रवणाचें हि श्रवण तूं चि रसनेची रसना ॥ ३ ॥ निळा ह्मणे तूं चि माझा सर्वहि व्यापक। देहादेहीं शोधुनि पाहतां न दिसे आणिक ॥ ४ ॥

॥ १३७५ ॥ सकळाचिया नेत्रें तुम्हां सर्व ही देखणें। सकळांचिया श्रोत्रें तुम्हां सर्व ही ऐकणें ॥ १ ॥ ऐसे सर्वज्ञ चि तुह्मीं सर्वदा देवा। जेथिल तेथें ज्याच्या तैशा जाणतसा भावा ॥ २ ॥ सकळांच्या ही रसना सर्व ही रस सेवितां। सकळांच्या ही चरणें लंघुनि जातां दिगंता ॥ ३ ॥ निळा ह्मणे सकळांच्या हि जीवाचे जीव। होउनियां अलिप्त सेखीं रूप ना नांव ॥ ४ ॥

॥ १३७६ ॥ ऐशा परि नमन माझें पंढरिनाथा। तूं चि होउनि तुजमाजि झालों मीं सरता ॥ १ ॥ न ये कळों कांहीं आतां एकानेक भाव। तुजमाजि मी ही मजमाजि तूं सर्व ॥ २ ॥ नाम रूप तूं चि माझें क्रीया कर्तव्य। कायिक वाचिक मानसिक जे निपजती भाव ॥ ३ ॥ निळा ह्मणे मी तुं उपाधी सारुनियां परती। राहों जैसे होतों तैसे निजरूप एकांतीं ॥ ४ ॥

॥ १३७७ ॥ ऐसा नीळा नित्यानंदीं निमग्न केला। देऊनीयां नामस्मरण चरणीं स्थापीला ॥ १ ॥ तेणें ब्रह्मानंदें गर्जे नाम वैखरी। आठवूनी रूप तुमचें हृदय मंदिरीं ॥ २ ॥ नेणे आपपर नेणे जन विजन। नेणोनीयां कांहिं चि नुरवी देहाचें भान ॥ ३ ॥ निळा ह्मणे हा चि माझा ऐश्वर्य भोग ॥ काया वाचा मानस अवघा पांडुरंग ॥ ४ ॥

॥ १३७८ ॥ नुरउनि दुसरें आतां ठेलों चरणीं । नित्यानंद भोगी तूं ची दिन रजनी ॥ १ ॥ आळउनि वाचे याचीं उत्तम नामें ॥ सारीन काळ याचि परि सुख संभ्रमें ॥ २ ॥ धरूनियां रूप दृष्टी हृदय भुवनीं । सांठवीन आपुलिया मनाचे मननीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे जन्मोनियां केली हे जोडी । विठोबाची सेवा नित्य नविये आवडी ॥ ४ ॥

॥ १३७९ ॥ भावें आळवितां देवा । लागला हातीं जुनाट ठेवा ॥ दैव मोडोनि आलें दैवा । सुख विश्रांती पावलों ॥ १ ॥ आतां वेचूं खाऊं जेऊं । शोभती अळंकार ते लेऊं ॥ आपुले सुहृद गौरवूं । हरिभक्त वैष्णव सावडे ॥ २ ॥ अपार संपत्ति आलि घरा । नाहीं आतां वोढा वारा ॥ नलगे जाणें आणिकाच्या घरा । कांहीं मागावें यासाठीं ॥ ३ ॥ खरें नाणें खरें कोणे । खरिया मोलें घेणें देणें ॥ खरें विके खरेपणें । न पडे उणें भरलेंसे ॥ ४ ॥ निळा ह्मणे माझिया दैवें । जोडिलें होतें पडिलें ठावें ॥ कृपा केली विठ्ठलदेवें । आइतें दिधलें भांडार ॥ ५ ॥

॥ १३८० ॥ मागें बहुतांसि वांटिलें । पुढें आणिकां हि ठेविलें ॥ भावें विश्वासिते वावलें । अधिकारिया दिधले अधिकार ॥ १ ॥ चतुरा चतुर शिरोमणी । सकळां जाणतियांचा धणी ॥ करूं जातो वांटणी । भाग जैसे त्यापरी ॥ २ ॥ एका वर्णाश्रम धर्में । एका यज्ञादिका कर्में ॥ एका वेदाध्ययन नेमें । एक चतुर्थाश्रमें संन्यासे ॥ ३ ॥ एका नामस्मरण मात्रें । एका पढतां स्तवनें स्तोत्रें ॥ एका गुणानुवाद चरित्रें । वर्णितां हा तोषला ॥ ४ ॥ एका ध्यानें समजाविलें । एका पूजनचि वारिलें ॥ एका जपें बुझाविलें । एका स्थापिलें योगावरी ॥ ५ ॥ एका तीर्थें यात्रा गमनें । एका ब्रह्मचर्यादि अनुष्ठानें ॥ एका व्रतें पुरश्चरणें । गृहस्थाश्रमें वानप्रस्थें ॥ ६ ॥ निळा ह्मणे हा सर्व जाणें । सर्वसाक्षी सर्वज्ञपणें ॥ जयापरि तैसें देणें । करी हा उणें नाहिं यासी ॥ ७ ॥

॥ १३८१ ॥ ज्या ज्या भक्तीं जेथें जेथें । पाचारिलें ज्या ज्या आर्तें ॥ तुह्मी जाउनियां तेथें । साह्य केलें श्रीहरि ॥ १ ॥ आर्तें गजेंद्राचें स्तवन । ऐकतां चि पदाभिगमन ॥ करुनियां त्याची आर्ति हरण । निजधामाप्रति पाठविला ॥ २ ॥ जिज्ञासता जनका आंगीं । तुमचे जाणावयालागीं ॥ त्यासि ज्ञान देउनिया विषय भोगीं । विदेही करूनि ठेविला ॥ ३ ॥ अर्थार्थी तो

बिभीषण । त्यासि लंकापति करुनि पूर्ण ॥ स्थापिला चिरंजीव पद देऊन । अर्थदान त्या दीधलें ॥ ४ ॥ शुकसनकादिक ज्ञानें । अनुसरले आत्मचिंतनें । त्यांसि देउनियां निजात्मज्ञान ॥ जीवन्मुक्तपदीं बैसविले ॥ ५ ॥ चतुर्विधा भक्ति चारी भक्त । तुमचे कृपे परम मुक्त ॥ उपमन्या क्षुधार्त्ती आळवीत । तया क्षीरसिंधु दीधला ॥ ६ ॥ ध्रुवें केलें तुमचें स्तवन । मागे बैसावया निजस्थान ॥ तयातें ध्रुवपदीं बैसवून । केला वरिष्ठ सकळांसी ॥ ७ ॥ सुदामदेव तो लाचारी । तीनचि मुष्टी पोहे हरी ॥ तेची घालुनियां मुखाभीतरी । सुवर्ण नगरी दिधली त्या ॥ ८ ॥ स्तंभीं प्रल्हाद पाचारी । तत्काळ प्रगटोनियां नरहरी ॥ हिरण्यकश्यपातें विदारी । आणि कुरवाळी निजभक्ता ॥ ९ ॥ निळा ह्मणे ऐशी कीर्ति । केली चरित्रें श्रीपती ॥ अपार हरिभक्ता अपार हस्तीं । अपार दिधलीं वरदानें ॥ १० ॥

॥ १३८२ ॥ एका नामें बहुत तरले । एका भावें जे अनुसरले ॥ एका तुमतेंचि ते पावले । एकाएकीं गोविंदा ॥ १ ॥ एका जाणोनियां तुमतें । एका रुसले अहंकारातें ॥ एका विसरोनियां संसारातें । एका सुखातें पावले ॥ २ ॥ एका तुमच्या निजध्यासें । एकाचि तुमच्या नामघोषें ॥ एका तुमच्या कृपालेशें । आपणा ऐसे तुह्मी केले ॥ ३ ॥ एका तुमच्या कीर्तिमेळें । एका तुमच्या भावबळें । एकाएकिं चि उठोनि पळे ॥ पाप सगळें गोविंदा ॥ ४ ॥ निळा ह्मणे एकाएकीं । स्मरणमात्रें चि झाले सुखी ॥ एका नामोच्चारें मुखीं । वैकुंठलोकीं बैसविलें ॥ ५ ॥

॥ १३८३ ॥ विठ्ठलनामें विठ्ठल झाले । देहभावा विसरुनि गेले ॥ १ ॥ सर्वकाळ विठ्ठल चित्तीं । ब्रह्मानंदें ते डुल्लती ॥ २ ॥ विठ्ठल ध्यानीं मनीं जनीं । विठ्ठल लोचनीं चिंतनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे भोगीं त्यागीं । विठ्ठल तया जडला आंगीं ॥ ४ ॥

॥ १३८४ ॥ नाम वाचे आठविलें । रूप मनीं सांठविलें ॥ १ ॥ आतां फिरुनियां घरा । येशी आपणचि माघारा ॥ २ ॥ लाविला मोकळ । भाव मागें सर्व काळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे आतुडलें । बरें वर्म हाता आलें ॥ ४ ॥

॥ १३८५ देखती ते विठ्ठलरूप । वाचे विठ्ठल नाम जप ॥ १ ॥ तेही विठ्ठलचि झाले आंगें । मोह ममता विषय त्यागें ॥ २ ॥ विठ्ठल कीर्ती

लेईले आंगीं । विठ्ठल झाले भोगीं त्यागीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे विठ्ठल झाले । द्वैतभावा ते मुकले ॥ ४ ॥

॥ १३८६ ॥ देवा भेटी संतपण दिसे । देवपण नुरे संतभेटी ॥ १ ॥ ब्रह्मानंदें निमग्न झाले । आप विसरले आपणा ॥ २ ॥ भक्तीचे आवडी झाले भिन्न । एकचि जीवप्राण उभयतां ॥ ३ ॥ निळा ह्मणे स्वसुखलोभा । एकिची प्रभा दोठाई ॥ ४ ॥

॥ १३८७ ॥ होतें तैसें पाईं केलें निवेदन । अंतरलों दीन बहुत होतों ॥ १ ॥ संबोखून केलें समाधान चित्ता । वोगरूनि भाता प्रेमरस ॥ २ ॥ नाम रत्नमणी करूनी भूषण । अळंकारीं मंडण माळा दीली ॥ ३ ॥ निळा तेणें सुखें झाला निरामय । नामीं नाम सोये निमग्नता ॥ ४ ॥

॥ १३८८ ॥ पांडुरगें सत्य केला अनुग्रह । निरसुनीयां देह बुद्धी भेद ॥ १ ॥ येऊनी एकांतीं उपदेसीलीं कानीं । बीजमंत्रें दोन्ही निजाक्षरें ॥ २ ॥ जीवशिवा सेज रचीली आनंदीं । आउटावें पदीं आरोहण ॥ ३ ॥ निजीं निजरूपीं निजविला निळा । आनुहातें बाळा हल्लर गाती ॥ ४ ॥

॥ १३८९ ॥ शोधूनी अन्वय वंश वंशावळी । परंपरा कुळी उच्चारण ॥ १ ॥ ह्मणवीलें पूर्वी जैसें होतें तैसें । केलें सामरस्यें समाधान ॥ २ ॥ एक छत्रझळके उन्मनी निशाणी । अनुहताचा ध्वनी गगनीं गर्जे ॥ ३ ॥ निळया स्वामी स्थापी निजपदीं दासा । करूनि उल्हास आवडीचा ॥ ४ ॥

॥ १३९० ॥ स्थीरावल्या वृत्ती पांगुळला प्राण । अंतरींचि खूण पावोनियां ॥ १ ॥ पुंजाळले नेत्र झाले अर्धोन्मीलित । कंठ सद्गदित रोमांच आले ॥ २ ॥ चित्त चाकटलें स्वरूपा माझारि । न निघे बाहेरि सुखावलें ॥ ३ ॥ सुनिळ प्रकाशे उदेजला दीन । अमृताचें पान जीवनकळा ॥ ४ ॥ शशी सूर्या झाली जीवें वोवाळणी । आनंदा दाटणी आनंदाची ॥ ५ ॥ निळा सुखासनीं प्रेमेसी डुल्लत । विराला निश्चित निश्चितीनें ॥ ६ ॥

॥ १३९१ ॥ उपरम झाला सर्वकाळ इंद्रीयां । स्वरूपीं विलया मन गेलें ॥ १ ॥ ऐसीया स्वानंदें बुझाविलें चित्त । राहिली आंचित वदनीं वाचा ॥ २ ॥ अष्ट आविर्भाव डउरले आंगीं ॥ प्राणी प्राण रंगीं नीजवासे ॥ ३ ॥ त्र्यबंद ठसा पडीला शरीरा । वृत्ती गेली घरा निजाचीया ॥ ४ ॥ निमो

नियां गेलें शब्दाचें बोलणें । पवनूचि प्राणें शोषीयेला ॥ ५ ॥ निळा सुखासुखीं पावला विश्रांती ॥ पदपिंडा समाप्ती करूनीयां ॥ ६ ॥

॥ १३९२ ॥ नीत नवा प्रेमा कृपेचिया बळें । अंतरीं हा वोळे आनंदघन ॥ १ ॥ नाचती मयूरे रोमांचीत दाटी । अमृताची वृष्टी जीवनकळा ॥ २ ॥ आकाशे दुमदुमी गर्जे अनुहत । सुनीळ तळपत विद्युल्लता ॥ ३ ॥ पिकली भूमीका बीज आलें फळा । अद्वय निजकळा संवगीलें ॥ ४ ॥ भाग्यवंत निळा सांठवी नीराळी । आत्माया जवळी निकटवासे ॥ ५ ॥

॥ १३९३ ॥ वेडा नव्हे मुका चतुर शाहणा । बोले अबोलणा मौन्यावस्था ॥ १ ॥ विष्णुदास निळा नाचे विदेहता । अंगीं सप्रेमता आवडीची ॥ २ ॥ हृदईं चतुर्भुज मेघशाम मूर्ति । मुखीं नामकीर्ति ब्रीदावळी ॥ ३ ॥ नेणता ह्मणोनी संतीं आपंगीला । निळा निरवीला पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १३९४ ॥ प्रवृत्ति निवृत्तीचे आटूनियां भाग । उतरिलें चांग रसायण ॥ १ ॥ ज्ञानाग्नि हुताशीं कडसीले वोजा । आत्मसिद्धी काजा लागुनिया ॥ २ ॥ ब्रम्हरस ब्रम्हीं सिद्ध झाला पाक । घेतला रुचक प्रतीति मुखीं ॥ ३ ॥ स्वानुभवें आंगीं झाला समरस । साधन निजध्यास ग्रासोग्रासीं ॥ ४ ॥ आरोग्यता निळा पावला अष्टांगीं । मीरवला रंगीं निजात्मरंग ॥ ५ ॥

॥ १३९५ ॥ जाणीवचि माझी गिळूनी ठेला । नेणवितें प्याला निपटुनियां ॥ १ ॥ निढळवाणें मज करूनी ठेविलें । जीवाचेंही हरिलें जीवपण ॥ २ ॥ ज्ञानासी तो हा वाढोंचि नेदी । ग्रासील्या उपाधी परमार्थीका ॥ ३ ॥ निळा म्हणे येणें नेलें आपपर । मोडीयेली थार दोहींकडे ॥ ४ ॥

॥ १३९६ ॥ नेटकेंचि दैव उघडलें आजी । तोहा मजमाजी संचरला ॥ १ ॥ आतां कैसें करूं मी यासी । नावरेची मनासी आवरितां ॥ २ ॥ सुदीन घटीका सांपडली होती । ते पडिली आवचिती हातीं याचे ॥ ३ ॥ निळा म्हणे मी मज माझें । हिरोनियां वोझें नेलें सकळ ॥ ४ ॥

॥ १३९७ ॥ उगेंची आतां बैसेन मी ह्मणें । तंव हा करण चेष्टवीतो ॥ १ ॥ दृष्टीपुढें हा उभाचि ठाये । ऐकणें होऊनी राहे श्रोत्रबिळीं ॥ २ ॥ मनही नेऊनी लपउनी ठेवी । चित्तासी हा गोवी आपणापासीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे बाई हृदयींच राहिला । अवघाचि रोधीला जागा येणें ॥ ४ ॥

॥ १३९८ ॥ अवघाची गुणीं आहे हा भला । परि हा याला क्षोभ कां ॥ १ ॥ कांहींचि उरो नेदी माझें । संचितपुंजे भरियेलें ॥ २ ॥ बरें वाईट हा न ह्मणे चि कांहीं । पाप पुण्य तेंही लुंचियेलें ॥ ३ ॥ निळा ह्मणे जें जें देखे । तें तें हा सुखें भरितुची ॥ ४ ॥

॥ १४९९ ॥ उगाचि नसे क्षणही भरि । व्यभिचारी हरि चित्ताचा ॥ ॥ १ ॥ मन चि गोवी चरणापासी । अवघे चि यासी मग मुक्त ॥ २ ॥ घरिचे घरीं जीवींचें जीवीं । उघडी हा ठेवी जुगदीच्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे धरिली खोडी । मुळींची न सोडी कल्पवरि ॥ ४ ॥

॥ १४०० ॥ जडला जीवीं तो नव्हे चि परता । चित्तिंचित्ता व्यापू-नियां ॥ १ ॥ बुद्धी माझे याचेंचि ठाणें । राहटे करणें अहोरात्रीं ॥ २ ॥ अंतःकरणीं धरिला थारा । आंतु शरीरा बाहेरी हा ॥ ३ ॥ निळा ह्मणे अवघा चि हरि । आह्मां घरीं दारीं दाटला ॥ ४ ॥

॥ १४०१ ॥ व्यापूनियां ठायां ठावो । अवघा चि देवो प्रगटला ॥ १ ॥ संतकृपा फळा आली । ते वरुपली स्वानंदें ॥ २ ॥ अंकुरली भावबीजें । विस्तारली सहजे गुणचर्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे कणिसें दाटे । नाहीं फळ कटकण भारे ॥ ४ ॥

॥ १४०२ ॥ नव्हती माझे फुकट बोल । जाणे विठ्ठल सत्य मिथ्या ॥ ॥ १ ॥ संतकृपेची हे जाती । ओघें चि चालती अक्षरें ॥ २ ॥ कैची मती बोलावया । ठायीं चि पाया विदित ते ॥ ३ ॥ निळा ह्मणे बाहेरी आले । होतें सांठवलें हृदयीं जें ॥ ४ ॥

॥ १४०३ ॥ केलें तैसें वदलों देवें । अनुभवें उद्गार ॥ १ ॥ नाहीं येथें चालों येत । तर्क मत पायांपें ॥ २ ॥ स्वामीसवें निकटवासें । जैसें तैसें केंवि सरे ॥ ३ ॥ खोटी याची नव्हे चाली । निवाढिली पारखिता ॥ ॥ ४ ॥ निळा ह्मणे केला धंदा । परमानंदा आज्ञेचा ॥ ५ ॥

॥ १४०४ ॥ नेणें मी परिहार । देऊं कोणासी उत्तर ॥ १ ॥ ह्मणो-नियां हें खरें खोटें । ठेवा बांधोनियां मोटे ॥ २ ॥ नेणोनियां तुमची गती । तंटा माझ्यांच नावें करिती ॥ ३ ॥ निळा ह्मणे प्रत्युत्तर । मज तो न सुचे उत्तर ॥ ४ ॥

॥ १४०५ ॥ देव हांसोनि बोलती । नको येऊं काकुलती ॥ १ ॥ आह्मीं रंजवूं आपणीयां । तुझीये वाचे चेतउनीयां ॥ २ ॥ नलगे कांहीं परिहार । देणें तुज धरीं धीर ॥ ३ ॥ निळा ह्मणे चरणावरि माथा । ठेउनी करी पुढें कथा ॥ ४ ॥

॥ १४०६ ॥ न धरीं आतां शंका । काशासाठीं भेऊं लोकां ॥ १ ॥ ज्याचें ओझें तयावरी । मज हे ऐसी काय थोरी ॥ २ ॥ सांगीतलें करूं काज । ज्याची तया चिंता लाज ॥ ३ ॥ निळा ह्मणे गेला भेवो । जाणोनि माझे पंढरिरावो ॥ ४ ॥

॥ १४०७ ॥ होवोनियां निश्चळ । स्थीर राहिलों अढळ ॥ १ ॥ नाहीं भय शंका मनीं । विश्वास मानियेला वचनीं ॥ २ ॥ ज्याचें तया पुढें । बोलेन वेडें हो वाकडें ॥ ३ ॥ निळा ह्मणे देवें । वदवीलें तें वदेन भावें ॥ ४ ॥

॥ १४०८ ॥ चित्त ठेउनि पायावरि । रूप धरुनियां अंतरीं ॥ १ ॥ मुखें याच्या नामावळी । आठवीन नित्यकाळीं ॥ २ ॥ करीन ऐसाची कैवाड । शंका येऊं नेदीं आड ॥ ३ ॥ निळा ह्मणे दिवसराती । तुह्मां आठवीन श्रीपती ॥ ४ ॥

॥ १४०९ ॥ बरा केला अंगीकार । माझा तुह्मी घेतला भार ॥ १ ॥ नाहीं तरी जातों वायां । नाना योनि भोगावया ॥ २ ॥ गाईन यावरि चोखाडे । तुमचे कीर्तीचे पवाडे ॥ ३ ॥ निळा ह्मणे ध्यानीं चित्तीं । धरूनि राहेन तुमची मूर्ती ॥ ४ ॥

॥ १४१० ॥ नपडे आतां दीवसराती । विसर तुमचा श्रीपती ॥ झाली इंद्रियां विश्रांति । रंगली नाम चिंतनें ॥ १ ॥ वदनीं सुंदर तुमचें नाम । डोळियां रूप मेघश्याम ॥ श्रवणीं ऐकतां उत्तम । गुण तुमचे गोविंदा ॥ २ ॥ हातें वाजवीतां टाळी । चरणें नृत्य कथाकाळीं ॥ गोजिरें ध्यान हृदय कमळीं । तेंची ठसावोनि राहीलें ॥ ३ ॥ मस्तक ह्मणे चरणावरीं । माझा ठाव निरंतरीं ॥ जिव्हा रंगली नामोच्चारीं । न राहे क्षणभरी आठवीतां ॥ ४ ॥ निळा ह्मणे माझा हेत । होउनी ठेला मुद्रांकित ॥ सदासर्वदा गावें गीत । हें चि चिंतुनि राहीला ॥ ५ ॥

॥ १४११ ॥ ध्यानिं रंगलें मानस । जिव्हे नामाचा उल्हास ॥ कीर्तन आवडे श्रवणास । नेत्रही स्वरूपास भाळले ॥ १ ॥ वाचा लांचावली गुणा । तुमच्या नाम संकीर्तना ॥ देह घाली लोटांगणा । मस्तक चरणा सोकावला ॥ २ ॥ ऐसीं अवघीच अवघ्या ठाईं । पडलीं तुमचीये प्रवाहीं ॥ तुम्हांवीण दुजें कांहीं । कोणा नाठवे सर्वथा ॥ ३ ॥ देखिलें तें ईटेवरी । राहिलें डोळीया भीतरी ॥ तेणें अवघीया एक चि सरि । वेधूनीयां ठेविलें ॥ ४ ॥ निळा ह्मणे नव्हे आतां । पालट केली याही सर्वथा ॥ नामें रूपें पंढरिनाथा । लावीलें पंथा आपुलिया ॥ ५ ॥

॥ १४१२ ॥ बरवी आजी हे जोडी झाली । तुमचीं पाउलें देखिलीं ॥ अवघींच इंद्रियें निवालीं । आलिंगनीं तुमचिया ॥ १ ॥ वदनीं आठवलें नाम । तुमचें सांपडलें प्रेम ॥ बरवा साधला हा नेम । मनही विश्राम पावलें ॥ २ ॥ बरवा पंढरपुरा गेलों । सत्संगें महाद्वारा पावलों ॥ भीतरि राउळा प्रवेशलों । बरवा भेटलों विठोबासी ॥ ३ ॥ तेणें पुरले सर्वेही काम । रूप डोळां वदनीं नाम ॥ संतांचाही समागम । धणी धाय तो पावलों ॥ ४ ॥ निळा ह्मणे सर्वांपरि । कृतकृत्य झालों हरि ॥ तुमचा दास मी कामारि । ठेवा दारवटां राखोन ॥ ५ ॥

॥ १४१३ ॥ तुमच्या पाईं ठेवितां चित्त । पुरले हेत सकळही ॥ १ ॥ बरवें वर्म हें हाता आलें । संतीं दीधलें दाखउनि ॥ २ ॥ बरवें उच्चारिलें नाम । जिव्हे काम मारुनी ॥ ३ ॥ निळा ह्मणे आठव धरिला । बरवा सांगितला तो संतीं ॥ ४ ॥

॥ १४१४ ॥ धन्य झालों कृपा केली । भेटी दिधली अवचिती ॥ १ ॥ सांभाळिलें तुह्मीं संतीं । केल्या आर्ती परिपूर्ण ॥ २ ॥ मी तो दीन तुमचा रंक । घातली भीक अभयाची ॥ ३ ॥ निळा ह्मणे न भेणें आतां । सन्मुख येतां कळिकाळ ॥ ४ ॥

॥ १४१५ ॥ तुमच्या बळें निःशंक मनीं । गाऊं वदनीं हरिनाम ॥ १ ॥ कळिकाळ तोही वंदी माथां । तुमच्या शरणांगता भिउनीयां ॥ २ ॥ नुपेक्षी या पंढरिनाथा । जाणोनि स्थापित संताचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे भूमंडळीं । संत महाबळी विदित ॥ ४ ॥

॥ १४१६ ॥ ब्रह्मानंदें गर्जे वाणी । हरिच्या गुणीं मातली ॥ १ ॥

आंवरितांही नावरती । पूरचि लोटतो अक्षरांचे ॥ २ ॥ अवतार चरित्रें जन्मकर्में । क्रीडा संभ्रमें केलीं ते ॥ ३ ॥ निळा ह्मणे घडघडाट । चालती लोट नावरती ॥ ४ ॥

## बालक्रीडा.

॥ १४१७ ॥ खेळ मांडी गडियांसवें । आपण लपावे लपवी त्यां ॥ १ ॥ ह्मणे अवघे झांका डोळे । आपण पळे पळवी त्यां ॥ २ ॥ आला डाव द्यावी पाळी । मागे जवळी गडियांही ॥ ३ ॥ निळा ह्मणे पाठीवरी । बैसे हरि बैसवी त्यां ॥ ४ ॥

॥ १४१८ ॥ गडियां ह्मणे पाळतां घरें । नवनितें क्षिरें असती ते ॥ १ ॥ ह्मणती गोवळ ऐके कान्हा । आहेसि तूं देखणा पुढें होईं ॥ २ ॥ आम्ही नेणों थोरेमारे । अवघीं घरें तुज ठावीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे काढीं माग । आह्मी सवेग येऊं मागें ॥ ४ ॥

॥ १४१९ ॥ ऐकोनि बोल हांसे त्यांचे । ह्मणे हे बेव्याचे पोट पोसे ॥ १ ॥ आयतें आणुनि द्यावें हातीं । मग हे सेवीती स्वानंदें ॥२॥ तयां ह्मणे यारे लागे । माझिया मागें चोजवित ॥ ३ ॥ निळा ह्मणे पाळतिही करी । आपण चि चोरी वाटिद्या ॥ ४ ॥

॥ १४२० ॥ दहीं दूध तूप लोणी । आणि दुधाणी चोरूनी ॥ १ ॥ ह्मणे घ्यारे पोटभरी । आपणहि स्वीकारी त्यां सवें ॥ २ ॥ नाचे हातीं लोणिया गोळे । नाचवी गोंवळे भोंवताली ॥ ३ ॥ निळा ह्मणे चाहाळी करी । रिचवि वरी आणि हांसे ॥ ४ ॥

॥ १४२१ ॥ कान्होबाचें चाटुनियां आंग । ह्मणती मग पोट धालें ॥ १ ॥ रोज ऐसिची देई धणी ॥ लागती चरणीं गोपाळ ॥ २ ॥ ह्मणती गोविंद मोठे व्हाल । मग तुम्ही सांडाल सोय माझी ॥ ३ ॥ निळा ह्मणे ते वाहाती आण । नेणों सुजाणा तुजविण ॥ ४ ॥

॥ १४२२ ॥ जन्मोजन्मीं तुमचे दास । न करूं आस आणिकाची ॥ १ ॥ हे तों तुह्मी जाणा देवा । तरि कां ठेवा बोल आह्मां ॥ २ ॥

कान्हो ह्मणती पाहिलें मन । सखे सज्जन तुह्मी माझे ॥ ३ ॥ निळा ह्मणे देइन धणी । ऐसिच चक्रपाणी ह्मणे तया ॥ ४ ॥

॥ १४२३ ॥ आतां माझ्या सहवासें रहा । होईल पहा कौतुक तें ॥ १ ॥ चला जाऊं मांडू खेळ । ह्मणती गोपाळ बहुत बरें ॥ २ ॥ खेळों हुतुतु वांटुनि गडी । पुढेंहि परवडि विटिदांडू ॥ ३ ॥ निळा ह्मणे श्रीहरि शहाणा । नागवे चि कोणाडाया तळीं ॥ ४ ॥

॥ १४२४ ॥ विटियादांडू मांडिति खेळा । मेळवुनि मेळा संवगडियांचा ॥ १ ॥ सूं ह्मणोनियां मारिति टोला । हांसति त्याला डाव घेतां ॥ २ ॥ धांवति एक ते उभे चि टाकती । जिंकोनियां मानिति आपणा धन्य ॥ ३ ॥ निळा ह्मणे खेळ मोडरे गडिहो । कान्होबाचे पाहों पाय आतां ॥ ४ ॥

॥ १४२५ ॥ येउनियां गडी वंदिती कान्हया । आळंगितो तया बहुता माने ॥ १ ॥ चला जाऊं घरा हरिसवें चालती । आनंदें नाचती भोंवताले ॥ २ ॥ इंद्रादिकां देवां नाहीं तैसें सुख । अवलोकिती मुख गोविंदाचें ॥ ३ ॥ निळा ह्मणे जन्म नाहीं तयां मरण । अवलोकिती सगुण रूपडोळे ॥ ४ ॥

॥ १४२६ ॥ घुमघुमिती मोहऱ्या नादें । पांवे छंदें वाजविती ॥ १ ॥ शिंगें काहाळा गजर झाला । श्रीहरि शोभला समुदायें ॥ २ ॥ अंगीं चंदन बाणली उटी । कास ते गोमटी पितांबरें ॥ ३ ॥ निळा ह्मणे केशर भाळीं । तेज बंबाळी मुगुटाचें ॥ ४ ॥

॥ १४२७ ॥ यारे गडिहो घेऊं धणी । काला वदनीं श्रीहरिचा ॥ १ ॥ सांडुनियां आभिमान दुरी । नाचों फेरी गोविंदा ॥ २ ॥ देखोनि भाव अंतरींचा । देईल हातींचा विभाग ॥ ३ ॥ निळा ह्मणे ब्रह्मरस । उरले शेष हरिचे ते ॥ ४ ॥

॥ १४२८ ॥ कावडी भरुनि आणिलीं क्षीरें । दहीं घृत सारें नवनीतें ॥ १ ॥ ओदनाचेही पर्वत आले । माजि ते केले मिश्रित ॥ २ ॥ भोवते गोपाळ मध्यें हरी । दाविती कुसरी नृत्याची ॥ ३ ॥ निळा ह्मणे ब्रह्मानंदु । लोटला सिंधु क्षीराचा ॥ ४ ॥

॥ १४२९ ॥ मोहऱ्या पांवे तलालोरी । नाचती गजरीं गीत गाती

॥ १ ॥ शिंगे काहाळा मृदंग विणे । गाणें नाचणें निजछंदें ॥ २ ॥ टिपारे घागऱ्या एकची । उठितातीं पाईं झणत्कार ॥ ३ ॥ निळा ह्मणे रंगले रंगें । केले श्रीरंगें आपणासे ॥ ४ ॥

॥ १४३० ॥ देखोनियां साचा अंतर्भाव । बोळला देव कृपासिंधू ॥ १ ॥ येउनि जवळी हृदयीं धरी । आणी मुखीं भरी ब्रह्मरस ॥ २ ॥ देउनि विभाग आपला मान । करी वाढवून मान्य जगीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे ठाकुनि आलेला वेळ । आवडी गोपाळ आळंगी सा ॥ ४ ॥

॥ १४३१ ॥ गोधनें घेउनी गोपाळ आले । छायेसी बैसले कळंबाचीये ॥ १ ॥ आतां ह्मणे मांडा खेळ । गोमटी हे वेळ सांपडली ॥ २ ॥ तंव कृष्ण ह्मणती आधीं जेवा । रुचेल वरवा खेळ मग ॥ ३ ॥ पोटांत भुक सुकलें मुख । कोणतें सुख खेळायाचें ॥ ४ ॥ कोणा कैसा पाहोंद्या दीठी । यारे सोडा गांठी शिधोरियाच्या ॥ ५ ॥ सोडिती सिधोऱ्या दावीती अवघे । तंव एका ऐशी नव्हे एकीपरि ॥ ६ ॥ अरुप एक ते बोलतातीं बोल । परि अर्थ सखोल विचारितां ॥ ७ ॥ आधीं माझा घास भरी । मग मी श्रीहरि घेईन तुझा ॥ ८ ॥ कन्हा ह्मणे ऐकारे बोजा । आधीं तुह्मी माझा घांस भरा ॥ ९ ॥ गोपाळ ह्मणती शेवट गोड । पुरवीं आधीं कोड आमुचा घेईं ॥ १० ॥ घाटा घुगऱ्या कोरड्या भाकरी । एकाची शिधोरी सीळीपाकी ॥ ११ ॥ कढण काला कालविलें ताक । एकाचा साजूक दहींभात ॥ १२ ॥ एक ते ह्मणती आमुचें अंगीकारी । मुखीं घांस भरीं टाकूं नको ॥ १३ ॥ चांगलें कोणाचें आणावें गोपाळा । आमचा हा दुबळा संसार ॥ १४ ॥ तव कान्हा ह्मणे आईकारे गडे । तुमचें चि आवडे घाला मुखीं ॥ १५ ॥ तुमचीये हातींचें भाजी देठ पान । तें आह्मां समान पंचामृता ॥ १६ ॥ आणखी अर्पिती उपाधी जाणीवा । विकृती साचीया भावा देखोनि मज ॥ १७ ॥ सर्व भावें आम्हां हें चि गोड लागे । दांभिका न लगे भेदकांचें ॥ १८ ॥ मिटक्या देउनियां स्वीकारी श्रीरंग । मग म्हणे विभाग घ्यावारे माझा ॥ १९ ॥ ब्रह्म रस वरि नामाचें सिंचन । सेवारे सज्जन सखे माझे ॥ २० ॥ जेऊनीयां धाले गोविंदा पंगती । उद्गार ते देती स्वानुभवें ॥ २१ ॥ धन्य तो सोहाळा आनंदाचा खेळ । निळा ह्मणे गोपाळ सांगातीं ज्यां ॥ २२ ॥

॥ १४३२ ॥ गोपाळ ह्मणती कान्ह्या आमुची उमाणी । सांगसी तरि

चरणीं ठेवूं माथा ॥ १ ॥ यावरी श्रीहरि बोले मधुराक्षरीं । पुसारे झड-करी विलंब नका ॥ २ ॥ मी चि मज न देखें । मी माझें नोळखें ॥ कान्हो कोण्या मुखें सांगें आतां ॥ ३ ॥ तंव बोले गोविंदु ऐकारे सावधु । बोधी विराला बांधु ह्मणोनियां ॥ ४ ॥ एक ह्मणती गोपाळा देखणा माझा डोळा । तरी न देखो मातें आंधळा कैसेनि झाला ॥ ५ ॥ तंव कृष्ण ह्मणे द्योतक तूंची प्रकाशक । मृगजळ केंवी अर्क देखेल सांगे ॥ ६ ॥ एक ह्मणती गडी रसना रस निवडी । तरि का ने घे गोडी आपुली आपण ॥ ७ ॥ निळा ह्मणे कान्हया बोले आमुच्या काजा । सिद्धी गेले गुज पावलेती ॥ ८ ॥

॥ १४३३ ॥ आतां मी पुसेन तें सांगारे उमाणें । तुह्मी आलेती कोठुनी जाणें कोठें ॥ १ ॥ मग विचारिती गोवळ ह्मणती नेणों मूळ । ऐसे चि आह्मी आढळ दास तुझे ॥ २ ॥ ह्मणतो नंदाच्या पोसण्या । दार सुण्या दासाच्या ॥ ३ ॥ जेथुनी तुझें येणें तेथुनि आमुचें जीणें । जाशील तेव्हां जाणें तुजची संगे ॥ ४ ॥ निळा ह्मणे ऐकोनीयां संतोषले हरि । म्हणती यारे यावरि खेळ खेळों ॥ ५ ॥

॥ १४३४ ॥ चुचकारुनि गोधनें बैसवीलीं आखरीं । म्हणती याहो श्रीहरि खेळों आतां ॥ १ ॥ धांवती वोढाळे आवरिलीं सकळें । झालों तुझिया बळें बळीवंत ॥ २ ॥ नाचवीसी तैसे नाचों सुखें आतां । काळा-चिया माथां ठेवुनि पाय ॥ ३ ॥ निळा ह्मणे केलों सांगाती दैवाचे । देउनि सुखाचें भोजन आजी ॥ ४ ॥

॥ १४३५ ॥ बैसवुनि आले गोधनें आखरि । खेळ नानापरी मांडीयेला ॥ १ ॥ वाजवीती पांवे मोहऱ्या घुमती । छंदें सा नाचती गाती ब्रीदें॥ २ ॥ आलके सेलके हमामा हुंबरि । झोंब्या घेती कुसरि निडुनि गडी ॥ ३ ॥ लगोरियाचें डुसुर कार्डी मुरदांग । नानापरि आंग मोडुनियां ॥ ४ ॥ निळा ह्मणे हरि पाहोनी निराळा । अवघी याच्या खेळा साक्षपणें ॥ ५ ॥

॥ १४३६ ॥ गोपाळ विनोदें बोलती । तीरस्कारिती गोविंदा ॥ १ ॥ लाज ना भये नाहीं कामयासी । मोकाळ सकळांसी ठाउका असे ॥ २ ॥ उगा चि बैसे पाहे खेळ । भोवडा सकळ आपणातुनि ॥ ३ ॥ निळा ह्मणे भोगुनी सोळा सहस्र नारी ।कैसा ब्रह्मचारि म्हणवीतसे ॥ ४ ॥

॥ १४३७ ॥ वळसा आम्हांसी पाठवी । त्याचा नाठवी उपकारही ॥ १ ॥ नका येऊं देऊं संगें । लावा मागें भोवंडुनी ॥ २ ॥ याचि वोढाळे धावती । सैरा नाटोपती ते आम्हां ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐकोनि हरि । सांचें करी समाधान ॥ ४ ॥

॥ १४३८ ॥ जिवलग माझे गडी । न गमे घडी तुम्हांवीण ॥ १ ॥ सांगा जे जे मनोरथ । पुरविन आर्त तुमचे ते ॥ २ ॥ नका आतां उदासीन । करूं मन मजवरि ॥ ३ ॥ निळा म्हणे हरि ऐसा । करी लालसा दासाची ॥ ४ ॥

॥ १४३९ ॥ यावरि बोलती गोवळ । तूंचि सकळ जाणता ॥ १ ॥ कैसें जाणें येणें आम्हां । पुरुषोत्तमा तुजवीण ॥ २ ॥ धन वित्त आमुचें गोत । तुह्मी सतत जीवप्राण ॥ ३ ॥ निळा म्हणे वरद्ळ वोली । केली साहीली पाहीजे ते ॥ ४ ॥

॥ १४४० ॥ तुझीये संगती । आह्मी लागलों नेणती ॥ १ ॥ परि तूं कृपावंत हरि । सांभाळीसी सर्वा परि ॥ २ ॥ शहाणे तूंते चोजवीती उदासी तूं तयां प्रतीं ॥ ३ ॥ निळा म्हणे भावीकाला । ह्मणवी अंकीत मी त्याला॥ ४ ॥

॥ १४४१ ॥ नाचती विनोदें । क्रीडा करी त्यांच्या छंदें ॥ १ ॥ गोवळ वाकुल्या दाविती । आलें वाचे तें बोलती ॥ २ ॥ म्हणती चोरट्या शीनळा । दोघां बापांचिया बाळा ॥ ३ ॥ लटिकीया कपटिया कुचरा । निर्बळ नपुंसका निष्ठुरा ॥ ४ ॥ तोंडें वांकुडी पिचके डोळे । तयां माजी आवडी खेळे ॥ ५ ॥ निळा ह्मणे विश्वाचीया । नवजे दुरिपासुनिया ॥ ६ ॥

॥ १४४२ ॥ गोड लागे जें आपणा । तेंचि वांटी सकळां जणां ॥ १ ॥ पोट भरे तों पुरवी । उरलें बांधोनियां ठेवी ॥ २ ॥ जतन आहे तुह्मां साठीं । नका धांवो बारावाटी ॥ ३ ॥ निळा ह्मणे सांगा । पाहीजे तें जिवीचें मागा ॥ ४ ॥

॥ १४४३ ॥ धीट आधीकार कांपीरे । बधीर बोलिके तोतीरे ॥ १ ॥ भावीकाचा गोड भावो । देखोनी सवें नाचे देवो ॥ २ ॥ ह्मणे धन्य तुमचें कर्म । अवघें माझेची ठांई प्रेम ॥ ३ ॥ निळा ह्मणे तुह्मांवीण । दुजे आप्त मज ते कोण ॥ ४ ॥

॥ १४४४ ॥ अंतरंग माझे गडी । न गमे तुह्मांवाचुनि घडी ॥ १ ॥ यारे जवळी फांकों नका । झकवल्यासवे कोणा लोका ॥ २ ॥ तुमचा गोड वाटे संग । शहाणे उबग मज त्यांचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे भाविकां प्रती । येऊनी काकुळती बोलतु ॥ ४ ॥

॥ १४४५ ॥ पासुनी तुह्मां न वजें दुरी । क्षण घटिका भरी वेगळा ॥ १ ॥ चालतां तुह्मां धांवे पुढें । मागेंही वोढे सरिसाचि ॥ २ ॥ निजल्या जवळी तुह्मां उभा । भक्तीलोभा गुंतलों ॥ ३ ॥ निळा ह्मणे करुनि साटी । तुह्मां कल्प कोटी न विसंबें ॥ ४ ॥

॥ १४४६ ॥ देतां शिव्या हांसों लागे । निंदा श्लाघ्ये ऐकोनी ॥ १ ॥ करिती त्याचें अवघें चि गोड। करुनि कोड स्वीकारी ॥ २ ॥ जेवितां देती उष्टावळी ॥ घाली कवळी मुखीं चि त्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे धनी वारे घाले । ह्मणे मी पावलों पाहुणेर ॥ ४ ॥

॥ १४४७ ॥ शिंगे काहाळा मोहरि पावे । नांदें हेलावे अंबर ॥ १ ॥ वाकी घागऱ्या तोरड पायीं । धांवती गाई थाट पुढें ॥ २ ॥ मोर कुंचे चांदीवे वरि । नाचती गजरीं हरिनामें ॥ ३ ॥ पढती ब्रीदेंसवे निळा । बहुत गोपाळा आवडे ॥ ४ ॥

॥ १४४८ ॥ कैसा होतो ब्रह्मानंद । भाग्यमंद न देखति ॥ १ ॥ वाजतां वाद्यें नाईके कानीं । वीट मानी अभागी ॥ २ ॥ आह्मी सेवूं यारे गडी । तोडूं बेडी संसार ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसी वेळ । न लभे काळ वेचलीया ॥ ४ ॥

॥ १४४९ ॥ आवघा टाकोनियां धंदा । यारे गोविंदा सांगातें ॥ १ ॥ आवघेचि लाभ येती घरा । तुमच्या एक मोहरा वोळोनि ॥ २ ॥ काय कांडोनियातें भुस । न लभे लेश कणाचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे पुरे उरे । सवे धुरे चालतां ॥ ४ ॥

॥ १४५० ॥ विश्वासी ते ऐकतां कानीं । धरिती मनीं आदरें ॥ १ ॥ पूर्वार्जितें उत्तमें होती । आली सत्संगती भेटते ॥ २ ॥ सुखें सुख वाढतें झालें । केलीया विठ्ठलें कृपा मग ॥ ३ ॥ निळा ह्मणे निजात्म सुखा । पावलें एका क्षण मात्रें ॥ ४ ॥

॥ १४५१ ॥ भावीक गोवळ । अंगीं विश्वासाचें बळ ॥ १ ॥ तेणें स्थीरावली बुद्धी । निश्चळ झाली हरिच्या पदीं ॥ २ ॥ नाहीं ओढा वारा । चित्तीं चैतन्याचा थारा ॥ ३ ॥ निळा ह्मणे हरिच्या संगें । करिती क्रीडा नाना रंगें ॥ ४ ॥

॥ १४५२ ॥ पडतां चि तें वचन कानीं । धरिती मनीं अत्यादरें ॥ १ ॥ सुकृताचीं उत्तम फळें । आलीं एक वेळे ओढवोनि ॥ २ ॥ सुखीं सांठवलें सुख । हरिखा हरिख भेटला ॥ ३ ॥ निळा ह्मणे कल्प कोटी । पडली गांठी हरिसवें ॥ ४ ॥

॥ १४५३ ॥ हरिच्या पायीं विश्वासले । संवगडे झाले म्हणउनी ॥ १ ॥ दिवस राती नव्हतां तुटी । सांगती गोडी आलोलिका ॥ २ ॥ ब्रम्हानंदें खेळती खेळ । करिती कल्लोळ गीतवाद्यें ॥ ३ ॥ निळा म्हणे निर्भय चित्तें । नाणिती काळातें निज दृष्टी ॥ ४ ॥

॥ १४५४ ॥ सांगीतली धरिती गोठी । आदर पोटीं भक्तांचा ॥ १ ॥ तया सन्मुख झाला हरि । संसार तमारी तिमिराचा ॥ २ ॥ निरसुनियां भ्रांतीमळ । केले निर्मळ सहवासी ॥ ३ ॥ निळा म्हणे झाला ऋणी । चक्रपाणी साचा चि ॥ ४ ॥

॥ १४५५ ॥ ज्याचा विश्वास जडला पायीं । हरि वीण कांहीं नेणती ॥ १ ॥ त्याचा करी अंगीकार । निरसी अंधार ममतेचा ॥ २ ॥ सत्यासत्य दाखवी तया । लावी आपुलीया निजसोई ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसें वर्म । सांपडे सुगम एकनिष्ठा ॥ ४ ॥

॥ १४५६ ॥ एकनिष्ठ झाला भाव । आतां देव ते चि अगें ॥ १ ॥ द्वंद्वें त्याचीं करिती काई । सर्वां ठायीं देव तयां ॥ २ ॥ ध्यानीं मनीं जनीं वनीं । प्रगटे लोचनीं अहोरात्र ॥ ३ ॥ निळा म्हणे वियोग वार्ता । नेणती सर्वथा हरिभक्त ॥ ४ ॥

## गोपिकांचें प्रेम.

॥ १४५७ ॥ श्रीकृष्णस्वरूपा वेधल्या त्या नारी । देखति अंतरीं तें

ची रूप ॥ १ ॥ गमनीं शयनीं आसनीं भोजनीं । देखति जनीं वनीं दृष्टीपुढें ॥ २ ॥ एकांतीं लोकांतीं घरिं दारीं बाहेरी । त्याविण निजाचारी नेणती दूजे ॥ ३ ॥ निळा ह्मणे सर्व त्याचा हा परिवार । होउनी शार्ङ्गधर ठेला घरीं ॥ ४ ॥

॥ १४५८ ॥ बोलती बोलणें चालती चालणें । करिती घेणें देणें परि तो ध्यानीं ॥ १ ॥ जेवीती जेवीणीं खेळती खेळणीं । मिरवती भूषणीं परि चित्त तेथें ॥ २ ॥ गीतीं गाती गीत विनोदीं हांसत । रोदनीं रूदत परि त्या कृष्णीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे सुखें भोगिती नाना भोग । परि त्यांचे श्रीरंग ध्यानीं मनीं ॥ ४ ॥

॥ १४५९ ॥ चित्ताचे चिंतनीं मनाचे मननीं । जीवाचे जीवनीं कृष्ण त्यांचे ॥ १ ॥ बुद्धीचे बोधनीं श्रोत्राचे श्रवणीं । आमोद घेतां घ्राणीं कृष्णीं मन ॥ २ ॥ देहीं देहभावा नेणती स्वभावा । इंद्रियांचा धावा कृष्णरूपीं ॥ ३ ॥ निळा म्हणे त्यांचा वर्ततां व्यापार । अवघा शार्ङ्गधर होऊनि ठेला ॥ ४ ॥

॥ १४६० ॥ बोलती चालती देखती ऐकती । सर्वत्रीं श्रीपति त्यांचे दृष्टी ॥ १ ॥ सामूरें माहेर सासू सासरा दीर । देखती त्या भ्रतार हरिच्या रूपें ॥ २ ॥ सोयरे सज्जन इष्ट मित्र जन । कन्या कुमरे धन कृष्ण गोत ॥ ३ ॥ निळा म्हणे त्यांचें संपत्ति वैभव । पश्वादिक सर्व झाला कृष्ण ॥ ४ ॥

॥ १४६१ ॥ पशु पक्षी जीव श्वापदें वनचरें । अवघीं कृष्णाकारें झालीं तयां ॥ १ ॥ माड्या उपर माड्या बैसतीं बैसणी । नाना अळंकार लेणीं झाला कृष्ण ॥ २ ॥ मनीं त्यांचे कृष्ण ध्यानीं त्यांचे कृष्ण । श्रवणीं त्यांचे कृष्ण वदनीं वाचे ॥ ३ ॥ निळा म्हणे कृष्णीं झाल्या कृष्णरूप । अवघ्या नाम रूप क्रियासहित ॥ ४ ॥

॥ १४६२ ॥ नाहीं त्यां ऊरलें दुजें कृष्णें विण । बाह्य अतःकरण कृष्ण झाला ॥ १ ॥ जीवाचाही जीव शीवाचाहि शिव । देहीं देहभाव कृष्ण झाला ॥ २ ॥ शब्दा शब्दविता बोधा बोधवीता । चित्ता चेतविता झाला कृष्ण ॥ ३ ॥ निळा म्हणे कृष्णें केलें कृष्णाकार । सबाह्य अंतर रंगवीलें ॥ ४ ॥

॥ १४६३ ॥ मृदु मधुर वाजवीत वेणु । सावळा नंदनु नंदाचा ॥ १ ॥

तेणें गोपीका वेधल्या । पात्र झाल्या ब्रम्हसुखा ॥ २ ॥ रंजवील्या विनोद वचनीं । हास्य करूनि हासवीतु ॥ ३ ॥ निळा म्हणे त्याचिया गळां । घाली वेळोवेळां करपल्लव ॥ ४ ॥

॥ १४६४ ॥ करितां तयां काम धाम । तमाळ श्याम ध्यानीं मनीं ॥ १ ॥ तेणें पावल्या आनंदा । वेधीं गोविंदा वेधलिया ॥ २ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ती आंत । नेणति मात आणिकांची ॥ ३ ॥ निळा ह्मणे अहोरात्रीं । देखती नेत्रीं ते चि रूप ॥ ४ ॥

॥ १४६५ ॥ येतां देखोनियां भार । गाई मनोहर गोवळांचे ॥ १ ॥ धांव चि घेऊनि गौळणी येती । पहावया श्रीपती मदन मूर्ती ॥ २ ॥ एकीस न पुसतां एकी । माय लेकी सासवा सुना ॥ ३ ॥ निळा ह्मणे पाहोनि सुख । भोगिताती मुख्य कैवल्यपर ॥ ४ ॥

॥ १४६६ ॥ एकी ह्मणती हा आमुचा सांगाती । दुजी ह्मणे परती भाऊ माझा ॥ १ ॥ तिजी ह्मणे हरि आमुचा मेहुणा । चौथी ह्मणे पेसुन्या देखसी क्षणें ॥ २ ॥ एकि ह्मणती हा आमुचा गोवळ । साहावी ह्मणे बाळ नंदाचा कीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे जैशा श्रुती वेवादती । तैशा या भांडती परस्परें ॥ ४ ॥

॥ १४६७ ॥ एकी ह्मणती हरि आमुचा सोयरा । दुजी ह्मणे घरा पुसों जाई ॥ १ ॥ तिजी ह्मणे काली आणिला पोसणा । चौथी ह्मणे तान्हा यशोदेचा कीं ॥ २ ॥ एकी ह्मणे माझा नोवरा माजणी । एकी ह्मणे वहिणी पाठीची मी ॥ ३ ॥ निळा ह्मणे एकी ह्मणती आमुचा पिता । एकी ह्मणे चुलता सखा माझा ॥ ४ ॥

॥ १४६८ ॥ एकी ह्मणे हरि आमुचा शेजारी । दुजी ह्मणे दुरी मित्र माझा ॥ १ ॥ तीजी ह्मणे सखा आमुचा जिवलग । चौथी ह्मणे निःसंग सदांचा हा ॥ २ ॥ एकी ह्मणे कुमारि देऊनि आणिला । एकी ह्मणे जन्मला यशोदे पोटीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे एकमेकां न मिळती । पुराणें भांडती तैशापरि ॥ ४ ॥

॥ १४६९ ॥ ज्याचे जैसे भाव तैशा सा दावीती । स्वानुभवें बोलती आपुलाल्या ॥ १ ॥ परी तो एकला सकळासी पुरला । ज्याच्या परि

झाला तैसा तेथें ॥ २ ॥ एकचि स्वातीजळ विसे मुक्ताफळ । पालटे स्थळा स्थळ होय तसे ॥ ३ ॥ निळा ह्मणे गंध उपाधी निराळा । दावी पुर्वी कळा उमलता ॥ ४ ॥

॥ १४७० ॥ उत्तम अधम जया जे संगती । तैसी त्याचि मती फांकों लागे ॥ १ ॥ सज्जना संगती धर्म कीया वाढे । पापीया आवडे पापबुद्धी ॥ २ ॥ ह्मणोनि जैसिया तैसा झाला हरी । भक्ता मित्र वैरि निंदकाला ॥ ३ ॥ निळा ह्मणे जाणे अंतरींचा भाव । तया तैसा देव फळदाता ॥ ४ ॥

॥ १४७१ ॥ सांगों नवरस लक्षण । तरी शृंगार हास्य करुण ॥ धीर वीर भयानक जाण । बीभत्स अद्भुत शांत रस ॥ १ ॥ शृंगारिक तें माधुर्य गाणें । हास्य तें विनोद करणें ॥ कारुण्य तें कीव भाकणें । धैर्य उपजवणें तें धीर ॥ २ ॥ वीर ते युद्धाच्या गाठी । शब्दामागें शब्द उठी ॥ भयानक रस भय घाली पोटीं । बीभत्स त्यादेनि कुटी उत्संकळ ॥ ३ ॥ अद्भुत रस ते नवल वाणे । जेकां अचाट चि बोलणें ॥ श्रोतयातें विस्मय देणें । ऐकतां शहाणे निर्बुजती ॥ ४ ॥ शांत रस तो शुद्धसात्विक । विकार विवर्जित माजि विवेक ॥ निळा ह्मणे हे नवरस देख । जाणती गायक चतुर ते ॥ ५ ॥

---

## श्रीचांगदेवचरित्रप्रारंभः.

---

॥ १४७२ ॥ नमो ज्ञानेश्वरा नमो ज्ञानेश्वरा । निवृत्ती उदारा सोपान देवा ॥ १ ॥ मुक्ताबाई नमो त्रिभुवनपावनी । आद्यत्रय जननी देवाचीये ॥ २ ॥ जगदोद्धारालागीं धरिले अवतार । मिरवीला बडिवार सिद्धाईचा ॥ ३ ॥ निळा शरणागत ह्मणूनी आपुला । संतां मीरवीला देउनी हातीं ॥ ४ ॥

॥ १४७३ ॥ वोनमो सिद्धासी नमस्कार केला । ग्रंथारंभ झाला ज्याचे कृपे ॥ १ ॥ त्याचीये कृपेनें अद्वत सामर्थ्य । दावी सिद्धपंथ चालावया ॥ २ ॥ चालविला ग्रंथ ज्ञानेश्वभेटी । आले उठाउठी चांगदेव ॥ ३ ॥ चांगदेव जन्मािद्याचा आयास । आणी योगाभ्यास मूळकथा ॥ ४ ॥ कथा हे विचित्र करीतां श्रवण । पुण्यपरायण होती श्रोते ॥ ५ ॥ नारायण डोहो पुण्यक्षेत्र

ग्राम । वस्ती गृहस्थाश्रम मुधोपंत ॥ ६ ॥ ग्रामलेखन वृत्ति यजुर्वेदी ब्राह्मण । पंचमहायज्ञ कूळशीळ ॥ ७ ॥ धर्मपत्नी झाली गर्भातें धरीती । गर्भाधान रीती संस्कारें ॥ ८ ॥ आणूनी कुळगुरू केलें पुंसवन । आले मरुद्गण उदरासी ॥ ९ ॥ होतां नवमास प्रसूतीचा काळ । उपजला बाळ कुळदीप ॥ १० ॥ स्वरूपें सुंदर सभार लक्षणी । देखतां लोचनीं मनोहर ॥ ११ ॥ अनुलोभन केलें सीमंत नयन । जातीकर्म विधान नाम करण ॥ १२ ॥ बहुत चि चांगलें चांगा ह्मणउनी । जनिता जननी नाम ठेवी ॥ १३ ॥ निष्क्रमण आणि अन्न प्राशन झालें । पुढें आरंभिलें चौलोपनयन ॥ १४ ॥ व्रतबंध दीक्षा अनुग्रह गायत्री । संध्या वेद मंत्रीं संपादिली ॥ १५ ॥ प्रज्ञा सीळ बुद्धी गुरू मुखें ऐकतां । तीन आवृत्ती संध्या पाठ होय ॥ १६ ॥ सांगतां नलगे गुरूसी आयास । त्रिकांड ग्रंथास संपादीलें ॥ १७ ॥ चारी वेद साही शास्त्रें अभ्यासीलीं । अर्थें विचारीलीं स्वानुभवें ॥ १८ ॥ उपवेद आणि उपशास्त्रें घोकीलीं । पुराणें अवगमीलीं अष्टादश ॥ १९ ॥ व्रतें उद्यापनें कथानकें बोवसे । आध्यात्में इतिहासें निपुण जाला ॥ २० ॥ क्षुल्लकादिक मंत्र क्षुल्लकादिक विद्या । अभ्यासील्या मध्या चमत्कृता ॥ २१ ॥ चौदा विद्या आणि चोसष्टीही कळा । अध्ययनी आगळा दुजा नाहीं ॥ २२ ॥ अतीत ब्राह्मण येती दर्शनासी । वंदुनी चांगयासी करिती पूजा ॥ २३ ॥ ह्मणती विद्या सिद्ध अवतार जाला । नेणो ब्रह्मा आला येणे वेषें ॥ २४ ॥ सकळांसी हा पूज्य सकळांसी वंद्य । सकळांसी हा आद्य गुरू होय ॥ २५ ॥ ऐसा स्तुती वाद करीती ब्राह्मण । समर्पिती धन कनक वस्त्रें ॥ २६ ॥ आमर्याद धन चांगया बहुमान । ह्मणती कन्यादान द्यावें यासी ॥ २७ ॥ सत्पात्र जोडलें निज भाग्य योगेसी । करीती मुधोपंतासी विज्ञापना ॥ २८ ॥ वरासी दक्षिणा देऊं शें होन । तव दूजा ह्मणे द्विगुण देईन मी ॥ २९ ॥ एक ह्मणती सहस्र मुद्रांचा संकल्प । करितों तरी अल्प यथा शक्तया ॥ ३० ॥ महा नाम्नी व्रत महा व्रत गो दान । जालें उपनयन चतोर्दश ॥ ३१ ॥ तव वेदमूर्ती गुरू बैसउनी पंगती । पूजन करूनी स्तवीती चांगदेव ॥ ३२ ॥ या उपरी करा लग्नाचा वीचार । ह्मणती लहान थोर आप्त वर्ग ॥ ३३ ॥ विनवीत अती नम्र पूसती सकळांसी । उदईक प्रारंभासी ग्रंथ कोण ॥ ३४ ॥ तव ते विस्मित होउनी बोलती ब्राह्मण । कुळासी मंडण जन्म तुझा ॥ ३५ ॥ आतां नाहीं ग्रंथ पाहावया ऊरला । एक तो राहिला योगाभ्यास ॥ ३६ ॥ तरी तो उपदेशा ह्मणती

चांगदेव । द्यावा अनुभव साचा स्वामी ॥ ३७ ॥ तेव्हडीच विद्या राहाते तें काय । पुरुप प्रश्ना नव्हे श्लाघ्यपण ॥ ३८ ॥ तव ते ह्मणती आम्ही नेणो योग मार्ग । नाहीं तो प्रसंग वीचारीला ॥ ३९ ॥ काय आम्हा चाड तया योगेवीण । करूं संध्या स्नान जपादि तप ॥ ४० ॥ युक्त अहारी जे का इंद्रियांचे जती । तेची योग्य होती तीये मार्गी ॥ ४१ ॥ मितलें बोलणें मितलें चालणें । मितलें ज्या घेणें अन्नरसां ॥ ४२ ॥ नैराश्य निर्लोभ लौकिका विरहित । तेचि प्रवर्तत अभ्यासीते ॥ ४३ ॥ हटयोगें करितां प्राण निरोधन । तो आव्हटा भरोन विटंबी देहा ॥ ४४ ॥ मग हाना तो साटा वोन नपवोनि साधक । पावती निष्टंक क्षीणता देहे ॥ ४५ ॥ काळासी वंचन करितां क्षोभे काळ । मग तो नेदी पावां स्थळ विश्रांतीचें ॥ ४६ ॥ नाना विघ्नें लय विक्षेप कपाय । रसा स्वादनें अपाय रची सासी ॥ ४७ ॥ सिद्धीचा संभ्रम घालूनियां आड । करी साचा नाड स्वहीताचा ॥ ४८ ॥ ऐसीया संकटीं वाळिया तोचि पावे । इतरासी नागवे दुर्जय पवन ॥ ४९ ॥ तरी ह्मणती चांगदेव साधीन तो योग । उपदेशीला सांग जरी कोणी ॥ ५० ॥ तव ते ह्मणती सुज्ञा ऐकावें वचन । आहे तें कारण निस्पृहाचें ॥ ५१ ॥ जे अखंड एकांतीं शुचिष्मंत चित्तीं । तेची दृढावती योगासनीं ॥ ५२ ॥ तरी ते योग कोठें आहेती स्वामीया । सांगा जाईन पायां शरण साच्या ॥ ५३ ॥ तव द्विज ह्मणती योगी नाहींत स्वदेशी । आसती वाराणसी माजी विरळे ॥ ५४ ॥ तरी ह्मणती चांगदेव जाऊं महा क्षेत्रां । योग आणि यात्रा उभय कार्या ॥ ५५ ॥ मग तीर्थरूपा आज्ञा मागोनि यात्रेसीं । करीती मुहूर्तेसीं स्वस्त्ययन ॥ ५६ ॥ क्षौरकादिक विधी केलें वृत स्नान । दक्षिणा भोजन देउनी द्विजां ॥ ५७ ॥ गणपती पूजन पुण्याह्वाचन । केलें आवाहन पूर्वजांचें ॥ ५८ ॥ पूजीयेली माता पीता उभयतां । आप्त वर्गा गोता गौरवीलें ॥ ५९ ॥ समर्पिलें तयां पुरे ऐसें धन । होय पुनरागमन आपूलें तों ॥ ६० ॥ क्षेत्र प्रदक्षिणा पूजीलें ब्राह्मणा । वंदीलें चरणा शिष्टांचीया ॥ ६१ ॥ निघाले बाहेरी मुहूर्ते प्रस्थान । आले बहुत जन बोळवीत ॥ ६२ ॥ ऐकोनि प्रांतवासि आखमेदीन जने । विनवीती स्तवनें चांगयासी ॥ ६३ ॥ म्हणती आम्हा नाहीं घडली वाराणसी । आणी हेत तो मानसीं बहुत काळ ॥ ६४ ॥ तरी चला समागमें म्हणती चांगदेवो । होईल निर्वाहो सर्वांविसीं ॥ ६५ ॥ मग अनाथें दुर्बळें निघालीं बाहेरी । चालिलीं परिवारी लक्षावत ॥ ६६ ॥ खर्चा व्यर्चा तया देती चांगदेव ।

आणि सांभाळीती सर्व मागें पूढें ॥ ६७ ॥ सुरंग जडला म्हणती सकळ जन । नलगे घेण ऋण रंगे याच्या ॥ ६८ ॥ भागल्या श्रमल्या जाणे हा ऊपाय । रोगें येऊंनये याचे दृष्टी ॥ ६९ ॥ चालतां मारगीं सामोरे जन येती । ऐकोनियां कीर्ती आलोकिक ॥ ७० ॥ महा व्याधीहारीं आंधळ्यासी डोळे । वांझा पुत्रफळें पंगुसी पाय ॥ ७१ ॥ जे जे रोगी येती तयासी ऊपाय । करिती तया काय उणें मग ॥ ७२ ॥ प्रार्थुनी करिती पुजा समर्पीती धने ॥ तोषवीती स्तवनें नारीनर ॥ ७३ ॥ भरिल्या गाड्या धनें वस्त्रांच्या समृद्धी । जाती राजपदीं मीरवत ॥ ७४ ॥ ऐसे आले वाराणसी ऐकोनि द्वीजवर । क्षेत्रवासी भार पाहो आले ॥ ७५ ॥ देखोनि योग्यता सकळीकीं पूजिला । बहु मान जाला महाक्षेत्रीं ॥ ७६ ॥ केला तीर्थविधी यथा शास्त्रन्यायें । पूजीले समूदाये ब्रह्मवृंदा ॥ ७७ ॥ ग्रहप्रवृत्ती दानें मठ भिक्षा दीधली । अष्ट तीर्थी केली प्रदक्षीणा ॥ ७८ ॥ मग गंध अक्षता द्विजा करूनी पूजन । आर्तीचें वचन अनुवादती ॥ ७९ ॥ ह्मणती कोणा आहे योगाची धारणा । ते ह्मणती आपणा गम्य नाहीं ॥ ८० ॥ वेदाध्ययनी आह्मी स्वधर्मी निरत । नेणो कैसी मात योगाची ते ॥ ८१ ॥ यज्ञाचार आह्मा पट्कर्माचा धंदा । नेणो उदावादा पवनाभ्यास ॥ ८२ ॥ माहा विवरीं एक आहे योगीराज । ऐकतसो सहज कर्णोपकर्णीं ॥ ८३ ॥ परी तें स्थळ चि परम गुप्त अवघड भयंकर । न करवे संचार कोणा तेथें ॥ ८४ ॥ तरी ह्मणती चांगदेव जाऊं दर्शनासी । केलें स्तंभनासी व्याघ्रसर्पा ॥ ८५ ॥ पंचाक्षरी विद्या भारियेल्वीं भूतें । केलीं शरणागतें वेताळादी ॥ ८६ ॥ तव प्रार्थीती द्वीजवर नवजावें आपण । काय सायोगें वीण खोळंबलें ॥ ८७ ॥ सर्व विद्या तुह्मा आहेती स्वाधीन । कोणेवीसीं न्यून पडिलें सांगा ॥ ८८ ॥ तया ह्मणती चांगदेवजी एवढीच ऊणीव । येते येर सर्व आलोटीले ॥ ८९ ॥ तरी ते ह्मणति देवा ऐकावें वचन । जीवासी घेतन तेथें जाता ॥ ९० ॥ दरकुटी विशाळ आहे भयानक । जातां सकळ लोक मुकती प्राणा ॥ ९१ ॥ पिशाच्चें बहुवस असती विंचू सर्प । माजी गडदधुप अंधःकार ॥ ९२ ॥ घरामाजी घरें द्वारामाजी द्वारें । विवरांत वीवरें लक्षावरी ॥ ९३ ॥ गेलीया निर्गम नव्हेची कोणासी । वर्जीतो स्वामिसी याचीलागीं ॥ ९४ ॥ समागमी सर्व येती काकूळती । अहो कृपामूर्ती चांगदेवा ॥ ९५ ॥ नव जावें आपण कदा वीवरांत । सांगती आघात सर्व तेथें ॥ ९६ ॥ परी चांगदेवा साधनें हढ्त । ते नाईकती मात कोणाचीही ॥ ९७ ॥ ह्मणती

तुह्मा आहे खर्चावया धन । एक मास पाहोन जावें मार्ग ॥ ९८ ॥
करूनीयां संचार शोधीलें वीवर । गेले योगेश्वर जेथें होता ॥ ९९ ॥ लागो-
नियां चरणा वेदाक्षरीं स्तविला । प्रसन्न तो केला तपोराशी ॥ १०० ॥
तो ह्मणे बाळका कैसा तूं आलासी ॥ संचार पवनासी नसतां येथें ॥ १ ॥
येरु ह्मणे स्वामी आपूल्या प्रसादें । आलों आशीर्वादें चरणापासी ॥ २ ॥
संसारें पीडीलों जालों खेदक्षीण । ह्मणोनि शरण आलों देवा ॥ ३ ॥
स्वामीच्या वचनें जन्मांतरें फेरे । चुकती आणि दुस्तरें हरती कर्में ॥ ४ ॥
करोनीयां कृपा ह्मणवा जी आपुला । सेवक धाकुला नेणती मी ॥ ५ ॥
नुपेक्षावा कदा आला शरणांगत । हे तो धर्मनीत स्वामी खरी ॥ ६ ॥
हृद्गत हें माझें पाववावें सिद्धी । अहो कृपानिधी गुरुराया ॥ ७ ॥ मज शर-
णांगता करावा उपदेश । सांगा योगाभ्यास करीन मी ॥ ८ ॥ विचा-
रीती गुरू आपूल्या मानसीं । ह्मणती अनुतापेसी शरण आला ॥ ९ ॥
अव्हेरितां यासी येईल दूषण । विरक्त हा पूर्णमुमुक्षु जाला ॥ १० ॥ अनु-
तापाचें लेणें लेऊनियां अंगीं । जालासे वीरागी देहगेहा ॥ ११ ॥ वयें तो
लहान दिसतो सगुण । अध्ययनें संपन्न वेदवेत्ता ॥ १२ ॥ सच्छिष्य
वीरळा जोडे भाग्ययोगें । महिमा ज्याच्या संगें गुरुत्वासी ॥ १३ ॥
देउनी आलिंगन आश्वासीला कृपा । ह्मणती केला बाप्पा अंगीकार ॥ १४ ॥
यथा सांप्रदायें आज्ञा समावेश । दावीयेला सौरस परंपरें ॥ १५ ॥ बैस-
ऊनी सन्मुख घालवीलें आसन । कळा स्थान मान उपदेशीती ॥ १६ ॥
कृपावंत गुरू ह्मणती यमनियम । करी प्राणायाम प्रत्याहार ॥ १७ ॥
ध्यान हे धारणा आसन हे मुद्रा । साधावी शिष्येंद्रा सिद्धीलागीं ॥ १८ ॥
रेचक पूरक कुंभक त्राहाटक । पवनाभ्यास ऐक स्थीरबुद्धी ॥ १९ ॥
सगर्भ आगर्भ दाविले प्रकार । करी पवन स्थीर मनोजयें ॥ २० ॥ देह
सीतळ पडतां करी अग्नधारण । सोमधारण उष्णे पीडतां देह ॥ २१ ॥ प्राण-
निरोधन सोहं मंत्रें जाण । करी प्राणापान ऐक्य दोघां ॥ २२ ॥ षट्च-
क्राचे भेद दावीले विशद । मुक्त ब्रह्मरंध्र होय जेणें ॥ २३ ॥ काकी मुख-
अग्नचक्र औटपीठ गोल्हाट । सहस्र दळ श्रीहट पावावया ॥ २४ ॥ नाद
बिंदुकळा ज्योतीचा अनुभव । जेणें साधे सर्व ते ते आंगें ॥ २५ ॥
जाळंधर भेद आंताळी अभ्याळी । भ्रमरगुंफा कंकाळी पावे जेणें ॥ २६ ॥
ऐकतां सादर मुद्रा ठसावली । समाधी लागली चांगयासी ॥ २७ ॥
सद्गुरूच्या वचनें ऐके ज्याज्या खुणा । पावे त्या त्या स्थाना तेचि क्षणी ॥ २८ ॥

पर्ं ते सविकल्प समाधी काष्टा ह्मणती तीसी । नावडे संतासी मूर्छा ह्मणोनी ॥ २९ ॥ वासनेचा क्षय नव्हे ऐशा रीती । न चुके पुनरावृत्ती जडत्व तें ॥ ३० ॥ देखोनि त्याची प्राप्ती विस्मय करिती गुरू । ह्मणती हा चमत्कारू थोर झाला ॥ ३१ ॥ एकाची क्षणें कैसा झाला या अनुभव । मज्ञा अभिनव बाळकाची ॥ ३२ ॥ बहूत दिवस मी ही करितो अभ्यास । परि न लभेची भौरत याच्या ऐसा ॥ ३३ ॥ नवल हें देखलें एकाचि उपदेशें । भेदीयेलीं निमिषें चौदा चक्रें ॥ ३४ ॥ भ्रमरगुंफे माजी केला रहीवास । गीळोनि निःशेष दश ही प्राण ॥ ३५ ॥ ऐसी सप्त वरुषें समाधी भोगिली । सत्रावी शोपिली आमृतकळा ॥ ३६ ॥ जिंकोनियां काळ घातला तोडरीं । उभविली गुढी विजयाची ॥ ३७ ॥ झाली योगसिद्धी मांडिलें व्युत्थान । केलें उन्मज्जन इंद्रीयांचें ॥ ३८ ॥ देखोनी गुरुदेव आलिंगन देती । आणी अनुभव मागती समाधीचा ॥ ३९ ॥ वचनें तयासी आवस्था लावीली । कसोटी दाविली सिद्धाईची ॥ ४० ॥ घेउनी अनुभव निघाले बाहेरी । ते आले घाटावरी मनकर्णीके ॥ ४१ ॥ तव सा देखीयेलें तीरींच्या ब्राह्मणीं । ते लागले चरणीं धांवोनियां ॥ ४२ ॥ ह्मणती समागमीं वहू झाले चुकुर । नव्हतां सत्वर तुमचें येणें ॥ ४३ ॥ क्षेत्रवासी ब्राह्मणी करूनियां खेद । ह्मणती प्रमाद थोर झाला ॥ ४४ ॥ गेले ते सांगाती तुमचे ग्रामवासी । न येतां तुह्मासी रूदन करित ॥ ४५ ॥ नेले क्षेत्रामाजी वाद्याच्या गजरीं । घोष जयजयकारी करूनी हर्षें ॥ ४६ ॥ बाणली असमाई आंगीं योगकळा । गुरुत्वें आगळा भासे लोकां ॥ ४७ ॥ उपरम झाला सकळ इंद्रीयां । स्वरूपीं वीलया मन गेलें ॥ ४८ ॥ ऐसीया स्वानंदे बुझावीलें चित्ता । राहीली अचीत वदनीं वाचा ॥ ४९ ॥ अष्टही आविर्भाव इडरले आंगीं । प्राणी प्राणरंगीं निजवासे ॥ ५० ॥ वेदत्रई ठसा पडीला शरीरा । वृत्ती गेली घरा निजाचिया ॥ ५१ ॥ विसोनियां गेलें शब्दाचें बोलणें । पवनुची प्राणें शोषीयेला ॥ ५२ ॥ ऐसा सुखासुखीं पावला विश्रांती । पद पिंडा समाप्ती करूनियां ॥ ५३ ॥ सिद्धाईचा वड वाढला वडीवार । पूजीती लहानथोर स्त्रिया बाळें ॥ ५४ ॥ देशोदेशीं वार्ता विस्तारीली ऐसी । ते येती दर्शनासी सिद्धाचीया ॥ ५५ ॥ राजे भेटी येती अनुगृहीत होती । आशीर्वाद इच्छीती लहानथोर ॥ ५६ ॥ जया जें पाहीजे ते ते विद्या देती । ह्मणोनि शरण येती प्राणीमात्र ॥ ५७ ॥ नाना उपासना सीकती

विजें न्यास । मंत्रादि यंत्रास करिती साध्य ॥ ५८ ॥ वेदांचीं अध्ययनें शास्त्राची परिज्ञानें । सिकती रसायने चिकित्सा नाडी ॥ ५९ ॥ ज्योतिष आयुर्वेद निघंट घोकीती । कोश विचारिती पंचाक्षरा ॥ ६० ॥ जारण मारणादि सप्तही प्रयोग । एक ते आगम योग करिती साध्य ॥ ६१ ॥ गारुडाचे दंश नृत्य संगीतास । घेती बहुत शिष्य बहुत विद्या ॥ ६२ ॥ असो आतां ऐसे शिष्य लक्षवत । जाले शरणागत करीती सेवा ॥ ६३ ॥ यावरी द्वितीय प्रकर्णींची कथा । परिसावी ते श्रोता देउनी चित्त ॥ ६४ ॥ निळा ह्मणे पुढें ज्ञानेश्वर आख्यान । अद्भुत महीमान सिद्धाईचें ॥ ६५ ॥ इती श्रीचांगदेवचरित्र जन्मकर्म विद्यायोगाभ्यास कथनो नाम प्रथम प्रकर्णाह ॥ समाप्तः ॥

॥ १४७४ ॥ ऐसा बहुत काळ कर्मीला क्षेत्रांत । मग धरिला पृथ्वी हेत पर्याटणी ॥ १ ॥ उत्तरदक्षीण सानस करावें । तीर्थां अवलोकावें आणी क्षेत्रां ॥ २ ॥ प्रांतोप्रांतीं शिष्यसांप्रदाय आपुला । वाढवावा हा धरिला उद्देश मनें ॥ ३ ॥ मना आलें तेथें समाधी बैसोनी । प्रगट व्हावें जनीं दुर्जीये स्थळीं ॥ ४ ॥ सिद्धीसी खेळणें गगनेंसी बोलणें । पवनेंसी धांवणें अदृश्यगती ॥ ५ ॥ सत्यवाचासिद्धी मनोजयसिद्धी प्राणजयोबुद्धी निश्चयेसी ॥ ६ ॥ सर्वही पाहिलें सर्वही शोधीलें । सर्व अभ्यासिलें विद्याजात ॥ ७ ॥ वरिष्ठ सकळां व्याकरणीं आगळा । गायनाची कळा सप्तस्वरी ॥ ८ ॥ नृत्य करूं जाणे थैमाने संगीत । अनुकारें दावीत हावभाव ॥ ९ ॥ दशावतार खेळें सोंगें नाना परी । विद्या नाहीं उरी ठेवीयेली ॥ १० ॥ चौदाशें वरुपें काळाचा अतिक्रम । करूनि मठ आश्रम तप्तीतिरीं ॥ ११ ॥ जेवीं मोरासी सर्वांगीं पिछावरी डोळे । परी एक आंधळे दृष्टीवीण ॥ १२ ॥ तयापरी विद्यासिद्धीचा सोहळा । अपरोक्ष आंधळा आत्मज्ञानीं ॥ १३ ॥ नेणे भक्तीप्रेम सुखाचें साधन । सीगे चढला मान सर्वज्ञतेचा ॥ १४ ॥ चौदाशें वरुषांचे सिद्ध चांगदेव । स्वीकारिती भाव पूजकाचे ॥ १५ ॥ विद्येचें मूळपीठ साधनीं वरिष्ट । स्वधर्मी कनिष्ट व्रतधारी ॥ १६ ॥ आरोग्य शरीर आंगीं दिव्य कांती । नासे विराजती चतोर्दश ॥ १७ ॥ चांगदेव चांगा वटेश्वर चांगा । चक्रपाणीचांगा चांगासिद्ध ॥ १८ ॥ शिवयोगींचांगा मणीसिद्धचांगा । अनकरचांगा नाहमानामे ॥ १९ ॥ नागेश नामें चांगा सुधेश नामें चांगा । सत्यसिद्ध चांगा

निश्चळदास ॥ २० ॥ चिंधादेवीचांगा ह्मणति वुटीचांगा । चौदा नामें चांगा वर्तमान ॥ २१ ॥ राजे प्रजालोक अनुगृहीत झाले । विद्या अभ्यासिले बहूसाल ॥ २२ ॥ सिद्धीचा साधक वास तप्तीतीरीं । पूजीती नरनारी भावयुक्त ॥ २३ ॥ नित्य नूतन यात्रा येउनी लक्षावत । पावोनि मनोरथ फिरोनी जाती ॥ २४ ॥ वसवीले बाजार भोवते सवदागर । वीकीताती संभार केणीयाचे ॥ २५ ॥ त्रीकाळ पूजन त्रीकाळ भोजन । करिती शिष्यजन आरतीया ॥ २६ ॥ तव आला अतिथी पांथीक द्विजवर सांगे समाचार पैठणीचा ॥ २७ ॥ देखीलें अपूर्व चरित्र लोचनीं । विस्मय तो मनीं नित्य वाटे ॥ २८ ॥ ह्मणे जी सिद्धराया नवलची वर्तलें । प्रतिष्ठानीं देखिलें सर्वजनी ॥ २९ ॥ ह्मैपीपुत्रामुखें बोलवील्या श्रुती । येउनी बाळमूर्ती माहासिद्ध ॥ ३० ॥ आणूनी स्वर्गवासी पीतर जेववीले । ते पुढती बोळविले निजस्थाना ॥ ३१ ॥ तें ऐकोनिया सकळही धिःकारीती त्यासी । ह्मणती जाला यासी बुद्धीभ्रंश ॥ ३२ ॥ सिद्धापासी ऐसें असत्य बोलतां । भोगील हा निभ्रांता दुष्टफळें ॥ ३३ ॥ कैसा हा बोलीयेला भय चि न धरितां । आजागळी वार्ता अघटीत ची ॥ ३४ ॥ ह्मणती या मूर्खासी भोवंडा बाहेरी । पिशाच निर्धारी बरळे भलतें ॥ ३५ ॥ तंव तो ह्मणे स्वामी निजनेत्रीं देखीलें । आणी तुह्मा हें वाटलें मिथ्या वाक्य ॥ ३६ ॥ तव सिद्ध ह्मणती त्यासी येऊनीया जवळीं । सांगावी समुळी वितली कथा ॥ ३७ ॥ न वाटेचि हें सत्य अनुमानें सांगतां । केंवी झाला वदता पशूमूखें ॥ ३८ ॥ काय त्याचीं नांवें जीहीं बोलवीला । ह्मैसा पढवीला निगमे केंवी ॥ ३९ ॥ तरि तो ह्मणे स्वामी परिसावें सादर । सांगेन सविस्तर वर्तमान ॥ ४० ॥ तेथें चौघी जणें बाळें अकस्मात आलीं । अंगीं विराजली योगमुद्रा ॥ ४१ ॥ प्रायश्चित्तालागीं आलीं तया स्थळा । परि दाखविली लिळा अनुमाई ॥ ४२ ॥ निवृत्ती ज्ञानदेवो सोपान मुक्ताई । नावाची नवाई विश्री केली ॥ ४३ ॥ सातवें वरुष विराजे निवृत्ती । साहा वरुषांची मूर्ती ज्ञानेश्वर ॥ ४४ ॥ पांचवें वरुष सोपानदेवासीं । चौथें मुक्ताईसीं कुमारित्व ॥ ४५ ॥ त्यां देखोनियां ब्राह्मण आश्चर्य मानीती । बाळकें ह्मणती नानीरगोंडी ॥ ४६ ॥ ह्मणवीती पतीत नाहीं वडीलधारे । पातित्य कवण्या द्वारें पुसावयासी ॥ ४७ ॥ तंव ते ह्मणती स्वामी धाडीलें ब्राह्मणीं । तीहीं दीधलें लिहूनी सविस्तर ॥ ४८ ॥ मग तया दाविती वंशावळी पत्रीका । आणि ह्मणती कीजो रंका पावन आह्मां ॥ ४९ ॥ पत्र तें वाचिती सादर मानसें । ऐकती विन्यास

विप्रकुळें ॥ ५० ॥ आपे गावकर गोवींदपंत निराई । आणि सिदोपंत गिर-
जाई आळंकापुरि ॥ ५१ ॥ ते श्रीगैनीनाथाची शुद्ध सांप्रदाई । परि येर-
येरां नाहीं परिचय कदा ॥ ५२ ॥ त्या गोविंदपंताउदरीं वंशाचा उद्धार ।
उपजला कुमर विठ्ठलनामें ॥ ५३ ॥ केला व्रतबंध पढवीला अक्षर । वेदां-
तादी सार सांख्ययोग ॥ ५४ ॥ परमार्थीक ग्रंथ पाहीले गुरूमुखें ।
आध्यात्मी निजमुखें विराजला ॥ ५५ ॥ परम विरक्त ज्ञानीया सात्वीक ।
ब्रह्मचर्य निष्टंक व्रत चाली ॥ ५६ ॥ मातृपितृभक्त परम सुशीळ । नेदी
अहंता मळ लागो आंगीं ॥ ५७ ॥ परी जावें रामेश्वरा उत्कंठीत मनीं ।
मग तीर्थरूपा पुसोनी निघतेझाले ॥ ५८ ॥ ब्रह्मचर्य व्रत त्रिकाळ साधन ।
स्नान अर्घ्य दान करित चाले ॥ ५९ ॥ गोदा उभय तीरें तीर्थें अवलोकीलीं ।
पुढें चाली केली भीमातीरें ॥ ६० ॥ मधुकर भिक्षा अनुतापें अर्थीला ।
तो आळंकापुरा आला अकस्मात ॥ ६१ ॥ तव तेथें गिरजाई होते
सिदोपंत । परम भागवत स्वधर्मशीळ ॥ ६२ ॥ तयासी संतती होतें कन्या-
रत्न । रुक्माई आभीधान नाम तीये ॥ ६३ ॥ ती ही विठोबाची देखोनियां
स्थिती । कन्या दिधली हातीं संकल्पूनी ॥ ६४ ॥ करूनियां लग्न शुद्ध
कन्यादान । केली समर्पण रुक्माई त्या ॥ ६५ ॥ मग ते तीर्थवासु गेले रामे-
श्वरा । करूनीया ईतरा दक्षीण तीर्थां ॥ ६६ ॥ सर्वेंचि तेथुनी गेले वारा-
णसी । तंव ऐकिलें वार्तेसी गांवींचीये ॥ ६७ ॥ श्रीगोविंदपंतासी देवआज्ञा
झाली । मग उत्तरकार्य करुनी गयेसी गेले ॥ ६८ ॥ गयावर्जनाचा संपा-
दिला विधी । जाले शुद्धाबुद्धी विरक्तीबळें ॥ ६९ ॥ ऋणत्रयापासुनी झाला
तोही मुक्त । मग आले ते पुनरुक्त महाक्षेत्रा ॥ ७० ॥ विरक्त मानसी अनु-
तापाचें बळ । वैराग्य निर्मळ अंतरनिष्ठ ॥ ७१ ॥ मठी नृसिंहाश्रमासी जाऊ-
नियां शरण । केलें विसर्जन ग्रहस्थाश्रमा ॥ ७२ ॥ सर्व प्रायश्चितें केला प्रेषो-
च्चार । नासीले वीकार साही वैरी ॥ ७३ ॥ पूर्वआश्रमाचें त्यागुनियां नाम
जालें चैतन्याश्रम यती धर्में ॥ ७४ ॥ शीरीं नारायण उदरीं नारायण
गायत्री नारायण सर्वसंधी ॥ ७५ ॥ जनीं नारायण विजनीं नारायण ।
वदनीं नारायण सर्वकाळ ॥ ७६ ॥ सद्गुरूसेवनीं राहीले सतत । ते ऐकी-
येली मात सिदोपंतीं ॥ ७७ ॥ करूनियां खेद उभय दंपत्य । हृदयीं रुक्मा-
ईतें आळंगिती ॥ ७८ ॥ ह्मणती सर्वाविसी तुझें वो अनहीत । आह्मीची
तें नेणत केलें मुर्खी ॥ ७९ ॥ पांथिक विरक्त आला तीर्थवासु । तो देखो-
नियां उदासु दिधलें तुज ॥ ८० ॥ होणार ते बळींवंत होऊनियां गेलें ।

पूर्वीचिता नचले कांहीं ॥ ८१ ॥ जीता आन्न तुज देऊ चीरचोळी । तूची आमुचे कूळीं कन्यापुत्र ॥ ८२ ॥ यावरी तुळसीवृंदावनीं पूजन । करूनि प्रदक्षिणा सारी काळ ॥ ८३ ॥ मग तेंचि दृढ व्रत धरीयेलें रुक्माई । नेणे दुजें कांहीं मेवेवीण ॥ ८४ ॥ तंव नृसिंहाश्रमासी निजस्वप्नीं दृष्टांत । झाला अकस्मात महाक्षेत्रीं ॥ ८५ ॥ चैतन्याश्रमासी आहे भार्या घरीं । पतिव्रता माहेरीं मार्ग लक्षी ॥ ८६ ॥ तरी तुह्मी जाऊनियां आणावी ते येथें । आणी द्यावें सन्यास्याते तिचिये हातीं ॥ ८७ ॥ उभयतां एकत्र नांदवावी ऐक्यें । जंव होती बाळकें चौघें पोटीं ॥ ८८ ॥ इंद्रायणीतीरीं आहे ते सुंदरा । माजी आळंकापुरा पतिव्रता ॥ ८९ ॥ तरी तुह्मी अनुमान नकरितां यदर्थी । जावें शीघ्रगती आणावी ते ॥ ९० ॥ मग नृसिंहाश्रम आले आळंकापुरासी । आणी नेलें वाराणसी सिदोपंता ॥ ९१ ॥ गिरजाबाई सवे रुक्माई घेतली । त्या उभयां भेटी केली वधुवरा ॥ ९२ ॥ आज्ञापिलें तेव्हां चैतन्याश्रमासी । रहावें सहवासी स्त्रियेचीये ॥ ९३ ॥ जंव चवघें अपत्यें होती ईचे कूसीं । तंव तुह्मी उदासी नये होऊं ॥ ९४ ॥ दंड कुमंडलू घेतला हातींचा । आणि केला उभयतांचा मेळापाक ॥ ९५ ॥ करूनियां यात्रा आले आळंकापुरासी । कन्या जामातेसी सिदोपंत ॥ ९६ ॥ त्या देखोनि प्रांतीं उपहासिले बहुत जनीं । ह्मणती यातें नयनीं पाहों नये ॥ ९७ ॥ सन्यासी होऊनी भार्येसि संबंध । स्वप्नीं हें निषीद्ध नदेखावें ॥ ९८ ॥ वनिता आणी घरीं आणि बाहेरि सन्यासी । आतळता यासी प्रत्यवाय ॥ ९९ ॥ कामलोभी तरी कां जाहला सन्यासि । नेलें पूर्वजासी अधःपाता ॥ १०० ॥ हरिले शिखा सूत्र वर्ण याति गोत्र । गृहदारादी सर्वत्र त्यजुनीयां ॥ १ ॥ आणी घेउनीयां पत्नी पहुडे हा शेजेसी । पापात्मा सन्यासी पापरूपी ॥ २ ॥ विटाळ मानीती सर्वेही दर्शनाचा । ह्मणती हा पतीताचा शिरोमणी ॥ ३ ॥ बुडवीले स्वधर्म चतुर्थाश्रमासी । इहलोक परत्रासी आंचवला ॥ ४ ॥ विटंविली काया नासीला परमार्थ । वेदबाह्य अनर्थ केला येणें ॥ ५ ॥ धीक् ऐसें जीणें म्हणती स्त्रियावाळें । नेलीं उभय कुळें निरयवासा ॥ ६ ॥ उबगोनी षट्कर्मा त्यजीलें शिखासूत्र । आणि अपंगीलें कलत्र परिग्रहो ॥ ७ ॥ परि तो कोणासीही न बोले वचन । सर्वदा लपोन वसे गुंफे ॥ ८ ॥ नैवेद्य वैश्वदेव नाहीं स्मार्ताधान । श्राद्ध ब्रह्मयज्ञ विवर्जित ॥ ९ ॥ तयाची संतती मुलें चौघें जणें । प्रायश्चित्त कोणें कैसें द्यावें ॥ १० ॥ वडील निवृत्ती दुजा ज्ञानदेवो । तिजा सोपानदेवो मुक्ताबाई ॥ ११ ॥ वाची-

लीया पत्र हांसती सकळ । म्हणती याती कूळ नाहीं यांसीं ॥ १२ ॥ नव्हतें जें ऐकिलें तें नेत्रीं देखिलें । अपूर्व हीं मुलें श्रीपादाचीं ॥ १३ ॥ चतुर्थाश्रम आणि भार्येसी संबंध । ऐकतां हें निषिद्ध घडती दोष ॥ १४ ॥ ठेवीयेलीं नांवें बरवीं विचारुनी । केलीं उपजवोनि पतित पोरें ॥ १५ ॥ ज्ञानदेवो अर्थें ज्ञानाचा दीवस । हा तो पतित वेष बाळकाचा ॥ १६ ॥ ईतिचिये पोटीं जन्मले पतीत । नामें विपरीत ठेवीयेलीं ॥ १७ ॥ जेविं छत्रपती म्हणती घरींच्या बाळका । परी कैंचा गज सिक्का राज्य त्यासी ॥ १८ ॥ निवृत्ति हें नाम प्रवृत्ति बांधला । सोपान अवघडला प्रत्यवायीं ॥ १९ ॥ मुक्ताबाई आणि मुक्तीची सुराणी । ज्ञानदेवो आणि पातित्य भोगी ॥ २० ॥ तंव एक म्हणती होता नामापासी काय । राजा आणि वाहे मोळ्या शिरीं ॥ २१ ॥ रवी नाम आणी दधी मंथन करीत । फणी विंचरीत वनिता केश ॥ २२ ॥ इंद्रधनुष्य आणि क्षणमात्रेंची वीरे । मेरू आणि फीरे माळेसवें ॥ २३ ॥ पैल तो गे म्हैसा पखाले वाहती । आणि ग्याना तया म्हणती विश्वजनीं ॥ २४ ॥ म्हैसीपुत्र आणि नामें म्हणति ग्याना । तरी काय तो होईल प्रज्ञाशीळ ॥ २५ ॥ ऐकोनि ज्ञानदेव बोलती तयासीं । होती ज्ञानरासी आत्मा माझा ॥ २६ ॥ अज्ञानासी ठावो नाहीचि पाहतां । विचारावें आतां देईल साक्ष ॥ २७ ॥ म्हणती द्वीज हे पूर्णाची बोलणी । बोलती वायाणी मुखें पोरें ॥ २८ ॥ उपवासी उद्गार देती धाल्या ऐसे । परि ते फोस जैसें भुकेल्याचें ॥ २९ ॥ श्रीपाद बोलतां ऐकीलीं जीं वचनें ॥ तेची धरुनि मनें बैसलीं हे ॥ ३० ॥ कुपथ्य हें यासी झालें सर्वांपरि । प्रायश्चित्तावरी पडिला धोंडा ॥ ३१ ॥ वासुदेव सर्वा भूतीं हे बोलती । परी बहुत जन्माते प्रतीती ज्ञाननिष्ठे ॥ ३२ ॥ शुका सनकादिकाचे हे स्वानुभव । पावती मानव कैशापरि ॥ ३३ ॥ शब्दज्ञानी सर्वही कथनी हेची कथिती । परी तैशा नपवती स्वानुभवा ॥ ३४ ॥ ऐशा करूनिया खीक्या धिःकारें बोलती । नाश केला म्हणती वृथा ज्ञानें ॥ ३५ ॥ पुसायासी कैसा तुझा आत्मा पशू । हा दावी सौरसु बोलीलयाचा ॥ ३६ ॥ त्याचीया ताडणें तुज येती वेदना । कीं पावसी घातना त्याच्या घातें ॥ ३७ ॥ दावी चमत्कार तरी ज्ञानेश्वर । ऐसें द्विजवर बोलीयेले ॥ ३८ ॥ म्हणती ज्ञानदेव संदेह निरसावा । म्हैसा आणवावा जवळीके ॥ ३९ ॥ मग अणुनी टोणगा मारीती सिपुटी । तंव तोची उठी ज्ञानदेवा ॥ ४० ॥

देखोनि आश्चर्य येरयेरा दाविती । आसुमाई हें म्हणती नवल-
थोर ॥ ४१ ॥ बोलीलया सारखी कतृत्वाची शक्ती । आंगीं तेची विभुती
ईश्वराची ॥ ४२ ॥ उदंडें बोलती हावभाव दाविती । परी ते प्रतिष्ठाची
मिरवीती ॥ ४३ ॥ आजी हे अपूर्व देखीलें लोचनीं । परदुःख लेउनी
दाविलें आंगीं ॥ ४४ ॥ कुटील म्हणती सर्व बाजीगीरी । दावि-
ताती परी विद्याचिया ॥ ४५ ॥ गौडबंगालीची विद्या हे प्रसिद्ध ।
शिकवूनी प्रबुद्ध केलीं पोरें ॥ ४६ ॥ चतुर्थाश्रमांत करितां तीर्थाटणें ।
शिकला टाणे टोणें क्रियाभ्रष्ट ॥ ४७ ॥ पतीत सन्यासी पतिताचे मंत्र ।
पढविले अपवित्र अर्भकांसी ॥ ४८ ॥ सर्वा विशि तेणें नाश केला यांचा ।
जें प्रायश्चित्त वाचा नवदे श्रुती ॥ ४९ ॥ गुरु आज्ञेवरी होऊनी सोकाळ
। लावीयेला वीटाळ चतुर्थाश्रमा ॥ ५० ॥ अभिचार पूजा कापट्याचीं
बीजें । घोकवीलीं वोजें मूर्खापोरां ॥ ५१ ॥ अर्भकांसी थार नाहीं
ऐसी केलीं । उभय कुळें नेलीं पतनद्वारा ॥ ५२ ॥ सात्विक
प्रबुद्ध बोलती तयासी । नये गुणदोषी चित्त ठेऊं ॥ ५३ ॥ दिक्षादानी
ऐसे भासती लोचनीं । पैशुन्य वचनीं काय काज ॥ ५४ ॥ न कळेची
महिमा कदाहि कोणाचा । नये बोलों वाचा हेळमुनी ॥ ५५ ॥ जानकी
स्वयंवरी राम बाळरूप । भंगूनीयां चाप पर्णिली सीता ॥ ५६ ॥
बटुरूपी वामन तीन पादभूमी । मागोनी आक्रमी अवनी सर्व ॥ ५७ ॥
तैसाची प्रल्हाद दैत्याचीये वंशीं । झाला वैष्णवाशी अग्रगण ॥ ५८ ॥ मर्कट
योनीसी जन्मला हनुमंत । प्रताप अद्भुत आंगीं साचे ॥ ५९ ॥ घटामाजी
जन्म प्राशील्रा सागर । पाहा द्विजवर अगस्ती मुनी ॥ ६० ॥ हे न झाके
सुवर्ण कसवटी लावितां । भानू आच्छादितां अभ्रछाये ॥ ६१ ॥ याहिवरी
यासी युक्ति एकी आहे । जेणें निःसंदेह फिटे भ्रांती ॥ ६२ ॥ जरी बोल-
वील पशु निजमुखें । तरी याचे श्रुतीकें आत्मज्ञान ॥ ६३ ॥ तरी मानू
म्हैसा याचा आत्मा खरा । करूं परीहारा दोषमुक्त ॥ ६४ ॥
ऐकोनीया सकळ मानवले द्वीज । म्हणती हेची वोज बरवी युक्ती ॥
॥ ६५ ॥ येऱ्हवी पद्धती नाहीं ग्रंथांतरीं । प्रायश्चिता वरी वचन याच्या
॥ ६६ ॥ यती धर्मामाजी पत्नी आपंगीली । नाहीं हे ऐकीली शिष्टा-
चारीं ॥ ६७ ॥ कैंचे प्रायश्चित्त श्रीपादाच्या पोरा । कीजे परीहारा
दंडुनि दोषां ॥ ६८ ॥ नकरवे सर्वथा याचा अंगीकार । बरवा हा
विचार काढीयेला ॥ ६९ ॥ वरी ह्मणेनिळा पुढीलीये प्रकर्णीं । वेद घोषें

वाणी गर्जेल पशु ॥ ७० ॥ इति श्रीचांगदेवचरित्रे ज्ञानेश्वर जन्म कर्म निरूपणं नाम द्वितीय प्रकरणं ॥

---

॥ श्रीज्ञानेश्वर प्रसन्न ॥

॥ १४७५ ॥ वरवीं हीं गुंतली आपुल्या वचनें। निमित्तावरुन भोंवडांवीं ॥१॥ विचारुनी ऐसें बोलीले सकळ। वदवी अविकळ पशूमुखें ॥ २ ॥ तुझ्यायाचा आत्मा आहे एकजरी। वदवी ग्यान्यातरी येचीक्षणी॥ ३ ॥ नाहीं तरी वृथा न करावी वल्गना। घेऊनियां पतना जावें स्थळा ॥ ४ ॥ म्हणती ज्ञानदेव तुमच्याची प्रमादें। करील घोष वेद म्हैसी पुत्र ॥ ५ ॥ कराल तें काय नव्हे धरामर। पापाणीं ईश्वर प्रतिमे स्थापा ॥ ६ ॥ ग्रंथत्रया माजी सांगाजी निरुता। पढावा कोणता वेद येणें ॥ ७ ॥ ऐकोनि सकळ विस्मयें बोलती। ऋग्वेदची म्हणती पढावा यासी ॥ ८ ॥ देऊनी वरदान केली आज्ञा त्यासी। पशू प्रारंभासी करिताझाला ॥ ९ ॥ मुख्य प्रणवोच्चारे काढीयेला स्वर। देखोनि द्विजवर ठकावले ॥ १० ॥ लागली टकमक मांडलें निज धैर्या। ह्मणती गेलों वाया दुराभिमानें ॥ ११ ॥ संहिता पदक्रम उपन्यासे स्वरित। सुत्रादिनिरुक्त शिक्षा छंद ॥ १२ ॥ अष्टाध्यायी मिमांसा अरण ब्राह्मण। मांडीलें अध्ययन युगादिचें ॥ १३ ॥ बोलीयेला म्हैसा वेदाच्या सुस्वरी। हें सकळ द्वीजवरीं देखीयेलें ॥ १४ ॥ गळाले अभिमानें जाले विगलीत। चरणीं लोळत दीनपणें ॥ १५ ॥ ह्मणती हेची देव तिन्ही मुर्तीमंत। मुक्ताई साद्यंत परामाया ॥ १६ ॥ नेणोनिया महिमा चावळलोंजी देवा। तो परिहार आतां द्यावा काय किती ॥ १७ ॥ घडले जे अपराध ते ते कराक्षमा। अहो सिद्धोत्तमा विश्ववंद्या ॥ १८ ॥ अज्ञान गर्वांत गेलों जी अभिमानें। बोलीयेलों वचनें अमर्यादें ॥ १९ ॥ सर्वांसर्व तुम्ही सदा सर्वगत। कैंचें प्रायश्चित्त नित्य मुक्ता ॥ २० ॥ निमित्तें करूनी करीतां उद्धार। जड जीवा आधार चरण तुमचे ॥ २१ ॥ विश्वाच्या उद्धारा तुमचें अवतरण। कराया स्थापन स्वधर्माचें ॥ २२ ॥ कळलेती यावरी विधीचे जनिते। व्यापूनि सकळांते सगुणरूपी ॥ २३ ॥ ऐशीं करूनी स्तवनें करीती दंडवत। आणि मागती आज्ञे ते विनीतता ॥ २४ ॥ घेऊनी निरोप जाती मंदीरासी। म्हैसा देऊनि त्यासी

पढीण म्हुण ॥ २५ ॥ ऐकोनी अद्भुत ऐसा चमत्कार । येती नारीनर नमस्कारा ॥ २६ ॥ घरोघरीं चर्चा स्त्रियावाळें करीती । प्राणीमात्र वर्णिती कीर्ती त्यांची ॥ २७ ॥ मिळोनी परस्परें विप्र अनुवादती । योग्यता हे ह्मणती नकळे यांचीं ॥ २८ ॥ आणीक ही एक नवल वीतलें । क्षेत्रीच्या देखीले सर्वजनीं ॥ २९ ॥ करीती विस्मयचर्चा तव येरे दिवसीं । श्राद्ध गृहस्थासी होतें घरीं ॥ ३० ॥ तेणें त्या चौघासीं दिधलें निमंत्रण । त्याचे पितृगण आणीयेले ॥ ३१ ॥ देऊनि भोजन केले स्वर्गवासी । सांगीतली ऐसी मात तेणें ॥ ३२ ॥ सादर चांगदेवें ऐकीयेलें श्रवणीं । आणखीही ब्राह्मणीं सन्नीधींच्या ॥ ३३ ॥ श्रवणेंची सिद्धासी ताटस्य लागलें । प्रश्नी विचारीलें ज्योतिषमतें ॥ ३४ ॥ तव तें सत्य ऐसें आलें अनुमान । विस्मयें त्या नयना अश्रू आले ॥ ३५ ॥ ह्मणे हें तो नव्हे तपाचें सामर्थ्य । होती मूर्तीमंत देवची ते ॥ ३६ ॥ अपूर्व हे वार्ता नवलची ऐकीली । पूर्वीं नाहीं झाली नव्हे पुढें ॥ ३७ ॥ अनुतापें ज्याला उद्विग्न मानसीं । पुसे ब्राह्मणासी पुढतोपुढती ॥ ३८ ॥ कोण त्याचा ग्राम झाले किती दिवस । द्वीज ह्मणे मास एक झाला ॥ ३९ ॥ इंद्रायणी तिरीं आहे आळंकापूर तेथें निरंतर वास्तव्य त्या ॥ ४० ॥ पुसोनि ब्राह्मणा गेले नेवासिया । ह्मेसा घेऊनियां समागमें ॥ ४१ ॥ ऐकोनी चांगदेवें शिष्य पाचारीले । आणि एकांतासी गेले सांगती त्या ॥ ४२ ॥ यावरी पूजन करावें आमचें । मांगतों हें साचें धरीं चित्तीं ॥ ४३ ॥ तव ते विनविती होऊनि भयभीत । आज्ञा कीन्निमित्त केली ऐसी ॥ ४४ ॥ आह्मी तो अज्ञान नेणो स्वामीसेवा । अपराध देवा कीजे क्षमा ॥ ४५ ॥ त्या ह्मणती चांगदेव पुजेचे अधिकारी । आले महीवरी तेची पूज्य ॥ ४६ ॥ जेवीं सूर्यवंशीअवतरता राघव । राहीला भार्गव मागिल मागें ॥ ४७ ॥ शिष्ट असतां पूजा न घ्यावी आपण । आहे हें प्रमाण वेदशास्त्रीं ॥ ४८ ॥ घडतां अमर्यादा जावें पतनासी । भय हें मानसीं बहुत वाटे ॥ ४९ ॥ शतमख करूनीया नहुष स्वर्गा गेला । परी अमर्यादें पावला सर्पत्वतो ॥ ५० ॥ त्रिशंकू सगर ऐसे सांगो कीती । अमर्यादें येती पतनद्वारा ॥ ५१ ॥ तरी ते पूज्य प्रकट झाले मूर्तिमंत । ऐकीलें तें सांप्रत याची काळें ॥ ५२ ॥ नव्हती मानवी देवाचे अवतार । निवृत्ती ज्ञानेश्वर सोपानदेवो ॥ ५३ ॥ मुक्ताबाई आदीमाया हे जननी । केला प्रतिष्ठानी कीर्ती घोष ॥ ५४ ॥ ह्मैसीपुत्रामुखें बोलवीलया श्रुती । आश्चर्य हें चित्तीं बहुत वाटे ॥ ५५ ॥

जावें भेटीलागीं विचारीलें मनीं । हे सिद्धी साधनी नव्हे कोणा ॥ ५६ ॥ अनुतापें झाला मंतप्त मानसीं । ह्मणे सिद्धाईसी खेव आला ॥ ५७ ॥ तव बोलती प्रबुद्ध त्यासीचि आणावें । अहो मुळ पाठवावें सिद्धराया ॥ ५८ ॥ सर्व सत्ता तुम्हा आहे जी स्वाधीन । राजे प्रजाजन आज्ञे माजी ॥ ५९ ॥ तव म्हणती चांगदेव नव्हे हा विनार । आज्ञेचा बडिवार कोणाआंगीं ॥ ६० ॥ वंचूनियां काळा रक्षीलें शरीर । बहुत दिस भार वाढविला ॥ ६१ ॥ परी हें सामर्थ्य नाहीं आम्हां आंगीं । जावें भेटीलागीं हेंची सत्य ॥ ६२ ॥ जन्माचें सार्थक सिद्धाचीये भेटीं । होईल या तुटी संसारेसी ॥ ६३ ॥ परी सिद्धपणा येईल उणीव । काय कीजे जीव तळमळी ॥ ६४ ॥ ते ह्मणती देवा हे नव्हे सत्य वार्ता । म्हैसा केवी वदता होईल वेदा ॥ ६५ ॥ आणि मृतस्वर्गवासी पीतर कैसे येती । ते भोजनें करूनि जाती हेंही मिथ्या ॥ ६६ ॥ स्वामीसी विश्वास वाटे भलतीयाचा । परी हा नव्हे साचा वर्तमान ॥ ६७ ॥ नाहीं ये वार्तेसी साक्ष पडताळा । बोलीयेला वाचाळ मिथ्या द्विज ॥ ६८ ॥ तया म्हणती चांगदेव रे प्रश्न म्या पाहिला । तो ही उतरिला यथार्थपणें ॥ ६९ ॥ तों शिष्य म्हणती देवा प्रश्नही चुकतो । नसांपडतां जातो वेळाकाळ ॥ ७० ॥ हें ऐकोनि तयासी सिद्ध म्हणती तुम्ही मूर्ख । अरे विद्या आहे चोख पढीत माझी ॥ ७१ ॥ तरि ते म्हणती देवा आणवावी वार्ता । पैठणीहुनी तत्वतां धाडुनि शिष्य ॥ ७२ ॥ विद्यार्थीया म्हणती जारे प्रतिष्ठाना । आणी हें वर्तमान आणा यथातथ्य ॥ ७३ ॥ चीरंजीव सकळ क्षेत्रवासी द्रीज । आशिर्वाद माझा लिहा पत्रीं ॥ ७४ ॥ नवल हें ऐकीलें रेडा बोलवीला । निगमाक्षरीं केला घोष तेणें ॥ ७५ ॥ स्वर्गस्थ पीतर आणूनि जेवविले । पुनरपी बोलवीले स्वर्गाप्रती ॥ ७६ ॥ साच कीं हें मिथ्या धाडावें लिहुनी । तें ऐकावया मनी उत्कंठीत ॥ ७७ ॥ सांगती शिष्यासी जाऊनी त्वरीत । यावें शिघ्रवत वरावरी ॥ ७८ ॥ चालीले तेथूनी सत्वर ब्राह्मण । ते पावले पैठण गंगातीरा ॥ ७९ ॥ ऐकोनीं चांगदेवें पाठविलें पत्र । मिळाले सर्वत्र क्षेत्रवासी ॥ ८० ॥ धुतवस्त्रावरी गोधुमाची राशी । मांडिलें पत्रासी पूजा केली ॥ ८१ ॥ आलिंगीलें पत्र कंठीं ऊरीं शिरीं । वाचीलें समग्रीं श्रवण केलें ॥ ८२ ॥ कळला अभिप्रायो विस्मयें दाटले । ते सिद्ध आठवले बाळ वेषी ॥ ८३ ॥ फुंदती गाळिती उभय नत्रीं जीवन ।

ह्मणती धन्य धन्य ईश तीन्ही ॥ ८४ ॥ पूर्वाचींतें होती उत्तम गोमटी । ह्मणोनी ते दृष्टीं देखीयेले ॥ ८५ ॥ ह्मणति सिद्धासी झालें उपश्रुत । नवल अद्भुत विपलें येथें ॥ ८६ ॥ दीव्यक्रीडा ऐसे संत आचरीत । दिगंता धांवत वाऱ्यावरी ॥ ८७ ॥ कैसी विस्तारिली आख्या दुरीदेशीं । आश्चर्य मानसीं बहुत वाटे ॥ ८८ ॥ सन्मानूनी ब्राह्मणा दीधलें भोजन । वस्त्रें पांघरवून गौरवीलें ॥ ८९ ॥ दीधली दक्षिणा मार्गी खर्चाविया । पत्र लेहूनियां दीलें हातीं ॥ ९० ॥ परात्परा सिद्धा गुरूसी नमन । पत्र अवलंबन केलें स्वामी ॥ ९१ ॥ विद्यार्थी ये आह्मी सर्व ही ब्राह्मण । झालों सुखसंपन्न आशीर्वादें ॥ ९२ ॥ ऐकीली जे वार्ता सत्य विपली येथें । पढवीलें पशूतें वेदघोषें ॥ ९३ ॥ गृहस्थाचे पितर आणूनी जेववीले । प्रत्यक्ष पाहिलें आपण नेत्रीं ॥ ९४ ॥ निवृत्ति ज्ञानेश्वर मुक्ताई सोपान । वय तों लहान बाळवेषी ॥ ९५ ॥ करूनी ऐसी क्रीडा येथुनि स्वार झाले । नेवासिया गेले महासिद्ध ॥ ९६ ॥ तयास्थळीं केला भगवद्गीता अर्थ । दहा सहस्र ग्रंथ सिद्ध झाला ॥ ९७ ॥ बाबाजी-पंतांनीं स्वहस्तें लीहिला । ओंवीबद्ध केला ज्ञानेश्वरीं ॥ ९८ ॥ सच्चिदानंद बावा ठेवीयेलें नांव । सिक्षापीला भाव देखोनीयां ॥ ९९ ॥ एक पशु दूजा सच्चिदानंदबावा । शिष्य केले नभा नाकळती ॥ १०० ॥ येथूनिया जातां अळंकापूरीसी । पशु आलीया पासीं स्थापीयेला ॥ १ ॥ अजान वृक्ष तेथें ठेवीयेली खूण । झालें निरूपण निवेदिलें ॥ २ ॥ घेऊं-नियां पत्र आले तप्तीतीरा । नमीलें वटेश्वरा चांगयासी ॥ ३ ॥ करूनि नमस्कार पत्र दिलें हातीं । नवलावो सांगती देखीला तो ॥ ४ ॥ ह्मणती सत्यदेवा अद्भुत चारित्र । वर्णिती सर्वत्र तेथिचे जन ॥ ५ ॥ वाचीलीया पत्र ह्मणती चांगदेव । वार्ता अभिनव नित्य नवी ॥ ६ ॥ विचा-रितां दिसे नव्हे हें सामान्य । गेला अभीमान गळोनियां ॥ ७ ॥ कायरे अति-क्रम करविला मज हातीं । फिटली असती भ्रांति पाहोनि त्यातें ॥ ८ ॥ आतां तरी जावें म्हणती अळंकापुरा । सामग्रीया करा सिद्ध वेगीं ॥ ९ ॥ शिष्यजन सर्व गृहस्थ मीळाले । सकळीं प्रार्थिलें म्हणती देवा ॥ १० ॥ सिद्धाई कोणाची नाहीं स्थिरावत । तपाचें सामर्थ्य वेचलीया ॥ ११ ॥ आहे नाहीं आतां त्याचें सिद्धपण । धाडा विचक्षण पाहोनि येती ॥ १२ ॥ मग तैशा सारीखा करावा विचार । जेणें येर झार चुके देवा ॥ १३ ॥ पाचारिले प्रौढ वृद्ध तपोराशी । जा म्हणती तयासी अळंकापुरा ॥ १४ ॥ वसती सिद्ध तेथें निवृत्ति ज्ञानेश्वर । सोपान मुनेश्वर मुक्ताबाई ॥ १५ ॥

सिद्धपण त्यांचें आहे कीं वेचलें । पाहोनि यावें वहिले वेगावत ॥ १६ ॥ ते म्हणती स्वामीया संतांचें लक्षण । काय कैसी खूण सांगा आम्हा ॥ १७ ॥ वर वेषा आम्हीं पाहावें तें काय । अंतरीचें नव्हे विद्यमान ॥ १८ ॥ गृहस्थाश्रमीं एक उदास दिसती । एक ते भासती व्यवसायीसे ॥ १९ ॥ एक वेडे मुके पंगु मुद्राहीन । चतुर वित्पन्न दिसती एक ॥ २० ॥ देहाच्या संबंधें दिसे देहाकृती । अवस्था भोगीती यथा काळें ॥ २१ ॥ निद्रित नीजेमाजी जगोचि जागृतीं । स्वप्नी हि देखती नाना विध ॥ २२ ॥ इंद्रियां वर्तवीती स्वभाव व्यापारीं । दीसती संसारीं अतिदक्ष ॥ २३ ॥ बाळक कौमार वृद्धाप्य तारुण्य । दिसती शक्तीहीन व्याधिग्रस्त ॥ २४ ॥ क्षुधा काळीं अन्न प्रसादा ते घेती । तृषाकाळीं पीती जीवना ते ॥ २५ ॥ इतराचि सारिखे दिसती तेही जनीं । काय तें पाहोनी यावें आम्ही ॥ २६ ॥ हांसती रूसती शिव्या देती एका । दिसती लौकीका सारिखेची ॥ २७ ॥ न चोजवे आम्हा संताची निज खूण । सांगावें लक्षण तें चि पाहों ॥ २८ ॥ आंगें संत तोची ओळखे संतासी । काय आणीकासी वर्म कळे ॥ २९ ॥ म्हणती चांगदेव साच हे बोलिले । विचार नचले युक्ती तेथें ॥ ३० ॥ कायरे करावें पूसती शिष्यासी । ते ह्मणती सिद्धासी द्यावें पत्र ॥३१॥ लेहोनि पत्रिका द्यावी यांचे हातीं । देऊनि हे पाहती स्थिरसंतर ॥ ३२ ॥ पत्राचें उत्तर काय देती कैसें । अर्थि अनायासें येईल कळों ॥ ३३ ॥ पत्र लीहावया वैसले एकांतीं । न चालेची युक्ती थोटावली ॥ ३४ ॥ अनामासी नाम अरूपासी रूप । कैसें लाऊं पाप कल्पनेचें ॥ ३५ ॥ चिरंजीव ह्मणो तरी विश्वात्मक । तीर्थरूप तरी बाळक दशा आंगीं ॥ ३६ ॥ न दीसे पूर्वी न लभेचि अक्षर । पडीयेला विचार न चले हात ॥ ३७ ॥ मग दिधली टाकुनी पत्रिका लेखणी । चित्तिं चितवणी पैठी झाली ॥ ३८ ॥ देखोनि सकळ प्रार्थीती सिद्धासी । कां हे दशा ऐसी विपरीत ॥ ३९ ॥ ह्मणती चांगदेव कायरे लीहावें । मूळ न संभवे पत्रिकेचें ॥ ४० ॥ तरि ते ह्मणती देवा कोरें पत्र पुरे । द्यावें अत्यादरें पाठऊनी ॥ ४१ ॥ युक्ती माजी दिसे बरवा हा सिद्धांत । सिद्धाईचा अर्थ गूढ गुह्य ॥ ४२ ॥ घालूनीयां घडी कोरें पत्र देती । आणि उत्तर ह्मणती म.गा त्यासी ॥ ४३ ॥ जाऊनियां तुह्मीं यावें शीघ्रवत । करा दंडवत क्षेम सांगा ॥ ४४ ॥ चालीले तेथुनी आले शिवपीठा ।

देती ज्ञानेश्वर परिसावें तें ॥ ४६ ॥ अत्यंत रसाळ आहे निरूपण । पुढील प्रकरण कसोटीचें ॥ ४७ ॥ इति श्रीचांगदेव चरित्रे पत्र प्रेषणं नाम तृतीयं प्रकरणं ॥ ४८३ ॥

॥ १४७६ ॥ पावले ब्राह्मण अळंकापूरासी । आनंद मानसीं न समायतो ॥ १ ॥ देखीयेला दंडक्षेत्रवासी जन । प्रातःकाळीं प्रश्न करिती तीर्थी ॥ २ ॥ पूजूनि सिद्धासी नर नारी बाळें । जाताती राउळा आपुलाल्या ॥ ३ ॥ बाळ लीळा वेषें आनंदें खेळती । नर नारी देखती येतां जातां ॥ ४ ॥ खालाऊनी माथा श्रीमुख पाहती । आपुलाल्या जाती कामा लोक ॥ ५ ॥ देखोनीयां ब्राम्हण मनीं विचारिती । येथें नमस्कारिती मार्गी कोणा ॥ ६ ॥ पुढें देखीयेल्या खेळतां कुमारी । पुसती उच्चस्वरीं तयांप्रती ॥ ७ ॥ निवृत्ति ज्ञानदेव वसताती कोठें । कोणीकडे मठ आहे त्यांचा ॥ ८ ॥ ऐकोनि कुमारी हिडसूनि धिक्कारीं । बोट कानावरी ठेऊनियां ॥ ९ ॥ कोठील रे तुम्ही नेणा विनीतता । उद्धट बोलतां महामूर्ख ॥ १० ॥ अर्भकाच्या परी नामें उच्चारूनी । पुसतां महामुनी सिद्धराया ॥ ११ ॥ दीर्घस्वरें करिती नामाचा उच्चार । नेणोनियां पार महिमा त्यांचा ॥ १२ ॥ गव्हाराच्या परी बोला सैराशब्द । मूर्ख तुह्मी मुग्ध हीनबुद्धी ॥ १३ ॥ व्यापकासी स्थान अपारासीं मान । मानीतां अज्ञान मूढमती ॥ १४ ॥ ऐकावें स्वर्गाचे श्रीमंत गोसावी । नाटक लावी ब्रह्मांडाचे ॥ १५ ॥ तया एक देशी कल्पूनीयां स्थान । पूसतां अज्ञान मठ त्यांचा ॥ १६ ॥ तीहींलोकांवरी मिरवे ध्वज ज्यांचा । नेणा महिमा त्यांचा मतिहीन ॥ १७ ॥ अरे ब्रह्मादिकां पूज्य ईश्वर अवतार । बोलतां उत्तर अमर्यादें ॥ १८ ॥ संज्ञामात्रें नेत्रखूणेनें दाविती । पाहा ते खेळती नित्यमुक्त ॥ १९ ॥ ज्ञानप्रभादिनमणी उगवले । प्रत्यक्ष देखीले देव तिन्ही ॥ २० ॥ सहजाचें आसन आंगीं योगकळा । देखीयेली लीळा आत्मनिष्ठ ॥ २१ ॥ देखतां लोटीले देह लोटांगणी । लागले चरणी अतिनम्र ॥ २२ ॥ ह्मणती ज्ञानदेव चांगया पासून । आले हे ब्राह्मण समाचारा ॥ २३ ॥ ऐकोनीयां द्विज ह्मणती अतींनिष्ठ । जाणीतलें स्पष्ट अंतरीचें ॥ २४ ॥ यावरी सीद्धाई असावी ते कैसी । सर्वांतर वासी देवची हे ॥ २५ ॥ लागोनीयां चरणीं दीधली पत्रिका । सांगितलें नीकें वर्तमान ॥ २६ ॥ ह्मणती चांगदेवें

प्रणिपात केला । मस्तक ठेविला चरणावरी ॥ २७ ॥ पत्राचें उत्तर मागीतलें स्वामी । भेटी अंतर्यामी इच्छीताती ॥ २८ ॥ म्हणती निवृत्ति नाथ वाचा ज्ञानेश्वरा । तव ते म्हणती कोरा अर्थ आहे ॥ २९॥ कोरें पत्र वरें निवृत्ती बोलती । पाकाची निष्पत्ती होय तेथें ॥ ३० ॥ कोरें तें सोंवळें खरकटें ओंवळें । धूतल्याही जळें शुद्ध नोहे ॥ ३१ ॥ कोरें तें निर्मळ स्वीकारीलें जाय । अमंगळ राहे खरकटें तें ॥ ३२ ॥ कोरीया अक्षर उमटे कसोटी । रद्दीजाय हाटीं विकावया ॥ ३३ ॥ एकाक्षर ब्रह्म प्रणवाचे कुशी । नुचारे पराशि उच्चारीतां ॥ ३४ ॥ पावीजे अक्षर गुरुकृपाखूणें । येराशीं उमाणे नुकळवे ॥ ३५ ॥ शीणती बहूते करीतां खटपट । अर्थ उपराटा पडे तयां ॥ ३६ ॥ अक्षर परब्रह्म वेदा अगोचर । केंचा अनुस्वार उमटला ॥ ३७ ॥ नचले जाणीव नचले शाहाणीव । तर्कानुरे ठाव अक्षर तें ॥ ३८ ॥ पत्र लिहा तुम्ही कृपेच्या सोरमें । आज्ञापिलें ऐसें निवृत्तिनाथें ॥ ३९ ॥ रेखीयेली पत्रीं लिखीत पासष्टी । पाहातां अर्थ दृष्टी तत्वीं पडे ॥ ४० ॥ परम गुह्या गुह्य उपनिषद भाग । कृपेचा प्रसंग संपादिला ॥ ४१ ॥ वाचीलीया अर्थ आणीतां मानसीं । पावीजे अनायासीं परमतत्वा ॥ ४२ ॥ नकरितां यजन अध्ययन अध्यापन । नकरितां साधन आत्मप्राप्ती ॥ ४३ ॥ देऊनियां पत्र म्हणती चांगदेवा । निरोप सांगावा विवराहे ॥ ४४ ॥ घेऊनीयां पत्र निघाले ब्राम्हण । वंदीले चरण पुढतो पुढती ॥ ४५ ॥ आले तप्तीतीरा नमीलें सिद्धासी । वर्तमान त्यासी निरोपिलें ॥ ४६ ॥ म्हणती सिद्धराया पाहीलाजी महिमा । आंगी निरूपम सामर्थ्याचा ॥ ४७ ॥ अद्भुतऐश्वर्य देखीलें लोचनीं । दीधलें लेहोनी पत्र तुम्हा ॥ ४८ ॥ देऊनिया पत्र म्हणती द्विजवरा । देवाचे अवतार निःसंदेहें ॥ ४९ ॥ करूनियां पूजा पत्र वाचीयेलें । तव गुह्य देखिलें नचले युक्ती ॥ ५० ॥ मग म्हणे अभिमान अद्यापी नजळे । तिमिरें गेले डोळे नदिसे हित ॥ ५१ ॥ कृत्रिम आचरणें दशा झाली ऐसी । विश्वास मानसीं थार नेदी ॥ ५२ ॥ ऐकतों श्रवणीं पाहावें लोचनीं । निश्चय तो मनीं दृढ केला ॥ ५३ ॥ अनुतापें उद्देश धरिला चांगदेवें । अळंकापुरा जावें सिद्धा भेटी ॥ ५४ ॥ तरीच सार्थक धरिलीया जन्माचें । नाहीं तरी काळाचे भातुकलें ॥ ५५ ॥ नचुके ती जन्म चौऱ्यायसी यातना । काळासी वंचना कोठवरी ॥ ५६ ॥ पाचारिले सर्व पारपत्य आधिकारी । सांगती तयारी करावी सां ॥ ५७ ॥ वहन सामग्राया सिद्ध करा वेगीं ।

जाणें भेटीलागीं सिद्धाचीये ॥ ५८ ॥ कोठवळे जामदार आले पोतनीस । सरंजाम त्यांस आज्ञापीला ॥ ५९ ॥ ऐकोनिया सर्व गृहस्थ शिष्यवर्ग । धावीले सवेग आले जवळी ॥ ६० ॥ म्हणती सिद्धराया परिसावी विनंती। जाणें तरी युक्ती ऐसें जावें ॥ ६१ ॥ प्रतापें महत्वें आपुल्या महिम्यानें । ऐश्वर्य भूषणें सिद्धाईच्या ॥ ६२ ॥ विद्येच्या सामर्थ्ये आपुलीया वैभवें । जाऊनी भेटावें बडिवारें ॥ ६३ ॥ आपणा देखोनि झांकेल त्याचें तेज । येतील ते ही सहज शरण पायां ॥ ६४ ॥ तैसाचि योजिला युक्तीचा प्रसंग । विस्तारिलें सोंग बहुविध ॥ ६५ ॥ व्याघ्रासी स्तंभनें सर्पासी मोहनें । सिद्ध केलीं वहनें रथ वारू ॥ ६६ ॥ हाकारिला सर्व शिष्य समुदाय । सांगीतलें काय तयांप्रती ॥ ६७ ॥ वैसा व्याघ्रावरी सर्प धरा करीं । नानाअलंकारीं जाऊं चला ॥ ६८ ॥ जाती चांगदेव भेटी समुदायें । महा महोत्साहें अळंकापुरा ॥ ६९ ॥ तप्तीतीराहूनि गृहस्थ आपार । सर्वें दळभार गजवारू ॥ ७० ॥ कश्यप स्वामीचा फळला आशीर्वाद । राज श्रियापद भोगप्राप्ती ॥ ७१ ॥ चालीयेले राजे गृहस्थ मंडळी । केली विप्रकुळीं परस्थानें ॥ ७२ ॥ म्हणती सिद्धा भेटी होईल परस्परें । पाहों असादरें उत्साहतो ॥ ७३ ॥ परिवार सांगातीं घेतलीं स्त्रियावाळें । व्यवसायी पाठ्याळ थोपटिली ॥ ७४ ॥ निघाला उदीम म्हणती सौदागर । भरियेले संभार केणीयाचे ॥ ७५ ॥ हांसील जकाती नलगे चौकी देणें । लाभा नाहीं उणें पिकला कौल ॥ ७६ ॥ नटवे नृत्यांगना गुणिजनाचे भार । चालीले अपार समागमें ॥ ७७ ॥ ठाकूर नगारीं गर्जती पवाडे । सवें चालती देव्हडे सिद्धापुढें ॥ ७८ ॥ गजावरी वाद्यें निशाणें कुसरी । द्रव्यें भरिल्या हारी गाडीयाच्या ॥ ७९ ॥ नरसिम्न्याचीं दिंडें सवें शिकारखाना । राजभार सेना तैसा चाले ॥ ८० ॥ डेरेकनातांचे लादीयेले उंट । चालती संघाट काटीयाचे ॥ ८१ ॥ नौबदि नगारे वाद्यजात सकळ । घोषें त्या भूगोळ दुमदुमीला ॥ ८२ ॥ लक्षावत यात्रा तप्तीतीराहूनी । चालतां अवनी नपुरे मार्ग ॥ ८३ ॥ छत्रिने पताका मोरपिसा कुंचे । टाळमृदंगाचे समारंभें ॥८४॥ शृंगारिला भेख विद्येच्या कुसरी । सोंगें नानापरी दर्शनाचीं ॥ ८५ ॥ सत्वरले शिष्य गुरूआज्ञेवरी । नानावेषधारी वाह्यरंग ॥ ८६ ॥ चर्चियेला भस्में काशांवरवासी । मृग व्याघ्र चर्मासी संख्या नाहीं ॥ ८७ ॥ कुडूक कुंडलें शिरीं जटाभार । मुक्तकेशी दिगंबर नागवेची ॥ ८८ ॥ जागवटे सैल्या फुलमाळा शोभती । कथा विराजती नाना-

वर्ण ॥ ८९ ॥ झोळ्या बटवे कक्षेमाजी जड्या बुट्या । आडबंद लंगोट्या बहुवस्त्रें ॥ ९० ॥ कुबड्या काठ्या छड्या वेणुदंड हातीं । टोप विराजती कफणीया ॥ ९१ ॥ कुंडलें सांगातें भांग घोटावया । चिलमी ओढावया गुडगुड्या ॥ ९२ ॥ पक्ष्यांचे पिंजरे सांगातें कुतरे । चितळे सामरे सोकवीलीं ॥ ९३ ॥ पांवे मोहऱ्या चंग किन्नरी झल्लरी । डफ हुडुक करीं नागसरे ॥ ९४ ॥ गोरख धंदे हातीं गोळाणें धनुष्यें । धावती आवेशें विद्येचिया ॥९५॥ कूशळ कवी ते वाचाळ बोलते । बहुमतें झकविते तर्कवादी ॥ ९६ ॥ फळें जळाहारी येक दुग्ध पीती । मौन्याचें व्रतस्थ पवनाभ्यासी ॥ ९७ ॥ व्याघ्राआरोहणें रथाचीं वहनें । सर्पाचीं वेष्टणें नानाविध ॥ ९८ ॥ योग मुद्रा अंगीं दावीती कोटी। नानालक्ष्य दृष्टी उफराटीया ॥ ९९ ॥ कलर वापरी आंजनें घालूनि नयनीं । दाविती लोचनीं तिमिर तेज ॥ १०० ॥ भावीका नरनारी बाळा झकवीती । हेंचि ब्रह्म ह्मणती तेजाकार ॥ १ ॥ सत्याचा दुष्काळ असत्याची रूढी । दावितातीं प्रौढी थोरपणा ॥ २ ॥ मार्गिचे जनलोक सामोरे धांवती । लोटांगणी येती चांगदेवा ॥ ३ ॥ नानावस्त्रें भेटी सिद्ध सामग्रिया । समर्पूनि पाया नमस्कारिती ॥ ४ ॥ याचेनि दर्शनें जडजीवा उद्धार । करिती जयजयकार नामघोषें ॥ ५ ॥ आलें पुण्य स्तंभा श्रीगोदे सन्निध । केला तीर्थविधी स्नान संध्या ॥ ६ ॥ द्विजसंतर्पणें वाटीयेलीं दानें । पुढारी गमनें आरंभीलीं ॥ ७ ॥ आले खिडीवरुनी चालीयेले भार । केले नमस्कार ह्मैसीपुत्रा ॥८॥ केंदुरा वरुनि उतरले घाटा । गर्जती उद्भट सिद्धनामें ॥ ९ ॥ कान्होपाठक प्रीती चालविलेसवें । प्रार्थुनी चांगदेवें अत्यादरें ॥ १० ॥ आले भीमातीरीं स्नानीं स्थिरावले । पुढें पाठवीलें सांगोनियां ॥ ११ ॥ यावरी ह्मणे निळा होईल सिद्धभेटी । परस्परें ते गोमटी आहे कथा ॥१२ ॥ बहुत आपूर्व आसुमाई चरित्र । परिसोत सर्वत्र श्रोतेजन ॥ १३ ॥ इती श्रीचांगदेवचारित्रे सिद्धदर्शननाम चतुर्थ प्रकरणं ॥ ५९६ ॥

---

## श्रीज्ञानदेव.

॥१४७७॥ चालीले ब्राह्मण वार्ता सांगावया । शीघ्र बैसोनियां व्याघ्रावरी

॥ २ ॥ बाळ क्रीडालीळे होतीं भिंतीवरी । बैसलीं सूर्यकरीं उष्णघेत ॥ ३ ॥ तवते पातले वार्तिक द्विजवर । करिती नमस्कार विनीतता ॥ ४ ॥ सिद्ध आले भेटी चांगदेव समर्थ । सांगती वृत्तांत साष्टांगेसी ॥ ५ ॥ ऐकोनि चांगदेव आले भेटावया । उल्हासल्या बाह्या आलिंगना ॥ ६ ॥ जावें सामोरें निवृत्तिनाथ बोलती । तव ज्ञानदेवा चित्तीं विस्मय वाटे ॥ ७ ॥ सर्वांतरवासी स्वामी सर्वगत । नभीं नभ सतत जयापरी ॥ ८ ॥ सन्मुख विन्मुख सूर्यकोणाकडे । आज्ञेचे बागडे नाचवीत ॥ ९ ॥ जेथें जावें तेथें भरूनि ऊरलेती । सर्वांतरीं वस्ती तुमची स्वामी ॥ १० ॥ हंसूनि तयासी ह्मणती निवृत्तिनाथ । वदलासी यथार्थ सिद्धांत तूं ॥ ११ ॥ परी येथें सगुणें सगुणा भेटावें । निर्गुणीं तो अवघें शून्याकार ॥ १२ ॥ द्वैतयोगें घडे निजसुखाची वृद्धी । अभेदी तो सिद्धी आपेंआप ॥ १३ ॥ आणखीं एकगुज ऐके ज्ञानासिंधू । इंद्राचा हा बंधू मरुद्गण ॥ १४ ॥ पुत्र कश्यपाचा ऊदरीं दितीचा । जन्म झाला याचा पूर्व जन्मीं ॥ १५ ॥ मातेनें याचिये मागीतला वर । व्हावा राज्यधर पुत्र माझा ॥ १६ ॥ तोची भोगावया आला हा वैभव । परमार्थिक सर्व लेउनी लेणीं ॥ १७ ॥ इंद्रादिका पूज्य व्हावी ऐसी बुद्धी । विद्यायोग रिद्धीवरें तुह्मा ॥ १८ ॥ स्वर्गवासी आला वरदें मृत्युलोका । विद्याचा आवाका सर्व आंगीं ॥ १९ ॥ चतुर्वेद वक्ता षडशास्त्रीं संपन्न । अष्टादश पुराण मुखोद्गत ॥ २० ॥ चतुर्दशविद्या कळा ही चौसष्टि । मंत्र सप्तकोटी विधी जाणे ॥ २१ ॥ स्थान मान कळा जाणे योगसिद्धी । आष्टादशौषधी रसायनें ॥ २२ ॥ जड्या बुद्या जाणे रोगाच्या परीक्षा । पंचाक्षरी शिक्षा करीत भूतां ॥ २३ ॥ मणीमंत्र सिद्धी तोटके वेधका । साधुका बाधका विद्याजाणे ॥ २४ ॥ चतुर हरिभक्त चौदाशें वर्षांचा । बहुविद्या सिद्धाच्या सिद्धजगीं ॥ २५ ॥ आर्तभूत आले भेटी लवलाहो । उचित हें आहे सामोरया ॥ २६ ॥ ह्मणती ज्ञानदेव चलावें जि माझा । भिंतीशीं केली आज्ञा चला ह्मणे ॥ २७ ॥ निर्जीव चाले भिंती देखे विश्वजन । धावती ब्राह्मण पुढें सांगों ॥ २८ ॥ तो येती चांगदेव वाद्यांच्या गजरीं । आरूढोनि गजावरी चवरडोली ॥ २९ ॥ तव सांगती वार्तिक महासिद्ध आले । भिंती वोळंघले चालवीती ॥ ३० ॥ ऐकूनि चांगया गलितपत्र जाला । लोटांगणीं आला गडबडां ॥ ३१ ॥ घाली दंडवत उभाठाक पाहे । भिंती चालताहे गजगती ॥ ३२ ॥ तेजसूर्यापरी चौघे भिंतीवरी । देखोनियां करी नमस्कार ॥ ३३ ॥ ऐसेशतवरी संख्या नमस्कार जाले । तव ते पातले जवळीके ॥ ३४ ॥ विनीत चांगया देखीयेलीं स्थिती

उतरले क्षिती भेटावया ॥ ३५ ॥ जाली भेटी तोची विश्रांतीचा वट। छाया घनदाट बैसावया ॥ ३६ ॥ प्रीतीच्या पडीभरें पडीलें आलिंगन। परमसमाधान उभयतां ॥ ३७ ॥ आलिंगनमीसें हृद्गत आपुलें। मुख निक्षेपिलें हृदयीं त्याच्या ॥३८ ॥ चांगदेवो कृपादृष्टी अवलोकिलें। अमृताचें झालें मार्जन त्या ॥ ३९ ॥ नेणो काय केलें हृदयीं क्षेम देतां। विश्वीं एकात्मता ठसावली ॥ ४० ॥ तुटलें बिरडें पुढें जन्मावळी। मागें झाली होळी संचिताची ॥ ४१ ॥ सकळ जन यात्रा दंडाचियेपरी। जैसी महीवरी पडिलीं वस्त्रें ॥ ४२ ॥ देखोनियां भाव देव कृपामूर्ती। आलिंगन देती लहान थोरां ॥ ४३ ॥ देवासी सारिखीं आले शरणांगते। दुबळीं समर्थे उंचनिचें ॥ ४४ ॥ अनन्याचा भाव जाणती हृद्गत। करिती त्या सनाथ दर्शनमात्रें ॥ ४५ ॥ सकळ विश्वजन यात्रासमुदाय। आलंगिले बाह्या पसरूनियां ॥ ४६ ॥ आनंद पिकला सिद्धाचीये भेटी। आमृताचि वृष्टी अनिवार ॥ ४७ ॥ विश्रांतिसी सुख आलें जया ठाया। रूळविया पायावरी निडळें ॥ ४८ ॥ गर्जती आनंदें नामाच्या गजरीं। घोष तो अंबरीं नसमाये ॥ ४९ ॥ नाचती नाचणी संगीत कूसरी। राग सप्तस्वरीं आळविती ॥ ५० ॥ वाजविती वाद्यें करीती सोहळा। समर्पिती कळा अभ्यासिल्या ॥ ५१ ॥ सिद्धाच्याचारित्रें गर्जती पवाडे। नाचती सुखाडे आनंदाच्या ॥ ५२ ॥ ऐसे आले आळंकापुरी इंद्रायणीतीरा। ब्रह्मानंद नरानारी लोका ॥ ५३ ॥ ह्मणती चांगदेव महालाभ झाला। हा सद्गुरू भेटला कृपामूर्ती ॥ ५४ ॥ विधीयुक्त पूजा षोडशोपचारीं। समर्पिलीं शिरीं पुष्पांजुळी ॥ ५५ ॥ पतित पतित तारावें पतिता। चांगा विनीतता शरण आला ॥ ५६ ॥ वरद हस्त आतां मस्तकीं ठेवावा। चांगा ह्मणवावा शिष्यवर्ग ॥ ५७ ॥ मग श्रीनिवृत्तिनाथें कृपेच्या सागरें। आणि ज्ञानेश्वरें सोपानदेवें ॥ ५८ ॥ निरविला चांगा मुक्ताबाई प्रती। यासी करा प्रतीत आत्मज्ञानी ॥ ५९ ॥ चांगदेवें चरणीं न्यासीला मस्तक। मुक्ताबाई हस्त ठेवी माथा ॥ ६० ॥ नकळे ब्रह्मादिकां सद्गुरूचि हतवटी। केला उठाउठी निजबोध ॥ ६१ ॥ स्वरूपीं अढळ ठेली चित्तवृत्ती। इंद्रिया विश्रांति तेणें सुखें ॥ ६२ ॥ नलाविची मुद्रा कष्ट नाहीं अंगीं। केला राजयोगी जिवन्मुक्त ॥ ६३ ॥ लेववीला सर्वांगीं पासष्टीचा अर्थ। होऊनि कृतार्थ ठेला पायीं ॥ ६४ ॥ चांगदेव ह्मणे आजीचि जन्मलों। गुरूपुत्र झालों मुक्ताईचा ॥ ६५ ॥ मागील चौदाशें झाली जन्मांतरें। आजी जन्म खरें सार्थकाचें ॥ ६६ ॥ मीची मज भासें विश्वातें वसविता।

हें सद्गुरू वचनें आतां प्रतिती आलें ॥ ६७ ॥ धन्य हा सद्गुरू निवृति ज्ञानेश्वरु । सोपान मुनेश्वरु मुक्ताबाई ॥ ६८ ॥ दर्शनेचि यांच्या स्वरुप साक्षात्कारू । चांगावटेश्वरू सुखी केला ॥ ६९ ॥ मग केशवदास चांगा ह्मणती ज्ञानेश्वर । तुज असो बडिवार नामाचा या ॥ ७० ॥ हा ऐकोनि उत्साह सकळ प्रांतवासी । आले दर्शनासी परीवारें ॥ ७१ ॥ ह्मणती सिद्ध भेटी आले चांगदेव । अगणित वैभव घेऊनियां । ॥ ७२ ॥ सकळ वर्ण आले पाहाया चरित्र । पंचक्रोशि क्षेत्र नपुरे ठावो ॥ ७३ ॥ व्यवसायी जन आले घेऊनी सौदे माल । होईल उकल म्हणती येथें ॥ ७४ ॥ साधिले बाजार मांडिलें दुकान । पाहिजेतो वाण सिद्ध आहे ॥ ७५ ॥ म्हणती चांगदेव करावें पूजन । द्यावें निमंत्रण सर्वयात्रे ॥ ७६ ॥ त्रिलक्षभोजनाची अइत सारिली । पूजा आरंभिली सद्गुरूची ॥ ७७ ॥ उभय तिरीं दीले मंडप अपार । शोभे गंगातीर इंद्रायणी ॥ ७८ ॥ सकळ यात्रा आणि जन क्षेत्रवासी । यावें भोजनासीं प्रार्थियेलें ॥ ७९ ॥ नरनारी बाळें अवघीं लहानथोरें । प्रार्थिलीं आदरें प्रसादासि ॥ ८० ॥ भगवत्भुतीं द्यावें सर्व भुतीं अन्न । हेंचि मुख्य पुजन सद्गूरूचें ॥ ८१ ॥ आरंभिले पाक अन्नें नानापरी । शाखा कोशिंबिरी चिरीयेल्या ॥ ८२ ॥ शर्करा मिश्रीत सघृत पक्कान्नें । षडरस दिव्यान्नें सिद्ध केलीं ॥ ८३ ॥ मग षोडशोपचारें पूजेस आरंभा । वेदघोषें नभ गर्जिन्नलें ॥ ८४ ॥ सिदोपंत गिरिजाबाईचें पूजन । करूनी स्तवन बहुत केलें ॥ ८५ ॥ तुमचिये कुळीं हे विश्वाचे तारक । उपजले बाळक माहा सिद्ध ॥ ८६ ॥ समर्पिली पुजा वस्त्रें अळंकार । संपदा अपार वोपीयेली ॥ ८७ ॥ सिद्धाचें पूजन आरंभिलें वोजा । मेळउनियां द्विजा वित्पन्नासी ॥ ८८ ॥ निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान मुक्ताई । पूजेची नवाई विश्व देखे ॥ ८९ ॥ रत्नजडित चौक्या बैसविले वरी । अर्घ्य पाद्यादि उपचारी पंचामृतें ॥ ९० ॥ शतसहस्र विप्र भोवताले फेरी । अभिषेक पात्रें करीं धरिलीं द्विजीं ॥ ९१ ॥ महारुद्र अतिरुद्र अरंभ उपन्यास । अंबर मंत्रघोषें दुमदुमीत ॥ ९२ ॥ मंगळ उतुरे नाना वाद्यांचा गजर । घोषें जयजयकार करिती सर्व ॥ ९३ ॥ अक्षवणे नारी पतिव्रता करिती । आणि श्रीमुख अवलोकिती चरण दृष्टी ॥ ९४ ॥ नानापरीमळ द्रव्यें गंधाक्षता माळा । जडित पदकें गळां समर्पीलीं ॥ ९५ ॥ सुवर्ण तंतू वस्त्रें मुकुटादि अलंकार । लेववीले परीकर चांगदेवें ॥ ९६ ॥ मुद्रिका भूषणें जडिताचीं कुंडलें । कटी सूत्र सुदले वाळे वाकीं ॥ ९७ ॥ नाना

सुमन हार घालूनियां कंठीं । अवलोकुनी दृष्टी भरूनियां ॥ ९८ ॥ विसम्र चांगया जाणे विधी मार्ग । पुजा केली सांग उपचारेंशिं ॥ ९९ ॥ पूजेचे आसनीं विराजल्या मूर्ती । झाली धुपारती आरतीया ॥ १०० ॥ सुवर्ण दक्षिणा गौदाना दीधली । पुजा सांग केली सद्गुरूची ॥ १ ॥ पाहाती लोचनीं नरनारी बाळें । आणि नाचती कल्लोळें प्रेमाचिया ॥ २ ॥ जवादी कस्तुरी बुक्याचे धूसर । उधळती अपार देवावरीं ॥ ३ ॥ नैवेद्य पुष्पांजुळी केल्या प्रदक्षिणा । सकळा ब्राह्मणा पूजीयेलें ॥ ४ ॥ हरिभक्त वैष्णव पुजिले आदरें । वाद्यें मंगळ तुरे घोष ध्वनी ॥ ५ ॥ व्यवसायी जन पुजीले क्षेत्रवासी । दिधलें सवाष्णीसीं हळदी कुंकें ॥ ६ ॥ चांगदेवें मग आरंभिलें ध्यान । मूर्ती अवलोकून सद्गुरूची ॥ ७ ॥ आरक्त पद तळीं पाऊलें सकुमार । पोटऱ्या सुंदर जानु जघा ॥ ८ ॥ उदर त्रिवळी प्रशस्त वक्षस्थळा। शोभली निर्मळ उटी आंगीं ॥ ९ ॥ सरळ भुजादंड तुळशी पत्रें माळा । नानापुष्पें गळां डोल देती ॥ १० ॥ हनुवटी चुबुका दंत हिरीया जाती । दुबाही पंगति विराजली ॥ ११ ॥ नासिक सरळ उन्मलीत नेत्रकमळ । शोभल्या कपाळीं गंधाक्षता ॥ १२ ॥ जावळ कूरळ मंडीत मस्तक । पुजा ब्रह्मादिक समर्पीती ॥ १३ ॥ मुक्ताई मुक्तरूप मुक्तीची चित्कळा । नित्य मुक्तलीळा दावी अंगीं ॥ १४ ॥ आर्ध्य पाद्यादिक वेदाच्या सुस्वरीं । चांगदेव करी ध्यान पुजा ॥ १५ ॥ धन्य तो दीवस नैवेद्य अर्पिला । पुष्पांजुली केला प्रणीपाता ॥ १६ ॥ पुजीले ब्राह्मण विधी उपचारें । हरिभक्त आदरें येथो चित्ता ॥ १७ ॥ बैसवील्या पंगती इंद्रायणी तीरीं । पात्रीं नानापरी विस्तारिल्या ॥ १८ ॥ दिव्यान्नें परवडी अन्नशुद्धी वाढिली । मंत्रें प्रोक्षीयेलीं त्रिपदेच्या ॥ १९ ॥ सोडीला संकल्प झालों निर्विकल्प । निराशिलें पाप संदेहाचें ॥ २० ॥ तद्र्पण केलें ज्ञानेश्वर नामें । भोजनें संभ्रमें सारीयेलीं ॥ २१ ॥ एक एक शीत द्विजमुखीं अर्पितां । शत्तक्रतू भोक्ता नारायण ॥ २२ ॥ ऐसा ये क्षेत्रींचा अद्भूत महिमा । वर्णी निरुपमा चांगदेव ॥ २३ ॥ मग समर्पिले विडे दक्षिणा उपचारीं । चांगदेव करी नमस्कार ॥ २४ ॥ मंत्राक्षता द्विजीं आर्पियेल्या शिरीं । राहो कल्पवरीं क्षेत्र महिमा ॥ २५ ॥ मग बैसवोनि पंगती परिवार आपुला । शेष प्रसाद घेतला चांगदेवें ॥ २६ ॥ अद्भुत सोहळा हरीचीं कीर्तनें । वाटियेलीं धनें याचकासीं ॥ २७ ॥ सकळांशीं तृप्ती याचेनि दर्शनें । करीती स्तवनें नारीनर ॥ २८ ॥ प्रत्यक्ष पंढरी तेहे अळंकापुर । मुक्तीचें माहेर उपासका ॥ २९ ॥ निर्विकार जन सकळ

क्षेत्रवासी । पुजिती सिद्धासि नित्यकाळ ॥ ३० ॥ धन्य पंचक्रोसी धन्य क्षेत्रवासी । धन्य जे यात्रेसीं येती लोक ॥ ३१ ॥ ऐसा चांगदेवें स्तुतिवाद केला । आणि मस्तक ठेविला चरणावरी ॥ ३२ ॥ याचि जन्में बहुत जन्मा निवारीलें । वंदितां पाउलें सद्गुरूचीं ॥ ३३ ॥ बहुतेक विद्यांचे बहु गुरु आहेती । परीते तुळणे न येती सद्गुरूचे ॥ ३४ ॥ ज्याचीया प्रसादें पावलों हा बोधु । समूळ माया कंदू तोडीयेला ॥ ३५ ॥ निजानंद पदीं स्थापिलों सतत । केला जिवन्मुक्त क्षणामाजी ॥ ३६ ॥ काय उतराई होऊं कवण्या अर्थें । अर्पितां नाशिवंते जीवादिकें ॥ ३७ ॥ काया वाचा मनें करूनि कुर्वंडी । धरी ते न सोडी चरण याचे ॥ ३८ ॥ येणें काळे सर्व लाभाचिया कोटी । लाधलों या भेटी सिद्धाचिया ॥ ३९ ॥ सकळ विद्यासहित करुनी वोवाळणी । सांडीन वरूनि जीव प्राण ॥ ४० ॥ ह्मणती चांगदेव कृतकृत्य झालों । चरणि राहिलों मुक्ताईचे ॥ ४१ ॥ या संतचरित्र ओंव्या मुक्ताफळें माळा । मिरवि जो गळा आवडीनें ॥ ४२ ॥ पढे वाचे गाये आणीका परिसवी । लाभे तो पदवी हरिभक्तीची ॥ ४३ ॥ संतांचें चरित्र आवडी जो गाये । पढीयता तो हो विठोबासी ॥ ४४ ॥ आवडे श्रीहरी संत आचरिता । ह्मणउनी तिष्ठत हरीकथे ॥ ४५ ॥ नारद प्रल्हाद पुंडलिक नामा । प्रिय पुरुषोत्तमा जीवाहुनी ॥ ४६ ॥ गोरा परीसा आतां नरहरी सावता । कुर्मा आवडता पांडुरंगा ॥ ४७ ॥ निवृत्ती ज्ञानेश्वर सोपान मुक्ताई । चांगा मिराबाई भानुदास ॥ ४८ ॥ विसोबाखेचर जाल्हान कबीर । रोहिदास वछरा चोखामेळा ॥ ४९ ॥ जनार्दन एका विष्णुदास तुका । वैकुंठनायका आवडते ॥ ५० ॥ संतोबापवार हरिभक्त अपार । हे परम प्रितीकर विठोबाचे ॥ ५१ ॥ या सकळांचीं चरित्रें श्रवणें पठणें । मुक्त वाचारुणें झाला निळा ॥ ५२ ॥ नव्हे वाचस्पती मूढ वाचक मती । परि उदयो कर्ता स्फुर्ती ज्ञानेश्वर ॥ ५३ ॥ तिहींचा हा ग्रंथ पावविला सिद्धी । प्रवर्तवुनि बुद्धी स्फुर्ती दीली ॥ ५४ ॥ श्रोता वक्ता तूंचि आवडीच्या भारें । ग्रंथ प्रसादरें लीहवीला ॥ ५५ ॥ नेणतां प्रमेय कथेच्या अन्वया । नेणो केलें काय सामर्थ्य गुणें ॥ ५६ ॥ निळ्यालागीं शेष प्रसाद वोपिला । सद्गुरू वोळला तुकयास्वामी ॥ ५७ ॥ सत्य सत्य सत्य त्रिवाचा हें सत्य । वदविता यथार्थ तुकया [illegible] ॥ ५८ ॥ उदंड राहिलें कथीं कथितां कथनीं । वाढेल ह्मणउनी ग्रंथ थोर ॥ ५९ ॥ देवाचिया चित्ता आलें तें ची पुरे । राहिल्या विस्तारें काय काज ॥ ६० ॥ पुढतीं पुढतो संता हेचि विनवणी । वैमात्रें

श्रवणीं करूनी कृपा ॥ ६१ ॥ ऐकूनि हें संत तोषले सकळ । ह्मणती तूं प्रेमळ कळों आलें ॥ ६२ ॥ हरिप्रियाची कथा सप्रेमें वदलासी । झाला हा आह्मासी पाहुणेरु ॥ ६३ ॥ प्रसादिक वाणी आह्मारे रुचली । अष्टांगें निवाली श्रवणमात्रें ॥ ६४ ॥ निळा ह्मणे सुखें आनंदें निवाला । चरणासि लागला धांवोनियां ॥ ६५ ॥ इति श्रीचांगदेव चरीत्रे सिद्धदर्शनानुग्रह पूजाद्युपचार कथनंनाम पंचमं प्रकरणं । समाप्त

## आरती.

॥ १४७८ ॥ होतां कृपा तूझी पशू बोले वेद । निर्जीव चाले भिंती महिमा अगाध । भगवद्गीता टीका ज्ञानेश्वरि शुद्ध । करूनि भाविक लोकां केला निजबोध ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय ज्ञानसिंधू । नामस्मरणें तुमच्या तूटे भवबंधू ॥ २ ॥ चौदाशेंवरुषांचे तप्ती तिरवासी । येउनि चांगदेव लागति चरणासी । करुनि कृपा देवें अनुग्रहीलें त्यांसीं । देउनी आत्मज्ञान केलें सहवासी ॥ ३ ॥ समाधी समयीं सकळ समुदाय । घेउनी सुरवर आले श्रीपंढरिराय । द्वारीं अजान वृक्ष सुवर्ण पिंपळ असुमाय । जाणोनि महीमा नीळा चरणातळीं राहे ॥ ४ ॥

## गौळणी.

॥ १४७९ ॥ येकि येकटेंचि असोनि येकला । विश्वीं विश्वाकार होउनियां ठेला ॥ जयापरी वो तैसाचि गमला । नंदनंदन हा आचोज आंबुला वो ॥ १ ॥ ऐशा गौळणी त्या बोलति परस्परी । करुनि विस्मय आपुल्या अंतरीं ॥ विश्वलाघवीया हाचि चराचरीं । नेणो महिमा यासीं ह्मणो व्यभिचारी वो ॥ २ ॥ गिरि गोवर्धन येणें उचलिला । कालिया महासर्प नाथुनि आणिला ॥ जळत वणवा वो मुखेंचि प्राशीला । गिळीता आघासुर चोरुनि सांडीला वो ॥ ३ ॥ कपट्या मामळभटा दिल्हें पिंडे दान । शोषिली पूतना विषें पाजिताचि स्तन ॥ उखळिं बांधतां उप-

टिले विमळार्जुन । भक्षुनि मृत्तिका वदनीं दाविली भुवनें यो ॥ ४ ॥ आणिखीं येक येणें नवलावो केला । काला वांटितां वो विधाता ठकवीला ॥ भाग नेदितां तो वत्सें गोवळ घेउनि गेला । तैसिच आपण येथें होउनियां ठेला वो ॥ ५ ॥ इंद्र चंद्र महेंद्र याते चि पूजीती । श्रुति शास्त्रें ते ही यातें चि स्तविती ॥ माहासिद्ध मुनि ध्यानि आराधीती । नीळा ह्मणे तो हा जोडला सांगाती वो ॥ ६ ॥

॥ १४८० ॥ दिसे सगुण हा स्वरूप सुंदर । पारि व्यापुनियां ठेला चराचर ॥ देवदानवादि मानव असुर । याविण उरला ऐसा नाहीं तृणांकुर वो ॥ १ ॥ ऐशा गौळणी त्या अनुवाद करिती । ज्या ज्या रंगलिया याच्या अनुवृत्ती ॥ रजनि दिवो जयां याचि चि संगती । त्या त्या स्वानुभवें आपुल्या बोलति वो ॥ २ ॥ महि अंबु तेज मारुत गगन । जगा बीजरूप हाचि वो लपोन ॥ महद मायेचें हा अनादि कारण । देवत्रयासी हा मूळ अधीष्टान हो ॥ ३ ॥ येकानेक झाला आपुलाचि गुणी । उरला भरोनिया चाऱ्हि वाणि खाणी ॥ जया परि हा तैसाचि साजणी । रूपें गुणें क्रीया मंडीत भूपणीं वो ॥ ४ ॥ भुवनें चतुर्दश तींहि याच्या पोटीं । स्वर्गा येकविसाहि आदि हा सेवटी ॥ होण्या न होण्याच्या नेणोनिया गोटी । आपीं आपण चि येकट येकटी ॥ ५ ॥ ह्मणे निळा आम्ही नेणोनि आवळा । हासों रुसों यासी करुग दारोळा ॥ खेळता खेळ यासी भांडों वेळोवेळा । केले अपराध ते मागों या गोपाळा वो ॥ ६ ॥

॥ १४८१ ॥ वेणु वाजवित यमुनेच्या तटीं । उभा कान्हया सावळा जगजेठी ॥ भोवती गोधने वो गोवळाच्या थाटी । ऐकोनि गौळणी धावती उठाउठी वो ॥ १ ॥ ऐसा जनमनमोहन रंजवणा । गुणी गुणातीत नंदाचा पोसणा ॥ करुनि अकर्ता हा सृष्टयादि रचना । विश्वीं विश्वातीत अलक्ष देखणा वो ॥ २ ॥ बैसोनि विमानि याच्या पाहों येति खेळा । देव सकळ हि मिळोनिया पाळा ॥ वोघ कुंठित या यमुनेच्या जळा । वरुषे ब्रह्मानंद नरनारीबाळा वो ॥ ३ ॥ जळचर भूचर खेचर वनचर । लुब्ध होउनिया वेणुचिया स्वरें ॥ राहिली तटस्थ चि मानसें शरीरें । नेणती वैरभाव येकत्र परस्परें वो ॥ ४ ॥ पवन निश्चळ चि होउनियां ठेला । सूर्य अस्तमाना जाऊं विसरला ॥ वछे न पिती पेहभाव गेला । मुखींचा कवळ गाईमुखीं ची राहीला वो ॥ ५ ॥ ऐसा स्वानंदाचा आला माहापूर ।

कृष्ण वेणुध्वनि लोधले आंतर ॥ नेत्रिं गळताति प्रेमाचे पाझर । नीळा ह्मणे देहीं देहा अनादर वो ॥ ६ ॥

॥ १४८२ ॥ शुकादिकाचीये हृदईचें ध्यान । आम्हा जोडलें वो न करितां साधन ॥ सहजचि पाचारितां येतसे धावोन । प्रेमें आलिंगीतां निवे तनु मन वो ॥ १ ॥ ऐशा गौळणी आनंद भरिता । दृष्टी अवलोकुनि मदनाचिया ताता ॥ ह्मणति धन्य भाग्य आमुचें वो आतां । लाधलों जन्म झालि कृत्याची कृत्यता वो ॥ २ ॥ नित्य हरिचिया समागमें बाई । नाहिं देखीलें तें सुख भोगूं देहीं ॥ प्रालब्ध संचित वो क्रियमाण तें ही । गेलें हारपोनियां ठाईचें ठाई वो ॥ ३ ॥ येतां जातां नेणो काळाचा आडदरा । देखतां सन्मुख तो पळतुसे माघारा ॥ रंग श्रीरंगाचा उमटला शरीरा । तेणें वाताहात जन्मदुःख जरा वो ॥ ४ ॥ हरिचे सन्निधीं वो सहवासे वर्ततां । यासि बोलतां चालतां कृष्ण खेळतां ॥ आंगीं ऐश्वर्याची दृढावली सत्ता । तेणें आजरामर झालों सों निभ्रांता वो ॥ ५ ॥ ऐशा कृष्णरूपी रूपसा बाळा । होउनि स्तविती पूजिती वेळोवेळां ॥ कडिये खांदिये घेउनी घननीळा । नीळया स्वामितें आवलोकीती डोळां वो ॥ ६ ॥

॥ १४८३ ॥ येकले नकंठाचे म्हणोनियां येणें । केलीं निर्माण वो चौदाहि भुवनें ॥ गगन चंद्र सूर्य मेघ तारांगणे । पाच हि माहा भूतें भौतिकेभिन्न भिन्ने वो ॥ १ ॥ ऐसा लाघवीया माया सूत्रधारी । येकला येकटाचि झाला नानाकारी ॥ स्थूळ सूक्ष्म जीव जीवाचे अंतरी । तो हा नंद नंदन सये बाळ ब्रह्मचारी वो ॥ २ ॥ याचिये नाभिकमळीं जन्म चतुरानना । याचिया निजप्रभा प्रकाश रवि किरणा ॥ याचिया माहातेजें तेज हुताशना । येणेचि पढउनी वेद केला शाहाणा वो ॥ ३ ॥ याचिया द्रावपणें समुद्रासी जळ । याचिया चपळपणें पवन हा चंचळ ॥ याचिया अवकाशें आकाश पघळ । याचिया धृतिबळें अवनि हि अढळ वो ॥ ४ ॥ येणेंची मेरुस्तंभ अचळ धरियेला । दिशादिग्पाळासी येणेंचि ठाव दिधला ॥ विधिविधा नाचा शास्त्रा बोधकेला । येणेंचि सुरपति स्वर्गीं बैसविला वो ॥ ५ ॥ भोगुनि अंगना हा बाळब्रह्मचारी । येकला जेथें तेथें सोळासहस्रा घरीं ॥ आम्हा तुम्हां भोगुनि अलिप्त मुरारी । नीळा म्हणे ऐशा विवादति नारी वो ॥ ६ ॥

॥ १४८४ ॥ कांहिंच नहोनिया कांहीं येक होना । नामारूपातीत आपण

नेणता ॥ होण्यानहोण्याच्या नेणोनिया वार्ता । त्याचा संकल्पचि झाला त्या प्रसवता वो ॥ १ ॥ ऐशा परि हा मुर्तिमंत झाला । विश्वि विश्वाकार होउनियां ठेला ॥ भाग्यें आमुचिया मूर्ती मुसावला । गाऊं वानूं ऐसा आह्मासी फावला वो ॥ २ ॥ नव्हे ते पुरुष ना नारीपण जेथें । शून्या निशून्याहि पैलाडी परतें ॥ नाकळे नाद बिंदु कळा ना ज्योति तें । परा पश्यंतीचा प्रवेश नाहिं जेथें वो ॥ ३ ॥ गुणलावण्याची उघडली खाणी । मंडित चतुर्भुज मुगुट माळा मणी । मुख मनोहर कुंडलें श्रवणीं । श्रीवत्सलांछन हृदयीं साजणी वो ॥ ४ ॥ घ्यागे उचलुनि जाऊं निजघरा । आजि फावला तो पाहों यदुवीरा ॥ खेळों आदरें या खेळवूं सुंदरा । याच्यासंगें नाहिं सुखा पारावारा वो ॥ ५ ॥ नीळा ह्मणे ऐशा संवादति सुंदरी । करिती क्रीडा सवें घेऊनि मुरारी ॥ सुखीं सुखरूप झाल्या कल्पवरी । पुन्हा न येती त्या फिरोनि संसारीं वो ॥ ६ ॥

॥ १४८५ ॥ नित्यानंदा पुढें आनंद तो कोण । विषयसुख बाई बापुडें तें क्षीण ॥ जेथें न सरे ची वैकुंठसदन । शेषशायी वो त्रिकुटभुवन वो ॥ १ ॥ ने घों ह्मणोनियां सागिती परौते । घेऊं संगसुख हरिच्या सांगातें ॥ गाऊं वानूं रूप पाहोनि निरुतें । हांसों खेळों ठायीं जेववूं सांगातें वो ॥ २ ॥ नेघों समाधीचें सुख तुच्छ वाटे । नित्यानित्याचिये न पडों खटपटे ॥ काय करूं ते तपाचे बोभाटे । येका हरिविण अवघी ते फलकटे वो ॥ ३ ॥ काय जाउनियां करूं निजधामा । तेथें मी नातुडे नाढळे विश्रामा ॥ येथें सांडूनियां तमालमेघःशामा । नेघों नाईका आणिका दुर्गमा वो ॥ ४ ॥ स्वर्गभोग ते हीन लागति असार । क्षणें होती जाती क्षणेंचि नेश्वर ॥ येथें हरिसंगें क्रीडों निरंतर । सर्वही सुखाचें हा जोडला आगर वो ॥ ५ ॥ नीळा ह्मणे नित्य निःसीमस्वानुभवें । ऐशा गोपिका त्या रंगल्या हरिसवें ॥ अधिकाधिक हें प्रेम त्यांचें नवें । जाणोनि आवडी ते पुरविली देवें वो ॥ ६ ॥

॥ १४८६ ॥ यासि पाहतां वो हृदयस्थ पाहीला । यासी बोलतां वो वेदुची घोकला ॥ यासीं खेळतां कुसंगदोष गेला । यासि भोगितां हा प्रत्यवाय गळाला वो ॥ १ ॥ ऐसा निजानंद परमात्मा श्रीहरी । आह्मी लाधलों वो भाग्याच्या संसारी ॥ नित्य आळंगूं या हृदयाच्या आंतरीं । ऐशा निज[illegible]थें निवाल्या सुंदरी वो ॥ २ ॥ यासी विचरतां परमार्थ हातीं लागे । यासि विवरीतां ये सिद्धांत वोळंगे ॥ यासि विनटतां समाधी पाया लागे । यासि विनवितां हाचि बरि आगें वो ॥ ३ ॥ यासि करूं जातां

सहज ची गोटी । स्वार्थ परमार्थ पुरुषार्थ लागे पाठी ॥ यासी जीवीं ध्यातां यासिचि पडे मीठी। यासि गीनीं गातां ब्रह्मांड पडे पोटीं वो ॥ ४ ॥ यासि करुनि पुढें विचरों जनि वनीं। यासि घेउनि संगें बैसो वो भोजनीं॥ यासि निजउनी निजों निजशयनी । याचे संग सुख घेऊं अनुदिनी वो ॥ ५ ॥ नीळा ह्मणे निजाश्रमि चि कसळा। ऐशा आरजा गौळणी त्या बाळा ॥ ध्यानिं मनिं जीवीं ध्यातां या गोपाळा । गेल्या विसरोनियां संसार सोहळा वो ॥ ६ ॥

॥ १४८७ ॥ ऐकिं ऐकपणाचा घेउनियां त्रास । जाला नानाकार स्वरूपें बहुवस ॥ ह्मणोनि दुसरेंचि नाढळे वो यास । जयातयामाजी याचा चि रहिवास वो ॥ १ ॥ ऐसे निजात्मया जाणोनि गोविंदा । जीवें अनुसरल्या सकळाही प्रमदा ॥ करिती सेवावृत्ति निशिदिनीं सदा । हसती रुसती करिती विनोदा वो ॥ २ ॥ सर्वसाक्षी सर्वही जाणता। सर्व करुनियां ह्मणवि अकर्त्ता ॥ जीवीं जीवाचा हा आप्त चि सर्वथा । जेथें तेथें याची नित्य ऐक्यात्मता वो ॥ ३ ॥ नित्य अंगसंगें भोग त्यासि देति । दृष्टी अवलोकुनि गुण त्याचे गाती ॥ नेउनि ऐकांति वो निजगुज बोलती। करिती काम धाम परि त्याचि पासी वृत्ती वो ॥ ४ ॥ सासु सासुरिया भ्रताराशी चोरी। नणंदा जावा त्याही सजूनियां घरीं ॥ देती आलिंगन निजात्मया हरी। येथुनि ह्मणाति संसारा बोहरी वो ॥ ५ ॥ ऐशा निळा ह्मणे झाल्या हरिरता। त्या त्या विराजाति मुक्तिचीया माथा ॥ नानासाधनाच्या लाजउनि चळथा। जाल्या असोनि संसारि नित्यमुक्ता वो ॥ ६ ॥

॥ १४८८ ॥ याच्या संगसुखें गर्भवास घेतां । येत जात गे कल्पाच्या चळथा ॥ नेघो भुक्ती मुक्ती देता सायुज्यता। ऐशा गौळणी त्या सुखानंद भरिता वो ॥ १ ॥ धन्य प्रेमळा त्या रंगल्या श्रीरंगीं। नेणाति दुसरें वो संसारीं विरागी ॥ हरिचीं भूषणें त्या लेउनि निजांगीं। सुखी सुखरूप भोगी नित्य त्यागी वो ॥ २ ॥ याच्या सहवासें भोगितां निजभोग । भोगी भोगातीता सर्वदा निःसंग ॥ नयेनिदृश्यावरी देखतीही जग। ऐशा विचरति होउनि आंनग वो ॥ ३ ॥ नित्य जानवनि हरिते देखती। हरिची होउनियां हरिते भजती ॥ हरिरूप जाली त्यांचि अगकांती। हरिची ध्यानीं गुसावला मनिं चित्ती वो ॥ ४ ॥ येती जाती त्या हरीच्या सांगातें वसाति । नित्यकाळ हरि वसे जेथें ॥ करिती भोजन त्या जेववीतां हरीनें। हरिविण त्या नघेती

जीवनातें वो ॥ ४ ॥ निळा ह्मणे तया हरिच सांगाती । त्या हि वर्तताति हरिच्या अनुवृत्ती ॥ नाहीं उरविली दोनिपणे खंती । वर्तति एकएकीं निजात्मता युक्ती वो ॥ ५ ॥

॥ १४८९ ॥ मी मज माझें याची केली वो निरस । वीण आपणा येणें आणियेला त्रास ॥ नेदी आड येऊं दुजियाचा आभास । कैसें काय करूं सांगा मज यास वो ॥ १ ॥ ऐसें जाजावोनि बोले एकी नारी । हरिचा सुखानंद भरुनी अंतरीं ॥ लटिकाचि वालभाचा भाव लोकाचारी । दाउनि एकांती हरिसी काम सारि वो ॥ २ ॥ ह्मणे वृत्ती माझी नुरे देहावरी ॥ क्षण हि न कंठे वो सासुरामाहेरीं ॥ काय करूं मी वो नगमे घरदारीं । नेऊनी घाला जेथें अनंग मुरारी वो ॥ ३ ॥ यावरी गेलें आतां माझें माणुसपण । करितां उपचार ते हरिती माझे प्राण ॥ गेले होऊनियां होते ते निर्माण । सोडा आस माझी द्या वो मोकलुन वो ॥ ४ ॥ ऐसि देहगेहीं होऊनि उदास । गेले तुटोनियां अवघे आशापाश ॥ निद्रा जागृति ना स्वप्नाचा आभास । एक लागला त्या हरिचा निजध्यास वो ॥ ५ ॥ निळा ह्मणे नेणे आपपर दुसरें ॥ भरली निजानंदीं न पाहे माघारें ॥ कैचें येईल तेथें अविद्येचें वारें ॥ झाले हृदयीं स्वानुभव चेईरे वो ॥ ६ ॥

॥ १४९० ॥ नव्हतें एक ना दुसरें कांहीं यासीं होता । लपोनियां आपुलीये कुसी । कांहीं चि नोळखोनि आप आपणासीं । तोचि येउनि येथें झाला आविनाशी वो ॥ १ ॥ रूप धरिलें सगुण चांगलें । वाण माण जेथील तेथेंची रेखीलें ॥ चतुर्भुज शंखचक्रातें मिरवलें । मुगुट माळा श्रवणी सुतेज कुंडलें वो ॥ २ ॥ नव्हता गांव सीव पहिले यासि कांहीं । नामरूपासि तो आधी चि ठावानाहीं ॥ ह्मणति वैकुंठ ते कालिची झाले वाई । क्षीरसागर ना कैचि शेषशाई वो ॥ ३ ॥ नव्हता काळा गोरा खुजा ना ठेंगणा । स्वरूपसुंदर ना आंधळा देखणा ॥ कैचि जीव शिव तयासी भावना । पंचभौतिक ना नेणे पंचप्राणा वो ॥ ४ ॥ नव्हता मन बुद्धि इंद्रियांचा मेळा । कार्य कर्तृत्व हा करणावेगळा ॥ येणें जाणें यासि नव्हतें कवण्या काळा । तोचि आला या नंदाच्या राउळा वो ॥ ५ ॥ यासि जीवें भावें धरा घाला मिठ्या । ऐशा बोलती गौळणी गोरट्या ॥ निळा ह्मणे अवघ्या मिळोनि लहाना मोठ्या । यासि चुकाति त्या अभाग्या करंट्या वो ॥ ६ ॥

## खेळ मुलांचे.

॥ १४९१ ॥ आंगा आणुनि वारें पोरा घालिसि हमामा । निघोनियां जाईल पुढें पडसि येउनि दमा ॥ १ ॥ घुमे एक्याभावें । हा गोपाळ घेउनि सर्वे ॥ २ ॥ तोंडा येतो फेंस पुटिला नाचसिल वारे । पडतां निसतोश मग हांसतिल पोरें ॥ ३ ॥ निळा ह्मणें सकळ ही सोडुनियां तमा । एका हरि-विण तया नांव हमामा ॥ ४ ॥

॥ १४९२ ॥ धरुनि हातिं हात पोरा धरिसी चिकाटी । नसुटेसि मग बळिया सांपडतां मुष्टी ॥ १ ॥ धरिसी तरी धरि एक हरि चित्तीं मनीं । नाहितरि अहंकार गोविल व्यसनीं ॥ २ ॥ सोडवितां न सुटे त्या नाडिवो अभीमाना । वायां व्यर्थ कुंथोनियां पडसिल पतना ॥ ३ ॥ निळा म्हणे अंतरिचें जाणे हरि सर्व । तया हातीं हात देतां देईल तो वैभव ॥ ४ ॥

॥ १४९३ ॥ तारुण्याच्या बळें घेऊं धांवसिल झोंबी । पडलिया तळीं हासों लागतिल उभी ॥ १ ॥ घेसी तरी घेई हरिसवें घालि मिठी । नेदी पडों तोचि वंद्य करिल येसृष्टी ॥ २ ॥ एकाहुनि बळि येक नये तुझ्या ध्याना । कुंथोनियां येसी तळा होईल तनाना ॥ ३ ॥ निळा ह्मणे झोंबि लोंबि घेई काळासवें । श्रीहरिच्या बळें मग वाटसिल नांवें ॥ ४ ॥

॥ १४९४ ॥ ह्मैस वेलि देता सेलि होसि कासाविस । येईल पुढें थेटे पडसे आयुष्याचा नाश ॥ १ बुड हरि सवें । देह भाव उरनिभावें ॥ २ ॥ दरडिवरी राहोनि उभा मारिसी कीराणे । तळिचा धोंडा नेणोनि पारो जाशिल जिवें प्राणें ॥ ३ ॥ ह्मणे निळा सांडुनि खेळा श्रीहरितें भज । आक्षोभ जळ नचले वळ होशिल निर्बुज ॥ ४ ॥

॥ १४९५ ॥ सुरकाडि बैसोनि खोडि चढसि झाडावरी । मोडलिया डाहाळी खांदि पडशील आघोरीं ॥ १ ॥ वेंघ ऐशावरी घेउनि सवें हरि ॥ २ ॥ जगडवाळ झाड वरि खांद्याहि वांकुड्या । उलंडल्या वरुनि हात सोडतिल मांड्या ॥ ३ ॥ निळा ह्मणे श्रीहरि तें दीष्टि धरुनियां । वेंघेवरि जाई दुरि न पवसि अपाया ॥ ४ ॥

॥ १४९६ ॥ चढोनियां झाडा पोरा खेळसि सुरकाडी । निसरता हात पाय माझा होईल मोडी ॥ १ ॥ धरुनी हरि चित्तिसी खेळे वरिझाडा । अभिमानें जासि तरी होईल चुराहाडा ॥ २ ॥ दिसति त्या खांद्या पोरा मोठ्यापरि ठीसरी । मोडती आंगभारें याचा विश्वास नधरीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे सांगितलें धरि चित्तें मनें । मग तूं चढेवरी सुखें हिंडे खांद्या पानें ॥ ४ ॥

॥ १४९७ ॥ समान निट दोहि आंगे पोरा खेळे मुरदांगे । नाहींतरी जासि वायां चुकाविता आंगे ॥ १ ॥ खेळ सख्या खेळा । लक्षुनि हरि-डोळा ॥ २ ॥ सांडुनि मर्यादा जरि घालिसी पाउलें । तरी होसि फजित पोरा मारितील मुलें ॥ ३ ॥ निळा ह्मणे चिप चरणें धरुनियां निग । न पडसी कोडियांत ध्याता हा श्रीरंग ॥ ४ ॥

॥ १४९८ ॥ खेळे हेटि मेटी नाचे एकाचि पायावरी । धावोनियां सिव आतां आत्मया श्रीहरि ॥ १ ॥ तरिच खेळ बरोरे । नाहितरि चेरा ॥ २ ॥ धावति तो पोरें पळता धारि वेगावत । सारुनिया मागें गिती गाई भग-वंत ॥ ३ ॥ निळा म्हणें चपळपणे करि कार्य सिद्धी । नाहितरी पोधा होतां नपवसी कधीं ॥ ४ ॥

॥ १४९९ ॥ घालितां उमाणी पोरा नुमजति तुज । उकलुनियां हरि घेई हृदईचें निज ॥ १ ॥ असोनियां चराचरी नदिसे तें काय । नाहीं जया कान डोळे मुख हात पाय ॥ २ ॥ एकना अनेक नव्हे नव्हेची कांहीं बाहीं नसोनियां तेचि वसे अखंड देहादेहीं ॥ ३ ॥ निळा म्हणे सांग माझे ऐके हे उमाणे । नेणवेत रिपुस सुखें हरिचीं हीं लक्षणें ॥ ४ ॥

॥ १५०० ॥ खेळो कोलकाटि पुढें धावसील वेगें । वारुनि वरिच्यावरि राखों नेणसि तूं आंगें ॥ १ ॥ आतां खेळ कोलकाटि । रे गोपाळ धरुनि दिष्टी ॥ २ ॥ राखों जाता गडि दांडे सिवताति आंग । नावरति तुज तरी वाउगेचि सोंग ॥ ३ ॥ निळा म्हणे वस्ताद करि नंदाचा नंदन । तोचि देईल विद्या तुज करिल प्रवीण ॥ ४ ॥

॥ १५०१ ॥ वाटुनियां गडि चेंडु मांडियलि फळी । मेलासि धांवतां कान्हो नाटोपेचि बळी ॥ १ ॥ येईल चेंडु हातारे । हरिसी शरण जातां ॥ २ ॥ पाडिल्या लगोऱ्या जेगें तेणेचि नेला डावो । वाउगिची सीणति येरे धावतां

गेले पावो ॥ ३ ॥ म्हणे निळा शरण गोपाळा जाई करितातडी । तरिच चेंडु येईल हातापांगविसी गडी ॥ ४ ॥

॥ १५०२ ॥ करितां हुसि हातां नये चेंडु गमाविला । धरुनि कानि पाठिवरी बैसविती मुला ॥ १ ॥ म्हणति म्हणे कीर । नाहींतरी घेई फेरे ॥ २ ॥ आधिके आधिक वरिसाऱ्या घेउं येती । गमावितां चेंडु हाल अवघेचि पहाती ॥ ३ ॥ निळा म्हणे म्हणोनियां लावि लक्षडोळा । देईल हातिं चेंडु हरि कृपेचा कोवळा ॥ ४ ॥

॥ १५०३ ॥ पाडुनि लगोऱ्या चेंडुवाच्या एका घायें । सुखि खेळे खेळ साहे करुनि हरिचे पायें ॥ १ ॥ खेळे ऐसा खेळ । मनीं धरुनि घननीळ ॥ २ ॥ उडोनिया जातां चेंडु नसांभाळे हुसी । धांवतांचि मरति पोरें होती कासाविसी ॥ ३ ॥ निळा म्हणे झेलुनियां घेई वरिच्यावरी । एकविध भावें शरणजाउनियां हरी ॥ ४ ॥

॥ १५०४ ॥ लगोरिया मांडुनि पोरा वाटिसिल गडी । निर्बळाच्या संगें डाव देतां येसि रडी ॥ १ ॥ नकरि ऐसें आतां । करि गडी श्रीअनंता ॥ २ ॥ मारितांचि लगोऱ्या आधीं येतो हाताडाव । चुकलिया व्याहाण वाटी हांसतात सर्व ॥ ३ ॥ निळा म्हणे वायाविण नको पावो खेदा । याचि लागि न विसंबे श्रीहरि गोविंदा ॥ ४ ॥

॥ १५०५ ॥ विटी दांडु भलारे तरिच मारि टोला । नाहिं तरि डाव घेतां धांवडिती मुला ॥ १ ॥ सावधान पाहेरे हरिची चित्तीं ध्याये । न राहोनि निंदसुरा खेळाच्या प्रवाहें ॥ २ ॥ हाणे नीट दांडु रे नाहींतरी नाडु । वाउगाचि टोला होतां पावसिल दंडु ॥ ३ ॥ निळा म्हणे हरिमुखें हाणतां चिसुनेति । नचुकें जो त्वरा करितोचि पावे कीर्ती ॥ ४ ॥

॥ १५०६ ॥ जाईजण्या बळें पोरा घालिसी हुंबरी । विचकिसी दांत पुढें पडसिल फेरी ॥ १ ॥ पाहे हरिकडे । मग हुंबरि घालिकोंडें ॥ २ ॥ उडसिल बळें ज्याच्या वोळखेतो आधीं । नाहींतरि वायांजासि नपडे उपाधी ॥ ३ ॥ निळा म्हणे सांगितलें हीत धरिं पोटी । निजभावें शरण रिघे कान्हो जगजेठी ॥ ४ ॥

॥ १५०७ ॥ धरूनियां स्त्रास पोटि सिवो पाहासी हाल । नपवसि

स्थळ भोंवता गडियांचा मेळ ॥ १ ॥ हुतुतु हुतुतु किति करिसी वेळोवेळां । होउनियां नम्रभजे घननिळ सांवळा ॥ २ ॥ धावतां अविचारें पोरें धरितील टांगे । नचलतां बळ मागें पडसिल उगे ॥ ३ ॥ निळा म्हणे सांडुनियां हुतुतुचा बार । आठवि हा ध्यानीं मनीं नंदाचा कुमर ॥ ४ ॥

॥ १५०८ ॥ फिराविसी मान तरी पिंग्याचें महिमान । नाहिंतरि सरे परति जाई वो येथुन ॥ १ ॥ धरि हरि चित्तिं गे पिंग्याच्या निगुती । नाहिंतरि वाया जासी भोवंडिचे भ्रांती ॥ २ ॥ मोडिसिल माजगे तरिच पिंगा साजे । लाटण्याऐसी नलवता फजीतिचें भोज ॥ ३ ॥ निळा म्हणे सांगितलें धरि हित कानीं । तरिच पिंगा गोड तुझा श्रीहरि चिंतनीं ॥ ४ ॥

॥ १५०९ ॥ पिंगा ह्मणिजे पिलंगोनि भीरभीरिऱ्याचे परी । फिराविसी माजमान तरि तुझी थोरी ॥ १ ॥ चित्त हरिवरि गे ठेउनि दे भोंवरी । नाहिंतरि सर परति येथूनि जाई दुरी ॥ २ ॥ वाउगाचि ताटा गे नाहिं वळवटा । येथें नाहिं काम तुझें जाई आल्या वाटा ॥ ३ ॥ निळा ह्मणे निजानंदें कापवि शरीर । धरुनियां निजमनीं रुक्मिणीचा वर ॥ ४ ॥

॥ १५१० ॥ तरिच पिंग्या गोडिगे लवोनि आंग मोडी । नाहिंतरि परति सर ह्मणति जा धांगडी ॥ १ ॥ फिराविसी मान जरि हरि तें लक्षून । तरिच खेळ रुचेल तुझा मानवति जन ॥ २ ॥ राहे उभी नीट गे होउनियां धीट । नाहिंतरि झोंके खातां ह्मणति फटफट ॥ ३ ॥ निळा ह्मणे श्रीहरि गे आठवि आंतरी । तरिच पिंगा मानेल जगा धन्य ह्मणति नारी ॥ ४ ॥

॥ १५११ ॥ फुंकिसि जगागडि गे तरि घालि फुगडी । नाहिं तरीनको करुं फजिति रोकडी ॥ १ ॥ मोडी आंग बाई गे नाचण्याचे सोई ॥ आठवुनि श्रीहरीचा निजानंद देहीं ॥ २ ॥ या नांव फुगडि गे बंधनातें तोडी । नाहिंतरि कापउनि काय टिऱ्या मांडी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जोडी गे देवा सवें गडी । आठवुनि ध्यानिं मनिं रूप घडिघडि ॥ ४ ॥

॥ १५१२ ॥ तरिच बरवंटा गे लईलई लकोटा । फीरोनियां न वजसी यमपंथे वाटा ॥ १ ॥ लकोट्याच्या भारें गे नव्ह जाये चाचरि । धरुनियां तारा निज वृत्ति हे सावरी ॥ २ ॥ हरिचिया छंदे गे डोल ब्रह्मानंदें । घालु-

नियां पायां तळीं इंद्र चंद्रपदे ॥ ३ ॥ निळा ह्मणे खेळि गे जोडि वनमाळी । नाहिंतरि माया मोहें पडशिल जाळीं ॥ ४ ॥

॥ १५१३ ॥ कपाळ झेंटि मिसे बोट लावितेसी लल्लाटीं । तेंचि नमन अर्पी बाई कान्हो जगजेठी ॥ १ ॥ सहजाचिया खेळा गे जोडि घननीळा नलगे कांहिं घेणें देणें परि हा तो जवळा ॥ २ ॥ नमन हेंचि निज गे परमार्थाचें विज । सहज भावें नमुं जातां जोडे अधोक्षज ॥ ३ ॥ निळा ह्मणे आतां गे वर्म आलें हातां ॥ श्रीहरिच्या संग सुखें गाउं गुण कथा ॥ ४ ॥

॥ १५१४ ॥ झेंटि मेटि बाई गे लवे हरिच्या पाईं । नमन नमृता हेचि परमार्थाचि सोई ॥ १ ॥ निडळासी बोट लावितेसि वेळोवेळां । नमनाचि होतें सहज खेळतां या खेळा ॥ २ ॥ उत्तम हा खेळ गे खेळतां निर्मळ । नमनि नमितां हातां येतो हा गोपाळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे जग तुज करिल कृपा मग । येउनिया वास करितां हृदईं श्रीरंग ॥ ४ ॥

॥ १५१५ ॥ टिपरियाचे घाई गे नाच सुखें बाई । गिती गाउनियां हरिचें संग सुखें घेईं ॥ १ ॥ नाचोनियां फेरि गे गुण साचे उच्चारी । जेणें काग बग रिठा मर्दियले वैरी ॥ २ ॥ ऐसें गाई गाणें गे हरि जोडे जेणें । येर येउंनेदी वाचे लटकी ते वा याणे ॥ ३ ॥ निळा ह्मणे नामें गे तोडि मरण जन्में । ऐसा हरिगित गातां हरतील कर्मे ॥ ४ ॥

॥ १५१६ ॥ खेळे खेळ झेंपा गे आठवि । चि द्रुपा नाहितरि पुनःपुन्हा न चुकति खेपा ॥ १ ॥ घेईं बारवोटि गे काढि सागरगोटी । जेणें अर्थ स्वार्थ परमार्थ पडे पोटीं ॥ २ ॥ वरवि घालि झेंप गे लांबउनि हात । नाहिंतरी लाजोनियां आयुष्या करिसि घात ॥ ३ ॥ निळा ह्मणे डोले गे हरिचिया तोले । जेणें इहपरलोकीं विकासिल मोले ॥ ४ ॥

॥ १५१७ ॥ पेहरंब्याचे सोई गे सारविसि भुईं । परि येथें तेथें असे अवघाचि हरि पाही ॥ १ ॥ कांपवितां हात जरि सावधान चित्त । तरिच होईल मान न पवता घात पात ॥ २ ॥ नाचविसि पाय गे घोळ सुनि भोय । परि नग्न दाखवितां जगिं हांसें होय ॥ ३ ॥ निळा ह्मणे बरा गे विचार करि धीरा । आठवुनि हृदयांत राहे सार्ङ्गधरा ॥ ४ ॥

॥ १५१८ ॥ आहाडे पाहाडे गे वावुगेचि झगडे । नको करूं बाई आतां पाहे मागें पुढें ॥ १ ॥ सावळा श्रीरंग गे व्यापुनि आसे जग । सासि नव्हे

क्षत ऐसे बोल बोले चांग ॥ २ ॥ वेड्यावाकुड्या गोष्टिगे नको काढु वोटी। ध्यानि मनीं गीती गाई कान्होजगजेठी ॥ २ ॥ निळाह्मणे निंदास्तुति ज-यासि समान । त्याचि सवें बोल उणे करिल बहुमान ॥ ४ ॥

॥ १५१९ ॥ पुन्हा पेहरंब्याच्या सुखें गे गाई हरि मुखें । वाजउनि टाळि रंगि नाचोनि हरिखे ॥ १ ॥ देईल तोचि पाने गे गौरउनि माने । खोबरियाच्या वाट्या माळा गळाचि सुमने ॥ २ ॥ उदार हा दानि गेलो कि त्रिभुवनीं । तोचि धर्याइ चीत्ति आतां करिल सुखाधणी ॥ २ ॥ निळा ह्मणे सर्व खेळिखेळा साक्ष भुत । तोचि जनि वनि सये नांदे हृदयांत ॥ ३ ॥

॥ १५२० ॥ खेळों पंडखडेगे बैसोनि निवाडे । आधीं उचलि येकमग दोनि घेई पुढें ॥ १ ॥ सावधान चालिगे नेमाचेचि झेली । दोनी तीन पाच सात सांडि येक उचली ॥ २ ॥ नेंदिला गोढका दुसरि यासि झोका । हळुचि घेई उचलुनियां तरिच खेळ निका ॥ ३ ॥ निळा ह्मणे हरिगे साक्ष निरंतरी । तोचि जाणे सर्व आहे तुज मजही माझारी ॥ ४ ॥

॥ १५२१ ॥ चाल ह्मणसि बाईगे खेळों लपंडाई । जेथेंतेथें साक्ष कान्हा लपो कोणे ठाई ॥ १ ॥ झाकुनिया डोळागे लपविली चपळा । लपों जाति । जेथें तेथें कलकलिति बाळा ॥ २ ॥ पडसाई नसेगे अवघाचॅ प्रकाशे सर्वठाई व्यापुनि आत्म वनमाळिवसे ॥ ३ ॥ निळा ह्मणे खेळगे अवघाचि होपळ । जेथें तेथें साक्ष पणे वर्त्ते हा गोपाळ ॥ ४ ॥

॥ १५२२ ॥ ह्मणसि कडव सांगे मायचिया बैसा । मायाचि नाहिं मिथ्यापणे निजबोध प्रकाशा ॥ १ ॥ लपों कोणिकडेगे सांगबाई निवाडे । अविद्याहि ह्मणसी तरिते न दिसे निवाडे ॥ २ ॥ कैचे भिहे माझेगे झाको ळिले तेजे । अवघी आत्मराजे माझ्या उजाळे निजे ॥ ३ ॥ निळा ह्मणे नुरेगे लपणेचि वोसरे । याचिया प्रकाशें उजळले दरे खोरे ॥ ४ ॥

॥ १५२३ ॥ सरलिया खेळागे ह्मणति आवघ्या बाळा । आरते आरति करु नंदाच्या गोवळ ॥ १ ॥ हाचि जीव प्राणगे सोयरा सज्जन । वोवाळि तां यासि टाई निवेतनु मन ॥ २ ॥ करुनियां आरति पंचप्राण जोंती । मिळोनिया सकळा बाळाश्री मुख पाहाती ॥ ३ ॥ निळा ह्मणे वेळगे धन्य पर्व काळ । साधला हा आजि येथें आळवुं गोपाळ ॥ ४ ॥

॥ १५२४ ॥ देव प्रगटचि लपाला । आड आपण बैसला ॥ १ ॥ काय नवल मांगों कैसे । झाकिला प्रकाशें ॥ २ ॥ निज ज्वाळे वैश्वानर । लहऱ्या लोपिला सागर ॥ ३ ॥ निळा ह्मणे धुळी । आड ठेलि मही तळीं ॥ ४ ॥

॥ १५२५ ॥ पाहों जातां हा नदिसे । झांकोळिला विश्वाभासें ॥ १ ॥ आतां पाहों कोणि कडे । आड आपणां हा दडे ॥ २ डाहाळि आड आंबा । असोनि नदिसेचि उभा ॥ ३ ॥ साखर दिसेखडा । गोडि पाहों कोणिकडा ॥ ४ ॥ निळा ह्मणे सोनें । नदिसे झाकिलें भूषणें ॥ ५ ॥

॥ १५२६ ॥ हातिं घेतला चिताक । दिठी नदिसेजी कनक ॥ १ ॥ तैसा देव पाहों जातां । विश्वाभासुचि दोरा माजील पाला आंवरा ॥२॥ नदिसेची दोरा । माजील पाला आंवरा ॥ ३ ॥ निळा ह्मणे गारा ठेल्या लपउनियां नीरा ॥ ४ ॥

॥ १५२७ ॥ येकायेक पण । नसंपडे दुजे नाविण ॥ १ ॥ ह्मणोनिया भक्त केला । आधी मग देव जाला ॥ २ ॥ फुला आधी फळ । नव्हेचि मुळे विणडाळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे लेंक । होता बापपणां बिक ॥ ४ ॥

---

## विराहिणी

॥ १५२८ ॥ खेळिं खेळता वो विकळ सुंदरा । जालि आठवितां नंदाच्या कुमारा । स्वेद कंपखेद हाटला शरिरा । जाला विरह तो नेणती ईतरवो ॥ १ ॥ धरा आवरुनी ह्मणति वोसाजणी । धिर नधरत पडीलि धरणी । येकी सांगति वोजालि झडपणी । वेगि आणा आतां पंचाक्षरी गुणीवो ॥ २ ॥ जातो प्राण वो येताति लहरे । येकी ह्मणतिवो डंखिली विरवारे । आंग तापलें वो येतु आसे शियारे । येकी ह्मणति वो मोडसि येचाभरें वो ॥ ३ ॥ येकि ह्मणति गे लागलें दैवत । कुळिचें दारुण वो नेदि करुनि मान । घाला गोंधळ वो विनवा समस्त । ठेवा आण भाक करूनि येक चित्त वो ॥ ३ ॥ ऐसा मिळाला वो भोवताला पाळा । होति तुकुर येकी रडताती बाळा । पाजा वो खेदें वो वांचवा ल्हाळा । नका उसिर गे धांवा उतावेळा वो ॥ ४ ॥ मग ते येकांतिची सांगे सखियासी । नका बाहेरिवो

फुटो कोणापाशीं ॥ आणा नंदाचा नंदनु येकांतासी । निळ्या स्वामिची हे भावना निश्चयेसी वो ॥ ५ ॥

॥ १५२९ ॥ देतां आलिंगन नंदाच्या कुमरा । पडेल उतार हे वांचेल सुंदरा ॥ नका आड घालूं संदेह दुसरा । लावा उठवुनि जाउंद्या इतरा वो ॥ १ ॥ ऐसे बोलति त्या जीविच्या जिवलगा । झाला विरह गे वांचवा सुभगा ॥ आणा पाचारुनी गे एकांता श्रीरंगा । दुजा उपावोचि नचले या प्रसंगा वो ॥ २ ॥ आहे ठाउकें हें अंतरीं आम्हांसी । याचा वेध झाल्या दशाचि हे ऐसी ॥ होते आटणि गे जीवा आणि शिवासी । तेथें देहबुद्धी नाठवे देहासी वो ॥ ३ ॥ हृदयीं होतांचि या कामाचा संचार । न्यावा एकांतासि निष्काम यदुवीर ॥ देईल सुख तोचि नाहीं ज्यासि पार । सांडा चावटी आणिक विचार वो ॥ ४ ॥ नाहीं अनुभव हा ठाऊका जयासी । साचि भोगिती या अनुदिनीं दुःखासी ॥ येति जाति पुन्हा होति कासाविसी । आम्ही न विसंबों या सावळ्या कृष्णासी वो ॥ ५ ॥ नाहीं जीवीं या जीविताची चाड । याच्या संगसुखें घालूं वो धुमाड ॥ स्वामी निळ्याचा पुरवील कोड । आणा तोचि आतां सांडा बडबड वो ॥ ६ ॥

॥ १५३० ॥ झाला विरह हे नये देहावरी । देतां औषधें वो आणितां पंचाक्षरी ॥ देवि देवतांची नचले येथें थोरी । नानाउपायांच्या करितां भरोभरी वो ॥ १ ॥ आणा वेगीं तो सावळा सुंदर । मदनमूर्ति वो नंदाचा कुमर ॥ तया भेटतांचि होईल उतार । पुरेल आर्त हे वाचेल सुंदर वो ॥२॥ एकी सखिया त्या येऊनि विनविती । एकी हरिचीया पायावरी लोळती ॥ एकी करुनि पंचप्राणाची आरती । म्हणति चला वेगीं एकांतीं वो ॥ ३ ॥ एकी घालिती हरीसी विंजणवारा । एकी देती विडिया त्या सुंदरा ॥ एकी वारीती वरी चौऱ्या श्रकुमारा । एकी ह्मणती हरि चलावें मंदिरा वो ॥ ४ ॥ एकी देती त्या चंदनाची उटी । एकी लाविती कस्तूरी मळिवटी ॥ एकी घालिती त्या तुळसीमाळा कंठीं । ऐकी ह्मणती आतां चलावें जगजेठी ॥ ५ ॥ ऐसा विनवूनी आणिला सकळीं । एकोनि जीवीं ते सुखावली बाळी ॥ उठोनि सेजेवरी बैसली वेल्हाळी । निळ्या स्वामि तीचे आर्त पुरवि तयेकाळीं वो ॥ ६ ॥

॥ १५३१ ॥ झाला विरह अंतरीं कामिनीसी । नये सांगतां बोलतां

कोणापासी ॥ मुख सुकलें वो तापली विशेषी । आंग कांपे तेणें झाली कासाविसी वो ॥ १ ॥ हृदयीं आठवे श्रीरंग सांवळा । मन चि गुंतलें तयापासि डोळा ॥ कोण आगिल वो तया याचि वेळा । द्यावया आलिंगन जीव उतावेळा वो ॥ २ ॥ कोठें न गमे वो नावडे आणिक । जीवीं जीवामाजी पडियलें ठक ॥ उघडे नयन वो लागली टकमक । कोण आणील तो हरील माझें दुःख वो ॥ ३ ॥ झाली अवस्था ते न कळे कोणासी । जातां सांगों होईल हांसें पिशुनासीं । होईल लाज वो कारण उपहासासी ॥ कांहीं चि न सुचे मी काय करूं यासि वो ॥ ४ ॥ कोण जिवलग वो येईल धावती । माझे जीवीचें आर्त उगविल निगुती ॥ नेदितां कळों कोण आणील श्रीपति । संग त्याचा माझा करील एकांतीं वो ॥ ५ ॥ ऐसि विरहानळें पीडियेली बाळा । हृदयीं आठवितें हरि वेळोवेळा ॥ जाणोनि अंतरीं तो कृपेचा कोंवळा । येऊनि निवविलें तिये ह्मणे निळा वो ॥ ६ ॥

॥ १५३२ ॥ येऊनि जाऊनि करी गौळणिचें कोड । पुरवुनि सकळ ही अंतरींची चाड ॥ नेदि प्रेम त्याचे खंडों करि वाड । ऐसा कृपाळू हा सुखाचा सुरवाड वो ॥ १ ॥ धन्य भाग्याच्या त्या जन्मल्या संसारीं । ज्याचे ध्यानीं मनीं नित्य काळ हरी ॥ करितां काम काज दृष्टी त्याचि वरी । बोलतां चालतां जेवितां निरंतरिं वो ॥ २ ॥ त्याचा विकिला ऐसा राबे त्याच्या घरीं । पडिलें काम काज तेंहि आपण करी ॥ नवचे पळभरी त्या सांडुनियां दुरी । त्याचा नव्हजेचि ह्मणवितां कामारी वो ॥ ३ ॥ त्याचा येवजाव सासुरें माहेर । झाला आपण चि लेणें अळंकार ॥ अवघें धन वित्त गोत परिचार । झाला नाम रूप दीर भावे वर वो ॥ ४ ॥ नेदी उरों त्या आणिक दुसरे । विण आपणा वो सोयरे धायरे ॥ गाई ह्मैशी पशू पोटिचीं लेकुरें । झाला घर दार त्याचे एकसरे वो ॥ ५ ॥ खाती जेवीती ते भोग सकळ ही । झाला आपणचि संचरोनि देहीं ॥ नेदि आपपर ऐसें दिसों कांहीं । निळा ह्मणे ऐसी ऐक्याचि नवाई वो ॥ ६ ॥

॥ १५३३ ॥ सये आनंदाचा अवचिता आला पूर । याचे मुरलीचा उठीतां चि गजर ॥ मि मज नाठवे चि कैचें घर दार । ठेलें तटस्थ चि राहिलें शीर वो ॥ १ ॥ ऐसें मोहन नाटक येणें केलें । जीव चैतन्य वो हरुनियां नेलें ॥ एकलें एकवटाचि करुनी ठेविलें । नाठवे सासुरें ना माहेर ऐसें झालें वो ॥ २ ॥ याचा नवलावो हाचि एक वाटे । जीवीं जीव नुरे

आनंदचि भेटे ॥ तेणें सुखानंदें संसारु चि आटे । मी हें माझें तों न दिसे चि कोठें वो ॥ ३ ॥ मनीं मनासीं ही नुरोनियां थार । हृदय भुवनीं होय याचा चि प्रसर ॥ बुद्धी चाकाटलि राहे निरंतर । सुखी सुखाचा चि होतसे आदर वो ॥ ४ ॥ होतें आपुलीये घरीं वो निश्चळ । कोठें पाहों गेलें याचा निज खेळ ॥ तैंचि पासुनि वृत्ति झालि वो वोढाळ । मनीं नाठवेचि लेंकरूं ना बाळ वो ॥ ५ ॥ एका एकिची पडियेला फासा । याचा नेणोनियां स्वभाव वो ऐसा ॥ माझा मज ची हा नवलावो मानसा । निळा ह्मणे होता संचिताचा ठसा वो ॥ ६ ॥

॥ १५३४ ॥ एकली एक दुजी होति ये सदनीं । तव आयीकिली मुरलीची ध्वनी ॥ गेलें धावोनियां पाहावया लोचनीं । तव गेलिये देहभाव विसरोनी ॥ १ ॥ हरि देखतांची मदनाचा पुतळा । गेला जडोनियां बैसला तो डोळा ॥ मनीं आठवे साजणी वेळोवेळा । नेल्या शोपुनी माझीया जीवनकळा वो ॥ २ ॥ नव्हतें जवळी दुसरें बाई कोण्ही । नको जाऊं ऐसें सांगावया लागुनी ॥ नेईल जीवभाव सर्व हा हरूनी । मग पडसि तूं याचे चि व्यसनीं वो ॥ ३ ॥ ऐसि जाजावोनी बोले सखियाप्रती । येरि टकमका पाहोनि हांसती ॥ ह्मणती जाणोनियां होसि कां नेणती । भाग्यें लाधलिसी धरुनी राहे चित्तीं वो ॥ ४ ॥ आजि तुझिया भाग्यासी नाहीं पार । झाला परिचय पाहीला सारंगधर ॥ ज्यालागीं शिणति हे योगि मुनेश्वर । तोचि तुझे हृदयींचा परात्पर वो ॥ ५ ॥ निळा ह्मणे आजि दैवासि ही दैव । आलें मोडोनि वैभवा वैभव ॥ सकळहि सुखाचीच जोडली राणिव । देखिला यदुपति निजलावण्याची ठेव वो ॥ ६ ॥

॥ १५३५ ॥ होते लेउनियां आर्तिचें अंजन । तेणें देखिलें वो निक्षेपीचें धन ॥ होतें वेदरायें ठेविलें जोडून । तेंचि सांपडलें आईतें निधान वो ॥ १ ॥ जनीं जनार्दन प्रत्यक्षचि होता । तोचि मुसावोनी कृष्ण झाला आतां ॥ मंडित चतुर्भुज वेणु वाजविता । मुगुट कुंडलें वो माळाचा मिरविता वो ॥ २ ॥ प्रगट असोनियां न दिसेची कोणा । आड आलिया वो बुद्धीचि कल्पना ॥ जाय हारपोनि अविद्येच्या भावना । तेणेंचि न देखति भर्ती भगवाना वो ॥ ३ ॥ कैसा माया मोह भ्रम झाला गाढा । नेणें जाणिव ची धांवे पुढा पुढा ॥ विधी निषेधाचा माझारी झगडा । तेणें अंतरला न सांपडे मूढा वो ॥ ४ ॥ इंद्रिया विषयाची सदा लगबग । मातले

अहंकार काम क्रोध मांग ॥ मदमत्सराचे धांवति निलाग । तेणें हातिच्या हाती अंतरला श्रीरंग वो ॥ ५ ॥ ऐसे चुकवुनी आघात अपार । आजि सांपडलें आईतें भांडार ॥ तेणें झालिये वो निजसुखें निर्भर । निळा ह्मणे भोगूं सुखाचे संभार वो ॥ ६ ॥

॥ १५३६ ॥ होतें बहुत दिवस आर्त वागविलें । आजि अकस्मात तें फळ देऊं आलें ॥ दृष्टि श्रीहरिची देखीलीं पाऊलें । घेतले जन्म मागे सार्थक त्याचें झालें वो ॥ १ ॥ धन्य हे आनंदाचि सांपडली वेळ । तेणें संत सज्जन भेटले कृपाळ ॥ त्याणि फेडियला बुद्धीचा वो मळ । दृष्टीं दाखविला यशोदेचा बाळ वो ॥ २ ॥ नाना साधनाच्या केलिया खटपटा । परि त्या न पवति ची वो याच्या दारवंटा ॥ जाणो जातां जाणिव घालि आडफांटा । योगाभ्यासें सिद्धी रोधीताती वाटा वो ॥ २ ॥ यज्ञयागें स्वर्गभोग आड येती । करितां तपें काम क्रोध खवळती ॥ नित्यानित्यज्ञानें अभिमान वाढती । करितां तिर्थाटणें अहंकाराचि चि प्राप्ती वो ॥ ३ ॥ जपतां मंत्रबीजें चळचि घाली घाला । करितां दान धर्म पुढें भोगवितो फळा ॥ सांवळें मिरवितां विधि निषेध आगळा । आतां हेंचि बरवें धणी पाहों याला वो ॥ ४ ॥ ऐसे शोधियले मार्ग नानापरी । न येती प्रतीति मग सांडियले दुरी ॥ आतां गाउनि गीतीं नाचों हा मुरारी । निळा ह्मणे करूं संसारा बोहरि वो ॥ ५ ॥

॥ १५३७ ॥ आजि पुरलें वो आर्तीचें आरत । होतें हृदयीं वो बहु दिवस चिंतित ॥ मना आवरुनि इंद्रियां सतत । दृष्टि पाहों हा धणि वरि गोपिनाथ वो ॥ १ ॥ तेंचि घडोनियां आलें अनायासें । जातां यशोदे घरा वाणाचिया मिसें ॥ आला खेळत खेळत बाळवेषें । कवळि घालि मिठी गद्गदा हांसे वो ॥ २ ॥ मुख अमृताचा मयंक उगवला । दंत हिऱ्याचा प्रकाश फाकला ॥ नयनीं रत्न कीळ तारा वो झमकला । देखतां हृदयीं निज वास त्याचा झाला वो ॥ ३ ॥ जन्म जन्मांतरीं बहु केले सायास । याचे भेटिलागीं व्रतें उपवास ॥ सेविलीं गंगेची तटाकें उदास । त्याचिया सुकृताचे आले नेणो घोष वो ॥ ४ ॥ आजि आनंदाशीं आनंद माझ्या झाला । आजि सुखाशीं सुखें लाभ केला ॥ आजि हर्षाशीं हर्ष भेटों आला । तेणें श्रीरंग निज दृष्टी स्थिरावला वो ॥ ५ ॥ भोग भोगितां वो

सरले समस्त । गेलें उडोनियां प्रालब्ध संचित ॥ विटलें विषया वरुनियां चित्त । निळा ह्मणे घडला हरिशीं एकांत वो ॥ ६ ॥

॥ १५३८ ॥ माझें मजचि वो आतुडलें गुज । नाहीं आणिकाचें कामा आलें काज ॥ सांडिली लौकिकाची बरें झालें लाज । तेणें लाधलीये निजाचें ही निज वो ॥ १ ॥ पडिली गांठी या गुणा सवें । एकनिष्ठ वो शरण जातां भावें ॥ मनींचें राखतां वो आर्त नित्य नवें । झाला प्रसन्न हा देवाचाही देव वो ॥ २ ॥ याचिलागि म्या सोशिले गर्भवास । घेतले जन्म वो याचीच केली आस ॥ नाहीं देखिले वो कोणाचे गुण दोष । ह्मणोनि कृपावंत झाला हा परेश वो ॥ ३ ॥ जें जें अर्चिलें तें सुकृत याचि साठीं । नाहीं वेचिलें वो जतन केलें गांठीं ॥ भोगीं त्यागीं वो याचि वरि दीठी । ह्मणोनि आजि हा लाधलें जगजेठी वो ॥ ४ ॥ धरिले जन्म ते सार्थक झाले माय । भेटवुनी याशीं वो फळले उपाय ॥ चुकले अवघेचि आघात अपाय । ह्मणोनि आलिंगन देति यादव राया वो ॥ ५ ॥ केलें ब्रीद वो साच येणें काळें । अनाथबंधु हें दीनाच्या दयाळें ॥ केली कृपा वो पुरविले सोहळे । ह्मणोनि निळा नित्य चरणावरी लोळे वो ॥ ६ ॥

॥ १५३९ ॥ येणें एकलें वो जाणें ही शेवटीं । येथें राहाणेंचि नाहीं कल्पकोटी ॥ जोडिलें धन तें न चले लक्ष कोटी । ह्मणोनि आलियें या सांवळियाचे भेटी वो ॥ १ ॥ आतां घाला वो याच्या पायां वरी । हाचि चुकवील जन्माचि भोवरी ॥ शिणलें बहुत वो चौऱ्याशीचे फेरी । तोडील चिंता हा हे चि आशा थोरी वो ॥ २ ॥ बहुत गांजियेलें माया मोह भ्रमें रततां विषयीं या विषयाच्या कामें ॥ करितां भरोवरी रित्या मनोधर्में । याशी कृपा येतां हरील हा कर्मे वो ॥ ३ ॥ कामक्रोधीं वो जांचिलें बहुत। नेदी राहों वो क्षण एक निवांत ॥ वरी पडती वो गर्वाचे आघात। ह्मणोनि विनवणी सांगा वो त्वरित वो ॥ ४ ॥ आशा कल्पना या मातल्या पापिणी । मनसा चिंता डंखिती सर्पिणी ॥ येती लहरे वो जाणिवेची जाचणी । ह्मणोनि विनवितें हे चि क्षणक्षणीं वो ॥ ५ ॥ आहे शेवटिचें माझें येथें पेणें । वाटे निश्चय हा याचिया दर्शनें ॥ राहिलें चित्तीं वो याचेंचि चिंतन । निळा ह्मणे आजि ऐकिलें गाऱ्हाणे वो ॥ ६ ॥

॥ १५४० ॥ काय करूं वो भुलविलें भुली। चित्त माझें या विषयाचे चाली॥ आडकल्पना ठाकोनि राहिली। साणें संगति वो याची अंतरली वो॥ १॥ पायां

पडतें वो दाखवा मज वाट । कर्माकर्मा चुकवुनियां घाट ॥ कामक्रोधाचे ऐकोनि वोभाट । भय वाटेतें हें देखोनि दुर्घट वो ॥ २ ॥ मज तो विचार न सुचे आपुल्या मतें । न्याल तुह्मी त्या येईन सुपंथें ॥ घेउनि धर्म मज पाववा वो तेथें । जेथें असती सांवळे गोपीनाथ वो ॥ ३ ॥ कोठें गेले या करूं वोरवारा । आगीं लागो या अघोरा संसारा ॥ पडते गुंति हा अधिक चि पसारा । भेटवा आतां मज न्या वो सारंगधरा ॥ ४ ॥ येथें होती हे बहुत चि उत्पात । जन्म जरा या व्याधीचे आघात ॥ भुललें वाट वो न मिळतां संघात । तुह्मि पाववा वो रमानाथ जेथें वो ॥ ५ ॥ आहे भरंवसा हा तुमचा चि मज । संत जाणतसां अंतरीचें गुज ॥ आले शरण ते पावती सहज । निळा ह्मणे आतां राखा माझी लाज वो ॥ ६ ॥

॥ १५४१ ॥ वदन निमासुरें कडावरी कर । उभा वीटेवरी पुंडलीका समोर ॥ चरणी ब्रीदावळी रुळती असुर । वरी वाळे वाकी रुणझुणिती मधुर वो ॥ १ ॥ तेणें नवल चि केलें वो साजणी । सहज अवलोकितां संचरला नयनीं ॥ त्याविण न दिसे चि दुजें जनीं वनीं । जें जें दिसे तें तें हा चि भासे मनिं वो ॥ २ ॥ कांसे कसिला वो पिरवे सोनसळा । कटीं कटिसूत्र जडित मेखळा ॥ उदरीं त्रिवळी वो तुळसी वनमाळा । कौस्तुभ पदकें द्विजचरणांकुश सोज्वळा ॥ ३ ॥ मुखमयंक पूर्णांशें उगवला । भक्तचकोरासी अमृतें वरुपला ॥ दंत हिऱ्याचा प्रकाश फांकला । आधार सोज्वळ वो नासाग्र सरळा वो ॥ ४ ॥ निडळिं रेखिलें वो केशर झळके । श्रवणीं कुंडलांचें तेज बहळ फांके ॥ नयनीं सुतेज विद्युल्लता चमके । माथां मुगुटावरी मयूरपिच्छ स्तवकें वो ॥ ५ ॥ सुंदर साजिरे वो स्वरूप ठाण माण । तेणें आकर्पिले माझे पंचप्राण ॥ नावडे आणिक वो त्याचि चि मज आण । निळा ह्मणे मी माझी याचि झाली बोळवण वो ॥ ६ ॥

॥ १५४२ ॥ मी मज माझी याचा तुटला संबंध । ऐसा लाविला वो येणें मज वेध ॥ जीवीं जीवाचा हा मोडील कंद । नुरे देहभाव ऐसा केला बोध वो ॥ १ ॥ सखिये साजणी ऐके माझें गुज । यासी पाहतां वो बोलतां सहज ॥ नेलें हरूनियां अंतरीचें निज । पुढें नाचवी हा आपुलें चि भोज वो ॥ २ ॥ करितां काम धाम विसरचि पडे । ध्यानीं आ[illegible] वो याचे चि रुमडे ॥ राहे वेष्टुनियां हाचि मागें पुढें । या विण न दिसे चि केलें मज वेडें वो ॥ ३ ॥ करितां भोजन वो निजतां शयनीं । जागृती

जागतां वो बोलतां वदनीं ॥ हाचि जडोनियां ठेला माझे मनीं । नेदी हा पारिखेंचि दिसों जनीं वनीं वो ॥ ४ ॥ नेदी उमजों हा येऊं देहावरी । केली माझिया संसारा बोहरी ॥ हाचि व्यापुनियां ठेला घरीं दारीं । ऐसा नाटक हा नंदाचा खिल्लारि वो ॥ ५ ॥ येणें ऐशाचि वो मोहिल्या सुंदरा। नेल्या भुलवुनि आपुल्या मंदिरा ॥ हें मी नेणोनियां गेलें याच्या दारा । तव निळा ह्मणे वेधिलें अंतरा वो ॥ ६ ॥

॥ १५४३ ॥ माझ्या मीपणाचा करुनि फराळ । उरलें खावयासि बसलौ सकळ ॥ ऐसा भुकाळू हा नंदाचा गोवळा । यासि न पुरे चि ग्रासितां माझा खेळ वो ॥ १ ॥ आतां काय देऊं नसतां जवळी । संचित प्रालब्ध तें भक्षिलें समुळीं ॥ कर्मा कर्माच्या घेतल्या कवळी । विषय वासना त्या ग्रासिल्या निमिष मेळीं वो ॥ २ ॥ भक्षिले संपत्ती विपत्तीचे भोग । कांहीं नुरवितां चि कोणाचा ही भाग ॥ अवघे भक्षूनियां नुरवि हा माग । नाम रूप तेंही नेंदिची उरों सोंग वो ॥ ३ ॥ ऐसा भक्षूनियां पूर्ण नव्हे कधीं । अवघ्या भक्षूनियां संसार उपाधी ॥ जीव भावाचिया नुरवुनियां आधी । केलें एका एकीं निज रूप अनादि वो ॥ ४ ॥ आधिचीं दुर्बळ मी नव्हती कांहीं जोडी । पूर्वींच भक्षूनियां गेला वो तातडी । आणूं कोठुनि वाढूं या परवडी हा तो भुकाळूचि सदाचा बराडि वो ॥ ५ ॥ आतां तृप्ति लागीं दीसे एक शेवटीं । भाव भक्ति याचे वो गरिन ताटीं ॥ तेणेंचि होईल या क्षुधेची संतुष्टी । ऐसें निळा ह्मणे विचारिलें पोटीं वो ॥ ६ ॥

॥ १५४४ ॥ भाव भक्तिची या प्रीती जेवविला । देउनि ढेकर वो पूर्णपणें धाला ॥ नेणों आनंदाचा प्रवाह लोटला । ऐसिया स्वानंदाची वचनें अनुवादला वो ॥ १ ॥ ह्मणे केले तेपावले उपचार । तुह्मीं आवडिनें प्रेमाचे प्रकार ॥ झाली तृप्ति आतां घ्या वो देतों वर । पुन्हा नातळो हा तुह्मासि संसार वो ॥ २ ॥ तातल्या सोसुनियां विरक्तीच्या ज्वाळा । बरव्या शिजविल्या समृद्धी सकळा ॥ झाला रस स्वाद भोजनीं आगळा । वाढिलीं पंचामृतें जवितां जे वेळो वेळावो ॥ ३ ॥ ऐसे जेउनियां धाले विश्वंभर । भक्ता उभविला अभयाचा कर ॥ काढुनी घालिती कंठीचे तुळसी हार । निळ्या स्वामी गौरविती वारंवार वो ॥ ४ ॥

॥ १५४५ ॥ देवें भक्तालागीं उपचार मांडिले । शांति सुखासनीं मानें बैसविलें । धरुनि तन्मयाचीं छत्रें गौरविलें । ज्ञानसंपत्तीचे दळभार दिधले

॥ १ ॥ सुखें राज्य करा ह्मणे त्रिभुवनीं । माझें ऐश्वर्य हें सर्वांगीं लेउनी ॥ मिरवा भूषणें हीं यश कीर्ति दोन्ही । माझीं आयुधें हीं देतों संतोषोनी वो ॥ २ ॥ शांति विरक्ती हे मूर्तिमंत दया । क्षमा नित्यानंदें तुह्मा अर्पिलीया ॥ अखंड नैराश्यता सेवे तुमचिया । ठेविली निकट वासे नवजाति आनटा-या वो ॥ ३ ॥ निळा ह्मणे ऐसा भक्ताचा समुदाय । देवें आनंदविला प्रीती च्या उत्साहें ॥ ह्मणे निर्भय असा जवळिच मी आहे । भोगा सुख माझें निजाचें अद्वय वो ॥ ४ ॥

॥ १५४६ ॥ माझी मजाच वो पडियली भुली । गेलें मर्यादा वो विसरोनि आपुली ॥ याची अणुमात्र पडताचि साउली । वृत्ति तदाकार होउनियां ठेली वो ॥ १ ॥ आलें वाचे तेचि करितोंचि करिते बडबड । नये भ्रांतीचे वो वस्त्र दृष्टी आड ॥ मना आलें तैसा नाचतें धुमाड । नेणों काय पुरें आरंभला नाड वो ॥ २ ॥ नाहिं देखिलें तें येउनि पडे दृष्टी । तेंचि उच्चारे वो येउनि वाचे ओठीं । नेणोनि अनुभवा ज्ञानाची कसोटी । नेणो काय येउनी साठवलें पोटीं वो ॥ ३ ॥ वाचे अनिर्वा-च्य येउनि आदळे । हृदयीं वाउगेचि होताती सोहळे ॥ उठिति स्फूर्तिचे चि क्षण क्षणा उमाळे । माझिये जाणीवेचे फोडुनि पेंडोळे वो ॥ ४ ॥ होतें तैसें तुह्मा जिवेंदिलें पाईं । नकळे यावरी तुमचे कृपेची नवाई । ठेवाल जैसे तेथें राहावे तेठाईं । कैंचि सत्ता आज्ञा बोलावें तें काई वो । ५ ॥ यावरी कराल तें तुह्मि करा देवा । मी तो नुरोनियां उरलें देह भावा । कांहींचि नेणोनियां हिता हित तेव्हां । निळा ह्मणे साक्षी तुह्मिचि या सर्वा वो ॥ ६ ॥

॥ १५४७ ॥ ऐशि या सुखा माजी राहे न सुखरूप । दुजा वागों नेदी आड येउं संकल्प ॥ भोगिन याचेचि वो सर्वदा पडप । करूनि भावना अखंड तद्रूपवो ॥ १ ॥ ऐशी हे निश्चयाची सांगितली मात । तुह्मी ही आयकाहो कृपावंत संत ॥ नकळे माझा मज सत्याचा इत्यर्थ । तुह्मीचि दावाल तो मानीन हितार्थ ॥ २ ॥ येईल चित्तासि ते सांगा विचारुनी । माझें निजहित तें चि विवरुनी ॥ मि तो नेणेचि वा याची ये वाहाणी । हे चि कळासले हृदयभुवनीं वो ॥ ३ ॥ हाचि निजानंद आवडला मना । करूं सर्व काळ हेचि विवंचना ॥ रूप दृष्टीपुढें धरूनि गाउं गुणा । करूनि तदाकार वृत्तीची भावना वो ॥ ४ ॥ याविण नावडे चित्ता ऐसें झालें ।

दिवसारात्रि हें ध्यानचि लागलें ॥ सांगति ईतरे तें नमनेचि भलें । नेणो कोण ऐसें कर्म उभें ठेलें वो ॥ ५ ॥ हेंचि राहेन वो धरुनियां दृष्टी । रूप नागर वो मुरली वाये वोटी ॥ खांदिये घोंगडें वो घेउनि वेताटी । चाले गाईमागें सवें गोवळ थाटी वो ॥ ६ ॥ ऐसिये आवडिचें पुरविलें आरत । घेउनि एकांतीं वो भेटले गोपिनाथ ॥ तेणें मानस वो माझें झालें स्वस्थ । निळा ह्मणे वो भोगिन एकचित्त वो ॥ ७ ॥

॥ १५४८ ॥ एकलें न कंठवे याविण मज आतां । घेउनि विचरेन सवें प्राणनाथा ॥ जनिं वनिं वो एकांतिं वसतां । न करिं वेगळा ही युगें कल्प जातां वो ॥ १ ॥ हातीं लागला वो युगादिचा निध । भाग्यें माझिया वो जोडियला सिद्ध ॥ करुनि उपचार पूजिन सावध । न वंचिं शरीर सेविन एकविध वो ॥ २ ॥ याचिये संगती घो सुखाचिया कोडी । वेचतां युगें कल्प मज वाटे घडी ॥ भोगीन नित्य नवा जीवाचे आवडी । भरुनि निज दृष्टि पाहेन घडि घडि वो ॥ ३ ॥ अवघे निवेदिन अंतरिंचे भोग । यासि करुनियां सये अंगसंग ॥ कांहीं न वंचितां मन बुद्धि अंग । भोगिन निजसेजे घेऊनि श्रीरंग वो ॥ ४ ॥ सागें जीवाचिया घालिन यासि मिठी । जातां युगसंख्या कल्पाचिया कोटी ॥ धरिन अंतरिं वो बांधोनियां गांठी । यावरि न करिं मी कदा यासि तुटि वो ॥ ५ ॥ कळे अंतरींचा भाव या परेशा । होय प्रियवादें जैसा केला तैसा ॥ पुरवी निजदासीं केला जो भिवसा । निळा म्हणे आहे कृपावंत ऐसा वो ॥ ६ ॥

॥ १५४९ ॥ याचिलागिं वो सजियले भोग । याचिलागिं वो केले नाना याग ॥ याचिलागिं वो अष्टांगादि योग । याचिलागिं या विषयांचे त्याग वो ॥ १ ॥ जन्मजन्मांतरिं केली हे सूचना । याचिलागिं वो वस-विले निर्जना ॥ भक्षुनि फळ मूळ प्राशीलें जीवन । याचिलागिं वो केलें तीर्थाटण वो ॥ २ ॥ याचिलागिं वो आसनीं शयनीं । केली निरंतर याचि चिंतवणी ॥ बैसलें भरुनियां रूप निज ध्यानीं । नामीं नेमियेली नित्य याचे वाणि वो ॥ ३ ॥ याचिलागिं वो मंत्रजप केला । याचिलागिं वो वेदांत पाहिला ॥ याचिलागिं वो निजधर्म अनुष्ठिला । याचिलागिं म्यां संसार [illegible]जिला वो ॥ ४ ॥ याचिलागिं वो सत्संग साधन । याचिलागिं हें नित्यानित्य ज्ञान ॥ केले सायास ते याचि वो लागून । याचिलागिं नियमीं निरोधिलें मन वो ॥ ५ ॥ याचिलागिं मी जालोंये उदास । सांडुनि आपु-

लिया पारिख्याचि आस ॥ याचिलागिं वो याचा निजध्यास । धरिला निळा म्हणे निशिदिनीं ध्यास वो ॥ ६ ॥

॥ १५५० ॥ येणें आपुलिया कृपेचिया गुणें । माझीं पोषिलीं वो सर्वांग जीवनें ॥ देउनी क्षेम अवघीं निववलीं करणें । यासि काय देउनि व्हावें म्या उत्तीर्ण वो ॥ १ ॥ माझे जीवींचा हा जिवलग सोयरा । यासी करुनि काय पूजावें उपचारा ॥ जें जें कीजे तो तो उपाधी पसारा । कैसेनि पावेल या निज निर्विकारा वो ॥ २ ॥ करुनि पूजुं जव मंत्रतंत्र जप । तव हा शब्दातीत निर्गुण अरूप ॥ कोण करूं यासि न पवेचि वो तप । ध्यानिं ध्यातां हा अरूपि अरूप वो ॥ ३ ॥ यासि न पुरे वो जाणिवे जाणतां । यासि न चले वो शाहाणीव करितां ॥ नानातर्क वाद यापुढें वृथा । आतां कोणा करूं उपचार तत्वता वो ॥ ४ ॥ करितां योगाभ्यास न पवे ती सिद्धी । करितां नानायाग वाढति उपाधी ॥ नित्यानित्य ज्ञानें अभिमानाचि वृद्धी । आतां कोण्यायुक्ति तोषवूं कृपानिधी वो ॥ ५ ॥ ऐसें जें जें करूं ह्मणे आपुलिये मती । तें तें सांडि परतें न धरि हा हातीं ॥ येकचि आवडे या शुद्धभावभक्ती । निळा ह्मणे वर्म दाविलें हें संतीं वो ॥ ६ ॥

॥ १५५१ ॥ एक ना दुसरें वो नव्हतें मजपासीं । मी मज नोळखतां आप आपणासी ॥ होति ये निर्जनीं वो निराभास देसीं । नेणों कोणें आणियेलें कर्म भूमिसी ॥ १ ॥ तैंचपासुनियां विसरलें निजसुखा । वाटे जीव माझाचि परि मज वो पारिखा ॥ देखोनि आपपर पात्र जालें बहु दुःखा । सांगों कोणापासिं सये जाला ऐसा वाखा वो ॥ २ ॥ मी मज माझियानि वेढाळिलें बाई । चित्तासि या चिंतनें वो घातलें प्रवाहीं ॥ नेणें चि विश्रांति कोठें विचरतां मही । जेथुनियां आलिये ते नाठवेचि कांहीं वो ॥ ३ ॥ नराते चि काम क्रोध लागले हे वैरी । येउनियां आशा चिंता बैसल्या जिव्हारीं ॥ द्वेष निंदेचिया नित्य नानाभरोवरी । कामना कल्पना ह्या दाटल्या शरीरीं वो ॥ ४ ॥ किती तरी करूं वो या संसारा पुरवणी । किती सोसूं येऊं जाऊं यमाचि जाचणी ॥ किती येऊं जाऊं भोगुं नानायातिचिया खाणी । किती गर्भवासीं बैसों थार अडचणि वो ॥ ५ ॥ ऐसि जाजावलि बहु अनुतापें बाळा । घेउनियां विकृतिया विषयाचा [illegible]टाळा ॥ मनोभावें चिंतिला वो श्रीरंग सांवळा । पावली निजस्थान पुनरपि ह्मणे निळा वो ॥ ६ ॥

॥ १५५२ ॥ पाहों गेलियें वो नंदाचा नंदन । नेत्रिं लेऊनियां आर्तिचें ‑जन ॥ जेथें उभा होता राजीवलोचन । भोंवते मेळउनी गाडि संत सज्जन वो ॥ १ ॥ दृष्टि तेथें हि निवालि वो इंद्रियें सकळ । जालियें तटस्थ चि देखोनियां घननीळ ॥ मुकुट विराजित कुंडलें वनमाळ । सुंदर श्रीमुख चतुर्भुज सरळ वो ॥ २ ॥ शंख चक्र हातीं गदा पीतांबरधारी । देव्हडा पाउलिं वो मुरलि अधरीं ॥ वाजवितां सप्तस्वर उमटति माझारी । देखतां देहभाव नुरतीच शरीरीं वो ॥ ३ ॥ वेधीं वेधले वो ज्याचे विधाता हरिहर । इंद्रआदिकरुनी सकळहि सुरवर ॥ सिद्ध महामुनि योगि ऋषीश्वर । नारद तुंबरादी महानुभाव थोर वो ॥ ४ ॥ तेथें कोण पाड आह्मा मानवांचा । ज्यातें न पुरति स्तवितां वेदवाचा ॥ नकळे महिमा वो याच्या स्वरूपाचा । नयनिं पाहतांचि सुकाळ सुखाचा वो ॥ ५ ॥ रूप नागर वो सुंदर गोजिरें । चरणीं वाजती वो मंजुळ रुणझुणिति नेपुरें ॥ ऐकतां निजानंदा होतसे चेईरे । निळा ह्मणे माझें तेथेंचि मन मुरे वो ॥ ६ ॥

॥ १५५३ ॥ मनिंचा माझिये वो संदेह फीटला । देव पाहों जातां जवळिच भेटला ॥ अवघा मागें पुढें तो चि वो ठाकला । जनीं जनार्दन भरोनियां दाटला वो ॥ १ ॥ पुरलें जीवींचें आरत साजणी । पाहे जेथें तेथें दिसे चक्रपाणी ॥ लोक लोकांतरीं याचि चि भरणी । भरोनि उरला अवघ्याचि वाणि खाणि वो ॥ २ ॥ जाला सुकाळ हा सुखाचा मानसा । पडिला त्रिभुवनिं एकरूप ठसा ॥ धरा व्यापुनियां अंबर दशदिशा । आतां भोगीन मी सर्वकाळ ऐसा वो ॥ ३ ॥ नानाभूताकृति एकाचि आभासे । नानानामें आळवितां वो देतसे ॥ नाना अळंकार एकाचि लेतसे । नागिवा उघडा ही बरवाचि हा दिसे ओ ॥ ४ ॥ नानावस्त्रें हा नेसला पांघुरला । जेथील तेथेंचि हा बहुरंगें नटला ॥ शस्त्रें अशस्त्रें हा हातें मिरवला । सौम्य क्रूर ऐसा होउनियां राहिला वो ॥ ५ ॥ एका नीववी भोगवी नाना भोग । ऐका खावावि जेवावि दावी जग ॥ एका विचरे देउनि अंगसंग । निळा ह्मणे हा एकलाचि अनंग ॥ ६ ॥

॥ १५५४ ॥ नित्य श्रीहरीचे आठवितें गुण । वदनीं याचिया वो नामाचें स्मरण ॥ हृदयीं धरुनियां निजभावें चरण । करितें अनुदिनीं हेंचि अनुष्ठान वो ॥ १ ॥ येथें आलियें वो याचि निजकार्या । केलीं कर्में तीं मागील भोगाया ॥ आतां घडती तीं यातें समर्पाया । नाहिं भय त्या निजस्थाना

जावया वो ॥ २ ॥ वाचे अमत्याचा नेदि लागों वारा । केलें सांडणें वो देह संसारा ॥ चित्ती विषयाचा मोडियला थारा । नाहिं गुंतलें या दंभ अहंकारा वो ॥ ३ ॥ संतीं सांगितलें केलें तें जतन । नाहीं आज्ञे साचे केलें उल्लंघन ॥ मत मतांतरा नाहिं दिल्हें मन । हृदयीं धरिलें या हरिचें चिंतन वो ॥ ४ ॥ कांहीं ठाकलें तें केलें लोकहित । काया वाचा वो हें वेचुनियां चित्त ॥ नाहीं वंचुनिया ठेविलें संचित । काळ याचि परि सारियेला वो ॥ ५ ॥ नित्य नवा वो हा आवडिचा दिस । केला करूनियां कीर्तनीं उल्हास ॥ नाहीं गोवियला कोठें आशापाश । निळा ह्मणे वर्तोनि उदास वो ॥ ६ ॥

## पुरवणी.

॥ १५५५ ॥ उपरम झाला सर्वकाळ इंद्रियां । स्वरूपीं विलया मन गेलें ॥ १ ॥ ऐशिया स्वानंदें बुझाविलें चित्त । राहिली अचिंत वदनीं वाचा ॥ २ ॥ अष्ट अविर्भाव हउरले अंगीं । प्राणी प्राणरंगीं निजवासें ॥ ३ ॥ भयबंध ठसा पडिला शरीरा । वृत्ति गेली घरा निजाचिया ॥ ४ ॥ निमोनियां गेलें शब्दाचें बोलणें । पवनूचि प्राणें शोपियेला ॥ ५ ॥ निळा सुखासुखीं पावला विश्रांति । पद पिंडा समाप्ति करूनियां ॥ ६ ॥

॥ १५५६ ॥ कृष्णरूपा वेधल्या नारी । देखती अंतरीं तेंचि रूप ॥ १ ॥ गमनीं शयनीं आसनीं भोजनीं । देखती जनीं वनीं दृष्टीपुढें ॥ २ ॥ एकांतीं लोकांतीं घरी दारीं बाहेरी । ह्याविण निजाचारीं नेणती दुजें ॥ ३ ॥ निळा ह्मणे सर्वहि त्याचा परिवार । हाउनी सारंगधर ठेला घरीं ॥ ४ ॥

॥ १५५७ ॥ देखती तें विठ्ठल रूप । वाचे विठ्ठल नाम जप ॥ १ ॥ तेहि विठ्ठल झाले अंगें । मोह ममता विषय त्यागें ॥ २ ॥ विठ्ठल कीर्ति लेइले अंगीं । विठ्ठल झाले भोगीं त्यागीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे विठ्ठल झाले । द्वैतभावातें मुकले ॥ ४ ॥

॥ १५५८ ॥ देवाभेटी संतपण विरे । देवपण नुरे संतभेटीं ॥ १ ॥ ब्रह्मानंदें निमग्न झाले । आप विसरले आपणा ॥ २ ॥ भक्तीचे आवडी झाले भिन्न । एकचि जीव प्राण उभयतां ॥ ३ ॥ निळा ह्मणे स्वसुख शोभा । एकिचि प्रभा दा ठायीं ॥ ४ ॥

॥ १५५९ ॥ निराश्रित वाटे मनीं । पडिलों जनीं एकला ॥ १ ॥ कृपेविण

मच्या देवा । हळहळ जीवा बहु वाटे ॥ २ ॥ आजिचा दिवस उद्यां नये । आयुष्य जाय क्षणक्षणा ॥ ३ ॥ निळा ह्मणे करूं काय । न दिसे उपाय प्राप्तीचा ॥ ४ ॥

॥ १५६० ॥ पाचारितां पंढरिनाथा । संचरे तत्वता हृदयांत ॥ १ ॥ ऐसा प्रताप आणिका अंगीं । नाहीं ये युगीं विवरितां ॥ २ ॥ संगतीं अन्यत्र दैवतें भूतें । आशा लोलिंगते ते कायें ॥ ३ ॥ निळा ह्मणे जन्ममरणा । करि निवारणा एक हरि ॥ ४ ॥

॥ १५६१ ॥ पांडुरंगें सत्य केला अनुग्रह । निरसूनियां देह बुद्धिभेद ॥१॥ येऊनी एकांतीं उपदेशिलीं कानीं । बीजमंत्रें दोन्हीं नीजाक्षरें ॥ २ ॥ जीव शिवा सेज रचिली आनंदीं । आरुढावें पदीं आरोहण ॥ ३ ॥ निजीं निजरूपीं निजविला निळा । अनुहातें बाळा हुल्लर गाती ॥ ४ ॥

॥ १५६२ ॥ प्रवृत्ति निवृत्तिचे आदुनियां भाग । उतरिलें चांग रसायण ॥ १ ॥ ज्ञानाग्नी हुतासी कढसीले वोजा । आत्मसिद्धि काजा लागुनियां ॥ २ ॥ ब्रह्मरस ब्रह्मीं सिद्ध झाला पाक । घेतला रुचक प्रतीति मुखीं ॥३॥ स्वानुभवें अंगीं झाला समरस । साधन निजध्यास ग्रासोग्रासीं ॥ ४ ॥ आरोग्यता निळा पावला अष्टांगीं । मिरवला रंगीं निजात्म रंग ॥ ५ ॥

॥ १५६३ ॥ वाचा गुणीं लांचावली । मति विस्तारें फांकली ॥ १ ॥ ऐसी केली तुह्मी दया । कृपाळुवा पंढरीराया ॥ २ ॥ सर्वकाळ ध्यानीं मनीं । रूप राहिलें चिंतनीं ॥ ३ ॥ निळा ह्मणे भूक तान । गेली ठायींचि हरपोन ॥ ४ ॥

॥ १५६४ ॥ सदा सेवकांचा लाड । पुरवा करूनियां कोड ॥ १ ॥ जेंवि कृपावंत माय । तान्हयाच्या भणि धाय ॥ २ ॥ खाववा जेववा । लेणीं लुगडींहि त्या पुरवा ॥ ३ ॥ निळा ह्मणे दिवानिशीं । नेणा विसंबों तयासी ॥ ४ ॥

॥ १५६५ ॥ स्थिरावल्या वृत्ति पांगुळला प्राण । अंतरींची खूण पावोनियां ॥ १ ॥ पुंजाळले नेत्र झाले अर्धोन्मीलित । कंठ सद्गदित रोमांच आले ॥ २ ॥ चित्त नाकटलें स्वरूपा माझारि । न निघे बाहेरि सुखावलें

॥ ३ ॥ सुनीळ प्रकाशें उगवला दीन। अमृताचें पान जीवनकळा ॥ ४ ॥ शशी सूर्या झाली जीवें ओंवाळणी । आनंदा दाटणी आनंदाची ॥ ५ ॥ निळा सुखासनीं प्रेमेंसी डुल्लत । विराला निश्चित निश्चितीनें ॥ ६ ॥

॥ १५६६ ॥ सहजचि तुमचीं वंदिलीं पाउलें । तंव मी माझें हें हिरोनी घेतलें ॥ १ ॥ आतां कोण दर्शना येईल सांगा । स्वभाव कळल्यावरि तुमचा पांडुरंगा ॥ २ ॥ हें काय तुह्मासी बोलिलें विहीत । चोरोनियां घ्यावें आमुचें संचित ॥ ३ ॥ प्रालब्ध भोग जे द्यावयासी येती । अभिलाषुनी तेहि भोगितां श्रीपती ॥ ४ ॥ आतां क्रियमाण संग्रह जो करावा । तोहि वरिच्यावरी तुह्मींचि हरावा ॥ ५ ॥ अवघेंचि आमुचें घेऊनियां अंतीं । जीवभाव तेहि बुडवावे पुढती ॥ ६ ॥ निळा ह्मणे सर्वस्वें उघडाच केला । तुमचिये संगतीं दैव हा लाधला ॥ ७ ॥

॥ १५६७ ॥ शोधोनी अन्वय वंश वंशावळी । परंपरा कुळीं उच्चारण ॥ १ ॥ ह्मणविलें पूर्वीं जैसें होतें तैसें । केलें सामरसें समाधान ॥ २ ॥ एक छत्र झळके उन्मनी निशाणीं । अनुहाताचा ध्वनी गगन गर्जे ॥ ३ ॥ निळया स्वामी स्थापी निजपदीं दासां । करुनी उल्हास आवडीचा ॥ ४ ॥

॥ १५६८ ॥ होतें तैसें पायीं केलें निवेदन । अंतरलों दिन बहुत होते ॥ १ ॥ संबोखुन केलें समाधान चित्ता । ओंगरूनि भाता प्रेमरस ॥ २ ॥ नामरत्नमणी करूनि भूषण । अलंकारि मंडण माळा दिली ॥ ३ ॥ निळा ह्मणे तेणें सुखें झाला निरामय । नामीं नाम सोय निमग्नता ॥ ४ ॥

॥ १५६९ ॥ हाके सवें उडी । घालोनियां स्तंभ फोडी ॥ १ ॥ ऐसी कृपावंत कोण । माझे विठाई वांचून ॥ २ ॥ करितां आठव । धांवोनियां घाली कव ॥ ३ ॥ निळा ह्मणे गातां । नामें द्यावी सायुज्यता ॥ ४ ॥

समाप्त.

BOMBAY:—PRINTED AT THE "TATVA-VIVECHAKA" PRESS.